म. ग्रं. सं. ठाणे

विषय
लेखक
सन
संग्रहालय क्रमांक
पुस्तकाचें नांव

१८

इति.

# मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

१७५० पासून १७६१ पर्यंत.


विश्वनाथ काशीनाथ राजवाडे

यांनीं शोधिलेलीं


आपल्यांत दुही पडते, तेव्हां शत्रूस बळ फावतें ( रघुनाथरावदादा, लेखांक ७१ ).

सर्वांचें एकचित्त असतें, तेव्हां कार्य होतें ( गोविंदपंत बुंदेले, लेखांक १३३ ).


वाई येथें

मोदवृत्त छापखान्यांत छापिलीं

१८९८

# शुद्धिपत्र.

शुद्धिपत्राचा उपयोग केल्यानंतर ग्रंथ वाचावा.

## प्रस्तावना.

| पृष्ठ. | पंक्ति. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २९ | ३ | हुद्याला | हुद्याचें |
| ३६ | २२ | १७२९ | १७११ |
| ४८ | १० | संपत्ती | संपत्तीचे |

## ग्रंथ.

| पृष्ठ. | पंक्ति. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १, टीप | ९ | सहा | दहा |
| ११, टीप | ९ | २३ | १५ |
| २२, टीप | २ | १६८ | १६१ |
| २५, टीप | २ | १६८ | १६१ |
| ७१, टीप | १ | २५ | १५ |
| ९३, टीप | १ | समानी | सानी. |
| ९५, टीप | १३ | दादा, भाऊ व बाबा | भाऊ, दादा व बाबा |
| ९७, टीप | ११ | २१७ | २५७ |
| १६२ | १७ | २३ | २६ |
| १७४ | १५ | १ | २ |
| ७९ | १ | ५ | ४ |
| २ | ५ | ५ | ४ |
| १८३ | १ | ५ | ४ |
| २१३ | ९ | २५ जुलै १७५९ | १७६० |
| २१४ | ९ | १७५९ | १७६० |
| २२३, टीप | ४ | ३६ | १३८ |
| २२३, टीप | ९ | ३६ | १३८ |
| २३९, टीप | २ | ४५ | १४७ |
| २४०, टीप | १४ | ४५ | १४७ |
| २४९, टीप | ७ | ३७ | १३९ |
| १२ | २ | येरण | येरच |

... ग्रंथ संग्रह ... नं. ... ता. ... ठाणे.

# प्रस्तावना.

## १. पूर्वजांच्या इतिहासाची आस्था महाराष्ट्रांत अलीकडील तीस पस्तीस वर्षांत नव्यानें झाली आहे.

( अ ) यूनिव्हर्सिटी स्थापन होण्याच्यापूर्वी दादोबा पांडुरंगादि जी मंडळी झाली त्यांचा काल शालोपयोगीं लहानमोठीं पुस्तकें रचण्यांत गेला. इतिहासाचीं साधनें शोधून काढण्याच्या कामीं हळहळ दाखविण्यापलीकडे त्यांच्या हातून विशेष कांहीं झालें नाहीं. तरी पूर्वजांचा खरा इतिहास असावा अशी इच्छा त्यावेळीं त्या लोकांना झाली हें ह्या हळहळीवरून अनुमानतां येतें.

( ब ) डॉक्टर भाऊ दाजी, विश्वनाथ नारायण मंडलीक, उमियाशंकर याज्ञिक, कृष्णशास्त्री गोडबोले इत्यादि मंडळींनीं त्या कालीं हिंदुस्थानच्या प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाविषयीं बरेंच लिहिलें आहे; परंतु, महाराष्ट्राच्या अलीकडील इतिहासाकडे, फार तर राहूंद्याच पण थोडें देखील, लक्ष्य देण्यास ह्या मंडळीला फुरसत झाली नाहीं.

( क ) यूनिव्हर्सिटी स्थापन झाल्यानंतर, यूरोपखंडांतील देशांचे प्राचीन व अर्वाचीन इतिहास वाचून इतिहासाविषयीं स्पष्ट व उदात्त कल्पना नव्या विद्वानांना याव्या हें साहजिक होतें. ( १ ) ह्या नवीन कल्पनांचें प्रथम फल म्हटलें म्हणजे निळकंठराव कीर्तने यांची ग्रांट्डफ्वरील टीका होय. कीर्तन्यांना अस्सल कागदपत्र न मिळाल्यामुळें यद्यपि त्यांनीं केलेली टीका तांत्रिक आहे तत्रापि ग्रांट्डफ्च्या ग्रंथांत दोष व न्यूनें आहेत हें दाखविण्यास तिचा उपयोग झाला आहे. हिंदुलोकांच्या भित्रेपणाविषयीं व हिंदुस्थानांतील निरनिराळ्या राष्ट्रांच्या स्वतंत्र अस्तित्वाविषयीं ह्या टीकाकाराचें म्हणणें सयुक्तिक व सशास्त्र आहे. इतकेंच कीं, ही टीका अत्यंत बोधक आहे. १८६७ पासून पुढें डेक्कन कॉलेजांत व कदाचित् एल्फिन्स्टन् कॉलेजांत मराठ्यांच्या इतिहासाची आस्था बाळगणारी कांहीं मंडळी निपजत चालली होती असें दिसतें. ( २ ) कीर्तन्यांच्या टीकेनंतर विविधज्ञानविस्तारांतून एक बखर, एक राजनीति व एक काशीराजाचें भाषांतर अशीं तीन जुनीं बाडें बाहेर पडलीं. ( ३ ) त्यानंतर रा. साने, मोडक, चिपळोणकर व ओक ह्यांच्या अवाढव्य ( काव्य ) इतिहाससंग्रहाला सुरवात झाली. ( ४ ) पुढें लवकरच प्रभू लोकांच्या इतिहासाचीं साधनें थोडींबहुत जगापुढें आलीं. ( ५ ) नंतर कांहीं कालानें बडोदें येथें शिवराजाच्या दोन बखरी छापल्या गेल्या. ( ६ ) पुढें भारतवर्षाला प्रारंभ झाला व ( ७ ) अलीकडे वासुदेवशास्त्री खरे ह्यांनीं ऐतिहासिकलेखसंग्रहाला सुरुवात केली आहे. येणेंप्रमाणें साठपासष्टांत इतिहासाच्या आस्थेची जी एक लाट उसळली ती अजून म्हणजे

१८९८ तहि चढत्या प्रमाणावर आहे व पुढेंहि अशीच चढती राहील असा तर्क आहे. कारण, आतांपर्यंत जो साधनसंग्रह छापला गेला आहे तो जो अजून छापावयाचा राहिला आहे त्याच्या मानानें अगदींच थोडा व तुटपुंजा आहे.

## २. महाराष्ट्रांत स्वदेशाच्या इतिहासाची आस्था अठराव्या शतकांत व एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या चतुर्थांत बरीच होती व तत्समाधानार्थ बखरी निर्माण झाल्या.

हिंदुस्थानांत इतिहास काय तो दोन भाषांत लिहिलेला आढळतो; एक फारशींत व दुसरा मराठींत. कारण, इतिहास लिहून ठेवण्यासारखीं कृत्यें हिंदुस्थानांत मुसुलमानांच्या व मराठ्यांच्या हातूनच काय तीं ह्मणण्यासारखीं घडलीं आहेत. शीख, रजपूत, मवास व पाळेगार ह्यांनींहि पुंडावे व बखेडे बरेच केले आहेत. त्यांचे गद्यपद्य इतिहास अधून मधून पहाण्यांत येतात; परंतु, संगतवार इतिहास ज्यांचा अभिमानानें सांगतां येईल अशीं व्यवस्थित प्रौढीला पोंचलेलीं राष्ट्रें ह्मटलीं ह्मणजे एक मराठ्यांचें व दुसरें मुसुलमानांचें. इराण, तुराण, अफगानिस्थान व अरबस्थान ह्या देशांतील मुसुलमानांना इतिहासाची गोडी पूर्वीपासूनच आहे. मुसुलमानांच्या सहवासानें, त्यांच्या तवारिखा पाहून, मराठ्यांनींहि बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला. सध्यांपर्यंत छापून प्रसिद्ध झाल्या आहेत त्या सर्वांत बडोदें येथें छापलेली चिटणिशी बखर अगदीं जुनी आहे. त्याच्या अगोदर लिहिलेली कोणतीही बखर उपलब्ध नाहीं. त्याच्यापुढें मात्र पुष्कळ बखरी लिहिल्या गेल्या. खुद्द पेशव्यांच्या येथें बखरनवीस असत. त्यांचा धंदा जुने कागदपत्र पाहून बखरी सजविण्याचा असे. खुद्द पेशव्यांना वाचण्याकरितां ज्या बखरी लिहिल्या जात असत त्यांतील मजकूर कालानुक्रमानें लिहिलेला असे. ह्या बखरींच्या गांवोगांव ज्या नकला होऊन गेल्या त्यांत नांवांचा व तारखांचा घोटाळा होण्याचा संभव असे. कांहीं बखरी प्रांतोप्रांतीच्या माहितगार मंडळींनीं कर्णोपकर्णी ऐकून लिहिलेल्या आहेत. त्यांत मोठमोठे प्रसंगहि वाकडे तिकडे व पौराणिक तऱ्हेनें व बाष्कळरीतीनें वर्णिलेले आहेत. पेशव्यांच्या येथील बखरींतील मजकूर कालानुक्रमानें लिहिला जात असे असें ह्मणण्यास मजजवळ आधार आहे. दुसऱ्या माधवरावाची आजी ताई साठी ह्मणून होती. तिच्या वंशजांनीं आपलें दफ्तर मला दाखविलें. त्यांत सवाईमाधवराव आठ वर्षांचे असतांना त्यांना वाचण्याकरितां एक लहानशी बखर साळबाईच्या तहापर्यंत लिहिलेली आहे. तिच्यांतील मजकूर बहुतेक कालानुक्रमानें लिहिलेला आहे. गेल्या शतकांत व पंचवीस तीस वर्षांपाठीमागें ह्या शतकांत महाराष्ट्र देशांत बखरी लिहिण्याचा व वाचण्याचा सपाटा फार असे. अक्षर चांगलें झालें ह्मणजे मुलाकडून एक तरी बखर लिहवून घेण्याचा परिपाठ सार्वत्रिक असे. गांवोगांव व खेड्यापाड्यानें सुद्धां ब्राह्मणांच्या येथें व पाटील कुळकर्ण्यांच्या येथें बखरी सांपडण्याचा संभव असे. आजपर्यंत महाराष्ट्रांत खालील बखरी छापून प्रसिद्ध झाल्या आहेत.—

१ शहाजी महाराज भोसले यांची कैफियत ( पत्रें व यादी ४३८ ).
२ चिटणीसकृत शिवछत्रपतींचें सप्त-प्रकरणात्मक चरित्र.
३ ,, ,, संभाजी महाराजांची बखर.
४ ,, ,, थोरले राजाराम महाराज यांची बखर.
५ ,, ,, ,, ,, शाहूमहाराज यांची बखर.
६ ,, ,, धाकटे रामराजे यांची बखर.
७ ,, ,, ,, ,, शाहूमहाराज यांची बखर चतुर्सिंगाचे हकीकतीसह.
८ चित्रगुप्तविरचित शिवाजी महाराजांची बखर.
९ सभासदविरचित शिवछत्रपतींचें चरित्र.
१० शिवदिग्विजय.
११ शिवप्रताप.
१२ भूषणकविकृत शिवराजभूषणकाव्य.
१३ पुरुषोत्तमकविकृत शिवकाव्य.
१४ मराठी साम्राज्याची छोटी बखर.
१५ पेशव्यांची बखर सोहनीकृत.
१६ बाळाजी विश्वनाथ यांची कैफियत ( पत्रें व यादी ४९४ ).
१७ बाजीराव बल्लाळ यांची कैफियत ( पत्रें व यादी ४९५ ).
१८ नारायणराव पेशवे यांची बखर.
१९ पांडुरंगकृत नारायणराव पेशवे यांचें ओवीबद्ध चरित्र.
२० भाऊसाहेबांची बखर.
२१ भाऊसाहेबांची कैफियत.
२२ रघुनाथ यादवकृत पानिपतची बखर.
२३ सार्ष्टीची बखर.
२४ विंचूरकरांची बखर.
२५ दाभाड्यांची हकीकत.
२६ गायकवाडांची हकीकत.
२७ खर्ड्याच्या स्वारीची बखर.
२८ ब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र.
२९ जयराम स्वामींचें चरित्र.
३० रामदासस्वामींचें चरित्र.
३१ होळकरांची कैफियत.
३२ नागपूरकर भोसल्यांची कैफियत.
३३ मल्हाररामरावकृत राजनीति.
३४ संभाजी महाराजकृत राजनीति.
३५ पंतप्रधान ह्यांची शकावलि.
३६ कंपनीप्रतापमंडनम् .
३७ गोविंदपंत बुंदेल्यांची कैफियत.
३८ पंतप्रतिनिधींची कैफियत.
३९ काशीराजाची बखर ( भाषांतर ).
४० पोवाडे.
४१ नानाची बखर.
४२ अमात्य बावडेकर यांची कैफियत.

## ३. परंतु, एकंदरींत येथून तेथून सर्व बखरींत कालविपर्यासाचा दोष ओतप्रोत भरला आहे.

कोणतीहि बखर घ्या तींत कालाचा विपर्यास झाला नाहीं असें क्वचितच आढळेल. पुराणांतील कल्पित कथांच्या संसर्गानें, मुद्रणकलेच्या अभावामुळें व ऐतिहासिक सत्यासत्यतेसंबंधीं लोकांत असलेल्या औदासीन्यामुळें हा दोष ह्या बखरनविसांच्या बखरींतून शिरला आहे. रामरावणी कथांच्या श्रवणानें विचारांत अतिशयोक्तीचें प्राबल्य फार झालें व काला-

च्या पौर्वापर्याचें महत्व ह्या बखरनविसांच्या अगदींच लक्ष्यांतून गेलें. कालविपर्यासाचा दोष अत्यंत कमी ह्मटला ह्मणजे " भाऊसाहेबांच्या बखरींत " अतिच कमी आहे; व अत्यंत जास्त पहावयाचा असल्यास " पेशव्यांच्या बखरींत " अमूप आहे. ह्या दोन आद्यंताच्या मध्यें इतर सर्व बखरींचें वर्गीकरण दोषांच्या न्यूनाधिक्याच्या प्रमाणानें करितां येईल.

## ४. निरनिराळ्या प्रसंगांचें अन्योन्य महत्व ह्या बखरींतून मुळींच दाखविलें नाहीं व क्षुल्लक गोष्टींचा निरर्थक पाल्हाळ मात्र केला आहे.

[ अ ] ( १ ) शिवाजीची सूर्यवंशापासून उत्पत्ति, ( २ ) शिवाजीच्या मरणसमयीं त्याच्या कोठारांतील दाण्यागल्याची याद, ( ३ ) भाऊसाहेबाच्या बखरींतील मलकाजमानीचें रडगाणें इत्यादि कथा कमजास्त कल्पित असून क्षुल्लक आहेत. त्यांचा अन्यदृष्ट्या कितीहि उपयोग असला तरी इतिहासदृष्ट्या फारच थोडा आहे.

[ ब ] ( १ ) शिवाजीच्या पूर्वीच्या व त्याच्या वेळच्या मुसुलमानी राज्यांची माहिती, ( २ ) शिवाजीच्या कोणत्याहि मोहिमेचा संगतवार वृत्तांत, ( ३ ) शिवाजीच्या किंवा पेशव्यांच्या गृहस्थितीची चोख हकीकत ह्या बखरींतून बिलकुल मिळण्यासारिखी नाहीं. जी कांहीं थोडी बहुत माहिती दिली आहे ती इतकी असंबद्ध, परस्परविरोधी, संदिग्ध व प्रायः अविश्वसनीय आहे कीं, इतर साधनांच्या साहाय्यावांचून त्यांपैकीं कोणतीहि एक खरी मानणें मोठें संकटाचें आहे.

[ क ] अस्सल कागदपत्रांच्या साहाय्याव्यतिरिक्त ह्या बखरी वाचूं गेलें असतां एक प्रकारची चमत्कारिक चूक होते. ह्या बखरींतून जो मजकूर खरा असतो तो त्यांत असलेल्या खोट्या मजकुरापासून विलग काढून घेतां येत नाहीं. सारांश, केवळ ह्या बखरींवर भिस्त ठेवून इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केल्यास, सत्यासत्यतेच्या निर्णयाची कसोटी जवळ नसल्यामुळें, तो वायफळ जाण्याची बहुतेक खात्री आहे. पुष्कळ बखरींतून एकच मजकूर एकसारिखा आल्यास, बहुमताच्या न्यायानें, तो खरा मानण्याचीहि ह्या बखरींच्या संबंधानें सोय नाहीं. पुष्कळ ऐतिहासिक गोष्टींच्या अभावाचें साधारणत्व ह्या बखरींतून सांपडतें; परंतु, तेवढ्यावरून त्या गोष्टी झाल्याच नाहींत असें विधान करणें मोठें धोक्याचें काम होईल. तात्पर्य, एक अस्सल चिटोरें सर्व बखरींच्या बहुमताला हाणून पाडण्यास बस्स आहे. ह्या संबंधानें विचार करितां Majority of documents वर फारशी भिस्त ठेवितां येत नाहीं. कांकीं विश्वासार्ह अस्सल कागदाच्या एका चिटोऱ्यावर जितका विश्वास ठेवितां येतो तितका स्वदेशीय व विदेशीय बखरकारांच्या व बखरवजा इतिहासांच्या भाकड कथांवरती अर्थात् ठेवितां येत नाहीं.

ही स्थिति ह्या बखरींची झाली.

५ इतिहास

## ५. परंतु, काव्येतिहाससंग्रहांत व इतरत्र छापलेल्या पत्रांची किंमत फारच निराळ्या प्रकारची ह्मणजे अत्यंत महत्त्वाची आहे.

ह्या महत्त्वाचें कारण सर्वांच्या सहज ध्यानांत येण्याजोगें आहे.

## ६. ह्या पत्रांच्या साहाय्यानेंच बखरींतील मजकुराच्या खरे-खोटेपणाचा निर्णय व्हावयाचा आहे; बखरींतील काल-विपर्यासाचा परिहार हींच पत्रें करितील; व बखरींत जी माहिती दिली नाहीं ती हींच पत्रें देतील.

( अ ) काव्येतिहाससंग्रहांत एकदर ५०१ पत्रें व यादी आहेत. पैकीं नं. २० चें पत्र व नं. १ चें पत्र हीं एकच असल्यामुळें खरोखर ५००च पत्रें आहेत. १ शहाजीच्या कारकीर्दीसंबंधी, २ शिवाजीच्या कारकीर्दीतील, १ राजारामाच्या कारकीर्दीतील, ५ बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीतील, २६ बाजीराव बल्लाळाच्या कारकीर्दीतील, १५९ बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीतील, ३२ माधवराव बल्लाळाच्या कारकीर्दीतील, २३४ माधवराव नारायणाच्या कारकीर्दीतील, २१ बाजीराव रघुनाथाच्या कारकीर्दीतील, २ इंग्रजींतील, ३ शकावली, ७ वंशावली, १ हिशेबी, ७ किरकोळ, मिळून ५०१ पत्रें व यादी होतात. पैकीं ४३८, ४९४, ४९५ ह्या लहान लहान बखरी आहेत. तिन्ही शकावलींपैकीं दोन मोठ्या विश्वसनीय आहेत असें नाहीं. वंशावळींतहि बहुत अपूर्णता आहे. बाकी राहिलेलीं पत्रें मात्र पूर्णपणें विश्वसनीय व अस्सल आहेत; परंतु, तीं संगतवार अशीं फारच थोडीं असल्यामुळें त्यांचाहि इतिहासाच्या कामीं उपयोग झटला ह्मणजे रचनेपेक्षां पुराव्याच्यारूपानें विशेष होण्यासारिखा आहे. शहाजी, शिवाजी, राजाराम, बाळाजी विश्वनाथ, बाजीराव बल्लाळ, माधवराव बल्लाळ, नारायणराव बल्लाळ, माधवराव नारायणाच्या कारकीर्दीतील पहिलीं सहा वर्षे व पुढलीं दहा वर्षे, बाजीराव रघुनाथ व अव्वल इंग्रजी ह्यांसंबंधीं पत्रें मुळींच नाहींत झटलें असतां चालेल. अर्थात् ह्यांच्या कारकीर्दीसंबंधीं माहिती ह्या संग्रहांत प्रायः नाहीं. बाकी राहिले बाळाजी बाजीराव व माधवराव नारायण; पैकीं माधवराव नारायणाच्या कारकीर्दीतील साळबाईच्या तहाच्या वेळचीं, एकदोन वर्षे अलीकडचीं व महिना दोन महिने पलीकडचीं, अशीं पत्रें काव्येतिहाससंग्रहांत, सुमारें १८० आहेत. माधवराव नारायणाची बाकीची कारकीर्द बहुतेक रिकामीच आहे. बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीसंबंधीं पत्रें पहातां उदगीरच्या व पानिपतच्या मोहिमेसंबंधीं एकादें दुसरेंच जुजबी पत्र ह्या संग्रहांत सांपडतें. उदगीरच्या लढाईसंबंधीं १७० वें पत्र व पानिपतच्या लढाईसंबंधीं ५३, १७१ व १७५ एवढींच काय तीं पत्रें आहेत. पैकीं १७१ कुशलार्थाचेंच आहे. ५३ वें पत्र नाना फडणविसानें आत्मचरित्र ह्मणून लिहिलेलें आहे. बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीसंबंधीं एकंदर १५९ पत्रें आहेत ह्मणून वरती सांगितलेंच आहे. त्यांतून हीं चार वजा करितां बाकीं राहिलेलीं १५५ पत्रें इ० स० १७४० पासून १७६१ पर्यंतच्या अवधींतील कांहीं ठळक ठळक प्रसं-

गांसंबंधीं आहेत. सर्वांत १७५२ सालचीं पत्रें फार आहेत ह्मणजे सुमारें २० आहेत, ५१सालचीं सुमारें १४ आहेत, ५४ सालचीं १४, ५५ सालचीं १०, ४७ सालचीं १०, ५९ सालचीं ६, ५६,५७,६० व ६१ सालांचीं पांच पांच, ४० व ५८ सालांचीं चार चार. ४६ सालचीं ३, ४१ चीं ३, ५३ चीं २, ४८ चें १ व ४२,४३,४४,४९ व ५० ह्या सालांचीं मुळींच नाहींत. ह्या सालवारी पत्रांची एकंदर संख्या ११७ होते. १५९ पैकीं बाकीं ४२ राहिलीं. तीं विशेष महत्वाचीं नसल्यामुळें त्यांचें सालवारी वर्गीकरण केलें नाहीं.

( **ब** ) ऐतिहासिकलेखसंग्रहांत बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीपर्यंतचीं एकंदर ३२ पत्रें आहेत. हा संग्रह सबंद छापून झाल्यावर त्यांत माधवराव बल्लाळ, नारायणराव बल्लाळ, रघुनाथ बाजीराव, माधवराव नारायण व अंशतः बाजीराव रघुनाथ इतक्यांच्या कारकीर्दीचा एकदेशीय इतिहास येईल. आजपर्यंत माधवराव बल्लाळाच्या कारकीर्दीतील सुमारें तीनशें पत्रें ऐतिहासिकलेखसंग्रहांत आलीं आहेत.

( **क** ) भारतवर्षांत आजपर्यंत एकंदर ४९ पत्रें छापिलीं आहेत. पैकीं लेखांक १९, ३९, ४**४**, **४**५, ४६, ४७, ४८, ४९ हीं आठ पत्रें बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीतील आहेत. लेखांक १९ हें पत्र विविधज्ञानविस्तारांत व लेखांक ४० हें पत्र थोरले शाहूच्या चरित्रांत पूर्वींच छापिलेलीं आहेत. ह्या मासिकपुस्तकांतील पत्रांतून व बखरींतून मोडी वाचनाच्या चुका अतोनात झाल्या आहेत. पत्रांना टीपा दिल्या आहेत त्याहि ऐतिहासिक माहितीला धरून नाहींत.

## ७. तेव्हां पुढील दहा वीस वर्षांतील इतिहासजिज्ञासूंचें पहिलें काम ह्मटलें ह्मणजे अस्सल कागदपत्रें शोधून काढून तीं छापण्याचें आहे.

ऐतिहासिक कागदपत्र महाराष्ट्रांत शेंकडों ठिकाणीं आहेत. हिंदुस्थानांतहि पुष्कळ ठिकाणीं आहेत. हिंदुस्थानच्या बाहेर ह्मणजे अफगाणिस्थान, इराण इत्यादि देशांत व लिस्बन, पॅरिस, लंडन व आम्स्टर्डाम इत्यादि शहरांत मराठ्यांच्यासंबंधीं कागदपत्र सांपडण्यासारिखे आहेत. ब्रिग्स्, ग्रांट्डफ्, म्याकेंझी इत्यादि गृहस्थांनीं विलायतेंत नेलेले कागदपत्र लंडन येथें जाऊन शोधिले पाहिजेत. सध्यां मिरजमळा येथें माधवराव बल्लाळ, नारायणराव बल्लाळ, रघुनाथ बाजीराव व माधवराव नारायण यांच्या कारकीर्दीतील पत्रें उपलब्ध झालीं आहेत. मेणवली येथें माधवराव नारायणाच्या सबंद कारकीर्दीसंबंधीं पत्रें शाबूत आहेत. शिवाजी, संभाजी, राजाराम व बाळाजी विश्वनाथ ह्यांच्या कारकीर्दीसंबंधीं अजून कांहींच उपलब्ध झालें नाहीं. मुख्यतः शिवाजी महाराजासंबंधीं पत्रें सांपडलीं पाहिजेत. महाराजांना जाऊन कांहीं फार काळ झाला नाहीं. सव्वा दोनशें वर्षें अद्यापि व्हावयाचीं आहेत. शिवाजी महाराज व त्यांचे सरदार व मुत्सद्दी यांनीं लिहिलेलीं पत्रें लक्षावधि असलीं पाहिजेत. शिवाजी महाराजांचा पसारा केवढा ! त्यांचा पराक्रम कसला अकटोविकट आणि त्यांचें धोरण किती लांबवर ! तेव्हां

त्यांच्या अद्भुत चरित्रपटान्या लाखों धाग्यांचा यथास्थित उलगडा करण्यास त्यांचा व त्यांच्या मुत्सद्यांचा पत्रव्यवहार सांपडला पाहिजे. पहिल्या बाजीरावासंबंधीं व बाळाजी बाजीरावाच्या १७५० पर्यंतच्या कारकीर्दीसंबंधीं म्हणजे शाहूमहाराजांच्या सबंद कारकीर्दीसंबंधीं देखील अद्याप प्राय: कांहींच सांपडलें नाहीं असेंच म्हणणें भाग पडतें. तसेंच, मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, रघोजी भोसले, फत्तेसिंग भोसले, गोविंद हरी पटवर्धन, मुराररराव घोरपडे, संभाजी राजे कोल्हापुरकर, दमाजी गायकवाड, दाभाडे, यशवंतराव पवार, यमाजी शिवदेव, रमाजी यमाजी, बाबूजी नाईक बारामतीकर, आंग्रे, अंताजी माणकेश्वर, नारो शंकर, विठ्ठल शिवदेव इत्यादि पुरुषांचे पत्रव्यवहार सांपडल्यावांचून इतिहासाची गुंतागुंत नीट उलगडावयाची नाहीं. माझ्या मतें खालीं दिलेल्या स्थळीं बारीक शोध केला असतां उपयोग होईल.

१ अयोध्या. २ काशी. ३ अलीगड. ४ पानिपत. ५ चरखारी. ६ बुंदी. ७ कोटा. ८ भोपाळ. ९ ग्वालेर. १० जयपूर. ११ जोधपूर. १२ इंदूर. १३ देवास. १४ धार. १५ उज्जनी. १६ महेश्वर. १७ ओंकार. १८ बऱ्हाणपूर. १९ नागपूर. २० अलजपूर. २१ अमदाबाद. २२ बडोदें. २३ मालेगांव. २४ विंचूर. २५ नाशीक. २६ जव्हार. २७ अलीबाग. २८ मुंबई. २९. औरंगाबाद. ३० अहमदनगर. ३१ पेडगांव. ३२ हैद्राबाद. ३३ बीड. ३४ पैठण. ३५ सातारा. ३६ वाई. ३७ ओझर्डे. ३८ तासगांव. ३९ कोल्हापूर. ४० तालीकोट. ४१ सावंतवाडी. ४२ सावनूर. ४३ गुत्ती. ४४ बेदनूर. ४५ श्रीरंगपट्टण. ४६ म्हैसूर. ४७ तंजावर. ४८ मद्रास. ४९ उदेपूर. ५० आनंदवल्ली. ५१ सासवड. ५२ हिंवरें. ५३ कोरेगांव. ५४ कोपरगांव. ५५ अकोळनेर. ५६ जुन्नर. ५७ खेड. ५८ चास. ५९ वाफगांव. ६० चाफळ. ६१ लिंब. ६२ टेंभुर्णी. ६३ विजापूर. ६४ औंध. ६५ महाड. ६६ काळेगांव. ६७ मुधोळ. ६८ कितूर. ६९ गुलबुर्गा. ७० तळेगांव. ७१ चिंचवड. ७२ सागर. ७३ दिल्ली. ७४ निर्मळ. ७५ वारंगळ. ७६ बेदर. ७७ अक्कलकोट. ७८ जत. ७९ फलटण. ८० पुणें. ८१ चांभारगोंदें. ८२ पंढरपूर. ८३ कायगांव. ८४ सुरत. ८५ वसई. ८६ पन्हाळा. ८७ निपाणी. ८८ कागल. ८९ शिरें. ९० रासनाथ. ९१ मलखेड. ९२ कल्याण. ९३ भिवंडी. ९४ जेजूरी. ९५ रामदुर्ग. ९६ भरतपूर. ९७ कर्नोल. ९८ कडाप्पा. ९९ मिरजी. १०० चांदवड. १०१ पाटस. १०२ इचलकरंजी. १०३ भोर. १०४ बारामती. १०५ कऱ्हाड. १०६ मलकापूर. १०७ वीरवाल्हे. १०८ धावडशी. १०९ सोनोरी. ११० पेण. १११ पांडववाडी. ११२ वावधन. ११३ सुपें.

ह्या व अशाच आणखीं इतर स्थळीं कांहींना कांहीं तरी कागदपत्र हटकून सांपडेल. ह्यांपैकीं कांहीं स्थली तर मोठमोठीं दफ्तरेंच आहेत तीं कित्येक ठिकाणीं संस्थानिकांच्या ताब्यांत आहेत व कित्येक ठिकाणीं जहागीरदार व इनामदार ह्यांच्या ताब्यांत आहेत. ह्या दफ्तरांतील जमीनजुमला व मानपान ह्यासंबंधींचे जे कागदपत्र, सनदा वगैरे

असतील त्यांच्याशीं इतिहासज्ञांना फारच थोडें कर्तव्य आहे. इतिहासज्ञांची उडी ह्मटली ह्मणजे राजकीय, दरबारी, यौद्धिक, औद्योगिक, कार्षिक, व्यापारीक, नैय्यायिक, लौकिक, व्यावहारिक इत्यादि कागदपत्रांवर विशेष असणार. तेव्हां असला पत्रव्यवहार इतिहासजिज्ञासूंच्या स्वाधीन करण्यास दफ्तरांच्या मालकांस कोणतीच हरकत वाटूं नये. इ. स. १८०० पूर्वीचा कोणताहि पत्रव्यवहार दाखविण्यास हिंदुस्थानांतील कोणत्याहि मराठ्या संस्थानिकाला किंवा जहागीरदाराला कांहींच अडचण नाहीं. स्वतः आपापलीं दफ्तरें छापून काढिल्यास त्यांनीं आपलें कर्तव्य केलें असेंच होईल. निदान, जी बाहेरची इतिहासजिज्ञासु मंडळी त्यांच्याकडे येतील त्यांना तीं दफ्तरें दाखविल्यास इतिहासज्ञ त्यांचे उपकार कालावधि विसरणार नाहींत. शिवाय हीं दफ्तरें दाखविण्यांत व प्रसिद्ध करण्यांत त्यांचे फायदे आहेत.

[ १ ] विस्मृतीच्या सर्वव्यापी अंधारांत ते व त्यांचीं घराणीं गुप्त होऊन जाणार नाहींत. शिवाजीराजे उदयास येण्यापूर्वी मुसुलमानांची सत्ता महाराष्ट्रांत निरनिराळ्या स्थलीं दीडशें, दोनशें व तीनशें वर्षे होती. त्या कालीं महाराष्ट्राच्या कांहीं भागांत मराठ्यांचेंहि राज्य होतें. दक्षिणेंत मुसुलमान येण्यापूर्वी जाधव, शेलार, चालुक्य, राष्ट्रकूट, आंध्रभृत्य, शालिवाहन इत्यादि राजकुलें आळीपाळीनें बारा पंधराशें वर्षे राज्य करीत होतीं; परंतु, ह्या सर्व मराठी राजांचा व पातशाहांचा इतिहास त्यांच्या नांवांपलीकडे फारसा कांहींच माहित नाहीं. त्यांचीं नांवें देखील लोपून जावयाचीं; परंतु, पुराणें, ताम्रपट व तवारिखा आहेत ह्मणून तीं तरी अद्याप ऐकूं येतात. महाराष्ट्रांतील संस्थानिकांच्या व जहागीरदारांच्या पूर्वजांच्या नांवांचीहि हीच दुर्दशा होण्याची वेळ आली आहे. तेव्हां ती टाळावयाची असल्यास ह्या संस्थानिकांनीं व जहागीरदारांनीं आपापलीं दफ्तरें होईल तितकी त्वरा करून स्वतः प्रसिद्ध करावीं किंवा प्रसिद्धीकरितां इतिहासशोधकांच्या स्वाधीन करून टाकावीं.

[ २ ] त्यांच्या पूर्वजांचे पराक्रम ऐकून त्यांच्या घराण्याविषयीं महाराष्ट्रांतील लोकसमूहास आदर व पूज्यता वाटूं लागेल. सध्यां, अमुक एका घराण्याचें पूर्वज मोठे होते ह्या पलीकडे कांहींच माहिती नसते ह्या निर्गुण मोठेपणाचें सामान्य जनास ध्यान करितां येत नाहीं. तेव्हां हें मोठेपण सगुण व साकार झालें असतां ह्मणजे ह्या मोठ्या पुरुषांनीं कोणकोणते पराक्रम केले ह्याची तारीखवार अशी भरपूर माहिती मिळाली असतां, लोकांना त्यांच्या मोठेपणाची व्यवस्थित कल्पना येईल.

[ ३ ] त्यांच्या घराण्याचा लोकांना आदर वाटूं लागला ह्मणजे त्यांचें स्वभावसिद्ध धुरीणत्व सर्वत्र मान्य होईल.

[ ४ ] व आपण लोकसमूहाचे धुरीण आहों, असें ह्या संस्थानिकांना व जहागीरदारांना वाटूं लागलें ह्मणजे ते, पूर्वजांच्याच नांवानें नव्हे, तर स्वतःच्या गुणांनीं लोकादरास पात्र होण्यास तयारी करूं लागतील.

हे अमूल्य फायदे ह्या दफ्तरांच्या प्रसिद्धीकरणापासून त्यांच्या मालकांस होण्यासारिखे आहेत. इतर लोकांस व संपूर्ण देशास फायदे काय होतील हें सर्वत्र महशूर असल्यामुळें त्यांचें येथ संकीर्तन करीत नाहीं.

### ८. ह्याच हेतु मनांत धरून मीं हीं पत्रें प्रसिद्ध केलीं आहेत.

प्रस्तुत ग्रंथांत एकंदर ३०४ पत्रें आहेत. तीं सर्व १७५० पासून १७६१ पर्यंतच्या अवधींतील ह्मणजे शाहूराजाच्या मृत्यूपासून ( १५ डिसेंबर१७४९ पासून ) पानिपतची लढाई होऊन दहा अकरा महिन्यांपर्यंतच्या ( नोव्हेंबर १७६१ ) अवधींतील आहेत. १७५० तील ३, १७५१ तील ११, १७५३ तील ७, १७५४ तील २०, १७५५ तील ८, १७५६ तील १, १७५७ तील ७०, १७५८ तील ५, १७५९ तील २३, १७६० तील १२५ व १७६१ तील ३१ अशी ह्या पत्रांची सालवारीनें गणना करितां येईल. विषयवारीनें गणना केली तर १७५० तील ३ पत्रांपैकीं लेखांक १ दिल्लींतील पातशाहाशीं झालेल्या तहासंबंधीं आहे; लेखांक २ रघुनाथरावाच्या १७५०तील खानदेश–गुजराथेंतील मोहिमेसंबंधीं आहे व लेखांक २६ शाहूराजाच्या नांवानें बाळाजी बाजीरावानें पाठविलेलें आज्ञापत्र आहे. हें आज्ञापत्र शाहूच्या मृत्यूनंतर लिहिलेलें असून त्याच्यावर शाहूराजाच्या नांवाचा शिक्का आहे; परंतु, ह्याच्याच जोडीला, काव्येतिहाससंग्रहांतील ३३४ वें पत्र आहे. हें ३३४ वें पत्र २९ सप्टेंबर १७५१ त लिहिलें आहे. असें असून त्याच्यावर शाहूराजाच्या नांवाचा शिक्का आहे; १७५१ तील ११ पत्रें १७५१ त सलाबतजंग व नानासाहेब ह्यांच्यांत झालेल्या झटापटींच्या अगोदरचीं आहेत. १७५२ तील एकहि पत्र नाहीं. १७५३ तील ७ पत्रांपैकीं लेखांक १४, १५, १६, १७, १८ हे लेखांक भालकीचा तह झाल्यानंतर नानासाहेब व बूसी ह्यांच्यांत उत्पन्न झालेल्या स्नेहाविषयीं आहेत. व लेखांक २७, २८ रघुनाथराव गुजराथेहून थालनेरास आल्यावरचीं आहेत. १७५४ तील २० पत्रांपैकीं लेखांक १९, २०, २१, २२, २३, २४ हीं मुसाबुसी व सलाबतजंग ह्यांसंबंधीं आहेत. व लेखांक २९ पासून लेखांक ४२ सुद्धां रघुनाथरावाच्या १७५४ तील हिंदुस्थानांतील मोहिमेसंबंधीं आहेत. लेखांक ४१त सफदरजंगाच्या मृत्यूचें वर्तमान आहे. १७५५ तील ८ पत्रांपैकीं लेखांक ४३,४४,४५,४६, ४७, ४९ व ५० हीं पत्रें रघुनाथराव व जयाप्पा रजपुताना व हिंदुस्थान ह्या प्रदेशांत असतांना लिहिलेलीं आहेत. लेखांक ४८ हें पत्र १७५५ तील नसून १७५८ तील आहे. ह्या पत्राचा सन चार आहे. दिल्लीस व दिल्लीभोंवतालच्या प्रांतांत पातशाहाच्या सिंहासनारोहणापासून सन मोजण्याची चाल असे. अलमगीर पातशाहा १७५४च्या जुलैंत सिंहासनारूढ झाला ( पत्रें व यादी ३२ व Keene ). त्यावेळीं सुहुर्सन खमसखमसैन होता. तेव्हांपासून चवथें साल ह्मटलें ह्मणजे समानखमसैन येतें. त्या सालच्या जमादिलावलांत हें पत्र लिहिलें आहे. जमादिलावलाच्या २० तारखेला अब्दालीचा एलची दिल्लीच्या पातशाहाला भेटावयाला आला होता ह्मणून पत्रकार लिहितो; त्याअर्थी हें पत्र २० तारखेनंतर

लिहिलें आहे हें उघड आहे. तेव्हां ह्या पत्राची तारीख २१ जमादिलावल, सन चार ह्मणजे समानखमसैन धरावी हें सयुक्तिक आहे, ह्मणजे इं. स. १७५८ च्या १ फेब्रुवारीला हें पत्र लिहिलें असावें असें होतें. ही दुरुस्त झालेली तारीख घेतली ह्मणजे १०० व १०४ ह्या टिपा काढून टाकणें जरूर आहे. तसेंच १०२ टिपेंतील ५ व ६ ह्या ओळींतील ' ह ' पासून ' गेला ' पर्यंतचें वाक्य ह्याच टिपेंतील १७५७ सालासंबंधींच्या मजकुराच्या पुढें नेलें पाहिजे. १७५६ तील लेखांक १२० हें एकच पत्र आहे; तें गुजराथेंतील कांहीं गडबडीसंबंधीं आहे. ही गडबड झाल्यावर १७५६ च्या दसऱ्यानंतर रघुनाथरावदादा व सदाशिव रामचंद्र गुजराथेंतील दंगा मोडण्यास गेले व पुढें लवकरच सदाशिव रामचंद्राला गुजराथेंत ठेवून रघुनाथरावदादा १७५७ च्या जानेवारींत माळव्यांत आले ( लेखांक ५२ ). १७५७ तील ७१ पत्रांपैकीं लेखांक ५१,५२,५३,५४,५५,५८,५९.६०,६१,६३, ६६.६७,६९,७०,७१ व ७२ रघुनाथरावाच्या हिंदुस्थानांतील स्वारीसंबंधीं आहेत. लेखांक ५६,५७ व ६२ श्रीरंगपट्टणच्या स्वारीसंबंधीं आहेत. १७५७ तील बाकींचीं सर्व पत्रें ह्मणजे लेखांक ११९ पर्यंत व सुद्धां शिंदखेडच्या मोहिमेच्या अगोदरचीं आहेत. १७५७ तील लेखांक १२१ हें पत्र बाळाजी बाजीरावाचें आहे. १७५८ तील ५ पत्रांपैकीं लेखांक १२२, १२३, १२४, व १२५ रघुनाथरावासंबंधीं आहेत व लेखांक १३२ गोविंदपंत बुंदेल्यासंबंधीं आहे. १७५९ तील २३ पत्रांपैकीं लेखांक १२६ ताराबाईसंबंधीं आहे, १२७ पेशव्यांसंबंधीं आहे, १२८ कावडीसंबंधीं आहे, लेखांक १२९, १३०, व १३१ हिंदुपतीसंबंधीं आहेत, लेखांक १३३ पासून लेखांक १४८ पर्यंत व सुद्धां शिंद्यांच्या, रोहिल्यांच्या व अवदालीच्या अंतरवेदींतील झटापटीसंबंधीं आहेत व लेखांक १४९ उदगीरच्या मोहिमेसंबंधीं आहे. १७६० तील १२५ पैकीं लेखांक १५० पासून लेखांक १६६ पर्यंत व सुद्धां सर्व पत्रें उदगीरच्या मोहिमेसंबंधीं व अवदालीशीं शिंदेहोळकरांच्या झटापटी झाल्या त्यासंबधीं आहेत. १७६० तील बाकींचीं पत्रें पानिपतच्या मोहिमेसंबंधीं आहेत. लेखांक २८७ हें पत्र होळीच्या पोळीच्या तंट्यासंबधीं आहे. १७६१ तील व १७६३ तील पत्रें पानिपतच्या लढाईनंतरचीं भाऊसाहेबाच्या तोतयासंबंधीं वगैरे आहेत. येणेंप्रमाणें सुमारें ३०४ पत्रें ह्या ग्रथांत छापिलीं आहेत.

लेखांक ३ पासून लेखांक २५ सुद्धां पत्रें पैठणास वाण्याच्या दुकानीं मिळालीं. लेखांक २६ पासून ( लेखांक ४८ खेरीजकरून ) लेखांक ५० सुद्धां पत्रें मिरज येथील वासुदेवशास्त्री खरे ह्यांनीं दिलीं. लेखांक १, २, ४८ व लेखांक ५१ पासून लेखांक १२२ सुद्धां पत्रें वाई येथील गोविंदराव भानू यांच्या येथील आहेत. लेखांक १२२ पासून लेखांक ३०४ सुद्धां सर्व पत्रें वाई येथील दादासाहेब येरंडे यांच्या दफ्तरांतील आहेत. दादासाहेब येरंडे यांचे पूर्वज जनार्दनपंत येरंडे ह्यांना नानासाहेबांनीं, गोविंद बल्लाळ, बुंदेलखंडांतील पेशव्यांचे मामलतदार, यांजवर दरखदार ह्मणजे तपासनवीस ह्मणून पाठविले होते. येरंडे हे १७५७ पासून १७६१ पर्यंत बुंदेलखंड व अंतरवेद ह्या प्रदेशांत होते. त्या अव-

[stamp]

धींत हीं पत्रें त्यांच्याजवळ आलीं तीं त्यांनीं देशीं परत आल्यावर वांई येथें आपल्या वाड्यांत ठेवून दिलीं. तीं १७६१ पासून १८९७ एप्रिलपर्यंत त्यांच्या वाड्यांतील एका अंधारांत एका कातड्यानें मढविलेल्या पेटाऱ्यांत शावृत, कोरीकरकरीत, असोत्या तशींच पडून होतीं. ह्या पेटाऱ्यांत एकंदर सुमारें ७०० पत्रें होतीं; त्यांपैकीं १८२ पत्रें पानिपतच्या मोहिमेसंबंधीं वगैरे आहेत. बाकीं राहिलेलीं पत्रें माधवरावाच्या कारकीर्दींतील हिंदुस्थानांतील घडामोडींसंबंधीं खासगी व जमीन महसुलासंबंधीं आहेत.

ह्या सर्व पत्रांच्या तारखा प्रो. मोडक ह्यांच्या जंत्रीवरून ठरवून टाकिलेल्या आहेत. पत्रांतील कठिण शब्दांचे अर्थ प्रायः दिलेले नाहींत. कारण, अलीकडील २० वर्षांत काव्येतिहाससंग्रहाशीं महाराष्ट्रवाचकांचा बराच परिचय झाला असल्यामुळें तें काम आतां न केलें असतां चालण्यासारिखें आहे. शिवाय, आमचे एक मित्र सतराव्या व अठराव्या शतकांतील ऐतिहासिक लेखांतून आलेल्या कठिण शब्दांचा कोश तयार करीत आहेत व तो लवकरच छापून तयार होईल असा अजमास आहे. हीं पत्रें वाचणारास महाराष्ट्राचा स्थूल इतिहास माहीत आहे असें गृहीत धरिलें आहे. पत्र कोणीं कोणास लिहिलें आहे हें पत्रांतूनच लिहिलेलें असतें व पत्र केव्हां लिहिलेलें आहे हें प्रत्येक पत्राच्या मथळ्यावरील तारखेवरून समजून येईल. हीं सर्व पत्रें १७५० पासून १७६२ च्या मधील अवधींतील असल्यामुळें तीं कोणकोणत्या प्रसंगाला अनुलक्षून आहेत हें सहज कळून येण्यासारिखें आहे. शिवाय, ह्या ग्रंथांतील बहुतेक पत्रें संगतवार लागलेलीं आहेत. तेव्हां अमुक एक पत्र अमुक एका प्रसंगाला अनुलक्षून आहे हें समजण्याला अडचण यावी असें नाहीं. तरी वाचकांना संगतवार पत्रांचेंहि अनुसंधान सहज व्हावें ह्मणून इ. स. १७५० पासून १७६१ पर्यंतच्या सर्व मोहिमांचे तक्ते खालीं देतों. ह्या तक्त्यांच्या, इतर इतिहासांच्या व पत्रांखालीं दिलेल्या टिपांच्या साहाय्यानें पत्रांचें अनुसंधान कळण्यास वास्तविक पाहिलें तर हरकत पडूं नये.

## तक्ता पहिला.

### नाना, भाऊ व विश्वासराव ह्यांच्या १७५० पासून १७६१ पर्यंतच्या हालचालींचा तक्ता.

| सन. | महिना. | स्थल. | तपशील. |
|---|---|---|---|
| १७४९ | डिसेंबर. | सातारा. | १५ डिसेंबर शाहूचा मृत्यु. |
| १७५० | जानेवारी पासून एप्रिल पर्यंत. | सातारा. | प्रतिनिधींचें व यमाजी शिवदेवाचें बंड. |
| | मे पासून अक्टोबरपर्यंत. | पुणें. | भाऊ रामराजाला घेऊन प्रतिनिधीवर जातात. ताराबाई कांहीं महिने पुण्यास. भाऊ सातारा, पंढरपूर, सांगोलें, मंगळवेढें |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | इत्यादि ठिकाणीं जातात. भाऊंचा व कोल्हापूरकरांचा संबंध. |
| | नोव्हेंबर पासून डिसेंबर पर्यंत. | पुणें. | भाऊ भांडारकवळ्यावरून पुण्यास. |
| १७५१ | जानेवारी | गंगातीर. | |
| | फेब्रुवारी, मार्च. | गंदार, इंदूर, कलबुर्गे व रायचूर. | भाऊ, रामचंद्र बाबा व नाना सलाबतजंगावर स्वारी करितात. सलाबतापासून दोन लाख रूपये तुंगभद्रेवर घेऊन साताऱ्याकडे येऊं लागतात. |
| | एप्रील. | नजीक सातारा, वडूत, वऱ्या, गेंड्याचा माळ. | नाना पुरंदरे गेंड्याच्या माळावर दमाजीचा पराभव करितो. इतक्यांत नानासाहेब साताऱ्याजवळ येऊन पोंचतात. |
| | मे पासून आगष्ट पर्यंत. | पुणें. | |
| | सप्टेंबर पासून डिसेंबर पर्यंत. | खेड, घोडनदी, कुकडी नदी. | सलाबतजंग व बुसी पुण्यावर चालून येतात. त्यांवर नाना, दादा, भाऊ, रामचंद्रबाबा, महादोबा पुरंधरे, एकबोटे व बाबूराव फडणीस चालून जातात. |
| १७५२ | जानेवारी ते मार्च. | जुन्नर. नाशीक. त्रिंबक. | |
| | एप्रिल ते आगष्ट. | पुणें. | शिंदे व होळकर गाजुद्दिनाला घेऊन अवरंगाबादेला येतात. |
| | सप्टेंबर ते डिसेंबर. | भालकी. | भाऊ, नाना व रामचंद्रबाबा निजामावर चाल करितात. भालकीची लढाई. |
| १७५३ | जानेवारी ते जून. | हरपन्हळी. चित्रदुर्ग. श्रीरंगपट्टण. | नाना, भाऊ व रामचंद्रबाबा श्रीरंगपट्टणावर स्वारी करितात. ( का० सं० पत्रें व यादी १४ ). |
| | जुलै ते डिसेंबर. | पुणें. | |
| १७५४ | जानेवारी ते मे. | होळीहोन्नूर. | भाऊ मोर्चांत तीन दिवस. रामचंद्रबाबा. |

| | | | |
|---|---|---|---|
| | जून ते नोव्हेंबर. | पुणें. | |
| | डिसेंबर. | कृष्णातीर. | |
| १७५५ | जानेवारी. फेब्रुवारी. | कृष्णातीर. | महादोबा पुरंधरे व माधवराव पानशी बिद-नूरच्या स्वारीवर पुढें जातात. व मे–जून मध्यें पुण्यास परत येतात. |
| | मार्च. | नाशीक. त्रिंबक. | नानासाहेब सिंहस्थाकरितां व सलाबताला दरडावण्याकरितां कायगांवटोक्यावरून नाशकास जातात. |
| | एप्रिल ते अक्टोबर. | पुणें. | |
| | नोव्हेंबर. | कृष्णातीर. | |
| | डिसेंबर. | घटप्रभातीर. | |
| १७५६ | जानेवारी ते जून. | सावनूर | नाना, दादा, भाऊ, मल्हारराव, जानोजी व मुधोजी भोसले, विठ्ठल शिवदेव, बुसी व सलाबत हे मुजफरजंग, मुरारराव व सावनूरकर नवाब ह्यांना सावनूर येथें कोंडतात. भाऊ मोर्चांत. माधवराव हजर. दादा पुढें कितुरास. गोपाळराव पटवर्धन पुढें सोंध्यास. |
| | जुलै ते डिसेंबर | पुणें. | |
| १७५७ | जानेवारी ते जून. | कृष्णातीर. श्रीरंगपट्टण. | श्रीरंगपट्टणची स्वारी. बळवंतराव मेहेंदळे व गोपाळराव पटवर्धन दुसऱ्या बाजूनें आधींच श्रीरंगपट्टणास येतात. भाऊ मोर्चांत. |
| | जुलै ते आक्टोबर. | पुणें. | विश्वासराव, दत्ताजी, भाऊ व महादजी निजामावर स्वारी करितात. पुढें नाना मदतीला येतात. शिंदखेडची लढाई. |
| | नोव्हेंबर ते डिसेंबर. | सलाबताचा प्रांत. | |
| १७५८ | जानेवारी ते एप्रिल. | सलाबताचें राज्य. | विश्वासरावाला शिंदखेडच्या लढाईंत मदत न केल्यावद्दल भोसल्यावर दोष ठेवून त्याच्या वर घालून जातात. |

| | | | |
|---|---|---|---|
| | मे ते अक्टोबर. | पुणें | |
| | नोव्हेंबर, डिसेंबर. | कोकण. | |
| १७५९ | जानेवारी, फेब्रुवारी. | पुण्याचा गणपती. | गोपाळराव पटवर्धन श्रीरंगपट्टणास. |
| | मार्च ते नोव्हेंबर. | पुणें. | उदगीरच्या मोहिमेची तयारी. |
| | | पेडगांव. | |
| | | नगर. | |
| | डिसेंबर. | सलाबताचें राज्य उदगीर. | उदगीरची मोहीम. |
| १७६० | जानेवारी ते मार्च. | उदगीर. | उदगीरची लढाई. दादा, भाऊ, विश्वासराव मेहेंदळे, इब्राईमखान, गोपाळराव पटवर्धन वगैरे वगैरे. |
| | एप्रिल ते डिसेंबर. | हिंदुस्थान. पानिपत. | पानिपतच्या मोहिमेला भाऊ व विश्वसराव जातात. दादा निजामावर कांहीं वेळ टेहेळणी करितात. गोपाळराव पटवर्धन कर्नाटकाची बाजू संभाळितात. नाना नोव्हेंबरपर्यंत पुण्यास. |
| १७६१ | जानेवारी. | पानिपत. | नाना अवरंगाबादेवरून खेची वाडयांत जातात. |
| | फेब्रुवारी ते जून. | नाशीक पुणें. | नाना पुण्यास येऊन २३ जूनला समाप्त. भाऊ व विश्वासराव पानिपतच्या गर्दीत समाप्त. माधवराव व गोपिकाबाई पुण्यास. |

## तक्ता दुसरा.

### जयाप्पा, मल्हारराव, दत्ताजी व जनकोजी ह्यांच्या १७५० पासून १७६१ पर्यंतच्या हालचालींचा तक्ता.

| सन. | महिना. | स्थल. | तपशील. |
|---|---|---|---|
| १७४९ | डिसेंबर | सातारा. | |
| १७५० | जानेवारी ते मार्च. | सातारा. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | एप्रिल ते डिसेंबर. | रजपुताना, जयपूर. | ( का. स. पत्रें व यादी १६१ ). |
| १७५१ | जानेवारी. फेब्रुवारी. | दिल्ली. | |
| | मार्च ते जून. | रोहिलखंड. | कादरगंजाची लढाई. |
| | जुलै ते सप्टेंबर. | माळवा. सेंधें. | |
| | आक्टोबर ते डिसेंबर. | दिल्ली. | महादजी शिंदे व तुकोजी होळकर कोरेगांवास. |
| १७५२ | जानेवारी ते जून. | झांशी दिल्ली. | |
| | जुलै ते डिसेंबर. | नर्मदा. अवरंगाबाद. भालकी. | जयाप्पा व मल्हारराव गाजुद्दिनाला घेऊन दक्षिणेंत येतात. गाजुद्दिन सप्टेंबरांत मरतो. भालकीची लढाई. |
| १७५३ | जानेवारी ते म. | चांभारगोंदें. वाफगांव. | दत्ताजी २३ मे १७५३ पर्यंत श्रीगोंद्यास ( पत्रें व यादी ३४० ) रहातो. दत्ताजी श्रीगोंद्यास. होळकर हिंदुस्थानांत जातो. |
| | जून ते डिसेंबर. | रजपुताना. | जयाजी थेट हिंदुस्थानांत जातो. दत्ताजी सप्टेंबरांत रघुनाथरावास थालनेरास मिळतो व सर्व मिळून रजपुतान्यांत जातात. |
| १७५४ | जानेवारी ते मे. | कुंभेर. | |
| | जून ते जुलई. | कुंभेर. मथुरा. | जयाप्पा जुलैंत नागोराकडे जातो. मल्हारराव रघुनाथरावाबरोबर. दत्ताजी व जनकोजी जयाप्पाबरोबर नागोरास जातात. |
| | आगष्ट. | कृष्णगड. | |
| | आक्टोबर. | मेडतें. | मल्हारराव रघुनाथरावाबरोबर |
| | नोव्हेंबर. डिसेंबर. | नागोर. | दिल्लीस व रोहिलखंडांत. |
| १७५५ | जानेवारी ते जून. | नागोर. | ३० जूनला जयाप्पा मारला जातो. होळकर रघुनाथरावाबरोबर दिल्ली–रजपुतान्यांत. |

| | | | |
|---|---|---|---|
| | जुलै ते डिसेंबर. | नागोर. | दत्ताजी व जनकोजी नागोरचा वेढा चालवितात. अंताजी माणकेश्वर मदतीस. होळकर रघुनाथरावाबरोबर पुण्याहून सावनुरास. |
| १७५६ | जानेवारी ते मार्च. | नागोर. बुंदीकोटा. | |
| | एप्रिल ते जून. | बुंदीकोटा. | मल्हारराव सावनुरास. |
| | जूलै ते डिसेंबर. | चांभारगोंदें. | जनकोजी व दत्ताजी देशीं येतात. |
| | | | मल्हारराव सावनुराहून माळव्यांत जातो. |
| १७५७ | जानेवारी ते जुलै. | चांभारगोंदें. | मल्हारराव रघुनाथरावाबरोबर हिंदुस्थानांत जातो. |
| | आगष्ट ते दिसेंबर. | सलाबताचें राज्य. गोदावरी तीर. अवरंगाबाद. शिंदखेड. | दत्ताजी व जनकोजी शिंदखेडच्या मोहिमेंत विश्वासरावाबरोबर होळकर रघुनाथरावाबरोबर. |
| १७५८ | जानेवारी ते मे. | सलाबताचें राज्य. चांभारगोंदें. | |
| | आगष्ट ते डिसेंबर. | माळवा. रजपुताना. | होळकर रघुनाथरावाबरोबर माळव्यांत येतो. रघुनाथराव पुण्यास जातो. |
| १७५९ | जानेवारी. फेब्रुवारी. | दिल्ली. | |
| | मार्च ते एप्रिल. | सतलजनदी. लाहोर | साबाजी शिंदे लाहोरास जातो. |
| | | शुक्रताल. | रोहिले व सुजाउद्दवला यांशीं लढाई. |
| | मे ते नोव्हेंबर. | रोहिलखंड. अंतरवेद. | होळकर जयपुराजवळ. |
| | नोव्हेंबर ते डिसेंबर. | सरहिंद. पानिपत. दिल्ली. | अबदालीशीं दत्ताजी व जनकोजी लढतात. |

| | | | |
|---|---|---|---|
| १७६० | जानेवारी ते एप्रिल. | दिल्ली, भरतपूर, सवलगड. | दत्ताजी अवदालीशीं लढतो. दत्ताजीचा मृत्यु. होळकर व जनकोजी अवदालीशीं लढतात व एप्रिलांत अवदाली यमुनेच्या पलीकडे जातो व सरदार अलीकडे जातात. |
| | मे ते डिसेंवर. | पानिपतची मोहीम. | |
| १७६१ | जानेवारी. | पानिपत. | जनकोजीचा मृत्यु. |
| | फेब्रुवारी. | | होळकर पानिपताहून माळव्यांत येतो. |

## तक्ता तिसरा.

### रघुनाथरावाच्या १७५० पासून १७६१ पर्यंतच्या हालचालींचा तक्ता.

| | | |
|---|---|---|
| १७४९ | डिसेंवर | सातारा. |
| १७५० | जानेवारी ते जून. | खानदेश, गुजराथ. |
| | जुलै ते नोव्हेंवर. | पुणें. |
| | डिसेंवर. | खानदेश. |
| १७५१ | जानेवारी ते जून. | गुजराथ. |
| | जुलै ते आगस्ट. | पुणें. |
| | सेप्टेंवर, आक्टोबर. | खानदेश. |
| | नोव्हेंवर, डिसेंवर. | जुन्नर. कुकडी नदी. कोरेगांव. |
| १७५२ | जानेवारी ते जून. | खानदेश. वागलाण. वऱ्हाड. |
| | जुलै ते नोव्हेंबर. | भालकीची मोहीम. सलाबतजंगाचें राज्य. अवरंगाबाद. |
| | डिसेंवर. | खानदेश. |
| १७५३ | जानेवारी ते जून. | गुजराथ. पेटलाद. अमदावाद. |

| | | | |
|---|---|---|---|
| | जुलै ते सेप्टेंबर. | थालनेर. | |
| | आक्टोबर ते डिसेंबर. | माळवा, रजपुताना. | |
| | जानेवारी ते मे. | कुंभेर | |
| | जून ते डिसेंबर. | दिल्ली. | |
| १७५५ | जानेवारी, फेब्रुवारी. | रोहिलखंड. | |
| | मार्च ते मे. | रजपुताना. | |
| | जून ते आगष्ट. | माळवा, खानदेश. पुणें. | |
| | सप्टेंबर, आक्टोबर. | पुणें. | |
| | नोव्हेंबर, डिसेंबर. | गलगलें ( गळतगें ), कृष्णातीर. | |
| १७५६ | जानेवारी ते जून | सावनूर, कितूर. | |
| | जुलै ते सप्टेंबर. | पुणें. | |
| | आक्टोबर, नोव्हेंबर. | खानदेश, गुजराथ. | सदाशिव रामचंद्र गुजराथेंत. आमदावादेकडे जातात. |
| | डिसेंबर. | थालनेर, बऱ्हाणपूर. | |
| १७५७ | जानेवारी ते मे. | इंदूर, जयपूर. | |
| | जून ते डिसेंबर. | दिल्ली, रोहिलखंड, अंतरवेद. | |
| १७५८ | जानेवारी ते मार्च. | सरहिंद, दिल्ली. | |

| | | |
|---|---|---|
| | एप्रिल ते जून. | लाहोर. |
| | जुलै ते आक्टोबर. | रजपुताना, माळवा, खानदेश, पुणें. |
| | नोव्हेंबर, डिसेंबर. | पुणें. |
| १७५९ | जानेवारी ते नोव्हेंबर. | पुणें. |
| | डिसेंबर. | पेडगांव. |
| १७६० | जानेवारी ते मे. | उदगीर. |
| | जून ते नोव्हेंबर. | सलाबताचें राज्य, पुणें. |
| | डिसेंबर. | वऱ्हाड. |
| १७६१ | जानेवारी ते मार्च. | वऱ्हाड, गोदातीर. |
| | एप्रिल ते आक्टोबर. | पुणें. |

## स्पष्टीकरण.

१ बाळाजी बाजीराव, २ सदाशिव चिमणाजी, ३ रघुनाथरावदादा, ४ विश्वासराव, ५ जयाप्पा, ६ दत्ताजी, ७ जनकोजी, ८ मल्हारराव, ९ विठ्ठल शिवदेव, १० नारो शंकर, ११ साबाजी शिंदे, १२ गोविंदपंत बुंदेले, १३ गणेश संभाजी, १४ गोपाळराव गणेश, १५ गोपाळराव बापूजी, १६ अंताजी माणकेश्वर, १७ यशवंतराव पवार, १८ सदाशिव रामचंद्र, १९ गोविंद हरी, २० गोपाळराव गोविंद, २१ बळवंतराव मेहेंदळे, २२ महादाजी अंबाजी, २३ इब्राईमखान गारदी, २४ रघोजी भोसले, २५ जानोजी भोसले, २६ मुधोजी भोसले, २७ मानाजी आंग्रे, २८ राघोजी आंग्रे, २९ त्रिंबकराव विश्वनाथमामा, ३० नाना पुरंधरे, ३१ दमाजी गायकवाड, ३२ कोन्हेर त्रिंबक एकबोटे, ३३ केदारजी गायकवाड, ३४ बापूजी खंडेराव चिटणीस, ३५ बामोरीचे नागोराम, ३६ समशेरबहाद्दर व ३७ रघोजी करांडे हे इतके लोक उत्तम सेनापति होते. त्यांपैकीं प्रत्येकानें निरनिराळ्या वेळीं स्वतंत्र सैन्याचें आधिपत्य घेऊन मोहिमा सर केल्या आहेत. तेव्हां त्या

प्रत्येकाच्या मोहिमांचे सालवार तक्ते देतां आले असते तर फार उपयोगाचें झालें असतें. परंतु, अस्सल ऐतिहासिक लेखांच्या कोताईमुळें तसें सध्यां करितां येत नाहीं. सध्यां बाळाजी बाजीराव, सदाशिव चिमणाजी, रघुनाथरावदादा, विश्वासराव, जयाप्पा, दत्ताजी, जनकोजी व मल्हारराव यांच्या मोहिमांचेच तेवढे तक्ते वरती दिले आहेत. त्यावरून १७५० पासून १७६१ पर्यंत मराठ्यांच्या हिंदुस्थानभर एकंदर ठळक ठळक मोहिमा झाल्या किती, त्यांचा बहुतेक नक्की आंकडा खालीं काढून दाखविला आहे.

१७४९च्या डिसेंबरांत शाहूराजे वारले. १७५०च्या जानेवारींत रामराजे राज्यावर आले. मार्चएप्रिलांत प्रतिनिधि व त्यांचे मुतालिक यमाजी शिवदेव ह्यांनीं बंड केलें. तें मोडण्यास भाऊसाहेबांनीं सांगोल्यावर ( १ ) स्वारी केली. ही स्वारी १७५० च्या सप्टेंबरांत संपली. (धा.रा. च. ५). शाहूराजाच्या मरणसमयीं शिंदे, होळकर देशीं आले होते; ते १७५०च्या एप्रिलपर्यंत साताऱ्यास होते. पुढें हिंदुस्थानांत बागलाण, खानदेश इत्यादि प्रदेशांतून जातांना त्यांनीं, नासरजंग आर्काटाकडे गुंतला आहे असें पाहून, त्याचे धोडप वगैरे किल्ले (२) काबीज केले. १७५० च्या जानेवारींत रघुनाथरावांनीं गुजराथेवर आपली पहिली ( ३ ) स्वारी केली व जुलैंत ते खानदेशांत प्रकाशाजवळ आले ( लेखांक २ ).

नासरजंग १७५० च्या डिसेंबरांत मारला गेला. मुजफरजंगाचीहि तीच व्यवस्था १७५१ च्या जानेवारींत झाली. नंतर बूसी व रामदासपंत ह्यांच्या साहाय्यानें सलाबतजंग मसनदीवर आला. तो कडाप्पाहून अवरंगाबादेस परत येत असतांना बाळाजीनें अवरंगाबादेवर १७५१ च्या जानेवारींत (४) स्वारी करून (पत्रें व यादी १६१ ) व तेथून १५ लाख खंडणी घेऊन सलाबताला रायचूरपाशीं कृष्णेवर मार्चांत गाठिलें व गाजूद्दिन येण्याची भीती दाखवून त्याच्यापासून सडकून मुलूख हबकणार तों साताऱ्यास दमाजी येऊन पोहोंचल्याची वार्ता आल्यामुळें दोन लाखांची चिरीमिरी ( Malleson's The French in India. p. 275 ) घेऊन त्याला साताऱ्यास यावें लागलें ( पत्रें व यादी १६८ ). इकडे नाना पुरंधरे, नागोराम मेघश्याम व बापूजी खंडेराव ह्या लिवर्गांनीं दमाजीला गेंज्याच्या माळावर ( ५ ) वठणीस आणिलें व ताराबाईच्या पक्षाचे हातपाय मोडून टाकिले. हिंदुस्थानांत जयाप्पा, मल्हारराव व साबाजी ह्यांनीं ( पत्रें व यादी १६८ ) वजिराच्या विनंतीवरून रोहिलखंडांत ( ६ ) स्वारी करून कादरगंजाजवळ दहा हजार रोहिला बुडविला व वजीर फत्तेच्या मसनदीवर बसविला ( पत्रें व यादी १६२ ). मार्चांत कृष्णेवर दिलेल्या त्रासाचा सूड उगविण्याकरितां सलाबत बुसीला घेऊन कोरेगांवापर्यंत आला; तेव्हां त्याला तोंड देण्यास पेशव्यांस ( ७ ) स्वारी काढणें भाग पडलें.

१७५२च्या जुलैंत शिंदे होळकर गाजुद्दिनाला ( अ ) घेऊन नर्मदेवर आले. इकडून बाळाजीहि औरंगाबादेवर सप्टेंबरांत ( ८ ) चाल करून गेले. डिसेंबरपर्यंत सलाबताच्या राज्यांत राहून त्यांनीं भालकी येथें सलाबताला यथास्थित चोपलें. शिंदे होळकरांनीं ( ब ) खान-

देशाच्या बाजूनें, बाळाजीनें नगरच्या बाजूनें व जानोजी भोसल्यानें अलजपूर–बाळापुरच्या ( क ) बाजूनें सलाबताला कोंडून टाकिलें. तेव्हां तो तहाच्या गोष्टी बोलूं लागला. रघुनाथरावदादांचाहि हात ( ड ) ह्या मोहिमेंत होता. मानाजी आंग्र्यानेंहि तुळाजीवर ( ९ ) स्वारी केली.

१७५३ च्या जानेवारींत रघुनाथरावदादा भालकीहून निघाले ते थेट गुजराथेंत ( १० ) अमदाबादेवर गेले; होळकर माळव्यांत गेले; शिंदे देशीं मेपर्यंत राहिले; जानोजी गाविलगडावर ( ११ ) गेला; व बाळाजी बाजीराव ( १२ ) श्रीरंगपट्टणावर तसेच चालून गेले ( पत्रें व यादी १४ ). १७५३ च्या जून–जुलैंत दादा थालनेरास आले; नाना श्रीरंगपट्टणाहून पुण्यास आले; होळकर इंदुरास जाऊन बसले; व शिंदे श्रीगोंद्याहून निघून रघुनाथराव दादास मिळण्यास थालनेरास सप्टेंबरांत गेले. दादांनीं १७५३ च्या सप्टेंबरापासून डिसेंबरपर्यंत ( १३ ) माळव्यांतील मवाशीलोक व संस्थानिक ताळ्यावर आणिले.

१७५४ च्या जानेवारींत बाळाजी बाजीराव (१४) होन्नीहोनूरच्या स्वारीस गेले; रघुनाथराव दादांनीं ( १५ ) कुंभेरीस वेढा दिला; व जानोजी ( १६ ) निजामअलीवर चालून गेला. १७५४ च्या ३ जुलैस बाळाजी पुण्यास आले; व कुंभेरीहून दादा दिल्लीस गेले; जयाप्पानें ( १७ ) मेडत्याकडे स्वारी केली व विठ्ठल शिवदेवानें सप्टेंबरांत ( १८ ) ग्वालेरीस वेढा घातला.

१७५५ च्या जानेवारींत बाळाजी बाजीराव ( १९ ) बिदनूरच्या स्वारीस निघाले, कृष्णेपर्यंत गेले व तेथें महादाजी अंबाजी पुरंधऱ्यावर स्वारी सोपवून सिंहस्थाकरितां टोक्यावरून नाशकास परतले ( पत्रें व यादी १६ ). १७५५ त दादा दिल्ली, रोहिलखंड, कुमाऊ, काशी, प्रयाग, जयनगर, रजपुताना इत्यादि ठिकाणीं ( २० ) स्वारी करून आगस्टांत पुण्यास आले. जयाप्पानें नागोरास ( २१ ) वेढा दिला. जानोजीनें निजामावर ( २२ ) स्वारी केली. दत्ताजीनें नागोरचा वेढा संपवून ( २३ ) बुंदीकोटयाच्या राण्यास १७५६ त मदत केली.

१७५६ च्या जानेवारींत बाळाजी बाजीरावानें, सदाशिव चिमणाजी, जानोजी भोसले, मुधोजी भोसले, विठ्ठल शिवदेव, महादोबा पुरंधरे, मल्हारराव होळकर इत्यादि मंडळीसह सावनुराला ( २४) वेढा दिला. रघुनाथरावदादा हिंदुस्थानांतून १७५५ च्या आगस्टांत पुण्यास येऊन, तेथून गलगल्यास आपलें लग्न करून, बाळाजीस सावनुरास मिळाले व तेथून निघून त्यांनीं कित्तूरावर (२५) स्वारी केली. मानाजीनें संभाजीवर विजयदुर्गास (२६) स्वारी केली. १७५६ च्या सप्टेंबर–आक्टोबरांत रघुनाथराव दादांनीं सदाशिव रामचंद्राला घेऊन गुजराथेवर स्वारी केली.

१७५७ च्या जानेवारींत बाळाजी बाजीरावानें श्रीरंगपट्टणावर ( २७ ) स्वारी केली. गोपाळराव पटवर्धनानें सोंधेबिदनूर प्रांतातून श्रीरंगपट्टणाला ( २८ ) जबरदस्त शह दिला व बळवंतराव मेहेंदळ्यानें गुत्तीकडून चिक्कृष्णराजाला चेपिलें. १७५६ च्या नोव्हेंबर-

डिसेंबरांत व १७५७ च्या जानेवारी—जुनांत विश्वासराव व दत्ताजी ह्यांनीं सलावतजंगावर ( २९ ) स्वारी केली. १७५७ च्या जुलैंत बाळाजी पुण्यास आले व नंतर सप्टेंबरांत त्यांनीं निजामावर स्वारी करून विश्वासरावाच्या हातून सलावताचा शिंदखेडास ( ३० ) पराभव करविला. १७५७ त रघुनाथरावांनीं गुजराथेंतून हिंदुस्थानांत ( ३१ ) स्वारी केली.

१७५८ त रघुनाथरावांनीं लाहोरास ( ३२ ) स्वारी केली. बाळाजी बाजीराव व विश्वासराव ह्यांनीं निजामावर ( ३३ ) टेहळणी केली व जानोजी भोंसल्याला वठणीस आणिलें.

१७५९ त गोपाळराव पटवर्धनानें श्रीरंगपट्टणावर ( ३४ ) स्वारी केली. दत्ताजीनें रोहिलखंड व लाहोर या प्रदेशावर ( ३५ ) स्वारी केली आणि मानाजी व राघोजी आंग्रे यांणीं कांसे, उंदेरी इत्यादि शामळाच्या स्थलांवर ( ३६ ) चाल केली.

१७६० त भाऊंची उदगीरची ( ३७ ) मोहीम झाली. दत्ताजीचे अवदालीशीं ( ३८ ) युद्ध झालें. मल्हाररावाचें अबदालीशीं (३९) युद्ध झालें व पानिपतची (४०) मोहीम झाली.

१७६१ त पानिपतचीं शेंपटें. ( ४१ ) जानोजी भोंसले, गोपाळराव पटवर्धन, रघुनाथराव, विसाजी कृष्ण, बाळाजी गोविंद इत्यादींनीं मराठ्यांची उध्वस्त झालेली सत्ता स्थापण्यास केलेले प्रयत्न. ( ४२ ) कोळ्यांची कोळवणांत बंडें.

येणेंप्रमाणें एकंदर बेचाळीस मोहिमांचे उल्लेख, काव्येतिहास संग्रहांतील पत्रांतून, ऐतिहासीक संग्रहांतील पत्रांतून व मीं सध्यां छापिलेल्या पत्रांतून सांपडतात. ह्याखेरीज आणखी कांहीं मोहिमा १७५० पासून १७६१ पर्यंत झाल्या नाहींत असें मात्र कोणीं समजूं नये. गुजराथेंत दमाजी गायकवाड, दिल्लीस अंताजी माणकेश्वर, बुंदेलखंडांत गोविंदपंत बुंदेले, अंतर्वेदींत गोपाळराव गणेश, गणेश संभाजी व गोपाळराव बापूजी इत्यादि मंडळी ह्या अकरा वर्षांत काय करीत होती ह्याचा बिलकूल पत्ता नाहीं. तसेंच जानोजी भोंसले, रघूजी करांडे, विसाजी कृष्ण बिनिवाले, मुरारराव घोरपडे, कोल्हापुरकर इत्यादि दक्षिणेंतील सरदार नक्की काय करीत होते ह्याचाही बहुतेक बिलकूल पत्ता नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाचें सध्यां मुख्य भांडार म्हटलें म्हणजे ग्रांट् डफ्चा इतिहास होय. ह्या इतिहासांत ह्या सरदारांच्या कृत्यांचा वृत्तांत मुळींच दिलेला नाहीं; ह्यावरून तीं कृत्यें क्षुल्लक होतीं असा ग्रह होण्याचा संभव आहे. परंतु तसा ग्रह होऊं देणें अगदीं चुकीचें आहे. ग्रांट् डफ्च्या ग्रंथांत ह्या दहा वर्षांतील घडामोडींची, विस्तृत तर राहुंद्याच परंतु, साधारण समाधानकारक अशी देखील माहिती दिलेली नाहीं. त्यानें लहान सहान मोहिमा तर सोडून दिल्या आहेतच; परंतु, कांहीं मोठमोठ्या मोहिमा देखिल गाळिल्या आहेत. त्या त्यानें मुद्दाम गाळल्या आहेत असा म्हणण्याचा भाग नव्हे; तर मिळालेल्या कागदपत्रांचा योग्य उपयोग त्याच्या हांतून झाला नाहीं. जे लेख त्याला मिळाले होते त्यांचें

व्यवस्थित वर्गीकरण आणि त्यांची बारीक फोड व उकल त्याच्या हातून झाली नाहीं. त्यामुळें व कांहीं जरूरीचे कागदपत्र त्याला न मिळाल्यामुळें ह्या मोहिमा त्यानें गाळल्या असें दिसतें. वर दिलेल्या वेचाळीस मोहिमा अगदीं ठळक ठळक आहेत. त्यांपैकीं ग्रांट् डफ्नें कोणकोणत्या गाळल्या आहेत किंवा त्या झाल्या हें माहीत असून अस्सल लेखांच्या कोताईमुळें कोणकोणत्या मोहिमांचा निवळ नामसंकीर्तनापलीकडे जास्त उल्लेख त्यानें केला नाहीं किंवा व्यवस्थित वर्गीकरण न केल्यामुळें कोणकोणत्या मोहिमांची त्यानें गफलत केली आहे तें खालीं लिहितों.

रघुनाथरावाच्या ( १ ) १७५०, ( २ ) १७५१, ( ३ ) १७५२, ( ४ ) १७५३ व ( ५ ) १७५६ ह्या सालांतील गुजराथ व खानदेश ह्या प्रांतावरील मोहिमा ग्रॅन्ट् डफ्नें अजीबात गाळल्या आहेत. रघुनाथरावाची १७५३ ची अमदाबादेवरील मोहीम त्यानें १७५५ सालांत नेली आहे. १७५५ सालांत रघुनाथराव दिल्लीस होते हें त्याला माहीत नव्हतें; हें पुढील पत्रांतील टीपांत सविस्तर सिद्ध करून दाखविलें आहे ( टीप १६१ ). रघुनाथरावाची १७५४ ( जानेवारी–जून ) तील रजपुतान्यांतील ( ६ ) स्वारीची ( कुंभेरीचा वेढा इ. ) व १७५४ ( सप्टंबर—डिसेंबर ) तील रोहिलखंड, कुमाऊ, ह्या प्रदेशांवरील ( ७ ) मोहिमेची हकीकत त्यानें दिली नाहीं. रघुनाथरावाच्या १७५७ तील ( ८ ) दिल्लीवरील व १७५८ तील ( ९ ) लाहोरावरील मोहिमांचा त्यानें त्रोटक व तोहि बराच चुकीचा वृत्तांत दिला आहे. रघुनाथराव वस्तुतः १७५७ त माळव्यांत गेला असून तो १७५६ च्या शेवटीं गेला असें डफ् ह्मणतो. रघुनाथराव १७५७ च्या जूनांत व सप्टंबरांत दिल्लीस होता हें १५३व्या टीपेंत स्पष्टपणें दाखवून दिलें आहे. अवदाली १७५५ त दिल्लीस आला, मथुरा वगैरे शहरें त्यानें त्याच सालीं घेतलीं, मग लवकरच काबुलाला तो परत गेला व १७५७ च्या सप्टंबरांत तो दिल्लीस येऊन बसला, इत्यादि भ्रामक विधानें त्यानें केलीं आहेत. तींहि मीं १५३ व्या टिपेंत खोडून काढिलीं आहेत. तसेंच १७५४ व १७५५ आणि १७५७ व १७५८ रजपुताना, माळवा, बुंदेलखंड, काशी, प्रयाग, अयोध्या, व अंतर्वेद इत्यादि प्रदेशांतील संस्थानिक, पाळेगार, मवासी, इत्यादि मंडळीवरही रघुनाथरावानें स्वाऱ्या केल्या आहेत, त्यांसंबंधीं माहिती ग्रँट्डफ्च्या ग्रंथांत नाहीं. जयाप्पाच्या ( १० ) नागोरच्या वेढ्यासंबंधीं तर त्यानें फारच आश्चर्यकारक चुकी केली आहे. नागोरचा वेढा १७५५ त चालला होता व जयाप्पा तो वेढा चालला असतांना ज्येष्ठ वद्य ७ मीला ह्मणजे ३० जून १७५५ ला मारला गेला अशी वास्तविक गोष्ट आहे. असें असून ग्रॅन्टडफ्नें जयाप्पाच्या मृत्युचें साल १७५९ धरलें आहे व मधील चार वर्षांत जयाप्पासारिख्या चळवळ्या शिपायानें केलें काय ह्याचा हिशेब अर्थात् कांहींच दिला नाहीं. हीहि चूक मी १६१ व्या टीपेंत जयाप्पाच्या मृत्यूच्या तारखेसुद्धां दाखवून दिली आहे. एकंदरींत रघुनाथराव दादांच्या बहुतेक सर्व स्वाऱ्यांसंबंधीं, ग्रँट्डफ्चें अज्ञान आश्चर्य करण्यासारिखें आहे. जयाप्पाच्या मारवाडांतील मोहिमेसंबंधीं, त्याच्या मृत्यूसंबंधीं व त्याच्या मृत्यूनंतर दत्ताजीनें मारवाडांत केलेल्या

खटपटीसंबंधीं ग्रँट्डफ्च्या ग्रंथांत एक अक्षरही सांपडण्यासारिखें नाहीं. हें जयाप्पाच्या व रघुनाथरावाच्या मोहिमांविषयीं झालें.

१७५२च्या डिसेंबरांत भालकीची लढाई व तह झाल्यानंतर १७५३च्या जानेवारींत भालकीहून बाळाजी बाजीराव श्रीरंगपट्टणच्या (११) स्वारीस गेले. ग्रँट्डफ्नें भालकीच्या तहापर्यंत बरीबाईट हकीकत दिली आहे. पुढें १७५३ च्या जानेवारींत, तो ह्मणतो, शिंदे, होळकर हिंदुस्थानांत गेले व बाळाजी बाजीराव पुण्यास परत आले. परंतु, हीं दोन्हीं विधानें विश्वसनीय नाहींत. शिंदे १७५३ च्या मेपर्यंत देशीं चांभारगोंद्यास राहिले ( पत्रें व यादी ३४० ). होळकर मात्र हिंदुस्थानांत गेले. बाळाजी बाजीराव पुण्यास न जातां, भालकी-हून थेट श्रीरंगपट्टणास गेले ( पत्रें व यादी १४ ). काव्येतिहाससंग्रहांतील पत्रें, यादी वगैरें-तील नंबर १४ हें पत्र शके १६७४ च्या पौषांतल्या वद्य सप्तमीला ( पौष वद्य पंचमी ह्मणून तेथें चुकून पडलें आहे ) ह्मणजे २५ जानेवारी १७५३ ला लिहिलें आहे. हें पत्र हरप-न्हळीच्या मुक्कामाहून लिहिलें आहे. अर्थात काव्येतिहाससंग्रहकार सुचवितात त्याप्रमाणें हें पत्र कर्नाटकच्या ह्मणजे श्रीरंगपट्टणच्या स्वारींत असतां बाळाजी बाजीरावानें लिहिलें आहे. ह्यावरून उघड आहे कीं, १७५३ च्या जानेवारींत श्रीरंगपट्टणची स्वारी सुरू झाली. ही स्वारी ग्रँट्डफ्नें अजीबात गाळली आहे. भालकीचा तह झाल्यावर सबंद १७५३ साल-भर बाळाजी बाजीरावाच्या हालचालींचा त्यानें बिलकुल हिशेब दिला नाहीं. १७५४ त होळीहोन्नूरची स्वारी बाळाजीनें केली एवढें मात्र त्यानें पुढें लिहिलें आहे. १७५३ तील श्रीरंगपट्टणची स्वारी त्याच्या लक्षांतून अजीबात गेली. ही स्वारी कांहीं लहानसहान नव्हती. ही १७५३ च्या जानेवारीपासून जूनपर्यंत चालली होती. ही स्वारी त्याला माहीतच नव्हती तेव्हां त्यानें तिचीं कारणें व परिणाम दिले नाहीत हें स्पष्टच आहे. १७५४ तील होळीहोन्नूरच्या स्वारीचा त्यानें थोडासा उल्लेख केला आहे. ती स्वारी करण्यास कारणें काय झालीं हें त्यानें मुळींच सांगितलें नाहीं. १७५४ च्या जूनांत होळी-होन्नूरच्या मोहिमेहून परत आल्यावर रघुनाथरावदादाला बाळाजीनें गुजराथेंत पाठविलें ह्मणून ग्रँट्डफ् ह्मणतो. परंतु, १७५४ च्या जानेवारींत रघुनाथराव कुंभेरीच्या वेढ्यास लागले होते हें ह्या पुस्तकांतील १६१ व्या टीपेंत सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे; त्याअर्थीं १७५४ च्या जूनानंतर रघुनाथराव गुजराथेंत गेला हें ग्रॅन्ट्डफ्चें ह्मणणें निवळ चुकीचें आहे हें उघड आहे. होळीहोन्नूरच्या स्वारीहून बाळाजी १७५४ च्या जूनांत पुण्यास आले ह्मणून ग्रॅन्ट्डफ् ह्मणतो, परंतु तेंही चूकच आहे. कारण पत्रें व यादींतील नंबर १५ च्या पत्रांत ' कर्नाटक, कचेश्वरीहून शके १६७६ च्या ज्येष्ठ शुद्ध १३ स आपण पुण्यास आलों.' ह्मणून बाळाजी लिहितो. ह्मणजे १७५४ च्या ३ जुलैला बाळाजी पुण्यास आला असें होतें. १७५४ च्या पावसाळ्यानंतर ह्मणजे १७५४ च्या आक्टोबरांत रघुनाथराव गुजराथेच्या स्वारीस निघाला व त्यानें अमदाबाद १७५५ च्या एप्रिलांत घेतली, असें ग्रॅन्ट्डफ्नें चुकीचें गणित केल्यामुळें रघुनाथरावाची १७५३ तील

गुजराथेंतील मोहीम, १७५४ तील कुंभेरीचा वेढा व १७५५ तील दिल्ली, रोहिलखंड ह्या प्रदेशांतील मोहिमा, ग्रँटडफला मुळींच सोडून द्याव्या लागल्या. कुंभेरीचें नांव त्यानें एका ठिकाणीं काढिलें आहे; परंतु, तें भीतभीतच काढिलें आहे व त्या पॅरिग्राफावर टीप देतांना रघुनाथरावाच्या हिंदुस्थानांतील मोहिमांसंबंधीं आपल्याला चांगली माहिती मिळाली नाहीं ह्मणून प्रांजलपणें कबूल केलें आहे. परंतु, ह्या प्रांजलपणांत थोडासा हटवादीपणाहि दाखविला आहे. अमदाबाद १७५३ त घेतली किंवा १७५५ त घेतली ह्याचा टिपेंत निर्णय करतांना १७५५ हें साल त्यानें पसंत केलें आहे. ह्या निर्णयामुळें रघुनाथरावाच्या हालचालींचा खरा नकाशा त्याला काढितां आला नाहीं. तो कसा काढितां आला नाहीं तें पुढील दोन चार वाक्यांत स्पष्ट करून दाखवितों. ग्रॅन्ट्डफच्या मताप्रमाणें रघुनाथरावानें १७५५ च्या एप्रिलांत अमदावाद घेतली. नंतर तो अमदावादेहून निघाला असल्यास हिंदुस्थानांत जाण्यास थालनेरच्याच मार्गानें आला पाहिजे. थालनेरास येण्यास रघुनाथरावाला जून महिना अवश्य झालाच असला पाहिजे व सबंध पावसाळा थालनेरास रहाणें त्याला भाग पडलें असलें पाहिजे. नंतर १७५५ च्या सप्टेंबरांत तो हिंदुस्थानांत गेला असला पाहिजे व नंतर कुंभेरीचा वेढा व रोहिलखंडाची स्वारी त्यानें केली असली पाहिजे. ह्या इतक्या सर्व खटाटोपी करून, ग्रँट्डफ् ह्मणतो, तो १७५६ सालच्या अगोदर ह्मणजे १७५५ च्या डिसेंबरांत देशीं पुण्यास आला. परंतु, हे सर्व ग्रँट्डफचे तर्क झाले. कारण, रघुनाथराव १७५६ च्या आगष्टांत पुण्यास आले; हें सप्रमाण सिद्ध करण्यांत येतें. ह्याला पुरावा काव्येतिहाससंग्रहांतल्या पत्रें व यादी वगैरेंतील ४५१ वें पत्र आहे. तेथें अताजी माणकेश्वर लिहितो कीं, दादासाहेबांच्या स्वारीनें नरवरच्या घाटानें येऊन आपल्या सैन्याची झडती घेतली. १७५५ च्या मार्च-एप्रिलांत बाळाजी बाजीराव नाशिक ऊर्फ गुलचनाबाद येथें असतांना अताजी माणकेश्वर त्यांना ससैन्य भेटला. तेथें त्यांना बाळाजी बाजीरावानें हिंदुस्थानांत जाण्यास सांगितलें. हिंदुस्थानांत जातांना वाटेंत दादासाहेबांची स्वारी नरवरच्या घाटानें परत येतांना त्याला भेटली. ह्यावरून रघुनाथराव १७५५ च्या डिसेंबरांत पुण्यास आले ह्मणून ग्रँट्डफ् ह्मणतो तें खोटें असून रघुनाथराव जुलै- आगष्टांत पुण्यास आले हें निःसंशय खरें आहे हें सिद्ध आहे. १७५५ त बाळाजी बाजीरावानें व महादाजीपंत पुरधऱ्यानें बेदनूरची स्वारी केली. बाळाजी कृष्णेपर्यंत जाऊन मध्येंच नाशकाला सिंहस्थाकरितां जाण्यास परतले, ते सलाबतजंगाच्या राज्यांतून कायगांवटोक्यावरून ( पत्रें व यादी १६ ) नाशकास गेले. कायगांवटोक्यावरून बाळाजीला जाण्यास एक कारण झालें, तें हें कीं, सलाबतजंगानें जानोजी भोसले व रघोजी करांडे यांच्यावर स्वारी करण्याचा घाट घातला होता तो इकडून शह देऊन जागच्या जागींच बसवून टाकावा. ह्या ( १२ ) डावपेंचाचें वर्णन ह्या पुस्तकांतील लेखांक ६५ त केलें आहे. हें राजकारण ग्रँट्डफला माहीत नव्हतें. नाशकाहून बाळाजी बाजीराव पुण्यास १७५५ च्या एप्रिल-मेंत आले व १७५५ च्या नोव्हेंबरांत सावनूरच्या स्वारीस

निघाले; ह्मणजे सरासरी सहा महिने ते पुण्यास होते. असें असून सबंध वर्षभर ते पुण्यास स्वस्थ बसून होते ह्मणून डफ् आपल्या इतिहासाच्या १९ व्या भागाच्या प्रारंभीं लिहितो तें त्याला हा मवाल डावपेंच माहीत नव्हता ह्मणून त्यानें लिहिलें हें उघड आहे. १७५६ च्या जानेवारींत बाळाजी सावनुरास जाऊन पोहोंचला व सावनूरच्या वेढ्यास सुरवात झाली. सावनूरची स्वारी १७५६ च्या जानेवारीपासून जूनपर्यंत चालली होती. मध्येंच रघुनाथराव दादा सावनुरास येऊन मिळाले व तेथून त्यांनीं कित्तूरास ( १३ ) स्वारी केली. ही स्वारी ग्रँटडफ्‌ला माहीत नव्हती. सावनूरची स्वारी चालू असतां गोपाळराव पटवर्धनानें सोंध्यास (१४) स्वारी केली ( ऐतिहासिकलेखसंग्रह २,३ ). हीहि स्वारी ग्रांट्‌डफ्‌ला माहीत नव्हती. गोपाळराव सोंध्याहून निघून बंकापुराजवळ हनगळ येथें उतरला व सबंद पावसाळा तेथेंच काढून पुढें उघाड झाल्यावर त्यानें श्रीरंगपट्टणाकडे मोर्चा वळविला, तों १७५७ फेब्रुवारी आला. १७५७ च्या मार्चांत गोपाळराव श्रीरंगपट्टणापासून दहाबारा कोसांवर होता ( लेखांक ५७,६२ ). १७५७ तील श्रीरंगपट्टणच्या ( १५ ) स्वारीचें सर्व श्रेय गोपाळरावास देणें रास्त आहे. परंतु, गोपाळरावाचें नांव सुद्धां ग्रँट्‌डफ्‌ला माहीत नव्हतें. मग त्यानें ह्या स्वारींत बहुत मेहनत घेतली हें त्याला कोठून ठाऊक असणार? गोपाळरावाच्या श्रीरंगपट्टणावरील १७५९ च्या (१६) स्वारीसंबंधीं देखील ग्रँटडफ्‌नें असेंच मौनव्रत धारण केलें आहे. हें इतकें बाळाजीबाजीरावाच्या स्वाऱ्यांसंबंधीं झालें. ह्याखेरीज कोळवणांतील कोळ्यांचीं बंडें वगैरेसंबंधीं त्याच्या ग्रंथांत माहिती नाहीं हें मुद्दाम सांगितलें पाहिजे असें नाहीं.

ग्रँट्‌डफ्‌नें अजीबात सोडून दिलेल्या मोहिमांचा येथवर विचार झाला. आतां ज्या मोहिमांचीं उल्लेख व वर्णनें त्यानें केलीं आहेत त्यासंबंधीं माझें ह्मणणें काय आहे तें सांगतों. १७५० पासून १७६१ पर्यंत ज्या मोहिमांची माहिती ग्रँट्‌डफ्‌नें दिली आहे त्या सर्वांत पानिपतच्या मोहिमेचें वर्णन त्याच्या त्या वेळच्या माहितीप्रमाणें त्यानें बरेंच विस्तृत दिलें आहे. त्याच्यापेक्षां कीननें पानिपतचें वर्णन बरेंच सांगोपांग दिलें आहे. परंतु, ह्या दोन्ही ग्रंथकारांनीं काशीराजावरती सर्वस्वीं भिस्त ठेवल्यामुळें त्यांचीं वर्णनें एकदेशीय व अपुरीं झालीं आहेत. तीं अपूर्ती व एकदेशीय कशीं झालीं आहेत ह्याचें विवेचन मीं पुढें केलें आहे. तेव्हां सध्यां ह्या मोहिमेला सोडून दुसऱ्या मोहिमांकडे वळतों. उदगीरच्या मोहिमेचें व युद्धाचें वर्णन डफ्‌नें त्याच्या नित्याच्या नेमाप्रमाणें त्रोटक परंतु बरें केलें आहे. पानिपतच्या लढाई खेरीजकरून १७५० पासून १७६१पर्यंत झालेल्या बाकी कोणत्याहि लढाईची तारीख देण्याच्या भानगडींत ग्रँट्‌डफ् पडला नाहीं; त्याप्रमाणें ह्याहि लढाईची तारीख त्यानें दिली नाहीं. ग्रांटडफ्‌च्या वर्णनाशीं मीं छापलेलीं पत्रें ताडून पाहिलीं असतां वाचकानां कांहीं तफावत व बरीच नवीन माहिती दिसून येईल. शिंदखेडच्या मोहिमेसंबंधीं ह्या ग्रंथांत सरासरी ७० पत्रें छापिलीं आहेत. त्यांत लढाई होण्याच्या अगोदर झालेल्या कारस्थानाची बारीक हकीकत आहे. त्या हकीकतीशीं ग्रांटडफ्‌ची हकीकत ताडून पाहिली असतां कांहीं तफावत व बरीच नवीन माहिती दिसून येईल. ग्रँट्‌डफ्‌नें ह्या मोहिमेची

प्रस्तावना बरी केली आहे; परंतु, खुद्द लढाईचें वर्णन मुळींच दिलेलें नाहीं. पानिपत, उदगीर व शिंदखेड ह्या तीन मोहिमांखेरीज नामसंकीर्तनापलीकडे ग्रँट्डफ्नें कोणत्याच मोहिमेचें वर्णन केलें नाहीं. अमक्या वर्षी अमुक मोहिम झाली व तींत अमुक अमुक व्यक्तींचा प्रमुखपणें संबंध येतो ह्या व्यतिरिक्त त्याच्या ग्रंथांत जास्त कांहींएक सांपडावयाचें नाहीं. हा असा प्रकार होणें एका प्रकारें अपरिहार्यच होतें. १७५० पासून १७६० पर्यंत ठळक ठळक अशा वेचाळीस मोहिमा झाल्या हें वरतीं सांगितलेंच आहे. ह्या प्रत्येकीचें यथास्थित वर्णन देऊं ह्मटल्यास ग्रांटडफ्च्या बखरी एवढी बखरही पुरणार नाहीं. ह्याचा दाखला पाहिजे असल्यास ग्रांटडफ्नें केलेलें पाणिपतच्या लढाईचें वर्णन घ्या. ग्रांटडफ्च्या इतिहासाचा संबंध २१वा भाग ह्मणजे ग्रांटडफ्च्या मुंबईच्या आवृत्तीचीं १५ पृष्ठें ह्या मोहिमेनें व्यापून गेलीं आहेत. लहान मोठ्या मोहिमांचीं सरासरी काढून दर मोहिमेस १० पृष्ठें धरिलीं तर ४२ मोहिमांस ४२० पृष्ठें लागतात. तेव्हां १७५० पासून १७६१ पर्यंतच्या मराठ्यांच्या हालचालींचा वृत्तांत मुंबई-आवृत्तीच्या ५० पृष्ठांत आणावयाला बऱ्याच मोहिमा न कळत गाळाव्या असतांहि राहिलेल्या मोहिमांची त्रोटकच हकीकत देणें ग्रांटडफ्ला भाग पडलें. तशांत, मराठ्यांच्या हालचाली एकाच विवक्षित प्रदेशांत होत नसून, एकाच कालीं, स्वदेश, कोंकणकिनारा, गुजराथ, खानदेश, त्या वेळचें निजामाचें राज्य, ह्मैसूर, रजपुताना, दिल्ली, अंतरवेद, नागपूर, अयोध्या, काशी, प्रयाग, बुंदेलखंड इत्यादि निरनिराळ्या प्रांतांत होत असत. त्यामुळें दृष्टि फांकून जाऊन, दरवर्षी एकाच मोसमांत होणाऱ्या निरनिराळ्या मोहिमांचें व्यवस्थित आकलन होऊन वर्णन करितां येण्याचें काम केव्हांहि मोठ्या श्रमाचें व कुशलतेचें होण्याचा संभव आहे. तशांत त्याच्या हातून, मिळालेल्या कागदपत्रांचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. ह्या व इतर कारणांनीं ग्रांटडफ्च्या हातून जशी इमारत मराठ्यांच्या इतिहासाची मराठ्यांच्या दृष्टीनें उठावी तशी उठली नाहीं. ह्याला मुख्य कारण ग्रांटडफ्नें स्वीकारलेली पद्धत किंवा खरें ह्मटलें असतां पद्धतीचा अभाव होय. अर्थात् १७५० पासून १७६१ पर्यंत बाळाजी बाजीरावानें जो अवाढव्य खटाटोप केला त्याचें ग्रांटडफ्च्या संक्षिप्त पद्धतीनें यथास्थित वर्णन होणें अगदींच अशक्य होतें. ह्या ग्रांटडफ्च्या संक्षिप्त पद्धतीचें स्वरूप पुढील विवेचनांत स्पष्ट करून दाखवितों.

## विवेचन पहिलें.

कोणत्याहि संस्कृत राष्ट्राच्या चरित्राचा सांगोपांग विचार करावयाचा ह्मटला ह्मणजे तो अनेक दृष्टींनीं केला पाहिजे. धर्म, नीति, विद्या, समाज, व्यापार, कृषि, कलाकौशल्य, कायदेकानू, राजकारण व तत्सिद्ध्यर्थ केलेल्या अंतःस्थ व बहिःस्थ खटपटी इतक्या सर्वांच्या प्रगतीचा किंवा विगतीचा कालक्रमानें यथास्थित, बांधेसूत, पद्धतवार व सप्रामाण विचार केला जाऊन तो पुनः आत्मिक व भौतिक रीत्या झाला ह्मणजे राष्ट्राचें चरित्र समग्र कळलें, असें होतें. येथें आत्मिक व भौतिक हे शब्द कोणत्या अर्थाचे वाचक आहेत तें सांगितलें

पाहिजे. धर्म, नीति, विद्या, राजकारण इत्यादि राष्ट्राच्या चरित्राचीं जीं निरनिराळीं अंगें सांगितलीं त्यांचा विचार दोन तऱ्हेनें करितां येईल. हीं अंगें कार्याच्या रूपानें फलित झालेलीं पाहून त्या फलित रूपांचें पद्धतवार वर्णन करण्याची एक तऱ्हा आहे व हींच अंगें कारणरूपानें असलेलीं पहाणें ह्मणजे वर सांगितलेल्या फलित कार्यांचीं कारणें ह्मणून त्यांचा विचार करणें ह्मणजेच दुसऱ्या तऱ्हेचा अंगीकार करणें होय. पहिल्या तऱ्हेला मी भौतिक ह्मणतों व दुसरीला आत्मिक ह्मणतों. भौतिक पद्धतीनें कोणत्याही धर्माचा विचार करावयाचा ह्मणजे त्या धर्मांतील निरनिराळ्या पंथांचें जीवनवृत्तांत द्यावयाचे ह्मणजे ते पंथ किती आहेत, त्यांचीं स्थलांतरें कोठें कोठें झालीं, निरनिराळ्या पंथांच्या कलहांचें स्वरूप काय होतें इत्यादि बाह्य रूपांचीं वर्णनें करावयाचीं आणि आत्मिक पद्धतीनें कोणत्याही धर्माचा विचार करावयाचा ह्मणजे त्या धर्माचीं मूलतत्वें काय आहेत. आत्म्याच्या अनेक वृत्तींतून कोणत्या वृत्तीचें त्या धर्मांत प्राधान्य आहे, इत्यादि अंतःस्थ व गूढ प्रश्नांचा उहापोह करावयाचा. भौतिक पद्धतीनें कलाकौशल्याचा विचार करावयाचा ह्मणजे त्याच्या शाखा किती आहेत, निरनिराळ्या शाखांचा संकर किती झाला व शाखांचीं स्थलांतरें कोठें कोठें झालीं हें सांगावयाचें आणि आत्मिकरीत्या कलाकौशल्याचा विचार करावयाचा ह्मणजे आत्म्याच्या कोणत्या वृत्तीपासून कलाकौशल्याचा उगम होतो वगैरे अंतःस्थ व गूढ प्रश्नांचा उलगडा करावयाचा. त्याचप्रमाणें भौतिक पद्धतीनें कोणत्याही राष्ट्राच्या राजकीय गतिस्थितींचा विचार करावयाचा ह्मणजे त्या राष्ट्रांत झालेल्या अंतःस्थ कलहांचीं व बाहिःस्थ कलहांचीं वर्णनें द्यावयाचीं ह्मणजे राष्ट्रांतील बंडांचीं, निरनिराळ्या पक्षांच्या, वर्गांच्या व जातींच्या चढाओढींचीं व परराष्ट्रांशीं झालेल्या लढायांचीं वर्णनें द्यावयाचीं आणि आत्मिक पद्धतीनें राष्ट्राच्या राजकीय गतिस्थितींचा विचार करावयाचा ह्मणजे अंतःस्थ व बाहिःस्थ कलहांच्या उत्पत्तीचीं कारणें, त्या राष्ट्रांतील एकंदर लोकसमूहांत आत्म्याच्या उन्नतावनत वृत्तींपैकीं कोणत्या वृत्तीचें विशेष प्राबल्य आहे त्याचा सूक्ष्म विचार, त्या राष्ट्रांतील मोठमोठ्या नटांच्या पुरुषांच्या राजकीय मताचें सशास्त्रदर्शन इत्यादि प्रश्नांची चर्चा करावयाची. राष्ट्राच्या राजकीय गतिस्थितींचा भौतिक व आत्मिकदृष्ट्या जो विचार त्यासच राष्ट्राचा राजकीय इतिहास ह्मणतात. धर्म, नीति, विद्या, समाज, व्यापार, कृषि, कलाकौशल्य ह्यांतील एक किंवा अनेक अंगांचें प्राबल्य किंवा दौर्बल्य होऊन राष्ट्राच्या राजकीय चरित्रावर त्यांचे आघात व परिणाम होऊं लागले ह्मणजे त्यांचाही विचार राष्ट्राच्या राजकीय इतिहासांत करावा लागतो. येणेंप्रमाणें कोणत्याही राष्ट्राचा सर्वांगांनीं संपूर्ण असा राजकीय इतिहास लिहावयाचा ह्मटला ह्मणजे तो भौतिक व आत्मिक अशा दोनही पद्धतींनीं लिहिला पाहिजे. आतां प्रस्तुतच्या विवेचनाचा विषय जो ग्रांटडफचा इतिहास त्याची पद्धत पाहिली तर निव्वळ भौतिक आहे हें सर्वत्र ग्राह्य होण्यासारिखें आहे असें वाटतें. आत्मिकरीत्या मराठ्यांच्या इतिहासाचा विचार करण्याच्या खटपटींत पडण्याची आपली इच्छा नाहीं व योग्य शिक्षण न मिळाल्यामुळें आपल्या अंगीं सामर्थ्य नाहीं असें ग्रांटडफ् आपल्या

इतिहासाच्या प्रस्तावनेंत स्वतःच प्रांजलपणें व विनयानें कबूल करितो. आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षी ग्रांटडफनें शाळा सोडिली. तोंपर्यंत व्याकरणभूगोलादिविद्यासंपत्ति जी कांहीं मिळाली ती घेऊन तो हिंदुस्थानांत आला व तेवढ्यावरती आपल्या लष्करी व मुलकी हुद्याला लिहिणें सवरणें त्याच्या वरिष्ठांच्या मताप्रमाणें तरी त्यानें मोठ्या बहादरीनें केलें. पुढें पेशवाई बुडत असतां व बुडाल्यावर पुणें व सातारा येथील अवाढव्य दफ्तरें त्याच्या हातांत आलीं व त्याला मराठ्यांचा इतिहास लिहिण्याची स्फूर्ति झाली. परंतु, उदार शिक्षणाचा ह्मणजे प्राचीन इतिहासादि विद्यांचा जो कांहीं योग्य संस्कार मनुष्याचें मन उदात्त, कुशाग्र, ग्राहक व मार्मिक करण्यास लहानपणींच लागतो तो ह्या इसमाला झाला नसल्याकारणानें, आत्मकरील्या मराठ्यांच्या इतिहासाचें विवेचन करण्याचें तर त्याला सोडून द्यावें लागलेंच; परंतु, भौतिक पद्धतीनेंहि जें मराठ्यांच्या इतिहासाचें वर्णन त्यानें केलें आहे तेंही अनेक प्रकारें व्यंग आहे. कालविपर्यासाचा दोष, मोठमोठ्या मोहिमांचें अज्ञान व सापेक्षदृष्ट्या कोणत्या प्रसंगाला किती महत्त्व द्यावें ह्याची नुमज, इतर मराठी बखरींप्रमाणेंच ह्याच्याहि इतिहासांत दिसून येते. १७५० पासून १७६१पर्यंत झालेल्या रघुनाथरावाच्या मोहिमांच्या कालाचा ग्रांट्‌डफनें कसा विपर्यास केला आहे व त्यामुळें तो कसा कसा गोत्यांत पडत गेला आहे हें मी मागें नुकतेंच दाखवून दिलें आहे. त्यानें मोहिमा कोणकोणत्या गाळल्या आहेत ह्याचाहि निर्देश मागें झाला आहे व त्या वेळच्या मराठ्यांच्या अवाढव्य प्रयत्नांच्या मानानें त्या वेळच्या इंग्रजांचा प्रयत्न अगदींच क्षुद्र असून त्यांच्या वर्णनानें आपल्या इतिहासाची संकुचित जागा सापेक्ष दृष्टीनें ग्रांट डफनें किती अडविली आहे, हें सुरत, विजयदुर्ग, बाणकोट इत्यादि ठिकाणीं इंग्रजांनीं केलेल्या वळवळींचे पवाडे वाचून कोणाच्याहि ध्यानांत येण्यासारिखें आहे. ह्या वळवळींसंबंधानें ग्रांटडफचें स्वतःचेंहि मत वर निर्दिष्ट केल्याप्रमाणेंच आहे. तो ह्मणतो, इंग्रज महाराष्ट्राचे पुढें धनी झाले ह्मणून ह्यावेळचीं हीं त्याचीं कृत्यें सविस्तर वर्णिलीं पाहिजेत. ह्मणजे इंग्रजांच्या हिंदुस्थानांतील इतिहासाच्या महासमुद्रांत शेवटीं मराठ्यांच्या इतिहासाचा लोप होणार हें मत दृष्टीपुढें ठेवून त्यानें मराठ्यांचा इतिहास लिहिला. त्यामुळें शिवाजी महाराजांच्या पराक्रमाला प्रारंभ झाल्यापासून ह्मणजे इ०स०१६४६ पासून १७९६ पर्यंतच्या १५० वर्षांचा इतिहास त्यानें ४७५ पावणे पांचशें पृष्ठांत आटोपून पुढील २२ वर्षांच्या हकीकतीला २०० दोनशें पृष्ठें दिलीं आहेत. पहिल्या १५० वर्षांतील मराठ्यांच्या खटाटोपा किती अवाढव्य होता ह्याचा विचार केला तर पुढील २२ वर्षांना त्यानें जितकीं पृष्ठें दिलीं आहेत त्यांच्या मानानें ह्या १५० वर्षांना १२०० पृष्ठें तरी निदान देणें जरूर होतें. परंतु, इतकी विस्तृत माहिती दिल्यास ती आपल्या इंग्रजी वाचकांस रुचणार नाहीं हें ध्यानांत धरून त्यानें आपल्या इतिहासाची रचना केली ( Duff's preface ). इतिहास लिहिण्यांत त्याचा मुख्य हेतु आपल्या देशबांधवांना मराठ्यांच्या संबधीं टोकळ

व त्यांतल्या त्यांत समाधानकारक माहिती देण्याचा होता. मराठ्यांचा इतिहास कसा तरी ओरबाडून जो त्यानें काढिला त्याचें मुख्य कारण हेंच आहे. त्यानें मराठ्यांचा इतिहास लिहिला तो मराठ्यांच्याकरितां लिहिला नसून आपल्या देशबांधवांकरितां लिहिला आहे. मराठ्यांच्या पराक्रमांचें कौतुक वाटण्याचें त्याला कांहींच कारण नव्हतें. मराठ्यांचें बहिःस्वरूप मोठ्यांत मोठें होतें केवढें व तें नसें कसकसें होत गेलें एवढें त्याला दाखवून द्यावयाचें होतें. व तें काम त्यानें समाधानकारक केलें आहे असें त्याच्या देशबांधवांचें मत आहे. मराठी बखरींच्यापेक्षां त्याचा इतिहास जास्त व्यवस्थित आहे हें इकडील लोकांसहि मान्य आहे; परंतु, स्वतंत्र इतिहास ह्या नात्यानें त्या ग्रंथाची किंमत महाराष्ट्रांतील इतिहासज्ञ निराळी करितात. कां कीं, ( १ ) ग्रांट्डफनें आपला इतिहास मुख्यत्वें मराठी बखरी, मुसलमानी तवारिखा, सरदारांनीं दिलेल्या कैफियती व अशाच स्वरूपाचीं इतर टिपणें, ह्यांची संगति जुळवून तयार केला आहे. ह्या बहुतेक बखरी, तवारिखा व कैफियती कमजास्त प्रमाणानें अविश्वसनीय आहेत व त्यांच्या आधारावर रचलेला मराठ्यांचा कोणताहि इतिहास, अपूर्ण व अविश्वसनीय होण्याची बहुतेक खात्री आहे. ( २ ) पुणें व सातारा येथील दफ्तरें व दुसरीं अवांतर कागदपत्रें ग्रांटडफला मिळालीं होतीं हें खरें आहे. परंतु, त्याचा त्यानें योग्य उपयोग करून घेतला नाहीं. काव्येतिहाससंग्रहांतील पत्रें, ऐतिहासिकलेखसंग्रहांतील पत्रें व मीं सध्यां छापिलेलीं पत्रें हीं सर्व मिळून १७५० पासून १७६१ पर्यंतच्या अवधींतील अशीं सुमारें ४५० साडेचारशें होतात. त्यांवरून ह्या अकरा वर्षांतील ग्रांटडफच्या इतक्या चुका दाखवून देतां येतात, त्याअर्थीं निदान ह्या अकरा वर्षांसंबंधीं तरी ग्रांटडफनें पुणें व सातारा येथील दफ्तरांचा योग्य उपयोग करून घेतला नाहीं असें बिनदिक्कत ह्मणतां येतें. ( ३ ) योग्य शिक्षणाच्या अभावामुळें कोणताच इतिहास लिहिण्याची व विशेषतः मराठ्यांचा इतिहास लिहिण्याची ग्रांटडफची योग्यताच नव्हती. पुणें व साताऱ्यांतल्यासारिखीं भरपूर माहितीनें भरलेलीं अवाढव्य दफ्तरें जेम्स् मिल, गिबन, मोम्सेन, ह्यूम, गिझो इत्यादिसारख्या शोधकांच्या हातीं पडलीं असतीं तर, त्यांचें त्यांनीं बावनकशी सोनें करून दाखविलें असतें. ( ४ ) तो विदेशीय असल्या कारणानें मराठ्यांच्या पराक्रमांचा पाल्हाळ तर राहूं द्याच; परंतु, सविस्तर व साद्यंत माहिती देण्याची त्याला हौस नव्हती. विदेशीय लोकांना मराठ्यांच्या हालचालींचें सामान्य ठोकळ ज्ञान झालें ह्मणजे आपलें काम झालें अशी ग्रांटडफची समजूत होती. (५) त्यानें आपला इतिहास भौतिक पद्धतीनें लिहिलेला आहे व तोहि अनेक प्रकारें अपूर्ण झाला आहे. ह्यामुळें त्याच्या इतिहासाला, कीर्तनें ह्मणतात त्याप्रमाणें, अपूर्ण असा मराठ्यांच्या मोहिमांचा नामनिर्देशात्मक इतिहास असें ह्मटलें असतां चालेल. ग्रांटडफच्या इतिहासाला मोहिमांचाहि इतिहास ह्मणतां येत नाहीं. कारण, मराठ्यांनीं ज्या शेंकडो मोहिमा केल्या त्यांपैकीं फारच थोड्यांचा ह्मणजे एकीचाच त्यानें कांहींसा सविस्तर वृत्तांत दिलेला

आहे. बाकीच्यांचा वृत्तांत कांहींच दिला नाहीं. तेव्हां ‘ मराठ्यांच्या मोहिमांचा इतिहास ’ असेंहि नांव ह्या इतिहासाला शोभत नाहीं. ह्या इतिहासाला “ इंग्रजांना मराठ्यांची कांहीं माहिती देणाऱ्या वृत्तांताचें इतिहासवजा पुस्तक ” असें नांव दिलें असतां चालेल.

ग्रांटडफचा इतिहास अपूर्ण व जुनापुराणा होण्याची हीं अशीं कारणें आहेत. हीं दाखवून दिलीं नसतीं तरी देखील चालण्यासारिखें होतें. कारण, ग्रांटडफच्या ग्रंथांत चुका आहेत असा संशय आल्याचीं चिन्हें अलीकडील १०।२० वर्षांतील लिहिण्यांत व बोलण्यांत थोडथोडीं दिसूं लागलीं होतीं. परंतु, कोणींहि स्पष्टपणें ग्रांटडफच्या ग्रंथांत अमुक अमुक चुका आहेत असें दाखवून दिलें नव्हतें. ह्या एवढ्याच कारणाकरितां मला हें दोष दाखवून देण्याचें कंटाळवाणें काम निरुपायानें करावें लागलें आहे. शिवाय, आणीकहि एक आनुषंगिक कारण झालें. तें असें कीं, ग्रांटडफनें आपला इतिहास भौतिकपद्धतीनें लिहिला असल्याकारणानें वाचकांचा मराठ्यांच्या कृत्यांसंबंधीं कांहीं एक चमत्कारिक ग्रह होऊन जातो. शिवाजी महाराजांच्या पराक्रमाला प्रारंभ होण्यापासून तों नाना फडणिसांच्या अखेरीपर्यंत मराठ्यांनीं शेंकडों मोहिमा हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांतून केल्या. इ. स. १६४६ पासून १७९६ पर्यंत एकहि वर्ष कोठेंनाकोठें तरी मुलुखगिरी केल्याशिवाय मराठ्यांनीं सुनें जाऊं दिलें नाहीं. ग्रांटडफच्या ग्रंथांतील ह्या मुलुखगिऱ्यांची कोरडी जंत्री पाहिली व त्यानें ह्या मुलुखगिऱ्यांची केलेली थट्टा वाचली ह्मणजे वाचक क्षणभर स्तब्ध होऊन आपआपल्याशींच विचार करितो कीं, काय हो हा चमत्कार आहे ! एक सारिखे दीडशें वर्षे एक वर्षाचीहि खळ पडूं न देतां ह्या सैतानांनीं सर्व हिंदुस्थानभर केवळ हुतूतु कीं हो घातला ! शेतें, वाड्या, गांवें, शहरें जाळून व पोळून प्रांताचे प्रांत ह्या राक्षसांनीं उध्वस्त करून टाकिले ! लढाईच्या वेळेस शत्रूला हातघाईस आणण्यास संस्कृतराष्ट्रें हीं असलीं कृत्यें कधीं कधीं किंवा वारंवारहि करितात; परंतु त्यांत त्यांचा कांहीं तरी स्तुत्य हेतु असतो. ह्या मराठ्यांचा मात्र प्रकार कांहीं विलक्षणच! हेतु ह्मणावा तर लूट मिळविण्याखेरीज दुसरा कांहींच नाहीं ! ह्या मोहिमेचा पत्ता त्या मोहिमेला नाहीं ! कांहीं कारण नसतां, पावसाळा झाल्यावर ह्या दुष्टांनीं पुण्याहून जें तडक निघावें तें कांहींनीं श्रीरंगपट्टणावर घाला घालावा, कांहींनीं अमदाबादेवर झांप टाकावी, कांहींनीं अवरंगाबादेला बुचाडावें व काहींनीं खुद्द दिल्लीच्या-पातशाहाच्या मानगुटीस बसावें ! एका काळीं ह्या दरोडेखोरांनीं हिंदुस्थानचें सार्वभौमत्व पटकावून बसण्याचा प्रसंग आणिला होता; परतु, खरोखर देवाचीच करणी ! ह्मणून हा अघोर प्रसंग हिंदुस्थानच्या निरुपद्रवी प्रजेवर आला नाहीं. हे असले विचार कल्पक वाचकांच्या मनांत ग्रांटडफचा इतिहास वाचून येतात, हें मेकॉले, गोपाळराव हरी देशमुख इत्यादींच्या लिहिण्यावरून ध्यानांत येण्यासारिखें आहे. ह्या असल्या विचारांचा पगडा अजूनहि गेला नाहीं. हेंहि सप्रमाण सिद्ध करून दाखवितां येईल. मराठ्यांच्या अमदानींत जिकडे तिकडे दंगेधोपे, लढाया व मुलुखगिऱ्या ह्यांचा सुळसुळाट होऊन

शांतता ह्मणून माहित नव्हती असें प्रतिपादन केलेलें अद्यापाहे अनेक लोकांच्या तोंडून ऐकू येतें. ह्याला कारण ग्रँटडफचा इतिहास व त्याची भौतिक पद्धति हीं होत. अज्ञ किंवा नवख्या प्रेक्षकाच्या दृष्टीला भासणाऱ्या मराठ्यांच्या ह्या सरावैरागतीला कांहीं व्यवस्थित धोरण होतें किंवा नव्हतें, १६४६ पासून १७९६ पर्यंत ह्या महाराष्ट्रांतील लोकसमूहांत कोणत्या विचाराचें प्राधान्य होतें व परराष्ट्राशीं मराठ्यांच्या ज्या लढाया होत त्यांना कांहीं सयुक्तिक व समाधानकारक कारणें होतीं किंवा नव्हतीं ह्या गोष्टींचा आन्मिकरीत्या ग्रांटडफनें विचार न केल्यामुळें ह्या असल्या मतांचा प्रसार झाला आहे. पद्धति, धोरण, विचार व नीति मराठ्यांच्या कृत्यांत होती किंवा नव्हती ह्याचा ग्रांटडफनें विचार न केल्यामुळें व त्याच्याखेरीज मराठ्यांचा दुसरा इतिहास अद्यापपर्यंत लिहिला गेला नसल्यामुळें ह्या दुराग्रहाचें साम्राज्य सध्यां झालें आहे. परंतु, ह्या दुराग्रहाना जागा असण्यास, माझ्या मतें, बिलकुल कारण नाहीं. मराठ्यांच्या कृत्यांना कांहीं धोरण होतें हें सप्रमाण दाखवितां येतें, ह्याच प्रश्नाचा विचार पुढील विवेचनांत केला आहे.

## विवेचन दुसरें.

पंधराव्या व सोळाव्या शतकांत आणि सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत महाराष्ट्राची स्थिति फारच विपन्न झाली होती. त्या वेळचें वर्णन करितांना समर्थ ह्मणतात:—"तीर्थ क्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं । सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ यवनांनीं हिंदु धर्माचा उच्छेद करून टाकिला तेव्हां " देव, धर्म, गो, ब्राम्हण ह्यांचें संरक्षण करण्यास " शिवाजी राजे अवतीर्ण झाले व त्यांनीं यवनांच्या सर्वोच्छेदक गतीचा प्रतिरोध केला. ह्या महत्कृत्याला अनुलक्षून समर्थ शिवाजीराजास लिहितात कीं, " तुह्मीं झाला ह्मणून महाराष्ट्र धर्म कांहीं तरी राहिला; " व पुढें सप्रेम विनवणी करितात कीं, " आपण धर्मस्थापनेची कीर्ति उत्तरोत्तर अशीच संभाळिली पाहिजे. " धर्मस्थापनेची कीर्ति संभाळण्यास काय करावें ह्मणाल तर " अमर्याद फितवेखोर लोकांचा संहार करावा; न्यायसीमा उल्लंघू नये; नेटके बंद बांधावे; तुरंग, शस्त्र आणि स्वार जमवावें " आणि सर्वांत पहिलें काम काय करावें तर "मराठा तितका मेळवावा; आणि जिकडे तिकडे महाराष्ट्रधर्म वाढवावा " आपला महाराष्ट्रधर्म वाढविण्यास आणखी उपाय कोणते तर " बहुत लोक मेळवावे । एक विचारें भरावें । कष्टें करून घसरावें । म्लेंच्छावरी ॥ " आणि इतकें करून झाल्यावर मग, " आहे तितकें जतन करावें । पुढें आणीक मेळवावें । महाराष्ट्र राज्य करावें । जिकडे तिकडे ॥ " समर्थांच्या ह्या उक्तींवरून कळून येईल कीं, सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत महाराष्ट्रांतील विचारी पुरुषांचीं मनें एका जबर कल्पनेनें भारून गेलेलीं होतीं. ती कल्पना कोणती तर महाराष्ट्रधर्माची स्थापना करणें ही. ही कल्पना सफल करण्याचें अवघड काम शिवाजीनें केलें शिवाजीच्या एकंदर चरित्राची गुरुकिल्ली हीच कल्पना होय. ही कल्पना ध्यानांत ठेवून मग शिवाजीच्या व त्याच्या अनुयायांच्या कृत्यांचा विचार करावा

ह्मणजे त्या काळीं महाराष्ट्रांत व कर्नाटकांत जिकडे तिकडे मराठे निष्कारण धांवतांना परकीय इतिहासकारांना जे दिसतात ते मनांत कांहीं विशिष्ट हेतु धरून शिस्तवार मोहिमा करीत आहेत असें भासूं लागतील. शिवाजीला चोर व त्याच्या अनुयायांना गनीम ह्मणून यवनांनीं टोपणनांवें दिलीं. त्यांचा वाच्यार्थ घेण्याची जी परकीय इतिहासकारांना खोड लागली आहे ती ते टाकून देतील व देव, धर्म आणि स्वराज्य ह्यांची स्थापना करणाऱ्या पृथ्वीवरील महापुरुषांच्या मालिकेंत ह्या पुण्यश्लोक व परमप्रतापी पुरुषाला आडेवेढे न घेतां गोवूं लागतील. आतां हा महाराष्ट्रधर्म ह्मणजे काय? ख्रिस्तीधर्म, महमुदीधर्म, यहुदीधर्म ह्यांच्यासारिखाच हा महाराष्ट्रधर्म आहे कीं काय? तर तो तसा नाहीं. महाराष्ट्रधर्म ह्मणजे हिंदुधर्मच कीं नाहीं? तर महाराष्ट्रधर्म ह्मणजे हिंदुधर्महि केवळ नव्हे. महाराष्ट्रधर्माची व्याख्या हिंदुधर्माहूनहि जास्त व्यापक आहे. महाराष्ट्रांत त्या काळीं चालणारा हिंदुधर्म व भरतखंडांतील इतर प्रांतांत चालणारा हिंदुधर्म ह्यांच्यांत महदंतर होतें. त्या काळीं भरतखंडांत सर्वत्र यवनांचें राज्य होतें व त्या राज्याच्या अंमलाखालीं महाराष्ट्रेतर प्रांतांत प्रजा आपला हिंदुधर्म ह्मणजे व्रतें, उद्यापनें, उपासना, पूजा इत्यादि धर्माचार यवनांकडून कमजास्त त्रास पोंहचत असतांहि, निमूटपणें चालवीत असत. महाराष्ट्रांतील प्रजा मात्र इतकी सोशीक नव्हती. देव फोडणाऱ्या, विजापूर, अहमदनगर, खानदेश, जुन्नर, कोंकण वगैरे प्रांतांवर अमल करणाऱ्या यवनांनीं मराठ्यांना एका बाजूनें अगदीं सतावून सोडिलें होतें व दुसऱ्या बाजूनें त्यांच्यांतील प्रमुख सरदारांना व मुत्सद्यांना मोठमोठ्या मानाच्या जागा दिल्या होत्या. त्यामुळें त्या वेळच्या मराठ्यांत यवनांविषयीं संताप व तो परिहार करण्याचें सामर्थ्य हीं एकाच वेळीं उत्पन्न झालीं. धर्म भ्रष्ट करणाऱ्या, गाई मारणाऱ्या व ब्राह्मणांचा छल करणाऱ्या यवनांविषयीं द्वेषबुद्धि महाराष्ट्रांत दामाजीपंताच्या वेळपासून धुमसत होती व ती शिवाजीमहाराज अवतीर्ण व्हावयाच्या कालीं तर अत्यंत उत्कट झाली होती. यवनांचा उच्छेद करावयाचा हें त्य कालीं महाराष्ट्रांतील हिंदुधर्माचें एक कलम होऊन गेलें होतें. यवनांचा उच्छेद करावयाचा एवढाच त्या वेळच्या मराठ्यांचा हेतु नव्हता तर धर्माची स्थापना करून गोब्राह्मणांचा प्रतिपाल करावयाचा त्यांचा मुख्य हेतु होता. हा उत्तमोत्तम हेतु साध्य होण्यास नुसता यवनांचा उच्छेद करून काम भागण्यासारिखें नव्हतें, तर स्वराज्याची स्थापना करणें जरूर होतें. तेव्हां स्वराज्याची स्थापना करणें हेंहि एक महाराष्ट्रांतील हिंदुधर्माचें मुख्य कलम होऊन बसलें. स्वराज्याची स्थापना करण्यास दोन गोष्टी केल्या पाहिजेत असें शिवाजीच्या लक्ष्यांत आलें. मराठ्यांचें एकीकरण केलें पाहिजे ही एक गोष्ट व त्यांचे धुरीधरण ह्मणजे पुढारपण स्वीकारिलें पाहिजे ही दुसरी गोष्ट. कोणत्याहि वेळीं "बहुत लोक मेळवून एक विचारें भरल्या" शिवाय स्वराज्यस्थापनेची तयारी होत नसते व एवढेच करून काम भागत नाहीं; तर एक विचारानें भरलेल्या लोकांचें धुरीणत्वहि पत्करण्यास व तें पत्करून इष्ट हेतु तडीस नेण्यास महापुरुषांनीं सिद्ध व्हावें

लागतें. “ बहुत लोक मेळवून एक विचारें भरण्याचें ” काम शिवाजीनें संतमंडळीकडून करविलें. ह्या कल्पनेला अनुलक्षून समर्थ ह्मणतात:— “ ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या । संतमंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं ॥ ” ह्या एक विचारानें भरलेल्या मंडळ्यांचें पुढारपण शिवाजीनें व त्याच्या मुत्सद्यांनीं स्वीकारिलें ; आणि स्वराज्याची स्थापना करण्याचें अतिमानुष कृत्य घडवून आणिलें. येणेंप्रमाणें महाराष्ट्रेतर प्रांतांतील हिंदुधर्म + धर्मस्थापना + गोब्राह्मणप्रतिपाल + स्वराज्यस्थापना + एकीकरण + धुरीधरण ह्मणजे महाराष्ट्रांतील हिंदुधर्म होतो अशी त्या काळीं समजूत होती. ह्याच समजुतीला महाराष्ट्रधर्म ह्मणून समर्थांनीं संज्ञा दिली आणि ह्या धर्माची स्थापना व प्रसार करण्याकरितां शिवाजी महाराज व त्यांचे अनुयायी ह्यांनीं प्राणांचा व वित्ताचा अपरंपार व्यय केला. महाराष्ट्रेतर प्रांतांतील हिंदुधर्मास सहिष्णु हिंदुधर्म ह्मटल्यास व महाराष्ट्रांतील हिंदुधर्मास जयिष्णु हिंदुधर्म ह्मटल्यास ह्या दोन्ही धर्मांतील भेद उत्कटत्वेंकरून स्पष्ट होईल. दामाजीपंताच्या वेळचा स्तब्ध विठोबा सहिष्णु हिंदुधर्माची मूर्ति आहे व समर्थांचा उड्डाण करणारा मारुति जयिष्णु हिंदुधर्माची पताका आहे. सारांश, १६४६ पासून १७९६ पर्यंत ह्या कल्पनेला मराठे साक्षात् स्वरूप देत होते व बरोबर १५० वर्षे ह्या कल्पनेच्या धोरणानें मराठे चालले होते. महाराष्ट्र धर्माची ही कल्पना मराठ्यांच्या ह्या १५० वर्षांतील हालचालींची केवळ प्राणभूत आहे. आतां ह्या कल्पनेचा निरनिराळ्या काळीं कसकसा आविष्कार झाला तें सांगतों.

( अ ) स्वराज्यस्थापना हें एक महाराष्ट्रधर्मांतील मुख्य अंग. तत्साधनार्थ शिवाजीमहाराजांचे सर्व प्रयत्न चालले होते. दुर्दैवानें शिवाजी महाराजांचा अस्सल लेख अद्यापपर्यंत एखादा दुसराच उपलब्ध आहे. काव्येतिहाससंग्रहांतील ४११ वें पत्र शिवाजीमहाराजांनीं १६५९ त लिहिलें आहे. त्यांत राज्य आक्रमिण्याकरितां परराज्यांतील देसाई, देशपांडे यांस ते काय काय लालुचा दाखवून बांधून घेत असत हें अंशतः कळण्यासारिखें आहे. ह्या पत्राचा सबंद उतारा खालीं देतों.

तहनामा राजश्री खेमसावंत व लखमसावंत देसाई बहादूर प्रांत कुडाळ यांजकडील पितांबर शेणवई कारभारी येऊन ठराव करून दिला. सुरू सन तिस्साखमसैन अल्लफ.

प्रांत मजकूरचे महाल वगैरे चालत आहेत. आकार होईल त्याचा ऐवज दरसाल निम्मे हुजूर पावता करावा. निम्मा आकार राहील त्यांत तीन हजार लोक पायदळ हेटकरी ठेवावे आणि ज्या वेळेस हुजूर चाकरीस बोलाविले जातील तेव्हां तीन हजार लोकांनिशीं सेवा करावी. खासा जातीनें

स्वराज्य साधनाच्या ठायीं वकिलापाशीं मध्यें राहून तुरुक लोकांचें साधान करावें. ... ... ... ... ... कलम १

प्रांतांतील जमाबंदीच्या चौकशीस हुजरून कारकून व लोक राहतील ते ठेवून त्यांच्या नेमणुकीबद्दल हुजूर अम्मल पैकीं पावतें करावें. ... ... ... ... ... कलम १

येण्याचें प्रयोजन पडेल तेव्हां बोलावणें होईल. तेव्हां येत असावें. ... कलम १.

किल्ले फोंडो प्रांत तालुका घेऊन हुजूर ठेविला त्यास हरएक प्रसंगास कुमक राखीत जावी. विदनूर वगैरे संस्थानच्या खंडण्या घेण्यास स्वारी होईल त्यांच्या कुमकेस जात असावें. ... ... कलम १.

प्रांतमजकुरची देशकत वतनें तुमचीं व वहादूर किताव अजरामत चालेल. त्यांतील किल्ले, कोट व ठाणीं तुमच्या स्वाधीन केलीं आहेत. तेथें दास्तान करून जतन करावीं. तेथें हुजूरचे कारकून व लोक येतील ते ठेवावे. ... ... ... ... कलम १.

शके १५८० विलंबीनामसंवत्सरे फाल्गुन वद्य ७. एकूण पांच कलमें करार करून तहनामा दिला असे. मोर्तब.

हा तहनामा १६५९ च्या मार्चांत झाला आहे. ह्याचा उल्लेख ग्रांटडफनें १६५९ सालच्या हकीकतीखालीं केला आहे. ह्यांत स्वराज्यसाधनाचें कलम आहे. शिवाजीनें मुधोळच्या घोरपड्यांस पाठविलेलें एक विस्तीर्ण पत्र मजजवळ आहे त्यांतही हाच हेतु दर्शित केला आहे.

(ब) स्वराज्य, गनीमाई, सरदेशमुखी व चौथाई ह्या मागण्या मोंगलाईतून मागण्याचा शिवाजीनें परिपाठ ठेविला. ह्यांत स्वराज्यसाधनाचा बराच इतिहास गर्भित आहे. आपण मोंगलाच्या राज्यांतील प्रांताचे सरदेशमुख आहोंत, मोंगलाच्या अमलांतील प्रांत पूर्वी मराठ्यांच्या स्वराज्यांत मोडत होता व मोंगल लोक मराठ्यांना गनीम ह्मणत त्याअर्थी गनीमाईचा पैसा त्यांच्यापासून चोपून घेऊन उणें अक्षर बोलल्याची आठवण जन्मोजन्म त्यांना व्हावी, इत्यादि अर्थ ह्या शब्दांपासून ध्वनित होतात.

(क) महाराष्ट्रधर्मांत ह्मणजे महाराष्ट्रसंस्थांत अष्टप्रधानघटित राज्यव्यवस्थेचाहि अंतर्भाव होतो. राष्ट्राच्या कल्पनेंत राष्ट्रभाषेचाहि समावेश होतो. शिवाजीराजे अवतीर्ण होईतोंपर्यंत दक्षिणेंतील मुसुलमानांच्या संसर्गानें जावली, शृंगारपूर इत्यादि स्थलींच्या मराठ्या राजांच्या दरबारीं व शिवाजी राजाच्या पराक्रमाला सुरुवात होऊन त्यांच्या अभिषेककालापर्यंत खुद्द शिवाजीच्या दरबारीं देखील निरुपायानें फारसी व मुसुलमानी भाषेंतील शब्दांचाच प्रचार उत्कटत्वेंकरून सर्वत्र चालत असे. ह्या परदेशीय प्रचारामुळें स्वराज्याची व स्वराष्ट्राची शुद्ध कल्पना मराठ्यांच्या मनांत गढूळ व अस्पष्ट अशी असण्याचा संभव होता. ह्मणून शिवाजीनें फारशी शब्द टाकून त्यांच्या ऐवजीं संस्कृत व महाराष्ट्रशब्दांचा उपयोग करण्याचा परिपाठ घातला.

येणेंप्रमाणें स्वराज्य साधून महाराष्ट्रधर्म वाढविण्याचा विचार शिवाजीच्या राजनीतींत प्रधान होता. संभाजीराजालाहि महाराष्ट्रधर्म पसरविण्याचा उपदेश समर्थांनीं केला आहे. राजाराम व त्याच्या वेळचे मुत्सद्दी व सेनापति ह्यांनींहि हा स्वराज्य साधनाचा कित्ता उत्तम गिरविला. पुढें शाहूमहाराज आले. त्यांनीं १७०७ पासून १७१४ पर्यंत जो प्रांत

ताराबाईच्या हातून त्यांना मिळाला तेवढ्याची व्यवस्था करून. नंतर १७१४ त बाळाजी विश्वनाथास स्वराज्यसाधन करण्याकरितां मतलबाची खालील याद करून दिली.

१ स्वराज्य थोरले कैलासवासी स्वामींचे वेळेप्रो रायगड व वरकड कोट देखील करून घेणें—ठाणीं मागून घेणें.... ... ... कलम.

१ खटाव १ आकलूज १ कासेगाऊ १ मंगळवेढें. १ मिरज. १ पेडगांव. १ जुन्नर किल्ले समत. १ चौल समत किल्ले. १ सांगोलें. १ नाझरें. १ चाकण. १ बेळगाऊं. १ कल्याण भिंवडी समत किल्ले... ... ... . कलम.

१ त्रिंबक मागोन घेणें .. ... कलम.

१ नोफा दर संस्थानीं घेतील त्यांची चौथाई करून घेणें. ... . कलम.

१ चांदाचें राज्य कान्होजी भोंसले यांनीं साधिलें आहे तें स्वराज्यांत करून घेणे. ... ... ... ... ... कलम.

१ सहा सुभे खेरीज गुजराथ, माळवा साधेल तेथवर साधणें. ... ... कलम.

१ नबाब बल्लोलखानाची दौलत फत्तेसिंग यावाचे नांवें करून घेणें. ... ... कलम.

१ मातुश्री व मदनसिंग देखील कबिले व दुर्गाबाई सेवक लोक मागोन घेणें . कलम.

१ पेशजी मतलब लिहून दिल्हे आहेत. त्याचे फर्मान सनदा करून घऊन येणें. ... ... ... ... ... कलम.

१ कोंकणपट्टी देखील राजपुरी चौथ सरदेशमुखी, स्वराज्य व वरकड साधेल त्याचे फर्मान पृथकाकारें करून घेणें. ... कलम.

१ सरदेशमुखी इनाम दरमहालास एक गांव करून घेणें. ... ... ... कलम.

१ चंदीप्रांतीं राज्यगडकोट देखील करून घेणें. ... ... ... ... ... कलम.

१ जयसिंग पालकर येथील तरी मागून घेणें. ... ... ... ... ... कलम.

ह्या यादींतील मतलबाचें साधन करण्याकरितां बाळाजी विश्वनाथ १७१८ त हुसेनअल्लीबरोबर दिल्लीस गेला. १७१९ च्या फेब्रुवारींत व मार्चांत वर दिलेल्या यादींतील स्वराज्याच्या मतलबाच्या सनदा सय्यदबंधूंकडून त्यानें करून घेतल्या; त्या सनदा घेऊन तो साताऱ्यास परत आला व थोड्याच दिवसांत ह्मणजे १७२९ च्या अक्टोबरांत मरण पावला. बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूचा सन १७२० अक्टोबर असावा असें ग्रांटडफ ह्मणतो तें मला अनेक कारणांकरितां ग्राह्य दिसत नाहीं. पुढें १७२० च्या एप्रिलांत बाजीरावाला पेशवाई मिळाली. त्या वेळीं बाळाजी विश्वनाथाला दिलेली यादी शाहूनें बाजीराव बल्लाळाला दिली ( भारतवर्षांतील पत्रें व यादी ४० ).* कारण, कीं बाळाजी विश्वनाथ दिल्लीहून जे

* भारतवर्षांत छापिलेल्या पत्रें व यादींतील ४० वें पत्र व काव्येतिहाससंग्रहांत छापिलेल्या थोरल्या शाहूमहाराजांच्या चरित्रांतील ४० व्या पृष्ठावरील याद अक्षरशः एकच आहेत. भेद ह्मणून एवढाच कीं, चरित्रांतील याद बहुतेक शुद्ध छापलेली आहे व भारतवर्षांतील याद येथून तेथून चुकांनीं ओथंबलेली आहे. तुलना करण्याकरितां भारतवर्षांतील याद जशीच्या तशीच येथें देतों.

यादी मतलब घेणें ह्मणोन शाहूमहाराज यांणीं बाजीराव बल्लाळ यांजकडे पाठविली तीः—

फर्मान घेऊन आला त्यांची अंमलबजावणी करण्यास तो जगला नाहीं. तेव्हां बाजीरावाला पेशवाई देतांना साधावयाच्या राहिलेल्या मतलबांची याद जशीच्या तशीच शाहूनें त्याच्या

---

**श्री.**

यादी मतलब करून घेणें.

स्वराज्य थोरले कैलासवासी स्वामींचेप्रमाणें "रायगडावरकड" गडकोट देखील करून घेणें.

ठाणीं मागोन घेणें.

१ खटाव.
१ आकलुज.
१ कासेगांव.
१ सांगोलें.
१ मगळवेढें.
१ नाझरें.
१ मिरज.
१ चाकण.
१ पेडगांव.
१ " वालगड."
१ जुन्नर" समेत" किल्ले.
१ कल्याण भिवडी "समेत" किल्ले.
१ चेऊल "समेत" किल्ले.

---

३

"तालुके" दरसंस्थानीं करून " घेतला" त्याची चौथाई करून घेणें.

नवाब " बार्काखानाची " दौलत फत्तेसिगबाबाचे नांवें करून घेणें.

चांदीचे राज्य कान्होजी भोंसले यांणीं साधिलें आहे, तें स्वराज्यांत करून घेणें.

" चंदीप्रांताचें राज्य गडकोट देखील करून घेणें. मातोश्री व " मर्दानसिंग " देखील "कर्दाम" व दुर्गाबाई, जानकीबाई व सेवक लोक " मार्गाल" घेणें.

पेशजी मतलब लिहून दिले आहेत, त्याचे फर्मान सनदा करून घेणें.

कोंकणपट्टी देखील राजपुरी चौथ व सरदेशमुखी, स्वराज्य व वरकड " साधले " त्याचे फर्मान " पृथक् कोरे " करून घेणें.

सरदेशमुखीस इनाम दरमहा "कसगांव" करून घेणें.

जैसिंग पालकर येतील तरी मागोन घेणें.

त्रिंबक मागोन घेणें.

" सांभाळून " याखेरीज गुजराथ माळवा साधेल तथवर साधणें.

येणेंप्रमाणें खमखाम करून घेणें. बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा. मोर्तब असे.

मोडी वाचण्याच्या चुका ह्या एका पत्रांत सुमारें १६।१७ झाल्या आहेत. भारतवर्षाच्या संपादकांनीं काव्येतिहाससंग्रहांतील यादी वाचण्याची खटपट केली असती तर ह्या चुका झाल्या नसत्या. ह्या मासिकपुस्तकांत मोडी वाचनाच्या इतरत्रहि अशाच चुका झाल्या आहेत. बऱ्याच टिपा इतिहासाला सोडून लिहिलेल्या आहेत. ह्या पत्राला भारतवर्ष-

स्वाधीन केली. बाजीरावाच्या कारकीर्दीतील पहिलीं दहा अकरा वर्षे ह्या यादींतील मनलब साधण्यांत गेलीं. १७३१ साच्या सुमाराला बाजीरावानें वरील यादींतील कलमें सर्व साधिलीं. येथपर्यंत ह्मणजे १७३१ पर्यंत स्वराज्यसाधनार्थ मराठ्यांच्या सर्व खटपटी झाल्या. ह्या पुढें आतां मराठ्यांच्या राजनीतीनें दुसरें स्वरूप धारण केलें. तें स्वरूप ह्मणजे हिंदुपदवादशाहीची स्थापना करणें हें होय. हिंदुपदवादशाहीची स्थापना करण्याची प्रस्तावना बाजीरावानें शाहूपुढें केलेली सर्वश्रुत आहेच. १७३१ पासून १७४० पर्यंत बाजीरावाची सर्व खटपट ह्याच स्थापनेच्या प्रीत्यर्थ झाली. दक्षिणेस तुंगभद्रा, उत्तरेस यमुना, पश्चिमेस समुद्र व पूर्वेस निजामुल्मुल्काचा प्रांत व पूर्वसमुद्र ह्या वाढत्या हिंदुपदबादशाहीच्या सीमा झाल्या. हें एवढें काम करून बाजीराव बल्लाळानें आपला अवतार संपविला. बाजीरावाच्या पश्चात् राज्याची धुरा बाळाजी बाजीरावानें उचलली. १७४० पासून १७५० पर्यंत बाजीरावानें जिंकिलेल्या प्रदेशांची व्यवस्था करण्यांत बाळाजीचा काळ गेला व अथून मधून काशी, प्रयाग, कटक, गढेमंडळ, बहादुरभेंडा इत्यादि प्रदेशांकडे त्यानें आपली दृष्टि फेंकिली. परंतु ही दृष्टि रघोजी भोसल्याचा पाडाव करण्यापुरती व दक्षिणेंत पूर्वापार चालत आलेले हक्क प्रस्थापित करण्या पुरती होती. १७५० पर्यंत मराठ्यांचें आधिपत्य साताऱ्याच्या छत्रपतींकडे होतें. त्यांच्या नांवानें हिंदुपदबादशाहीचा प्रसार व स्थापना करण्याची मेहनत बाजीराव बल्लाळानें व बाळाजी बाजीरावानें केली. शाहूराजापेक्षां मुत्सद्देगिरीनें व पराक्रमानें बाजीराव बल्लाळ अतिच श्रेष्ठ होता. परंतु शाहूचें आधिपत्य कमी करण्याकडे त्याचा बिलकुल कल नव्हता. बाळाजी बाजीरावाला पेशवाई मिळाल्यापासून मात्र शाहूचें व त्याच्यानंतर येणाऱ्या छत्रपतींचें माहात्म्य कमी करण्याचा प्रयत्न झाला. शाहू असे तों पर्यंत बाह्यात्कारें छत्रपतीची सेवा अनन्यभावें करण्याचा बाळाजीनें बहाणा केला व तो वारल्यानंतर रामराजा गादीवर आला असतां त्याची पायमल्ली बाळाजीनें मनःपूत परंतु, मोठ्या युक्तीनें केली. बाळाजीच्या खऱ्या पराक्रमाला व त्याच्या मनांत घोळत असलेल्या अवाढव्य हेतूंना स्वरूप शाहूच्या मरणानंतर ह्मणजे १७५० पासून येऊं लागलें. ह्या वर्षापासून बाळाजी मराठ्यांचा खरा पुढारी झाला व साताऱ्याच्या छत्रपतीचें आधिपत्य अस्तास गेलें. ह्या १७५० सालापासून तों १७६१ सालापर्यंत सर्व भरतखंड महाराष्ट्रमय करून टाकण्याचा बाळाजीनें उद्योग केला. सारांश, ह्या १७५० सालापासून ब्राह्मणपदवादशाहीचा प्रारंभ झाला व हिंदुपदवादशाही हा शब्द मागें पडला. पुढील दोन विवेचनांत बाळाजीनें १७५० पासून १७६१ पर्यंत बहुतेक सर्व हिंदुस्थानभर मराठ्यांची सत्ता प्रस्थापित कशी केली व खुद्द महाराष्ट्रांत साताऱ्याच्या छत्रपतींचें व त्यांच्या राजमंडळाचें महत्त्व कमी करून आपलें महत्त्व कसें स्थापिलें ह्याचा विचार केला आहे.

---

कारांनीं एक टीप दिली आहे, तींत ही याद शाहूनें बाजीराव बल्लाळाला पाठविली नसावी असा साशंक व साश्चर्य ध्वनि काढिला आहे. परंतु ही याद बाजीराव बल्लाळालाच शाहूनें पाठविली हें वरील विवेचनांत स्पष्ट केलें आहे.

# विवेचन तिसरें.

ह्या १७५० सालापासून हिंदुपदबादशाहीच्या ऐवजीं ब्राह्मणपदबादशाहीचें नांव नव्यानेंच ऐकूं येऊं लागलें. सातारच्या महाराजांचें प्रस्थ ह्या सालापासून अगदींच मावळलें व पेशवे मराठमंडळाचे मुख्य झाले. ही क्रांति कशी घडून आली तें ह्या विवेचनांत स्पष्ट करितों.

शाहूराजाच्या मृत्यूनंतर १७५० च्या जानेवारीपासून पुढें सर्व हिंदुस्थान व सर्व दक्षिण महाराष्ट्रमय करण्याचा प्रयत्न बाळाजीनें केला व सदाशिव चिमणाजी तर खुद्द रूमशामची सरदेशमुखी पटकविण्याच्या गोष्टी बोलू लागला. १७५० पासून १७६१ पर्यंतच्या ११ वर्षांतील बाळाजी बाजीरावाच्या धोरणाचें खालीं लिहिल्याप्रमाणें पृथक्करण करितां येतें. (अ) हिंदुस्थानांत पश्चिमोत्तर दिशेनें उत्तर रजपुताना, अंतर्वेद, रोहिलखंड, मुलतान, लाहोर, ठठ्ठा व भकर ह्या प्रांतांत अंमल बसवावयाचा ( लेखांक १ ). ( ब ) हिंदुस्थानांत पूर्वेकडे काशी, प्रयाग, अयोध्या, बंगाला इत्यादि प्रदेशांवर मोहीम करावयाची ( काव्येतिहाससंग्रह, पत्रें व यादी ३६२, ३७३, ३८७, ३८८. प्रस्तुत ग्रंथांतील लेखांक ३१, ३७, ३९ इत्यादि ). ( क ) दक्षिणेंत पूर्वेकडे सलाबतजंगाचा प्रदेश घ्यावयाचा; ऐन कर्नाटकांत श्रीरंगपट्टणाला हिंदुराजांच्या ताब्यांत तें होतें तोंपर्यंत अंकित करून टाकावयाचें व पुढें मुसुलमानांच्या ताब्यांत गेल्यावर जिंकून घ्यावयाचें. ( ड ) कोंकणांत सुरत, जंजिरा वगैरे ठिकाणें खालसा करावयाचीं. ( ई ) खुद्द महाराष्ट्रांत सातारची व कोल्हापुरची गादी एक करावयाची ( फ ) आणि सरदारांची व्यवस्था लावावयाची. येणेंप्रमाणें बाळाजी बाजीरावाच्या राजनीतीचें धोरण सहाप्रकारचें होतें. पैकीं (अ), ( ब ), ( क ), ( ड ) आणि ( फ ) ह्या प्रकारांची माहिती ह्या पुस्तकांत, काव्येतिहाससंग्रहांत व ऐतिहासिकलेखसंग्रहांत छापलेल्या पत्रांतून बरीच आली आहे. त्यावरून त्यावेळच्या महाराष्ट्रमुत्सद्यांच्या मनांत कांहीं विशिष्ट हेतु होते व तत्सिद्ध्यर्थ त्यांचे व्यवस्थित प्रयत्न चालले होते हें स्पष्ट दिसून येईल. पश्चिमोत्तर दिशेकडील प्रदेश दिल्लीच्या पातशहानें १७५० त मराठ्यांना बहाल करून टाकिले. तेव्हां १७६१ पर्यंत त्यांत अंमल बसविण्याचा उद्योग करणें त्यांना अवश्यच झालें होतें. लेखांक १ त अबदालीला तंबी देण्याचें वचन मराठ्यांनीं १७५० त पातशहाला दिलें होतें. तेव्हांपासूनच अबदालीचा व मराठ्यांचा सामना होणार हें ठरून गेल्यासारिखें होतें. रघुनाथरावानें १७५८ त लाहोर घेतलें, त्यामुळें अबदाली चवताळला व मराठ्यांच्या अंगावर पानिपतचा घोर प्रसंग आला असें ग्रांटडफ् ह्मणतो, तें फारसें विश्वसनीय नाहीं. हें १७५०तच अबदालीला तंबी देण्याचा मराठ्यांनीं पत्कर घेतला होता ही गोष्ट ध्यानांत धरिली ह्मणजे कळून येईल व रघुनाथरावाला विनाकारण दोष देण्यांत अर्थ नाहीं अशी खात्री होईल. पूर्वेकडील काशी व बंगाला हे प्रदेश घेण्याचा बाळाजीचा १७४२ पासूनच प्रयत्न चालला होता. १७४७ त स्वतः बाळाजी काशींत जाऊन आला. १७५२च्या डिसेंबरांत भालकीचा तह झाल्यावर जयाप्पा १७५३च्या मेंत हिंदुस्थानांत

जावयास निघाला त्यावेळीं काशींचें काम उरकून घ्यावयाची कामगिरी बाळाजीनें जयाप्पाला सांगितली होती. पुढें जयाप्पा कुंभेरचा वेढा झाल्यानंतर काशीकडे जाणार तों त्याला नागोरची कामगिरी आली व काशीचें काम तसेंच तहकूब ठेवून द्यावें लागलें. तरी देखील बिजेसिंगाचें पारपत्य केल्यावर काशीकडे जाण्याचा त्याचा उत्कट मनोदय होता. लेखांक ३१ त १७५४ च्या मार्चांत बापूराव महादेवाला जयाप्पा लिहितो, "तुमचा उपराळा करून श्रींचें काम शेवटास न्यावें यापरतें दुसरें अधिकोत्तर नाहीं". पुढें १७५४ च्या आगष्टांत जयाप्पा पुनः लिहितो, "त्यांचें पारपत्य यथायुक्त करून श्रीक्षेत्रांत अंमल खुलासा करणें हे गोष्ट चित्तांत फारशी आहे." जयाप्पा १७५५ त वारल्यानंतर १७५९ त दत्ताजीला काशी, प्रयाग व बंगाल ह्या प्रांतांवर स्वारी करण्यास बाळाजीनें सांगितलें; परतु, अवदालीच्या गडबडीमुळें तें काम तसेंच राहिलें व पुढें कधीं श्री मराठ्यांच्या हातांत आली नाहीं. दक्षिणेंत सलाबतजंगावर १७५१, १७५२, १७५७ व १७६० ह्या सालीं पुण्याकडून व १७५३, १७५४ व १७५५ ह्या सालांत खानदेश, अलजपूर, येलगदल वगैरे प्रांतांच्या रोखें मराठ्यांनीं सलाबतावर स्वाऱ्या केल्या व त्याच्या हातांतून "बहुतेक सगळी दक्षिण १७६० त मोकळी केली" (लेखांक १६६). १७५१ त चार लाखांचा मुलूख, १७५२ त पन्नास लाखांचा मुलूख, १७५७ त पचवीस लाखांचा मुलूख व १७६० त साडेएकसष्ट लाखांचा मुलूख सलाबतापासून बाळाजीनें घतला. शिवाय १७५५ । ५६ त पंधरा लाखांचा मुलूख परशुराम महादेवाच्या हस्तें मिळाला तो निराळाच (लेखांक ६५). तसेंच जानोजी भोसल्यानेंहि पाईनगंगेच्या अलीकडे आपलें घोडें बरेंच ढकलिलें होतें. सारांश, १७६० त सलाबताजवळ तेलंगणाचा पट्टा तेवढा उरला होता. बाकीचा सर्व मुलूख मराठ्यांच्या ताब्यांत आला होता. १७५९ पर्यंत बहादूरभेंडा, बेदनूर, होळीहोन्नूर, सावनूर, सोंधें वगैरे ठिकाणचे पाळेगार बहुतेक सर्व पादाक्रांत करून पेशव्यांनीं म्हैसूरचें राज्य बहुतेक संपुष्टांत आणिलें. पुढें तें संस्थान हैदरअल्लीच्या ताब्यांत गेलें. तेव्हां तें अजीबात खालसा करावें असा सदाशिवरावभाऊचा मनोदय होता. परतु, अवदालीच्या गडबडीमुळें तें काम लांबणीवर टाकणें भाग पडलें. कोंकणांत शामळाची कासें, उंदेरी वगैरे स्थलें व तुळाजीचे विजयदुर्ग वगैरे किल्ले बाळाजीनें घेऊन, बहुतेक सर्व कोंकणपट्टी सोडवून घेतली. येणेंप्रमाणें १७६० पर्यंत, लाहोर, मुलतान, ठट्टा, भक्कर, अंतर्वेद, रोहिलखंड, कटक, नागपूर, माळवा, गुजराथ, काठेवाड, खानदेश, औरंगाबाद, विजापूर, कोंकण व किल्ले कोपलपर्यंत सर्व मुलूख मराठ्यांच्या साक्षात् अमलाखालीं बाळाजीच्या राजनीतीनें आणिला. येथपर्यंत मजल आणून ठेपल्यावर महाराष्ट्रधर्माचा प्रसार आणीक करावयाचा तों अवदालीची धाड आली आणि कांहीं कालपर्यंत आहे तेंच राखण्याच्या खटपटींत पेशव्यांस पडावें लागलें. ती खटपट १७६१ च्या पुढली असल्यामुळें तिचा विचार मी येथें करीत नाहीं. इतकेंच सांगून ठेवितों कीं, ह्याहि खटपटींत व्यवस्थित धोरण होतें (भारतवर्षांतील पत्रें, यादी वगैरे ८,

41-7.39/2



कलमें ३।४।८।११ ). हें इतकें महाराष्ट्रधर्माचा प्रसार व ब्राह्मणपदवादशाहीची प्रस्तावना व विस्तार करण्याकरितां मराठ्यांनीं काय काय खटपटी केल्या तत्संबंधीं झालें. आत पुढील विवेचनांत सातारच्या छत्रपतींची व्यवस्था करण्यांत पेशव्यांचें काय धोरण होतें त्याचा विचार करितों.

## विवेचन चवथें.

महाराष्ट्रधर्माचा ह्मणजे संस्थांचा प्रसार व ब्राह्मणपदवादशाहीची स्थापना करणें हें बाळाजीच्या राजनीतीचें सर्वस्व होतें. ह्या मतलबाच्या सिद्ध्यर्थ महाराष्ट्रांत व महाराष्ट्राच्या बाहेर त्याचे प्रयत्न चालले होते. पैकीं महाराष्ट्राच्या बाहेर त्यानें काय खटपटी केल्या त्याचें दिग्दर्शन वरील विवेचनांत केलें आहे. आतां खुद्द महाराष्ट्रांत त्यानें काय खटपट केली तें सांगतों. बाळाजी विश्वनाथापासून बाळाजी बाजीरावासुद्धां सर्व पेशव्यांचा मुख्य हेतु स्वतःचें महत्त्व सर्वांहून अधिक वाढविण्याचा होता. धनाजी जाधवाच्या मृत्यूनंतर चंद्रसेन जाधव शाहूचा सेनापति झाला. त्याला बाळाजी विश्वनाथानें प्रथम पिटून लाविलें. नंतर त्यानें बहिरोपंत पिंगळ्याला एकीकडे सारिलें व आपण मुख्य प्रधानकीचा अधिकार ह्मणजे मराठ्यांचें धुरीणत्व मिळविलें. बाजीरावाचे मुख्य प्रतिस्पर्धी ह्मटले ह्मणजे श्रीपतराव प्रतिनिधि, त्रिंबकराव दाभाडे व रघोजी भोसले हे होत. ह्यांपैकीं पहिल्या दोघांचें महत्त्व १७३१ च्या आंत त्यानें पूर्णपणें नाहींसें केलें व पुढील ९ वर्षे मराठ्यांचें धुरीणत्व अनन्यसामान्यत्वेंकरून चालविलें. रघोजीचें प्रस्थ कांहीं राहिलें होतें तें बाळाजी बाजीरावानें १६ जानेवारी १७४४ त मोडून त्याला आपला स्नेही केलें. शाहूच्या मृत्यूनंतर १७५० सालीं बाळाजीचे लहान सहान प्रतिस्पर्धीहि वर डोकें करूं लागले व कांहीं वेळ त्याचे स्नेही सुद्धां त्याच्याविरुद्ध उठले. ताराबाई, जगजीवनराव प्रतिनिधी, यमाजी शिवदेव, बाबूराव बारामतीकर, दमाजी गायकवाड व दाभाडे ह्यांना जागच्याजागीं बसविण्यांत बाळाजीला १७५० पासून १७५३ पर्यंत खटपट करावी लागली. ह्या अवधींत सदाशिव चिमणाजी व रामचंद्रबाबा शेणवई ह्यांना देखील प्रतिस्पर्धेच्या पिशाच्चिकेनें सोडिलें नाहीं. खुद्द रामराजाहि बाळाजीविषयीं उदासीन राहूं लागला. तेव्हां पहिल्या दोघांना मायावीपणानें फितवून बाळाजीनें रामराजावर आपला सर्व राग काढिला. सातारच्या छत्रपतींविषयीं बाळाजी बाजीरावाच्या मनांत फारशी प्रेमबुद्धि कधींच नव्हती. खुद्द शाहूमहाराजांशींहि बाळाजी बाजीरावाचें वर्तन धरसोडीचेंच होतें. परंतु बाळाजी बाजीरावानें ह धरसोडीचें वर्तन प्रथम घालून दिलें असें मात्र कोणीं समजूं नये. १७४०त चिमाजीआप्पा कोंकणांत असतां कांहीं राऊत गोत्रळकोंड्याकडे पाठवून द्यावे ह्मणून शाहूनें चिमाजीला लिहिलें. तें चिमाजीला मान्य न होऊन चिमाजीचा व शाहूचा बराच खटका उडाला ( भारतवर्ष पत्रें व यादी ३८ ). बाळाजीरावानें पेशवाईचीं वस्त्रें १७४० घेतलीं. तीं त्याला महत्प्रयासानें प्राप्त झालीं. कांकीं रघोजी भोसल्यानें बाबूजीनाईक बारामतीकराला पेशवाई देवावण्याचा घाट घातला होता. परंतु महादोबा

पुरंधरे व गोविंदराव चिटणीस ह्यांच्या विद्यमानें बाळाजीनें कशीतरी पेशवाई मिळविली. ह्यावेळीं जो त्रास झाला त्याचा सूड बाळाजीनें अंतस्थ रीतीनें उगवून घेतला. इंहिदे आर्बैन रौद्री नामसंवत्सरीं ह्मणजे इ० स० १७४० सालीं कोल्हापूरचे संभाजी महाराज साताऱ्यास आले असतां त्यांच्याशीं बाळाजी बाजीरावानें एक गुप्त करार केला. त्यांत खालील कलम आहे:-- "शाहूमहाराज यांचा जीवात्मा आहे तों बाह्यात्कारी त्यांचे सेवक, अंतर्यामीं स्वामींचे. शाहूमहाराज यांणीं कैलासवास केल्यावर दोहीं राज्यांवर स्वामींची ( सत्ता ) आणि आह्मी सेवक स्वामींचे" ( काव्येतिहाससंग्रह, पत्रें, यादी वगैरे ४२८।४२९ ). ह्याप्रमाणें शाहूवर सूड उगावल्यानंतर, त्यानें रघोजीचा समाचार घेतला. १७४३त रघोजीचा पराभव करून १७४४त रघोजी साताऱ्यास आला असतां शाहूकडून रघोजीला हिंदुस्थानांतील प्रांतांची वांटणी करून देवविली ( भारतवर्ष, ४६।४७।४८।४९ ). रघोजीच्या गर्वाचा परिहार केल्यावर त्यानें बाबूजीनाईकावर दृष्टि फिरविली. नाईक, सोंधें बिदनूर, सावनूर वगैरे संस्थानिकांच्या प्रांतांत जाऊन चौथ सरदेशमुखी गोळा करीत असे. सावनूरच्या पठाणाला व इतर संस्थानिकांना आंतून फूस देऊन नाईकाचें सर्वस्वीं नुकसान करण्याचें बाळाजीनें आरंभिलें. ( का. पत्रें, यादी वगैरे ६७।६८।७७।७८ ). बाळाजीनें शाहूला, रघोजीला व बाबूजी नाईकाला हा असा त्रास दिला. शिवाय, शाहूचें कर्ज फेडण्यास बाळाजी विलंब लावूं लागला. शाहूच्या राण्यांचींहि कर्जें फेडण्यास बाळाजी अळमटळम करी. तेव्हां शाहूला बाळाजीचा राग अर्थातच आला व १७४७ त बाळाजीचा अधिकार काढून घेण्याचा त्यानें विचार केला. ह्या प्रसंगाला अनुलक्षून भारतवर्षांतील नंबर ४५ चें पत्र आहे. * त्यावरून बाळाजीला निरोप देण्याचा शाहूचा विचार होता हें स्पष्ट होतें. शाहूला ह्यावेळीं बहुतेक वेड लागण्याचा समय येऊन तो पुढें दोन वर्षांनीं १७४९ साच्या डिसेंबराच्या १५ तारखेला मरण पावला. शाहूच्या मरणापूर्वी तीन महिने बाळाजी साताऱ्यास येऊन बसला होता व महाराजांच्या मरणोत्तर गादीवर कोणास बसवावें ह्या

---

* ह्या पत्रांत भारतवर्षकार नाईक कोण ह्मणून विचारतात ते हे बाबूजीनाईक बारामतीकर होत. भाऊंनीं १७४६ अक्टोबरपासून १७४७ च्या मेपर्यंत सावनुरावर व बहादूरभेंड्यावर स्वारी केली ( काव्येतिहाससंग्रह, पत्रें, यादी ६८ ). त्यावेळीं ते सोंधें बिदनूर प्रांताजवळ असल्या कारणानें गोवेंकरांना सहजासहजीं भीति वाटून सांवताकडील पोर्तुगीज लोकांचा शह चुकेल अशी बाळाजीची अटकळ होती ( पत्रें, यादी वगैरे ७७।७८ ). सावनूरचा नवाब सोंध्याकडे आला ह्मणजे सदाशिवरावभाऊला शह बसून गोवेंकरांचा शह उडून जाईल असें बाळाजीचें ह्मणणें होतें. ह्यासंबंधीं बोलणें करीत बाळाजी साताऱ्यास असतांना हें पत्र लिहिलें आहे. शाहूनें बाळाजीची स्वामिभक्ति पहाण्याच्या इच्छेनें त्याला निरोप देण्याचें ह्मणजे काढून टाकण्याचें ढोंग केलें ह्मणून शाहूमहाराजांच्या बखरींत लिहिलें आहे. परंतु, शाहूचें हें ढोंग नसून मनःपूर्वक करणें होतें हें स्पष्ट आहे.

वा.६.३११२



खटपटींत निमग्न होता. सातारच्या गादीला त्यावेळीं हक्क सांगणारे दोन पुरुष होते. ( १ ) पहिला हक्कदार ताराबाईचा नातू रामराजा व ( २ ) दुसरा, कोल्हापुरचा संभाजी राजा. पैकीं संभाजी राजाकडे बाळाजीचा १७४० पासून ओढा होता हें वर सांगितलेंच आहे. परतु, तो शाहूमहाराजांना पसंत नव्हता. राजाराम महाराजांचा वडील पुत्र जो शिवाजी त्याचा मुलगा रामराजा हयात आहे असें शाहूला नुकतेंच कळलें होतें. तेव्हां त्याला दत्तक घेऊन राज्य चालवावें असें शाहूचें साग्रह व सशास्त्र ह्मणणें पडलें. त्यावेळीं बाळाजीला शाहूनें एक चिट्टी लिहिली आहे ती खालीं देतों.

राजमान्य राजश्री बाळाजी प्रधान पंडित यांस

आज्ञाः—

तुह्मी फौज धरनें. आज्ञा केली त्याच्या दैवीं नाहीं. महाराजास दुखनें झालें. नाहीं*; बरें होत नाहीं. राज्यभार चालला पाहिजे. तरी पुढें वंश* बसवन. कोल्हापुरचें न करनें. चिटणिसास सर्व सांगितलें तस करनें. वंस होईल त्याच्या आज्ञेंत चालनें. राजमंडळ चालवनें. चिटणीस स्वामीचे इसवासू . त्याच्या विचारें राज्य राखनें. वंस होईल तो तु ( ह्मास * अंतर ) करनार नाहीं. सुदन असा. *

ह्या चिट्टीवरून बाळाजीवर शाहूचा फारसा विश्वास होता असें दिसत नाहीं. रघोजी भोसले व दाभाडे ह्यांना बोलाविलें असतां ते येऊं पावलें नाहींत. तेव्हां " फौज धरनें " त्यांच्या दैवीं नाहीं अशी शाहूची खात्री झाली. त्यांना सामर्थ्य असतें व अक्कल असती तर ते महाराजांच्या आज्ञेबरहुकूम केव्हांच येऊन पावते. ते आले नाहींत तेव्हां बाळाजीच्या स्वाधीन फौजेचा ( १ ) अधिकार देण्याखेरीज शाहूला गत्यंतरच राहिलें नाहीं. बाळाजीचा ओढा संभाजीराजाकडे विशेष. तेव्हां ( २ ) त्याला बिलकुल आणूं नये असें शाहूनें लिहून ठेविलें. ( ३ ) वंश आहे तोच चालवावा ह्मणजे राजारामाचा पुत्र जो

---

* ही चिट्टी काव्येतिहाससंग्रहांत छापलेली प्रसिद्ध आहे. विराम चिन्हें देऊन ती मीं येथें छापिली आहे. (*) नाहींच्या बद्दल कांहीं, ' वंश ' ह्याबद्दल वंस,**ह्या फुल्यांबद्दल ' ह्मास अंतर ' शब्द असावे असें सुचविणें मला योग्य वाटतें. मूळ लेखाची जशीच्या तशी नकल काव्येतिहाससंग्रहांत छापिलेली नाहीं. कारण, झालें, वंश, इत्यादि शब्द मूळांत जाले, वंस, असे लिहिले असले पाहिजेत. अस्सल लेख जशाचा तसा मिळाल्यास अनेक शंकांचें निवारण होईल. ( १ ) अक्षर शाहूचें आहे कीं नाहीं तें कळेल. ( २ ) कागदावरून व शाईवरून लेख बनावट आहे कीं काय त्याचा निर्णय होईल. ( ३ ) व मूळ लेखांतील अक्षरें जशींच्या तशींच काय आहेत तीं कळतील. चिटणिसांच्या बखरींतील हकीकतीवरून हा लेख अस्सल असावा असें बव्हंशीं ह्मणण्यास हरकत नाहीं. इतकेंच कीं बखर लिहिणाऱ्याच्या पूर्वजाच्या हातांत ही चिट्टी शाहूनें दिली असल्यामुळें, तिच्या खरेपणाविषयीं थोडा संशय येतो.

शिवाजी त्याचा मुलगा रामराजा ह्याला गादीवर बसवावें ही शाहूची तिसरी आज्ञा होती. तसेंच (४) सरदारलोकांचेंहि पुर्वीप्रमाणेंच चालवावें अशी शाहूची चवथी आज्ञा होती. ह्या चार आज्ञांपैकीं फौजेचा अधिकार मिळविण्याकरितां बाकीच्या तीन आज्ञा मनांतून नसतांही बाळाजीनें मान्य केल्या व पुढें समयानुसार रामराजाचें व सरदारांचें महत्त्व कमी करण्यास कमी केलें नाहीं व कोल्हापुरच्या संभाजीशीं पुढील दहा वर्षे मोठें प्रेमाचें वर्तन ठेविलें. इतकेंच नाहीं; तर रामराजा जिवंत असतां नवा राजा करावा असा त्यानें पुढें १७६१ त घाट घातला ( लेखांक २८९ ). बाळाजीची संभाजीराजावर किती ममता होती हें काव्येतिहासांतील ३३५ व्या पत्रावरून कळून येईल. संभाजीराजा १७६० च्या डिसेंबरांत वारला. त्यानंतर १७६१ च्या जूनच्या ९ तारखेला हें पत्र लिहिलें आहे. त्यांत संभाजीशीं बाळाजीचा केवढा स्नेह होता तें जिजाबाईनें मोठ्या सलगीनें ध्वनित केलें आहे व स्पष्ट लिहिलेंहि आहे. कोल्हापुरची व सातारची गादी एक करावी व सर्व सत्ता आपल्या हातीं ठेवावी हा बाळाजीच्या मनांतला द्विविध हेतु होता. ही एकी करण्याची कल्पना शाहूराजाच्या डोक्यांत शिरली नाहीं, त्यामुळें 'करवीरचें न करनें' ह्मणून बाळाजीला त्यानें आज्ञा केली. हा हेतु साध्य झाला असतां मराठ्यांचें राज्य एकछत्री झालें असतें अशी बाळाजीची योजना होती. परतु, शाहूच्या हट्टामुळें व अज्ञानामुळें बाळाजीला हा आपला फार दिवसांचा हेतु एकीकडे ठेवावा लागला आणि शाहूच्या आज्ञा त्या वेळेपुरत्या तरी शिरसा मान्य कराव्या लागल्या. ह्या आज्ञा मान्य करण्यांत बाळाजीचें अतोनात नुकसान झालें. दोन्ही राज्यें एक होण्याची आयती संधि येत होती ती गेली ती गेलीच; परंतु, स्वतःची सत्ता कायम ठेवण्यास त्याला नंतर तीन वर्षे एकसारखी धडपड करावी लागली. कारण, रामराजा राज्यावर आल्यानें ताराबाईचें महत्त्व अतिशय वाढलें. १७०० त राजाराम महाराज वारल्यावर ह्या बाईनें त्यावेळच्या मुत्सद्यांच्या व शाहूच्या विरुद्ध वागून सर्वांचा द्वेष जोडिला होता. शाहूराजे १७०७ त मोंगलांच्या कह्यांतून सुटल्यावर त्यांच्याशींहि १७१२ पर्यंत ह्या बाईनें वाद मांडिला होता. १७३० त ह्या बाईला शाहूनें धरून सातारा येथें कैदेंत ठेविलें. १७४९ पर्यंत ही साताऱ्यास प्रतिबधांत होती. पुढें हिचा नातू जो रामराजा त्याला गादी मिळावी असें शाहूनें ठरविलें. तेव्हां हिचें महत्त्व वाढून आपल्या नित्याच्या स्वभावाप्रमाणें हिनें बाळाजीशीं प्रति स्पर्धा मांडली; दादोबा प्रतिनिधि व यमाजी शिवदेव ह्यांचें खूळ माजविलें; बाबूजी नाईकास भर दिली; सलाबतजंगाचा दिवाण जो रामदासपंत त्याच्याशीं राजकारण केलें; बाळाजीची पेशवाई रामदासपंताचे भावास देण्याचा बेत केला; महादोबा पुरंदऱ्याला देखील फितविलें ( का०पत्रें, यादी वगैरे-३५९ ); व त्याच्या करवीं रामचंद्रबाबा शेणवई व सदाशिव चिमणाजी ह्यांचें व बाळाजीचें वाकडें आणिलें; दमाजीला साताऱ्यास बोलाविलें; उमाबाई दाभाडिणीस चढीं लाविलें; खुद्द शिंदेहोळकरांच्याहि बुद्धीचा भेद करून पाहिला व रघोजीला मोंगलाकडे जाण्यास भर दिली. हा खेळ एकसारखा १७५० पासून १७५३ पर्यंत चालला होता व तो चालत

असतां रामराजा ताराबाईच्या मुठींत राहून बाळाजीच्या धडपडीकडे उदासीनपणें पहात होता. रामराजा उदासीन राहिला तो कांहीं मतलब साधावा अशा हेतूनें राहिला असा अर्थ नव्हे. तर, त्याच्या नैसर्गिक कर्तृत्वहीनतेमुळें त्याला हें औदासीन्य पत्करावें लागलें. रामराजा खुळा आहे अशी इतर लोकांप्रमाणें बाळाजीची खात्री झाली होती. त्याच्याविषयीं कोणाच्याच मनांत आदरबुद्धि नव्हती. गयाळ ह्मणून ताराबाई त्याचा द्वेष करी. कर्तृत्वहीन ह्मणून सरदारांचें त्याच्या ठिकाणीं प्रेम नसे आणि प्रतिस्पर्धी ह्मणून कोल्हापूरकर त्याचा मत्सर करी. एवंच रामराजा कोणालाच हवा असें वाटत नव्हतें. शाहूराजाची इच्छा ह्मणून बाळाजीनें रामराजाला पानगांवाहून आणिला व गादीवर बसविला. त्याला कांहीं तरी राजकारण करून काढून टाकावें अशी बाळाजीची इच्छा होती असें जरी खास ह्मणतां येत नाहीं तत्रापि त्याचें महत्व होईल तितकें कमी करण्याच्या इच्छेनें बाळाजीनें त्याचा शिक्का तीन वर्षे चालू केला नाहीं. ह्या ग्रथांतील १७५०तील ३० जानेवारीच्या ( लेखांक २६ ) पत्रावर, काव्येतिहाससंग्रहांतील १७५१ च्या २९ सप्टेंबरच्या ( ३३४ पत्रें, यादी वगैरे ) पत्रावर, १७५२ च्या १२ एप्रिलच्या ( पत्रें, यादी वगैरे ३७४ ) पत्रावर व १७५२च्या १५ आक्टोबरच्या ( पत्रें, यादी वगैरे ३९५ ) पत्रावर शिक्का शाहूराजाचाच आहे. ह्यावरून रामराजाला शाहूराजाच्या इच्छेवरहुकूम बाळाजीनें यद्यपि मान्य केलें होतें. तत्रापि त्याचा शिक्का चालविण्यांत तीन वर्षे तो धरसोड करीत होता असें दिसतें. अर्थात् दुसरा राजा करावयाचा ह्मणजे संभाजीला साताऱ्यास आणावयाचा त्याचा बेत होता असें अनुमान करण्यास प्रवृत्ति होते. नाहीं तर शाहूच्या मृत्यूनंतर तीन वर्षे शाहूचा शिक्का चालविण्याच्या कामीं धरसोड करण्यांत बाळाजीचा कांहींच मतलब नव्हता असें होईल. तसेंच परराष्ट्रांशीं केलेल्या तहांतही साताऱ्याच्या छत्रपतींचें नांव १७५० सालापासून १७६१ पर्यंत कोठेंहि नाहीं. जेथें तेथें बाळाजी बाजीरावाचेंच नांव प्रमुखलेलें दिसतें ( लेखांक १।६५।१२९।।३०।१४५ ). पुढें १७५३च्या व १७५४च्या शेवटीं ताराबाईची धुसफुस बाळाजीनें मोठ्या युक्तीनें बंद केली व रामराजाला निव्वळ बाहुलें करून सोडिलें. साताऱ्याच्या छत्रपतींचें महत्व समूळ नाहींसें केल्यावर आणीक एक गोष्ट बाळाजीस करावयाची राहिलीच होती. ती गोष्ट ह्मणजे कोल्हापुरची व साताऱ्याची गादी एक करून मराठ्यांचें राज्य एकछत्री करणें ही. ह्या हेतूच्या साधनार्थ १७४० त संभाजीशीं त्यानें गुप्त करार केला. १७५० त हा हेतु साध्य होण्याचा समय आला असतां शाहूच्या हट्टामुळें तो फसला गेला. तरी पुढें अशीच एखादी संधि येईल ह्या आशेनें बाळाजीनें संभाजीशीं पूर्वीचा स्नेह कायम ठेविला ( का० पत्रें, यादी वगैरे ३३५ ). कारण, संभाजीहि वृद्ध झाला असून लवकरच मरणासन्न होईल असा संभव होता. हा संभव ज्यावेळीं केव्हां खरा ठरेल त्यावेळीं संभाजीचा वारस जो रामराजा त्याला कोल्हापुरची गादी मिळून साताऱ्याचें व कोल्हापुरचें राज्य एक करण्याचा फार दिवसांचा हेतु साध्य

होईल असा बाळाजीचा बेत होता. परंतु, ज्या हट्टानें व अज्ञानानें १७४९ त शाहूला पछाडिलें त्याच हट्टानें व अज्ञानानें १७६० त संभाजीला गांठिलें व त्यानें मरणापूर्वी खानवटकर भोसल्यांच्या कुळांतील एक मुलगा दत्तक घ्यावा असें ठरविलें. पुढें १७६२ त जिजाबाईनें ह्या मुलाला दत्तकहि घेतलें. संभाजीच्या ह्या कृत्यानें बाळाजीचा बेत त्यावेळीं दुसऱ्यांदा फसला. परंतु एवढयानें नाउमेद होऊन बाळाजी स्वस्थ बसला नाहीं. खानवटकरांच्या घराण्यांतील जो मुलगा जिजाबाई दत्तक घेणार होती त्यालाच रामराजाच्या मांडीवर देऊन रामराजास वनवासास जावयास सांगावें असा बाळाजीचा त्यावेळीं मनोदय होता ( लेखांक २८९ व चिटणिसांची बखर ). ह्या खानवटकरांच्या कुळांतील नवा राजा करण्यांत मतलब असा कीं पुढें मागें कोणतीहि एक गादी निपुत्रिक झाली असतां ज्या गादीवरील वंश हयात असेल त्याला निपुत्रिक गादीवर हक्क सांगतां यावा व हीं दोन्हीं राज्यें एक व्हावीं. पानिपतची लढाई झाल्यावर नवा राजा करण्याचा बाळाजीचा बेत होता ( लेखांक २८९). परंतु बाळाजीला पुढें मृत्यूनें लवकरच गांठिल्यामुळें तो बेत तसाच राहिला. असो. महाराष्ट्रांत अव्वल प्रतीचें घराणें झटलें ह्मणजे सातारच्या छत्रपतीचें. त्यांचें महत्त्व कमी करण्यास बाळाजीनें वर सांगितलेल्या खटपटी केल्या. येणेंप्रमाणें बाहेर मेहनत करून बाळाजीनें १७६०त बहुतेक हिंदुस्थान व बहुतेक सर्व दक्षिण जिंकून टाकिली व आंत मेहनत करून सातारचे छत्रपति व त्यांचें राजमंडळ ह्यांस बहुतेक संपुष्टांत आणून आपलें वर्चस्व सर्वत्र स्थापित केलें व ब्राह्मणपदबादशाहीची कल्पना खरी करून दाखविण्याचा प्रसंग जवळ आणून ठेविला. पानपतच्या लढाईंत पेशव्यांस यश येतें तर त्या यशाच्या दराऱ्याच्या जोरावर सर्व भरतखंड महाराष्ट्रमय त्यानें करून टाकिलें असतें व बाळाजी विश्वनाथाचा वंश ब्राह्मणपदबादशाहीचा आधारस्तंभ झाला असता. तसेंच पानिपतच्या लढाईंत पेशव्यांस यश येतें तर ह्या दुर्बल छत्रपतींचा मागमूसही न रहाता, असा तर्क करण्यास जागा आहे. कारण पेशव्यांचें महत्व १७५० पासून १७६१ पर्यंत जसजसें वाढत चाललें तसतसें छत्रपतींचें कमी कमी होत चाललें हें विवेचनावरून दिसून येण्यासारिखें आहे. अर्थात् पेशव्यांचें महत्व १७६१ त झेनिथाला जाऊन पोंचलें असतें तर छत्रपतींचें महत्त्व नाडिराला जाऊन बुडलें असतें ह्यांत संशय नाहीं. सातारच्या छत्रपतींना पुढें पुढें कोणी अगदीं विचारीत नाहींसें झालें ह्याचा दाखला पाहिजे असल्यास नाना फडणिसांच्या आत्मचरित्रांत उत्तम पहावयास मिळतो. आह्मीं पेशव्यांचें सेवक, आह्मास छत्रपतींशीं कर्तव्य नाहीं असें नाना फडणवीस लिहितो. ह्यावरून छत्रपतीविषयीं इतरांच्या मनांत किती आदरबुद्धि होती ह्याचें अनुमान करितां येईल. परंतु मराठ्यांच्या दुर्दैवानें तो सुयोग जुळून आला नाहीं. सामान्य नीतीच्या दृष्टीनें पहातां ह्या दुर्बल छत्रपतींचें महत्त्व बाळाजीनें संपुष्टांत आणिलें हें बरेंच गर्हणीय आहे. परंतु बुद्धीनें व शक्तीनें बलिष्ठ अशा पुरुषाच्या किंवा पुरुषांच्या हातांत कोणत्याहि राष्ट्रांचीं सूत्रें असणें मोठें हितकर असतें ह्या

राजनीतीच्या धोरणानें बाळाजीच्या प्रयत्नांचा विचार केल्यास झालें तें योग्यच झालें असें ह्मणणें प्राप्त होतें. इतकेंच कीं, जें झालें तें पानिपत येथील घोरसंकटामुळें पूर्णपणें झालें नाहीं. एवढेंच नव्हे; तर जें झालें तें अंशतः न झाल्यासारिखेंच झालें. हें पाहून मन किंचित् उद्विग्न होतें. उद्विग्न होण्याचें कारण असें आहे कीं, ही पानिपत येथील विपत्ति पर्यायानें व परंपरेनें मराठयांच्या राष्ट्राच्या नाशास कारण झाली. ती कशी झाली व तिचीं कारणें प्रस्तुत ग्रंथांत छापिलेल्या पत्रांच्या आधारानें काय होतीं त्याचा पुढील विवेचनांत सविस्तर प्रपंच केला आहे.

## विवेचन पांचवें.

दुसऱ्या, तिसऱ्या व चवथ्या विवेचनांवरून दिसून येईल कीं मराठ्यांनीं १७६१ पर्यंत जीं जीं कृत्यें केलीं त्या सर्वांत एकच धोरण होतें. महाराष्ट्रधर्म वाढविणें हा मुख्य मुद्दा होता. हा मुद्दा अस्पष्ट रीतीनें त्यावेळच्या मुत्सद्यांच्या मनांत होता असा बिलकुल प्रकार नाहीं. महाराष्ट्रधर्माची कल्पना व तत्साधनार्थ योजिलेल्या उपायांचें व्यवस्थित स्वरूप तत्कालीन मुत्सद्यांच्या, विचारी पुरुषांच्या व सेनापतींच्या मनांत स्पष्टपणें आविर्भूत झालेलें दिसतें. हिंदुधर्माची प्रस्थापना, गोब्राह्मणांचा प्रतिपाल, स्वराज्याची स्थापना, मराठ्यांचें एकीकरण व त्यांचे पुढारपण, हीं जीं महराष्ट्रधर्माचीं मुख्य अंगें त्यांचा उच्चार शिवाजी राजाच्या तरुणपणीं जसा स्पष्टपणें झालेला दिसतो तसाच खर्ड्यांच्या लढाईनंतर नाना फडणिसानें निजामाशीं केलेल्या तहांतहि दिसून येतो. ह्या तहांत धर्म, गोब्राह्मण व स्वराज्य ह्यांच्या संरक्षणार्थ कलमें आहेत. तेव्हां १६४६ पासून १७९६ पर्यंत महाराष्ट्रधर्माची प्रसृति होत असतां मराठ्यांचें पुढारपण वेळोवेळीं निरनिराळ्या जातींनीं घेतलें. प्रथम स्वराज्याची शुद्ध कल्पना उत्पन्न झाली. तत्साधनार्थ मराठ्यांचें पुढारपण शिवाजी, राजाराम, शाहू व अनुषंगानें बाळाजी विश्वनाथ ह्यांनीं घेतलें. ह्या चार पुरुषांच्या प्रयत्नानें ज्याला स्वराज्य ह्मणून प्रथम संज्ञा दिली गेली तो सर्व प्रदेश मराठ्यांच्या ताब्यांत आला. स्वराज्याचें साधन केल्यावर मराठ्यांच्या वाढत्या पराक्रमाला स्वराज्यांतर्गत प्रदेश संकुचित भासूं लागला व तो उफाड्यानें स्वराज्याच्या मर्यादेच्या बाहेर पसरूं लागला. ह्मणजे सार्वभौमत्वाची कल्पना त्यावेळीं अवश्य होऊन तिचा स्पष्ट उच्चार बाजीरावानें शाहूपुढें करून दाखविला. ह्या कालापासून हिंदुपदबादशाहीची प्रस्तावना झाली. हिंदुपदबातशाहीची प्रस्तावना बाजीरावाच्या पुढारपणाखालीं झाली हें जरी खरें आहे, तरी ती शाहूराजाच्या सल्यानें झाली ह्मणून तिला मी हिंदुपदबातशाही हें नांव दिलें आहे. शाहूराजा वारल्यानंतर किंवा वारण्याच्यापूर्वी देखील सातारच्या छत्रपतींचें तेज मावळत जाऊन महाराष्ट्राचें पुढारपण पेशव्यांच्या हातांत आलें. ह्मणून बाळाजी बाजीरावाच्या उत्तरार्धापासून ब्राह्मणपदबादशाहीचा प्रारंभ झाला ह्मणून मीं ह्मटलें आहें. ब्राह्मणपदबातशाही ह्मणजे हिंदुपदबादशाहीच होय. १७५० पर्यंत ह्या बादशाहीची प्रस्तावना भोसल्यांच्या कुळाच्या नांवानें होत असे. आतां ती पेशव्यांच्या कुळाच्या नांवानें होऊं लागली. पहिलीस भोसले-

कुलवादशाही अथवा मराठपदवादशाही व दुसरीस भटकुलवादशाही किंवा ब्राह्मणपदवादशाही ह्मटल्यास चालेल. नांव पाहिजेल तें द्या. वस्तुस्थिति ध्यानांत आली ह्मणजे झालें. महाराष्ट्रधर्म व महाराष्ट्रराज्य जिकडे तिकडे करण्याचा प्रयत्न ह्या कालीं मराठ्यांचा चालला होता. प्रसंगोपात्त ह्या प्रयत्नाचा पुढाकार कधीं महाराष्ट्रांतील मराठ्यांनीं व कधीं महाराष्ट्रांतील ब्राह्मणांनीं केला. हेतु पाहिला तर दोघांचाहि एकच होता. महाराष्ट्रांतील मराठ्यांनीं व ब्राह्मणांनीं दोघांनीं मिळून महाराष्ट्रधर्माचा व राज्याचा प्रसार करण्याचें काम चालविलें होतें. ह्या कामीं येणाऱ्या यशापयशाचा वांटा ह्या दोघांनाहि सारखा घ्यावा लागे. इ.स. १६४६ पासून १६८० पर्यंत शिवाजीच्या पुढाराखालीं मराठयांस उत्तरोत्तर यशच येत गेलें. १६८९ पासून १७०७ पर्यंत मराठयांना अवरंगजेबाशीं लढावें लागलें. शिवाजीच्या वेळीं आलेल्या संपत्ती व त्याच्या पश्चात् आलेल्या विपत्तीचे वांटेकरी ब्राह्मण व मराठे हे दोघेहि झाले. त्या मरणप्राय संकटांतून निघून मराठयांनीं पेशव्यांच्या पुढारपणाखालीं समुद्रवलयांकित पृथ्वीचें सार्वभौमत्व मिळविण्याचा सुमुहूर्त १७६० च्या सुमारास आणिला. परंतु १७६१ सालीं अवदालीशीं युद्ध होऊन मराठ्यांचा कधींहि झाला नव्हता असा पराभव पानिपत येथें झाला. ह्याहि गंडांतरांतून निभावून थोडक्याच कालांत त्यांनीं आपली पूर्वींची सत्ता बहुतेक कायम केली; परंतु, पूर्वींची भट्टी जी ह्यावेळीं विघडली ती पुनः कधीं नीट सावरती आली नाहीं. १७६० त सर्व हिंदुस्थानाला ह्मणजे उत्तरेस मुलतान, लाहोर, ठठ्ठा, भकर, रोहिलखंड, अंतर्वेद, काशी, प्रयाग, अयोध्या व बंगाला; दक्षिणेस श्रीरंगपट्टण, तंजावर व रामेश्वर आणि पूर्वेस तैलगण व पूर्वसमुद्र इतक्या प्रदेशांवर मराठ्यांची सत्ता कायम करावयाची असा सदाशिवरावभाऊचा व बाळाजी बाजीरावाचा बेत होता. परंतु १७६१ नंतर पश्चिमोत्तरेकडील मुलतान लाहोर, ठठ्ठा, भकर व पूर्वोत्तरेकडील प्रयाग, अयोध्या व बंगाला ; दक्षिणेकडील श्रीरंगपट्टण व रामेश्वर व पूर्वेकडील तैलंगण व पूर्वसमुद्र, हे प्रांत मराठ्यांच्या ताब्यांत पुढें कधींच आले नाहींत. १७६० पर्यंत मराठ्यांचें पाऊल एकसारिखें पुढें पडत चाललें होतें तें १७६१ पासून यमुना व तुंगभद्रा ह्या दोन नद्यांच्या आंत आलें. हें जें आंत पाऊल आलें हींच पानिपत येथील पराभव केवढा भयंकर होता ह्याची उत्तम साक्ष आहे. प्रस्तुतच्या विवेचनांत ह्या पराभवाचा विचार करावयाचा आहे. पानिपत येथील पराभवाचीं अनेकांनीं अनेक कारणें कल्पिलीं आहेत त्यांपैकीं मुख्य मुख्य कारणांचा येथें निर्देश करितों व त्यांपैकीं खरीं कारणें कोणतीं ह्याचा उलगडा ह्या ग्रंथांत व इतरत्र छापिलेल्या पत्रांच्या साहाय्यानें होईल तितका करून दाखवितों.

( १ ) पेशव्यांनीं छत्रपतींची सत्ता संपुष्टांत आणिल्यामुळें स्वामिद्रोहाच्या पापानें पेशव्यांचा क्षय झाला.

( २ ) छत्रपतींची सत्ता संपुष्टांत आणिल्यामुळें मराठा व ब्राह्मण सरदारांचीं मनें पेशव्यांविषयीं कलुषित झालीं.

( ३ ) मराठ्यांच्या राज्यव्यवस्थेंत सत्तेचें केंद्रीभवन झालेलें नव्हतें, त्यामुळें निरनिराळ्या सरदारांना आपापली सत्ता स्वतंत्रपणें स्थापण्याची दुरिच्छा झाली.

( ४ ) जातिभेदामुळें मराठ्यांची एकी होण्याचा कधींच संभव नव्हता व कांहीं अघटित कारणांनीं कांहीं वेळ एकी झालीच तर ती लयास जाऊन व जातीजातींत मत्सर उत्पन्न होऊन सर्वत्र बेबंदशाही माजण्याचा संभव होता. तोच प्रकार १७६१ च्या अगोदर थोडाबहुत होऊन पानिपत येथें मराठ्यांचा मोड झाला.

( ५ ) भरतखंडांत सर्व हिंदुलोकांत राष्ट्रीयत्वाची कल्पना पसरली नव्हती.

( ६ ) ब्राह्मणांच्या पोटजातींत भेद झाला होता.

( ७ ) सदाशिवरावभाऊंचें वर्तन उद्दाम व सान्निपातिक होतें.

( ८ ) त्यानें इब्राईमखानाच्या तोफखान्यावर भिस्त ठेवून मोगलाई रीतीचा अंगीकार केला.

( ९ ) मराठ्यांची जुनी गनीमी रीत त्यानें सोडून दिली.

( १० ) मराठ्यांच्या अंगीं पूर्वीचा कांटकपणा राहिला नव्हता. त्यांच्यामध्यें चैनबाजीचा प्रवेश झाला होता.

( ११ ) सडे जाऊन युद्ध करण्याचें सोडून सदाशिवरावभाऊनें कबिलेबुणगे बरोबर घेतले.

( १२ ) त्यानें दिल्लीचें तख्त फोडून तद्देशीयांचें वैर संपादिलें.

( १३ ) सुजाउद्दौल्यानें अबदालीशीं तह करून देतों ह्मणून थाप देऊन मराठ्यांचा विश्वासघात केला.

( १४ ) गिलज्यांच्या धिप्पाड व अवजड शरीरांपुढें मराठ्यांच्या ठेंगण्या व हलक्या मूर्तींचा टिकाव लागला नाहीं.

( १५ ) सदाशिवरावभाऊनें रघुनाथरावदादासारख्या अनुभवलेल्या शिपायाला ह्या मोहिमेचें सेनापतित्व दिलें नाहीं. सदाशिवरावभाऊला लढाईचा सराव नव्हता.

( १६ ) मल्हारराव होळकर माळव्याच्या अलीकडे खाशांनीं येऊं नये ह्मणून सांगत असतां भाऊनें त्याचा उपदेश ऐकिला नाहीं.

( १७ ) लाहोरास जाऊन अबदालीची धाड मुद्दाम बोलावून आणण्यांत रघुनाथरावाचा मूर्खपणा झाला.

( १८ ) अबदालीसारख्या अनुभवलेल्या शिपायापुढें सदाशिवरावभाऊसारख्या नवशिक्या सरदाराचें कांहीं एक चाललें नाहीं.

इत्यादि कारणें पानिपतास मराठ्यांचा मोड होण्यास झालीं ह्मणून ग्रंथोग्रंथीं लिहिलेलें आढळतें. ह्या कारणांत तथ्य कितपत आहे व मराठ्यांचा मोड होण्याचीं खरीं कारणें कोणतीं ह्याचा विचार करणें जरूर आहे.

( अ ) स्वामिद्रोहोत्पन्नपापाचे दैवी परिणाम काय झाले असावे त्याचा तलास लावण्याचें काम धर्मशास्त्र्यांकडे सोंपवून, त्या पापाचे मानवी परिणाम काय झाले ह्याचा विचार

करणें उपयोगाचें आहे. बाळाजी बाजीरावानें साताऱ्याच्या छत्रपतींना शून्यवत् करून टाकिलें ही गोष्ट सर्वस्वीं खरी आहे. परंतु, साताऱ्याच्या छत्रपतींना शून्य होऊन बसण्याखेरीज अन्य गति शक्य नव्हती हीहि गोष्ट तितकीच खरी आहे. शाहूराजा वयातीत होऊन राज्य करण्यास अयोग्य झाला. त्याच्या मृत्यूनंतर रामराजा गादीवर आला. तो बुद्धीनें मंद, राजपदाला अयोग्य व मतलबाला अजागरूक असा होता. अशाचा बडीजाव करीत बसण्यांत व अशाच्या हातीं राज्यसूत्रें ठेविण्यांत राष्ट्राचें हित कांहींच साधणें शक्य नव्हतें. तेव्हां आत्यंतिक राष्ट्रहित साधण्याची ज्याच्या अंगीं कर्तबगारी विशेष त्याच्या हातांत सूत्रें जाणें स्वाभाविक व अपरिहार्य होतें. येणेंप्रमाणें बाळाजीच्या हातांत राज्याचीं सर्व सूत्रें गेलीं व साताराचे छत्रपति, त्यांचें राजमंडळ व त्या सर्वांना मुठींत ठेवूं पाहणारी ताराबाई ही साताऱ्यांत भिकार तंटे करीत बसली. खर्चाकरितां साठ सत्तर लाखांचा मुलूख त्यांच्या नांवानें तोडून दिला होता; परंतु, त्यांतील उत्पन्न व्यवस्थेनें काढून घेण्याचीहि ऐपत त्यांच्यांत नव्हती. १७५५त तर आपला खर्च पेशव्यांनीं चालवावा व उत्पन्नाची व्यवस्था वाटेल तशी बघून घ्यावी ( चिटणिशी बखर ) अशी तोड त्यांनीं काढिली. ह्यामुळें छत्रपतींचें, राजमंडळाचें व विशेषतः ताराबाईचें जें कांहीं थोडेंसें स्थानिक महत्त्व होतें तेंहि गेलें. ह्यापुढें ताराबाईला व रामराजाला बाळाजीच्या ओंजळीनें पाणी पिणें भाग पडलें. हें कर्म ताराबाईनें आपल्या हातानें आपल्या अंगावर ओढवून घेतलें व घरांत बसून थिटे, देवस्थळे इत्यादि पुराणिकांच्या उपदेशानें बाळाजीच्या नांवानें मात्र खडे फोडण्यास तिनें प्रारंभ केला. ताराबाईच्या ह्या तोंडच्या वडवडीनें १७५३ च्या पुढें बाळाजीचें कांहींच नुकसान झालें नाहीं. सरदारांपैकीं-ब्राह्मण अगर मराठे--कोणींहि तिच्याकडे लक्ष्य दिलें नाहीं. अर्थात् ताराबाईचा पुरस्कार करून बाळाजीचें वाकडें करण्यास १७५३ च्यापुढें कोणींच धजला नाहीं. पानिपतच्या मोहिमेच्या वेळीं तर ताराबाईचें व रामराजाचें स्मरणहि कोणास राहिलें नाहीं. १७५१ त ताराबाईचा कड घेऊन भांडणारा दमाजी गायकवाड १७६० त पेशव्यांच्या बाजूनें पानिपतच्या मोहिमेंत हजर होता. येणेंप्रमाणें पानिपतीयुद्धांत ताराबाईच्यामुळें पेशव्यांचें कांहींएक नुकसान झालें नाहीं. मराठा सरदारांपैकीं भोसल्यांखेरीज बहुतेक सर्व सरदार व ब्राह्मणांपैकींहि प्रतिनिधीखेरीजकरून बहुतेक सर्व सरदार पानिपतांत हजर होते. रामराजाला व ताराबाईला पेशव्यांनीं शून्यवत् करून सोडिलें ह्मणून कोणी सरदार पेशव्यांच्या विरुद्ध गेल्याचा दाखला तर कोठें मिळत नाहींच; परंतु, कोठें ध्वनि देखील काढिलेला आढळत नाहीं. आतां मराठ्यांपैकीं कांहीं सरदार व ब्राम्हणांपैकीं कांहीं सरदार पानिपतच्या मोहिमेंत पेशव्यांच्या उलट गेल्याचे दाखले सांपडतात. परंतु, त्या उलट जाण्याचा संबंध छत्रपतींच्या शून्यावस्थेशीं मुळींच नसून, इतर कारणांशीं आहे. ह्या कारणांचें स्पष्टीकरण पुढल्या कलमांत केलें आहे.

( ब ) पेशव्यांच्या हातीं सर्व सत्ता आली त्यावेळीं मुख्य सरदार व मामलतदार ह्मटले ह्मणजे, शिंदे, होळकर, पवार, गायकवाड, भोसले, अंताजी माणकेश्वर, विठ्ठल शिव-

41 . ? . 39/2

देव. गोविंद बल्लाळ, गोपाळराव पटवर्धन, नारो शंकर, मानाजी आंग्रे, सदाशिव रामचंद्र शेणवई, रामचंद्र गणेश कानडे. निंबकराव विश्वनाथ पेठे, मेहेंदळे, पुरंधरे, चिटणीस, पायगुडे, थोरात वगैरे होत. हे सर्व सरदार पेशव्यांचे नोकर असत. उत्पन्नाच्या संबंधानें ह्या सरदारांची गणना मामलतदार ह्मणून होत असे. ह्यांनीं आपापल्या प्रांतांतील वसूल उत्पन्न करून, खासा, कारकून व शिबंदी यांचा खर्च वारून बाकी राहील तो पैसा रसद ह्मणून पुण्यास पोंचवावा असा करार असे. ह्यांपैकीं कित्येक मामलतदारांना लहान मोठ्या फौजा बाळगाव्या लागत. ह्या फौजांच्या खर्चाकरितां जे निव्वळ मामलतदार असत त्यांना महालांतून रोकड रक्कम मिळे व जे सरदार असत त्यांना सरंजामाला महालांतील कांहीं प्रांत स्वतंत्र तोडून दिलेला असे. ह्याप्रमाणें मुलकी व लष्करी अशा दोन नात्यांनीं पेशव्यांशीं सरदारांचा संबंध येई. सरदारांनीं मोंगलाईंतील एखादा प्रांत काबीज केला ह्मणजे त्याची सरकार व सरदार ह्या दोघांत कांहीं प्रमाणानें वांटणी होत असे. ( १ ) सरदारांना आपापल्या प्रांताचा हिशोब वर्षाच्या वर्षास खडान् खडा द्यावा लागे. ( २ ) सरदारांच्या ताब्यांतील प्रांतांतील संस्थानिक. जमीदार व रयत ह्यांना सरदार–मामलतदाराविरुद्ध तक्रार करावयाची असल्यास संस्थानिकांना खुद्द पुण्याच्या दरबारांत जाऊन दाद मागतां येत असे आणि जमीदार व रयत ह्यांना पेशव्यांनीं पाठवून दिलेल्या दरखदारांना भेटून आपलीं गाऱ्हाणीं सांगतां येत. ( ३ ) सरदार–मामलतदाराकडून येणाऱ्या वार्षिक रसदेची रक्कम दरवर्षी नवीन ठरविली जात असे. रयतेकडून जास्त उत्पन्न मामलतदार घेतात असें दरखदाराच्या नजरेस आल्यास रसदेची रक्कम वाढविली जात असे. ( ४ ) सरकारी मोहिमांस पेशवे सांगतील तेव्हां सरदारांना आपापल्या सरंजामी फौजा घेऊन जावें लागे. ( ५ ) सरदारांच्या जहागिरींची तगारी बहाली पेशव्यांच्या खुषीवर असे. ( ६ ) तथापि ह्या जहागिरी वंशपरंपरेनें चालणाऱ्या असत. ( ७ ) जहागीरदार निपुत्रिक झाल्यास दत्तक कायम करण्याचा अधिकार पेशव्यांचा असे. ( ८ ) एखाद्या सरदाराची वावगी वर्तणूक दिसल्यास त्यास वर्तर्फ करण्याचा अधिकार पेशव्यांस असे. ( ९ ) परराष्ट्रांशीं किंवा संस्थानिकांशीं तहरह पेशव्यांच्या नांवानें, संमतानें व आज्ञेप्रमाणें सरदारांना करावा लागे. १७५० पासून १७६१ पर्यंत ( सध्यां ह्या अकरा वर्षांचाच विचार ह्या प्रस्तावनेंत चालला आहे हें ध्यानांत धरून ) पेशव्यांचा सरदारांशीं हा असा संबंध होता हें ह्या अकरा वर्षांतील घडामोडीसंबंधीं जे कांहीं कागदपत्र उपलब्ध झाले आहेत, त्यांवरून दिसून येतें. ह्या कागदपत्रांत साताऱ्च्या छत्रपतींच्यासंबंधीं एक अक्षरहि नाहीं पेशवे आपले मुख्य आहेत व आपलें बरें वाईट काय पाहिजे तें करण्याचा अधिकार सर्वस्वीं पेशव्यांच्या हातांत आहे असा सरदारमंडळांत सर्वत्र ग्रह झाला होता. साताऱ्च्या राजमंडळांतील, प्रतिनिधी, सचिव, दाभाडे, सुमंत, राजाज्ञा वगैरे सरदार क्षुल्लक असून पेशव्यांच्या शिंदे, होळकर, विंचूरकर इत्यादि सरदारांप्रमाणें व पुरंधरे, फडणीस, मुजुमदार इत्यादि मुत्सद्यांप्रमाणें वजनदार पुरुष त्या राजमंडळांत एकहि नव्हता. तेव्हां

त्यांचा विचार करण्याची येथें जरूरच राहत नाहीं. शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड, विचूरकर राजेबहादर, बुंधेले, वगैरे सरदारांच्या मामलतदारांच्या वर्तनांचा तेवढा येथें विचार करावयाचा आहे. वर नमूद केलेल्या ९ बंधनांनीं ह्या सरदारांच्या व मामलतदारांच्या हालचाली नियमित करून टाकिलेल्या होत्या. कोणतेंहि मुलकी किंवा लष्करी लहान मोठें काम करावयाचें असल्यास सरदारांना व मामलतदारांना पेशव्यांची परवानगी घ्यावी लागे. राज्याचीं सर्व सूत्रें पेशव्यांच्या हातांत एकीभूत झालीं होतीं. मोहिमा, तह, महालांचा जमा व त्यांचा खर्च ह्या सर्वांची व्यवस्था पुण्याहून होत असे. सरदारांना स्वतंत्र हालचाल कोठेंच करितां येण्याची सवड सदाशिवरावभाऊनें व बाळाजी बाजीरावानें ठेविली नव्हती. त्याकालीं सत्तेचें केंद्रीभवन पेशव्यांच्या ठायीं पूर्णपणें होत चाललें होतें. हा केंद्रीकरणाचा उद्योग बाळाजी बाजीरावानें १७४० पासून सुरू केला. १७४४ त त्यानें रघोजी भोसल्याची हालचाल मर्यादित केली. १७४६ त बाबूजी नाईक बारामतीकराला त्यानें घरीं बसविलें. १७५० त प्रतिनिधि व यमाजी शिवदेव ह्यांची, १७५१ त दाभाडे व दमाजी गायकवाड ह्यांची व १७५३ त ताराबाईची रग जिरवून त्यानें सातारच्या छत्रपतींचें महत्त्व कमी केलें. सारांश, १७५३ च्या पुढें मराठ्यांच्या हालचालींचीं सर्व सूत्रें बाळाजीच्या हातीं केंद्रीभूत झालीं. पेशव्यांच्या हातीं झालेल्या सत्तेच्या ह्या केंद्रीभवनाच्या विरुद्ध बरीच खटपट ह्यापुढें कांहीं सरदारांनीं, मामलतदारांनीं व मुत्सद्यांनीं केली. ही खटपट सत्तेचे केंद्रीभवन झालें नव्हतें ह्मणून करितां आली अशी गोष्ट नसून, सत्तेचें केंद्रीभवन फार झालें व तें तत्कालीन कांहीं सरदारांना असह्य झालें ह्मणून ती करितां आली. होळकर, शिंदे वगैरे सरदारांचें पारडें पुढें फार जड होईल ह्मणून ह्या वेळेपासून बाळाजीनें व सदाशिवरावभाऊनें त्यांना योग्य बंधनांनीं जखडून टाकण्याचा बेत केला. हा बेत तडीस नेत असतां पेशव्यांना त्यांच्या स्वतःच्या सरदारांकडून अडथळे येऊं लागले. पूर्वीच्या राजमंडळांतील सरदारांच्या शत्रुत्वाच्या ऐवजीं आतां पेशव्यांच्याच सरदारांकडून पेशव्यांना त्रास पोहोंचूं लागला. १७५० किंवा १७५३ सालापर्यंत बाळाजीनें, दाभाडे, गायकवाड, प्रतिनिधि, यमाजी शिवदेव, ताराबाई व भोसले ह्यांचें महत्त्व कमी करण्याचा उद्योग केला. १७५० पासून पुढें पेशव्यांना आपल्याच सरदारांचे डावपेंच, कृत्रिमपणा, फितवेखोरी, व उद्दामपणा ह्यांना आळा घालण्याचें काम पत्करावें लागलें. बाळाजी बाजीरावाच्या व सदाशिवरावभाऊच्या अधिकाराखालीं सरदारांना स्वातंत्र्य फारच थोडें राहिलें होतें. तेव्हां केंद्रप्रवण न होतां स्वतंत्र होण्याचा उद्योग निरनिराळ्या हेतूंनीं प्रोत्साहित होऊन निरनिराळ्या सरदारांनीं केला. बाळाजी बाजीराव असेतोंपर्यंत ( कदाचित् खड्यांची लढाई होईतोंपर्यंत देखील ) हा उद्योग सफल झाला नाहीं. परंतु ह्या दुरुद्योगाचे हानिकर परिणाम पेशव्यांना पानिपत येथें व इतरत्र सोसावे लागले हें सोदाहरण सिद्ध करितां येण्यासारखें आहे. ह्या दुरुद्योगाच्या खटपटींसंबंधानें, मल्हारराव होळकर, अंताजी माणकेश्वर, लक्ष्मण शंकर, बापूजी महादेव व दामोदर महा-

देव आणि गोविंदपंत बुंदेले, वगैरे गृहस्थांचीं नांवें प्रमुखत्वानें उल्लेखितां येतात. १७५० पासून १७६० पर्यंत ह्या इसमांच्या उद्योगाचें त्रोटक वर्णन खालीं देतों.

१७४६।१७४७ त मल्हारराव होळकर व जयाजी शिंदे बुंदेलखंडांत कालिंजर, जैतपूर, अजेगड वगैरे स्थलीं लढत होते ( का. पत्रें, यादी वगैरे ६२,६९,७४ ). ह्या स्थलीं दाखविलेल्या शौर्याबद्दल मल्हाररावाची बाळाजीनें बहुत स्तुति केली आहे. १७४९ त मल्हारराव होळकर सातान्यास बाळाजीचा पाठिंबा करण्याकरितां आला होता. १७५० त मल्हाररावाचें व जयाप्पाचें वितुष्ट पडलें होतें असें लेखांक २ वरून कळतें. ह्यावेळीं ताराबाईनें मल्हाररावाला आपल्या बाजूस ओढण्याचा प्रयत्न केला. परंतु मल्हाररावानें बाळाजीचा पक्ष सोडिला नाहीं ( का. पत्रें, यादी वगैरे ३५९ ). १७५१ त सलाबतानें बाळाजीला कुकडी नदीवर नाडिलें त्यावेळीं बाळाजीनें मल्हाररावाची पायधरणी केली. तेव्हां मल्हाररावानें जयाप्पाच्या द्वारा बाळाजीकडे शपथपूर्वक बेलभंडार पाठविला ( का. पत्रें, यादी वगैरे ३६३ ). १७५२ च्या आगष्टांत मल्हारराव व जयाप्पा दक्षिणेस आले व १७५२ च्या डिसेंबरांत ते भालकीच्या लढाईंत हजर होते. पुढें १७५४ त कुंभेरीस मल्हाररावाचें व जयाप्पाचें वाकडें आलें. जयाप्पावर मारेकरी घालण्याची प्रथम सूचना मल्हाररावानेंच केली ह्मणून कित्येकांनीं शंका काढिली आहे. ह्या वेळेपासून मल्हारराव शिंद्यांचा व पेशव्यांचा द्वेष करूं लागला. १७५७ त मल्हाररावानें लटकींच लचांडें काढून रघुनाथरावास त्रास दिला ( लेखांक ५२,६७,७१ ). पेशव्यांची सत्ता अपरंपार झाली हें पाहून ह्यावेळीं मल्हारवारानें नजीबखानाचें संरक्षण केलें आणि दत्ताजीस व जनकोजीस पेशव्यांच्या विरुद्ध जाण्याचा इतिहासप्रसिद्ध उपदेश केला. ह्याच वेळीं रसदेच्या पैशासंबंधानें मल्हाररावाचें व पेशव्याचें वैमनस्य आलें. १७५९ त दत्ताजीचें व अबदालीचें युद्ध चाललें असतां मल्हारराव जयपूरप्रांतीं लहान सहान गढ्या घेत बसला व दत्ताजीला त्यानें मदत केली नाहीं. दत्ताजीला मदत करण्यास जाण्याविषयीं बाळाजी बाजीरावानें मल्हाररावाला बरींच पत्रें पाठविलीं ( लेखांक १५६,१५७,१६१ ). परंतु, दत्ताजी बडाउंच्या ( १० जानेवारी १७६० ) लढाईंत पडून जनकोजी कोटपुतळीस पळून येईतोंपर्यंत ( १२ जानेवारी १७६० ) मल्हाररावानें जयपूरप्रांत सोडिला नाहीं ( लेखांक १५३ ). ह्या दहा पंधरा वर्षांच्या हालचालीवरून मल्हारराव होळकराच्या मनाची स्थिति ताडतां येते. १७५० पासून हळू हळू त्याचें मन शिंद्यांविषयीं व पेशव्यांविषयीं कलुषित होत चाललें होतें. १७६० त तर ह्या कलुषतेचा कळस होऊन होळकराची मदत मिळाली नाहीं ह्मणून दत्ताजीचा नाश झाला. " दोन्ही सरदार एकत्र असलियास उत्तम रीतीनें पठाणाचें पारपत्य होईल, " ह्मणून रघुनाथराव, सदाशिव चिमणाजी व बाळाजी बाजीराव वारंवार लिहीत ( लेखांक १५२ वगैरे ) असतां मल्हाररावानें त्यांचा हुकूम अमलांत आणण्याचें होतां होईल तितकें लांबणीवर टाकिलें. ( टीप २१५ पहा ). सारांश, १७६० च्या प्रारंभीं शिंद्यांविषयीं व पेशव्यांविषयीं होळकराच्या मनांत द्वैतभाव अत्युत्कट भरला होता,

ह्यांत संशय नाहीं. ह्या द्वैतभावाला सातारचे छत्रपती मुळींच कारण झाले नाहींत. पेशव्यांची सत्ता वाढून आपली सत्ता संपुष्टांत येत आहे व शिंदे ह्या संपुष्टीकरणाला मदत करीत आहेत ह्या भीतीपासून मल्हाररावाच्या मनांत हा द्वैतभाव उत्पन्न झाला.

अंताजी माणकेश्वर हा लफंगा गृहस्थ १७५५ त हिंदुस्थानांत जाऊन ( का. पत्रें, यादी ४५१ वगैरे ) दत्ताजी शिंद्यास नागोरास मिळाला. १७५६, १७५७ व १७५८ हीं तीन सालें तो दिल्लीस होता ( लेखांक ५२,५७,६३ व का. पत्रें, यादी वगैरे ३३७, ३४१ ). तेथील बादशाही कारस्थानांत त्याचा बराच हात असे. बहुत मर्दपणा व कार्वालपणा करून दाखवून, पेशव्यांकडून सरदारी मिळवावी ही त्याची मुख्य आकांक्षा होती. परंतु, अब्रूची दरकार टाकून पैशाची अफरातफर करण्याची सवय या गृहस्थाला असल्यामुळें पेशव्यांची ह्याच्यावर गैरमर्जी असे. ह्यानें १७५७ त अबदालीला चांगला हात दाखविला. परंतु अबदालीची फौज भारी त्यामुळें ह्याचा फारसा उपाय चालला नाहीं. पेशव्यापाशीं अंताजीची पत मुळींच नव्हती.

बापूजी महादेव व दामोदर महादेव हे पेशव्यांच्या तर्फे दिल्लीप्रांतांत मामलतदार होते. ह्यांच्यावरहि पैशाच्या बाबतींत पेशव्यांची गैरमर्जी होती ( लेखांक ६९ ). नारो शंकराचा भाऊ लक्ष्मण शंकर ह्याचीहि पत पेशव्यांजवळ फारशी नव्हती ( लेखांक५९).

गोविंद बल्लाळ खेर ह्याला बाजीरावानें १७३३ त बुंदेलखंडाचा सुभेदार केलें ह्मणून कोठें कोठें लिहिलेलें आढळतें ती निव्वळ गप्प आहे. गोविंद बल्लाळ १७३९–४० त लहानसा कमावीसदार ह्मणून बुंदेलखंडांत कदाचित् आला असावा. त्यावेळीं बुंदेलखंडातील मुख्य अधिकार नारो शंकराचा भाऊ लक्ष्मण शंकर याजकडे होता. काव्येतिहाससंग्रहांतल्या पत्रें, यादींतील नंबर ११ च्या पत्रांत बुंदेलखंडासंबंधानें गोविंद बल्लाळाचा मुळींच उल्लेख केला नसून लक्ष्मण शंकराचें नांव प्रमुखपणें उल्लेखिलें आहे. हें पत्र १७४० च्या २९ सप्टेंबराला लिहिलें आहे. गोविंदपंत १७४६ व १७४७ तहि फरसा महत्त्वास चढला नसून सामान्य कमाविसदारच होता, हें पत्रें, यादींतील ६२,६९,७४,९५,९९ ह्या पत्रांतरून उघड होतें. हीं पत्रें १७४६।१७४७ त लिहिलेलीं आहेत ( ह्या पत्रांच्या तारखा प्रस्तावनेच्या शेवटीं दिल्या आहेत ). बुंदेलखंडांतील जैतपूर, कालिंजर, अजेगड वगैरे स्थलें ज्याअर्थीं शिंदे, होळकर १७४६।१७४७ त घेत होते त्याअर्थीं गोविंद बल्लाळाचें महात्म्य बुंदेलखंडांत त्यावेळीं फारसें वाढलें नव्हतें हें स्पष्ट आहे. गोविंद बल्लाळ त्यावेळीं साधा कमाविसदार नसून जर लढवय्या शिपाई असता तर बुंदेलखंडांतील लढायासंबंधानें त्याचें नांव वर उल्लेख केलेल्या पत्रांतून अवश्य येतें. १७४६।१७४७ पर्यंत सबंद बुंदेलखंड मराठ्यांच्या हातांत आलें नव्हतें. ह्या सालीं जैतपुरची लढाई होऊन कालिंजर वगैरे ठिकाणें मराठ्यांच्या ताब्यांत आलीं व पुढें लवकरच सरदारांच्या व पेशव्यांच्या वांटण्या झाल्या आणि पेशव्यांच्या वांटणीची व सरदारांच्या वांटणीची कमावीस गोविदपंताला मिळाली. तेव्हांपासून गोविंदपंताच्या हातीं सर्व बुंदेल-

खंडाचा अंमल येऊन त्याचा अधिकार वराच वाढला व तो कांहीं ह्मणण्यासारखी फौजही ठेवूं लागला. गोविंदपंताच्या कैफियतीच्या प्रारंभीं व सागरच्या कैफियतीच्या शेवटीं दिलेले संवत् खरे आहेत हें वरील संदर्भावरून ध्यानांत येईल. संवत् १७९६ ह्मणजे १७३९।४० पर्यंत बुंदेले हिस्सा बिनतक्रार देत गेले. तोंपर्यंत लक्ष्मण शंकराकडे बुंदेलखंडाची कमावीस होती. पुढें बुंदेले हिस्सा देण्यास तक्रार करूं लागले तेव्हां संवत् १७९८ त ह्मणजे १७४१, १७४२ त गोविंदपंताच्या हवालीं बुंदेलखंडाची कमावीस पेशव्यांनीं केली. पुढें जैतपूरची लढाई झाल्यावर संवत् १८०२ त ह्मणजे १७४६ त बुंदेलखंडाची बुंदेल्यांनीं कायमची वांटणी करून दिली व संवत् १८०३ त ह्मणजे १७४७ त गोविंदपंताची बुंदेलखंडांतील मातवर मामलतीची कारकीर्द सुरूं झाली. ह्यावेळेपासून ह्मणजे १७४७ पासून गोविंदपंताच्या भरभराटीस प्रारंभ झाला. १७३३ त गोविंदपंत बुंदेलखंडांत आले हें अनेक ग्रंथांवरून सिद्ध आहे, ह्मणून रा. पारसनीस ह्मणतात तो त्यांचा केवळ गैरसमज आहे बाजीराव १७४० त वारल्यावर बुंदेले हिस्सा देण्यास तक्रार करूं लागले. त्यावेळीं गोविंदपंताची नेमणूक बुंदेलखंडाच्या कमाविसीवर झाली. ह्यासंबधानें बाजीरावाच्या मृत्यूचा सन १७३९ ह्मणून भारतवर्षकार देतात तोहि चुकला आहे. काव्येतिहाससंग्रहांतील पत्रें यादींतील ११ वें पत्र १७४० च्या २९ सप्टेंबराला चिमाजीआप्पानें लिहिलें आहे. ह्याच संग्रहांतील ४९ व्या पत्रांत १७४१ च्या जानेवारींत बाजीरावाला मरून आठ महिने न झाले तोंच चिमाजी-आप्पा वारले ह्मणून बाळाजी बाजीराव धावडशीच्या स्वामीस लिहितो ह्यावरून बाजीराव १७४० च्या मेंत वारला हें स्पष्ट आहे. असो. इ. स. १७४७ च्या पुढें गोविंदपंत फौजफाटा ठेवून बुंदेलखंडांत अंमल बसवूं लागला. १७५४ त गोविंद बल्लाळ बराच वजनदार मामलतदार झाला होता (लेखांक ३३). ह्या वेळीं अंतर्वेद व बुंदेलखंड ह्या प्रांतांतील पेशव्यांच्या व सरदारांच्या वांटणीचा मुलूख त्याच्याकडे कमाविशीनें होता (लेखांक ३१). लेखांक ३१ (१४ मार्च १७५७) त जनकोजी शिंद्यानें बाळाजी गोविंदाला कमावीसदार ह्मणून हुकूम केला आहे. लेखांक ६० त रघुनाथरावदादा गोविंद बल्लाळाला मातब्बर मामलतदार ह्मणून ह्मणतो व त्याचा मुलगा जो बाळाजी गोविंद त्याला मगरूर ह्मणून नांवें ठेवितो. लेखांक ५४ त रघुनाथरा-वदादा गोविंद बल्लाळाची गणना लहान थोर वगैरेंत करितो. १७५७ त " आपल्या मुलु-खांतील चौकशीचा मजकूर पेशव्यांच्या मनांत होता " असें लेखांक ५४ वरून दिसतें. ह्यावरून १७५७ त आपल्या मुलुखांतील मामलतदार जे गोविंदपंत वगैरे मंडळी त्यांच्या-विषयीं पेशव्यांना संशय येऊं लागला होता, हें उघड आहे. १७५७ त खेतसिंगाकडील वकील रघुनाथरावदादाकडे गेले असतां बाळाजी गोविंदाला मोठी भीति पडली व गोविंदपं-ताला ही बातमी तावडतोब कळवा ह्मणजे ते पुण्यास "जी खबरदारी करणें ती करतील" अशी त्यानें आपल्या कारकुनांना सख्त ताकीद केली. कां कीं, खेतसिंगाचे वकील रघुनाथरावाला स्वतंत्रपणें जाऊन भेटले असतां आपलीं कारस्थानें बाहेर पडतील अशी बाळाजी गोविंदाला भीति पडली होती. गोविंदपंत आपल्या मामलतींत पैशाची अफरातफर

करतो असा संशय पेशव्यांना आल्यावरून येरंडे व कानिटकर हे दोन दरखदार १७५७ त पेशव्यांनीं गोविंदपंतावरोबर दिले. त्यांनीं गोविंदपंताविरुद्ध खालील नऊ तक्रारी आणिल्या ( लेखांक १४१ ).

( १ ) मागील जमा आहे त्यापैकीं सोडून देऊन जमा करितात.
( २ ) शिबंदीप्यादाचा खर्च जास्त वाढविला. पांच प्यादे होते तेथें पंचवीस ठेविले.
( ३ ) फौज मन मानेल तशी ठेवून खर्च बहुत करतात.
( ४ ) जेथें शिबंदी वहुत नलगे ते परगणे शिद्यांकडे देतात व बहुत शिबंदी लागती ते परगणे सरकारांत ठेवितात.
( ५ ) भेटी व नजराणे अंतस्ते घेतात.
( ६ ) महालांचा दाखला दाखवीत नाहींत.
( ७ ) ह्यांच्या दहशतीमुळें रयत किंवा जमीदार कोणी आह्मांस भेटत नाहीं.
( ८ ) कलमरुजुवात होत नाहीं.
( ९ ) कारभारी मान मानेल ते मिळवितात.

ह्या नऊ तक्रारी सदाशिवरावभाऊंनीं पाहून त्या गोविंदपंताचा पुणें येथील वकील बाबूराव नरसी यास दाखविल्या. बाबूरावानें तक्रारींचीहि याद जशीच्यातशीच गोविंदपंताकडे पाठविली. ती पाहून गोविंदपंतांचें धाबें दणाणून गेलें व तो येरंडे व कानिटकर यांची आपल्यास संभाळून घ्या ह्मणून विनवणी करूं लागला. ह्यासंबंधानें लेखांक १३३ पासून लेखांक १५० पर्यंत व सुद्धां पत्रें वाचण्यासारखीं आहेत. त्यांत गोविंदपंत पैशाची अफरातफर करीत असे ह्याची शाबिती गोविंदपंतानें आपली आपणच करून घेतली आहे. येरंडे हिशेब समजावून देण्याकरितां गोविंदपंताला आपल्याकडे बोलावीत असतां गोविंदपंत निरनिराळ्या सबबी काढून भेटायाला येण्याचें कसें लांबणीवर टाकीत होता हेंहि ह्या पत्रांवरून व पत्रांखालीं दिलेल्या टिपांवरून कळून येईल. येरंडे दोन सालें बुंदेलखंडांत राहिले; परंतु, गोविंदपंताचे मंडळीनें त्यांना एक जमीदार अगर पाटील भेटूं दिला नाहीं ( लेखांक १४२). मागील तीन सालांचा हिशोब त्यांस न दाखवितां हिशोबाचे रुमालहि गोविंदपंत आपल्यावरोबर घेऊन गेला ( लेखांक १५० ) आणि संशय येऊन येरंडे जेव्हां गोविंदपंताचा जामदारखाना जप्त करूं लागले तेव्हां त्यांच्यावर रागवावयालाहि गोविंदपंतानें कमी केलें नाहीं ( लेखांक १३४ ). गोविंदपंताच्या प्रांतांत आपली कांहींच दाद लागत नाहीं असें पाहून येरंडे पुण्यास जाऊं लागले तेव्हां गोविंदपंत कांहींसा नरम आला व नम्रतेच्या गोष्टी बोलूं लागला. " दरवारी नानाप्रकारें नालिशी, चुगली करितात " त्यानें आपलें नुकसान होतें असें त्यानें येरंड्यांना कळविलें व त्याच पत्रीं रयतेकडे आपण कसर ठेवीत होतों हें कबूल केलें ( लेखांक १३८ ). मोहिमेहून परत आलों ह्मणजे तीन सालांचा हिशोब व रयतेकडील बाकी दाखवून देण्यास आपण तयार आहों ह्मणून त्यानें येरंड्यांना लिहिलें; कारण, " दरबारचा रंग पाहिला, खावंद चौकशी करूं लागला, तेव्हां पैसेयाचा

लोभ धरून मेळविली अब्रू गमविणें " योग्य नाहीं असें त्यास उमजून आलें. तेव्हां आपल्यास संभाळून घ्यावें ह्मणून त्यानें येरंड्यांची खुशामत करण्यास आरंभ केला. " मीं येथें गुंतलों नसतों तर सर्व जमीदार तुह्मास भेटते ; कामकाज सर्व सुतीं लागतें; तें न जालें; याजकरितां तुह्मासहि वाईट लागलें ; तुमचें मनीं संशय आला; ( कां कीं ) दोन वर्षे झालीं, कांहींच परगण्याचें अवसान न सांपडे ; हेंहि खरेंच ! तुह्मास तरी काय शब्द ! ' तेव्हां " जर तुह्मास आमचें बरें करणें तर तुह्मीं देशास प्रस्तुत न जाणें " कारण "श्रीमंत स्वामींची मर्जी एक प्रकारची जाली. " ही असली खुशामत करून गोविंदपंतानें येरंड्याला १७६०च्या एप्रिलपर्यंत थोपवून धरिलें. पुढें खुद्द सदाशिवरावभाऊ हिंदुस्थानांत येऊं लागले तेव्हां येरंड्यांना गोविंदपंताविरुद्ध गाऱ्हाणीं सांगण्यास दक्षिणेंत जाण्याची जरूरच पडली नाहीं. १७६० च्या एप्रिलपासून १७६१ च्या जानेवारीपर्यंत सदाशिवरावभाऊ हिंदुस्थानांत होते. त्या अवधींत येरंड्याप्रमाणेंच सदाशिवरावभाऊलाहि गोविंदपंतानें असेंच फसविलें. ह्यासंबंधानें लेखांक २०१, २११, २१६, २१७ अ. २२४, २२७, २२९,२३०, २३७, २३९, २४२, २५७, २५९ हीं पत्रें अवश्य वाचण्याची शिफारस मी वाचकांस करितों. त्यावरून गोविंदपंताच्या नीचपणाची इयत्ता वाचकांना स्वतःच ठरवितां येईल. बायाबापड्यांना ( लेखांक ६० ), देवाब्राह्मणांना ( लेखांक १९३ ) व खुद्द स्वतःच्या धन्याला ( लेखांक २६८ ) हि फसविण्याला व बुचाडण्याला ह्या मनुष्यानें कमी केलें नाहीं. सारांश, पैशाची अफरातफर करून गोविंदपंतानें पेशव्यांची गैरमर्जी संपादिली व प्रत्याघातन्यायानें तो त्यांचा द्वेष करूं लागला.

येणेंप्रमाणें हिंदुस्थानांत मल्हारराव होळकर, गोविंदपंत बुंदेले वगैरे सरदार–मामलतदारांच्या उद्योगाचा वृत्तांत १७६० पर्यंत आणून पोहोंचविला आहे. पुढील कलमांत पानिपतच्या मोहिमेचें अत्यंत संक्षिप्त वर्णन देऊन त्यांत ह्या गृहस्थांनीं व विशेषतः गोविंदपंत बुंदेल्यानें काय काय दुष्कृत्यें केलीं त्याचें दिग्दर्शन करितों.

( क ) १७४८ त अबदालीनें हिंदुस्थानावर पहिली स्वारी केली. त्या स्वारींत यद्यपि तो दिल्लीपर्यंत आला नाहीं व त्याचा सरहिंदास मीरमनू व सफदरजंग यांनीं पराभव केला तत्रापि त्याच्या सर्वनाशक शक्तीचा त्यांना चांगलाच अनुभव येऊन चुकला. अबदालीपुढें टिकाव धरण्याचें सामर्थ्य हिंदुस्थानांत दिल्लीचा पातशाहा किंवा त्याचे अमीर ह्यांच्यांत बिलकुल राहिलें नव्हतें. तेव्हां दक्षिणेंतील सरदार मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे ह्यांच्या हातून अबदालीचें पारपत्य झाल्यास पहावें या हेतूनें सफदरजंगानें ह्या दोघा सरदारांशीं अबदालीला तंबी देण्याबद्दल करार केला. त्यांत लाहोर, मुलतान, रोहिलखंड व रजपुताना ह्या चार मुलखांची चौथ त्यानें मराठ्यांना देण्याचें कबूल केलें; अशा अटीवर कीं त्यांनीं अबदाली, रोहिले, रजपूत व सिंध प्रदेशांतील अमीर ह्यांना तंबी द्यावी व दिल्लीच्या पातशाहाचें परचक्रापासून व राज्यांतील अमीरांपासून संरक्षण करावें. ह्या कराराच्या अन्वयें मराठ्यांनीं १७५१ त रोहिल्यांशीं लढाई केली. मराठे रोहिल्यांशीं लढाई करीत

असतां अबदाली १७५१ च्या जानेवारींत पंजाबांत आला व त्यानें मुलतान व लाहोर हे दोन प्रांत काबीज केले. १७५२ त हे प्रांत मराठ्यांनीं अबदालीपासून हिसकावून घ्यावयाचे; परंतु त्या सालीं शिंदेहोळकरांना गाजुद्दिनाला घेऊन दक्षिणेंत यावें लागल्यामुळें तें काम त्यावेळीं त्यांना करितां आलें नाहीं. १७५४ व १७५५ त मल्हारराव, जयाप्पा व रघुनाथराव कुंभेर, नागोर, दिल्ली, रोहिलखंड ह्या प्रदेशांत अंमल बसविण्यांत गुंतले होते, त्यामुळें त्यावर्षीं लाहोराकडे त्यांना दृष्टि फेंकितां आली नाहीं. पुढें १७५७ त अबदाली थेट दिल्लीपर्यंत चालून येऊन त्यानें आग्रा, मथुरा वगैरे शहरें लुटलीं. त्याचा हेतु दक्षिणेंतहि चालून येण्याचा होता ( लेखांक ६५ व ६३ ). परंतु, ती निवळ गप्प होती. बाळाजी बाजीराव रघुनाथरावाला अबदालीवर १७५७ च्या जानेवारींत पाठवून देऊन आपण स्वत: श्रीरंगपट्टणास गेला. " अबदालीची गडबड दिवसेंदिवस अधिक ऐकत असतां आपला मुलुख खालीं टाकून आपण श्रीरंगपट्टणास गेला " हें योग्य केलें नाहीं ह्मणून लेखांक ६५ त शहानवाजखान बाळाजी बाजीरावास दोष देतो. ह्यावरून एवढें मात्र स्पष्ट दिसतें कीं बाळाजी बाजीराव अबदालीची फारशी तमा धरीत नव्हता. रघुनाथरावाचेंहि अबदालीविषयीं असेंच मत होतें. लवकरच त्याचें पारपत्य करितों ह्मणून १७५७ त रघुनाथरावानें वारंवार उद्गार काढिले आहेत ( लेखांक ५४,६६,६७, ७१ ). परंतु रघुनाथराव दिल्लीस जाऊन पोहोंचण्यापूर्वींच ह्मणजे १७५७ च्या जुलैपूर्वीं ह्मणजे १७५७ च्या एप्रिलांत अबदाली अफगाणिस्थानास परत गेल्यामुळें दादांची व अबदालीची गांठ पडली नाहीं. अबदाली १७५७ च्या सप्टेंबरांत दिल्लीस होता ह्मणून कीन वगैरे मंडळी ह्मणतात तें निराधार आहे, हें १५३ व्या टिपेंत मीं सप्रमाण दाखवून दिलें आहे. १७५७ च्या जुलैंत रघुनाथरावदादा दिल्लीस गेले व रोहिलखंड, दिल्ली, रजपुताना वगैरे प्रदेशांची व्यवस्था लावून १७५८ त त्यांनीं लाहोर प्रांत जिंकून घेतला. हा प्रांत जिंकण्याचा १७५० तच मराठयांचा विचार होता; परंतु अनेक अडथळे येऊन तें काम १७५८ त साधलें गेलें. हें काम १७५७ तच साधावयाचें; परंतु, मल्हारराव होळकरानें अनेक लचांडें काढून तें १७५८ पर्यंत होऊं दिलें नाहीं ( लेखांक ६७ ). ह्याच वेळीं मल्हाररावानें नजीबखानाचें साधन करून ठेविलें ( लेखांक ४८ ); त्यामुळें रघुनाथरावाच्या तडाक्यांतून नजीब वाचला. नाहीं तर मराठ्यांच्या कुशींतील ही व्याध त्याच वेळीं नाहींशी झाली असती. आपण दिल्लीस असेतोंपर्यंत अबदाली परत न आल्यास, सुजाउद्दौल्याचे काशी, प्रयाग वगैरे प्रांत घेऊन मुबलक पैसा उगविण्याचाहि रघुनाथरावाचा विचार होता ( लेखांक ७१ ). परंतु लाहोरावर स्वारी केल्यामुळें रघुनाथरावाच्या हातून ह्या विचार पार पडला नाहीं. काशी व कांहीं खंडणी देण्याचीं गोड अभिवचनें देऊन सुजाउद्दौल्यानें रघुनाथरावाला देशीं लावून दिलें ( का० पत्रें, यादी ३७३, ३८७ ). १७५७ व १७५८ तल्या स्वारींत बाळाजी बाजीरावानें रघुनाथरावाला खालील कामें नेमून दिलीं होतीं. ( १ ) रजपुतान्यांतील संस्थानिकांची व्यवस्था लावावयाची. ( २ ) दिल्लीच्या पातशहाची व्यवस्था लावावयाची.

(३) अबदालीचें पारपत्य करावयाचें. (४) रोहिलखंडांतील रोहिल्यांची व्यवस्था लावावयाची. (५) काशी, प्रयाग, बंगाला वगैरे प्रांतांवर पूर्वेकडे स्वारी करून मातब्बर पैका मेळवावयाचा. (६) सरकारी मुलुखांतील मामलतदारांची चौकशी करावयाची. (७) दामोदर महादेव, बापूजी महादेव, लक्ष्मण शंकर, गोविंदपंत बुंदेले, नारो शंकर, अंताजी माणकेश्वर वगैरे मंडळी पेशाची अफरातफर करितात त्यांची तगीरी बहाली करावयाची. (८) नजीबखानाला नाहींसा करावयाचा व (९) जिंकिलेल्या प्रदेशांतून पैसा मिळवून पुढें मोहीम करावयाची. ह्या कामांपैकीं कांहीं कामें रघुनाथरावानें अर्धीमुर्धी केलीं व कांहीं मुळींच करावयाचीं सोडिलीं. रजपुतान्यांतील माधोसिंग, बिजेसिंग वगैरे संस्थानिकांच्या मामलती विल्हेस लावण्याच्या कामीं मल्हाररावानें रघुनाथरावदादाला बरेंच अडथळे आणिले (लेखांक ७१, ६६). कां कीं, ह्या मंडळीला मल्हाररावाची आंतून फूस होती. सहारणपूर, जालापूर वगैरे ठिकाणचे रोहिले रघुनाथरावाला शरण आले. परंतु, नजीबखान रोहिला दादासाहेबाच्या हातीं लागला नाहीं. १७५७ त पातशाहाला व गाजुद्दिनाला फसवून नजीबखान अवदालीला मिळाला होता. रघुनाथराव दिल्लीस आल्यावर ह्या लुच्चाचें शासन करणार तों तो दिल्लींतून मोठ्या शिताफीनें पळून गेला. पुढें त्यानें मल्हाररावाला अंतस्थरीतीनें पैसा देऊन रघुनाथरावाचा राग कसा तरी टाळला (लेखांक ४८). लाहोरास जाऊन जाहानखान व अबदालीचा पुत्र तैमूरशाहा यांना रघुनाथरावानें घालवून दिलें व मराठ्यांचा अंमल त्या प्रांतांत वसविला; परंतु अबदालीचा कायमचा बंदोबस्त त्याच्या हातून झाला नाहीं (का. पत्रें, यादी ३४१). आपण गेल्यावर पाठीमागून अबदाली लाहोरास येईल म्हणून अंताजी माणकेश्वरानें दादासाहेबाला सुचविलें होतें. (का. पत्रें, यादी ३४१). परंतु, पावसाळ्यामुळें दादाला देशीं लवकर जाणें भाग पडलें व अबदालीचा कायमचा बंदोबस्त करण्याचें, मामलतदार व मुत्सद्दी यांची चवकशी करण्याचें व पूर्वेकडे स्वारी करण्याचें काम तहकूब ठेवून तो पुण्यास परत आला. ह्या स्वारींत मिळकत कांहींच न करितां रघुनाथराव एक कोट रुपये कर्ज करून आला. ह्या कर्जाचें ओझें बाळाजी बाजीरावाला फारसें वाटलें नाहीं (टीप २५४ पहा). बाळाजी बाजीरावाला रघुनाथरावाचा जो राग आला तो वरील नऊ कामें त्यानें केलीं नाहींत ह्मणून आला. माधोसिंग, बिजेसिंग वगैरे संस्थानिकांचा कल अबदालीकडे आहे; दामोदर महादेव, लक्ष्मण शंकर वगैरे मंडळी रयतेंत फितूर करितात; अंतस्थ नजराणा घेऊन मल्हारराव नजीबखानाला आश्रय देतो; काशी, प्रयाग देण्याच्या सुजाउद्दौला नुसत्या थापा मारितो; गोविंदपंत वगैरे मामलतदार पैशाची अफरातफर करतात; वगैरे कथा पेशव्यांच्या मुत्सद्दी मंडळांत प्रसिद्ध असून व त्यांचा प्रतिकार करण्याकरितां रघुनाथरावाला मुद्दाम पाठविलें असून, त्याच्या हातून जेव्हां तें काम झालें नाहीं तेव्हां रघुनाथरावाच्या नाकर्तेपणाचा नानासाहेबाला व भाऊसाहेबाला वीट आला व पुढें कोणत्याहि महत्त्वाच्या नाजुक प्रसंगीं रघुनाथरावावर कामगिरी सोंपविण्यांत अर्थ नाहीं अशी त्यांची खात्री झाली. रघुनाथरावाच्या ह्या

नाकर्तेपणाबद्दल ह्या दोघांनीं कांहीं कालपर्यंत एक चकार शब्दहि काढिला नाहीं. पुढें वेळ आली तेव्हां मात्र आपल्या मनांतील आशय भाऊसाहेबानें रघुनाथरावाला बोलून दाखविला व बाळाजी बाजीरावानें भाऊसाहेबाचें समर्थन केलें. ह्या प्रकारचा उल्लेख पुढील वर्णनांत येईल.

१७५८ च्या जुलैंत रघुनाथराव पुण्यास आला. ह्याच सुमाराला दत्ताजीची रवानगी हिंदुस्थानांत झाली. १७५८ च्या डिसेंबरपर्यंत दत्ताजीचा व जनकोजीचा काल रजपुतान्यांतील मवासांची व संस्थानिकांची व्यवस्था लावण्यांत गेला. नंतर ते दिल्लीस गेले. तेथें १७५९ च्या जानेवारी फेब्रुवारीपर्यंत राहून बाळाजी बाजीरावानें सांगितलेल्या कामगिऱ्या करण्याच्या उद्योगास ते लागले. ह्या कामगिऱ्या येणेंप्रमाणें होत्याः--( १ ) लाहोरचा बंदोबस्त करून तेथून पैसा पाठवणें. ( २ ) नजीबखानाला तंबी देणें. ( ३ ) सुजाउद्दौल्याकडून काशी प्रयाग घेणें व बंगाल्यावर स्वारी करणें. ( ५ ) सुजाउद्दौल्याला अगर गाजुद्दिनाला वजिरी देऊन कसे तरी पन्नास लाख रुपये काढणें. ( ५ ) अताजी माणकेश्वराला दिल्लीच्या कामांतून काढून टाकणें. पैकीं पहिल्या कामास ह्मणजे लाहोरचा बंदोबस्त करण्यास दत्ताजी शिंदे १७५९ च्या मार्चांत गेला व सतलज नदीवर एप्रिलांत जाऊन पोहोंचला ( का. पत्रें, यादी ३३२ ). तेथून साबाजी शिंदे व त्रिंबक बापूजी ह्या दोन सरदारांना लाहोराकडे पाठवून दत्ताजी स्वतः नजीबखानाला तंबी देण्याकरितां व सुजाउद्दौल्यावर स्वारी करण्याकरितां १७५९ च्या जून महिन्याच्या सुमाराला कुंजपुऱ्यास आला, कुंजपुऱ्यावर यमुना उतरून अंतर्वेदींत गेला व गोविंदपंत बुंदेल्याला इटाव्याकडून नजीबखानास पायबंद देण्यास त्यानें हुकूम केला. १७५९ च्या सप्टेंबरपर्यंत अंतर्वेदींतील नजीबाचा मुलुख घेऊन दत्ताजीनें २२ अक्टोबराला शुक्रतालास गंगानदी ओलांडिली व खुद्द रोहिलखंडात प्रवेश केला. गोविंदपंत बुंदेल्यानेंहि ह्याच सुमाराला गंगा उतरून जलालाबादेनजीक ठाणें दिलें ( लेखांक १३८ ) वरून दत्ताजी व खालून गोविंदपंत ह्यांच्या कचाटींत सांपडल्यामुळें नजीबखानाची ह्यावेळीं बहुतेक गाळण उडून गेली. तो, त्याचा मुलगा व त्याचे साथीदार-दुंदेखान, सादुल्लाखान व हफीज रहिमत—ह्यांचा दोन चार लढायांत पराजय झाला; नजीबखानाच्या पुलापर्यंत मराठ्यांनीं रोहिल्यांचे गाव जाळले व नजीबखानाच्या पुलाच्या दोन नावा तोडून त्याचा पूल केवळ निरुपयोगी करून टाकिला. ही अशी जबर तंबी मिळाल्यावर नजीबखानानें हफीज रहिमतखानाच्या द्वारें वरकरणी सलूखाचें बोलणें लाविलें ( लेखांक १३९ ) व आंतून सुजाउद्दौल्याचें सूत्र सिद्ध करून ठेविलें. मराठे आपलाहि मुलूख पुढें मागें बळकाविणार या रागानें, लखनौहून रामगंगेस पूल बांधोन सुजाउद्दौला व उमरावगीर गोसावी दाहा बारा हजार सैन्यानिशीं जलालाबादेस येऊन पोहोंचले. गोविंदपंत जलालाबादेच्या आसपास असून त्यानें सुजाउद्दौल्याला कांहीं एक अडथळा केला नाहीं. मराठ्यांची फौज संख्येनें अतीच कमी असल्यामुळें, सुजाउद्दौला नजीबखानाच्या मदतीस येतो असें ऐकून, गंगेच्या अलीकडे आली व कांहीं फौज व बुणगे यावयाचे

राहिले होते त्यांपैकीं किल्येक नजीबखान बाहेर निघाला अशी खोटीच दहशत खाऊन गंगेच्या अलीकडे येतांना पाण्यांत बुडून मेले, किल्येक वाहवले व किल्येक मारले गेले. ह्या प्रसंगाचें वर्णन करितांना गोविंदपंतानें दत्ताजीच्या व्यवस्थेची थट्टा केली आहे (लेखांक १४१). मराठ्यांची फौज १७५९ च्या ७ नोव्हेंबरला गंगेअलीकडे आली; तों थोडक्याच दिवसांत अशी बातमी आली कीं अबदाली लाहोरास येऊन पोहोंचला. १७५८ च्या मेंत रघुनाथरावानें तैमूरशहाला हाकून दिल्यापासून अबदाली हिंदुस्थानांत येणार होताच. परंतु बलुचिस्थानांत नासीरजंगानें बंड केलें होतें तें मोडून शिकारपूरच्या वाटेनें हिंदुस्थानांत येण्यास त्याला १७५९ चा नोव्हेंबर महिना लागला. अबदाली ज्याअर्थी १७५९ च्या नोव्हेंबरांत लाहोरास आला त्याअर्थी १७५९ च्या सप्टेंबरांत तो अनूप शहरीं आला म्हणून कीन म्हणतो ( Fall of the Mogul Empire p, 41 ). तें अविश्वसनीय आहे हें उघड आहे. दत्ताजीच्या मनांत नजीबखानाला पक्की तंबी पोहोंचवावयाची होती, परंतु अबदालीच्या येण्यामुळें दत्ताजीला तें काम तसेंच ठेवून द्यावें लागलें व तो लवकरच शुक्रतालास आला. रोहिले व सुजाउद्दवला यांना दबकाविण्याकरितां गोविंद बल्लाळाचा पुत्र बाळाजी गोविंद ह्यास ठेवून दत्ताजीनें यमुनेकडे मोर्चे वळविले ( लेखांक १४३ ). शुक्रतालाहून कुच करून दत्ताजी यमुना कुंजपुऱ्यावर उतरला व अबदालीशीं टक्कर देण्याची तयारी करू लागला. लाहोरास आल्यावर शीख लोकांची व अबदालीची एक मोठी लढाई झाली. साबाजी शिंदे व त्रिंबक बापूजी हीं दोन पथकें दत्ताजीनें १७५८ त पंजाबांत ठेविलीं होतीं, तीं दोन्हीं महिना पंधरा दिवसांच्या अंतरानें दत्ताजीला येऊन मिळालीं. लाहोरास अबदाली आला त्याच वेळीं साबाजी शिंदे दत्ताजीस शुक्रताल येथें येऊन मिळाला. त्रिंबक बापूजी अबदालीच्या पुढें सरकत सरकत सरहिंदापर्यंत आला. तेथें त्याची व गव्हारांची लढाई जुंपली. त्या लढाईंत त्रिंबक बापूजीचें पथक गव्हारांनीं सर्वस्वीं नागविलें. त्रिंबक बापूजीच्या पथकांतील माणसें-उघडीं बोडकीं अशीं-दत्ताजीच्या सैन्यास नोव्हेंबरच्या २३ व्या तारखेला मिळालीं ( लेखांक १४६ ). कुंजपुऱ्याहून दत्ताजी निघाला तों त्याची व अबदालीची सन्निधता दहा कोसांच्या अंतरानें ७ डिसेंबरीं झाली ( लेखांक १५५ ). ह्या सुमारास येरंड्यांना भेटावयास जाण्याकरितां गोविंदपंत दत्ताजीपाशीं निरोप मागूं लागला. ह्याचा राग येऊन दत्ताजी अबदालीला रेटण्यास एकटाच निघाला व गोविंदपंताला आपले कबिले बुणगे दिल्लीकडे घेऊन जाण्यास त्यानें सांगितलें (लेखांक १४७). इतर कांहीं मंडळीबरोबर गोविंदपंत बुंदेल्याला दत्ताजीनें पुढें अबदालीच्या तोंडावर पाठविलें म्हणून भाऊसाहेबाच्या बखरीच्या आधारावर रा० नातू महादजीच्या चरित्रांत (पृष्ठ ४९) लिहितात तो खरा प्रकार नसून, गोविंदपंत मागें राहिला. ह्या प्रसंगासंबंधानें लिहित असतां गोविंदपंतानें फारच चमत्कारिक शब्द वापरिले आहेत. अबदालीची व दत्ताजीची " आज लढाई अगर प्रातःकाळीं होईल " असें येरंड्यांना कळवून गोविंदपंत पुढें म्हणतो " ईश्वर ज्यास यश देईल त्यास सुखें देऊं ! " ह्या वाक्यावरून व विशेषतः " सुखें " ह्या शब्दावरून गोविंदपंताची

दत्ताजीच्या ठायीं किनपत भक्ति होती तें स्पष्ट ध्यानांत येण्यासारखें आहे ( लेखांक १४७). गोविंदपंत कविले वुणगे घेऊन पाठीमागें राहिला; त्यांत गाजुद्दिन वजीरहि होता. १० नोव्हेंबराच्या सुमाराला अलमगीर पातशाहाला ठार मारून गाजुद्दिन नोव्हेंबराच्या १४।१५ तारखेला मराठ्यांच्या सैन्यांत सामील झाला होता (लेखांक १४३). त्याला घेऊन गोविंदपंत मथुरेकडे गेला व दत्ताजी अवदालीची टेहळणी करीत राहिला. दत्ताजीच्या व अवदालीच्या दोन चार झटापटी होऊन २४ डिसेंबरीं एक मोठें युद्ध झालें. त्यांत मराठ्यांना यश आलें (लेखांक १५७). ३ जानेवारी १७६० ला अंतर्वेदींत शिरून अवदाली शुक्रतालीं रोहिल्याला मिळाला व तेथून त्यानें दिल्लीचा रोख धरिला (लेखांक १६४). इकडे कुंजपुऱ्याहून दत्ताजी शिंदेहि दिल्लीस यमुनेच्या दक्षिणतिरीं येऊन पोहोंचला. अवदाली व दत्ताजी ह्यांच्यामध्यें यमुनेचें पात्र तेवढें राहिलें होतें. १० जानेवारी १७६० ला अवदालीचें व दत्ताजीचें दिल्लीजवळ वडाऊंच्या घाटीं मोठें तुंबळ युद्ध झालें व त्यांत मराठ्यांचा पराजय होऊन दत्ताजी शिंदे रणांत राहिला ( लेखांक १६५ ). जनकोजी तेथून पळून कोटपुतळीस आला व तेथें १२ जानेवारी १७६० ला त्याची व मल्हारराव होळकराची गांठ पडली (लेखांक १५३ व १६५). १७५९ च्या नोव्हेंबर महिन्यांत अंतर्वेदींत शुक्रतालीं रोहिल्याशीं लढत असतां जेव्हां अवदाली आल्याची वातमी आली तेव्हांच दत्ताजीनें मल्हाररावाला मदतीस येण्याकरितां पत्रें पाठविलीं होतीं. परंतु वलवडा, झिलाडा वगैरे भिकार ठिकाणें जयनगर प्रांतीं घेत बसून मल्हाररावानें दोन महिने व्यर्थ दवडिले. पेशव्यांनींहि मदतीस जाण्याबद्दल मल्हाररावाला वारंवार पत्रें पाठविलीं (लेखांक १६१). " मल्हाररावांनीं आधीं काम कोणतें करावें, मग कोणतें करावें, माधोसिंगाचा मजकूर काय ? जेव्हां झटलें तेव्हां पारपत्य होतें तो विचार त्यांनीं न केला " (लेखांक १५७), ह्याप्रमाणें दोष देऊन, पुढें लेखांक १५८ त " मल्हारवास वारवार पत्रें रवाना केलीं आहेत, परंतु, त्याचे प्रकृतीस तुह्मी जाणता, " ह्मणून पेशव्यांनीं मल्हाररावाचा दुष्ट हेतुहि उघड करून दाखविला. मल्हारराव शिंद्यांना जर १७५९ च्या नोव्हेंबरांत मिळाला असता तर रोहिले व सुजाउद्दौला यांचें पारपत्य होऊन अवदाली एकटा राहता व त्याचें पारपत्य ह्या दोघां सरदारांना सहजासहजीं करितां आलें असतें. रघुनाथरावदादाचेंहि असेंच मत होतें ( लेखांक १५२ ). " दोन्ही सरदार येकत्र असलियास उत्तम रीतीनें पठाणाचें पारपत्य होईल; पठाणांत कांहीं फार बल नाहीं व त्यांनां मागील वर्षीं दहशतहि खादली आहे. सारांश, एकदिल फौज असलिया तें काम सहजांत आहे, " असें रघुनाथरावानें लिहून पाठविलें. परंतु मल्हाररावाच्या मनांत शिंद्याविषयीं अढी पक्की बसली होती. शिंदे पेशव्यांच्या मतानें चालतात; नजीबखानाला मारून टाकून पेशव्यांचें राज्य निष्कंटक करून टाकण्याचा शिंद्याचा आत्मघाती प्रयत्न आहे; हिंदुस्थानांत एखादा तरी " खळी " ठेवण्याचा आपला विचार शिंद्यांना पसंत नाहीं; इत्यादि कुकल्पना मनांत धरून मल्हाररावानें शिंद्यांना साहाय्य करण्याचें लांबणीवर टाकिलें व शिंद्याचा सर्वस्वीं नाश झाल्यावर कोटपुतळीस जनकोजीस येऊन तो भेटला

( टीप २१५ ). परंतु त्याच्या येण्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. जी गत शिंद्यांची झाली तीच मल्हाररावाची झाली. मार्च महिन्याच्या ४ किंवा ५व्या तारखेस मल्हाररावाचे सरदार शेव्याजी खराडे, त्याचा पुत्र शिवाजी खराडे, रामाजी यादवाचा पुत्र आनंदरावराम व गंगाधर यशवंत चंद्रचूड ह्यांची व अवदालीची गांठ पडली व चंद्रचूडाखेरीज बाकीची सर्व मंडळी ठार झाली. मल्हारराव होळकर स्वतः मागेंच राहिला होता. ह्या मागें मागें रहाण्याच्या कामीं गोविंदपंत बुंदेल्याशीं मल्हाररावाचें साम्य चांगलें जुळतें. ह्यावेळीं मल्हाररावाचें वय ६४ वर्षांचें व गोविंदपंताचें सुमारें तितकेंच असावें. दोघेहि वयस्क झाले असून तरुणपणची तडफ त्यांच्या अंगीं राहिली नव्हती. जेथें जातील तेथें माघार घेण्याचा त्यांचा विचार फार असे. लढाईच्या कामीं त्यांचा उत्साह जरी थंडा होत चालला होता तरी द्वेष, मत्सर, कुढाभाव, स्वामिद्रोह व मित्रद्रोह करण्याच्या कामीं ह्या दोघां ह्यातान्यांचें पाऊल सारखें पुढें होतें. द्वेष व मत्सर ह्या गोड व तिखट दुर्गुणांना भुलून जाऊन ह्या दोघांनीं दत्ताजीचें व पेशव्यांचें अतोनात नुकसान केलें. असो. शिंद्यांप्रमाणें मल्हाररावाची दुर्दशा झाल्यावर मेच्या सुमाराला शिंदेहोळकर करौलीच्या आसपास राहिले व अबदाली यमुनेच्या उत्तरतीरीं अंतर्वेदींत अनुपशहरीं जाऊन वसला.

शिंद्यांच्या पराजयाची बातमी १७५९ च्या डिसेंबरांत व १७६०च्या जानेवारींत पेशव्यांना पोहोंचली. त्यावेळीं पेशवे उदगीरच्या मोहिमेंत गुंतले होते. शिंद्यांची अवदालीशीं युद्धें १७५९ च्या जूनच्या अगोदर झालीं व त्याच्या अगोदर त्यांनीं पेशव्यांना मदतीस येण्याविषयीं पत्रें पाठविलीं वगैरे भ्रामक विधानें रा. नातू ह्यांनीं महादजीच्या चरित्रांत ( पृष्ठें ५४।५५ ) केलीं आहेत. त्यांचें निरसन २४५ व्या टीपेंत मीं साधार केलें आहे. येथें फक्त १७५८ त दत्ताजी हिंदुस्थानांत गेल्यापासून सदाशिवरावभाऊनें व बाळाजी बाजीरावानें १७६० च्या मार्च-एप्रिलपर्यंत केलें काय त्याचें दिग्दर्शन करितों.

१७५७ त शिंदखेडच्या लढाईंत विश्वासरावाला मदत न केल्याबद्दल जानोजी भोसल्यावर बाळाजी बाजीराव व सदाशिव चिमणाजी चालून गेले ते १७५८च्या एप्रिल-मेंत पुण्यास आले. १७५८च्या जून पासून सप्टेंबरपर्यंत ते पुण्यास होते. १७५८ च्या जुलैंत रघुनाथराव लाहोराहून पुण्यास आला. पुढें बाळाजी बाजीराव अक्टोबरांत कोंकणांत पुळयाच्या गणपतीस गेला. तो १७५९च्या मार्चांत पुण्यास आला. तोंकालपर्यंत पुण्यांत सदाशिवरावभाऊ कारभार पहात होता. १७५९च्या मार्चांत गोपाळराव गोविंद श्रीरंगपट्टणाकडे मोहीम करीत होता; दत्ताजी शिंदा दिल्लीहून लाहोराकडे चालला होता व कोंकणांत मानाजी आंग्रे व रघोजी आंग्रे कांसे, उंदेरी वगैरे शामळाचीं स्थळें घेण्यांत गुंतले होते ( का. पत्रें, यादी ६१,७६,१०२ ). बाकी हिंदुस्थानांत व दक्षिणेंत वरकांती शांतता विराजत होती. ह्यावेळीं सदाशिवरावभाऊच्या व बाळाजी बाजीरावाच्या मनांत कांहीं प्रचंड कल्पना खेळत होत्या. सर्व हिंदुस्थान व सर्व दक्षिण महाराष्ट्रसाम्राज्यांत अंतर्भूत करण्याचा त्यांचा मनोदय होता. हें अवाढव्य कृत्य पुढील वर्षी ह्मणजे १७६० त उरकावयाचा निश्चय करून त्यांनीं दत्ताजीला लाहोरचा

बंदोवस्त करून काशी, प्रयाग व बंगाला ह्या प्रांतांवर पूर्वेकडे स्वारी करावयास सांगितलें; दत्ताजी प्रयागास पोहोंचतो न पोहोंचतो तोंच रघुनाथरावानें १७५९ च्या सप्टंबरांत दक्षिणेंतून बंगाल्यांत दत्ताजीला जाऊन मिळावें, तो प्रांत आसमुद्र जिंकून टाकावा व सुजाउद्दौल्यानें मदत केल्यास त्यांपैकीं अर्धा प्रांत त्यास द्यावा, असें ठरविलें ( का० पत्रें, यादी ३६२, ३७३, ३८७, ३८८ ). हिंदुस्थानची व्यवस्था दत्ताजी, जनकोजी व रघुनाथराव यांजकडे सोंपवून, दक्षणची व्यवस्था करण्याचें काम सदाशिवरावभाऊ, बाळाजी बाजीराव व विश्वासराव ह्या तिघांनीं आपल्याकडे घेतलें. दक्षणेंत ह्या वेळीं मराठ्यांना दोन प्रतिस्पर्धी होते:—एक सलाबतजंग व दुसरा श्रीरंगपट्टणचा कुंभार राजा व त्याचा सरदार हैदरअल्ली. ह्या दोघांचा रग जिरविला ह्मणजे आसमुद्र दक्षण मोकळी झाली. गोपाळराव पटवर्धनाला लिहितां लिहितां बाळाजी बाजीराव ह्मणतो, "पन्नास हजार फौज जमा करून अगदीं मोगल दक्षिणेंत होता कीं नव्हतासा करूं" ( ऐतिहासिक लेखसंग्रह १५ ). तसेंच १७६० च्या फेब्रुवारांत गोविंद बल्लाळाला सदाशिव चिमणाजी लिहितो, " कर्नाटकची स्वारी न झाली; तिकडेहि अबदालीचा पेंच ; पैका मिळायाचें झालें नाहीं; नाहीं तरी सारी दक्षिण मोकळी होती" ( लेखांक १६६ ). १७६० त सेतुबंधापर्यंत दक्षण मोकळी करावयाची असा पेशव्यांचा बेत होता. हा बेत करण्यांत परदेश जिंकण्याच्या उच्छृंखल मनोवृत्तीचें प्राबल्य यत्किंचितहि नसून सर्व घटना, योग्य असा सारासार विचार करून पेशव्यांनीं जुळवून आणिली होती. श्रीरंगपट्टणचें हिंदूराज्य कलंडण्याच्या बेतांत आलें होतें; सलाबतजंग अर्धाअधिक पेशव्यांनीं गिळलाच होता व हिंदुस्थानांत क्षुद्र नजीबखानाखेरीज ह्मणण्यासारखा शत्रू मराठ्यांना राहिला नव्हता. दक्षण मोकळी करण्याकरितां होणाऱ्या स्वारीचे सदाशिवरावानें दोन भाग केले. पहिल्या भागांत सलाबतजंगाचा चुराडा करण्याचें ठरविलें व दुसऱ्या भागांत तसेंच पुढें कर्नाटकांत जाऊन श्रीरंगपट्टण घेण्याचें योजिलें. सलाबतजंगावर स्वारी करण्यास पेशव्यांस एक कारण होतें. तें हें कीं, शिंदखेडची लढाई झाल्यावर निजामअल्लीनें पेशव्यांस दहा लाखांची जहागीर व नगर व परांडा असे दोन किल्ले देण्याचा करार केला असून तो करार अंमलांत आणण्याचा निजामअल्ली अनमान करूं लागला ( लेखांक १५४ ). यास्तव १७५९ च्या दसऱ्यास डेरेदाखल होऊन फौज जमा करणें सदाशिवरावभाऊला प्राप्त झालें. सर्व फौज जमा होईतोंपर्यंत ह्मणजे १७५९ च्या नोव्हेंबरपर्यंत सदाशिवरावभाऊ पुण्याजवळ गारपिरावर डेरे देऊन होता ( टीप २३१ पहा ). विसाजी कृष्णानें कविजंगाशीं फितूर करून नगरचा किल्ला १० अक्टोबर १७५९ ( लेखांक १४७ ) ला घेतला अशी बातमी भाऊला तेथें कळली ( टीप २१७ पहा ). नोव्हेंबरांत भाऊला दगा करण्याचा विचार मुजफरखानानें केला; परंतु तो फसला ( लेखांक २३१ ). नंतर, भाऊ, दादा, नाना व विश्वासराव निजामावर निघाले ( टीप २१९ पहा ). नाना नगरास गेले व भाऊ, दादा व विश्वासराव राक्षसभुवनाकडे गेले ( लेखांक १४९ ). करार केलेली जाहागीर देण्यास मोगल ह्या वेळीं

राजी झाला; परंतु आतां तें बोलणें पेशवे कबूल करीतना ( लेखांक १४९ ); तेव्हां लढणें हाच मोगलाला शेवटचा उपाय राहिला व उदगीरची मोहीम सुरू झाली. ९ जानेवारीला भाऊसाहेब परळीजवळ गेले त्यावेळीं त्यांजवळ पंचवीस हजार सैन्य व दहा हजार गाडदी होते व निजामअल्लीपाशीं दहा हजार फौज व दहा हजार गाडदी होते. सलाबतजंगाची व त्याचा दिवाण निजामअल्ली यांची ह्या वेळेस फारच हलाखी होती. बसालतजंग फुटून कर्नाटकास गेला; मुसाबूसी १७५८ च्या जूनांत पांडिशेरीस गेला व इब्राईमखान पेशव्यांचा चाकर झाला ( लेखांक १५४ ). उदगिरीजवळ १७६० च्या १९ व २० जानेवारीला मोगलांशीं दोन युद्धें झालीं, त्यांत मोगल अगदीं नरम आला ( लेखांक १६० ), परंतु त्याचें पक्कें पारिपत्य १७६० च्या फेब्रुवारीला उत्तमोत्तम झालें ( लेखांक १६५ ). ह्या लढाईचें सविस्तर वर्णन विस्तरभयास्तव मी येथें देत नाहीं. कारण, तें ह्या ग्रंथांतील लेखांक १५१ पासून १६७ पर्यंतच्या पत्रांत ज्यांनीं साक्षात् ती लढाई मारिली त्यांनीं स्वतःच केलें आहे. लढाईनंतर जो तह झाला त्यांत निजामाचा बहुतेक प्रांत पेशव्यांनीं घेतला ( टीप २४१ पहा ). दक्षिण घेण्याचा येथपर्यंत पहिला भाग झाला. ह्यापुढें खरें पाहिलें तर सदाशिवरावभाऊनें दुसऱ्या भागाला ह्मणजे श्रीरंगपट्टणावर स्वारी करण्याच्या उद्योगाला लागावयाचें; परंतु, तें काम त्याला तसेंच टाकून द्यावें लागलें. कां कीं, उदगीरची मोहीम सुरू होऊन पंधरा दिवस होतात न होतात तों दत्ताजी शिंद्याच्या पराजयाचीं वर्तमानें आलीं. हिंदुस्थान गडबडलें आहे, संस्थानिकांचा अबदालीकडे फितूर आहे, वगैरे बातम्या लागोपाठ येऊं लागल्या. तेव्हां उदगीरची मोहीम हातीं घेतल्यासारखी यथास्थितपणें शेवटास लावून श्रीरंगपट्टणाकडे न जातां हिंदुस्थानांत सरदारांच्या साहाय्याला जाणें पेशव्यांस भाग पडलें. १७५९च्या मार्चांत दक्षिण सबंद मोकळी करण्याचा जो बूट पेशव्यांनीं योजिला होता तो तसाच अर्धा टाकून हिंदुस्थानांतील सरदारांची पडती बाजू सावरण्याची पेशव्यांस तयारी करावी लागली. ह्या कामाकरितां सदाशिवरावभाऊ व बाळाजी बाजीराव रंगपंचमीला ह्मणजे ७ मार्च १७६०ला पडदूर येथें भेटले ( लेखांक १६८ ) व तेथें आठ रोजपर्यंत हिंदुस्थानांत कोणीं जावें याबाबत खलबत झालें. हिंदुस्थानांत दादांनीं जाऊं नये वगैरे पुष्कळ बाबींची शहानिशा १७५९ च्या दसऱ्यास पुण्यासच झाली वगैरे भ्रामक विधानें अनेकांनीं केलीं आहेत. त्यांचा विचार २५४ व्या टिपेंत व २४५ ब, ह्या टिपेंत सविस्तर केला आहे. त्या टीपांकडे वाचकांचें लक्ष्य पोहोंचवून, प्रस्तुत अर्थाकडे वळणें रास्त दिसतें. पडदूर येथील खलबतांत सदाशिवरावभाऊनें हिंदुस्थानांत जावें असा सिद्धांत झाला. असा सिद्धांत होण्याचें मुख्य कारण रघुनाथरावाचा नाकर्तेपणा हें होय. ह्या नाकर्तेपणाचें स्वरूप मागें दाखविलेंच आहे. सदाशिवरावभाऊनें ह्या नाकर्तेपणाची ओळख राघोबाला ह्या वेळीं दिली. ती त्याला मर्माग्रीं झणाणून त्यानें आपण होऊन हिंदुस्थानांत जाण्याचें नाकारलें ( ऐतिहासिकलेखसंग्रह नं. १४ ). बाळाजी बाजीरावाच्या व सदाशिवरावभाऊच्या मनांत रघुनाथरावानें

जाण्याचें नाकारावें असेंच होतें. कारण, ह्या वेळीं प्रसंग फार विकट होता. माधोसिंग, विजेसिंग, पृथुसिंग, नजीबखान, मल्हारराव, गोविंदपंत व अबदाली असल्या गृहशत्रूंच्या व परशत्रूंच्या पुढें राघोबासारख्या भोळया सांबाचा टिकाव क्षणभरहि न लागता. असल्या चांडाळचौकडीचा खरपूस समाचार घेण्यास सदाशिवरावभाऊसारखाच पंचतंत्री मुत्सद्दी हवा होता. तेव्हां हिंदुस्थानांत त्याची रवानगी करून देण्यांत बाळाजी बाजीरावानें आपल्या विचारशक्तीचा केवळ गौरव केला असेंच कबूल करणें भाग पडतें.

बाळाजी बाजीरावानें सदाशिवरावभाऊची जी निवड केली ती यथायोग्य होती. कारण, सदाशिवरावभाऊ जसा उत्तम मुत्सद्दी ह्मणून नांवाजला गेला होता तसा लढवय्या सरदार ह्मणूनहि त्याचा चांगला लौकिक होता. १७४७ त सदाशिवरावभाऊनें बहादूरभेंड्याची स्वारी केली ( का० पत्रें, यादी ६८ ). १७५० त यमाजी शिवदेवाचें बंड त्यानें स्वतः जाऊन मोडिलें. १७५१ च्या मार्चांत बाळाजीनें सलाबताला तुंगभद्रेवर अडविलें त्या वेळीं भाऊ त्याच्याबरोबर होता. १७५१ च्या नोव्हेंबरांत सलाबत बुसीला घेऊन कोरेगांवास आला तेव्हां भाऊ लढाईंत हजर होता. १७५२ च्या डिसेंबरांत भालकीची लढाई झाली तींत तो होता. १७५३ च्या जानेवारींत श्रीरंगपट्टणची स्वारी झाली तींतहि भाऊ व रामचंद्रबाबा शेणवई हे दोघे होते. १७५४ च्या होळीहोन्नूरच्या स्वारींत भाऊ तीन दिवस मोर्च्यांत होता. १७५५ च्या सावनूरच्या स्वारींत भाऊ हजर होता. १७५७ च्या श्रीरंगपट्टणच्या स्वारींत भाऊ मोर्च्यांत होता. १७५८ च्या जानोजी भोसल्यावरील टेहळणींत भाऊ होता. १७६० त उदगीरची लढाई भाऊ व विश्वासराव ह्या दोघांनीं चालविली. सारांश, भाऊला लढाईचा सराव सारखा तेरा वर्षे होता. रघुनाथरावाची पहिली मोहीम १७५० त झाली. ह्मणजे १७६० पर्यंत रघुनाथरावाला लढाईचा सराव सरासरीं दहा वर्षे होता. रघुनाथरावाची तडफ व भरारी ह्या गुणांबद्दल जशी ख्याती होती तशी भाऊची युक्ति व दूरदर्शीपणा ह्यांबद्दल प्रसिद्धि होती. रघुनाथराव फार मेहनत करून थोडें फळ मिळवी; सदाशिवरावभाऊ थोड्या युक्तीनें फार लाभ करून घेई. रघुनाथरावानें लाहोरापर्यंत भटकून पुष्कळ शत्रु व बरेंच कर्ज पैदा केलें. सदाशिवरावभाऊनें जवळच्या जवळ सलाबतजंगावर स्वाऱ्या करून दीडदोनकोटींचा मुलूख मिळविला व शहानवाजखान, सय्यदलष्करखान व मुस्साबुसी अशांचा स्नेह जोडिला. दत्ताजी शिंदे, नाना पुरंदरे, महीपतराव चिटणीस असले सज्जन सदाशिवरावाच्या प्रीतींतले व मल्हारराव होळकर, सखारामपंत बोकील व सखाराम हरी असले दुर्जन रघुनाथरावाच्या मर्जींतले. तात्पर्य, सदाशिवरावभाऊ व रघुनाथरावदादा ह्या दोघांत जमीनअस्मानाचें अंतर होतें. हें बाळाजी बाजीराव १७४२ पासून जाणून होता ( टीप ११३ पहा ). महादोबा पुरंधऱ्यानेंहि भाऊसाहेबाविषयीं असेंच मत दिलें आहे ( र० या० पाणिपतची बखर, पृष्ठ ८ ).

१७६० च्या १५ मार्चाला सदाशिवरावभाऊनें पडदुराहून हिंदुस्थानास जाण्यास कुच केलें (टीप २५६ पहा). देशीं व कर्नाटकांत सलाबतजंग व हैदर ह्यांच्यावर दबाव राखण्या-

करितां रघुनाथरावदादा, गोपाळराव पटवर्धन, विसाजी कृष्ण विनीवाले वगैरे सरदार ठेवून, नाना पुरंधरे, बळवंतराव मेहेंदळे, महीपतराव चिटणीस ह्या मंडळीसह भाऊ व विश्वासराव पन्नास हजार फौज घेऊन ४ एप्रिलास ब-हाणपुरास येऊन पोहोंचले; १० एप्रिलच्या सुमारास हांडियास आले व तेथून दरमजल मधील वाटेनें ह्मणजे शिहूर, भोपाळ, सीरोंज, अरूण, मालन, पहारी, कलेधार, नरवर, ग्वालेर, ढवळपूर या मार्गानें आग-याकडे जाण्याचा त्यांचा विचार होता. समशेर बहाद्दर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, मानाजी धायगुडे दिल्लीच्या कामांतून काढून दत्ताजीनें दक्षिणेंत पाठविलेला अंताजी माणकेश्वर, माने, निंबाळकर वगैरे बारा तेरा हजार फौज, देशची वीस हजार फौज व गाडदी आठ हजार ह्याप्रमाणें पडदुराहून निघतेवेळीं फौज भाऊसाहेबाबरोबर होती. दमाजी गायकवाड, इब्राम्हईखान गार्दी स्वतः, संताजी वाघ वगैरे मंडळी पुढें गेली होती ती रस्त्यानें येऊन मिळाली. आपण दरमजल हिंदुस्थानांत येऊन पोहोंचतों असें गोविंदपंत बुंदेल्याला पडदुराहून १५ मार्चाला लिहून सदाशिवरावभाऊनें त्याला दोन चार गोष्टी अवश्य करण्याचें सुचविलें ( लेखांक १६७ ). सुजाउद्दौल्याला आपल्या बाजूला वळवून घ्यावें, ही पहिली सूचना होती. १७५९ च्या डिसेंबरांत अवदाली शुकतालीं रोहिल्यास मिळाल्यावर सुजाउद्दौला रोहिल्यांना सोडून अयोध्येस गेला. कारण, सुजाउद्दौल्याचें व अवदालीचें पिढीजाद वाकडें होतें. सुजाउद्दौल्याचा बाप जो सफदरजंग वजीर त्यानें १७५० त मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे ह्यांना अवदालीला तंबी देण्याकरितां बोलाविलें होतें. ह्याच सफदरजंगानें १७४८ त अवदालीचा सरहिंदास पराजय केला होता. १७५१ त अहमदखान बंगषाचा कादरगंजास पराभव करून फत्तेच्या मसनदीवर ज्याला शिंदे, होळकरांनीं बसविलें तो सफदरजंग ह्मणजे सुजाउद्दौल्याचा बापच होय (का. पत्रें, या.दी १६२ व लेखांक १७३ ). त्यावेळीं सफदरजंगानें मराठ्यांचे हे उपकार स्मरून त्यांना काशी व प्रयाग हीं दोन क्षेत्रें देण्याचें वचन दिलें होतें. परंतु, १७५४ च्या जुलैंत बाबूराव महादेवाला श्रीक्षेत्र ताब्यांत घेण्याकरितां पेशव्यांनीं पाठविलें असतां त्याला सफदरजंग अडथळा करू लागला ( लेखांक २९ ) . तेव्हां त्याच्यावर नागोरचें काम झाल्यावर स्वारी करण्याचा जयाप्पाचा विचार होता (लेखांक ३७). पुढें सफदरजंग १७ अक्टोबर १७५४स वारला ( लेखांक ४१ ) व त्याचा मुलगा सुजाउद्दौला नवाब झाला. १७५५च्या पुढें सुजाउद्दौल्यावर स्वारी करावयाची तों मध्येंच जयाप्पा नागोरास आटोपला. १७५७ त रघुनाथरावाची हिंदुस्थानांत स्वारी झाली. त्यावेळीं काशींत अंमल बसविण्याचा विचार होता; परंतु, १७५८ च्या मेपर्यंत रघुनाथराव लाहोरास गुंतल्यामुळें त्याच्या हातून तें काम झालें नाहीं. बारा लाख रुपये घेऊन सुजाउद्दौल्याला रघुनाथरावानें व विठ्ठल शिवदेवानें सोडून दिलें. १७५९ त दत्ताजीला काशी, प्रयाग व बंगाला हे प्रांत जिंकण्याची कामगिरी नानासाहेबानें सांगितली. त्याप्रमाणें दत्ताजी १७५९ च्या मेंत अंतर्वेदींत शिरला व नजीबखानाला तंबी देऊन सुजाउद्दौल्यावर जाणार तों सुजाउद्दौल्यानें नजीबखानाशीं स्नेह

करून मराठ्यांवर चाल केली. इतक्यांत इकडे अबदालीचा शह आला. त्यामुळें नजीब-खान व सुजाउद्दौला ह्यांना तसेच ठेवून ( लेखांक १५७ ) दत्ताजीनें अबदालीकडे तोंड वळविलें. आपल्यावरचें संकट गेलें असें पाहून सुजाउद्दौला अयोध्येस आला. त्याच्याकडे अबदालीनें किंवा मराठयांनीं तीन महिने म्हणजे १७५९ च्या डिसेंबरपासून १७६० च्या मार्चपर्यंत ढुंकून सुद्धां पाहिलें नाहीं. परंतु, हिंदुस्थानांत येण्याचें जेव्हां सदाशिवरावभाऊचें ठरलें तेव्हां त्यानें गोविंदपंताला सुजाउद्दौल्याशीं स्नेह करण्यास सांगितलें. आपला आमचा स्नेह वडिलोपार्जित आहे; सरदारांनीं व चिरंजीवांनीं आपले ठायीं ममतेंत अंतर केलें नाहीं; अबदालीची जड हिंदुस्थानचे पातशाहींत रुतों देणें अयोग्य आहे, वगैरे कान-गोष्टी सांगोन सुजाउद्दौल्याला आपल्या बाजूला ओढण्याचा प्रयत्न करावा; पातशहाजादा अलीगोहर व पट्टण्याचा सुभेदार जाफरअलीखान, ह्यांना अनुकूल करून घ्यावें; हिंदुपत वगैरे बुंदेले व यमुनापारचे रजपूत संस्थानिक ह्यांना चाकरीस सिद्ध करावें; अबदालीकडील बारीक बातमी काढून पाठवावी व वीस पंचवीस लाख रुपये तावडतोब हिंदुस्थानांत स्वारी आली म्हणजे पाठवून द्यावे; इतक्या कामगिऱ्या हिंदुस्थानच्या रस्त्यावर असतांना सदाशिवरावभाऊनें गोविंदपंताला सांगितल्या. मुद्दाम गोविंदपंतालाच ह्या कामगिऱ्या सांग-ण्याचें कारण असें कीं, शिंदेहोळकर ह्यावेळीं अबदालीशीं झगडण्यांत गुंतले होते व तें काम करून ते अगदीं थकून गेले होते. शिंदेहोळकरांच्या खालोखाल म्हणण्यासारखा वजन-दार माणूस हिंदुस्थानांत गोविंदपंतच होता. यद्यपि गोविंदपंताला सरंजामी सरदारी प्राप्त झाली नव्हती व तो कोणत्याहि प्रांताचा सुभेदार नव्हता, तत्रापि मातबर मामलतदार म्हणून त्याची अलीकडे दहा पांच वर्षं बरीच प्रसिद्धि झाली होती. त्याला सरकारांत रसद चौदा लाखांची भरावी लागत असून, त्याची वार्षिक मिळकत सामान्य नव्हती ( लेखांक १३२). तो दहा हजार फौज बाळगीत असून तत्प्रीत्यर्थ पंचवीस लाख रुपये सरकारांतून खात असे ( लेखांक २४३ ). इतकेंहि करून त्याची गणना मामलतदारांतच होत असे ( लेखांक २४२ ). सरदारांत आपली गणना व्हावी एतत्प्रीत्यर्थ त्याचे सर्व प्रयत्न चालले होते. मख्त्याच्या कमाविशी करून त्यानें सरकारचा फायदा करून दाख-विला होता. फौज जवळ ठेवून एखाद्या सरदाराप्रमाणें त्यानें अंतर्वेदींत अंमल बसविला होता ( लेखांक २४४ ). अंतर्वेदींतील रोहिले सरदार व सुजाउद्दौला ह्यांच्याशीं तो चांगला स्नेह ठेवून असे. काशीकडे कोणी सरदार अगर विद्वान् ब्राह्मण जावयाचा असला म्हणजे त्याला गोविंदपंताच्या साहाय्याची जरूर पडे व गोविंदपंत तें मोठ्या उत्सुकतेनें देई. सारांश, कऱ्हाडे लोकांचे ठायीं सर्वत्र साखर पेरून आपलें हित करून घेण्याचा जो एक मोहक गुण आहे तो गोविंदपंताचे अंगीं अमूप होता. गोविंद-पंताचें हें बाह्य स्वरूप झालें. गोविंदपंताचें अंतःस्वरूप फारच निराळें होतें. मख्त्याच्या कमाविशी करून त्यानें सरकारचा नफा करून दाखविला होता खरा; परंतु, मख्त्याची कमावीस जाऊन गोविंदपंताला जेव्हां बुंदेलखंड व अंतर्वेद ह्या प्रांतांची बिनमख्त्याची

८।।६ ३१/२

म्हणजे प्रांताचें जें कसोशीनें रास्त उत्पन्न येईल त्याचा भरणा सरकारांत करावयाचा व नोकरी केल्याबद्दल अमूक एक वेतन घ्यावयाचें अशा तऱ्हेची कमावीस करण्याची पाळी आली, तेव्हां गोविंदपंताला मख्ल्याच्या वेळेस खरोखर उत्पन्न केवढें मोठें येत असे व तो सरकारांत मख्ता किती कमी देत असे हें पेशव्यांना कळून आलें ( लेखांक २४२ ). त्यावेळीं १७५७ त गोविंदपंताबरोबर गोविंदपंताच्या प्रांतांतील उत्पन्नाची चवकशी करण्याकरितां व त्याचे मागील हिशेब तपासण्याकरितां पेशव्यांनीं येरंडे व कानिटकर हे दरखदार पाठवून दिले. चवकशी करण्याच्या कामीं गोविंदपंत व त्याचे मुत्सद्दी ह्यांनीं दरखदारांना आणवतील तितके अडथळे आणिले. जमीदारांची व त्यांची भेट होऊं दिली नाहीं; कुळें व मामलतदार ह्यांच्यामध्यें कसर काय निघतें तें त्यांना दाखविलें नाहीं व जमाबंदीचे खर्डे व हिशेब त्यांच्या दृष्टीस पडूं दिले नाहींत. यद्यपि गोविंदपंतानें दरखदारांना धाब्यावर बसविण्याची इतकी मेहनत केली तत्रापि पुण्याच्या फडांत सदाशिवरावभाऊ व रामचंद्रबाबा शेणवई ह्यांच्या हातांखालीं कामें केलेल्या ह्या कारकुनांना गोविंदपंताचीं सर्व विंगें कळून आलीं. प्रांतांची जमा कमी करून कशी दाखवितात; वाईट महाल सरकारांत कसे ठेवितात; अंतस्थ नजराणे कसे घेतात व फौजेचा खर्च वाढवून कसा दाखवितात वगैरे विंगें त्यांनीं सरकारांत कळविलीं. हीं विंगें पुण्यांत १७५७ तच सदाशिवरावभाऊला कळून चुकलीं होतीं. १७५७त गोविंदपंताची बुंदेलखंडांत रवानगी करतांना त्याला सदाशिवराव भाऊनें उत्पन्नाचे नवीन अजमास व बेहेडे करून दिले ( लेखांक २३७ शेवट). त्यांत गोविंदपंताच्या प्रांतांतून जास्ती जमा किती व्हावी ह्याचा ठोकळ अजमास होता. गोविंदपंताच्या प्रांतांत जाऊन ह्या अजमासाप्रमाणें जमेचा व खर्चाचा बारीक तपशील लावण्याकरितां सदाशिवरावभाऊनें येरंडे व कानिटकर यांना पाठविलें. त्यांची व्यवस्था गोविंदपंतानें कशी केली तें वर सांगितलेंच आहे. दरखदार येऊन कमाविशीनें मामलतीची सुरुवात झाल्यापासून गोविंदपंतानें निराळेंच वर्तन आरंभिलें. १७५७ त पुण्याहून निघतांना प्रांतांची व्यवस्था उत्तम ठेवितों ह्मणून पेशव्यांना त्यानें ज्या लांब लांब गोष्टी सांगितल्या होत्या त्या सर्व एकीकडे ठेवून तो प्रांतांचें कमी उत्पन्न करून दाखविण्याच्या खटपटीस लागला ( लेखांक २३९ ). रयतेला दिलदिलासा देण्याचें काम त्यानें सोडून दिलें; कुळांनीं लावणी-संचणी करावी ह्याकरितां मख्ल्याच्या वेळीं तो त्यांना तगाई देत असे ती त्यानें बंद केली व येरंडे व कानिटकर ह्यांना न भेटतां तो अतर्वेदींत निघून गेला. हातानें सरकारचें असें नुकसान करून तोंडानें मात्र सरकारचा नफा होईल तितका करून देईन असें येरंड्यांना लिहिण्यास त्यानें कमी केलें नाहीं. " ज्याप्रमाणें श्रीमंत स्वामींची मर्जी त्याप्रमाणें मजला करणें आणि तुमची खुषी तेंच मजला करणें, " असा त्यानें येरंड्यांना व पेशव्यांना लिहिण्याचा पाठ ठेविला ( लेखांक १४२ ). परंतु ह्या त्याच्या गोड भाषणाना पेशवे भुलले नाहींत. योग्य वेळ आली ह्मणजे गोविंदपंताची मामलत काढून टाकावयाची असा त्यांनीं अंतस्थ बेत केला ह्या अंतस्थ बेताची कुणकुण गोविंदपंताच्या कानावर गेली होती ( लेखांक

२४२ ). परंतु प्रसिद्धपणें त्याचा पुकार त्यांनीं कधींच केला नव्हता. येणेंप्रमाणें दोघांचीहि मनें परस्परांविषयीं संशयग्रस्त झालीं होतीं. प्रसिद्धपणें एकमेकांचें नुकसान करण्याची दोघांचीहि इच्छा नव्हती; परंतु, अन्तस्थ रीतीनें एकमेकांचें नुकसान करण्याचे प्रयत्न दोघांचेहि चालू होते. गोविंदपंत उत्पन्नाच्या बाबतींत नुकसान करून दाखवील हें पेशवे जाणून होते. ह्याच्याहि पलीकडे जाऊन राजकारणांत तो कांहीं घोंटाळा करील हें मात्र कांहीं काळपर्यंत त्यांच्या स्वप्नींहि नव्हतें. परतु पेशव्यांचें हें अज्ञान फारच हानिकारक होतें. कारण, सरकारचें उत्पन्न गोविंदपंतानें कमी तर केलेंच; परंतु एवढेंच करून तो थांबला नाहीं. तर पेशव्यांच्या मर्जीतला जो दत्ताजी शिंदे त्याचेंहि १७५९ व १७६० तील रोहिल्यांच्या व अबदालीच्या लढाईंत नुकसान केलें; अशा भावनेनें कीं, पेशव्यांप्रमाणें दत्ताजीहि आपली कमावीस आपल्याकडून काढून टाकील. गोविंदपंतानें केलेल्या दत्ताजीच्या नुकसानाचा व हानीचा पत्ता पेशव्यांना बिलकुल नव्हता. कारण, रोहिल्यांशीं व अबदलीशीं दत्ताजीचें युद्ध चाललें असतांना, लढाईची दत्ताजीसंबंधीं वगैरे बातमी पेशव्यांना गोविंदपंतच देत असे. तींत रोहिल्यांना आपण दिलेली फूस, ऐन अबदालीशीं लढाई होण्याच्या प्रसंगीं आपण मागितलेला निरोप, प्रत्यक्ष लढाईपासून दूरदूर राहण्याची आपली इच्छा वगैरे स्वकृत दुष्कर्मांचें वर्णन गोविंदपंतानें केलें नाहीं, हें उघडच आहे. ह्यावेळीं पेशव्यांना पाठविलेल्या पत्रांत, अबदालीचें वर्चस्व, मराठी सैन्याची दुर्दशा, शिंद्यांची हानि वगैरे प्रसंगांची माहिती देऊन मदतीला तावडतोब सैन्य पाठवून द्यावें, अशी गोविंदपंतानें सविनय प्रार्थना केली. त्यावरून गोविंदपंताला शिंद्यांविषयीं फार कळकळ वाटते अशी पेशव्यांची समजूत झाली. दत्ताजीला गोविंदपंताचा राग आला होता, गोविंदपंतानें सुजाउद्दौल्याकडून व नजीबखानाकडून लांच खाल्ला होता, दत्ताजीला यश आलें काय किंवा अबदालीला आलें काय, गोविंदपंताला त्याची फिकीर नव्हती ( लेखांक १८७ ), वगैरे प्रकरणें पेशव्यांना माहीत नव्हतीं. वृद्ध गोविंदपत दत्ताजीला व जनकोजीला साहाय्य करून आपण हिंदुस्थानांत येईतोंपर्यंत आपली बाजू संभाळीत आहे अशी पेशव्यांची समजूत होती. ह्याच समजुतीवर भिस्त ठेवून बाळाजी बाजीरावानें व रघुनाथरावानें उदगीरच्या मोहिमेंतून गोविंदपंताला स्नेहाचीं व आश्वासनाचीं पत्रें पाठविलीं. ह्याच समजुतीवर भिस्त ठेवून सदाशिवरावभाऊनेंहि पडदूर वगैरे ठिकाणांहून वर लिहिलेल्या कामगिऱ्या करण्यास गोविंदपंताला लिहिलें. त्या त्यानें कशा बजाविल्या तें पुढें दिसून येईल.

१७६० च्या २८ एप्रिलास सदाशिवराव सीहोरास आला ( लेखांक १७४ ). तेथून त्यानें माधोसिंग, विजेसिंग, कोटेवाले राणाजी वगैरे रजपूत संस्थानिकांना येऊन मिळण्याविषयीं पत्रें व वकील पाठविले. हे सर्व संस्थानिक दोन्ही डगरींवर हात ठेवून होते. जिकडे जोर दिसेल तिकडे त्यांचा जाण्याचा विचार होता. सदाशिवराव जवळ आल्याकारणानें मराठ्यांना येऊन मिळण्याचा त्यांनीं रुकार दिला. परंतु आंतून अबदालीकडे त्यांचा ओढा होता. सीहोरच्या आसपासच्या कांहीं दंगेखोर मवासांचें पारिपत्य करून मराठे खेचीवाड्यांत

अरुण येथें १४ मेला आले. तेथील अहिरांचें बंड मोडून भाऊनें नरवराच्या दिशेनें कुच केलें. ह्यावेळीं अबदाली अंतर्वेदींत अनुपशहरीं होता. त्यानें जहानखान व नर्जीबखान ह्यांना मराठयांच्या ताब्यांतील अंतर्वेदींतील इटावें शहराकडे दबाव टाकण्याकरितां व सुजाउद्दौल्याशीं स्नेह करण्याकरितां पाठविलें. अंतर्वेदींत ह्यावेळीं गोविंदपंताचा पाराशर दादाजी नामेंकरून कोणी पथक्या होता. त्याच्या सैन्याचें व यवनांच्या सैन्याचें युद्ध झालें, त्याची सर्व फौज उठोन गेली (लेखांक १८१) व सकुराबादचें ठाणें यवनांच्या हातीं पडलें (लेखांक २०९). ह्याच सुमाराला नक्षी व सुमेरसाचा पुत्र रतनसा ह्यांनीं बुंदेलखंडांत बंड केलें (लेखांक १८४). काशींतहि कोंकणस्थ व कऱ्हाडे यांचें भांडण लागलें (लेखांक १८५). गोविंदपंताच्या ताब्यांतील जे बुंदेलखंड, अंतर्वेद व कडाकुरा प्रांत त्यांच्यांत कांहीं ठिकाणीं हीं अशीं बंडें अधून मधून होत होतीं. हीं बंडें मोडून जेणेंकरून सरकारकिफायत होईल तें काम करणें ह्मणून शिंदे, होळकर व सदाशिवरावभाऊ ह्यांनीं गोविंदपंताला हुकूम केला. सुजाउद्दौला, मलकाजमानी, अलीगोहर व मारजाफरखान ह्यांच्याशीं राजकरण करून ह्यांना मराठ्यांच्या बाजूला आणण्याचा प्रयत्न करा ह्मणून गोविंदपंताला मागें सदाशिवरावभाऊनें सांगितलेंच होतें. तेव्हां आंत व्यवस्था ठेवून बाहेर राजकारणें करण्याचें दुहेरी काम गोविंदपंतावर येऊन पडलें. तीं दोन्हीं कामें त्यानें अर्धीमुर्धी केलीं. रतनसाला मायेंत घेऊन अंतर्वेदींतील अंमल गोविंदपंतानें आठ पंधरा दिवस कसा तरी राखला (लेखांक १८७). अलीगोहराला पातशाहा करावयाचा व त्याची वजिरी सुजाउद्दौल्याला द्यावयाची असें वचन दिल्यास सुजा मराठ्यांना मिळण्यास तयार आहे ह्मणून गोविंदपंतानें सदाशिवरावभाऊस लिहिलें. तेव्हां शामजी रंगनाथ यास भाऊनें सुजाकडे वकिलीस पाठवून दिलें (लेखांक १८९) व आपण मालन. पाहारीवरून ग्वालेरीकडे कुच केलें. सदाशिवराव ग्वालेरीस ३० मेला आला (लेखांक १९४). तो सरदारांच्या ह्मणजे शिंदेहोळकरांच्या सांगण्यावरूनच आला (लेखांक १८०, १८७ व टीप २७०). सरदारांनींहि लक्ष्मी नारायणाच्या हस्तें सुजाउद्दौल्याकडे बोलणें लाविलेंच होतें. ह्याच सुमाराला नर्जीबखान व जहानखान यांणीं इटाव्यास वेढा घातला (लेखांक १९४) व अंतर्वेदींतील ठाणेदार दूरच्या अवाईनेंच आपलीं ठाणीं सोडून पळून जाऊं लागले. तेव्हां गोविंदपंतानें सदाशिवरावाला इटाव्याकडे कांहीं सैन्य पाठवून देण्यास विनंति केली. सदाशिवरावानें गोविंदपंताला असें लिहून कळविलें कीं केवळ दुरची अवाई ऐकून तुमचे ठाणेदार ठाणीं टाकून पळतात ही शरमेची गोष्ट आहे; अशा पळपट्या ठाणेदारांचें उत्तम प्रकारें पारिपत्य करून ते अत्रूनें दम धरून झुंजतील अशी व्यवस्था तुह्मीं अवश्य करावी; ह्मणजे दुसऱ्या ठाणेदारांस वचक बसून ते झुंजून मरतील परंतु पळणार नाहींत (लेखांक १९५). अशी ताकीद करून २ जूनला भाऊ ग्वालेरीहून निघाला तो ४ जूनला ढवळपुराच्या खालीं पांच चार कोस चमेल नदीवर आला (लेखांक १९६); ८ जूनला चमेलीच्या उत्तर तीराला गेला व ११ जूनला वोडशियास जाऊन पोहोंचला (लेखांक २०२). आग्ऱ्याला तावडतोब जाऊन लागण्याचा भाऊचा

विचार होता; परंतु गंभीरनदीस पाणी फार आल्यामुळें दहा पंधरा दिवस त्याला मध्येंच कुचंबावें लागलें. जूनच्या शेवटीं त्यानें गंभीर नदी ओलांडिली व ६ जुलैला त्याची व शिंदे होळकरांची भेट झाली. ह्या भेटींत पुढें काय करावयाचें ह्याचा भाऊंनीं व सरदारांनीं विचार केला. त्याचें वर्णन देण्याच्यापूर्वी सुजाउद्दौला, अलीगोहर, मीरजाफरअली, नजीबखान, महमदखान बंगष, हाफीज रहिमतखान, वगैरे मंडळी काय करीत होती तें सांगितलें पाहिजे.

पडदुराहून निघतेवेळींच सुजाउद्दौल्याशीं स्नेह करण्यास भाऊनें गोविंदपंतास लिहिलें होतें. अवदालीचें व सुजाचें पिढीजाद वाकडें होतें. नजीबखानाचें व सुजाचेंहि फारसें चांगलें कधींच नव्हतें. १७५९ च्या नोव्हेंबरांत तो नजीबखानाला मिळाला. ह्याचें कारण असें होतें कीं मराठे आपल्यावर स्वारी करणार ही त्याला भीती होती. नाहीं तर नजीबखानाला तो मुळींच मिळाला नसता. दत्ताजी अंतर्वेदींतून यमुनेच्या बाजूला परत त्याबरोबर सुजा नजीबखानाला सोडून आपल्या प्रांतांत निघून आला. आपला प्रांत सुरक्षित राहील किंवा नाहीं एवढीच काय ती सुजाउद्दौल्याला काळजी होती. तिचें निवारण झाल्यावरोबर सुजानें नजीबाला सोडून दिलें. नजीबाला सोडून सुजाला दोन अडीच महिने झाले नाहींत तोंच गोविंदपंताच्या द्वारें मराठ्यांचें सुजाशीं बोलणें लागलें. ह्यावेळीं गोविंदपंताला सुजाशीं स्नेह दृढ व कायमचा करण्यास उत्तम संधी आली होती. नजीबखान व सुजाउद्दौला ह्यांच्यामध्यें गोविंदपंताचा प्रांत होता. तो जिंकून घेईतोंपर्यंत नजीबाशीं स्नेह दृढ करण्यास गोविंदपंताला पुष्कळ वेळ होता व स्पर्धा कोणाचीच नव्हती. तेवढ्या वेळांत गोड बोलून व जरब दाखवून सुजाला आपल्या बाजूला ओढून घेण्यास सदाशिवरावानें गोविंदपंताला हुकूम केला होता. तुमचा आमचा स्नेह पूर्वापारचा आहे, तुमच्या वडिलांवर आह्मीं उपकार केले आहेत. तुमच्यावरहि सरदारांची व रघुनाथरावाची ममता आहे, चकत्याची पातशाही कायम ठेवून तुह्माला वजीर करण्याची आमची इच्छा आहे, तुमच्यासारख्या मातबर माणसाखेरीज चकत्याच्या पातशाहीचा बंदोबस्त होऊन येणार नाहीं ( लेखांक १७३ व टीप २६१ ), नजीबखान मात्रागमनी आहे व तो तुह्मांला थापा देऊन अबदालीकडे नेऊन फसवील, पैशाकरितां अवदाली तुमची इज्जत घेईल व मग तुह्मी पस्ताव्यांत पडाल, चकत्याच्या पातशाहींत अवदालीचा हात पडणें इष्ट नाहीं, हिंदुस्थानच्या पातशाहीची व्यवस्था लावण्यास हिंदुस्थानांत तुह्माला व आह्मालाच तेवढा अधिकार व हक्क आहे, तुह्मी अवदालीला मिळाला तर आमचें जन्माचें वैर संपादाल, तुह्मी आमचेकडे आल्यास अवदालीला जिंकल्यावर तुह्माला बराच प्रांत व मुख्य वजिरी देऊं, न आल्यास तुमचें सर्वस्वी नुकसान होईल, वगैरे गरमनरम गोष्टी बोलून व वाटतील त्या योग्य सवलती देण्याचें कबूल करून सुजाला आपल्या बाजूला कसें तरी करून ओढून घ्यावें ह्मणून सदाशिवरावाचें आग्रहपूर्वक सांगणें होतें. सुजाच्या मनांत मराठ्यांना मिळावयाचें नसल्यास, निदान त्यानें अवदालीला तरी मिळूं नये एवढें तरी काम करावेंच करावें ह्मणून सदाशिरावाची गोविंदपंताला इशारत

होती. सुजाउद्दौल्याला मराठ्यांच्या बाजूला ओढण्यांत फारच फायदा होता. सुजाउद्दौल्याचा प्रांत रोहिल्यांच्या प्रांताला लागून असल्यामुळें सुजाच्या प्रांतांतून रोहिल्यांच्या प्रांतांत दंगा करण्यास मराठ्यांना चांगली सोय झाली असती; सुजाच्या प्रांतांतून अवदालीला दाणावैरणहि पोहोंचली नसती व सुजाकडून अवदालीला पैशाची मदतहि झाली नसती. शिवाय, सुजाउद्दौल्यासारखा मातब्बर मुसुलमान सरदार अवदालीला मिळाला नमता ह्मणजे अहमदखान बंगष, हाफीज रहिमतखान वगैरे लहान सहान संस्थानिकहि अवदालीला चिकटून राहिले नसते. सुजाउद्दौल्यासारखा मातब्बर मुसुलमान मराठ्यांच्या बाजूला आणिला ह्मणजे हिंदुस्थानांतील सर्व मुसुलमानांना मराठ्यांविषयीं विश्वास उत्पन्न होऊन त्यांचीहि मदत मराठ्यांना झाली असती. असे मोठमोठे फायदे सुजाच्या स्नेहापासून मराठ्यांना होण्यासारखे होते; व ह्याच कारणाकरितां गोविंदपंताला सदाशिवरावभाऊनें शेंकडों वेळां ह्यासंबधीं लिहिलें. गोविंदपंताचा सुजाशीं कित्येक वर्षांचा स्नेह होता. आपण वाटेल तें काम करून देऊं ह्मणून गोविंदपंतानें पुण्यांत भाऊला आश्वासनें दिलीं होतीं. तेव्हां हें सुजाचा स्नेह जुळवून आणण्याचें काम गोविंदपंत घडवून आणील अशी भाऊला आशा होती. सुजाशीं स्नेह करण्यापासून केवढा फायदा होईल हें अवदालीहि जाणून होता. सुजा आपल्याला मिळाला ह्मणजे बाकीचे सर्व मुसुलमान संस्थानिक आपल्या बाजूला अवश्य आलेच पाहिजेत ह्याची अवदालीला पूर्ण खात्री होती. परंतु सुजाच्या व अवदालीच्यामध्यें गोविंदपंताचा प्रांत व त्याची फौज असल्यामुळें सुजाशीं बोलणें करण्याचीच अवदालीला प्रथम अडचण आली. ही अडचण काढून टाकण्याकरितां १७६०च्या मेंत जहानखान व नजीबखान ह्यांना त्यानें गोविंदपंतावर पाठवून दिलें. गोविंदपंताची परीक्षा पहाण्याची हीच वेळ होती. ह्यावेळीं जयापजयाचीं सर्व सूत्रें गोविंदपंताच्या हातीं होतीं. नजीबखानाची व सुजाउद्दौल्याची भेट हरएक प्रयत्न करून गोविंदपंतानें होऊं द्यावयाची नव्हती. कोळजळेश्वराहून निघून गोविंदपंताचीं ठाणीं मारून सकुराबाद, इटावें वगैरे स्थळें घेत घेत सुजाउद्दौल्याला बिटूर वगैरे ठिकाणीं जाऊन भेटावें असा नजीबखानाचा बेत होता. हा बेत हाणून पाडण्याचें गोविंदपंताचें काम होतें; परंतु, दुःखाची गोष्ट कीं, हें काम गोविंदपंतानें मनापासून केलें नाहीं. इटावें प्रांतांतील सकुराबाद वगैरे ठिकाणचे गोविंदपंताचे ठाणेदार आपापलीं ठाणीं यवनांच्या देखत सोडून देऊन पळून येऊं लागले. स्वतः गोविंदपंत मागें मागेंच राहूं लागला. सुजाउद्दौल्याला पाठीशीं घालून नजीबाची व त्याची भेट प्राण गेला तरी होऊं द्यावयाची नाहीं हा जो निश्चयाचा व जोराचा प्रयत्न गोविंदपंतानें करावयाचा तो त्यानें केला नाहीं. इतकेंच नव्हे; तर वेळ होता त्या वेळीं सुजाशीं देखील त्यानें मळमळीतच बोलणें केलें. सुजा बोलून चालून मराठ्यांच्या स्नेहाविषयीं उदासीन होता. चार महिन्यांपूर्वी मराठे आपल्यावर स्वारी करणार होते ही गोष्ट त्यानें इतक्या थोड्या अवधींत विसरून जावी हें अशक्य होतें. अवदाली व नजीब ह्यांच्याकडून कोणी बोलायाला आलें नाहीं तोंपर्यंत मराठ्यांच्या बाजूचे आपण आहोंत असाच त्यानें बोल-

ण्याचा क्रम ठेविला; परंतु, गोविंदपंताच्या प्रांतांतून नजीबखान व जहानखान जेव्हां विठू-रास आले तेव्हां तो त्यांना भेटण्यास गंगा उतरून आला ( लेखांक १९९ ). त्यावेळी मराठ्यांचा वकील शामजी रंगनाथ सुजापाशीं होता. त्याच्या हस्तें सदाशिवरावाला त्यानें लिहून पाठविलें कीं, गोविंदपंतानें इटावे प्रांतात नजीबखानाला येऊं दिलें नसतें व त्या प्रांतांतील ठाणीं कायम राखून ठेविलीं असतीं म्हणजे अर्थात् नजीबखान इकडे आलाहि नसता व आपल्याला त्यांना भेटणेंहि जरूर न पडतें ( लेखांक २०५ ). ह्याच पत्रांत त्यानें आणखी असेंहि कळविलें कीं, जर गोविंदपंत इटावें प्रांतांत पुन्हा अंमल वसवील तर आपण फौजेसुद्धां त्याच्या साहाय्याला येऊं व नंतर गोविंदपंतासह जहानखान व नजीबखान यांजवर चाल करून जाऊं. परंतु गोविंदपंताच्या हातून हें पुन्हां अंमल वसविण्याचें काम त्या वेळीं झालें नाहीं. त्यानें सदाशिवरावभाऊला आपल्या मदतीला सैन्य पाठवून देण्याची विनंति केली; परंतु, गोविंदपंताच्या मदतीला सैन्य पाठविण्याची ह्यावेळीं भाऊची सोय नव्हती. तो व गोविंदपंताचा प्रांत यांजमध्ये दोन पूर आलेल्या नद्या वहात होत्या. शिवाय सरदारांना भेटून त्यांचा सल्ला घेतल्यावांचून सैन्याची फोडाफोड करावी हेंहि त्याला योग्य वाटेना. ह्याजवर गोविंदपंतानें असें लिहून पाठविलें कीं, आपण जवळ आल्याखेरीज सुजाउद्दौल्याला मराठ्यांना येऊन मिळण्याचें धैर्य होत नाहीं; तेव्हां आपण जलद आग्र्याजवळ येऊन पोहोंचावें; म्हणजे दहशत पडून जहानखान व नजीबखान इटाव्या प्रांतांतून परत अबदालीकडे जातील व सुजाउद्दौला एकटाच राहून आपल्याला येऊन सामील होईल. हें म्हणणें पसंत पडून सदाशिवराव बहुत जलदी करून गंभीर नदीच्या तीरीं येऊन पोहोंचला. तेथें त्याला अशी बातमी कळली कीं नजीबखानाच्या उपदेशावरून सुजाउद्दौला अबदालीकडे जाणार व मराठ्यांना येऊन मिळण्याचा त्याचा विचार नाहीं. तेव्हां त्यानें असा बेत केला कीं, सरदार, जाट व आपण आग्र्याला जाऊन यमुना उतरून नजीबखान व अबदाली ह्यांच्यामध्यें उतरावें व दोघांचेंहि निरनिराळ्या दिशेनें पारपत्य करावें. अबदाली ह्यावेळीं अनुपशहरीं होता, नजीबखान व सुजाउद्दौला विठुरास होते व गोविंदपंत त्या दोघांच्यामध्यें इटाव्याजवळ होता. अबदालीजवळ तीस हजार फौज, नजीबखान व सुजाउद्दौला ह्यांजवळ वीस हजार फौज व गोविंदपंताजवळ सरासरी आठ दहा हजार फौज होती. आग्र्याजवळ यमुना उतरून पश्चिमेकडून गोविंदपंताला मिळता घेऊन प्रथम नजीबखान, जहानखान व सुजाउद्दौला ह्यांचें पारपत्य करावें व नंतर अबदालीची खोड मोडावी असा भाऊचा बेत होता. ह्याकरितां त्यानें गोविंदपंताला आपल्या प्रांतांतील सर्व नावा यमुनेच्या दक्षिणतीरीं सुरक्षित आणून जमवून ठेवावयाला सांगितलें व आपण गंभीर नदी उतरून सरदारांना ६ जुलैला त्यांनीं सांगितलें त्या रस्त्यानें जाऊन मिळाला. सुजाउद्दौला नजीबखानाच्या उपदेशावरून अबदालीला खास जाऊन मिळणार अशी बातमी तेथे सदाशिवरावाला कळली. तेव्हां रामाजी अनंत व नारो शंकर ह्यांना पूर्वी सुजाउद्दौल्याकडे भाऊनें पाठविले होतें त्यांना त्यानें अर्ध्याच रस्त्यावरून परत बोलाविलें व यमुना

उतरून अंतर्वेदींत शिरण्याचा बेत तडीस नेण्याचा प्रयत्न केला. अबदालीवर चालून जाण्याचा हा पहिला बूट होता. अबदालीचें कांहीं सैन्य पूर्वेस अनुपशहराकडे होतें व कांहीं सैन्य नजीबखान व जहानखान यांच्याबरोबर सुजाउद्दौल्याकडे बिठुरास गेलें होतें; तेव्हां अबदाली व नजीबखान प्रत्येकीं भाऊपेक्षां बलानें कमी होता हें स्पष्ट होतें; तेव्हां ह्या वेळीं अकस्मात् मध्यें उतरून अबदालीचें पारपत्य करण्याचा जो भाऊनें बूट काढिला होता तो सर्वोत्कृष्ट होता ह्यांत संशय नाहीं. हा बूट सिद्धीस नेण्याकरितां सदाशिवरावानें तीन हजार जाट व मानाजी पायगुडे वगैरे सरकारी पथकें यमुनेच्या पलीकडे पाठवून सकुराबादेस मराठ्यांचें ठाणें बसविलें. इतक्यांत सुजाउद्दौला व नजीबखान हे अबदाली-कडे अनुपशहरास जात आहेत असें कळलें. खरें ह्मटलें असतां गोविंदपंतानें ह्या दोघांना मध्येंच वाटेंत अडवून ठेवावयाचें परंतु गोविंदपताच्या ह्यावेळच्या सर्व हालचाली हयग-यीच्या, चुकारपणाच्या व दिरंगाईच्या होत्या. त्यानें सुजाउद्दौल्याला सुरक्षितपणें जाऊन दिलें इतकेंच नव्हे, तर यमुनेच्या दक्षिणतीराला नावा जमवून ठेवावयाच्या त्याहि वेळेवर जमविल्या नाहींत. १२ जुलैला सरदार, जाट व सदाशिवरावभाऊ आग्र्याला आले त्या वेळीं यमुना उतरून पलीकडे अंतर्वेदींत जातां येणें अशक्य आहे अशी त्यांची खात्री झाली. सुजाउद्दौला व नजीबखान जे निसटून गेले ते थेट अबदालीला शिकंदऱ्यास जाऊन भेटले. गोविंदपंताच्या हयगयीमुळें व गैदीपणामुळें सदाशिवरावभाऊच्या हातची ही पहिली शिकार गेली. भाऊच्या मनांत स्वदेश पाठीशीं घालून अबदालीला यमुनेंत रेटून बुडवाव-याचें होतें; परंतु तें ह्यावेळीं साधलें नाहीं.

सुजाउद्दौल्याशीं राजकारण न करण्यांत व नजीबखानाला न अडविण्यांत गोविंदपंताचें वर्तन फारच गैरफायद्याचें झालें. गोविंदपंताचें इतर बाबीसंबंधानेंहि वर्तन असेंच तोट्याचें होतें. पंचवीस लाख रुपयांचा भरणा स्वारी हिंदुस्थानांत आली ह्मणजे तावड-तोब करण्याबद्दल गोविंदपंताला सदाशिवरावानें पडदुराहून लिहिलें होतें. परंतु, तेंहि काम त्यानें अद्यापर्यंत बजाविलें नाहीं. गारा पडून देशाची धूळधाण झाली; यवनांच्या येण्यामुळें रयत लावणीसंचणी करीत नाहीं; बुंदेलखंडांतील व अंतर्वेदींतील संस्थानिक बंडें करून पैसा देत नाहींत वगैरे सबबी सांगून सदाशिवरावाला वाटेस लावण्याचा त्याचा इरादा होता. खरें ह्मटलें असतां, बुंदेलखंडांत व गोविंदपंताच्या ताब्यांतील अंतर्वेदींतील कडाकुरा वगैरे प्रांतांत यवनांचा कांहींच दंगा नव्हता (लेखांक २३९). अद्यापपर्यंत संस्थानिकांनींहि फारशीं कोठें बंडें केलीं नव्हतीं. रतनसा, हिंदुपति ह्यांनीं बंडें केलीं त्यांना गोविंदपंता-चीच फूस होती ( लेखांक २१६ ). सारांश, गोविंदपंताच्या ह्या सबबींत कांहींच तथ्य नव्हतें. यदाकदाचित् दैवी मानवी आपत्तींनीं गोविंदपंताच्या प्रांतांचें उत्पन्न बुडालें होतें, अशी कल्पना केली तत्रापि मातब्बर मामलतदार ह्मणून गोविंदपंताची पत फार मोठी होती; त्यानें आजपर्यंत पैसाहि चांगला कमविला होता व हिंदुस्थानांत सरकारस्वारी आल्यास पैशाची होईल तितकी मदत करूं वगैरे आश्वासनें त्यानें पेशव्यांना १७५७ त दिलीं होतीं

त्याप्रमाणें ह्यावेळीं त्याच्या हातून कांहींच घडून येईना. सदाशिवरावभाऊनें त्याला चुचकारून, दरडावून, स्तुति करून, रागें भरून, टोंचून, खोंचून, नानाप्रकारें लिहिलें. परंतु काम न करण्याचें आपलें व्रत त्यानें कांहीं सोडलें नाहीं. पेशव्यांचें साहाय्य युक्तीनें, प्रयुक्तीनें, वहाण्यानें व शिताफीनें न करण्याचा उद्योग त्यानें साधेल तितका केला. बोलण्यांत व लिहिण्यांत मात्र गोड शब्द वापरण्याला कसूर केली नाहीं. पैसे लवकरच पाठवून देतों, सांगाल काम तें तावडतोब करितों, वगैरे मायन्यादाखल वाक्यांनीं सजविलेलीं पत्रें त्यानें सदाशिवरावभाऊला सतत लिहिलीं ( लेखांक २०६, २६४ ). त्यामुळें भाऊचें मन गोविंदपंताविषयीं नरम राहिलें. बाकीं गोविंदपंताचें हें कुचराईचें वर्तन सदाशिवरावभाऊच्या ध्यानांत आलें नाहीं असें नाहीं. ह्या गृहस्थाच्या हातून कामें नीट होऊन येत नाहींत हें भाऊ जाणून होता. त्याला त्यानें ह्याच वेळीं काढून टाकावयाचें; परंतु, तसें एकदम करणें दुरापास्त होतें. मल्हारराव होळकर व जनकोजी शिंदे ह्यांच्या खालोखाल वजनदार माणूस म्हणजे गोविंदपंतच होता. गोविंदपंताला काढिलें म्हणजे त्याच्या जागीं ह्या सरदारांपैकीं कोणी तरी त्याच्या प्रांतांत पाठविणें जरूर होतें. परंतु हे दोघे सरदार गेल्या लढाईंत अगदीं हैराण झाले होते. तेव्हां त्यांना आपल्या जवळच ठेवणें भाग होतें. शिवाय, ह्या सरदारांच्या सैन्याला घेतल्याशिवाय आपल्याला अबदालीशीं बरोबरीच्या नात्यानें सामना करतां येईल अशी भाऊची समजूत नव्हती. ह्याकरितां गोविंदपंताला एकाएकीं तोडणें भाऊला प्रशस्त वाटेना. तशांत गोविंदपंत अगदींच कांहीं उपयोगी पडणार नाहीं असें भाऊचें मत नव्हतें. यवनांच्या द्वेषानें, शिपाईगिरीच्या नैसर्गिक तडफेनें, लोकांच्या लज्जेनें व धन्यावरील स्वामिभक्तीनें प्रोत्साहित होऊन गोविंदपंत आपली बाजू सभाळील असा भाऊचा तर्क होता. थोडें कडक बोललें, थोडसा धाक दाखविला म्हणजे गोविंदपंत ताळ्यावर येईल व सांगितलेली कामगिरी बजावील असा भाऊचा अंदाज होता. ह्याच तर्कावर व अंदाजावर भिस्त ठेवून सदाशिवरावभाऊनें गोविंदपंताला अंतर्वेदींत राहू देऊन त्याच्याकडे आणीक कांहीं कामगिऱ्या सोपविल्या.

यमुनानदीला पाणी अतिशय आल्यामुळें व जड सामान नेण्यास नावा वेळेवर न मिळाल्यामुळें सदाशिवरावभाऊला यमुना उतरून अबदालीचें पारपत्य करण्याचें साधलें नाहीं. तेव्हां त्यानें शत्रूच्या पारपत्याची दुसरी योजना केली अबदाली, नजीबखान व सुजाउद्दौला हे ह्यावेळीं दिल्लीजवळ यमुनेच्या उत्तरतीराला शिकंदऱ्यावर जाऊन बसले होते. त्यांच्या पाठीला गंगानदी असून तोंडाला यमुना नदी होती. डाव्या बाजूला सकुराबादपर्यंत जाटांची, मराठ्यांची व गोविंदपंताची ठाणीं बसलीं होतीं. उजव्या बाजूला मात्र वेळ पडल्यास सरहिंदाकडे निसटून जाण्यास त्यांना मार्ग होता. सदाशिवरावाला यमुना उतरतां आली असती तर त्यानें अबदालीला पूर्वेकडून पश्चिमोत्तरेकडे रेटीत नेलें असतें. आतां सदाशिवरावाच्या मनांत अशी योजना आली कीं यमुनेच्या दक्षिणतीरानें मथुरा, दिल्ली, कुंजपुरा ह्या शहरांवरून जाऊन पश्चिमोत्तरेकडून यमुना उतरून अंतर्वेदींत यावें व

अबदालीला पूर्वेकडे कोळजळेश्वर, सकुराबाद वगैरे ठाण्यांवरून रेटीत गोविंदपंताच्या अंगावर नेऊन सोडावें. ह्या योजनेच्या साधनार्थ सदाशिवराव स्वतः मथुरेच्या दिशेनें चालता झाला व गोविंदपंतानें कोळजळेश्वर ऊर्फ अलीगडपर्यंत मराठ्यांचीं ठाणीं बसवावीं, अबदालीच्या भोंवतालचा मुलूख वैराण करावा, रोहिल्यांच्या मुलुखांत सोरमच्या घाटानें उतरण्याची अवाई घालावी व सुजाउद्दौल्याच्या प्रांतांत दंगे माजवावे असें त्यानें ठरविलें. सदाशिवराव १६ जुलैला मथुरेस आला ( लेखांक २१७ ), तेथून शिंदे, होळकर व बळवंतराव गणपत यांस त्यानें दिल्लीस पुढें रवाना केलें व स्वतः ३० जुलैला त्या शहरीं जाऊन पोहोंचला ( लेखांक २२८ ). दिल्लीशहर बळवंतराव मेहेंदळ्यानें अगोदरच सर केलें होतें ( लेखांक २२३ ). आंतील किल्ला घ्यावयाचा राहिला होता तो सदाशिवरावभाऊ आल्यावर १ आगष्टाला मराठ्यांच्या हातीं पडला. याकूबअलीखान ह्मणून अबदालीचा कोणी सरदार किल्ल्यांत होता, तो एकटाच इतर लोकांना टाकून नावेंतून पळून गेला ( लेखांक २४६ ). किल्ल्याच्या आंत अबदालीकडील लोक होते त्यांस कौल देऊन हत्यारांसुद्धां बाहेर काढून दिलें व पावसाळा सुरू झाला ह्मणून मराठे दिल्लीभोंवतीं सुमारें दोन महिने तळ देऊन राहिले. मराठ्यांनीं दिल्ली घेतली ही बातमी हिंदुस्थानांत लवकरच पसरली. दिल्ली शहर ह्मणजे चकत्यांच्या पातशाहीचें मुख्य ठिकाण. ते मराठ्यांनीं अबदालीच्या लोकांपासून हिसकावून घेतलें ह्या गोष्टीनें मराठ्यांचा दरारा पूर्वीं होता त्यापेक्षांहि आतां ज्यास्त वाढला व त्याच मानानें अबदालीचा कमी झाला. खुद्द अबदालीच्या सैन्यांत त्याच्या साथीदारांत फूटफाट होऊं लागली. हफीजरहिमतखान, अहमतखान बंगष, सादुल्लाखान, फैजुल्लाखान वगैरे रोहिल्यांचीं राजकारणे भाऊकडे पूर्वींपासूनच लागलीं होतीं. ह्या लोकांना मराठ्यांनीं दिल्ली घेतल्यापासून अबदालीच्या बलाचा व सामर्थ्याचा संशय येऊं लागला व ते त्याच्यापासून विभक्त होण्याची खटपट करूं लागले. कित्येक गिलचे व अफरीदी लोकहि अबदालीला सोडून निघाले ( लेखांक २३३ ) सुजाउद्दौल्यालाहि आपण अबदालीला मिळालों ह्या गोष्टीचा खेद वाटूं लागला. अबदालीनें सुजाउद्दौल्यावर मारेकरी घातले व त्याच्यापाशीं तो खर्चाकरितां पैसा मागूं लागला. नजीबखानानें सुजाउद्दौल्याला अबदालीकडे आणिला, त्यांतील मुख्य हेतु सुजाकडून पैसे काढावयाचे हा होता ( लेखांक २०४ ). सुजापाशीं अबदाली जेव्हां पैसा मागूं लागला तेव्हां त्या तरुण व उद्धट मनुष्याला नजीबखानाच्या कुंटणपणाचें व अबदालीच्या मतलबाचें इंगित कळलें ( लेखांक २४६ ). सुजाउद्दौल्याला तेव्हांपासून अबदालीच्या संगतीचा अगदीं वीट आला. आपली आई, सदाशिवरावभाऊ, मल्हारराव होळकर, वगैरे मंडळींनीं अबदालीला न मिळण्याविषयीं आपल्याला आग्रहपूर्वक सांगितलें असून आपण त्यांचें ऐकिलें नाहीं हा मूर्खपणा केला व नजीबखानासारख्या मात्रागमनी लुच्चाच्या नादीं लागून फसलों असें त्याचें त्यालाच वाटूं लागलें. ह्याकरितां तोहि सदाशिवरावाशीं सख्याचें बोलणें करूं लागला. ह्याप्रमाणें अबदालीला ह्यावेळीं त्याच्या सर्व साथीदारांनीं सोडून देण्याचा उद्योग आरंभिला.

अवदालीनें शहाजादा अलीगोहर व मीरजाफरअल्ली, पटण्याचा सुभेदार, ह्यांनाहि आपणाकडे मिळवून घेण्याचा प्रयत्न पूर्वीपासून चालविला होता. परंतु अल्लीगोहरानें त्यांजकडे जाण्याचें अनेक कारणांकरितां नाकारिलें ( लेखांक २२७ व २१९ ). सारांश, अवदालीची ह्यावेळीं अगदीं विपन्न स्थिति झाली होती. नजीबखानाच्या नादीं लागून व्यर्थ संकटांत मात्र पडलों असें अवदालीला वाटूं लागलें. हिंदुस्थानची पातशाही मिळवून देण्याच्या नजीबखानाच्या गप्पांना भुलून आपण आपला सर्वस्वीं नाश करून घेण्याच्या पंथाला लागलों असें अवदालीच्या प्रत्ययास आलें. खरें पाहिलें असतां अवदालीला हिंदुस्थानच्या कारस्थानांत ढवाढवळ करून लभ्यांश लुटीखेरीज कांहींच नव्हता. त्याला हिंदुस्थानांत कायमचें राहावयाचें नव्हतें. त्याचें हिताहित हिंदुस्थानांत यत्किंचित्‌हि नसून त्याचें सर्व कांहीं खयरखिंडाच्या पश्चिमेकडे गुंतलें होतें. हिंदुस्थानांत स्वारी करून, दोन चार महिने राहून, मिळेल ती लूट घेऊन विलायतेस निघून जाण्याचा त्याचा परिपाठ असे. ह्या खेपेला नजीबखानाच्या आग्रहाला मान देऊन तो हिंदुस्थानांत राहिला. परंतु त्या राहण्यापासून कांहीं फायदा नाहीं हें त्याला दिवसेंदिवस जास्त अनुभवास येऊं लागलें. त्याचे लोकहि हिंदुस्थानांत दहा महिने राहून कंटाळून गेले होते. कांहींनीं तर अफगाणिस्थानचा रस्ता सुद्धां सुधारला. कांहीं सदाशिवरावाच्या चिठ्या घेऊन गोविंदपंताकडे इटाव्याच्या बाजूला मराठ्यांना जाऊन मिळाले ( लेखांक २३३, २३७, २४२, २४४ ) येणेंप्रमाणें स्वकीय व परकीय अशा दोन्ही लोकांनीं त्याला सोडण्याचा क्रम जेव्हां आरंभिला तेव्हां मराठ्यांशीं स्नेह करून स्वदेशास आपणही सुरक्षित निघून जावें असा अवदालीनें निश्चय केला ( लेखांक २३६ व २४६ ). स्नेहाचें बोलणें करण्याकरितां भाऊकडे त्यानें वकीलहि पाठविले. परंतु त्यांजकडील राजकारणाचा आपल्या मनाप्रमाणें बनाव बसण्याला बराच अवधि लागेल हें पाहून भाऊनें त्याच्या वकिलांच्या बोलण्याकडे विशेषसें लक्ष दिलें नाहीं ( लेखांक २३७ ). अवदालीच्या बोलण्याकडे दुर्लक्ष्य करण्याजोगीच भाऊची ह्यावेळीं स्थिति होती. अवदालीच्यापेक्षां सर्वतोप्रकारें श्रेष्ठ असें सैन्य भाऊजवळ होतें. अवदालीनें कधीं पाहिला नाहीं असा तोफखाना भाऊच्याबरोबर होता. ज्या शिपायांना सहा महिन्यांपूर्वी अवदालीनें नाडिलें होतें त्यांच्याबद्दल यथेच्छ सूड उगविण्याची भाऊच्या मनांत सोत्कंठ ईर्षा होती. शहाजादा अलीगोहर याचाहि कल भाऊकडेच येण्याचा होता. तशांत अवदालीच्या सैन्यांत फुटफाट झाली होती व आणीक होण्याचा संभव होता ( लेखांक २२४ ). तेव्हां अशा वेळीं अवदालीला सोडावयाचा नाहीं असा भाऊनें निश्चय केला. अवदालीनें मनाप्रमाणें तह केल्यास मात्र त्याला देशीं सुखरूप जाऊं द्यावयाचें; नाहीं तर, अंतर्वेदींत कोंडून किंवा आंत तडफडून यमुना उतरून अलीकडे आल्यास बाहेरून गांठून त्याला तंबी द्यावयाची असा व्यूह भाऊनें रचिला ( लेखांक २५८ ). ह्या व्यूह तडीस नेण्यास लागणारीं साधनें भाऊजवळ जय्यत तयार होतीं.

भाऊ आगष्टपासून अक्टोबरपर्यंत दिल्लीस होता. हे तीन महिने पावसाळ्याचे असल्यामुळें सैन्याची हालचाल करणें बरेंच अडचणीचें होतें. तशांत दिल्लीस राहून भाऊला

म. ६. ३१९/२



बरींच कामें उरकावयाचीं होतीं. अबदाली, नजीबखान, सुजाउद्दौला ह्यांच्याशीं तहाचीं बोलणीं भाऊनें येथूनच चालविलीं; अबदालीच्या सैन्यांत फुटफाट करण्याचें राजकारण येथूनच रचिलें. व दिल्लीच्या पातशाहीची व्यवस्थाहि येथेंच राहून केली. अलमगीर पातशाहाचें सूत्र आंतून अबदालीकडे आहे असें समजून आल्यावरून १७५९ च्या नोव्हेंबरांत गाजुद्दिन वजिरानें त्याला ठार मारिलें व त्याच्या जागीं कामबक्षाचा पुत्र शहाजहान यास पातशाहा केलें. ह्या शहाजहानाचें राज्य, ह्मणींतल्या प्रमाणें, औट घटकेचेंच होतें. १७६० च्या जानेवारींत अबदालीनें दिल्ली घेतली त्यावेळीं ह्या राजर्षीचें राज्य संपलें. त्या वेळेपासून सदाशिवरावानें दिल्ली आगस्टांत घेतली, तोंपर्यंत तख्तावर कोणी पातशाहा नव्हता. अलमगिराचा पुत्र अलीगोहर हा भिऊन १७५९ च्या नोव्हेंबरांत जो पाटण्यास पळून गेला तो इकडे पुन्हां परत येईना. अबदालीनें व सदाशिवरावभाऊनें दोघांनींहि त्याला बोलावणीं पाठविलीं; परंतु, कोणाकडेहि येण्याची आपली खुषी नाहीं असें त्यानें साफ कळविलें. पुढें भाऊनें जेव्हां दिल्ली घेतली त्यावेळीं त्यानें मराठ्यांच्या बाजूला येण्याचा कल दाखविला. मराठ्यांचा वकील शिऊभट त्यावेळीं अलीगोहरापाशीं होता ( लेखांक २२७ ). ह्या वकिलाच्या उपदेशानें अलीगोहर मराठ्यांच्या बाजूला आला; परंतु, लढाईचा कायमचा निकाल झाल्यावांचून आपली दिल्लीस येण्याची खुषी नाहीं असें त्यानें कळविलें ( लेखांक २१९ ), व आपला पुत्र जवानबख्त यास भाऊकडे पाठवून दिलें. ह्या जवानबख्ताला सदाशिवरावभाऊनें नाना पुरंधरे व आप्पाजी जाधवराव यांच्या हस्तें १० अक्टोबर १७६० रोजीं वलीहद केलें व अलीगोहराला शहाअलम हें नांव देऊन त्याच्या नांवचे गजशिक्के चालविले ( लेखांक २५८ व २५९ ). दिल्लीच्या तमाम लोकांनीं नजरा केल्या व सर्वत्र खुशहाली झाली. सुजाउद्दौला व नजीबखान ह्यांच्या मनांत अबदालीला पातशाहा करावयाचें होतें व वजीरी, बक्षीगिरी आपसांत वांटून घ्यावयाची होती ( लेखांक २३६ ). बाबरशहा चकते यानें स्थापिलेल्या तैमुरियाच्या पातशाहीविषयीं ह्या दोघांच्या मनांत यत्किंचित्‌हि भक्ति नव्हती. नजीबखान व सुजाउद्दौला दिल्लीच्या पातशाहीच्या संरक्षणार्थ भांडत नव्हते. मराठ्यांशीं लढण्यांत त्यांचा मुख्य हेतु आपापल्या जहागिरी जतन कराव्या व पातशाहींत हवा तसा धांगडधिंगा घालता यावा, हा होता. अबदालीच्या हातांत दिल्लीशहर दहा महिने होतें; परंतु, त्यानें दिल्लीच्या तख्तावर चकत्यांच्या कुळांतील कोणी पातशाहा मुद्दाम बसविला नाहीं. स्वतःला पातशाही मिळाली तर पहावें ह्या हेतूनें अबदालीनें तख्त रिकामें ठेविलें. परंतु, अबदालीचा हा हेतु अलीगोहराला पातशाहा करून सदाशिवरावानें समूळ विध्वसून टाकिला. सुजाउद्दौल्याची वजिरी मिळविण्याची व नजीबखानाची बक्षीगिरी पटकावण्याची आशाहि सदाशिवरावाच्या ह्या कृत्यानें विफल झाली. आगष्टपासून अक्टोबरपर्यंत सुजाउद्दौला मराठ्यांशीं सलूख करण्याच्या मिळमिळीत गोष्टी बोलत होता; व अबदालीला सोडून जाण्याचाहि आस्ते आस्ते त्याचा विचार होत चालला होता; परंतु, तो विचार त्यानें आतां सोडून दिला आणि अबदालीची व नजीबखानाची

फांस बळकट धरिली. १० अक्टोबर १७६० पासून अबदाली, नजीबखान व सुजा- उद्दौला मराठ्यांच्या विरुद्ध एकसूत्रानें चालूं लागले. दिल्लीच्या तख्तावर मराठ्यां ज्या मनांत विश्वासरावाला बसवावयाचें आहे वगैरे ज्या बाजारगप्पा त्यावेळीं चोहोंकडे पसरल्या होत्या त्याहि अलीगोहराला पातशाहा करून सदाशिवरावानें जागच्या जागीं बसवून त्याकिल्या चकत्याच्या कुळांतील कोणी तरी औरस पुरुष दिल्लीच्या तख्तावर बसवावयाचा व त्याची वजिरी आपण स्वत: करावयाची असा भाऊचा त्यावेळी बेत होता. सातारच्या छत्रप- तींची पेशवाई करून पेशव्यांनीं महाराष्ट्रांतील सर्व सत्ता जशी आपल्या हातांत घेतली तशीच दिल्लीच्या पातशाहाची वजिरी करून सर्व हिंदुस्थानची सत्ता कायदेशीर रीतीनें विशेष बोभाट न होतां व लोकांचीं मनें न दुखवितां मिळवावयाची असा सदाशिवरा- वाचा विचार होता हा हेतु यवनांच्या ध्यानांत आल्याबरोबर ते आपलें वैरें तंटे विसरले व एकजुटीनें मराठ्यांशीं सामना करण्यास सिद्ध आले.

इकडे सदाशिवरावभाऊनेंहि ज्या ज्या योजना करावयाच्या त्या त्या केल्या. यमु- नेच्या दक्षिणतीराला कुंजपुऱ्यास अबदालीचा समदखान ह्मणून कोणी सरदार सुमारें वर्ष- भर पांच सहा हजार सैन्यासह ठाणें देऊन बसला होता. पश्चिमोत्तरेकडून यमुना उतरून अंतर्वेदींत अबदालीच्या अंगावर जावयाला किंवा त्या बाजूनें अबदालीला बाहेर काढाव- याला स्थल ह्मटलें ह्मणजे हें कुंजपूरच होतें. हें स्थल घेऊन सारंगपुरास यमुना उतरून अंतर्वेदींत शिरण्यास मार्ग होता ( लेखांक २५८ ). तेव्हां कुंजपुऱ्याकडे सदाशिवरावानें बळवंतराव मेहेंदळ्यास व सरदारांस पाठवून दिलें व स्वत: आपण त्यांच्या पाठीमागून त्याच रोखानें चालला. अबदालीला उजवी स्वत: घालण्याचा विचार करून डावीकडून त्याला शह देण्यास भाऊनें गोविंदपंतास हुकूम केला. भाऊनें गोविंदपंताला कामगिरी मोठी महत्वाची सांगितली होती. अबदाली, नजीबखान, सुजाउद्दौला शिकंदराबादवर गोळा झाले होते. भाऊ दिल्लीवरून यमुनेच्या दक्षिणतीरानें जसजसा उत्तरेस जाऊं लागला तसतसा अबदालीहि यमुनेच्या उत्तर तीरानें कुंजपुऱ्याकडे रोख करून चालला. कुंजपुऱ्यास जाऊन आपलें तोंड धरून ठेवावयाचा भाऊचा बेत आहे हें अबदाली समजला. तेव्हां अबदा- लीच्या उत्तरेकडच्या गतीला प्रतिरोध करावा ह्मणून गोविंदपंताला भाऊनें खालील कामगिऱ्या पूर्वीप्रमाणें पुन्हां सांगितल्या. गोविंदपंतानें सोरमच्या घाटीं गंगा उतरून रोहिलखंडांत जाण्याची अवाई घालावी; कोळजळेश्वराच्या बाजूनें येऊन अबदालीच्या पाठीमागें पधवद द्यावा; अंतर्वेद, रोहिलखंड व सुजाउद्दौल्याचा प्रांत ह्या प्रदेशांतील गावें, खेडीं, शहरें, लुटावीं, जाळावीं व पोळून फस्त करावीं; व तेथील जमीनदार व गडकरी ह्यांच्याकडून दंगा करवावा; ह्या इतक्या कामगिऱ्या अवश्य [illegible] भाऊचा हुकूम [illegible] सर्वांत [illegible] गोविंदपंतानें कराव्या अशी भाऊची अबदालीच्या पाठीमागचा मुलूख वैराण करून, अबदालीला रसद पोहोंचूं देऊं नये अशी भाऊची साग्रह व सोत्कट गोविंदपंताला विनवणी होती. किरकोळ गढ्या घेत बसून व्यर्थ काल हरण करूं नये अशीहि सूचना भाऊनें पंताला

केली. रसद बंद होऊन अंतर्वेदींत अब्दालीला फाके पडूं लागले ह्मणजे तो तडफडून यमु-नेच्या अलीकडे येईल किंवा गोविंदपंताच्या अंगावर उलटून जाईल अशी भाऊची अट-कळ होती. भाऊ कुंजपुऱ्याकडे गेल्यामुळें फारकरून तो कुंजपुऱ्याच्या दिशेनेंच कुच करील असा भाऊचा तर्क होता. तो कुंजपुऱ्याकडे आला तर गोविंदपंतानें त्याच्या पाठोपाठ येऊन मागील व भोंवतालचा मुलूख वैराण करावा व त्याची रसद मारावी अशी भाऊची इच्छा होती. तो गोविंदपंतावर उलटून धांवून गेला तर सदाशिवराव यमुना उतरून त्याच्या पाठीवर चालून जाण्यास तयार होता. येणेंप्रमाणें अबदालीला दोहींकडून पतंग करून पिसाळवून सोडावयाचा भाऊचा इरादा होता व ह्या कामीं गोविंदपंताने नेटानें व उत्साहानें मेहनत करावी अशी भाऊची विनवणी होती. त्यावेळीं मोहिमेची सर्व गुरु-किल्ली गोविंदपंताच्या हातांत होती. रान उठवून व अडवून शिकार सदाशिवरावाच्या हातांत बिनचूक आणून सोडण्याचें काम गोविंदपंताचें होतें. सारांश, ह्या मोहिमेंत जया-पजय येणें सर्वथा गोविंदपंताच्या हुशारीवर व चलाखीवर अवलंबून होतें.

भाऊ दिल्लीहून निघाले ते १५ अक्टोबराच्या सुमाराला कुंजपुऱ्यास आले. हें स्थल फार मजबूत असून नाकेबंदीचें होतें. आंत समतखान ह्मणून अब्दालीचा सरदार पांच सात हजार फौजेसुद्धां होता. कुंजपुऱ्याची गढी सोडून डावाडोल होऊन मराठ्यांच्या सैन्याला दमवावयाचा समतखानाचा विचार होता. मराठ्यांच्या सैन्याला अंगावर घेऊन आपण पळत सुटावें व अब्दालीनें पाठीमागून येऊन मराठ्यांना कचाटींत धरावें अशी समत-खानाची योजना होती ( लेखांक २५८ ). परंतु, बळवंतराव मेहेंदळे व जनकोजी शिंदे यांनीं त्वरा करून गढीभोंवती वेढा घातल्यामुळें व समतखानाची दोन हजार फौज बाहेर पळून जात होती ती वाटेंतच लुटल्यामुळें ( लेखांक २५५ ) ही समतखानाची योजना जागच्या जागींच जिरली. सदाशिवराव आल्यावर मराठयांनी कुंजपुरा १७ अक्टोबराला घेतला व आंतील पांच सहा हजार प्यादा लुटला ( टीप ३१६ ). कुंजपुरा घेतल्यावर भाऊच्या मनांत पूर्वी ठरल्याप्रमाणें सारगपूरच्या घाटानें यमुना उतरून अब-दालीवर जावयाचें होतें. त्याप्रमाणें यमुना उतरण्याकरितां सदाशिवरावानें कुंज-पुऱ्याच्या उत्तरेस कुच करण्याचा घाट घातला; तों अशी बातमी आली कीं अबदाली बागपतानजवळ यमुना उतरून अलीकडे दक्षिणतीराला आला. ह्या वेळच्या अबदालीच्या व सदाशिवरावाच्या हालचाली वाचकांच्या स्पष्ट ध्यानांत याव्या ह्मणून दिल्लीपासून कुंज-पुऱ्यापर्यंतच्या कांहीं गांवांचीं अंतरें देणें जरूर आहे. दिल्लीपासून उत्तरेस यमुनेच्या तीरीं बागपत २० मैल, सोनपत २६ मैल, गणोर ३६ मैल, संभाळकिया ४५ मैल, पानिपत ५४ मैल व कुंजपुरा ७८ मैल आहे. अब्दाली बागपतास अक्टोबरच्या २५ तारखेला उतरला व २८ अक्टोबरास गणोरावरून संभाळकियास येऊन पानिपताच्या रोखानें तीन कोस पुढें आला. ह्याच सुमाराला भाऊ कुंजपुऱ्याहून निघून पानिपतास अबदालीच्या समोर येऊन पोहोंचला ( लेखांक २६१ ). भाऊनें कुंजपुरा घेऊन समतखानाला जमीन-

दोस्त केल्यामुळें व तेथून अवदालीचें तोंड दाबिल्यामुळें अंतर्वेदींतून कोठून तरी बाहेर पडणें अवदालीला जरूर होतें. कुंजपुऱ्याच्या बाजूचे सर्व घाट मराठयांनीं धरल्याकारणानें तिकडच्या बाजूला कुच करण्याची अवदालीची सोय नव्हती. दिल्लीस नारो शंकर व सबळगडास सुरजमल जाट असल्यामुळें आणि शिकोराबाद, इटावें, आग्रा वगैरे यमुनेच्या अलीकडील व पलीकडील ठाणीं मराठ्यांच्या ताब्यांत असल्याकारणानें दिल्लीच्या दक्षिणेसहि अवदालीचा पाड लागण्यासारखा नव्हता. दिल्लीपासून कुंजपुऱ्यापर्यंतचेहि यमुनेचे सर्व घाट मराठ्यांच्या हातांत होते. त्यांतल्या त्यांत पानिपतापर्यंत भाऊचा दबाव विशेष होता. पानिपताच्या अलीकडे संभाळकियापासून बागपताच्या पलीकडे कांहीं कोसपर्यंत मराठयांची लहान लहान ठाणीं होतीं. त्यांपैकीं एखादें फोडल्याशिवाय यमुनेच्या अलीकडे येणें अवदालीला शक्य नव्हतें. भाऊच्या भीतीमुळें अंतर्वेदींत राहणें तर त्याला अत्यंत धोक्याचें होतें. तेव्हां बागपताजवळ मोठया कष्टानें अवदाली यमुना उतरला व मोठया सावधगिरीनें पानिपताचा त्यानें रोख धरिला. ह्यावेळीं अवदाली सदाशिवरावाच्या कचाटींत चांगला सांपडला होता. तोंडावर सदाशिवरावभाऊची सर्वप्रकारें सज्ज झालेली फौज पानिपतास उभी होती व पाठीमागें दिल्लीस नारो शंकर सहा सात हजार लोकांनिशी अवदालीला पायबंद देण्यास तयार होता. यमुनेच्या उजव्या तीराला अवदालीला मराठयांनीं ह्याप्रमाणें अगदीं बतंग करून टाकिलें होतें. एक बाजू मात्र अवदालीला मोकळी राहिली होती. ती बाजू यमुनेच्या पलीकडील नजीबखानाच्या ताब्यांतील अंतर्वेद व रोहिलखंड हे प्रांत होत. ह्या प्रांतांतून अवदालीला पायबंद देण्याचें काम सदाशिवरावभाऊनें गोविंदपंताकडे सोपविलें होतें. त्यानें तें काम कसें बजाविलें तें पाहूं.

अवदाली बागपतास यमुना उतरेतोंपर्यंत ह्मणजे २५ अक्टोबरपर्यंत यवनांचें सैन्य दिल्लीसमोर शिकंदऱ्यापासून मिरतापर्यंत पसरलें होतें. त्यांना दाणागल्ला वगैरे रसद भोंवतालच्या प्रांतांतून व रोहिलखंडांतून मिळत असे ती लागभाग पाहून मारण्याचें काम गोविंदपंताचें होतें. तसेंच नजीबखान व सुजाउद्दौला ह्यांच्या प्रांतांतील ठाणीं घेण्याचें व तेथें दंगा माजवून ह्या दोघां यवनसरदारांचीं चित्तें व्यग्र करण्याचें काम गोविंदपंतावर सोपविलेलें होतें. जाटाचे लोक सकुराबादेस बसले होते त्यांना मदतीस घेऊन हीं कामें जरूर करावीं, ह्मणजे फार उपयोग आहे ह्मणून सदाशिवराव गोविंदपंताला एकसारिखें लिहीत होता ( लेखांक २४४ ). ह्यावेळीं अवदालीची रसद बंद करणें हें अत्यंत महत्त्वाचें व जरूरीचें काम होतें. गोविंदपंतानें हें काम टाकून निराळेंच एक काम करण्याचा डौल घातला. तालगांव, तिरव, कनोज, खेरनगर, भुजोजंग, खतलाख, मोहना, बरगांव, गुलोली वगैरे विठुराकडील लहान सहान गढ्या घेत बसून अंतर्वेदींतील यवनांच्या सैन्याला शह देण्याच्या जरूरीच्या कामीं गोविंदपंतानें पूर्ण हयगय केली ( लेखांक २५८ ). किरकोळ गढ्या घेत बसून महिन्यांचे महिने व्यर्थ दवडण्यांत व मुख्य कामाला अडथळा आणण्यांत मतलब नाहीं; ताबडतोब भाऊसाहेबांच्या मदतीला जाऊन अवदालीला शह

देण्यांतच खरा पराक्रम आहे; वगैरे सूचना गोविंदपंताला कित्येकांनीं केल्या. परंतु, किरकोळ गढ्या घेतल्याशिवाय अव्वल काम हातीं घेतां येत नाहीं ह्या सबबीवर अबदालीला शह देण्याचें गोविंदपंतानें नाकारिलें ( लेखांक २५० ). त्यामुळें अबदालीच्या सैन्यांत दाणवैरणीची टंचाई मुळींच भासली नाहीं. अबदालीचा मार्ग भाऊनें कुंजपुऱ्यास अडविल्यामुळें अबदाली अंतर्वेदींत कोंडला गेला होता. फक्त रसद बंद करून त्याला घाबरा करण्याचें तेवढें राहिलें होतें. एवढें काम जरूर करावें ह्मणून गोविंदपंताला सदाशिवरावाचा सक्त हुकूम होता. ह्या हुकुमाप्रमाणें गोविंदपंतानें अबदालीच्या पिछाडीस दंगा केला असता ह्मणजे अबदाली समूळ बुडाला असता. अबदाली २३ अक्टोबरपासून २५ अक्टोबरपर्यंत बागपताजवळ यमुना उतरत होता, त्यावेळीं त्याच्या पाठीवर जर पंतानें शह दिला असता तर मोठें काम होऊन येतें. परंतु, अबदालीला गोविंदपंताच्या हातून यत्किंचित्‌हि उपसर्ग लागेना ( लेखांक २६० ). अबदाली यमुना उतरून बागपत गणोरावरून संभाळकियास आला तेव्हां भाऊनें गोविंदपंताला अबदालीची रसद मारण्यास पुन्हां हुकूम केला. " तुह्मीं जलदीनें यमुनेपलीकडून येऊन बागपतेपर्यंत धुमामा चालवून अबदालीस रसद न पोहोंचे, फौजेस शह पडे, ऐसें करावें. गिलच्यांचा पेच तिकडे नाहीं. यास्तव लांब लांब मजलींनीं येणें. या कामास दिरंग न लावणें. हें काम मागेंच करावें ऐसें होतें. याउपरि तशील न लावणें. गडमुक्तेश्वर, शामली वगैरे नजीबखानाचे प्रांत जाळावे. अबदालीस मागें रसद बंद होऊन मुलकाचा बोभाट होय असें जरूर करणें. वारंवार लिहिलें जाऊन अजून तुह्मी उमरगडींच आहां हें अपूर्व आहे! आतांहि लिहिलेप्रमाणें न झालें तरी मर्दुमीचें काम होत नाहींसेंच झालें! ईरे धरून तडकून येऊन काम करणें. " ह्याप्रमाणें सदाशिवरावानें गोविंदपंताला नोव्हेंबराच्या पहिल्या तारखेस लिहिलें ( लेखांक २६१ ). त्यावेळीं भाऊच्या व अबदालीच्या सैन्यांमध्यें अंतर दोन चार कोसांचें होतें. मराठ्यांचें भय अबदालीला इतकें पडलें होतें कीं, तो फार बाताबेतानें हालचाल करीत होता. चाळीस कोस पन्नास कोस धांवून जाण्याची हिंमत अबदालीच्या अंगीं राहिली नव्हती, यमुनेच्या अलीकडे आल्याकारणानें त्यावेळीं अबदालीच्या लष्करांत महागाई फार झाली ( टीप ३२१ ). ती गोविंदपंताच्या पराक्रमानें झाली नसून यमुनेच्या पाण्यामुळें झाली होती. सारांश, अबदालीची हलाकी त्यावेळीं फार झाली होती. त्याच सुमाराला अबदालीचें व मराठ्यांचें एक युद्ध झालें. त्यांत मराठी फौज विजयी झाली ( लेखांक २६२ ). यवनांचें पारिपत्य करण्याचा हुरूप त्यावेळीं सदाशिवरावाच्या व मराठी सैन्याच्या अंगांत अतोनात भरला होता व तो दोन्ही सैन्यांची एकंदर परिस्थिति पाहतां सर्वथैव रास्त होता. अबदालीला आपण खास गिळणार अशी सदाशिवरावभाऊला पूर्ण खात्री वाटत होती ( लेखांक २६१ ). ही खात्री खरी ठरण्यास एक गोष्ट मात्र होणें जरूर होतें. ती गोष्ट ही कीं, गोविंदपंतानें अंतर्वेदीच्या व रोहिलखंडाच्या बाजूनें अबदालीची रसद बंद केली पाहिजे होती. ह्यासंबंधानें सदाशिवरावानें गोविंदपंताला

नोव्हेंबरच्या ४ थ्या तारखेला येणेंप्रमाणें लिहिलें:— " कार्यावरी आज्ञेप्रमाणें जातों, ऐशा गोष्टी रिकाम्या ( मात्र ) लिहितां. निदर्शनास यांतील एकहि येत नाहीं. यामुळें तुमच्या कर्तृत्वाची तारीफ वाटते ते कोठपर्यंत लिहावी ! लिहितां लिहितां भागलों ! हें तुमच्या कर्तृत्वास उत्तम नाहीं. अबदालीची आमची गांठ पाणिपताजवळ पडली आहे. तोफखान्याच्या आराबा रचून लढाई करावयास तयारी केली आहे. त्याच्यानें इकडे तिकडें जावत नाहीं व कांहीं करवत नाहीं. पावणे दोन कोंस दीड कोंसाची तफावत आहे. पेंढारी व लुगारे राऊत वगैरे नित्य उंटें, घोडीं, तट्टें, बैल आघाडीपिछाडीवरी जाऊन गोटापासून घेऊन येतात. त्यांचे कोणी पाठीवरहि निघत नाहीं. याप्रमाणें आहे. तुह्मीं पत्र पावतांच अंतर्वेदींतून पटपटगंजावरी यांच्या पिछाडीस येऊन पोहोंचणें. सावकास याल तरी ठीक नाहीं. लांवलांव मजलीनें येणें. रसद त्याजकडे जावयाची आडकेल ते लुटणें, दबाव पाडणें, ह्मणजे चहूंकडून घाबरा होईल. हेंहि युक्त तुह्मांस बहुत वेळ लिहिली. परंतु तुह्मीं येत नाहीं. सारीच डोळेझांक करतां. परंतु असा समय चाकरी करून दाखवावयाचा पुढें कदापि येणें नाहीं. या हंगामीं जो आपले शक्तीपेक्षां चाकरी अधीक करून दाखवील त्याचें रूप आहे. हें दूरदेशीं ध्यानांत आणून सर्व गोष्टी लिहिल्याप्रमाणें करणें. ऐवज पाठवणें. तुह्मीं येणें. लहानसहान गढयामुळें गुंतोन मोठया कामाच्या उपयोगांतून जाल असें करून न घेणें. तुह्मीं दरमजल बागपतचे सुमारें अंतर्वेदींतून येऊन रसद मारणें. नजीबखानाचा मुलूख जाळून लुटून फस्त करणें. दोन चार हजार चांगली निवडक फौज लांब लांब मजली करून लिहिलेप्रमाणें रोहिलियांच्या मुलखांत दंगा करणें व रसद बंद करणें. कांहींच न झालें तरी परिछिन्न तुह्मांवर शब्द येईल. वारंवार लिहावयाची, आपले अबरूची ईर्षे धरून काम बजावून आणणें. या दिवसांत तुह्मीं येऊन लिहिलेप्रमाणें पावला असतां तर किती काम होतें. अजून तरी करून दाखवणें. गंगापार जमीदारांकडून दंगा करवणें. गोपाळराव गणेश फौजसुद्धां गंगापार उतरून जमीदार सामील करून सुजादौला, रोहिले यांचा अंमल उठवावा. याप्रमाणें करणें. मसलत मोठी. या दिवसांत ज्यास जे लिहावें त्याप्रमाणें होऊन न येई मग तुह्मी आमचे कामाचे काय ? याउपरि आज्ञेची व चाकरी करून दाखयावयाची सीमा झाली ! " ह्याप्रमाणें टोंचून व खोंचून लिहून गोविंदपताची कानउघाडणी सदाशिवरावानें केली ( लेखांक २६४ ). नारो शंकरानें नोव्हेंबरच्या ३ ऱ्या तारखेस अशाच अर्थाचें एक पत्र गोविंदपंतास लिहिलें ( लेखांक २६३ ). तर्रीहि गोविंदपतानें आपला दिरंगाईचा व सुस्तपणाचा क्रम सोडिला नाहीं. अबदालीचें पूर्णपणें पारिपत्य करण्याची ही तर ऐन वेळ होती. सदाशिवरावानें मुद्दाम उत्तरेकडे कुंजपुऱ्यास जाऊन अबदालीला दिल्ली येथील सैन्याच्या व आपल्या पानिपतयेथील सैन्याच्या मध्यें धरिलें होतें. अबदालीला समूळ चीत करण्यास २५ अक्टोबरपासून १५ नोव्हेंबरपर्यंत उत्तम संधि होती. ह्या अवधींत अबदालीच्या लष्करांत अत्यंत महागता होती; मराठ्यांनीं २ नोव्हेंबराला अबदालीचा सामान्यसा पाडाव केला होता व

अवदालीहि मराठ्यांचें अकटोविकट सैन्य पाहून भयभीत झाला होता. त्यासंबंधानें ५ नोव्हेंबराला कोल्हापूर येथील जोशीराव यांचा पूर्वज कृष्ण जोशी संगमेश्वरकर लिहितो:– " श्रीमंतांनीं चोहोंकडे तोफखाना पसरला आहे. यवनास थोर भय झालें आहे. पुढें येववत नाहीं. आमचे सैनिक यवनाचे समक्ष उभे राहून, नित्य शेंपन्नास यवन मारून उंट घोडीं आणितात. दोन हत्ती पेंढारी यांणीं काल आणिले. यवनाच्या सैन्यांत महर्गता झाली आहे. आमच्या सैन्यांत सवंगाई आहे. आणखी दोन चार दिवसांत यवन चालोन तोफांवरी येईल तरी क्षणमात्र बुडेल. न ये तर आमचे लोक जाऊन युद्ध करणार. सर्व सैन्यास उत्साह आहे कीं अवदाली व नजीबखान व सुजाउद्दौला आठा चौ दिवसांत क्षयास जातील. अवदाली शहानशाहा म्हणवीत होता. त्यानें युद्धें बहुत केलीं आहेत. परंतु तो दो कोसांवरी येऊन, आठ दिवस वसोन, कांहीं पराक्रम होत नाहीं. यामुळें आमची फौज बहुत शेर आहे. अवदालीनें स्वदेशास जावें तरी मार्ग नाहीं. युद्ध करावें तरी परिणाम नाहीं. उगेंच वसावें तरी भक्षावयास नाहीं. याप्रमाणें विचारांत पडला आहे ( लेखांक २६५ ). " ह्याप्रमाणें अवदालीची दुःस्थिति होती. तिचा पूर्णपणें नफा घेण्याचा सदाशिवरावाचा विचार होता. परंतु, एका गोविंदपंताच्या कुचराईमुळें सर्व कांहीं विघडण्याच्या रंगास येण्याचीं चिन्हें दिसत होतीं. गोविंदपंताच्या कुचराईसंबंधानें नारो शकंर ७ नोव्हेंबराला लिहितो:—"दाजीबा ! आणीक सर्व कामें एकीकडे ठेवून, रात्रीचा दिवस करून दाखवावयाचा प्रसंग असतां, तुम्ही यावयास ढील करतां, यावरून काय म्हणावें? पत्र पावतांच जेथें असाल तेथून कुच करून दुमजला येऊन पोहोंचणें. तुम्हांपाशीं दहा हजार फौज असोन पंचवीस लाख रुपये खात असतां, खावंदास कामाची निकड असतां, तुम्ही लटके बहाणे करून मुलखांत रहावें हे गोष्टी तुम्हांस योग्य नाहीं ! खावंद वारंवार लिहितात, तुम्ही गढीकोटांचे बहाणे लिहितां, हा सेवकलोकांचा धर्म नव्हे ( लेखांक २४३)." भाऊसाहेबानें अवदालीचें पारिपत्य करण्याची आपल्याकडून होईल तितकी उत्तम तयारी केली होती. इब्राईमखानाच्या तोफखान्याचा मजबूत आधार असल्यामुळें भाऊनें स्वतः मोगलाई पद्धतीनें लढण्याचा विचार केला व गोविंदपंतास गनीमी तऱ्हेनें शत्रूस भंडावून सोडण्यास सांगितलें ( लेखांक २६०,२४४,टीप ३१७ ). गोविंदपंताच्या गनीमी लढाईची वाट भाऊनें बरेच दिवस पाहिली व शेवटीं १५ नोव्हेंबराला येणेंप्रमाणें गोविंदपंतास लिहिलें:— "लिहिलेप्रमाणें एकहि काम होऊन न आलें. फार दिवस खावंदानें लहानाचें थोर केलें, वाढविलें, त्याचें सार्थक केलें ! अजून तरी सावध होऊन लिहिलेप्रमाणें येऊन पोहोंचणें" (लेखांक २६८ ). परंतु गोविंदपंत वेळेवर कसचा येऊन पोहोंचतो ! त्याच्या मनांत भाऊचा पक्का अंत बघावयाचा होता व त्याशिवाय त्याला दुसरें गत्यंतर नव्हतें. आजपर्यंत केलेलीं सर्व पापें झांकण्याची सोय मराठ्यांवर कांहींतरी भयंकर विपत्ति आल्यावांचून लागण्यासारखी नाहीं हें पंतमजकूर जाणून होता. तेव्हां भाऊला मदत न करण्याची व्यवस्था आपल्याकडून जेवढी होईल तेवढी हा इसम करून चुकला. इकडे भाऊनें मात्र आपली

हिंमत शेवटपर्यंत सोडिली नाहीं. आपल्या सैन्यांतील लोक एकदिलानें लढतील याची
भाऊला शंका नव्हती. शिवाय यवनांनीं कधीं पाहिला नव्हता असला तोफखाना भाऊच्या
पदरीं होता. सारांश, भाऊ सैन्याच्या उपकरणांच्या बाबतींत अबदालीहून सर्वप्रकारें श्रेष्ठ
होता. परंतु एका गोष्टींत १५ नोव्हेंबरच्या पुढें भाऊचें व्यंग पडूं लागलें. तें हें कीं, अब-
दालीला रसद अंतर्वेदींतून यथेच्छ मिळूं लागली व भाऊची रसद दिल्लीकडून येण्याचें मान
दिवसेंदिवस कमी होत चाललें. अबदालीला उठवून लढाईला आणण्याचा भाऊनें वारंवार
प्रयत्न केला. परंतु, अबदाली चिरडीस जाऊन आपल्या गोटाच्या बाहेर स्वतः बरेच
दिवस पडला नाहीं. अबदालीच्या मनांत निराळाच डाव होता. जी विपत्ति अबदाली १५
नोव्हेंबराच्यापूर्वी स्वतः भोगीत होता तीच किंवा त्याहूनहि भयंकर अशी विपत्ति आतां
मराठ्यांना भोगण्याची पाळी आली. तेव्हां उपासमारीनें मराठ्यांना पूर्ण जेरीस आणून
मग त्यांचें यथेच्छ पारिपत्य करण्याचा अबदालीनें बेत केला.

भाऊ या वेळीं अबदालीच्या कचाटींत पक्का सांपडला. १५ नोव्हेंबरपासून १४ जाने-
वारी १७६१ पर्यंत मराठी सैन्याची आस्ते आस्ते उपासमार होत चालली होती. तरी
भाऊची उमेद व हिंमत जशी होती तशीच होती. २३ नोव्हेंबराला अबदालीचें व भाऊचें
पहिलें म्हणण्यासारखें युद्ध झालें. (टीप ३२३ नानाफडणिसाचें पत्र). त्याच्या अगोदर
८ नोव्हेंबराला कृष्ण जोशी संगमेश्वरकर गोळा लागून ठार झाला होता. २३ नोव्हेंबरच्या
लढाईंत जनकोजी शिंद्यांच्या हस्तें अबदालीचा पराजय झाला. त्यांजकडील सहाशेंपावेतों
माणूस जाया झालें व आपल्याकडील दोन अडीचशेंपर्यंत झालें. आपल्या सैन्यानें त्यांच्या
लोकांना त्यांच्या गोटांत नेऊन घातलें. पुढें दुसरें युद्ध ७ डिसेंबरीं अस्तमानीं झालें
(नानाचें पत्र). त्यांतहि अबदालीचाच पराजय झाला. त्याजकडील दीड हजार माणूस
त्यांच्यान आराब्यापुढें पडलें होतें. आपल्या आराब्यापुढें त्याजकडील माणूस किती
पडले होते त्याचा नानाफडणिसानें आंकडा दिला नाहीं. आपल्याकडील सुमारें दीडशें
माणूस ठार व पांच सहाशें जखमी झालें होतें. ह्यावरून ह्याहि लढाईंत मराठ्यांना जय
मिळाला होता हें स्पष्ट आहे. परंतु ह्या लढाईंत एक मोठी हानि झाली. बळवंतराव मेहें-
दळे ठार झाला. त्यामुळें तिकडील लोकांना बहुत समाधान झालें. आपली मदत नसतांहि,
उलट आपण होईल तितकी कुचराई केली असतांहि भाऊसाहेबांचें सैन्य
उत्तरोत्तर विजयीच होत चाललें आहे हें ऐकून व नारो शंकरादि मंड-
ळींनें तोंडांत शेण घातलें तेव्हां गोविंदपंताच्या मनांत कांहीं निराळी
भावना होऊन, पतमजकुरांनीं चार लाख रुपये घेऊन दिल्लीचा रस्ता धरिला. गोविंदपं-
ताला दिल्लीकडे येण्यास दुसरेंहि एक कारण झालें. श्रीमंत नानासाहेब पेशवे स्वतः पंचवीस
तीस हजार फौज घेऊन भाऊच्या साहाय्यास कुच करून निघाले व सुमारें बऱ्हाणपुऱ्या-
पर्यंत आले, ही बातमी गोविंदपंताला कळली. तेव्हां श्रीमंतापाशीं अब्रू राहावी ह्या हेतूनें
गोविंदपंत २२ डिसेंबराच्या सुमाराला दिल्लीस आला. आणिलेली रक्कम नारो शंकराच्या

स्वाधीन करून पंतांनीं पानिपतच्या रोखानें गाजुद्दिनगराकडे कुच केलें. परंतु त्या शहराजवळ अबदालीचा सरदार अताईखान ह्यानें गोविंदपंताला २२ डिसेंबरीं गाठून ठार केलें ( लेखांक २७२ ). कोणत्याहि हेतूनें कां होईना गोविंदपंताच्या हातून ह्यावेळीं अबदालीची रसद बंद केली गेली असती तरी देखील भाऊचें हित झालें असतें. परंतु, राजीखुशीनें ज्याच्या हातून पूर्वी हित झालें नाहीं त्याच्या हातून धन्याच्या भीतीनें, लोकांच्या लज्जेनें किंवा फलाच्या आशेनें आतांहि हित होऊंच नये असाच ईश्वरी संकल्प होता असें दिसतें. गोविंदपंत जिवंत होता तोंपर्यंत अबदालीला कदाचित् शह बसेल व मराठयांना कदाचित् रसद मिळेल अशी आशा करण्यास जागा होती. गोविंदपंत वारल्यावर ह्या कादाचित्कत्वाचाहि लोप होऊन बाहेरून साहाय्य मिळण्याचा मराठयांना फारच थोडा संभव राहिला. २ जानेवारी १७६१ रोजीं पाराशरदादाजी हजार पांचशें स्वार व दीड लाख खजिना घेऊन दिल्लीहून पानिपताकडे जावयास निघाला ( लेखांक २८१ व टीप ३२४ ). तो चार जानेवारीला अबदालीच्या लष्करांत चुकून गेला. तेथें कांहीं स्वार मारले गेले, कांहीं मराठयांच्या लष्कराकडे निसटले व कांहीं दिल्लीकडे परत आले. हा मराठयांना साहाय्य करण्याचा दुसरा व शेवटला प्रयत्न झाला.

येथें पानिपतच्या मोहिमेसंबंधीं ह्या पुस्तकांतील अस्सल पुरावा संपला. ह्यापुढें पानिपतास मराठयांचें काय झालें तें बखरींवरून व तवारिखांवरून ढोबळ रीतीनें कळण्यासारखें आहे. १७६१ च्या १४ जानेवारीला झालेल्या पानिपतच्या शेवटल्या युद्धासंबंधीं (टीप ३२४) आजपर्यंत अस्सल असें एकहि चिटोरें उपलब्ध झालें नाहीं. आरळ्याचा कुळकर्णी नारो भगवंत ह्याची ग्रांट् डफ्नें घेतलेली जबानी मात्र अस्सल समजण्यास हरकत नाहीं. परंतु ती पानिपतच्या युद्धाच्या एका शेंवटल्या क्षुल्लक प्रसंगासंबंधीं असल्यामुळें युद्धाच्या हकीकतीवर प्रकाश पाडण्यासें तिचा विशेष उपयोग नाहीं. अस्सल पुराव्याची कांहीं तरी कसोटी जवळ असल्याशिवाय बखरींतील किंवा तवारिखेंतील अमुक मजकूर विश्वसनीय आहे व अमुक नाहीं हें सांगणें निव्वळ पक्षपाताचें व आग्रहाचें होईल. पानिपतच्या शेंवटच्या युद्धांत विश्वासराव मरेपर्यंत मराठयांना जय मिळाला किंवा नाहीं; विश्वासराव वारल्यावर भाऊच्या मनांत परत जावयाचें असतां, जेव्हां अबदाली चाल करून आला तेव्हां भाऊला निरुपायानें त्याला तोंड देणें भाग पडलें किंवा नाहीं; मल्हारराव होळकर, दमाजी गायकवाड ह्यांनीं लढण्याच्या कामीं कांहीं कसूर केली किंवा कसें; वगैरे बरेच प्रश्न सोडवावयाचे आहेत; परंतु अस्सल कागदपत्र एखादें सुद्धां जवळ नसल्यामुळें व्यर्थ, किंवा फार झालें तर किंचित् संभाव्य असा निर्णय काढण्याच्या कोरड्या खटपटींत पडण्याची माझी इच्छा नाहीं व कांहीं फायदाहि नाहीं. शिवाय खुद्द लढाईसंबंधीं अस्सल कागदपत्रें पुढें मागें बाहेर येण्याचा संभव नाहींच असें नसल्यामुळें मी त्या वादांत सध्यां शिरत नाहीं. बाकी तो वाद बराच महत्वाचा व मनोरंजक होण्याचा संभव आहे.

ह्या विवेचनाच्या आतांपर्यंतच्या भागावरून एवढें स्पष्ट आहे कीं, पानिपतच्या मोहिमेचें अपयश जर कोणाच्या माथीं मारावयाचें असेल तर त्या शिक्षेला गोविंदपंत बुंदेले हाच सर्वथैव पात्र आहे. अवदालीच्या पेचामुळें गोविंदपंताला भाऊकडे येतां आलें नाहीं असा बिलकुल प्रकार नव्हता. मुद्दाम बहाणे करून व सबबी सांगून ह्या गृहस्थानें भाऊला मदत करण्याचें टाळिलें व आपल्या ह्या देशावर महत् संकट आणिलें. गोविंदपतानें सदाशिवरावभाऊला मदत तर केली नाहींच, परंतु सुजाउद्दौला, अवदाली, अलीगोहर, मीरजाफर ह्या लोकांकडील बातमी देखील जी वेळोवेळ पाठविली ती पुष्कळदां खोटी असे. खरी बातमी काढावयाचाहि ह्या नीच गृहस्थानें प्रयत्न केला नाहीं. लेखांक २२६ त गोविंदपंत लिहितो कीं अवदाली शुक्रतालावर जाऊन छावणी करणार आहे. परंतु ही बातमी खरी नव्हती. वास्तविक प्रकार असा होता कीं अवदाली शिकंदऱ्यावरच होता. लेखांक २२७ त गोविंदपंत लिहितो कीं मीरजाफर, मिरन व रामनारायण ह्यांना खातरजमेचें पत्र पाठवावें. परंतु वास्तविक प्रकार असा होता कीं जुलैंत मिरन वीज पडून मेला, मीरजाफर मेला किंवा कलकत्त्यास गेला ह्याचा पत्ता नव्हता व पाठणा येथील सर्वाध्यक्षत्व रामनारायणाकडे आलें होतें. दोन्ही पत्रांत केलेल्या चुका गोविंदपंताला सदाशिवरावानें दाखवून दिल्या आहेत. येणेंप्रमाणें गोविंदपंताच्या खोटेपणाचा हा असा वृत्तांत आहे. दुसरा अपराधी इसम ह्मटला ह्मणजे मल्हारराव होळकर होय. ह्याच्या कृत्यांची याद मागें मीं १७६० पर्यंत आणून पोंहोंचविली आहेच. तींत १७५४ व १७५५ त जयाप्पाला दगा करण्यासंबंधीची त्यानें केलेली सूचना व १७६० त दत्ताजीला साहाय्य करण्यास केलेला दिरंग ह्यांचा उल्लेख झालाच आहे. आतां पानिपतच्या मोहिमेंत ह्यानें कांहीं स्वदेशाच्या अहिताचीं कृत्यें केलीं आहेत किंवा कसें तें पहावयाचें आहे. नजीबखान, सुजाउद्दौला, माधोसिंग, विजेसिंग व सुरजमल जाट ह्यांच्याशीं मल्हाररावाचें रहस्य वाजवीहून फाजील होतें हें सर्वप्रसिद्ध आहे व ह्या ग्रंथांतूनहि त्याचा अधूनमधून उल्लेख आला आहे. लेखांक २०२ त " अबदालीस खूब तंबी करावी; मल्हाररावाचा या गोष्टीविशीं संशय न आणावा; तेहि याच कामावर तयार आहेत " ह्मणून सदाशिवरावभाऊनें सुजाउद्दौल्याला लिहिलें आहे. ह्यावरून एक गोष्ट निष्पन्न होते. ती ही कीं अवदालीस तंबी देण्याचा मल्हाररावाचा निश्चय झाला नव्हता किंवा इच्छा नव्हती असा संशय येण्यास सुजाउद्दौल्याला कारण झालें होतें. मल्हाररावाच्या मनांत नजीबखानाला राखावयाचें फार पूर्वीपासूनच होतें. अवदालीला तंबी द्यावयाची ह्मणजे नजीबखानालाहि तंबी व्हावयाचीच. तेव्हां अवदालीचें पारिपत्य करण्याची इच्छा मल्हाररावाची नव्हती असा संशय दृढ होण्यास कांहीं कारणें आहेत हें स्पष्ट आहे. प्रस्तुत ग्रंथांत मल्हाररावासंबंधीं पत्रव्यवहार बहुतेक मुळींच नसल्यामुळें, मल्हाररावाविरुद्ध साक्षात् पुरावा कांहींच आणितां येत नाहीं. परंतु मल्हाररावाच्या पूर्वींच्या वर्तनावरून व लेखांक २०२ तील सुजाउद्दौल्याच्या संशयावरून ह्या गृहस्थानें पानिपतच्या मोहिमेंत व युद्धांत कुचराई केली असावी असा

चळकट तर्क करितां येतो. पानिपतच्या मोहिमेंत कुचराई केल्याबद्दल आणि अबदालीशीं व नजी-बखानाशीं अंतस्थरीतीनें व्यवहार केल्याबद्दल पहिल्या माधवरावानें मल्हाररावाचा दिवाण गंगाधर यशवंत चंद्रचूड यास तोब्याखालीं बडविलें होतें हें सुप्रसिद्ध आहे. ह्या आख्यायिकेवर जरी विशेष भिस्त ठेविली नाहीं तत्रापि मल्हाररावाच्या स्वामिभक्तीविषयीं व देशभक्तीविषयीं विकल्प घेतां येतो हें निर्विवाद आहे. सुरजमलजाट दिल्लीस मराठ्यांच्या सैन्यांतून रुसून सवलगडास गेला व आपल्या मुलाला भाऊकडे पाठवून देण्याचा त्यानें विचार केला ह्या गोष्टींचा उल्लेख ह्या ग्रंथांतील पत्रांत आला आहे ( लेखांक २५९, २६४, २४४, २१६, २१५ ). सुरजमलजाट मराठ्यांच्या विरुद्ध गेला नाहीं व अबदालीलाहि त्यानें मदत केली नाहीं; परंतु अबदालीच्या विरुद्धहि पण तो गेला नाहीं. गोविंदपंताच्या बरोबरीनें किंवा खालोखाल कुचराई करणारे गृहस्थ म्हटले म्हणजे गोपाळराव गणेश बर्वे व गणेश संभाजी खांडेकर हे होत. पहिले रघुनाथरावदादाचे निकट संबंधी होते. त्यांनीं अंतर्वेदींत राहून अबदालीला पायबंद देण्याचें काम केलें नाहीं. हे गोविंदपंताच्या दिमतीला असल्यामुळें गोविंदपंताच्या हुकुमाप्रमाणें त्यांना वागावें लागलें असेल हें उघड आहे. गणेश संभाजीचें पाऊल गोपाळराव गणेशाच्या थोडें पुढें होतें. त्यानें अंतर्वेदींत अबदालीला पायबंद देण्याचें काम तर केलें नाहींच; उलट बुंदेलखंडांत पृथुसिंग वगैरे संस्थानिकांशीं ह्याच वेळीं भांडण तंटे उपस्थित करून सदाशिवरावाला ह्या संस्थानिकांकडून कांहीं साहाय्य करून द्यावयाचें तें देवविलें नाहीं ( लेखांक २५६, २५७ ). गोपाळराव गणेश व गणेश संभाजी हे दोघे इसम रघुनाथरावाच्या पुठ्यांतील होते. ह्यांना कदाचित् सखारामबापूची शिकवणी असल्यास न कळे.

येथपर्यंत गोविंदपंतादि मंडळींच्या कृत्यांचा विचार झाला. आतां सदाशिवरावभाऊच्या वर्तनांत कांहीं कमीपणा दिसतो कीं काय तें पाहूं. १५ नोव्हेंबर १७६० पर्यंत सदाशिवरावाचें वर्तन जसें असावें तसेंच होतें. गोविंदपंत अबदालीच्या पाठीमागून येऊन त्याची रसद बंद करील ह्या आशेवर भाऊ पानिपतास तळ देऊन बसला हें रास्त होतें. परंतु, १५ नोव्हेंबराच्या सुमाराला गोविंदपंतावर विश्वास व भिस्त ठेवण्यांत अर्थ नाहीं हें भाऊला पक्कें कळून चुकलें होतें. यद्यपि भाऊच्या सैन्याचा जोर अबदालीपेक्षां जास्त होता, तत्रापि दाणागल्ला मिळण्याच्या दिवसेंदिवस कमी होत जाणाऱ्या संभवामुळें सदाशिवरावभाऊनें अबदालीशीं मोठ्या कडाक्याचें युद्ध मुद्दाम करून त्याचा शह टाळावयाचा होता किंवा त्या प्रकारानें शह टळत नसल्यास त्याची फळी फोडून दिल्लीकडे निघून यावयाचें होतें. ह्यांपैकीं पहिल्या मार्गाचा अवलंब भाऊनें १५ नोव्हेंबरपासून ७ डिसेंबरपर्यंत करून पाहिला. ह्या अवधींत अबदालीशीं दोन बरींच मोठीं युद्धें झालीं. परंतु ह्या दोन्ही युद्धांत स्वतः अबदाली लढाईला मुळींच आला नाहीं व त्याची बदनक्षी जी व्हावयाला पाहिजे होती तीहि झाली नाहीं. मराठ्यांना ह्या दोन्ही युद्धांत जय मिळाला हें निर्विवाद आहे; परंतु त्या जयापासून अबदालीचें फारसें नुकसान न होतां मराठ्यांचाहि मोठासा नफा झाला असें नाहीं. मराठ्यांची जी १५ नोव्हेंबराला स्थिति

होती तीच किंवा त्याहून अधिक निकृष्ट अशी दशा ७ डिसेंबराच्या पुढें झाली. ह्या वेळीं दुसऱ्या मार्गाचा अवलंब, म्हणजे अबदालीची फळी फोडून दिल्लीकडे जावयाचा प्रयत्न, भाऊनें करणें जरूर होतें व कित्येक सरदारांनीं ही सूचना केली देखील होती. ती अमलांत आणण्याचें सामर्थ्य भाऊच्या अंगीं नव्हतें असें नाहीं. भाऊ जर सडा असता व कबिल्या बुणग्यांनीं त्याच्या हालचाली जखडल्या नसत्या तर अबदालीची फळी फोडून जाणें अशक्य नव्हतें. बुणग्यांचें लटांबर टाकून निघून जाणें शोभण्यासारखें नव्हतें हें कबूल आहे; परंतु, एकंदर सारासार विचार करितां बुणग्यांना सोडून किंवा त्यांना पानिपतच्या गढींत ठेऊन देशावर येणारी आत्यंतिक हानि टाळण्याकरितां, सदाशिवरावानें जर अबदालीची फळी फोडून दिल्लीकडे कुच केलें असतें, तर त्याला कोणी त्यावेळीं किंवा पुढें मागें दोष देतें असें वाटत नाहीं. जसजसे जास्त दिवस लोटूं लागले तसतशी अबदालीची फळी फोडून जाण्याची भाऊची हिंमत कमी होत चालली व दाणागल्ल्याच्या टंचाईमुळें मराठ्यांचें शरीरसामर्थ्यहि खालावत चाललें. अन्नापाण्यावांचून उपाशी मरण्यापेक्षां व शत्रूच्या पुढें मृत्यूची स्वस्थ वाट बघत बसण्यापेक्षां फळी फोडून निघून जाणें सर्वस्वीं रास्त होतें. परंतु, तें त्या वेळीं साध्य होतें किंवा नाहीं हें कळण्यास कोठें आधार नाहीं. भाऊनें कबिले बुणगे बरोबर घेतले ही कदाचित् चूक केली असें नारो शंकरानें ध्वनित केलें आहे ( लेखांक २४३ ) व त्यासंबंधानें " निदान " हा शब्द उपयोजिला आहे. आतां भाऊला स्वतःला कबिल्या बुणग्यांची अडचण वाटत होती किंवा नव्हती हें निश्चयात्मक सांगतां येण्यास कांहींच आधार नाहीं. इतकें मात्र खास विधान करितां येतें कीं २३ डिसेंबरपर्यंत भाऊची हिंमत काडीमात्रहि खचली नव्हती. गोविंदपंत वारल्यावर समाधानार्थ बाळाजी गोविंदाला भाऊनें जें २३ डिसेंबरीं पत्र पाठविलें त्यांत " आह्मी आहों, सर्व नीट करूं " ह्या धीराच्या व आश्वासनाच्या शब्दावरून अबदालीचें भय सदाशिवरावाला विशेष वाटत होतें असें दिसत नाहीं ( लेखांक २७२ ). २३ नोव्हेंबरीं व ७ डिसेंबरीं झालेल्या युद्धांच्या अनुभवावरून पुढेंहि युद्ध झाल्यास पराजय येईल असें भाऊस वाटत नव्हतें असें ह्या पत्रांतील धीराच्या व आश्वासनाच्या गोष्टीवरून अनुमान काढण्यास जागा आहे. शत्रूची फळी फोडून दिल्लीक[illegible] निघून जाण्याचा भाऊनें प्रयत्न केला नाहीं त्याचें तरी हेंच कारण असावें. धीराच्या व आश्वासनाच्या मोठमोठ्या गोष्टी भाऊ बोलत असतां ज्याअर्थीं त्याचा १४ जानेवारी १७६१ ला पराभव झाला त्याअर्थीं त्याचें वर्तन धीराचें व शांतपणाचें नसून उद्दामपणाचें व सान्निपातिक होतें असा कोणी कोणी तर्क काढितात. परंतु हा तर्क अवास्तव आहे. शांतपणाबद्दल भाऊची पूर्वीपासून ख्याती होती. सबंद १७६० सालभर गोविंदपंताचें वर्तन किती राग आणण्याजोगें होतें हें आतांपर्यंत दाखवून दिलें आहे. परंतु गोविंदपंताला लिहितांना भाऊच्या हातून एकहि वावगा शब्द पडलेला सांपडावयाचा नाहीं. शिंदेहोळकरांच्याहि मर्जीच्या बाहेर भाऊ कधीं गेला नाहीं. त्यांनीं सांगितल्या रस्त्यानेंच तो आग्र्याकडे गेला

सुरजमल जाटाचें व भाऊचें वाकडें आलें होतें हें खरें आहे; परंतु तें देखील भाऊनें बाहेर कोणाला दिसूं दिलें नाहीं. सारांश भाऊच्या हातून उद्दामपणाचें वर्तन होणें केवळ अशक्य होतें.

२३ डिसेंबरपर्यंत, कदाचित् ४ जानेवारी १७६१ पर्यंत, भाऊच्या हालचालींचा व डावपेचाचा वृत्तांत दिला आहे. आतां भाऊचा प्रतिस्पर्धी जो अबदाली त्यानें डावपेच काय केले त्यांचाहि निर्देश केला पाहिजे. १७६० च्या मेंत अबदाली अनुपशहरीं जाऊन बसला. तेव्हांपासून २५ अक्टोबरपर्यंत तो अंतर्वेदींत अनुपशहर व शिकंदरा ह्या दोन टाण्यांना सोडून कोठें गेला नाहीं. सुजाउद्दौला वगैरे साथीदार मिळवून आणण्याचें काम नजीबखानानें केलें. आगष्टसप्टेंबरांत अबदालीची तर फारच हलाखी झाली होती. त्याच्या गोटांत सर्वत्र फुटाफुट होत चालली होती. सदाशिवरावाला अक्टोबरांत गोविंदपंतानें जर यथास्थित मनापासून मदत केली असती तर अबदाली अगदीं ठार बुडाला असता. अबदालीनें आपण होऊन अमुक एक डावपेच केला व तो सदाशिवरावाला भोंवला असें कदाचित्च उदाहरण सांपडेल. गोविंदपंताचा आळशीपणा व कुचराई अबदालीच्या कामास आली. दिल्ली व पानिपत ह्यांच्यामध्यें अबदाली सांपडला असतां त्याला कोंडून टाकण्याचें व घाबरवून सोडण्याचें सर्वस्वीं गोविंदपंताच्या हातांत होतें. तें गोविंदपतानें करावयाचें टाकल्यापासून अबदालीचा फायदा अतोनात झाला. अबदालीनें अमूक एक डाव योजिला व त्यामुळें सदाशिवराव फसला असा प्रकार मुळींच झाला नाहीं. मराठ्यांच्या लष्करांत दुही झाली ती अबदालीच्या पथ्यावर पडली. ह्या दुहीचा अबदालीनें चांगला फायदा करून घेतला. मराठे आपल्यापेक्षां जोरदार आहेत हें अबदाली जाणून होता. तेव्हां मराठे उपासमारीनें अर्धमेले होऊन जात तोंपर्यंत त्यांच्याशीं युद्ध करावयाचें नाहीं हा जो फेबियन डावपेच तो अबदालीनें चांगला उपयोजिला ह्यांत संशय नाहीं. १४ जानेवारी १७६१ च्या युद्धांत अबदालीनें कोणते पेच केले ते अस्सल पुराव्याच्या अभावामुळें निर्देशितां येत नाहींत. परंतु ती लढाई होईतोंपर्यंत अबदालीनें आपण होऊन अमूक एक योजना केली असेंहि पण सांगतां येणें शक्य नाहीं. शत्रूच्या युक्तीपेक्षां मराठे गोविंदपंताच्या व मल्हाररावाच्या कुचराईमुळें ही मोहीम हरले हा सिद्धांत मात्र सर्वत्र मान्य व्हावा असा दिसतो.

ह्या विवेचनाच्या प्रारंभीं पानिपतच्या युद्धाची व त्याच्या परिणामाची एकंदर १८ कारणें दिलीं होतीं. त्यांपैकीं कांहींच्या तथ्यातथ्याचा निवाडा करण्याचीं साधनें वर दिलीं आहेत. बाकीं राहिलेल्या कारणां ( ४,५,६,१०,१४ ) चा पानिपतच्या मोहिमेशीं विशेष संबंध आहे असें मला वाटत नाहीं. ( १ ) जातिभेदाचा प्रश्न त्यावेळीं मुळीं उद्भवलाच नव्हता. ( २ ) ब्राह्मणांच्या पोटभेदांतहि परस्पर वैमनस्य वाढून पानिपत येथें मराठ्यांचा पराभव झाला असें विधान करण्यास अद्यापपर्यंत कांहींच आधार पुढें आला नाहीं. रघुनाथरावदादा, सखारामबापु, महादोबा पुरंधरे, गोपाळराव पटवर्धन, गोपाळराव गणेश, गोविंद बल्लाळ, मल्हारराव होळकर, ह्यांचा १७५० पासून १७६२ पर्यंतचा आणखी बराच

खाजगी पत्रव्यवहार सांपडल्यावांचून ह्या प्रश्नाचा उलगडा यथास्थित व्हावयाचा नाहीं व तोंपर्यंत त्यासंबंधीं मूकव्रत आचरणेंच श्रेयस्कर होईल. ( ३ ) हिंदुस्थानांत त्यावेळीं राष्ट्रीयत्वाची आधुनिक कल्पना सर्वत्र पसरली नव्हती हें खरें आहे. ती पसरविण्याचाच तर मराठ्यांचा मुख्य प्रयत्न होता. महाराष्ट्रधर्माची पताका घेऊन मराठे १६४० त जे निघाले ते तिला आस्ते आस्ते हिंदुस्थानांत सर्वत्र हिंडवीत असतां त्यांच्यावर १७६१ त हा घोर प्रसंग आला. हा प्रसंग येण्याच्या पूर्वी कित्येक प्रांतांत महाराष्ट्रधर्माचा प्रसार झाला होता व कित्येक प्रांतांत व्हावयाचा होता. उत्तरेकडील प्रांतांत तो झाला नव्हता म्हणून तर तत्रस्थ हिंदूलोकांनीं यवनांचें साहाय्य केलें व मराठ्यांचा द्वेष केला. हा द्वेष कां झाला त्याचा विचार पुढील विवेचनांत करितों. परंतु पुढील विवेचनाला प्रारंभ करण्यापूर्वीं मराठ्यांच्या कांटकपणासंबंधीं दोन शब्द लिहिले पाहिजेत. महाराष्ट्रांतील लोकांच्या अंगीं अनन्यसामान्यत्वेंकरून एखादा जर कोणता गुण असेल तर तो त्यांच्या अंगचा कांटकपणा हा होय. विलास आणि मराठा ह्या दोन अर्थांची व्याप्ति मागेंहि कधीं झाली नाहीं व पुढेंहि कधीं होईल असा रंग दिसत नाहीं. साधी रहाणी आणि उच्च विचार हे दोन गुण मराठ्यांच्या स्वभावाचे मुख्य घटक होत. पैकीं उच्च विचाराचा विसर मराठ्यांना अधून मधून कधीं पडला असेल; परंतु साधी रहाणी मराठ्यांनीं आजपर्यंत कधींहि सोडलेली इतिहासांत माहीत नाहीं. साध्या रहाणीची, कांटकपणाची व विलासपराङ्मुखतेची संवय मराठ्यांच्या अंगीं १७५० पासून १७६१ पर्यंत कितपत होती हें पहावयाचें असल्यास त्यावेळच्या पुढाऱ्यांच्या हालचालींचें प्रेक्षण करावें म्हणजे झालें. मागें बाळाजी बाजीराव, सदाशिव चिमणाजी, रघुनाथ बाजीराव, विश्वासराव, जयाप्पा, दत्ताजी, जनकोजी, वगैरे पुढाऱ्यांच्या हालचालींचें तक्ते दिले आहेत त्यावरून विलास करण्याला ह्या पुरुषांना किती वेळ सांपडत असेल त्याचा ज्याचा त्यानेंच विचार करावा. बाळाजी बाजीराव विलासी व आळशी होता म्हणून ग्रांटडफ वगैरे लोक म्हणतात त्यांत बिलकूल तथ्य नाहीं. बाळाजी बाजीरावाचा सालवार इतिहास ग्रांटडफला माहीत नव्हता; त्यामुळें ज्या वर्षांचा इतिहास माहीत नसेल त्या वर्षी बाळाजी बाजीराव विलास करीत असे असा डफचा अंदाज आहे. परंतु, मागें दिलेल्या तक्त्यावरून दिसून येईल कीं १७५० पासून १७६१ च्या जूनपर्यंत एकाहि वर्षी पावसाळ्याखेरीज बाळाजी पुण्यास नव्हता. प्रत्येक वर्षाचे आठ महिने बाहेर काढण्याचा त्याचा परिपाठ असे. १७३८ पासून १७५० पर्यंतहि बाळाजी एकसारखा हिंडत होता हें दाखवून देण्यास साधनें आहेत. इ. स. १७३८।३९ हीं दोन सालें बाळाजी साताऱ्यास होता. १७४० च्या मार्चएप्रिलांत बाळाजी पुण्यास होता ( का. पत्रें, यादी ५८). शाहूमहाराज यांच्या चरित्रांत ( पृष्ठ १६१ ) राजश्री गोगटे म्हणतात कीं, बाळाजी १७४० च्या एप्रिलांत साताऱ्यास होता; परंतु, तें काव्येतिहाससंग्रहांतील पत्रें यादी ५८ वरून बरोबर नहीं. १७३९ च्या १७ एप्रिलास बाळाजी साताऱ्यास होता ( का. पत्रें, यादी ४५ ). १७४० च्या एप्रिलपासून जूनपर्यंत बाळाजी कोंकणांत आंग्र्य[illegible]रीला गेला होता

( का. पत्रें, यादी ५८ ). १७४० च्या नोव्हेंबरपासून १७४१ च्या एप्रिलपर्यंत बाळाजी निजाम, भोसले ह्यांच्या राज्यांत व हिंदुस्थानांत गेला होता. १७४१ च्या जुलैपासून अक्टोबरपर्यंत बाळाजी साताऱ्यास होता. १७४१ च्या नोव्हेंबरपासून १७४२ च्या सप्टेंबरपर्यंत तो धारेस होता. १७४२ च्या अक्टोबरपासून १७४३ च्या जूनपर्यंत जयपूर, काशी, प्रयाग, बंगाला वगैरे प्रांतांत होता. १७४३ च्या जूनपासून सप्टेंबरपर्यंत पुण्यास होता. १७४३ च्या अक्टोबरांत स्वारी साताऱ्यास जाऊन १७४४ च्या एप्रिलमेंत पुण्यास आली. १७४४ च्या नोव्हेंबरांत नाशिकावरून कोंकणांत शिरून डिसेंबरांत पुण्यास आला. १७४५ च्या जानेवारींत भेलशावर स्वारी करून आगष्टांत पुण्यास आला. १७४५ च्या नोव्हेंबरांत साताऱ्यास जाऊन तेथून १७४६ च्या मार्चांत निरोप घेऊन स्वारी पंढरपुरास गेली ( का. पत्रें, यादी ६८ ) व जूनांत पुण्यास आली. तेथून तो कोंकणांत सप्टेंबरांत जाऊन १७४७ च्या मार्चएप्रिलांत पुण्यास आला. १७४७ च्या डिसेंबरांत खानदेश, वेदर वगैरे निजामाच्या प्रांतांत जाऊन १७४८ च्या मार्चएप्रिलांत पुण्यास आला. १७४८ च्या सप्टेंबरांत हिंदुस्थानांत मकसुदाबाद, प्रयाग वगैरेवर स्वारी करून १७४९ च्या आगष्टांत साताऱ्यास आला. १७४९ च्या डिसेंबराच्या १५ व्या तारखेस शाहूराजा वारला. त्यावेळीं बाळाजी साताऱ्यास होता व पुढें १७५० च्या जानेवारींत नवा राजा करून एप्रिलांत बाळाजी पुण्यास आला. रा. गोगटे वगैरे मंडळी शाहूच्या मृत्यूचें साल १७४८ देतात. परंतु, ती चूक आहे. १७५० च्या पुढील बाळाजीच्या हालचालींचा तख्ता मागें दिलाच आहे. ह्यावरून इतकें समजून येईल कीं १७३८ पासून १७६१ पर्यंत बाळाजी सबंद वर्षभर अमुक एक ठिकाणीं सतत कधींच राहिला नाहीं. सदा चोहोंकडे फिरण्यांत त्याचा वेळ गेला. हीच स्थिति बाकीच्या पुढाऱ्यांची व सामान्य सैनिकांची होती. पावसाळ्यांत छावणींत असतांना या लढवय्यांना विलास करण्यास कितपत सोय व साधनें असत तें समजण्यास मजजवळ सामग्री नाहीं. पावसाळा खेरीज करून बाकीचे आठ महिने सर्व हिंदुस्थानभर घिरट्या घालण्यांत हाडांचीं काडें ह्या पुढाऱ्यांना व शिपायांना करावीं लागत हें सिद्ध करण्यास हवीं तितकीं साधनें आहेत.

आतां आणखी एका मुद्याचा विचार करून हें विवेचन संपवितों. गिलज्यांच्या धिप्पाड व अर्बुज शरीरांपुढें मराठ्यांच्या लहान व वामनमूर्तींचा टिकाव लागला नाहीं ह्मणून एक आक्षेप आहे. गिलज्यांच्या लांबीरुंदीपेक्षां मराठ्यांच्या शरीराचें क्षेत्रफळ कदाचित् लहान असेल; परंतु, लढाईंत ह्या क्षेत्रफळावरच मोठी भिस्त असते असें नाहीं. जर्मन, फ्रांक ह्या रानटी लोकांच्या लांबीरुंदीपेक्षां सीझराच्या रोमन सैनिकांची उंची व रुंदी कमी असे. परंतु, फ्रांक लोकांच्या पाव अर्धा फूट उंचीचा वचपा रोमनलोक भयंकर रीतीनें भरून काढीत हें प्रसिद्ध आहे. तोच प्रकार मराठ्यांचा होता. कर्नाटकांतील राठ व धिप्पाड शेतकरी, मथुरा वृंदावनांतील गलेलठ्ठ बैरागी, पंजाबांतील उंच, धिप्पाड व ढिसूळ शीख, रजपुतान्यांतील रुंद छाताडाचे व भरगच्च मासाचे राठोड, ह्यां सर्वांना लहान्या परंतु

कांटक मराठ्यांनीं वेळोवेळीं चीत केलें होतें. त्या मराठ्यांना अर्बुज गिलज्यांचें किंवा पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याहि मनुष्यांचें भय मागें कधीं वाटलें नाहीं व पुढें कधीं वाटणार नाहीं. १४ जानेवारी १७६१ च्या लढाईंत मराठ्यांचा पराजय झाला ह्मणून जर गिलज्यांच्या धिप्पाडपणाचे पोवाडे गावयाचे असतील तर २३ नोव्हेंबर व ७ डिसेंबर १७६०च्या लढायांत मराठ्यांचा जय झाला ह्मणून गिलज्यांच्या धिप्पाडपणाचे क्षुल्लकत्वहि वर्णन करणें जरूर आहे. तात्पर्य, शरीराच्या लहानमोठेपणाचा परिणाम पानपतच्या लढाईत कांहींच झाला नाहीं. कां कीं मराठी सैन्यांत येथून तेथून सर्व मराठेच होते असा प्रकार बिलकूल नाहीं. मराठें सैन्य पंचभेळ असे. परदेशी, मराठे, मुसुलमान, आहीर, अडारु, आरब, रजपूत, वगैरे सर्व प्रकारचे लोक मराठी सैन्यांत असत.

## विवेचन सहावें.

मराठ्यांचें हिंदुस्थानांत कार्य काय ? ह्या प्रश्नाचें उत्तर दुसऱ्या व तिसऱ्या विवेचनांत बहुतेक उल्लेखिलेंच आहे. ह्या विवेचनांत त्याचा निर्देश आणखी विस्तृत करून दाखवितों. मराठ्यांचें हिंदुस्थानांत मुख्य कार्य ह्मटलें ह्मणजे महाराष्ट्रधर्माचा प्रसार करणें हें होय. समर्थांनीं ज्याला महाराष्ट्रधर्म ह्मणून संज्ञा दिली तो केवळ हिंदुधर्मच नव्हे. महाराष्ट्रधर्मांत स्वराज्यस्थापनेचा व गोब्राह्मणप्रतिपालनाचाहि अंतर्भाव होतो. हिंदुधर्म, स्वराज्य व गोब्राह्मणप्रतिपालन ह्या तीन गोष्टींची स्थापना करावयाची ह्मटलें ह्मणजे राष्ट्रांतील लोकांची एकी झाली पाहिजे व त्या एकीचा पुढाकार करण्यास कर्त्या लोकांनीं पुढें सरसावलें पाहिजे. हीहि गोष्ट त्यावेळच्या मराठ्यांच्या स्पष्टपणें ध्यानांत आली होती. मराठ्यांखेरीज हिंदुस्थानांतील इतर लोकांच्या ध्यानांत ही गोष्ट अगदींच आली नव्हती असें नाहीं. हिंदुधर्माची स्थापना व गोब्राह्मणांचें प्रतिपालन केलें पाहिजे ही कल्पना शीख लोकांच्या व बुंधेल्यांच्या डोक्यांत अकबराच्या वेळेपासून, कदाचित् त्याच्याहि पूर्वी, आली होती असें ह्मणण्यास आधार आहे. परंतु ही कल्पना साक्षात् सिद्ध करून दाखविण्यास जी तडफ, जो निश्चय, जी जूट व जें पुढारपण लागतें त्याचें अस्तित्व ह्या लोकांच्या ठायीं होतें असें इतिहासावरून दिसत नाहीं. सुदैवानें ह्या गुणांचें अस्तित्व त्या कालीं मराठ्यांच्या अंगीं होतें व ह्मणूनच त्यांच्या हातून स्वराज्याची स्थापना होऊन हिंदुधर्माचें व गोब्राह्मणांचें प्रतिपालन झालें. १६४६ पासून १७०७ पर्यंत महाराष्ट्रधर्माची शुद्ध कल्पना महाराष्ट्रांत विराजत होती. तोंपर्यंत हिंदुधर्माचा, स्वराज्याचा व गोब्राह्मणांचा छल अवरंगझेबाच्या हातून होत होता. त्याच्यापुढें हा छल बंद झाला. स्वराज्याची स्थापना झाली आणि गोब्राह्मणांची व हिंदुधर्माची दीन दशा कायमची संपली. १७२० च्या सुमारास महाराष्ट्रांत महाराष्ट्रधर्माची पूर्ण स्थापना झाली व महाराष्ट्रांतील हिंदुधर्माला व गोब्राह्मणांना कोठूनहि भीति वाटण्याचें कारण उरलें नाहीं. सारांश, स्वराज्याच्या स्थापनेमुळें महाराष्ट्रांतील लोकांना सुखाचे दिवस दृष्टीस पडले. परंतु महाराष्ट्राबाहेरील प्रांतांतील लोकांना महाराष्ट्रांतील लोकांच्या सुखाचें वांटेकरी ह्या वेळपर्यंत होतां आलें नाहीं. खरें ह्मटलें असतां अवरंगझेबाच्या कारकीर्दींत

यवनांच्या सत्तेला उतरती कळा लागली होती; तेव्हां मराठयांच्याप्रमाणें हिंदुस्थानांतील इतर लोकांनीं उठाव करून आपल्या प्रांतांत स्वराज्याची स्थापना करून धर्माचें व गोब्राह्मणांचें प्रतिपालन करावयाचें. परंतु हा पराक्रम त्या लोकांच्या हातून झाला नाहीं. कां कीं, त्या लोकांच्या अंगीं स्वराज्यस्थापनेस एकजूट, पुढारपण वगैरे जे उदात्त गुण लागतात ते नव्हते. शिवाजीच्या प्रोत्साहनानें बुंदेलखंडांत छत्रसालानें कांहीं वेळ यवनांच्याविरुद्ध कंबर बांधिली होती हें खरें आहे. परंतु, मराठयांच्याप्रमाणें टिकाव धरून वसण्याइतका चिवटपणा बुंदेल्यांच्या अंगीं नसल्यामुळें स्वराज्याचें बीं त्या प्रांतांत जसें रुजावें तसें रुजलें नाहीं. महाराष्ट्राबाहेरील हिंदुस्थानांतील इतर प्रांतांची ही अशी स्थिति होती. स्वतः त्या लोकांच्या अंगीं स्वधर्माचें संरक्षण व स्वराज्याची स्थापना करण्याचें सामर्थ्य नव्हतें. तेव्हां ह्या लोकांना यवनांच्या कचाटींतून सोडवून आपल्या अमलाखालीं आणावें व हिंदुधर्माचें व गोब्राह्मणांचें प्रतिपालन करावें असा महाराष्ट्रांतील कर्त्या पुरुषांचा त्यावेळीं विचार झाला. १७२० च्या पुढें मराठयांनीं आपल्या सत्तेचें जाळें जें सर्वत्र हिंदुस्थानभर पसरिलें त्याचें मुख्य कारण हा विचार होय. १६४६ पासून १७९६ पर्यंत कोणताहि महत्त्वाचा तह घेतला असतां त्यांत स्वराज्याचें व स्वधर्माचें कलम नाहीं असें बहुशः व्हावयाचें नाहीं.

मराठयांची सत्ता सर्व हिंदुस्थानभर पसरण्यास वर सांगितलेला विचार मुख्य कारण झाला. ह्या विचारानें प्रोत्साहित होऊन मराठयांनीं यवनांच्या हातून १७६० च्या सुमाराला बहुतेक सर्व हिंदुस्थान सोडविलें. परंतु सोडविलेल्या प्रांतांत आपली सत्ता कायम करण्यास जे उपाय योजिले पाहिजेत ते १७२० पासून १७६० पर्यंत योजिले गेले नाहींत. खुद्द महाराष्ट्रांत १६४० पासून १७०७ पर्यंत स्वराज्यस्थापनेच्या वेळीं जे उपाय योजिले गेले त्यांचा उपयोग महाराष्ट्रेतर प्रांतांत १७२० पासून १७६० पर्यंत जे मुत्सद्दी झाले त्यांनीं केला नाहीं. स्वराज्यस्थापनेची कल्पना महाराष्ट्रांतील विचारी पुरुषांच्या मनांत जेव्हां प्रथम आली तेव्हां यवनांच्यासंबंधीं द्वेष व स्वधर्मासंबंधीं प्रेम महाराष्ट्रांतील सामान्य जनांच्या मनांत भरवून देण्याकरितां कथा, पुराणें, यात्रा वगैरे संस्थांच्या द्वारें कित्येक पिढ्या प्रयत्न चालले होते. त्यांच्या योगानें महाराष्ट्रांतील लोकमत जागृत झालें व सर्व लोकांची एकजूट बनविण्याचें बिकट कृत्य साध्य होणें शक्य झालें. पुढें शिवाजी महाराजांनीं स्वराज्याची मुहूर्तमेढ १६४६ त रोविल्यावर निराळेंच एक संकट उद्भवलें. तें हें कीं, महाराजांच्या सेवकसमुदायांत ह्मणजे मुत्सद्दीमंडळांत व सेनानायकांत परस्पर मत्सरभाव उत्पन्न होऊं लागला व स्वामिहित व देशहित साधण्याच्या कामीं व्यत्यय येऊं लागले ( समर्थांचा सेवाधर्म, दासबोध ). तेव्हां समर्थांसारिख्या थोर विभूति पुढें येऊन त्यांनीं ह्या स्वामिद्रोहरूपी व देशद्रोहरूपी रोगांचें उत्पाटन केलें ( सेवाधर्म, दासबोध ). आयुष्याची इतिकर्तव्यता काय, स्वामिद्रोह व देशद्रोह केल्यापासून आपलेंच अहित आपण कसें करितों, वगैरे विषयांची चर्चा करून, कुचर सेवकांना ताळ्यावर आणण्यास सुचर

सेवकांची भक्ति दृढ करण्यास, लोकांचे विचार सन्मार्गास लावण्यास व राजाला नीतीनें वर्तन करविण्यास, समर्थांसारख्या थोर विचारी महापुरुषांच्या ग्रंथांचा अत्यंत उपयोग झाला. महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापण्याच्या कामीं मराठ्यांच्या शौर्याचें व मराठ्यांच्या जुटीचें जितकें साहाय्य झालें तितकेंच, किंबहुना त्याहूनहि जास्त, साहाय्य समर्थांच्या उपदेशाचें झालें. राष्ट्रांतील लोकांना दिशा दाखविण्यास असल्या महात्म्यांची अवश्यकता सदां असते. समर्थ १६८१ त वारले. तदनंतर पंचवीस तीस वर्षे समर्थांच्या उक्तींचा नाद महाराष्ट्रांतील लोकांच्या कानांत घुमत होता. ह्या नादाच्या गुंगींत मराठ्यांनीं १७२० पर्यंत स्वराज्याची स्थापना केली. पुढें बाजीराव बल्लाळानें व बाळाजी बाजीरावानें हिंदुपद-बातशाहीची स्थापना करण्याच्या इरायानें बहुतेक सर्व हिंदुस्थान देश पादाक्रांत केला. त्यावेळीं ह्या मुत्सद्यांवर तिहेरी जोखीम आलें. पूर्वी शिवाजी व रामदास यांच्या वेळीं (१) सामान्य जनांचीं मनें तयार करावयाचीं व (२) सेवकलोकांत मत्सर शिरूं द्यावयाचा नाहीं एवढें दुहेरीच जोखीम त्यावेळच्या मुत्सद्यांच्या व विचारी पुरुषांच्या शिरा-वर होतें. आतां (१) सातारच्या महाराजांचें सूत्र राखावयाचें, (२) राजमंडळांतील व इतर सरदारांची मनधरणी करावयाचें (३) व जिंकि-लेल्या प्रदेशांतील लोकांचीं मनें आपल्याकडे वळवून घ्यावयाचें तिहेरी काम बाजीराव बल्लाळ व बाळाजी बाजीराव ह्या मुत्सद्यांना अवश्य झालें. ह्या तिहेरी का-माचें पहिलें कलम ह्मणजे शाहूराजाचें सूत्र राखण्याचें काम ह्या मुत्सद्यांनीं उत्तम साधिलें. त्या कामीं धावडशी येथील भार्गवराम बोवाचें साहाय्य पेशव्यांना चांगलें झालें. भार्गव-रामाचें शाहूवर वजन फार असून बाजीराव बल्लाळ व बाळाजी बाजीराव ह्यांच्याकडेहि पोटच्या पोराप्रमाणें त्याचा ओढा असे. त्यामुळें शाहूचें मन न दुखवितां पेशव्यांचें हित करून देणें धावडशीकर स्वामीला शक्य झालें. ज्याप्रमाणें शाहूराजाचें सूत्र ब्रह्मेंद्रानें राखिलें त्याप्रमाणें सरदारांची मनधरणी करण्यास व जिंकिलेल्या प्रदेशांतील लोकांचीं मनें मराठ्यांच्याकडे वळवून घेण्यास पेशव्यांनीं कांहीं व्यवस्था केली होती असें दिसत नाहीं. कायगांवकर वासुदेवदीक्षित टोक्यास व काशीस राहून सलावताच्या राज्यांत व काशीकर ब्राह्मणांत कांहीं खटपट करीत असत; परंतु त्यांच्या खटपटीहूनहि अवाढव्य खटपट करणारे व विचार पसरविणारे महापुरुष मराठ्यांच्या वाढत्या साम्राज्यांत एक जूट उत्पन्न कर-ण्यास हवे होते. कानडे, तेलंग, द्रवीड, गुजराथी, बुंदेले, रांगडे, पुरभय्ये, शीख वगैरे लोकांच्या मनांत महाराष्ट्रधर्माविषयीं प्रेम उत्पन्न करण्याकरितां कोणत्याहि संस्था पेशव्यांनीं स्थापलेल्या दिसत नाहींत किंवा त्या कामीं कोणा महापुरुषाचें साहाय्य घेतलेलेंहि आढळत नाहीं. ह्यामुळें तरवारीच्या जोरावर व मुत्सद्यांच्या युक्तीवर भिस्त ठेवून पेशव्यांना हिंदुस्था-नांत आपली सत्ता चालवावी लागे. मुसलमानांप्रमाणें पेशवेहि परकीय आहेत असा दुजा भाव जिंकलेल्या प्रदेशांत कायम राही व परशत्रु आला असतां पेशव्यांचें जूं झुगारून देण्यास तेथील लोक तयार असत. आपली सत्ता किती अस्थिर आहे ह्याचा अनुभव

पेशव्यांना पानिपतच्या मोहिमेंत पहिल्यांदां आला व तो मोठा भयानक आला. त्या वेळीं हिंदुस्थानांतील यच्चयावत् लोक मराठ्यांच्या विरुद्ध झाले. पानिपतची शेवटची लढाई होईतोंपर्यंत ह्या लोकांचा द्वेष पुरता कळून आला नाहीं हें कबूल आहे. सदाशिवराव विजयी झाला असता तर तो द्वेष कधीं कळूनहि न येता हेंहि कबूल आहे. परंतु, अपजय आला असतां हे सर्व लोक आपल्याला खाऊन टाकतील हें समजत असूनहि पेशव्यांनीं त्याचा उपशम करण्याची कांहीं एक खटपट केली नाहीं हेंहि कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. जिंकलेल्या लोकांचीं मनें आकर्षून घेण्यास व नवीन वळणावर नेण्यास पेशव्यांनीं व्यवस्थित प्रयत्न केले नाहींत हा त्यांचा मोठा दोष होता. परंतु तो दुसऱ्या एका दोषाच्या मानानें केवळ क्षुद्र आहे असें दृष्टोत्पत्तीस येईल. मल्हारराव होळकर, गोविंदपंत बुंदेले वगैरे कपटी, कुचर व स्वामिद्रोही सरदारांना ताळ्यावर व वठणीस आणण्यास पेशव्यांनीं कांहींच व्यवस्था केली नाहीं. ह्या सरदारांची स्वामिभक्ति कायम असती म्हणजे जिंकलेल्या प्रदेशांतील लोकांना जुलमानें वागवूनहि आपली सत्ता पेशव्यांना कायम ठेवितां आली असती. कदाचित् प्रथम प्रथम लहान सहान बंडें झालीं असतीं परंतु घरांतल्या घरांत भेद होऊन नाश होण्यापेक्षां तीं बंडें झालेलीं पुरवलीं असतीं. ह्यासंबंधानें रघुनाथरावदादानें एक मार्मिक वाक्य लेखांक २ त लिहिलें आहे. तो म्हणतो, " स्वजनविरोध व परराज्यांतील कलहाचें मूळ अजीपासूनच लागलें आहे. " सारांश, शिवाजीप्रमाणेंच बाळाजी बाजीरावानें व सदाशिव चिमणाजीनें हें स्वजनविरोधाचें बंड आधीं मोडून टाकिलें पाहिजे होतें. सरदारांची मनधरणी करण्याचें काम केवळ दपटशानें किंवा गोड बोलण्यानें भागण्याजोगें नव्हतें. त्याला रामदासासारखेच तिऱ्हाईत गृहस्थ सरदारांची कानउघाडणी करण्यास, हिंदुपदपातशाहीची दिशा दाखवून देण्यास व स्वामिभक्तीचें शिक्षण लावण्यास ह्या वेळीं हवे होते.

परंतु १७५० पासून १७६१ पर्यंतच्या अवधींत रामदासासारिख्यांचा टाहो कांहीं उपयोगीं पडला असतां किंवा कसें ह्याची शंकाच आहे. शिवाजीच्या वेळीं रामदासाला कांहीं मर्यादित व विवक्षित प्रदेशांत उपदेश द्यावयाचा असल्यामुळें त्याचें बोलणें सर्वांना ऐकू जाणें शक्य होतें. आतां महाराष्ट्रसाम्राज्याची मर्यादा बहुतेक आसमुद्र पसरली होती, मराठ्यांचे सरदार हिंदुस्थानांतील दूरदूरच्या प्रदेशांत वर्षेंच्यावर्षें वास्तव्य करून राहिले होते. त्यांना स्थानिक प्रीतीनें व स्थानिक द्वेषानें पछाडलेले होते. त्यांची व पेशव्यांची भेट दहा दहा पांच पांच वर्षांनींहि झाली तर होत असे. अशांचीं मनें सन्मार्गीं राखण्यास पेशव्यांच्या वतीनें शेंकडों रामदास वेळोवेळीं टोले मारण्यास त्यांजवळ राहिले पाहिजे होते. ज्यावेळीं एकहि रामदास सबंद महाराष्ट्रसाम्राज्यांत नव्हता त्यावेळीं शेंकडों रामदास असण्याची अपेक्षा करणें प्रायः दुरापास्त होतें. सारांश, सरदारांच्या उच्छृंखलवृत्तीला आळा घालतां येण्याजोगीं साधनें त्याकालीं पेशव्यांच्या जवळ नव्हतीं असेंच कबूल करणें ओघास येतें. सरदारांच्याप्रमाणें जिंकलेल्या प्रांतांतील लोकांचीं मनें

आकर्षून घेण्याचींहि साधनें पेशव्यांच्या जवळ नव्हतीं. कथा, पुराणें, यात्रा वगैरे संस्था सतराव्या शतकांतल्याप्रमाणें अठराव्या शतकांतहि चालू होत्या परतु, सतराव्या शतकांतला जिवंतपणा अठराव्या शतकांतील कथापुराणांत राहिला नव्हता. येणेंप्रमाणें मराठ्यांच्या राजकारणाला सरदारांचीं व प्रजेचीं मनें उपयोगीं पडण्यास योग्य जेणेंकरून होतील अशी–ग्रंथ, व्याख्यानें वगैरे–साधनसंपत्ति पेशव्यांनीं तयार न केल्यामुळें हिंदुस्थानांतील मराठे सरदार व तद्देशीय संस्थानिक व सामान्यजन पानिपतच्या मोहिमेच्या अगोदर व नंतर मराठ्यांच्याविरुद्ध उठले ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. ग्रंथसमूहाचा, धर्मव्याख्यानांचा, साधुसंतांचा व यात्राजत्रांचा उपयोग राष्ट्रांतील लोकांच्या मनाला नीट वळण देण्यास केवढा मोठा होतो ही गोष्ट शहाजी व शिवाजी ह्यांच्या मनांत जशी बिंबली होती तशी बाळाजी बाजीरावाच्या व सदाशिव चिमणाजीच्या मनांत भरलेली दिसत नाहीं. शिवाजी व बाळाजी ह्यांच्यामधील महदंतर हेंच होय. राज्यें मिळविण्यास जसा तोफांचा व शिपायांचा उपयोग होतो तसा तीं कायम राखण्यास व जतन करण्यास व्याख्यानांचा व विचारी पुरुषांचाहि होतो.

हें तत्त्व पेशव्यांच्या ध्यानांत कां आलें नाहीं ह्याचें कारण शोधण्यास फारसें लांब जावयास नको. त्या वेळीं महाराष्ट्रांत विद्येची व शिक्षणाची स्थिति कशी होती ह्याचा विचार केला असतां ह्या कारणाची अटकळ बांधितां येण्यासारखी आहे. त्या वेळच्या विद्येचे स्थूल मानानें तीन भाग करितां येतील:—( १ ) वैदिक, ( २ ) शास्त्रीय व ( ३ ) व्यावहारिक. वैदिक ब्राह्मण दश ग्रंथांचें पठन करीत; षट्शास्त्रांचा जिम्मा शास्त्रीपंडितांनीं घेतला होता; व ब्राह्मणवैश्यादि इतरजन व्यवहाराला उपयोगीं जें ज्ञान तें संपादन करीत. वैदिक व शास्त्रीपंडित ह्यांना राजाश्रय असे व व्यवहारिक शिक्षणाच्या शाळेंतील पंतोजींना लोकाश्रय असे. व्यवहारशिक्षणांत अक्षरांचे कित्ते, संसारचोपडी, बरावर्दीगणित, मराठ्यांच्या व मुसुलमानांच्या बखरी व तवारिखा, विक्रमबत्तीशी, वेताळपंचविशी, शुकबहात्तरी, लटकचाळिशी, भारत, भागवत व रामायण ह्या “ इतिहासग्रंथांतील ” आख्यानांच्या मराठी बखरी, रामरक्षादि स्तोत्रें, जमाखर्चाच्या पद्धति, भूमापन, पत्रें लिहिण्याचें मायने, मराठी कविता, वगैरेंचा समावेश होत असे. पुरुषाप्रमाणें अत्यंत कुलीन स्त्रियांनाहि लिहितां वाचतां येत असे. व्यवहारशिक्षण बहुतेक सर्व ब्राह्मणांना, वैश्यांना व उच्चप्रतीच्या मराठ्यांना मिळत असे. गृहस्थ, ब्राह्मण व मराठे ह्यांचे धंद्याच्या मानानें तीन वर्ग करितां येतील:–(१) स्वतःची शेतवाडी पहाणारे, ( २ ) कारकुनीचा धंदा करणारे, ( ३ ) व शिपायगिरीची पेशा स्वीकारणारे. ह्या तिन्ही धंद्यांतील लोकांना वर सांगितलेल्या व्यवहारशिक्षणाच्या पलीकडे माहिती ह्मटली ह्मणजे वयपरत्वें येणाऱ्या जगाच्या अनुभवाखेरीज जास्त कांहीं एक नसे. कारकुनांना व शिपायांना हिंदुस्थानचें भूज्ञान स्वतः हिंडून जें कांहीं मिळे त्यापलीकडे बिलकुल नसे. हिंदुस्थानाव्यतिरिक्त इतर देशांचें भूज्ञान ह्या लोकांना कांहींच नसे. निपाणीजवळ भोज येथील कुळकर्ण्यांच्या येथें मला एक अठराव्या शतकांतील पृथ्वीचा नकाशा

सांपडला. त्यांत सप्तसमुद्रात्मक पृथ्वी शेषाच्या मस्तकावर दिली असून, चीन, इंग्लंड, रावणाची लंका वगैरे देशांच्या दिशा स्थूल मानानें बरोबर दाखविल्या आहेत व हिंदुस्थान चतुष्कोणाकृति काढिला असून तासगांव हिंदुस्थानचा मध्य धरिला आहे. परंतु हें भूगोलज्ञान सामान्य जनांचें झालें. स्वत: पेशवे व त्यांचे सरदार ह्यांचें भूगोलज्ञान ह्या लोकांच्यापेक्षां अर्थात् जास्त विस्तृत व व्यवस्थित असे. फिरंगी, फराशिस, वलंदेज, डिंगमार, आफ्रंदोर, दुराणी, तुराणी, अरब, गिलच्ये, हबशी, शामळ, तुर्क, यवन, इराणी, शिद्दी, इंग्रज, मोरस, आफरीदी, वगैरे अठरा टोपीवाल्यांचे देश, व हिंदुस्थानांतील राजांचे छपन्न देश पेशव्यांना व त्यांच्या मुत्सद्यांना कित्येक नांवानें व कित्येक स्वदृष्टीनें माहीत होते. देशोदेशीचे वकील पेशव्यांच्या दरबारीं मोठ्या इतमामानें रहात असत (का. पत्रें, यादी वगैरे १३४ ). त्यांजपासूनहि त्यांच्या देशांची माहिती पेशव्यांना मिळत असण्याचा अवश्य संभव आहे. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांचे नकाशे पेशव्यांजवळ असत. लढाया झाल्या ह्मणजे तह ज्याअर्थी होत त्याअर्थी पेशव्यांजवळ नकाशे असत हें मुद्दाम सांगण्यांत विशेष मुद्दा आहे असें नाहीं. महाराष्ट्रांत बखरी वाचण्याचा व लिहिण्याचा प्रघात फार असे. तेव्हां मराठ्यांच्या व यवनांच्या इतिहासाचें ज्ञान महाराष्ट्रांत बहुश: सार्वत्रिक होतें असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. पाणिपतच्या बखरीचा कर्ता रघुनाथ यादव यानें त्या बखरीच्या १९ व्या पृष्ठावर मराठ्यांच्या सर्वव्यापी सत्तेचा पसार कसकसा होत गेला व सर्व हिंदुस्थान हिंदुमय करून टाकण्याचा मराठ्यांचा मनोदय होता वगैरे गोष्टी अवदालीच्या तोंडून वदविल्या आहेत. त्यावरून इतिहास व भूगोल ह्यांचें ज्ञान रघुनाथ यादवाला थोडें थोडकें नव्हतें असें दिसून येतें. रूमशाम ह्मणजे कुस्तुंतुनिया येथें इ. स. १७३० पासून १७५४ पर्यंत राज्य करणाऱ्या सुलतान महमदाचेंहि नांव रघुनाथ यादवाला माहीत होतें ( र. या. पा. ब. पृ. १९, टीप ) असें त्यावरून ठरतें. भूगोल व इतिहास ह्यांची माहिती बाळाजी बाजीरावाला व सदाशिव चिमणाजीला आपल्या कामापुरती यथास्थित होती ह्यांत संशय नाहीं. परंतु, युरोपांत तत्कालीन दरबारांतून ह्मणजे पंधरावा लुई, वडा फ्रेडरिक, दुसरा जार्ज ह्यांच्या दरबारांतून व राज्यांतून भूगोलाचें व इतिहासाचें जें ज्ञान त्यावेळीं होतें त्याच्या मानानें पेशव्यांच्या दरबारचें इतिहासाचें व भूगोलाचें ज्ञान अगदींच क्षुद्र होतें हें कबूल करणें योग्य आहे. कपिल, कणाद वगैरे पुराणमुनींनीं प्रणीत शास्त्रांच्या व्यतिरिक्त यूरोपांत ठाऊक असलेल्या शास्त्रांचा गंधहि पेशव्यांच्या राज्यांत कोणाला नव्हता. पाठशाळा, विद्यापीठें, विद्वत्सभा, अजबखाने, वादसभा, शोधसभा, पृथ्वीपर्यटणें, वगैरे यूरोपियन सस्था पेशव्यांच्या राज्यांत नव्हत्या इतकेंच नव्हे; तर त्या दुसरीकडे कोठें आहेत किंवा काय ह्यांचाहि पत्ता महाराष्ट्रांत कोणाला नव्हता. ह्या नकारात्मक वाक्यांचा इत्यर्थ एवढाच कीं १८ व्या शतकाच्या पूर्वार्धांत व उत्तरार्धांत मराठ्यांची संस्कृति यूरोपांतील प्रगत राष्ट्रांच्या संस्कृतीहून कमी दर्जाची होती. ती कोणकोणत्या गोष्टींत तशी होती त्याचा अंशत: निर्देश वर झालाच आहे. एक दोन विशेष मुद्यांचा विचार पुढें करितों.

अठराव्या शतकांतील पश्चिम यूरोपांतील संस्कृतीची व महाराष्ट्रांतील संस्कृतीची तुलना करूं पहातां शेंकडों भेद दृष्टीस पडतात. पैकीं कांहींचाच उल्लेख करणें येथें इष्ट आहे.

( १ ) मराठ्यांच्या संस्कृतींत प्रथम व्यंग ह्मटलें ह्मणजे त्यांना छापण्याची कला माहीत नव्हती व ती माहीत करून घेण्याचा त्यांनीं कधीं प्रयत्नहि केला नाहीं. १४९८ च्या ११ मेला गामानें हिंदुस्थान शोधून काढिलें. तेव्हांपासून १७६० पर्यंत फिरंग्यांच्या व मराठ्यांच्या मुलाखती अनेक ठिकाणीं झाल्या. गोमांतक, सांवतवाडी, वसई, कोची, दाभूळ, दिव, दमण वगैरे स्थलीं मराठ्यांच्या फिरंग्यांशीं गांठी पडलेल्या आहेत. वलंदेज ( डच् ) व डिंगमार ( डेन ) ह्या लोकांनाहि मराठे ओळखत असत. मुसाबूसी वगैरे फ्रेंच लोकांशीं तर मराठ्यांची चांगलीच घसट असे. मुंबई, सुरत, बाणकोट, विजयदुर्ग, राजापुरी, दाभोळ वगैरे ठिकाणीं इंग्रजांचीहि जानपछान मराठ्यांना झाली होती. मुंबईतील परभू, शेणवई, पारशी, भाटे व वाळुकेश्वरचे छत्रे, भातखंडे वगैरे ब्राह्मण पुजारी व वैरागी इंग्लिश लोकांशीं हरहमेश दळणवळण ठेवीत. कित्येकांना चांगलें इंग्रजी लिहितां व बोलतां येत असे. त्यांनीं छापील पुस्तकें पाहिलीं होतीं ह्यांत संशय नाहीं. नानाफडणिसाच्या दफ्तरांत छापील इंग्रजी नकाशे अद्यापहि आहेत. मोरोबादादाच्या घरच्या पुस्तकालयांत एक इंग्रजी चोपडी होती असें त्याच्या पुस्तकांच्या यादीवरून कळतें. असे असून ह्मणजे यूरोपांतील सर्व देशचे लोक त्यांच्या दारीं उभे असून, मराठ्यांनीं छापण्याची कला कशी घेतली नाहीं ह्याचें मोठें आश्चर्य वाटतें. मराठ्यांच्या वाढत्या साम्राज्यांत योग्य कल्पनांचें बीं पेरण्यास ह्या कलेचाच प्रवेश महाराष्ट्रांत झाला पाहिजे होता. घोरपडे, शिंदे, होळकर, भोसले, कोल्हापूरकर, सांवत, आंग्रे वगैरे सरदारांच्या पदरीं फिरंगी, फराशिस, इंग्रज वगैरे बरेच देशचे लोक पेशवाई जाईतोंपर्यंत व पुढें देखील होते; असें असून ज्याअर्थी मराठ्यांनीं ही कला उचलली नाहीं त्याअर्थी त्यांच्या ग्राहकशक्तीच्या कीर्तीला बराच कमीपणा येतो हें निर्विवाद आहे. ( २ ) मुद्रणकलेसारखा उघड उघड डोळ्यावर येणारा गुण ज्या लोकांच्या ध्यानांत आला नाहीं त्यांचें भूगोलाचें व इतिहासाचें ज्ञान कोतें असावें ह्यात मोठें नवल नाहीं. ( ३ ) परंतु ज्या वस्तूंची मराठ्यांना दर घडीस अत्यंत जरूर लागत असावी असा आपण तर्क करितों त्यांपैकींहि कांहीं वस्तु मिळविण्याची मराठ्यांनीं इच्छा दर्शविली नाहीं व प्रयत्न केला नाहीं. धुळपांना व आंग्र्यांना लोहचक्काची व तारवें बांधण्याच्या गोद्यांचा जरूर विशेष होती. ह्या दोन्ही गोष्टी त्यांनीं इंग्रजांच्या गलबतांतून व मुंबईंत पाहिल्या होत्या. परंतु त्या स्वतः बनविण्याची उत्कट इच्छा त्या प्रांतांतील लोकांना किंवा पुणें येथील मुत्सद्यांना झाली नाहीं हें मोठ्या कष्टानें कबूल करावें लागतें. ह्या इतक्या बाबींत मराठ्यांचें पाऊल मागें होतें. परंतु ( ४ ) एका बाबींत त्यांनीं आपली ग्राहकशक्ति चांगली दाखविली होती. ती बाब ह्मटली ह्मणजे कलेच्या तोफा व कवायती सैन्य ठेवण्याची तयारी ही होय. ह्या कामीं युरोपियन लोकांची श्रेष्ठता मराठ्यांनीं पाहिली होती. तेव्हां केशवराव पानशी, इब्राईमखान आणि मुजफ्फरखान गारदी ह्या इसमांकडून

त्यांनीं ह्या वाग्नींत प्रावीण्य संपादण्याचा प्रयत्न केला ही अभिनंदनीय गोष्ट आहे. उदगीरच्या लढाईंत तोफा मारून मराठ्यांनीं मोगलाला खालीं पाडिलें व तोफा मारूनच अबदालीलाहि चीत करण्याचा त्यांचा विचार होता. हा विचार बहुशः सफल झाला असतां; परंतु, गोविंदपंत बुंदेल्यानें व मल्हारराव होळकरानें हरामखोरी केल्यामुळें ह्या सफलतेस दिरंग लागला. आतां हे गाडदी मराठ्यांना कितपत मानवले तें पाहण्यासारखें आहे. १७५० त सलाबतानें व १७५१ त मराठ्यांनीं गाडदी ठेवण्यास प्रारंभ केला. १७५३ त गाड्यांचा मुख्य जो बुसी त्यानें सलाबताला निर्माल्यवत् केलें. १७५९ त श्रीरंगपट्टणांतील गाड्यांचा मुख्य जो हैदर त्यानें श्रीरंगपट्टणची गादी बळकाविली. १७६१ त बाळाजीच्या मृत्यूच्या दिवशीं पुण्यांत गार्दी दंगा करणार होते ( लेखांक २८६ ). १७७३ त गाड्यांनीं नारायणरावास ठार मारिलें. येणेंप्रमाणें यूरोपियन कवाईत शिकलेले गार्दी लोक हिंदुस्थानांतील देशी राजांना चांगलेसे मानवले नाहींत हें उघड आहे. विदेशी लोकांचीं पथकें प्रसंगानुसार धन्याच्या उरावरहि बसण्यास मागें पुढें पहात नाहींत ह्याचा अनुभव प्रिटोरियन गाड्यांनीं रोमच्या पातशाहांस व जानिझारांनीं तुर्कस्थानच्या पातशाहांस जसा आणून दिला तसा मराठ्यांसहि लवकरच आणून दिला. इंग्रजांच्या हातीं महाराष्ट्र गेलें नसतें तर ह्या गार्द्यांच्या हातांत तें पुढें मागें गेल्याशिवाय राहिलें नसतें असा माझा तर्क आहे. ह्या गाड्यांचें स्तोम महाराष्ट्रांत पुढें पुढें तर फारच वाढलें. बहुतेक सर्व लहान मोठ्या सरदारांच्या पदरीं गार्दी असत. खुद्द नानाफडणिसाच्या मेणवलीस गाड्यांचा पाहरा असे. देशी शिपाई टाकून विदेशी शिपाई जवळ ठेवण्यांत मोठीशी मुत्सद्देगिरी होती असें नाहीं !

## विवेचन सातवें.

पानिपतच्या लढाईचे परिणाम काय झाले? तर ( १ ) प्रथम मराठ्यांचें पाऊल आंत आलें. ( २ ) नजीबखानाला आपला प्रांत व दिल्लीचें कांहीं वेळ पुढारपण मिळालें. ( ३ ) होळकराची पेशव्यांचीं क्षेत्रें बडविण्याची भीति नाहींशी झाली. ( ४ ) सुजाउद्दौल्याला अयोध्या, काशी, प्रयाग वगैरे प्रांतांत मराठ्यांचा उपद्रव पुन्हा झाला नाहीं. ( ५ ) रोहिले मराठ्यांच्या कचाटींतून सुटले. ( ६ ) जानोजी भोसल्याचें कांहीं वेळ वजन वाढलें. ( ७ ) गायकवाड जिवंत राहिले. ( ८ ) जजिऱ्याच्या हबशाला दम आला. ( ९ ) दिल्लीच्या पातशाहाचें दैन्य दुणावलें. ( १० ) स्वामिभक्त शिंद्यांना गेलेली सत्ता पुन्हां स्थापण्याची दुवार मेहनत पडली. ( ११ ) पुंड, पाळेगार व मवासी ह्यांना दंगे करण्यास अवधि मिळाली. ( १२ ) सलाबतजंगाचा प्रधान निजामअली ह्याला गेलेला प्रांत मिळविण्याचा हुरूप आला. ( १३ ) मराठ्यांच्या ताब्यांत श्रीरंगपट्टण जावयाचें राहून हैदरअलीला तेथें आपली सत्ता स्थापितां आली. ( १४ ) रजपुत संस्थानिकांना कांहीं एक न मिळतां उलट पुढें मराठ्यांकडून जाच मात्र जास्त झाला. ( १५ ) साताऱ्याच्या छत्रपतींचें नांव समूळ नाहींसें व्हावयाचें तें झालें नाहीं. ( १६ ) साताऱ्याची व कोल्हापूरची गादी जोडण्याचें काम तहकूब

झालें. ( १७ ) पश्चिमोत्तर प्रदेशांत शिख लोकांची सत्ता रूजून वाढीस लागली. ( १८ ) बंगाल्यात व मद्रासेंत इंग्रजांची सत्ता कायमची स्थापिली गेली. १७६१ च्या पुढें हिंदुस्थानची पातशाही मिळविण्याची चढाओढ इंग्रज व मराठे ह्यांच्यामध्यें लागली. तिची आस्ते आस्ते वाढ १७९६ पर्यंत होत होती. नानाफडणिसाच्या शहाणपणानें इतर संस्थानांप्रमाणें मराठ्यांना इंग्रजांनीं गिळले नाहीं इतकेंच कायतें श्रेय नानाच्या मुत्सद्देगिरीला देतां येतें. परंतु इंग्रजांची संस्कृति मराठ्यांच्या संस्कृतीहून श्रेष्ठ होती. ही गोष्ट लक्ष्यांत आणिली असतां एवढें देखील श्रेय मिळविणें ह्मणजे मोठीच कर्तबगारी करणें होय असें निःपक्षपातानें कबूल करणें भाग पडतें व ( १९ ) अबदालीला पानिपतच्या मोहिमेपासून कांहीं एक फायदा झाला नाहीं. मराठ्यांची हानि झाली खरी; परंतु अबदालीच्यांतहि फारसा राम राहिला नाहीं. जर त्याच्या अंगीं कांहीं सामर्थ्य राहिलें असतें तर तो बाबराप्रमाणें हिंदुस्थानांत रहाता. परंतु पानिपतची लढाई झाल्याबरोबर त्यानें तडक विलायतेचा रस्ता धरिला. तो दिल्लीचा पातशाहहि झाला नाहीं; त्याला पंजाबांतील प्रांतहि मिळाला नाहीं व त्याला ह्मणण्यासारखी लूटहि मिळाली नाहीं. एवंच अबदालीनें हिंदुस्थानांत येऊन कांहींच साधिलें नाहीं ! ! ! मग त्यानें हा खटाटोप कशाकरितां केला ? स्वार्थ त्यानें कोणता साधिला ? परमार्थ त्याला कोणता लाधला ! “ ते के न जानीमहे ” ह्मणून कोणी संस्कृत कवि आश्चर्यानें उद्गार काढतो ते खरे आहेत. ( २० ) गोविंदपंताच्या पुत्रांना किंवा अनुयायांना पानिपतच्या मोहिमेंत व लढाईंत कुचराई केल्याबद्दल कांहीं एक प्रायश्चित्त मिळालें नाहीं. योग्य चाकरी न केल्यास पुढें लढाई झाल्यानंतर फार कठीण जाईल वगैरे धमकीचीं पत्रें सदाशिवरावानें गोविंदपंताला लिहिलीं होतीं. परंतु गोविंदपंताची हरामखोरी बाळाजी बाजीरावाला माहीत नसल्यामुळें, १६ जानेवारी १७६१ ला ह्मणजे पानिपतची लढाई होऊन तीन दिवसांनीं व गोविंदपंत वारल्यापासून २५ दिवसांनीं बाळाजी बाजीरावानें गंगाधरपंताला समाधानाचें पत्र पाठविलें, त्यांत गोविंदपंताची तारीफ केली होती ( मराठ्यांचे पराक्रम, पृष्ठ १४७ ). ह्यावरून असें दिसतें कीं सदाशिवरावभाऊनें व नारो शंकरानें मोहीम होत असतांना गोविंदपताला पाठविलेलीं पत्रें १६ जानेवारी १७६१ पर्यंत पेशव्यांच्या नजरेस पडलीं नाहींत. पुढेंहि कधीं हीं पत्रें पेशव्यांच्या नजरेस पडलीं नाहींत. पानिपतची मोहीम चालू असतां सदाशिवराव भाऊचीं, नारो शंकराचीं, बाळाजी बाजीरावाचीं व इतर लोकांचीं गोविंदपताला आलेलीं सर्व पत्रें येरंडयांच्याजवळ राहिलीं. हीं पत्रें येरंडयांच्या हातांत येण्याचें कारण नक्की काय असावें तें कळत नाहीं. परंतु गोविंदपताच्या विरुद्ध पुरावा ह्मणून येरंडयांनीं त्यांचा तावा घेतला असावा असा तर्क करणें साहजिक आहे. पानिपतची मोहीम झाल्यावर, खरें ह्मटलें असतां, गोविंदपंत बुंदेल्याचें कृष्ण कारस्थान बाहेर पडावयाचें. परंतु येरंड्यांची गोविंदपंताच्या चिरंजीवांनीं मूठ दाबिली ह्मणा किंवा रघुनाथरावदादा व सखारामपंत बोकील ह्यांच्या अंतस्थ मसलतीनें ह्मणा, गोविंदपंताचें हें बेंड

बाहेर पडलें नाहीं. नाहीं तर, मल्हाररावासारख्याचाहि समाचार घेण्यास ज्यानें मागें पुढें पाहिलें नाहीं त्या माधवरावानें गोविंदपंताच्या वंशजांना शिक्षा दिल्यावांचून सोडिलें असतें असें संभवत नाहीं. गोविंदपंताच्या वर्तनाची चौकशी करण्यास बाळाजी बाजीरावास स्वास्थ्यहि नव्हतें व वेळहि नव्हता. पानिपत येथील भयंकर वृत्त ऐकून बाळाजीच्या मनानें पराकाष्ठेची धास्ती घेतली व तेव्हांपासून कामकाज बघण्याला त्याचें मन घेईना. ह्या अवधींत बहुतेक सर्व कारभार रघुनाथरावदादा व सखारामबापू ह्या दोघांनीं आवरला होता. ह्या दोघांनीं सदाशिवरावभाऊला विघ्नें आणण्याचें काम चालविलें होतें असा बळकट संशय घेण्यास कारणें आहेत ( ऐतिहासिकलेखसंग्रह. २५ ,७१ ). ह्या विघ्नें आणण्याच्या खटपटींत गोविंदपंत व त्याचे चिरंजीव आणि येरंडे हे, एकेक किंवा सर्व मिळून एकाच वेळीं, किंवा एका पाठीमागून एक, समयानुसार, निरनिराळ्या कार्यांकरितां निरनिराळ्या कारणांनीं प्रोत्साहित होऊन, सदाशिवरावाच्या विरुद्ध गेले असावे व पुढें केलेलीं कारस्थानें गोपन करणें सर्वांनाच इष्ट व सोयीचें वाटलें असावें असा संशय येतो. उत्तरेकडील सरदारांचीं मनें कलुषित करण्यास कारण कांहीं अंशीं सखारामबापू झाला असें ह्मणण्यास आधार आहे. तसेंच, बाळाजी बाजीराव ज्या दिवशीं दिवंगत झाले त्या दिवशीं गार्द्यांचा दंगा होणार होता ( लेखांक २८६ ); त्यांत रघुनाथरावाचें व सखारामबापूचें अंग असावें असा संशय येतो. रघुनाथरावानें हा दंगा जागच्या जागीं जिरविला असें जरी पत्रांत लिहिलें आहे तत्रापि हीच गोष्ट रघुनाथरावाच्या विरुद्ध पुराव्याच्या रूपानें आणितां येण्याजोगी आहे. सखारामाचीं कारस्थानें अशींच भूल पाडणारीं असत. आपणच दंगा करवावयाचा, आपणच तो मोडण्याचें श्रेय घ्यावयाचें व घटकेंत आपणच राजनिष्ठ बनावयाचें, हे सर्व खेळ सखारामाचे होत ! ह्यावेळचीं सखारामबापूचीं व रघुनाथरावाचीं पत्रें जर पुढें मागें कोठें सांपडलीं तर त्यांत ह्यासंबंधीं उल्लेख अवश्य निघेल असें भविष्य करून ठेवण्यास हरकत नाहीं. असो. सखारामाच्या कारस्थानानें गोविंदपंताच्या चिरंजीवांचा बचाव झाला हाच संशय दृढ होतो. गोविंदपंताच्या विरुद्ध पुराव्याचीं पत्रें येरंड्यानें जीं दडवून व लपवून वाई येथें आपल्या वाड्यांत ठेविलीं तीं हा कालपर्यंत कोणाच्या दृष्टीस पडलीं नाहींत. पेशव्यांच्याहि तीं दृष्टीस पडलीं नाहींत व ग्रांटडफच्याहि नाहींत. त्यामुळें गोविंदपंताचा संशय कोणालाच आला नाहीं. अर्थात् पानिपतच्या मोहिमेचें मुख्य सूत्र कोठें होतें व खरें स्वरूप काय होतें तेंहि आजपर्यंत कळलें नव्हतें. सध्यां ह्या ग्रंथांत छापलेल्या पत्रांच्या द्वारें ह्या स्वरूपाच्या कांहीं भागाचा उलगडा झाला आहे. राहिलेल्या भागांचा उलगडा, मल्हाररावाचा, रघुनाथरावदादाचा व सखाराम भगवंताचा ह्या वेळचा पत्रव्यवहार सांपडे तोंपर्यंत, व्हावयाचा नाहीं. ( २१ ) रघुनाथरावदादाचें व सखारामबापूचें खरें स्वरूप बाहेर पडण्यास संधि मिळाली. सखारामबापूच्या सल्ल्यानें रघुनाथरावानें माधवरावाशीं लढाई आरंभून राज्याधिकार मिळविण्याचा प्रयत्न केला. सखाराम कलिपुरुष आहे अशी गोपाळराव पटवर्धनाची खात्री झालेली होती. परंतु, बाळाजी बाजीरावाचा सखारामावरती

पूर्ण विश्वास होता. तो किती अस्थानीं होता हें पानिपतची लढाई झाल्यानंतर स्पष्टपणें कळून आलें.

## विवेचन आठवें.

१७५० पासून १७६१ पर्यंतच्या मराठ्यांच्या इतिहासाचा थोडावहुन उलगडा करण्याचा अल्प प्रयत्न मागील सात विवेचनांत केला आहे. त्यावरून असें मत होतें कीं काव्येतिहाससंग्रह, ऐतिहासिकलेखसंग्रह व प्रस्तुतचा ग्रंथ ह्या तीन पुस्तकांत जो पत्रव्यवहार सांपडला आहे तो अत्यंत त्रोटक आहे. ह्या दहा वर्षांत मराठ्यांचा खटाटोप केवढा अवाढव्य होता हें दाखविण्यास त्याचा उपयोग झाला आहे हें खरें आहे. परंतु, ह्या खटाटोपाचा व त्याच्या निरनिराळ्या अंगांचा सविस्तर, सकारण व विश्वसनीय वृत्तांत देतां येण्यास अद्यापि पुष्कळच आणखी पत्रव्यवहार सांपडला पाहिजे. तो कोठें व कोणापाशीं सांपडेल ह्याचा खुलासा खालीं करतों. ह्या ग्रंथाच्या शेवटीं व्यक्तींच्या नांवांचें एक विल्हेवार परिशिष्ट दिलें आहे. त्या व्यक्तींच्या राहण्याच्या स्थलांचा शोध काढून त्यांचीं दप्तरें तपासलीं पाहिजेत. इनाम कमिशनच्यावेळीं महाराष्ट्रांतील बहुतेक गांवचीं दप्तरें इंग्रजसरकारानें तपासलीं आहेत. त्यांतील सनदा वगैरे कामाचे कागद वगळून बाकीचे सर्व किंवा बहुतेक कागद अद्याप जसेच्या तसेच आहेत ते तपासण्याचें काम त्या त्या प्रांतांतील व गांवांतील शोधक लोकांनीं केलें पाहिजे. किंवा एखादी इतिहासाच्या साधनांचा शोध करणारी मंडळी स्थापण्यांत येऊन तिच्या सभासदांनीं हें काम करण्याचें पत्करिलें पाहिजे. शोध करणारे गृहस्थ इतिहासज्ञ असल्यावांचून दप्तरें नीट तपासलीं जाणार नाहींत. खुद्द दप्तरांच्या मालकांना आपल्या दप्तरांत काय आहे हें माहीत नसण्याचा बहुत संभव असतो. शिवाय कोणी शोधक त्यांच्याकडे शोध करावयास गेल्यास त्याला नकारात्मक उत्तर देण्याची इतिहासाच्या औदासीन्यामुळें त्यांना सवय लागलेली असते. कोठें कोठें इतिहासाचें महत्व जाणणारे दप्तरांचे मालक आढळतात. आपण स्वत: दप्तर पाहून इतिहासाच्या उपयोगीं कागद काढून देऊं ह्मणून त्यांचा आग्रह असतो. परंतु शोधकांनीं स्वतःच दप्तर पहावें हें उत्तम. इतिहासाला उपयोगीं कागदपत्र टाकून देण्याचें व निरुपयोगीं पत्रें दिसावयाला चांगलीं दिसतात ह्मणून दाखविण्याचें व्यसन कित्येकांना लागलेलें माझ्या पाहण्यांत आहे. ह्याकरितां होईल तितकें करून शोधकांनीं स्वत: रुमाल, कागद व गळाठा तपासावा हें विशेष फायद्याचें आहे.

## विवेचन नववें.

पहिल्या विवेचनांत ग्रांटडफच्या पद्धतीचा किंवा पद्धतीच्या अभावाचा विचार करून मराठ्यांचा इतिहास भौतिक व आत्मिक अशा दोन्ही पद्धतींनीं लिहिला असतां सर्वांगांनीं संपूर्ण होईल ह्मणून सांगितलें आहे. हा सर्वांगांनीं संपूर्ण असा इतिहास लिहावयाचा ह्मटला ह्मणजे अगोदर नानातऱ्हेची तयारी झाली पाहिजे. प्रथम धर्म, नीति, विद्या, समाज, व्यापार, कृषि, कलाकौशल्य, कायदेकानू, राजकारण, मोहिमा वगैरे प्रकरणांसंबंधी अस्सल

वा. १. ३४२



कागदपत्र शुद्ध छापले गेले पाहिजेत. त्यांवरून त्या त्या प्रकरणांतील प्रसंगांचा कालनिर्णय केला पाहिजे व नंतर मराठ्यांच्या इतिहासाची इमारत रचण्यास हात घातला पाहिजे. ही पूर्वीची मेहनत होण्याच्या अगोदर मराठ्यांचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला असतां तो नानातऱ्हेनें अपूर्ण व अविश्वसनीय होण्याची बहुतेक खात्री आहे. आजपर्यंत मराठ्यांचा इतिहास आपापल्या मतीप्रमाणें संपूर्ण अथवा अंशत: लिहिण्याचा प्रयत्न कांहीं लोकांनीं केला आहे. शिवाजी, संभाजी, शाहू, बाजीराव, नाना फडणिस, हरिपंत फडके, परशुराम भाऊ पटवर्धन, बापु गोखले, अहिल्याबाई होळकर, मल्हारराव होळकर. गोविंदपंत बुंदेले, महादजी शिंदे, रामदासस्वामी, जयरामस्वामी, वगैरे ऐतिहासिक पुरुषांचीं चरित्रें आजपर्यंत छापून प्रसिद्ध झालीं आहेत. तसेच मराठ्यांच्या समग्र चरित्राचे इतिहासहि कित्येक बाहेर पडले आहेत. परंतु, ह्या चरित्रांपैकीं व इतिहासांपैकीं फारच थोड्यांत ऐतिहासिक शोध करून व्यवस्थित रीतीनें प्रसंगांच्या व पुरुषांच्या महत्त्वाप्रमाणें लिहिण्याचा प्रयत्न केलेला दृष्टीस पडतो. जीं कांहीं इतिहासाचीं साधनें आजपर्यंत छापलीं गेलीं आहेत त्यांच्या आधारावर हीं पुस्तकें तयार केलेलीं आहेत. आजपर्यंत मिळालेलीं साधनें कामाला पुरेशीं आहेत अशी बहुतेक ग्रंथकारांची तृप्ति झालेली दिसतें. बखरींतून सांपडणारा मजकूर ग्रांटडफच्या ग्रंथांतून सांपडणारा आहे; तेव्हां तो ग्रंथकार सर्वस्वीं विश्वसनीय आहे असाहि कित्येकांचा ठाम मह झालेला वाचण्यांत येतो ( लक्ष्मणराव चिपळोणकरकृत मराठ्यांचा इतिहास, प्रस्तावना ). ग्रांटडफच्या ग्रंथांतून मिळणाऱ्या माहितीपेक्षां जास्त माहिती काव्येतिहाससंग्रहांतील पत्रांत आली असून डफच्या ग्रंथांत बहुतेक सर्व महत्त्वाच्या गोष्टी आल्या आहेत इतकेंच नव्हें, तर कित्येकांचा बारीक पाल्हाळहि त्यानें केला आहे असेंहि एका ग्रंथकाराचें ह्मणणें आहे ( नातूकृत महादजीचें चरित्र, प्रस्तावना ). सर्व बखरींचा एकीकृत आधार घेतला असतां तो विश्वासार्ह होतो असेंहि ह्या ग्रंथकारानें प्रतिपादिलें आहे. परंतु, हीं सर्व विधानें भ्रामक आहेत हें मीं ह्या प्रस्तावनेंत १७५० पासून १७६१ सालापर्यंतच्या इतिहासासंबंधानें तरी साधार दाखवून दिलें आहे. माझ्या मतें, ग्रांटडफचा ग्रंथ बहुत प्रकारें अपूर्ण आहे इतकेंच नव्हें; तर कित्येक ठिकाणीं तो अविश्वसनीयहि आहे. त्यानें मराठ्यांच्या इतिहासांतील बहुतेक प्रसंगांचें वर्णन दिलें आहे अशी बिलकुल गोष्ट नाहीं. आपल्या ग्रंथाचे पहिले सोळा भाग बखरवजा समजावें ह्मणून तो स्वत: लिहितो. १७५० पासून १७६१ पर्यंतचा ग्रांटडफच्या ग्रंथाचा भाग बखरींपेक्षां थोडासा बरा आहे, परंतु ह्यापेक्षां जास्त शिफारस त्या ग्रंथाची करितां येत नाहीं ह्मणून मागें मीं सिद्ध करून दाखविलें आहे. असें असून त्याचा ग्रंथ बहुतेक पूर्ण आहे ह्मणून जे कित्येक लोक ह्मणतात तो केवळ गैर समजुतीचा प्रकार आहे. तसेंच ग्रांटडफचा ग्रंथ आधाराला घेऊन ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून चरित्रें किंवा इतिहास लिहिले आहेत त्यांचीहि किंमत ग्रांटडफच्या बरोबरच करणें रास्त आहे. आजपर्यंत जितकीं ह्मणून चरित्रें किंवा इतिहास मराठींत लिहिले गेले आहेत तितक्यांची व्यवस्था ही अशी आहे. अशी जर व्यवस्था आहे तर मग मराठ्यांचा इतिहास लिहावा

तरी कसा असा प्रश्न साहजिक उद्भवतो. ह्याला उत्तर असें आहे कीं मराठ्यांचा इतिहास शास्त्रीय पद्धतीनें लिहिला तरच त्याला कांहीं किंमत देतां येईल. इतिहास लिहिण्याला प्रस्तुतची संधि महाराष्ट्रांतील लोकांना मोठी उत्तम आली आहे. इतिहास उत्तम तऱ्हेनें कसा लिहितां येईल ह्याची फोड युरोपांतील शास्त्रज्ञांनीं करून ठेविलेली आहे. ह्या फोडीचा फायदा करून घेऊन मराठ्यांच्या इतिहासाची इमारत उभारली पाहिजे. यूरोपांत सतरा व्या व अठराव्या शतकांत इतिहासकारांनीं व चरित्रकारांनीं ज्या चुक्या केल्या त्याच जर आपण एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं करूं लागलों तर एकोणिसाव्या शतकांतील यूरोपाशीं आपला परिचय व्यर्थ झाला असें होईल. मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांनीं खालील कलमें लक्ष्यांत बाळगिलीं पाहिजेत. ( १ ) कोणताहि पूर्वग्रह घेऊन इतिहास किंवा चरित्र लिहावयास लागूं नये. आतांपर्यंत लिहिलेल्या बहुतेक चरित्रांतून हा दोष ढळढळीत दिसून येतो. महादजी शिंदे, गोविंदपंत बुंदेले, परशराम भाऊ पटवर्धन, बापू गोखले, पहिला बाजीराव, वगैरे सर्व सेनानायक एकासारखे एक अप्रतिम योद्धे होते असा त्या त्या ग्रंथकारांचा सांगण्याचा शोंक असतो. आतां पहिल्या बाजीरावाच्या बरोबरीला ह्यांपैकीं एकहि योद्धा बसवितां येणार नाहीं हें उघड आहे. तसेंच बाजीरावाच्या खालोखाल महादजीच्या तोडीचा ह्यांत एकहि सेनापति नाहीं. परशरामभाऊ पटवर्धन दुय्यमप्रतीचा सेनानायक होता असें मला वाटतें. गोविंदपंत बुंदेले व बापू गोखले हे कनिष्ठ प्रतीचे सेनापति होत, हें कोणीहि समंजस मनुष्य कबूल करील. बापू गोखल्यानें तर कोण्याएका गोऱ्याचें सर्टीफिकेट घेऊन ठेविलें होतें! सर्टीफिकेट्या सेनापतीची किती किंमत करावयाची तें मुद्दाम फोड करून सांगितलें पाहिजे असें नाहीं! हें सेनापतित्वासंबंधीं झालें. कित्येकांचा पूर्वग्रह मराठे सर्वप्रकारें श्रेष्ठ होते असें दाखविण्याचा असतो; कित्येकांचा ह्याच्या उलट असतो. तेव्हां पूर्वग्रहांना टाळा देणें ही मुख्य गोष्ट होय. ( २ ) भरपूर अस्सल माहिती मिळाल्याशिवाय चरित्र किंवा इतिहासाचा भाग लिहिण्याचा खटाटोप करूं नये. ( ३ ) तशांतूनहि लिहावयाचा संकल्पच असेल तर आपल्याला माहिती कोणती नाहीं तें स्पष्ट लिहावें. अस्सल भरपूर लेखसंग्रह जवळ असल्यावांचून जो कोणी इतिहास लिहावयाला जाईल त्याला माहिती नाहीं असा शेरा पुष्कळच प्रसगांसंबंधीं द्यावा लागेल. ( ४ ) अस्सल भरपूर माहितीवरून कांहीं सिद्धांत काढावयाचा तो काढावा. हें चवथें कलम पहिल्या कलमाचेंच एका प्रकारचें रूपांतर आहे अशी समजूत होण्याचा संभव आहे परंतु, तसा प्रकार नाहीं. पहिल्या कलमांत पूर्वग्रह प्रधान पद्धतीचा निर्देश केला आहे. व ह्या चवथ्या कलमांत पश्चाद्ग्रह प्रधान पद्धतीचा निर्देश केला आहे. पूर्वग्रह मनसोक्त काढिलेलाच असतो. पश्चाद्ग्रह अस्सल भरपूर आधारांतून जाता जो निघेल तोच घ्यावयाचा असतो. अलीकडे जे इतिहास व चरित्रग्रंथ लिहिले गेले आहेत त्यांत ह्या पूर्वग्रहाच्या पद्धतीचें प्राधान्य विशेष दिसून येतें. कित्येक ग्रंथांतून ह्या दोन्ही पद्धतींची भेसळ झालेली आढळून येते. उदाहरणार्थ, एका ग्रंथांतील

शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधानात्मक राज्यपद्धतीविषयीं क्लृप्ति पहा. ह्या क्लृप्तींत तीन सिद्धांत ठरवावयाचे आहेत. ( अ ) शिवाजीची राज्यपद्धति अष्टप्रधानात्मक होती; ( ब ) ती मुसुलमानांच्या राज्यपद्धतीहून निराळी होती; ( क ) व यूरोपांतील क्याबिनेट गव्हर्नमेंटसारखी ती होती. ह्या क्लृप्तींतील पहिला भाग ह्मणजे ( अ ) तेवढा बहुंशीं पश्चाद्ग्रहोत्पन्न ह्मणजे साधार आहे. शिवाजीच्या ज्या बखरी व एक दोन अस्सल कागदपत्र आजपर्यंत प्रसिद्ध झाले आहेत त्यांच्या आधारावर शिवाजीची राज्यपद्धति ( अष्ट ) प्रधानात्मक होती असें विधान करण्यास कांहीं एक हरकत नाहीं. आतां त्या प्रधानांची संख्या आठ होती किंवा त्याहून जास्त होती ह्या गोष्टीचा विचार करणें जरूर आहे. काव्येतिहाससंग्रहांतील ४०४ हें पत्र शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळचा कानूजाबता आहे. ह्या पत्रांत मुख्य प्रधान, अमात्य, सचिव, सेनापति,, पंडितराव, न्यायाधीश, मंत्री, चिटणीस, सुमंत, बक्षी, सेनाधुरंधर, अशा अकरा अधिकाऱ्यांची प्रधानांत गणना केली आहे. ( इ ) युद्धादि प्रसंग किंवा ( फ ) राजपत्रांवर चिन्ह करण्याचा अधिकार ज्यांना असेल ते प्रधान होत असा ह्या कानूजाबत्यांतील मायन्याचा आशय दिसतो. ह्या आशयाप्रमाणें वर दिलेले अकरा अधिकारी प्रधान ठरतात. परंतु ह्या कानूजाबत्यांच्या शेवटल्या कलमांत ह्या प्रधान मंडळाला अष्ट प्रधान ह्मणून संज्ञा दिली आहे. तेव्हां अष्टप्रधान ही संज्ञा विशिष्ट संख्यावाचक नसून केवळ समुदायवाचक आहे असा सिद्धांत काढणें अवश्य होतें. ह्या सिद्धांताला पोषक असें शिवाजीच्या कारकीर्दीतील दुसरें एखादें पत्र अद्यापपर्यंत उपलब्ध नाहीं. परंतु, राजारामाच्या कारकीर्दींत अष्ट प्रधानांत एकंदर नऊ असाम्या होत्या असें राजारामाच्या बखरीवरून ठरतें. तसेंच शाहूमहाराजांच्या कारकीर्दीतहि नऊ असाम्या होत्या असें काव्येतिहाससंग्रहांतील ४०५ पत्रावरून कबूल करावें लागतें. अष्ट प्रधानांची संख्या शिवाजीच्या पुढें आठच नव्हती हे ह्या दोन आधारावरून सिद्ध आहे, व तोच प्रकार शिवाजीच्या वेळींहि होता, हें ४०४ पत्रावरून उघड आहे. हा वाद आठ ह्या संख्येपुरताच आहे. बाकी शिवाजीची राज्यपद्धति ( अष्ट ) प्रधानात्मक होती हा सिद्धांत साधार आहे हें निर्विवाद आहे. ( ब ) आतां ही राज्यपद्धति शिवाजीनें अजीबात नवीन शोधून काढिली किंवा मुसुलमानापासून घेतली किंवा पूर्वीच्या संस्कृत नीतिशास्त्रांतून घेतली ? माझ्या मतें शिवाजीनें ही राज्यपद्धति मुसुलमानांपासून घेतली. पेशवा, मुजुमदार, वाकनीस, सुरनीस, डबीर वगैरे अधिकाऱ्यांचीं नांवें मुसुलमानांच्या दरबारांतील आहेत. त्यांना मुख्य प्रधान, अमात्य, मंत्री, सचिव, सुमंत वगैरे संस्कृत नांवें शिवाजीनें दिलीं. बाकी शिवाजीची पद्धति मुसुलमानांच्या पद्धतीचेंच हुबेहुब अनुकरण होतें. ( क ) ही अष्टप्रधानात्मक पद्धत प्रस्तुतच्या यूरोपांतील क्याबिनेट पद्धतीप्रमाणें तर नव्हतीच; परंतु, सतराव्या शतकांतील यूरोपांतील कित्येक देशांतील क्याबिनेट पद्धतीप्रमाणें ती कांहींशी होती. शिवाजीच्या पद्धतींत व सतराव्या शतकांतील यूरोपियन पद्धतींत अंतर असें आहे कीं शिवाजीचे न्यायाधीश व पंडितराव ह्या दोन प्रधानांखेरीज बाकीचे सर्व प्रधान लढाया

करीत व यूरोपांतील प्रधानांना हा शिपायगिरीचा धंदा बहुशः माहीत नसे. सारांश, शिवाजीच्या प्रधानमंडळीचें साम्य यूरोपांतील कोणत्याहि शतकांतील क्याबिनेटशीं नाहीं. शिवाजीनें केवळ मुसुलमानांचा कित्ता गिरविलेला आहे. तेव्हां ह्या कलमांत सूचित होणारी (व) आणि (क) हीं कलमें पूर्वग्रहात्मक होत हें उघड आहे. सत्यासत्य पद्धतींची भेसळ होते ती ही अशी होते. ह्या भेसळीला फार जपलें पाहिजे. (५) उपमान प्रमाणावर कोणताहि सिद्धांत ठरवूं नये. हीं पांच कलमें लक्ष्यांत ठेवून इतिहासरचना केली असतां ती सन्मान्य होईल ह्यांत संशय नाहीं. मराठ्यांच्या राष्ट्राच्या जीवनचरित्राचा अभ्यास अनेक दिशांनीं केला पाहिजे. (१) मराठ्यांचा सामाजिक इतिहास, (२) मराठ्यांचा राजकीय इतिहास, (३) मराठ्यांच्या धर्माचा इतिहास, (४) मराठ्यांच्या संस्कृतीचा इतिहास, (५) मराठ्यांच्या भाषेचा इतिहास, (६) मराठ्यांच्या मोहिमांचा इतिहास, (७) मराठ्यांच्या लष्कराचा इतिहास, (८) मराठ्यांच्या आरमाराचा इतिहास, (९) मराठ्यांच्या कायदेकानूंचा इतिहास, (१०) मराठ्यांच्या किल्ल्यांचा इतिहास, (११) मराठ्यांच्या जमीनमहसुलाचा इतिहास वगैरे शाखांचा सशास्त्र व सोपपत्तिक असा अभ्यास झाला पाहिजे. मराठ्यांच्या राजकीय इतिहासाचा सध्यां येथें विचार चालला आहे, तेव्हां त्याचे विभाग सशास्त्र किती करितां येतील तें स्थूलमानानें सांगतों. (१) इ. स. १६४६ पर्यंत शिवाजीच्या पूर्वीचा इतिहास. (२) १६४६ पासून १६८० पर्यंतचा स्वातंत्र्यार्थ लढाईचा इतिहास. (३) १६८० पासून १७०७ पर्यंतच्या स्वातंत्र्यार्थ लढाईच्या शेपटाचा इतिहास. (४) १७०७ पासून १७३१ पर्यंतचा स्वराज्यस्थापनेचा व हिंदुपदपादशाहीचा इतिहास. (५) १७३१ पासून १७६१ पर्यंतचा ब्राह्मणपदपादशाहीचा इतिहास. (६) १७६१ पासून १७९६ पर्यंतचा ब्राह्मणपदपादशाहीच्या जगवणुकेचा इतिहास. (७) १७९६ पासून १८१८ पर्यंतचा महाराष्ट्रसाम्राज्याच्या ऱ्हासाचा इतिहास. (८) १८१८ पासून १८९८ पर्यंतचा महाराष्ट्राच्या अवनतीचा इतिहास. मराठ्यांच्या इतिहासाच्या ह्या विभागांबरोबर महाराष्ट्राच्या भूज्ञानाचाहि अभ्यास झाला पाहिजे.

## विवेचन दहावें.

सतराव्या व अठराव्या शतकांत महाराष्ट्रांतील लोकांच्या अंगीं स्थितीपेक्षां गतीचें प्राबल्य विशेष होतें. पावसाळ्याचे चार महिने खेरीजकरून बाकीचे आठ महिने मराठे पुण्याहून दाही दिशांभर पसरत असत. अठराव्या शतकांत मराठ्यांच्या गतीचें मुख्य केंद्र पुणें शहर होतें. मुसुलमानाच्या कारकीर्दीतहि पुण्याचें ठिकाण मोहिमांची सुरवात करण्यास सोईचें समजलें जात असे व त्याच्या ह्या सोयीस्कर स्थानावरून त्यांनीं त्याला मोहिमाबाद असें अन्वर्थक नांव दिलें होतें. सातारा व सासवड हीं स्थळें सोडून पेशव्यांनीं आपलें ठाणें पुण्यास दिलें त्याचें तरी मुख्य कारण हेंच. हिंदुस्थानांत, कोंकणांत, गुजराथेंत, श्रीरंगपट्टणास व निजामाच्या राज्यांत जाण्यास पुण्याच्या मैदानांतून अनेक रस्ते फुटतात. त्यांपैकीं कांहीं मुख्य मुख्य मार्गांचा व मुक्कामांचा येथें तपशील देतों.

( १ ) पुणें ते नाशीकः–पुणें, भांबुरी, भोसरी, मोशें, चाकण, खेड, पेंठ, लिंगदेव, भोगूर, गोवर्धन, त्रिंबक, नाशीक.

( २ ) पुणें ते वसई, ठाणें, पनवेलः–पुणें, पुनावळें, तळेगांव, नाणें, माहू, कुसूरघाट, भिऊपुरी वैजनाथ, नासरापूर, दहिवली, बदलापूर, कल्याण, वसई, परशीक, ठाणें, तळेगांव, वडगांव, कार्लें, बोरघाट, खालापूर, चौक, पनवेल, मुंबई.

( ३ ) पुणें ते नागोठणेंः–पुणें, भांबुर्डें, मुळशी, भोरकस, भोरप, पाली, नागोठणें, अलीबाग, चौक, रेवदंडा.

( ४ ) पुणें ते रायगडः—पुणें, खडक वासलें, खामगांव, पाग्याचा घाट, येल्याची पेठ, बोचाघोळी, रायगड, महाड, तळें, घोसाळें, गावेल, श्रीवर्धन, बाणकोट.

( ५ ) पुणें ते वाईः—पुणें, कात्रज, शिवापूर, भोर, अंबेडखिड, वाई, वावधन, सातारा.

( ६ ) पुणें ते पुरंधरः—पुणें, बोपदेवघाट, सासवड, पुरंधर.

( ७ ) पुणें ते साताराः–पुणें, बोपदेवघाट, सासवड, जेजूरी, दहीगांव, माहुली, सातारा.

( ८ ) पुणें ते कोल्हापूरः–पुणें, जेजूरी, कोरेगांव, न्हावी, पुसेसावळी, वाळवें, कोल्हापूर, निपाणी, संकेश्वर, बेळगांव, शहापूर.

( ९ ) पुणें ते पंढरपूरः—पुणें, मांढवें, थेऊर, पाटस, मोरगांव, होळमुरूम, सांगवी, अकळूज, पंढरपूर, सांगोलें, मंगळवेढें, विजापूर.

( १० ) पुणें ते श्रीरंगपट्टणः—पुणें, पंढरपूर, विजापूर किंवा सांगोलें, जत, गलगलें, बागलकोट, हुनगुंद, किल्ले, कोपल, आनजी, हरिहर, चित्रदुर्ग, शिरें, नागमंगळ, श्रीरंगपट्टण.

( ११ ) पुणें ते सावनूरः—पुणें, पंढरपूर, आसंगी, कवतगी, गळतगें, बागलकोट, बदामी, कुरुतकोटी, लक्ष्मेश्वर, सावनूरवंकापूर.

( १२ ) पुणें ते नगर, औरंगाबादः—पुणें, कोरेगांव, रांजणगांव, घोडनदी, जातेगांव, खेरगांव, अहमदनगर, कायगांवटोकें, सातारा, औरंगाबाद.

( १३ ) पुणें ते दिल्लीः—पुणें, औरंगाबाद, अजंटा, बऱ्हाणपूर, हांडिया, सीहूर, सीरोंज, नरवर, ग्वालेर, ढवळपूर, आग्रा, मथुरा, दिल्ली, पानपत, कुरुक्षेत्र.

( १४ ) पुणें ते उज्जैनः—पुणें, नाशीक. मालेगांव, सेंधवें, महेश्वर, इंदूर, उज्जैन.

( १५ ) पुणें ते भडोच, सुरत, बडोदें, अमदाबादः— पुणें, नाशीक, बागलाण, खानदेशच्या बाऱ्या, कासारबारी वगैरे.

( १६ ) पुणें ते नागपूरः—पुणें, औरंगाबाद, दाभाडी, जाफराबाद, बाळापूर अलजपूर, नागपूर.

( १७ ) पुणें तें धारूरः—पुणें, गारपीर, थेऊर, करखंब, साळूमाळूचें पारगांव, वाळकी, मांडवगण, आडळगांव, भोसेगांव, सिंगवी, फकराबादथानेरें, बारशी, खर्डे, पानगांव, गारदौंड, पेडगांव, परिंडा, बीड, धारूर.

( १८ ) पुणें ते भागानगरः—पुणें, सुपें, बारामती, तुळजापूर, कल्याण, बेदर, भालकी, उदगीर, गोवळकोंडा, भागानगर.

पुण्याहून फुटणाऱ्या मोठमोठ्या मार्गांपैकीं कांहींचा हा ठोकळ तपशील आहे. ह्या मार्गांवरून माणसें, बैल, घोडीं, उंटें, हत्ती, पालख्या, मेणे वगैरे वाहनांचा रिघाव यथास्थित होत असे. माकाडामानें १७८० च्या पुढें शोधून काढिलेली खडीच्या सडका करण्याची युक्ति मराठ्यांना त्यावेळीं ह्मणजे १७६० त माहीत नव्हती हें सांगावयाला नकोच. परतु त्यावेळच्या इंग्लंडांतील व यूरोपांतील रस्त्यांची स्थिति लक्ष्यांत आणिली असतां हिंदुस्थानांतील रस्ते उत्तम होते असेंच ह्मणावें लागतें. पेशव्यांच्या राज्यांत सरकारी डाकेचा कारखाना मोठा असे. सरकारी डाकेबरोबरच खासगी लोकांचींहि पत्रें जात असत. डाकेच्या व रस्त्याच्या बाबींत १७६० त यूरोपखंड हिंदुस्थानाच्या फारसें पुढें होतें असें नाहीं. सरकारी डाकेपेक्षां सावकारी डाक जलद पोहोंचत असे. सध्यांच्यापेक्षां त्यावेळीं महाराष्ट्रांतील लोक भरतखंडाच्या सर्व प्रांतांत जास्त प्रवास करीत असत. कोंकणकिनाऱ्यानें गलबतांतूनहि सफरी कोंकणांतील लोकांस कराव्या लागत. द्वारकेपासून गोकर्णापर्यंत तराडीं व महागिऱ्या सारख्या चालू असत. परंतु किनारा सोडून पांच पचवीस कोसांच्या पलीकडे जाण्यास मराठीं तारवें फारशीं धजत नसत.

## विवेचन अकरावें.

पानिपतची मोहीम १५ मार्च १७६० ला सुरू झाली व १४ जानेवारी १७६१ ला संपली. ह्या दहा महिन्यांचा सविस्तर वृत्तांत मीं छापिलेल्या पत्रांखेरीज इतरत्र कोठें सांपडण्यासारखा नाहीं. ( १ ) पानिपतच्या बखरींत नुसत्या पानिपतच्या लढाईचा कमजास्त विश्वसनीय असा वृत्तांत दिला आहे. ( २ ) भाऊसाहेबाच्या कैफियतींत सदाशिवराव आंबेपडदुराहून निघाल्यापासून पानिपतची लढाई होईतांपर्यंत त्रोटक वृत्तांत आहे. ( ३ ) भाऊसाहेबाच्या बखरींत १७५४ पासून १७६१ जानेवारीपर्यंत हकीकत आहे. त्यांत ९० पासून १३२ पृष्ठांपर्यंतचा मजकूर पानिपतच्या मोहिमेसंबंधीं व खुद्द लढाईसंबंधीं आहे. ( ४ ) काशीराजाच्या बखरींत सुजाउद्दौल्याकडील पानिपताच्या मोहिमेचें वर्णन आहे. ( ५ ) मराठ्यांच्या पराक्रमकारानें छापलेल्या पानिपतच्या अपूर्ण बखरींत पानिपतच्या लढाईचा बनावट वृत्तांत आहे. ह्या पांच बखरी पानिपतच्या लढाईसंबंधीं आजपर्यंत प्रसिद्ध झाल्या आहेत. पैकीं पराक्रमकारांची बखर बनावट असल्यामुळें ( टीप २९० पहा ) तिचा विचार करण्याचें येथें कारण नाहीं. बाकीच्या ४ बखरींपैकीं काशीराजाच्या

बखरींवरून, आजपर्यंत जे स्वदेशी व विदेशी इतिहासकार झाले त्यांनीं, पानिपतच्या लढाईचें वर्णन केलें आहे. ग्रांटडफ्‌चा देखील मुख्य आधार काशीराजाचीच बखर आहे. रा. नातू ह्यांनी मात्र कोठें कोठें इतर बखरींचा उपयोग केला आहे. परंतु त्यांचा देखील कल इंग्रजइतिहासकारांच्या मताला मान देऊन, काशीराजाच्याच वृत्तांताकडे वळण्याचा दिसतो. तेव्हां काशीराजाच्या बखरींची ग्राह्याग्राह्यता ठरविणें अत्यंत जरूर आहे. काशीराजाच्या बखरींतील खालील गोष्टी इतिहासाला धरून नाहींत असें ह्या ग्रंथांतील पत्रांवरून कळून येण्यासारिखें आहे. ( १ ) बाळाजी बाजीराव ख्यालीखुशालींत मग्न असे. १७३८ पासून १७६१ पर्यंत वर्षांतून आठ नऊ महिने बाळाजी पुण्याच्या बाहेर असे हें मीं मागें दाखवून दिलें आहे. ( २ ) सदाशिवरावाला रामचंद्र मल्हारांची लहानपणापासून शिक्षा होती ह्मणून काशीराज ह्मणतो; परंतु, सदाशिवरावाची व रामचंद्र मल्हाराची गांठ १७५० त पडली. त्यापूर्वी भाऊला बाळाजीची शिक्षा होती. ( ३ ) रघुनाथरावाच्या लाहोरच्या स्वारींत जनकोजी शिंदे होता ह्मणून काशीराज लिहितो; तेंहि निराधार आहे. ( ४ ) उदगीरची लढाई काशीराजाला माहीत नव्हती असें दिसतें. ( ५ ) भाऊ उद्दाम झाला ह्मणून काशीराजाचें ह्मणणें आहे; परंतु, ह्या ग्रंथांत भाऊची गोविंदपंताला गेलेलीं पत्रें किती सौम्यपणानें लिहिलेलीं आहेत हें पाहिलें ह्मणजे उद्दामपणाचा आरोप भाऊवर आणणें मुष्कील होतें. ( ६ ) दत्ताजी शिंदे नजीबखानाशीं युद्ध करीत असतां रणांत पडला व त्यावेळीं अबदाली दूर अंतर्वेदींत होता अशी काशीराजाची माहिती आहे; परंतु, ती ह्या ग्रंथांतील लेखांक १६५ वगैरेवरून निराधार आहे हें कळून येईल. ( ७ ) भाऊनें दिल्लीस तळ दिल्यावर सुजाउद्दौला अबदालीला मिळाला ह्मणून काशीराज ह्मणतो; परंतु, भाऊ दिल्लीस येण्याच्या अगोदर सुजा अबदालीला मिळाला होता हें पांचव्या विवेचनांत दाखवून दिलें आहे. ( ८ ) कुंजपुरा घेतल्यावर भाऊ दिल्ली शहरास परत आला व तेथें दसऱ्यास त्यानें आपल्या सैन्याची गणती केली असें काशीराज लिहितो; परंतु, कुंजपुऱ्यास गेल्यावर भाऊ दिल्लीस कधीं आलाच नाहीं हें मागें दाखविलेंच आहे. ( ९ ) संभाळकिया येथील लढाईंत अबदाली विजयी झाला ह्मणून काशीराजाचें ह्मणणें आहे; परंतु, त्या लढाईंत मराठे शेर झाले ह्मणून कृष्ण जोशी लिहितो. ( १० ) गणपतराव मेहेंदळ्याच्या अगोदर गोविंदपंत वारला ह्मणून काशीराज लिहितो; परंतु, ती चूक आहे हें ह्या ग्रंथांतील ३२३ टिपेवरून कळून येईल. येणेंप्रमाणें काशीराजाच्या बखरींतील अग्राह्य भाग आहे. त्यानें स्वदृष्टीनें जेवढें पाहिलें तेवढें बहुश: खरें आहे. बाकीचें सर्व इतर अस्सल आधार असल्यावांचून विश्वसनीय धरवत नाहीं.

( ब ) रघुनाथयादवकृत पाणिपतची बखरहि मोठ्या कसोशीनें पारखून घेतली पाहिजे. ही बखर शके १६८४ चित्रभानुनामसंवत्सरे माहे फाल्गुन शुद्ध ५ मंदवारीं पुणें येथें संपविली ह्मणून रघुनाथ यादव ह्मणतो. परंतु फाल्गुन शुद्ध ५ मीला मंदवार नसून शुक्रवार आहे त्याअर्थी मित्तीवर विश्वास ठेववत नाहीं. बखरीला प्रारंभ २५ जमादिलाखरीं

म्हणजे १७६३ च्या १० जानेवारीला केला म्हणून बखरीच्या प्रारंभीं लिहिलें आहे.
म्हणजे ही बखर सजवावयाला ४१ दिवस लागले असें होतें. ह्या बखरींतील लढाईची
तारीख चुकली आहे. भाऊ व विश्वासराव रणांत पडल्यावर मग बाळाजी बाजीराव पुण्या-
हून उत्तरेकडे निघाले असें रघुनाथ यादव दफात्यावरून लिहितो म्हणून म्हणतो. परंतु
बाळाजी बाजीराव पानिपतच्या लढाईच्या अगोदर हिंदुस्थानांत जाण्यास पुण्याहून निघाले
हें निर्विवाद आहे. तेव्हां रघुनाथ यादवानें दफात्याचा नीट उपयोग केला नाहीं असें
म्हणावें लागतें. माहितीपेक्षां वर्णनानें ही बखर जास्त फुलविलेली आहे.

( क ) कांहीं लहान सहान चुका गाळल्या असतां भाऊसाहेबांची कैफियत बहुतेक
पूर्णपणें विश्वसनीय आहे.

( ड ) बऱ्याच चुका गाळल्या असतां भाऊसाहेबांची बखर बहुतेक बरीच विश्वसनीय
आहे. भाऊसाहेबाचा तोतया निर्माण व्हावयाच्या अगोदर म्हणजे १७६३ च्या अगोदर ही
बखर लिहिली आहे. तुंगारप्रतींच्या शेवटीं १७१२ शकाच्याबद्दल १७१३ पाहिजे म्हणजे
संवत्सराचें नांव, तिथि व चंद्र बरोबर होतात.

## विवेचन बारावें.

कोल्हापूर येथील प्रो. मोडक ह्यांच्या जंत्रीचा उपयोग मला अतिशय झाला. ह्या
जंत्रींत चूक म्हणून फारशी कोठें नाहीं. कधीं कधीं तिथींचे वार व मुसुलमानी तारखांचे
वार जंत्रींत व ऐतिहासिक पत्रांत निराळे सांपडतात. प्रो. मोडक ह्यांच्या जंत्रींतील तिथी,
तारखा व वार जर ठाम बरोबर असतील तर पत्रांतील तिथि, वार व तारीख मोडकांच्या
जंत्रींत जेथें जेथें जमत नाहींत तेथें तेथें एकच अनुमान करणें प्राप्त होतें. तें हें कीं, प्रो.
मोडकांनीं ज्या जंत्रीवरून व पंचांगावरून आपली जंत्री रचिली ती जंत्री व तीं पंचांगें पत्रें
लिहिणाऱ्यांच्याजवळ जीं पंचांगें होतीं त्यांच्याहून निराळीं असावीं. क्षय व वृद्धि ह्या तिथि
निरनिराळ्या प्रांतांतील पंचांगांत निरनिराळ्या दिवशीं कदाचित् असूं शकतील; परंतु, इतर
तिथी निरनिराळ्या प्रांतांतील पंचांगांत निरनिराळ्या वारीं कां असाव्या ह्याचें कारण
समजत नाहीं. तसेंच तारखांचें वारहि निरनिराळ्या पंचांगांत कां बदलावे तेंहि नीट सम-
जत नाहीं. उदाहरणार्थ कांहीं पत्रांच्या तारखा खालीं देतों.

( १ ) ऐतिहासिकलेखसंग्रहांतील १७७ व्या पत्रांत फाल्गुन शुद्ध चतुर्थी बुधवारीं आहे
म्हणून लिहिलें आहे. प्रो. मोडकांच्या जंत्रींत चतुर्थी गुरुवारीं आहे. त्यावरून मथाळ्यावरील
इंग्रजी तारीख १७ फेब्रुवारी म्हणून मांडली आहे. पण ज्याअर्थी बुधवारीं चतुर्थ प्रहरीं
म्हणजे सध्यांच्या दुपारच्या तीनपासून सहा वाजेपर्यंतच्या कालांत केव्हां तरी लिहिलें आहे
त्याअर्थी बुधवार हा वार खरा व बुधवारचीच इंग्रजी तारीख घेतली पाहिजे. तसेंच
बुधवारीं चतुर्थी होती हेंहि कबूल केलें पाहिजे.

( २ ) ऐतिहासिकलेखसंग्रहांतील १७९ व्या पत्रांत फाल्गुन वद्य ७ ला मंदवार आहे;
परंतु, जंत्रींत रविवार आहे.

( ३ ) ऐतिहासिकलेखसंग्रहांतील १५१ व्या पत्राच्या तिसऱ्या ओळींत १७ जमादिलाखरीं मंगळवार सांगितला आहे; १५३ व्या पत्रांत १८ जमादिलाखरीं मंगळवार सांगितला आहे व त्याच १५३ व्या पत्रांत अमावास्येला गुरुवार लिहिला आहे. १५३ वें पत्र गुरुवारीं लिहिलें आहे ह्यांत संशय नाहीं; कारण " काल्हीं " बुधवार होता ह्मणून पत्र लिहिणारा पुढें लिहितो. गुरुवारीं अमावास्या होती किंवा नाहीं एवढीच शंका आहे. १७ व १८ तारखा चुकल्या आहेत हें निर्विवाद आहे.

( ४ ) काव्येतिहाससंग्रह, पत्रें, यादी वगैरे ८ त आषाढ वद्य ५ ला रविवार व १० ला शुक्रवार आहे; जंत्रींत ह्या दोन्ही तिथींस अनुक्रमें सोमवार व शनवार आहे. उत्तर चोवीस रमजान शनवारीं लिहिलें आहे. पत्र शुक्रवारीं २३ रमजानला आलें. शुक्रवारीं पेशव्यांच्या पंचांगांत १० मी होती.

( ५ ) काव्येतिहाससंग्रह, पत्रें व यादी १७ च्या पैवस्तींत ज्येष्ठ शुद्ध १५ सोमवारीं आहे; जंत्रींत पूर्णिमेचा क्षय आहे.

( ६ ) काव्येतिहाससंग्रह, पत्रें व यादी ४२९ त ३९३ पृष्ठाच्या खालून ३ ऱ्या ओळींत शके १६५२ साधारणनाम संवत्सरीं फाल्गुन शुद्ध ३ ला मंदवार दिला आहे; जंत्रींत रविवार आहे. पत्रांतल्याप्रमाणें शनवारीं दोनप्रहरीं दिवसा ३ या होती. तेव्हां रविवारी जो तृतीयेचा शेष राहिला असेल त्याच्या जोरावर रविवारीं ३ या होऊं शकेल कीं काय ?

( ७ ) काव्येतिहाससंग्रह, पत्रें व यादी ४३० त चैत्र शुद्ध ३ ला इंदुवासर दिला आहे; जंत्रींत मंगळवार आहे.

( ८ ) भारतवर्ष, पत्रें, यादी वगैरे ३१ त मार्गशीर्ष शुद्ध १२ स दोनप्रहरीं मंदवार दिला आहे; जंत्रींत १२ शुक्रवारीं आहे. त्याच पत्रांत आणीक पांच ठिकाणीं सन, शक, राजशक, तीथ, वार, तारिख वगैरे दिलीं आहेत. त्यापैकीं कांहींना कांहींतरी मूळपत्रांत किंवा लेखांकाच्या नकलेंत किंवा संपादकाच्या नजर चुकीनें चुकलें असल्यामुळें ह्या तीथवारांसंबंधीं माझें कांहींच ह्मणणें नाहीं. हें मासिकपुस्तक मोठ्या अव्यवस्थितपणें संपादिलें जात असल्यामुळें त्याच्यांतील आंकड्यांवर विश्वास ठेववत नाहीं.

पत्रांतील व जंत्रींतील फरक दाखविण्याकरितां आणीकहि पुष्कळ दाखले देण्यांत येतील; परंतु, एवढ्यावरच काम भागण्यासारखें असल्यामुळें जास्त विस्तार करीत नाहीं. प्रो. मोडकांनीं इ० स० १७२८ पासून १८९४ पर्यंत जंत्री तयार केल्यामुळें ह्या अवधींतील मराठ्यांच्या कागदपत्रांचा अभ्यास करणाऱ्यांस मोठी सोय झाली आहे. जर प्रो० मोडक इ० स० १५०० पासून १७२८ पर्यंत दुसरी एक जंत्री छापतील तर त्या वेळच्याहि कागदपत्रांचा अभ्यास करण्याचें एक उपकरण तयार झाल्यासारखें होईल. शहाजी, शिवाजी, राजाराम व शाहू ह्यांच्या वेळची जंत्री अवश्य पाहिजे आहे. तींत दिल्ली येथील जुलुसी सनाच्या तारखा आल्यास फार उपयोग होईल.

ह्या पुस्तकाच्या टिपेंत व प्रस्तावनेंत काव्येतिहाससंग्रह, ऐतिहासिकलेखसंग्रह व भारत-वर्ष ह्या तीन मासिकपुस्तकांतील कांहीं लेखांचा उपयोग केला आहे. ज्या लेखांचा मत्न परोक्ष किंवा अपरोक्ष रीतीनें उपयोग झाला आहे त्यांचे सन मी प्रो. मोडक यांच्या जंत्री-वरून ठरवून टाकिले आहेत. ते बरोबर ठरले आहेत किंवा नाहींत हें तपासण्याचें काम इतिहासज्ञांचें आहे.

## काव्येतिहाससंग्रहांतील पत्रें व यादी.

जेथें पैवस्तीखेरीज दुसरी तारीख काढण्यासारखी नाहीं तेथें पैवस्तीचीच तारीख समजावी.

| पत्रें व यादी. | सन. | टीका. |
|---|---|---|
| २ | २२ एप्रिल १७५१ | शिवराम गोविंद भिडे औरंगाबा-देस १७५१ ल होता (लेखांक१०). |
| ३ | २७ जुलै १७५५ | |
| ४ | ११ सप्टेंबर १७५१ | |
| ५ | १ जुलै १७५२ | चंद्र २९ साबान. |
| ६ | २१ जुलै १७५२ | पैवस्तींत शके १६७६ बद्दल १६७४ पाहिजे. |
| ७ | २५ जुलै १७५२ | ११ रमजान=१२जुलै १७५२. हें पत्र पुढील पत्राची पुरवणी आहे. |
| ८ | २५ जुलै १७५२ | मोडकांच्या जंत्रींत आषाढ वद्य ५ स सोमवार आहे व १० स शनिवार आहे. |
| १० | १३ नोव्हेंबर १७४० | |
| ११ | २९ सप्टेंबर १७४० | |
| १२ | २० जानेवारी १७५१ | |
| १३ | २७ जुलै १७५२ | |
| १४ | २५ जानेवारी १७५३ | गुरुवारीं वहुल सप्तमी आहे, पंचमी नाहीं. वद्य ७ =१९ रविलावल गुरुवार. पत्र रात्रौ लिहिलेलें आहे. |
| १५ | ३ जून १७५४ | |
| १६ | २७ फेब्रुवारी १७५५ | |
| १७ | २३ जून १७५५ | |
| १८ | १ सप्टेंबर १७५५ | सोमवारीं पूर्णिमा किती घटकां लागली? |

| | | |
|---|---|---|
| | जानेवारी १७५२ | रामदासपंत १७५२ च्या एप्रिलांत वारला व त्रिंबक १७५१च्या डिसेंबरांत त्रिंबक सूर्याजानें घेतला. |
| | पहिलें पत्र पहा | |
| | ३ फेब्रुवारी १७६१. | माघ वद्य १ ला २६ जमादिलाखर नाहीं; १४ रजब आहे; मित्तीची व रवान्याची तारीख निराळी असेल. |
| | १२ मे १७६१ | जंत्रींत ६ सवाली ९ मी आहे. |
| | जानेवारी १७५२ | |
| | सप्टेंबर १७५१ | |
| २५ | २४ जुलै १७३५ | ह्या पत्रांत बाळाजी बल्लाळ प्रधान ह्मणून बाजीरावानें आपल्यास ह्मटलें आहे. तेव्हां बाजीरावाचें पाळण्यांतील नांव बाळाजी होतें असें दिसतें. बाळाजींतील ळाचा लोप केला तर बाजी रहातो. |
| २६ | २४ डिसेंबर १७४१ | १७४२ च्या सिंहस्थाच्या आधींचें हें पत्र आहे. यमुनेच्या घांटीं बाळाजीस पोहोंचलें. |
| २७ | २० मार्च १७५४ | |
| २८ | २७ मार्च १७५३ | चैत्र शुद्ध १५ मंगळवारीं १३ जमादिलाखर नाहीं; १२ जमादिलाखर आहे. |
| २९ | ४ डिसेंबर १७६९ | |
| ३० | ६ डिसेंबर १७६९ | |
| ३१ | १७ अक्टोबर १७५४ | पैवस्तींत शके १६७५ बद्दल शके १६७६ पाहिजे. |
| ३२ | १ आगस्ट १७५४ | |
| ३३ | ३ सप्टेंबर १७६३ | |
| ३४ | ८ सप्टेंबर १७५८ | ४ मोहरमच्या पुढें आश्विन शुद्ध ८ आली पाहिजे. |

| | | |
|---|---|---|
| ३५ | ३० मार्च १७५७ | पंचांगांत चैत्र शुद्ध एकादशी पाहिजे; प्रतिपदा चुकून पडली आहे. |
| ३६ | २८ मार्च १७५७ | |
| ३८ | २७ नोव्हेंबर १७६१ | मित्ती व खान्याच्या तारखा निराळ्या. |
| ३९ | ११ आगष्ट १८०२ | |
| ४० | १६ फेब्रुवारी १७४३ | फाल्गुन शुद्ध तृतीयेला [illegible] ह्मणजे वुधवार शके १६६४ [illegible] |
| ४१ | २९ आगष्ट १७४४ | भाद्रपद शुद्ध तृतीयेला [illegible] ह्मणजे वुधवार शके १६६६ [illegible] बाह्मद इ. स. १७४५ [illegible] जुलैला वारला. |
| ४३ | ११ जानेवारी १७३८ | |
| ४४ | ८ जानेवारी १७३८ | वागस=महमदखान वंगष. |
| ४५ | १७ एप्रिल १७३९ | तोवेयास कुलीखान=नादीरशहा. |
| ४७ | २४ एप्रिल १७४१ | |
| ४८ | १९ जानेवारी १७४३ | |
| ४९ | १४ जानेवारी १७४१ | |
| ५० | २१ आगष्ट १७६१ | |
| ५१ | २४ अक्टोबर १७४६ | ९५ वें पत्र पहा. |
| ५२ | ११ जून १७७४ | हा नारोशकर राजेबहादर नसावा. |
| ५५ | ४ फेब्रुवारी १७३९ | |
| ५६ | १३ मे १७३९ | जंत्रींत वद्य १ चा लोप आहे. |
| ५७ | १५ जून १७३९ | |
| ५८ | १० एप्रिल १७४० | ३ मोहोरम बद्दल २३ मोहोरम पाहिजे. दशमीला ३ तारीख अशक्य. |
| ६० | २९ मे १७४५ | |
| ६१ | २० मे १७५९ | |
| ६२ | १७ जुलै १७४६ | |
| ६३ | १५ जुलै १८१२ | |
| ६४ | १९ अक्टोबर १८१४ | |
| ६५ | १३ जून १७६६ | |
| ६६ | ९ जुलै १७५७ | |

| | | |
|---|---|---|
| ६७ | १६ डिसेंबर १७४६ | शुद्ध प्रतिपदेच्या बद्दल वद्य प्रतिपदा पाहिजे. वद्य प्रतिपदेच्या दुपारीं दिवसा छ १४ जिल्हेज होता, त्या दिवशीं जगजीवनाला प्रतिनिधी मिळाली. शुद्ध प्रतिपदेला मुसुलमानी १४ तारीख कधींहि नसते. |
| ६८ | ६ एप्रिल १७४७ | |
| ६९ | ७ जून १७४६ | |
| ७० | इ. स. १८१२ | बाबासाहेब ह्मणजे बाजीराव बल्लाळ नव्हे; बाबासाहेब ह्मणजे यशवंतराव होळकर. पत्रें, यादी ६३ व ९३ पहा. ६३ वें पत्र १८१२ तील आहे ह्यांत संशयच नाहीं. त्या पत्रांतील बाळाजी लक्ष्मण, खंडो महादेव व सखाराम जगजीवन, हीं नावें ह्या पत्रांत आलीं आहेत. तेव्हां हा मल्हारराव दुसरा होय, थोरला नव्हे. होळकरांची कैफियत पहा. सदाशिव माणकेश्वराला हें पत्र लिहिलें आहे. ह्या माणकेश्वराचें नांव ४४१ व्या पत्रांत आहे. |
| ७१ | १९ डिसेंबर १७५६ | शिंदखेडच्या लढाईच्या अगोदरचें पत्र आहे. |
| ७३ | २१ अक्टोबर १७४६ | |
| ७४ | ८ जून १७४६ | |
| ७६ | २२ एप्रिल १७५९ | ६१ वें पत्र पहा. |
| ७७ | २१ फेब्रुवारी १७४७ | सदाशिवरावभाऊ ५ डिसेंबर १७४६ त बहादूर भेंड्याच्या स्वारीस गेले ते ३ मे १७४७ त पुण्यास परत आले. ग्रांट्डफ्च्या ह्मणण्य प्रमाणें ही स्वारी १७४६ त सुरू झाली. ग्रांटडफ् चुकला आहे |

| | | |
|---|---|---|
| | | ह्मणून ऐतिहासिकलेखसंग्रहकार ह्मणतात (ऐतिहासिक लेखसंग्रह, न. व) ती चूक आहे. |
| ७८ | २२ फेब्रुवारी १७४७ | |
| ७९ | ३० एप्रिल १७४७ | |
| ८० | ३१ जुलै १७५२ | |
| ८१ | २५ नोव्हेंबर १७४७ | |
| ८२ | २९ आगष्ट १७४६ | |
| ८३ | १९ एप्रिल १७५९ | |
| ८४ | १० अक्टोबर १७५९ | |
| ८५ | ९ आगष्ट १७५२ | |
| ८६ | १७४८ | |
| ८९ | १७४१—१७४९ | |
| ९२ | नोव्हेंबर १७४७ | |
| ९३ | २७ जुलै १८१२ | |
| ९४ | १४ जुलै १७६९ | ६३,७० पत्रें पहा. माधवराव बल्लाळाच्या कारकीर्दीत १७६८ व १७६९ त ह्मैसुरावर स्वारी झाली त्यावेळचें हें पत्र आहे. काव्येतिहाससंग्रहकार हें पत्र बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीतील समजतात; पण ती त्यांची चूक आहे. कारण, श्रावणांत रबिलाखर बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीत १७४० पासून १७६१ पर्यंत कधींच आला नाहीं. मल्हारराव रास्ते बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीत होता व आनंदराव रास्ते माधवराव बल्लाळाच्या कारकीर्दीत होता. |
| ९५ | २८ अक्टोबर १७४६ | |
| ९६ | ४ डिसेंबर १७५९ | हें पत्र १३ रबिलावलीं रवाना केलें. तेव्हां त्याच्यांत १४ रबिलावल येणें अशक्य आहे. १४ रबिलावलाबद्दल १२ रबिलावल पाहिजे. कां कीं १२ |

| | | |
|---|---|---|
| | | रविलावलींच शनवार पडतो; १४ रविलावलीं पडत नाहीं. ह्या ग्रंथांतील टीप २३१ पहा. |
| ९७ | २२ अक्टोबर १७४६ | |
| ९८ | ३० मे १७६० | |
| ९९ | १० एप्रिल १७४६ | |
| १०० | २५ मार्च १७४१ | बाजीराव व चिमाजीआपा वारल्यावरचें हें पत्र आहे. |
| १०१ | २ जानेवारी १७६७ | |
| १०२ | १० डिसेंबर १७५२ | कार्तिक वद्याच्या पुढें ३ सफर येऊन कार्तिक वद्य द्वितीयेला गुरुवार येतो तो १७५२ च्या डिसेंबरांतच येतो. बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींत इतर वर्षीं कधींच येत नाहीं. |
| १०३ | कदाचित् १७४५ | तारखेबद्दल व वर्षाबद्दल अगदींच संशय आहे. |
| १०४ | ८ मे १७४५ | ६० वें पत्र पहा. |
| १०६ | २३ आगष्ट १७६१ | |
| ११० | १७५८ | हें पत्र गोपाळराव बापूजींचें आहे. |
| ११३ | ५ एप्रिल १७६९ | |
| ११४ | १७३२ | हें येसाजी आंग्र्याचें पत्र आहे. ह्या पत्रांतील बराच मजकूर चिटणिशी बखरींत आहे. तसेंच ४२८।४२९ पत्रांतीलहि मजकूर चिटणीसांच्या बखरींत आहे. ह्यावरून अस्सल कागद पाहून चिटणीसांनीं बखर लिहिली असें अनुमान होतें. सामर्थ्याप्रमाणें त्यांनीं उपयोग केला. |
| १३२ | १७४७ | हें पत्र सदाशिव चिमणाजीनें लिहिलें आहे. |
| १३३ | १७५७ | |
| १३४ | १४ एप्रिल १७५५ | ऐतिहासिक लेखसंग्रह नं. २ पहा. |

| | | |
|---|---|---|
| १४४ | १७५१ | ४२२ व्या पत्राच्या शेवटच्या ओळी पहा. |
| १६१ | २७ मार्च १७५२ | |
| १६२ | २२ मे १७५१ | "मराठ्यांच्या पराक्रम"कारानें ह्यांतील मजकूर अज्ञानानें गोविंदपंत बुंदेल्याला लाविला आहे. |
| १६३ | १० जून १७५१ | |
| १६६ | २४ मे १७३३ | बाजीराव बल्लाळाच्या चरित्र कर्त्यानें १७३८ सालचा वृत्तांत देतांना ह्या पत्राचा उतारा घेतला आहे ! |
| १६७ | १७२७ फेब्रुवारी. | |
| १६८ | ३१ मार्च १७५७ | २७ रबिलाखरीं सातान्याजवळ गेंड्याच्या माळावर लढाई झाली. नागोराम मेघःशामाचें नांव धाकट्या रामराजाच्या चरित्राच्या ३ ऱ्या पृष्ठावर आलें आहे. |
| १६९ | डिसेंबर १७२६ | १६७ वें पत्र पहा. १६७ वें व १६९ वें हीं दोन्हीं पत्रें अंबाजीपंत पुरंधऱ्याला एक शाहूनें व एक बाजीरावानें अशीं लिहिलीं आहेत. गुजराथेंत पेशव्यांच्या वर्तानें कंठाजी कदम बांडे असे व सेनापती दाभाडे यांच्या वर्तानें पिलाजी गायकवाड असे. पेशवे व सेनापति यांचें वांकडें; तेव्हां कंठाजी व पिलाजी यांचेंहि वांकडेंच. त्या दोघांचें खवायतेस १७२६ त खडाजंगी युद्ध झालें. त्याला अनुलक्षून हीं दोन्हीं पत्रें आहेत. |
| १७० | ८ फेब्रुवारी १७६० | ह्या पत्रांत उदगीरची लढाई जिंकल्याची बातमी बाळाजी बाजीरावानें महिपतराव विवकाला लिहिली आहे. काव्येतिहाससंग्रहकारांच्या मतें हें पत्र १७५९ सालचें असावें असें दिसतें. |

परंतु, उदगीरच्या लढाईनंतर ५ दिवसांनीं हें पत्र लिहिलें असल्यामुळें १७६० हेंच ह्या पत्राचें साल होय.

१७१ — १९ एप्रिल १७६०

१७२ — ३० मार्च १७५१ — हें पत्र गेंड्याच्या माळावरील लढाईला अनुलक्षून सदाशिव चिमणाजीनें नाना पुरंधऱ्याला लिहिलें आहे. भाऊ बाळाजीबरोबर निजामाला तुंगभद्रेवर आडवीत होते. ह्या पत्रांत " हया " ह्मणून शब्द दोनदां आला आहे. ती मोडी वाचनाची चूक आहे. " बरोबर " हा शब्द संक्षिप्त रीतीनें मोडींत " ब॥ " असा लिहितात व तो हुबेहुब " हया " सारखा दिसतो. काव्येतिहाससंग्रहकारांच्या मतें हें पत्र १७५० त लिहिलें असावें. परंतु, तसा प्रकार नाहीं. हें पत्र १७५१ च्या मार्चांतच लिहिलें आहे. १६८वें पत्र नाना पुरंधऱ्याला लिहिलें आहे तें पहा. १७५० सालीं रामदासपंताचें कारस्थान मुळींच नव्हतें. १७५१ च्या जानेवारींत रामदास सलाबताचा दिवाण झाला. तोंपर्यंत रामदासपंताचें नांव इतिहासांत माहीत नाहीं.

११ मे १७५१ — हें पत्र १७२ व्या पत्रानंतर १२ दिवसांनीं पाठविलें आहे.

१७४ — मे १७५० — सांगोल्याच्या स्वारीच्या वेळचें पत्र. बाबा ह्मणजे रामचंद्रबाबा नव्हे, महादोबा पुरंधरे होत. ३५९ पत्र पहा.

१७५ — ७ मार्च १७६१

१६

| | | |
|---|---|---|
| १८४ | मे १७५० | सांगोल्याच्या स्वारीस जातां वेळचें पत्र. |
| ३३४ | २९ सप्टेंबर १७५१ | |
| ३३५ | ९ जून १७६१ | हें पत्र कोल्हापूरच्या गादीवर दत्तक बसविण्यासंबंधीं आहे. बाळाजीला " समेटी " करावयाची होती- दोन्ही गाद्यांची. |
| ३३६ | १६ डिसेंबर १७५१ | |
| ३३७ | ३१ मार्च १७५८ | |
| ३३८ | जानेवारी १७५५ | |
| ३४० | २८ मे १७५३ | |
| ३४१ | ५ मे १७५८ | |
| ३४३ | मे १७५५ | |
| ३४६ | २४ नोव्हेंबर १७५६ | |
| ३४७ | १५ सप्टेंबर १७५६ | |
| ३४८ | ३० सप्टेंबर १७५६ | |
| ३४९ | ७ सप्टेंबर १७५६ | |
| ३५० | १७ आगष्ट १७५६ | |
| ३५१ | १८ सप्टेंबर १७५५ | |
| ३५२ | ३० आगष्ट १७५५ | |
| ३५३ | मे १७५१ | |
| ३५४ | २२ मे १७५१ | |
| ३५५ | ७ मार्च १७५२ | |
| ३५६ | १७५६ | |
| ३५७ | २ सप्टेंबर १७५४ | |
| ३५८ | ११ जून १७५१ | |
| ३५९ | जानेवारी १७५१ | |
| ३६० | १९ आगष्ट १७५४ | |
| ३६१ | १७५६ | |
| ३६२ | २१ मार्च १७५९ | |
| ३६३ | १२ फेब्रुवारी १७५२ | |
| ३६४ | १० जून १७५१ | |
| ३६५ | १२ जून १७५९ | |

| | | |
|---|---|---|
| ३६६ | ८ जुलै १७५२ | |
| ३६७ | २२ आक्टोबर १७५२ | |
| ३६८ | २१ जानेवारी १७६० | |
| ३६९ | ८ अक्टोबर १७५१ | ३९२ पत्र पहा. |
| ३७० | ५ सप्टेंबर १७५८ | |
| ३७१ | २१ सप्टेंबर १७५६ | |
| ३७३ | २४ फेब्रुवारी १७५९ | |
| ३७४ | १२ एप्रिल १७५२ | |
| ३७५ | ८ मे १७६१ | |
| ३७६ | ३ सप्टेंबर १७५४ | |
| ३७७ | ४ मे १७५८ | |
| ३७८ | ३० नोव्हेंबर १७५७ | |
| ३७९ | २२ फेब्रुवारी १७६० | |
| ३८० | ३ सप्टेंबर १७५४ | |
| ३८१ | ६ फेब्रुवारी १७५३ | |
| ३८२ | ३१ जुलै १७५५ | |
| ३८३ | १९ जुलै १७५२ | |
| ३८४ | २४ मे १७५२ | |
| ३८५ | २३ मे १७५१ | |
| ३८६ | २९ सप्टेंबर १७५५ | |
| ३८७ | २ मे १७५९ | |
| ३८८ | २४ डिसेंबर १७५८ | |
| ३८९ | ६ अक्टोबर १७५२ | |
| ३९० | जुलै १७५९ | ३६६ वे पत्र पहा. |
| ३९१ | ८ अक्टोबर १७५१ | |
| ३९२ | ७ अक्टोबर १७५१ | |
| ३९३ | १५ नोव्हेंबर १७५४ | |
| ३९४ | १२ फेब्रुवारी १७५२ | |
| ३९५ | १५ अक्टोबर १७५२ | |
| ३९६ | ३१ मे १७५२ | |
| ३९७ | ३१ मे १७५२ | |
| ३९८ | २० आगष्ट १७५४ | |
| ३९९ | ४ सप्टेंबर १७५४ | |

४०३ १७ एप्रिल १७५८

शके १६८० च्या चैत्रांत फसली सन ११६७ होता. त्या अर्थी ह्या पत्रांतील सर्व सन फसली आहेत हें उघड आहे. ११६७ फसली धरला तर इ. स. १७५८ येतो; १७५१ येत नाहीं. ११६७ सुहूसन धरला तर इ. स. १७६६ येतो. पत्रांत भाऊसाहेब ह्मणून ज्याचा उल्लेख केला आहे तो सदाशिवराव भाऊ पेशवे नव्हे. तो अकोळनेरचा इनामदार रामाजी अनंत दाभोळकर होय. ११६१ फसलींत ह्मणजे १७५१।५२ ह्या सालीं निजामाची व पेशव्यांची लढाई कोरेगांव, जुन्नर, अकोळनेर, नगर, कायगांव, औरंगाबाद ह्या रोखानें होत होती हें प्रसिद्ध आहे. ११६२ फसलींत ह्मणजे इ. स. १७५३ च्या जानेवारींतील भालकीच्या तहांत जो प्रांत पेशव्यांना मिळाला त्यांत अकोळनेर होतें असें दिसतें. १७५४ त दाभोळकर जयाप्पा शिंद्याबरोबर हिंदुस्थानांत होता.

| | |
|---|---|
| ४२८चा कांहीं भाग | १७४० |
| ४२९चा कांहीं भाग | १७४० |
| ४३९ | १७३९ |
| ४४२ | २१ मे १७४८ |
| ४५१ | १७५६ |

नागोरचा वेढा दत्ताजीनें संपविल्यावेळीं हें पत्र लिहिलें आहे. वैशाखमासीं ह्मणजे सिंहस्थांत ह्मणजे १७५५ च्या एप्रिलांत नाशकास अंताजी माणकेश्वर ग्रामजी बाजीरावास भेटला.

| | |
|---|---|
| १३ मे १७३९ | माघशुद्ध १०=९ फेब्रुवारी १७३९ =१७ फेब्रुवारी (डफ). वैशाखशुद्ध ८=५ मे १७३९=१६ मे १७३९ (डफ). १७५२, २ सप्टेंबरपर्यंतच्या ग्रांटडफच्या सर्व तारखा ११ दिवसांनीं पुढें आहेत. |
| ६ एप्रिल १७४७ | हें पत्र काव्येतिहाससंग्रहांत छापिलें आहे (६८). |
| ९ फेब्रुवारी १७५४ | |
| १ नोव्हेंबर १७५५ | कार्तिक शुद्ध २=५ नोव्हेंबर १७५५. |
| २१ मे १७५६ | २१ साबान ह्मणजेच नंबर चारांतील वैशाखवद्य ८ भृगुवार. |
| २१ मे १७५६ | |
| ४ फेब्रुवारी १७५७ | |
| २३ मे १७५५ | |
| २४ मे १७५५ | १७५७ त अधिकमास आश्विन होता ह्मणून १७५७ हें साल ह्या दोन पत्रांचें नव्हें. १७५५ त अधिक मास ज्येष्ठ आहे ह्मणून १७५५ हेंच साल खरें आहे. |
| २२ आगष्ट १७५२ | |
| २३ आगष्ट १७५२ | |
| २८ फेब्रुवारी १७५८ | |
| ४ एप्रिल १७५८ | |
| २०।२१ मार्च १७६० | |
| २०।२१ मार्च १७६० | |
| १ एप्रील १७६० | |
| ४ एप्रिल १७६० | |
| २ एप्रिल १७६० | चैत्रवद्य द्वितीया गुरुवाराबद्दल चैत्र वद्य नवमी गुरुवार पाहिजे. चैत्रवद्य ७ ह्मणजेच नंबर १८ तील २० साबान. चैत्रवद्य ८ मंगळ २१ साबान आहे. किल्ला मंगळवारीं घेतला हें खचित आहे. |

| | |
|---|---|
| | १८ एप्रिल १७६० |
| १८ | |
| १९ | ३१ मार्च किंवा १ एप्रिल १७६० |
| २० | १९ मार्च १७६० |
| २१ | २२ मे १७६० |
| २२ | ११ नोव्हेंबर १७६० |
| २३ | नोव्हेंबर १७६० |
| २४ | ९ जानेवारी १७६१ |
| २६ | २० नोव्हेंबर १७६० |
| २७ | २५ जानेवारी १७६१ |
| २८ | |

भारतवर्ष.

| लेखांक. | | |
|---|---|---|
| १ | १३ डिसेंबर १७६१ | |
| २ | ८ जानेवारी १७६२ | |
| ७ | १७७९ | धाकटे माधवराव पेशवे व हैदर यांजमध्ये हा तहनामा झाला. हा तहनामा १७८० त झाला नाहीं; १७७९ त झाला. |
| ९ | २८ सप्टेंबर १७६७ | १७६६ सालाचा ह्या यादीशीं कांहीं एक संबध नाहीं. |
| १८ | १५ आगस्ट १७६३ | |
| १९ | २८ डिसेंबर १७६० | हें पत्र विविधज्ञानविस्तारांत छापलें आहे. ह्या मासिकपुस्तकांत तें पुन्हां छापून अशुद्धें व थोडा वाचनाच्या चुका अनोनात ठेविल्या आहेत. पत्रांत आत चुका आहेत. सन शकांच्या चुकांचा कमाल आहे. |
| ३१ | | |
| ३५ | एप्रिल, मे १७७७ | |
| ३९ | १७८१ | |
| ४० | | हें पत्र काव्येतिहाससंग्रहांत छापलें आहे. ह्या पत्रासारखें पत्र कधीं कोठें छापलें गेलें नसेल! मोठी वाचनाचा सराव जास्त पाहिजे. वेदनूरच्या वकिलास तरी कशावरून! |
| ४२ | | |

| | | |
|---|---|---|
| ४३ | | मोडीच्या वाचनाच्या चुक्या. |
| ४५ | १७४७ | टीपा चुकीच्या. |
| ४८ | १७४४ | मोडी वाचनाच्या चुक्या. |
| ५० | १४मार्च १७५७ | " " इतर चुक्या विस्तरभयास्तव देत नाहीं. |

"पत्रें यादी" वगैरे असे शब्द जेथें आले आहेत तेथें तीं पत्रें, यादी वगैरे काव्येतिहाससंग्रहांतील आहेत असें समजावें.

"लेखांक" असा शब्द जेथें आला आहे तेथें प्रस्तुत पुस्तकांतील पत्रांचे अंक समजावें. इतर उल्लेख स्पष्ट आहेत.

परिशिष्टांना पाउणशें शंभर पृष्ठें बारीक टाइपाचीं लागत असल्यामुळें व जाहीर केलेल्या किंमतीत तीं देणें अशक्य असल्यामुळें तीं ह्या भागांत दिलीं नाहींत. ह्याच अवधींतील घडामोडीसंबंधीं आणीक कांहीं पत्रव्यवहार छापावयाचा आहे त्या बरोबर हीं परिशिष्टें दिलीं जातील.

समाप्त.

५१३.३२/२

मराठी ग्रंथ ... ठाणे.

श्रीशंकर.

नक्कल फर्मान वालाशान बनाम बालाजी बाजीराव वलकाबेहेकी या दिवनात अहदनामे मल्हारराव होळकर बअलकाबे व जयाजी-राव शिंदे बअलकाबरुफकाय आंखुलासहऊसीपाहचे मजमूनहे कीं श्री-महादेव व खंडेराव व धर्म व आईन आपले दरमीयान व जामीन आहत

---

## राजश्रियाविराजित बाळाजी बाजीराव यांस दिलेल्या उच्च फरमानाची नक्कल.

प्रस्तुत राजश्री मल्हारराव होळकर व पातशहाचे दोस्त आणि वीर-शिरोमणि जयाजीराव शिंदे यांच्याशीं तह येणेंप्रमाणें केला जातो कीं—

---

१ हा अहदनामा ह्मणजे करारनामा दिल्लीचा पातशहा आणि मराठ्याकडील सरदार मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे ह्यांच्यामध्यें झाला, असें ह्या करारनाम्यांतच लिहिलें आहे. हा करारनामा बहुश: १७५० सालांत झाला असावा. ह्यावेळीं दिल्लीचा पातशहा अहमदशहा तख्तावर होता.

पातशहाचा मुख्य वजीर सफदरजंग ह्यानें रोहिल्यांचा व अहमदशहा अबदाली ह्याचा दंगा मोडण्याकरितां मराठ्यांना मदतीस बोलाविलें. ह्या अहदनाम्यांत नवाबबहादर व वजीरबहादर ह्मणून जें नांव येतें तें ह्या सफदरजंगाचें होय. मुलतान, पंजाव, सिंध, रजपुताना व रोहिलखंड इतक्या विस्तीर्ण प्रदेशांवर चौथ बसविण्याचा हक्क मराठ्यांना ह्याच करारनाम्याच्या जोरावर प्राप्त झाला व ह्या हक्काच्या संरक्षणार्थ पुढें सहा वर्षे अबदालीशीं, रोहिल्यांशीं व रजपुतांशीं त्यांना झुंजावें लागलें.

मुळांत ह्या अहदनाम्याचे दोन भाग केलेले आहेत. पूर्वार्धाला अर्जी ह्मणून म्हटलें असून, उत्तरार्धाला अर्जीचें उत्तर ह्मणून ह्मटलें आहे. पूर्वार्धांत अमुक अमुक कामगिऱ्या अमुक अमुक किफायती करिता आह्मीं करूं असा मराठ्यांच्या तर्फेनें अर्ज केला आहे व त्याचें उत्तर उत्तरार्धांत दिलें आहे. पूर्वार्धाची उत्तरार्ध बहुतेक पुनरावृत्ति आहे. “ आह्मी करूं ” हें पूर्वार्धांत वाक्य आहे व “ तुह्मीं करावें ” हें उत्तरार्धांत आहे. मूळ करारनामा फारशींत लिहिलेला असावा. त्याचें भाषांतर मराठ्यांच्या सरदारांना कळण्याकरितां मराठींत केलेलें आमच्या जवळील दप्तरांत होतें. अहदनाम्यांतील मराठी भाषा बहुतेक फारशीच आहे. क्रियापदें मात्र मराठी आहेत. विभक्त्यांचे प्रयोग देखील फारशीच्याच धर्तीवर केले आहेत; ह्मणून ह्या उत्तर

की मादाम हयात दरफ़रमाबारदारी व अतायत व बंदगी व दफेकर्दन दु-शमनां अजदिलवजां सई करूं; काय अबदाली, वची राजहा, वची जमीदा-रान, व काय लहान काय थोर जे कोणी की अमुल हुकूमवालाचा करील तंबीह करूं; आणि हुजूर दरमीयान आणूं; व एकसर मुहुकम अकदखासी त-फावत व तजावज न करूं. ज्यांत सबब खैरीयत सलतनतचा व लकाय दौ-लत अबदमुदतचे होय त्याच प्रो कोशीश करूं. आणि ज्यांत सबब रजा-मंदी जनाब अकदसअलाची व रजामंदी नवाबबहादराची होय व इतफाक वजीरुलमुमालिकबहादराचे त्याप्रमाणें अमलांत आणूं. व जो कोणी दोस्त हजरत जनाब अकदस व दोस्त नवाबबहादराचा होय तोच दोस्त आमचा आणि जो मुखालिफ व दुशमन सलतनत व नवाबबहादराचा होय तोच मुखालिफ व दुशमन आमचा व जे कोणी की दरहुकम पातशाईचे

---

श्रीमहादेवाची व खंडेरावाची व धर्माची व स्मृतीची शपथ व साक्ष तुह्मा आह्मास आहे कीं—आह्मीं आमरणांत तुमची आज्ञा व सेवा व चा-करी व तुमच्या शत्रूचें पारिपत्य करण्याचा मनापासून प्रयत्न करूं—मग तो शत्रू अवदाली असो किंवा दुसरा कोणी राजा असो अथवा एखादा लहान मोठा जमीदार असो—सारांश, जो कोणी सरकारचा हुकुम मोडील त्याला तंबी देऊं व हुजूरच्या पुढं आणूं, आणि आपल्या हुकुमाच्या एक केसभरही कमजास्त वर्तणूक करणार नाहीं. जेणेंकरून आपल्या अखंड राज्याचें व खुद्द हुजूरचें कल्याण होईल अशीच तजवीज करूं; आणि जेणेंकरून हुजूरचें व नवाबबहादराचें समाधान व वजीरबहादराची मर्जी राहील त्याच गोष्टी अमलांत आणूं. आणि जो कोणी हुजूर-जनाब यांचा व नवाबबहादराचा दोस्त असेल त्याला आह्मी आमचा

---

हिंदुस्थानांतील त्या वेळच्या मराठीचें सध्यांच्या मराठींत आह्मीं भाषांतर केलें आहे उत्तरार्ध पूर्वार्धाची पुनरावृत्तीच असल्यामुळें हें भाषांतर पूर्वार्धापुरतेंच केलें आहे.

दिल्लीच्या पातशाहाशीं बरोबरीच्या नात्यानें करारनामा करण्याचा अधिकार त्या वेळीं हिंदुस्थानांत कोणालाच नाहीं असा सार्वत्रिक व लोकमान्य समज असल्या-मुळें, या करारनाम्याला अर्जाचें स्वरूप आलें आहे हें उघड आहे.

तेनदरबंदगीत न देत माबंदहा त्याला तंबीह करूं व मिनजुमले पन्नास लक्ष रूपयाचे अज हजूर मोअला मुआलग तीस लक्ष रुपये कारणे तंबीह अबदालीचे मरहमत जाले व दरसुबे मुलतान व पंजाब व थटा[2] व भकर मयें फौजदारीहा, व चारमहाल[3] मजारीफ काबील, व फौजदारी[4] हिसार व संबल व मुरादाबाद व बेदाऊंचे चौथ कारणे खर्च सीपाह बंदहाचे मुकरर जाहाली; व दोन हिस्से बराय सरकारवाला दाखल खालसे शरीफे व्हावे आणि एक हिस्सा बराय खर्च सीपाह पातशाही हमराह वजीरुलमुमालीक बहादरचे व हमराह नवाबबहादराचे आहे. करार पावे. आणि सुबेदारी सुबे हजरत अजॅमेरची[5] व फौजदारी नारनोल व सांभर वगैरे फौजदारीहा मुतआलीक त्याचे व सुबेदारी सुबे मुस्तकरुलखोलफत अकबरा-

---

दोस्त ह्मणूं व जो कोणी हुजूरचा व नवाबबहादराचा शत्रू व दुष्मन असेल त्याला आह्मीं आपला शत्रू समजूं; आणि जो कोणी सरकारच्या हुकुमीं आपलें तनमन खर्चणार नाहीं त्याला आह्मी शिक्षा करूं. आणि पन्नास लक्ष रुपयांपैकीं अबदालीच्या पारिपत्याकरितां तीस लक्ष रुपये आह्मास पावते झाले, व मुलतान, पंजाब, थटा व भकर या सुभ्यांची व त्यांच्या फौजदारीची व चारमहालांच्या साऱ्याची व हिसार, संबळ, मुरादाबाद व बदाऊंचे फोजदारीची चौथ आमच्या सैन्याच्या खर्चाकडे लावून दिली आहे. आणि दोन भाग हुजूरच्या खालसाकडे लावून दिली आहे. आणि एक हिस्सा वजीरबहादर व नवाबबहादराजवळ असणाऱ्या पातशाही सैन्याच्या खर्चाकडे लावून दिली आहे. येणेंप्रमाणें करार केला

---

त्यावेळीं दिल्लीच्या पातशहाची मोठी विपन्न स्थिती झाली होती हें या करारनाम्यावरून दिसून येईल. बाजीरावानें इंग्रजांना जसें सर्व राज्य दान दिलें त्याप्रमाणेंच दिल्लीच्या पातशहानें सर्व हिंदुस्थान ह्या सनदेनें पेशव्यांना देऊन टाकिलें. ह्या सनदेंत साताराच्या महाराजांचें नांव नाहीं!

२ थटा, व भकर हे प्रांत प्रस्तुतच्या सिंध प्रदेशांत मोडतात.

३ चारमहाल कोणत्या प्रांताला ह्मणतात तें कळत नाहीं.

४ हिसार, संबल, मुरदाबाद, नारनोल व बदाऊं हे प्रांत अंतर्वेद व रोहिलखंड ह्या प्रदेशांत आहेत.

५ अजमेर व सांभर उत्तर राजपुतान्यांत आहेत.

बाद मये फौजदारी मथुरा वगैरे फौजदारीहा मुतआलीक त्याची मये म-शरुत सुबेदारीहा व फौजदारीहा व पेशकशात सुबेदारीहा व फौजदारीहा बंदेदरगाहास मुकरर जाहाली व मरहमत जाहाली. करार करितों व शपथपूर्वक कौल करितों की, माफक मामूल मशरुत व पेशकशात सुबेदारीहा व फौजदारीहा लायक अहवाल राजहा व जमींदाराचे आणि शिवाय त्याचे जे कांहीं लवाजीम व लवाहक सुबेदारी व फौजदारीचे होत असेत कारबीज व मुतसरीफ होऊं. आणि बंदोबस्त सुबेजात व फौजदारीहा बवाकई करूं. आणि जे मुलूक की सीवाय तसरूफ पातशाईसी की दर तसरूफ राजहा व जमीदारात लहान मोठे सीवाय जमीदारी कर्दाम त्याची की मुलक पातशाईस तसरूफ केला आहे त्याचे हातांतून खलस करून व काढोन अर्धा दर तसरूफ मुतसदीयान पातशाईचे करूं व अर्धा कारणे खर्च सीपाह आपलीचे घेऊं. आणि हंगाम खलस करणें, मुलक व पारपत्य करणें मुफसीदांचे ज्या प्रो फौज व सीपाह व सरदार व तोफखाना अफजुदरकाबाचे विज्ञम करूं हजुरांतून तैनात होत असावे व बदस्तुर उमरा-

---

आहे. आणि पवित्र अजमीर सुभ्याची सुभेदारी व नारनोल व सांभर वगैरेची फौजदारी व त्यांच्या मुतालिकी आणि अकबराबादेची सुभेदारी व मथुरा वगैरे यांची फौजदारी व मुतालिकी व दुसऱ्या शर्तीतल्या सुभेदाऱ्या व फौजदाऱ्या व त्यांचे नजराणे सेवकास मुकरर केले आहेत व बक्षिस दिले आहेत. ह्मणून आह्मी शपथपूर्वक कौलकरार करितों कीं ह्या सुभेदारींतील व फौजदारींतील राजांच्या व जमीदारांच्या अन्नप्रमाणें मामूल वहिवाटीला अनुसरून सर्व अटी पाळीत जाऊं व त्या सुभेदारीचे व फौजदारीचे जे हक्क व लवाजम असतील त्यांचा कबजा घेऊं व सुभ्यांचा व फौजदाऱ्यांचा पक्का बंदोबस्त करूं व पातशाही राजेरजवाड्यांचे ताब्यांतील मुलुखांपैकीं जुना प्रांत कोणी बळकाविला असेल तो त्याच्या ताब्यांतून काढून अर्धा सरकारांत देऊ व अर्धा सैन्याचे खर्चाकरितां आह्मी आपलेकडे ठेवूं. आणि एखादा प्रांत खालसा करण्याचे वेळेस व फिसाद्यांचे पारिपत्य करण्याचे वेळेस जी अधिक

यान इजाम आह्मी दोघी फिदवीयान मधे फौज बराय बंदगी हाजीर राहूं, आणि जें कामें की कारणें पारपत्य अबदाली वगैरेचे आज्ञा होय जर योग्य ऐकिलें आमचेंच असलें तरी आह्मीच बजाऊं; आणि जर लायक मुदवजह हाणें रायात खीलाफात जाहाबाजीचे होत असेल तरी हमरकाब होऊन मसदर तरदुदेचे होऊं. आणि जर काबील तई फरमूदन उमरायाचे होत असले तरी ज्यांत अमिराविषयीं विनंति करूं तोच तैनात होय की बइतफाक त्याचे त्या कामाचा सरंजाम करूं. ज्या वेळेस हुकम होईल ते समयीं हुजतबोजा दरमयान न आणूं. आणि आज्ञा जनाब अकदसेस बजाय कौल करार आणि शपता आपलीच बलकजादा धर्म आईन आपल्यासी जाणोन लिहिण्यापूर्वीं या अहदनामयाचे ज्या जागा की अमील सरकारवालाचे खुद अमल व दखिलकाग आहेत त्या जागा दखल न करूं; व मदत व कुमक त्यांची करूं. व बंदहाय पातशाई की जे कोणी जागीरात खात असतां चाकरी नाहीं करीत जागीरात त्याची दाखल सरकार-वालांत करवूं आणि त्यांतून चौथ आपली घेऊं; व आपले कौल करारासी

---

फौज, सरदार, शिपाई व ताफखाना आह्मी ठेवूं ती हुजूरतैनातींतील समजत जावी. आह्मी दोघे व इतर अमीरउमराव नित्याप्रमाणें हुजूरच्या सेवेंत हजर राहूं. आणि अबदाली वगैरेंचें पारिपत्य करण्याचे कामीं आमचाच सल्ला हुजूर ऐकतील तर तें काम आह्मी स्वतःच बजावूं, आणि तें काम करण्यास हुजूरची स्वारी स्वतःच जाणें जरूर पडेल तर आह्मी आपल्या स्वारीबरोबर येऊं आणि जिवापाड मेहनत करूं. अथवा ते काम अमिरांच्या हातून होत असल्यास आह्मी विनंति करूं त्या अमिरांनाच पाठवावें, किंवा त्यांची सल्ला घेऊन तें काम आह्मी करूं. आपण आज्ञा कराल त्या वेळेस हुज्जत घालणार नाहीं. आणि केलेल्या कौलकराराखेरीज हुजूरवालाची आज्ञा विशेष मानून व धर्म व स्मृति ह्यांचे जागीं आपली आज्ञा मानून, ह्या तहाच्या पूर्वी ज्या जागा हुजूरच्या खास ताब्यांत होत्या त्या आह्मी आपल्या ताब्यांत घेणार नाहीं इतकेंच नव्हे तर त्या जागांचा बंदो-

न फिरूं; आणि जनाब अकदस व नवाबबहादरासी एकमर मूतफावत न करूं; व जन्मपरियेंत ताबेदार व फर्मानबरदार राहूं. व जर आह्मास दक्षणेस जावयाचा अगत्य पडला तरी कारणें बदगी जनाब अकदस व तंबीहि व पारपत्य मुफसीदाचें कार्याकारण फौज सोडोन जाऊं; व आह्मी ज्या वायद्याचा करार करून जाऊं; त्याच करारापों येऊं व सीपारस लहानथोरासी समजोनच करूं. आणि एहकाम शरीयतचे जारी राहत आह्मी मुकव्वी राहूं, व रसमीयात हिंदूचीहि आमचे धर्मापों जारी राहात, कोण्ही मुजाहीम त्यांचा न होय. आणि तीस लक्ष रुपये की कारणें मोहिम अबदालीचे इनायत जाहाले काय येंदा व काय आइंद की ज्यावेळेस अबदाली येईल आज्ञेप्रमाणें त्याचे पारपत्यास यत्न करूं, व चौथ सुभजात पंजाब व मुलतान व थठा व भकर व चार महाल मजारफ काबील व मुरादाबाद व संबल व हिसार व बदाऊ की मरहमत जाहाली, दोन हिस्से बराय सरकारवाला व एक हिस्सा कारणें फौज वजीरुलमुमालीकबहादर आणि नवाबबहादराचे मुकरर जाहाले, बंदोबस्त मुलक मजकुराचा केलिया उपरांतिक घेतले जाईल. आणि पेशकशात मुकररी पातशाई जमीदारान व राजवाड्यासी

---

बस्त ठेवूं. जे जहागीरदार सरकार चाकरी करीत नसतील त्याच्या जहागिरी सरकारांत दाखल करूं, व त्यांतून आपली चौथ काढून घेऊं; आणि केलेल्या कौलकराराशीं कधींहि फिरणार नाहीं. तसेंच हुजूरशीं व नवाबबहादराशीं कधींहि तफावत करणार नाहीं. आणि जन्मपर्यंत आपले ताबेदार राहूं. आह्मास जर दक्षणेस जाण्याचें अगत्य पडलें तरी हुजूरच्या चाकरीकरितां व शत्रूच्या पारिपत्याकरितां येथें फौज ठेवून जाऊं. तसेंच जो वायदा करून जाऊं त्याप्रमाणें बिनचूक परत येऊं. लहानथोरांची शिफारस आपल्यापाशीं विचारपूर्वक करूं. आह्मी मुसलमानांच्या व हिंदूंच्या धर्मांचे संरक्षण करूं. कोणाला अडथळा करूं देणार नाहीं. ज्याअर्थी अबदालीवर मोहीम करण्याकरितां तीस लक्ष रुपये आपण आह्मास दिले आहेत त्या अर्थी अबदाली ह्या अगर पुढील वर्षी आल्यास त्याचें पारिपत्य करण्यास यत्न करूं. पंजाब, मुलतान, थटा, व भकर व चार

सीवाय पेशकश सुबेदारीचे जे कांहीं मुतसदी पातशाई त्याचे जिम्मे साबीत करून देतील ते तहसील करोन, चौथ आपली वजा करून, बाकी सरकारांत पोहचती करीत जाऊं. व दरसुबेजात व फौजदारीहा दरोगे अदालतचे तरफ सरकारवालासी राहात आणि किलेदार हीं बदस्तूर सरकारवालाचे राहात तगीरीबहाली किल्लेदाराची तालूक हजूर मोअकसी आहे; आह्मी हरगीज किल्लेजात व देहात पशरुत किल्लेदारां आणि दिवाणी व बुताती वगैरे खिदमता पातशाई आणि लवाहक त्याचे व बागात व इमलाक पातशाईत तसरुफ व दखल न करूं. व भोगवटा प्रों तसरुफ मुतसद्दीयान पातशाईचे सोडूं व मदत व कुमकी राहूं व राहाणार. व वस्त व अज शहर पातशाईस राजी ठेवूं; व तंबीह व पारपत्य किल्ले आणि हरामजादे रासत्यांत उपद्रव करणार व वाट मारणार आणि चोरांचा करूं की व्यापारी व मुसाफर पनाहात राहेत. व बंदाहय पातशाईसी की जे जागीरदार जागीर ठेवीत असतां चाकरींत हाजीर नाहींत, माफक मुकम कुदसीचे

---

महाल मजारफ काबील व मुरादाबाद, संबल, हिसार व बदाऊं ह्या सुभ्यांची चौथ आह्माला आपण दिली आहे ती हुजूरचे दोन हिस्से व वजीरबहादर व नवाबबहादर ह्यांच्या फौजेच्या खर्चाकारितां एक हिस्सा देण्याचें ठरलें आहे; तर मुलूख मजकूरचा बदोबस्त केल्यावर आह्मी आपली चौथ घेऊं. सुभेदारी पेशकशाशिवाय पातशाही जमेदार व रजवाड्यांच्या पेशकशांच्या ज्या बाबती हुजूरचे कारकून लोक दाखवून देतील त्या वसूल करून, त्यांतून आपली चौथ काढून घेऊन बाकी सरकारांत पोचती करूं. सुभ्यांतील व फौजदारींतील अदालतींचे जे हुजुरनीं किल्लेदार व दरोगे नेमले आहेत त्यांच्या नेमणुका व बदल्या हुजूरनींच कराव्या. किल्लेदारांना सोपविलेले किल्ले व गांव आणि दिवाणी व खानगी पातशाही खिदमता, तसेच त्यांचे लवाजमे व लवाहक व बागा व इमले ह्यांच्यावर आह्मीं जबरदस्तीनें हक्क सांगणार नाहीं. पातशाही मुत्सद्यांच्या भोगवट्यास अडथळा करणार नाहीं. त्यांना मदत करूं व करीत जाऊं. पातशाही शहरांच्या

मार्गार त्याची दाखल सरकारवालांत करूं व त्यांपैकीं आपली चौथ घेऊं.
दीन व धर्म व महादेवजी व खंडेरावजी दरमयान आहेत.

आंतबाहेरचा बंदोबस्त करूं आणि रस्त्यांत उपद्रव करणाऱ्या व वाट मारणाऱ्या चोरांचे व हरामखोर किलेदारांचें पारपत्य करूं; जेणेंकरून व्यापारी व मुशाफर सुरक्षित रहातील. जे जहागिदार जहागिरी खाऊन आज्ञेंत रहात नाहींत त्यांच्या जहागिरा हुकुमाप्रमाणें जप्त करूं, व त्यांतून आपली चौथ काढून घेऊं. दीन व धर्म व महादेवजी व खंडेरावजी दरमयान आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

## अर्जीचें उत्तर

तवसीले दखल पविणार अस्तानसी पेहर निशाचे नजर अनवार आजहार जौयागुस्तरसीं गुजरला आणि करार केले कीं जन्मपरियंत बालाजी बाजीराव व अवलाद बालाजी बाजीराव व कौम बालाजी बाजीराव आणि आह्मी उभेता फिदवी मधे रुफकाये व अवलाद व कौम जे कोण्ही की जनाब अकदसअला आणि नवाबबहादरासी अमुलहुकूम व तस्दलूक करीत व बेवफाई करीत त्यांजला शपथ महादेवजी व खंडेरावजी व बेलभंडारची आहे. आणि याच कौला प्रो पोथी व गंगाजळ रूबरू नवाबबहादरावर आणि रूबरू वकीलान व मुतसदीयान आपलेंने उचले यास्तव माफक फजल व बक्षीश पातशाहाचे सुबेदारी सुबे मुसत करून खिलाफत अकबराबाद सुबेदारी व सुबे दारुलखैदर अजमेर व फौजदारीहा मुतआलीक त्याची व दर सुबेदारी व सुबे मुलतान व लाहोर व थटा व फौजदारी भकर व आणीक फौजदारी तालूक त्याचे तिन्ही सुब्यांत व चार महाल मजारीक काबील व फौजदारी हिसार व संबल व मुरादाबाद व बदाऊ यांत चउथाईष हिस्सा आंखुलासहसीपाहास मरहमत व मुकरर केले प्रो की शुकरवशीयास या बक्षीश उजमाचा बजावून भोगवट्याप्रमाणें मशरुत सुभेदारी अकबराबाद आणि अजमेर व मथुरा व नारनोळ. व संबल वगैरे फौजदारी तालूक त्याचे एकून दोणी सुबे व पेशकशात सुबेदारी व फौजदारी

वा.३.३१
२

माफक अहवाल रजवाडे व जमीदाराचे आणि सीवाय त्याचे जे लवाजम व लवाहक सुबेदारी व फौजदारीचा होत असेल, काबीज व मुतसरीफ होऊन बंदोबस्त दोनी सुबे आणि फौजदारीचा की मुतआलीक त्याचे आहेत करारवाके करावे. आणि जे मुलक की या दोन्ही सुब्यांत तसरूफ करिंदे पातशाहीसी तसरुफ राजहा व जमीदारान लहानथोराचे सीवाय जमीदारी कदीम त्याची की गेला असेल खलश करोन व सोडोन अर्धा अख्तयार मुतसदीयान पातशाईचे सोडावे आणि अर्धा कारणें खर्च सिपाह आपलीचे घ्यावा व दर सुबेदारी सुबे मुलतान व लाहोर व थटा व फौजदारी भकर वगैरे मुतआलीक तिन्ही सुब्याची आणि चार महाल मेजारफ काबील व फौजदारी हिसार व संबल व मुरादाबाद व बंदाऊं यांत दोन हिस्से बराय खालसे शरीफे आणि एक हिस्सा कारणें खर्च सीपाह पातशाई की हमराह वजीरुलमुमालिकबहादर बाअलकाबे व नवाबबहादर बाअलकाबेचे येक हिस्सा याने चउथअैव कारणें खर्च फौज हमराही आं खुलासहउसीपाचे करार पावले. बंदोबस्त केलीया उपरांतिक दोन हिस्से अख्तयार मुतसदीयान खालसे शरीफेचे आणि एक हिस्सा कारणें फौज वजीरुलमुमालिकबहादर व नवाबबहादराचे सोडावे आणि बाकी एक हिस्सा तुह्मी घ्यावा. हरवख्त खलस करणें. मुलुक आणि पारपत्य करणें. मुफसीदाचे जितकी फौज आणि सीपाह व सरदार व तोफखाना अफजुदरकार विनंति कराल मरहमत केले जाईल. बदस्तूर उमराय उनाम फौजेसहित बंदगीत हाजीर होऊन जे काम की मानंद पारपत्य अबदाली वगैरेचे आज्ञा करूं, करीत राहावें. आणि जर काबील ऐकिलें आं खुलासहउसीपाहचे न होय, माफक दरखास्त त्यांचे सरदार तंई केला जाईल. जरी लायक माबादौलतचे असेल तरीं मुतवजह होऊं. सादर होण्यापूर्वी फर्मान वालाशानचे ज्या जागा की अमील सरकारवालाचे अमल आणि दखल राखितात त्या जागेंत कोण्ही वजह दखल न करावें व मदती व कुमकी त्याचे राहावें. आणि बंदहापातशाहीसी जे कोण्ही की जागीर खाऊन चाकरी न करीत ज्यावेळेस हुकम करूं जागीर त्यांची तगीर

करून तीन हिस्से दाखल खालसे शरीफेत करणें. आणि एक हिस्सा तुह्मी घेणें आणि पेशकशात मुकररी पातशाईची रजवाडे व जमीदारान सीवाय पेशकशात सुबेदारी आणि फौजदारीचे जे कांहीं की मुतसदी निमे त्याचे साबीत करून देतील, तहसील करून, आपली चौथ वजा करोन बाकी सरकारवालांत पोहचावीत राहावे व दरसुनेजात व फौजदारीत दारोगा अदालतीचा सरकारवालासी राहे आणि किलेदार हीं बदस्तूर साबीला सरकारवालासी राहेत आणि तगीरी तहदिली त्याची तालूक हजूर मोअलाचे राहे व हरगीज किलेजात आणि जागीर मशरुत किलेदारासी आणि दिवाणी बुताती वगैरे खिजमता पातशाई आणि लवाजंमा व लवाहक स्यांचे आणि बागात व मीलीक पातशाईत तसरूफ व दखल न करावें. आणि राहाणार शहरान पातशाईस राजी ठेवावे व पारपत्य किले व हरामजादान व रासत्यांत उपद्रव करितात त्यांचा करावें की मुसाफर व व्यापारी खातरजमेनें आमदरफ्त करीत राहात, की मुजरा हुसनखिदमतेचा जाहीर होय आणि पाया नेकीनतीजेचा होय आणि मेहेरबानी व तफजुलात अकदसअलाची आपलेविसी फार जाणावी.

---

[ २ ] ॥ श्री ॥ २ जुलै १७५०.

सेवेसी विज्ञापना: देशीं मल्हारबांनीं व आपणाकडील लोकांनीं किल्ले

---

६ ह्या पत्राची पैवस्तीं ८ साबान आहे. हा ८ साबान कोणत्या सालचा? " रघोजी भोंसल्यास मोगलानें दवबून राखिलें, " ह्या उक्तीवरून हें पत्र रघोजी भोंसले जिवंत असतांना लिहिलें आहे हें स्पष्ट आहे. रघोजी ११६२ ( ११६१ ह्मणून भोसल्यांच्या कागदपत्रांत चुकून पडलें आहे ). फसलीच्या फाल्गुन शुद्ध ३ स ( ना. भा. का. लेखांक १ ) ह्मणजे इ. स. १७५३ च्या ८ एप्रिलास वारला. तेव्हां ८ एप्रिल १७५३ च्या अगोदर हें पत्र लिहिलें असलें पाहिजे. आतां ८ एप्रिल १७५३ च्या अगोदरचा ८ साबान म्हटला ह्मणजे ३ जून १७५२ ला पडतो. ह्या ३ जून १७५२ ला खालील गोष्टी घडून आल्या

घेतले. मल्हारबा मजलदरमजल सेंधव्यास आले. मोगलाकडे त्याचें राजकारण आहे. त्याच्या सूत्रें किल्ले घेऊन आपण हिंदुस्थानास जातात. इकडे मोगलानें सल्ला बिघडावा. रघोजी भोसल्यास मोगलानें दबवून राखिलें. पुढें खामखा सैदलष्करखान, जानैबा यांच्या मनांत एकवेळ उत्पात करून दिल्ही जहागीर फिरोन घ्यावी अथवा कांहीं तरी आपलेंसें करावें हा मनसबा परस्परें कळों आला. दुसरें सांप्रत जायाप्पाचे कागद येतात त्यांत मल्हारबाची व त्याची चित्तशुध नाहीं; वोढ करून, स्वतंत्र जाऊन उत्पात करावा ऐसें दिसतें. याचप्रमाणें मल्हारबाकडीलहि पत्रें येतात त्यांतहि भाव हाच आहे. जायाप्पाचें केलें शेवटास न जावें. ऐसें परस्परें स्वजन-

---

असल्यास ही तारीख ह्या पत्राची होय हें ठरेल. ( १ ) रघुनाथराव तापीतीरावर प्रकाशाजवळ असला पाहिजे; ( २ ) शिंदे होळकर दक्षिणेंतून हिंदुस्थानांत परत जात असले पाहिजेत; व ( ३ ) जातांना त्यांनीं देशीं मोगलाचे किल्ले घेतले असले पाहिजेत. पैकी १७५२ च्या जूनांत शिंदे होळकर हिंदुस्थानांत परत न जातां उलटे गाजुद्दिनाला घेऊन दक्षिणेंत देशीं येत होते ( पत्रें व यादी ५।६।७ ). तेव्हां १७५२ तला हा साबान नव्हे. आतां १७५२ च्या अलीकडला ८ साबान २१ जून १७५१ ला पडतो. परंतु १७५१ च्या जूनांत शिंदे होळकर अंतर्वेदींत लढत होते ( पत्रें व यादी १६२।१६३ ). तेव्हां १७५१ चाहि साबान ह्या पत्राचा महिना नव्हे. आतां १७५१ च्या अलीकडील ८ साबान २ जूलै १७५० ला पडतो. शाहूमहाराज १७४९ च्या डिसेंबरच्या २३ व्या तारखेला वारले ( थो. शा. च. पृ. १०१ ). त्यावेळीं शिंदेहोळकर दक्षिणेंत साताऱ्यास आले होते ( धा. रा. ष. पृ. ३ ). त्यांनीं परत जातांना निजामाचे धोडप वगैरे किल्ले घेतले व ते घेऊन ते माळव्यांत उतरले. पुढें लवकरच रघुनाथरावाला गुजराथच्या कामगिरीला प्रथमच नाना साहेबांनीं पाठविलें. इतक्यांत प्रतिनिधि, ताराबाई, मोगल, इत्यादींनीं अगदीं गहजब करून सोडला. तेव्हां सरदारांना परत आणावें असें नानासाहेबांनीं रघुनाथरावास लिहिलें; परंतु अनेक हरकती येऊन सरदारांना परत येतां आलें नाहीं. येणेंप्रमाणें देशीं येऊन परत जाण्याची, किल्ले घेण्याची व रघुनाथराव तापीतीरावर असण्याची संधि एकाच कालें आली असें ह्या १७५० च्या जुलैंतच झालें. तेव्हां ह्या पत्राची पैवस्ती २ जूलै १७५० ची आहे हें स्पष्ट आहे. नानासाहेब १७५० च्या जुलैंत पुण्यास होते; तेव्हां तापीतीराहून त्यांना पत्र पोहोंचण्यास फार झालें तर एक आठवडा लागावा. अर्थात् हें पत्र १७५० च्या जून महिन्याच्या शेवटास लिहिलें असावें. पत्रावरती तारीख पैवस्तीचीच दिली आहे.

७ निंबाळकर.

विरोध व परराज्यांतील कलहाचें मूळ अजीपासूनच लागलें आहे. आह्मी भोंडगांवास आलों तों राघो लक्ष्मण मल्हारबाचे सुत्रें गंगोबांनीं पाठविले. त्यांनीं कित्येक मजकूर सांगितले. त्यांत सारांश पाहतां जायाप्पाच्याच पेचाचा मजकूर आहे. आह्मांस येथून नेऊन त्यास दबवावें; आपली मातब्बरी हिंदुस्थानांत आहेच; आमची भेटी झाली, एकत्र झालां ह्मणजे खावंद हातास आले; सर्व गुंता उरकला; पुढें चित्तास मानेल तो मनसबा केला तरी कार्यास येईल; ऐसें दिसोन आलें. आह्मीं आपले जागा विचार पाहतां केवळ जायाप्पाचें कार्य नच व्हावें; मल्हारबाकडे होऊन त्यांसच खालें आणावें तरी त्याचेंहि स्वरूप रहात नाहीं, व सांप्रत देशींहि पेच मातबर. मोगलाच्या विचारें पहातां हे उभयता सरदार देशीं असावे ह्मणजे मोगलाशीं सालजाब होऊन बंदोबस्त होईल. दुसरे दोघांचा पेच आहे तोहि वारेल. जायाप्पास दुराभिमान रामसिंगांचा आहे. तरी जशी स्वामीची मर्जी असेल तसें शेवटास न्यावें लागेल. यासाठीं तुर्त राघो लक्ष्मणास सांगितलें कीं मल्हारबांनीं चार मजली माघारें यावें; आह्मी तापीतीरास येतों तेथें भेटी व्हावी; जायाप्पासहि बोलावणें पाठवितों; हरप्रकारें मल्हारबास सांगावें आणि तीर्थरूपाकडे घेऊन जावें; दोन महिन्यांत इकडील बंदोबस्त होऊन पुढें जो मनसबा करणें तो करावा.

---

८ सध्यांचें भडगाव.

९ ताराबाईचा व बारामतीकराचा.

१० मारवाडचा राणा अजितसिंग यास अभयसिंग व बख्तसिंग असे दोन पुत्र होते. अभयसिंगानें १७५० पर्यंत राज्य केलें. त्याच्यापुढें त्याचा मुलगा रामसिंग यास गादी न मिळतां बख्तसिंगास ह्मणजे रामसिंगाच्या चुलत्यास मिळाली. अर्थात् रामसिंगास मराठ्यांची ह्मणजे जयाप्पाची मदत मागणें जरूर पडलें. येणेप्रमाणें १७५० पासून जयाप्पाला रामसिंगाचा ओढा होता; परंतु पुढील दोन तीन वर्षे इतर गडबडीमुळें जयाप्पाला रामसिंगास मदत करण्यास फावलें नाहीं. नंतर १७५३ त बख्तसिंग वारला. तेव्हां त्याचा पुत्र विजेसिंग गादीवर बसला व रामसिंगाला पुन्हां जयाप्पाकडे धांव घेणें भाग पडलें. १७५३।५४।५५च्या सालीं मराठ्यांनीं हिंदुस्थानांत जंगी मोहीम केली त्या संधीस रामसिंगाचेंहि कार्य अर्धेमुर्धें घडून आलें.

याप्रमाणें बोलोन आजीच पत्रें त्यांजकडे रवाना केलीं. आह्मी रनाळ्या आसपास चार मुक्काम करून राहातों. भेटी होतील. चार गोष्टी बोलोन तहास आणावें. स्वामींनीं पत्र गंगोबास लिहिलेंच आहे. त्याचअन्वयें दुसरीं पत्रें गंगोबास व मल्हारबास ल्याहावीं कीं चिरंजीव पाठविले आहेत; इकडे दोन महिने राहून एकदा भेट घेऊन जावें. ह्मणोन याअन्वयें-करून एकामागेंएक दोन चार पत्रें ल्याहावीं. त्याचप्रमाणें जायाप्पासहि ल्याहावीं. मल्हारबा खामखा येतीलसें दिसतें. परंतु जायाप्पाची मर्जी कळत नाहीं. स्वामींनीं त्यास क्षेपनिक्षेप ल्याहावें. ह्मणजे उभयतांसहि घेऊन येऊं. जर जायाप्पा न आले तर मल्हारबा कांहीं अगोदर येणार नाहींत. ऐसें आहे. तरी जायाप्पास पत्रें परस्परेंहि पाठवावीं व आह्मांकडेहि दोन तीन पाठवावीं. ऐसें आहे. सारांश, इतका अटाहशा न करावा. परंतु तुर्त हे दोघेजण परस्परें कलह करून कोणी एक तरी बुडतो. दुसरें आपणास देशीं पेंच मोगलाचा. दोन्हीहि गोष्टी दोलतेस पेंच पडा-वयाच्या आहेत. तुर्त आढळला मनसबा टाकून यावें हें कामाचें नाहीं. यासाठीं आठपंधरा दिवस तापीतीरें आहों. पत्रें वरचेवरी पाठवावीं. साहित्य करावें. इतकें करून कदाचित् दोघांतून एक ना एक तरी फसें करावें तें सविस्तर ल्याहावें. इकडे होईल तें वर्तमान वरचेवरी लेहून पाठवूं. तेथून माणसें पाठविणें तीं जलद पाठवीत जावीं. दोघांसहि चार चार पत्रें देशीं येणें ह्मणोन आह्माकडे पाठवावीं. ह्मणजे आह्मीं याचा उपर त्यास, त्याचा उपर यास दाखवून घेऊन येतों. नाहीं तरी मोगलासीं तो§ कलह होईलसें वाटतें व हे मदतीस येत नाहीं. रघोजी-बावाचा यंदां संशयच आहे. आह्मी दोघांमध्यें शिरोन दोघांसहि परस्परें उपर दाखवून आणितों. काम मातब्बर. पुढें हातचें जाईल. हे भांडले तरी मग दोघांचा एकच होईल. तें कामाचें दिसत नाहीं. यास्तव याप्रमाणें करतों. उदैक कुच करून प्रकाशाकडे तापीसुमारें तीन कोस जाऊं.

११ खानदेश जिल्ह्यांत तापीवर आहे. § तर

मल्हारबा आठा दिवशीं तेथें येतील. आमची त्यांची भेटी होत्ये तों आपले कागद यावे कीं दादा बराबर खामखा येणें. पुढें घरचेदारचे किल्याकोटाचे सारेच पेच एका जागा झाल्यावरी वारतील. बहुत काय लिहिणें. हे विनंति. चहूं मजलीवरी मल्हारबा असतां व त्यांणीं वलाविलें असतां न जावें तरी तोहि शब्द कीं आपल्यामध्यें गृहकलह असतां समजावीस कशी न केली. यास्तव आठपंधरा दिवस गुंता पडेल. हे विज्ञापना.

पै॥ छ ८ साबान.

---

[ १ ] ॥ श्री ॥ ७ सप्टेंबर १७५१

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसीः—

विनंति सेवक शामजी गोविंद साष्टांगनमस्कार विज्ञापना. येथील कुशल

---

१२. १७४९ त शाहू राजे मुमूर्षु असतांना नासरजंग यानें दक्षिण कर्नाटकांत स्वारी केली त्यावेळीं निजामाच्या ताब्यांतील दक्षिण महाराष्ट्र स्वारी करण्यास अगदीं मोकळें होतें. ही गोष्ट नानासाहेब पेशव्यांच्या ध्यानांत येऊन चुकली होती. परंतु, शाहूराजाच्या मृत्युमुळें सातारा येथें स्थिरस्थावर करण्यांत त्यांचा वराच काल गेल्यामुळें ही उत्तम संधि त्यांना साधावी तशी साधली नाहीं. तरी शाहू राजाच्या मरणानंतर त्यांनीं रघुनाथरावाला तापी-तीरावर पाठवून ( लेखांक २ ) ते स्वतः नासीरजंगावर चालून गेले. इतक्यांत डिसेंबर १७५० त नासीरजंगाचा वध झाला व मुजफरजंग नबाबपदाप्रत पोहोंचला. पुढें १७५१ च्या जानेवारींत मुजफरजंगाचाहि अंत झाला व सलाबतजंग मसनदीवर बसला. ह्या संधीस नानासाहेब पेशव्यांनीं निजामाच्या राज्यावर स्वारी केली. परंतु, मसलत रंगारूपास कोठें नुकती येत चालली होती नव्हती, इतक्यांत ताराबाईच्या व गायकवाडाच्या कारस्थानाची बातमी येऊन पोहों-चली. तेव्हां मसलत तशीच बंद ठेवून नानासाहेबांस साताऱ्यास १७५१ च्या एप्रिलांत ( पत्रें व यादी १६८ ) परत यावें लागलें. इकडे नाना पुरंदऱ्यांनीं व बापूजी खंडेरावानीं गायकवाडाचा पराभव साताऱ्याजवळ गेंडयाच्या माळावर ( पत्रें व यादी १६८ ओळ ४ ) केला. ताराबाईला चूप करण्यांत पुढील चार पांच महिने जाऊन निजामावरील मस-

तागाईत छ २७ माहे शौवेल मंदवार पावेतों औरंगाबादेस स्वामीचे कृपा-दृष्टीकरून यथास्थित असे. विशेष. राजश्री नारो शंकर याजकडून रा॥ बाळाजी महादेव खजाना घेऊन येत होते. त्यास बऱ्हाणपुरीं अबदुल खैरखान याणीं खजाना अटकाविला. तें वृत्त सविस्तर पूर्वी विनंतिपत्रीं लिहिलें आहे त्यावरून कळों येईल. त्याउपर नसीरजंग यास सेवकानें चार गोष्टी सांगणें त्या सांगोन याजकडून रायनथमल यांस राजे रघुनाथदास यांजकडे पाठविलें आणि त्यास आपले घरीं बोलाविलें. त्यावरून छ २६ रोजीं राजाजी नसीरजंग याचे घरीं आले. उभयतांचें भाषण होऊन त्यांनीं सेवकास व रा॥ राघो गणेश यांस बोलाऊं पाठविलें. नसीरजंग याणीं राजाजीस सांगितलें कीं तुह्मास आपणाकडून बिगाडाची शुरुवात करणें असेल तर हें कर्म सुखरूप करणें; नाहीं, तेंव्हां गोष्ट कार्याची नाहीं. त्यावरून राजाजी ह्मणों लागले कीं, आह्मासहि आधीं आपणाकडून अंतर पाडणें नाहीं. त्याजकडूनच हरयेक विशई जाजती होत्ये. खजान्याचे कामाची इतल्ला अबदुल खैरखान यांणीं आह्मास दिधली नसतां बेजा केलें. याउपर त्यास मार्कूल करून लिहोन खजाना वगैरे परतोन देवितों. यामकारें निश्चय होऊन त्यांणीं सांडणीस्वार बऱ्हाणपुरास ताबडतोब रवाना केला व आह्मास आज्ञा केली कीं तुह्मी श्रीमंतास लिहिणें. त्यावरून राजेश्री राघोपंत यांणीं सविस्तर सेवेसी विनंतीपत्र लिहिलें आहे. सेवकास वकालतीचें जाबसाल लिहावयास प्रयोजन नाहीं. परंतु नसीरजंग यांस व राजाजीस

---

लतीला १७५१ च्या सप्टेंबरांत पुन्हां प्रारंभ झाला. ह्या वेळीं लढाईला प्रथम कारण निजामाकडूनच झालें. ह्या कारणाचा उल्लेख ग्रांटडफनें केला नाहीं. नारो शंकराकडील खजाना बऱ्हाणपुरीं आला असतां तो अबदुलखैरखान याच्या हस्तें राजा रघुनाथदास, निजामाचा दिवाण, यानें लुटविला. हेंच लढाईला मुख्य कारण झालें. पेशवे आपल्या प्रांतांत चालून आले आहेत असें पाहून, मुसा बुसीच्या सल्यावरून निजामानें पुण्यावर चाल केली. ह्या लढाईच्या प्रारंभाचीं हें व पुढील कांहीं पत्रें आहेत.

१३ सवाल.

१४ नसीरजंग शौकतजंग

१५ राजाजी, रघुनाथदास, रामदासपंत हीं सलाबतजंगाच्या दिवाणाचीं निरनिराळीं नांवें आहेत.

१६ माकूलमुचितं भवेत्.

स्वामीचीं पत्रें पावतीं करून आज्ञेप्रमाणें सविस्तर स्नेहाच्या अभिवृद्धीचा अर्थ निवेदन केला. त्याचें उत्तर प्रत्योत्तर उभयतांपासून घ्यावें तों हा मजकूर दरम्यान आला. यास्तव विनंतिपत्रीं लिहिणें लागला. हें वर्तमान राजश्री बगाजीपंत वकील येथें आले आहेत त्यांणीं व त्यांचे पुत्रांहीं सविस्तर लिहिलेंच असेल. राजाजी व नसीरजंग या उभयेतांपासून उत्तर प्रत्योत्तरें दों चौ दिवसांत घेऊन मुफसल सेवेसी लिहितों. सेवेसी विदित होय हे विज्ञप्ती.

[ ४ ]　　　　॥ श्री ॥　　　　७ सप्टेंबर १७५१

फौज रिसाले नवनिगांदास्त व कैदीमी मिळोन.

६००० नि॥ नसीरजंग बहादूर
- १५०० रिसाला अली आस्करखान
- ५०० रिसाला तुरशं म॰ हंमदखान
- १००० रिसाला अकबरबेग
- १५०० रिसाला मानखान
- १५०० रिसाला खोजेशहा

६०००

६००० नि॥ अबदुल खैरखान
- १००० शहरीं मीरगवासखान आले त्याबरोबर
- ५००० बऱ्हाणपुरीं आहेत

६०००

- २००० रिसाला मीरशमशुद्दीखान बक्षीसायेर
- १५०० रिसाला शेषाचार्य शिवाय बरकंदाज १०००
- २००० रिसाला याकुब मीरखान पीसर तुरक तामानखान
- १००० रिसाला हकीम महमद अलीखान
- १५०० रिसाला फत्तेखान
- १००० रिसाला सफीउल्लाखान
- ५०० रिसाला नजर म॥ खान
- १००० मराठे जगताप व साळोंकी व बाबर वगैरे जमातदार
- १५०० रिसाला मिरन पामाखान

१७ नवीन ठेविलेले लोक, १८ जुने
१९ नालकि बरखंदाज

४००० खुदावंदखान भागानगरीहून बोलाविले आहेत त्याव॥
५०० खोजम कुलीखान

१६५००

वगैरे ब्ऱ्हाणपुरींये

१२०००

२८५००

## साडे अठ्ठावीस हजार याचा तपशील.

येणार

५००० अबदुलखैरखान
४००० खुदावंदखान

येथें आहेत व चारणीस व तैनाती गेले आहेत ऐसे
१९५००

## जिनसी तोफखाना वगैरे हमराही.

किता

३२०० जेजालंदाज बलांये जेजाला
१८०० खासबारदार[21]
२२००० बारकंदाज, प्यादे, पूर्वीचे व कर्नाटकी
५०० बाणदार असामी.
३००० कामाठी व खारवे बंखाणी बेलदार सुतार वगैरे.
३१०४ कित्ता जिन्नस.
१०० उंट बाणास व सुर्माबरूप वगैरेस.
४ हत्ती तोफा लोटायाचे
३००० बैल तोफांचे.
५०० गुदस्तापैकीं त-

किता

१० तोफा मोटाल्या फुलचारीकडे राहिल्या. मध्यम प्रतीच्या समागमें आहेत.
१५० रेहकले.
१० हतनाळा.
२५ सुतरनाळा.
१५०००बाण सुमार
१४ फिरंग्याबरोबर सरंजाम.
३ तोफा कळेनें चालतात.
१ कि। तोफ कळेनें सोडावयाची.
१० तोटे बंदुखाचे व तोफाचे. संदुका ठेवाव-

२०करितां.
२१ खासदारस्तु अश्वधरो.

यार होते.

...० नवखरीद.

३०० नासरजंग असत।
वराडांतून आणविले
होते. ते येऊन हैदरा-
बादपावेतों गेले तों
नासरजंगाचें वर्तमान
आलें. त्यावरून राहि-
ले. ते सेहलीस व चा-
रणीस होते. हल्लीं आ-
णविलें. वरकड भार-
बारदारी आणविली
त्याबराबर तेहि ये-
तील.

३०००

३१०४

यास छकडे.

१४

० सुर्बाबरूपचे छकडे व
गोळ्याचे छकडे व उंट
येथून कुच होता समा-
गमें काय घेतील पहावें.
किती सरंजाम.

८० हत्ती सुमार.
१२०० उंटें भारबार-
दारी वगैरे
सुमार.

११०० हरकारे.
३०० कासीद.

येणेंप्रमाणें तूर्त बराबर घेणार. याखेरीज येथें किले अर्कात तोफा पांच ...त आहेत व अमदानगर पेडगांव येथें साहित्य फार आहे. काम पडल्यास त्यापैकीं आणवितील.

॥ श्री ॥ ७ सप्टेंबर १७५१.

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीः—

...विनंती ऐसीजे. सेवक येथें आलिया उपर नसीरजंग याच्यां चार भेटी

...तील एका किल्लेवजा इमारतीचें नांव. २३ अहमदनगर. २४ दौंडापाशीं आहे.

झाल्या. त्याचा आशय मनास आणितां स्वामीसीं कोणेहि प्रकारें बिघाड न करावा व होऊं न द्यावा; दारमदारानें चालावें; ऐसें दृष्टीस पडलें. राजाजींच्या दोन भेटी जाल्या. त्याचा आशय अंतस्थ मनास आणितां बिघाडाची बहुतशी खुरखुर आहे. नसिरजंग सेवेसीं मिलाफी आहेत ऐसें लेखोन, याचें वजन बहुत भार यास्तव जाह्यात्कारें यासी बहुतसी लोलिंगतों करितात. परंतु अंतर्यामीं यासाहि दुजाणंत नाहींत. वराडाची सुभेदारी यास दिल्ही, याचा सबंब या राखलेंतून कोणेहि प्रकारें यांस काढावें. याच प्रकारें राजश्री जानोजी निंबाळकर यांसाहि जाणतात. परंतु दोघेहि मातबर आहेत. पुढें अमलांत काय येतें तें आढळलियावर सेवेसीं लिहिलें जाईल. राजाजींचे सलाहकार मोठे अबदुलखैरखां व खुदावंदखां आहेत; त्यांस पाचारणीं गेलीं आहेत. दसऱ्याअलीकडे तेहि येऊन पोंचतील. आणि त्यांचे विचारें कुच करणार. वरकड राजाजींहीं निगादास्त केली व करणार. त्याचा अंतस्थ शोध करितां आजतागायत फौजेचा व जिनसीचा बंदोबस्त व निगादास्त केली आहे, त्याची याद अलाहिदा जिन्नस पाठविली आहे त्यावरून कळों येईल. बाणदार दर असामी दरमहा रु. १० प्र॥ करार करावा. दहा असामींपासून वीसपर्यंत ठीक केले आहेत. माणसें कसबी आहेत. त्यांस दुमाहा येथें खर्चास द्यावा लागतो. त्यास जामीन देतील. स्वामींची आज्ञा होईल त्याप्रमाणें खर्चास देऊन रवाना ‡करून. व शिसेंहि ठीक केलें आहे. येथून गंगेपर्यंत पावतें होईल. तेथून पुढें न्यावयास पूर्वीं रा. राघो गोविंद यांस पत्र आणिलें आहे त्याप्रमाणें पाठविलें पाहिजे. स्वामी समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

---

२५ पुढें पुढें करणें. ‡ करूं

२६ मान देणें.

२७ याचें कारण.

२८ मार्गांतून.

२९ त्या वर्षी दसरा १९ सप्टेंबराला होता.

३० नवीन फौज ठेवणें.

३१ दुमाही दीडमाही पगार देण्याची चाल असे.

[ ६ ] ॥ श्री ॥ ८ सप्टेंबर १७५१.

पु॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीः—

कृतानेक विज्ञापना. शहराबाहेर लश्कर कितीक उतरलें ह्मणोन पहावयास मुजरद जासूदजोडी पाठविली होती. त्यास जयसिंगाच्या तळेयावर रायचूर आदवानीवाला, आचार्या दि॥ राजे रघुनाथदास, त्याचे स्वार दोन हजार अजमासें आहे. व भावसिंगपुरेयांत फतेसिंग सिनरवाला दोनसें स्वारानसीं आहे. व भानजी खताल दि॥ गायकवाड दोनशें राऊतांनसीं जैसिंगपुरेयाबाहेर उतरला आहे. येकूण बाहेर शहराचे जमाव सदर्हूप्रमाणें आहे. बाकी स्वार शहरांत जागा जागा आहे, त्याचा सुमार कळत नाहीं. व दिल्लीदरवाजाबाहेर गाडदी फिरंगी याचा प्यादा अडीच तीनेक हजार आहेत. त्यामध्यें प्यादा पंचमेळ, परदेसी, मराठे, मुसलमान वगैरे असे आहेत. नवाबाचे कारखाने अद्याप आले नाहीं. आणावयाची ताकीद जाली आहे. नवाब छ २७ सवालीं शनवारीं सीकारास महमुदी बागांत गेले आहेत. समागमें खान वगैरे अमीर गेले आहेत. सेवेसीं श्रुत जालें पाहिजे. हे विज्ञापना.

---

[ ७ ] ॥ श्री ॥ ४ अक्टोबर १७५१.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीः—

विनंति सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन सा॥नमस्कार. कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान त॥ छ २४ माहे जिल्कादपावेतों म॥ शहर औरंगाबादेस यथास्थित असे. स्वामीचीं आज्ञा-

पत्रें छ १४ मिनहूचीं खासदस्तुराचीं दोन—येक राजश्री शामजीपंत यांचे नांवाचें व येक सेवकाचे नांवानें—सादर जालीं, तीं छ १९ मिनहूस दोनप्रहरां प्रविष्ट जालीं. स्वामीचे आज्ञेचा अर्थ सविस्तर विदित जाला. स्वामीची आज्ञा कीं किंबहुना हें पत्र खानास दाखवणें. आज्ञेप्रमाणें शामजीपंत व सेवक ऐसे खानाकडे जाऊन दोहों आज्ञापत्रांचा अर्थ सविस्तर खानास अवगत केला. खान बोलिले कीं आह्मास समजाविलेंयाप्रमाणें तुह्मीं उभयतां जाऊन राजाजीस समजावणें. इतकें बोलोन नथमल वकील यांस समागमें देऊन राजाजीकडे पाठविलें. छ २२ मिनहूस तृतीय प्रहरीं नथमल व आह्मी उभयतां सेवक ऐसे राजाजीस भेटलों. खलवत जालें. खलवतांत स्वामींचे आज्ञापत्राचा अर्थ सविस्तर राजाजीस निवेदन केला. पत्रें दाखविलीं नाहीं. राजाजी बोलिले कीं खजानेयाकरितां कलह प्राप्त जाला ह्मणोन श्रीमंत आज्ञा करितात; तर खजाना आह्मी द्यावा हे गोष्ट आह्मास योग्य नाहींच. अबदुल खैरखानाजवळोन बेज्या गोष्ट जाली. आह्मास गोष्ट कळतांच आह्मी कोणे वजानें त्यांस ताकीद लेहून पाठविली आहे हें वर्तमान बाळाजीपंतास जाहीर असेल. या गोष्टीची लाज आह्मास जाली आहे. आह्मी न बोलतां खजाना देत आहों. तीन लाख रुपये तो बऱ्हाणपुरीं देवविले. राहिले दोन लाख चौतीस हजार ते उदैक येथें देववितों. तोंडानें देतां ह्मणावें आण देऊं नये हे गोष्ट सहसा घडणार नाहीं पांच लक्षांचा विषय तो काय ? याजकरितां श्रीमंतीं संशय मानावा ऐसें नाहीं. श्रीमंत आज्ञा करितील तर सहज पांच लक्ष रुपये पाठऊं सकतों. तेथें खजाना न देऊं हे गोष्ट कसी घडेल ? या गोष्टीवरून कलह वाढावा ऐसें नाहीं. श्रीमंतांस अबरूची गरज आण आह्मास आपले अबरूची शरम आहे कीं नाहीं ? गोष्ट अनुचितच जाली आहे. श्रीमंतीं आज्ञा केली कीं दिलीहून बाहालीची सनद आलियावर आह्मी जागीर देऊं ऐसें आमचें वचन गुंतलें आहे. तर हे गोष्ट यथार्थ व श्रीमंतानेंहि वचन आह्माजवळ गुंतलें आहे कीं मोगलाई व गनीमाई दोन नाहींत. एकच आहेत. हा आमचा करार. याजकरितां जें आहे तें श्रीमं-

तांचेंच आहे. येकात्मतेस पडदा नाहीं. श्रीमंताचे कमाविसदार आहेत. त्याजप्रमाणें आह्मी कमाविसदार आपल्यास समजोन हिशेब रुजू करितां तो श्रीमंतीं पाहावा. आमचे खर्चाचा सरंजाम करून द्यावा. राहिला ऐवज त्यांचाच आहे. दुसरा पदार्थ नाहीं. वरकड हरएक गोष्टीनें अडचण जालियास मग आमचा उपाय नाहीं. रघोजी भोसले यांस आमचे सिफार-सीवरून जागीर दिली, आण आह्मास साफ जाब द्यावा हें उचित की काय ? ह्मणोन श्रीमंत आज्ञा करितात. तर रघोजी येथें यावा हे खाईश आह्मास नव्हती. श्रीमंतींच त्यांस पाठवून दिला. येविषईचीं श्रीमंतांचीं पत्रें आहेत. रघोजी येथें आला त्यास आह्मी पुढें आणावयासहि कोणी पाठ-विला नाहीं, व वरचेवर त्याची मुलाजमातहि फराविली नाहीं. पंधरा दिवस पडोन राहिला होता. मग त्याची मुलाजमत जाली. दाराजवळ भिकारी भीक मागावयास येतें त्यास मूठभर अन्न द्यावें लागतें. त्या प्रकारें रघोजीचा[32] विचार जाणोन त्यास जागीर दिली. ते त्याची अजिजी जाणोन दिली. त्याचें रहस्य कोणते गोष्टीनें राहिलें हें श्रीमंत जाणतच असतील. असें असोन आतां आज्ञा करितील तर त्याची जागीर जप्त करावयास विलंब आहे ऐसें नाहीं. खजाना खर्च करून फौज ठेविली ह्मणोन श्रीमंतांची आज्ञा[33]. तर कितेक काजकामें कर्तव्य आहेत तीं श्रीमंताचे सेवेसीं विदितहि असतील. यास्तव फौज जरूर ठेवा-वीच लागली. अबदुलखैरखान बिघाडाची मसलहत देतील ह्मणोन तर खान मा॥रनिलेनें बिघाडाची मसलहत काय देणें आहे ? तेथें सर्वांचा भाव की जानबास हलकें पाडावें, ह्मणोन श्रीमंतांस भास जाला. तर जानबास येथून आह्मी होऊन पाठविलें नाहीं. श्रीमंतीं खाहीष करून बोलाविलें ह्मणोन

३२ " आह्मा जवळोन रघोजी बावा मोगलाकडे गेले. मोगलांनीं त्यास जहागीर करार करून क्रिया करून आपलेसें केलें " ( पत्रें व यादी १६८ ). पेशव्याचा जोर पाहून राम-दासपंतानें रघोजीची पायधरणी करून त्यास फितविलें व जाहागीर दिली ही गोष्ट पेशव्यांचे वकील आपल्या आंगीं लावतात हें पाहून रामदासपंत रघोजीला भिकाऱ्याची उपमा देतो.

३३ कमजास्त फौज ठेविली असतां परस्पर कारणें विचारण्याची सभ्यांप्रमाणें पूर्वीहि चाल असे.

गेले. जानबावरच येथून सारा यख्तीयार आहे ऐसें असतां श्रीमंतांकडून पृथक् पृथक् पैगाम येतात, तेथें पैगामांत विपर्यास पडतो. आह्मी जाबसाल कोणाजवळ करावा ? जानबास फिकें पाडावें हे गोष्ट आह्माकडून नाहीं. आतांच तुह्मी श्रीमंतांचे आज्ञापत्राचा अर्थ सांगितलांत आण आजच माहाराव यांचें पत्र गोविंदराव वकिलास आलें. त्याणें आह्मास दाखविलें. त्यामध्यें अभिप्राय भिन्नच आहेत. यास आह्मीं काय करावें ? एकाजवळ जाबसाल असेल तर बोलावें. याजकरितां जानबाचे फिकेपणाचा अर्थ तिकडूनच आहे. आह्माकडून नाहीं. इतकी बोली जाहाली. बाळाजी महादेवहि आह्मा उभयतांसमागमें गेले होते. परंतु खलवतसमयीं बाहेर बैसले होते. सदर्हूप्रमाणें खलवतांत बोली जालियावर मग राजाजीनें बाळाजीपंतास बोलाऊन सांगितलें कीं तीन लाख रुपये तों ब्ऱ्हाणपुरीं तुमचे पदरीं पडिले असतीलच. राहिले दोन लाख चौतीस हजार रुपये उदैक तुह्मास सावकाराजवळोन निशा करून देववितों. इतकें बोलोन आह्मां त्रिवर्गास रुखसत करून आपण मिसला पहावयास गेले. तदनंतर आह्मी सेवक नसीरजंग याजकडे येऊन तेथील मजकूर सविस्तर निवेदिला. नथमलाहि आले होते. खान बोलिले कीं राजाजीचे जाबसाल जे जाले आहेत ते रावसाहेबांस लेहून पाठवणें ह्मणून बोलिले. त्याजप्रमाणें जाला मजकूर सविस्तर सेवेसी विनंति लिहिली आहे. अबदुलखैरखान व महमद अनवरखान काल गुरुवारीं छ २३ मिनहूस दोनप्रहरां शहरास आले. हरसुलाअलीकडे सराई आहे. ते सराईजवळ शहरचे महमुदी बागापलीकडे त्यांची फौज उतरली आहे. हरदोखान म॥रनिले×××××दाखल राहिले आहेत. शहरांत आले नाहीं. अबदुल खैरखानाबराबर फौज पांच हजार स्वार आहेत. त्यामध्यें चारशे करोल आहेत. हत्ती तीन आहेत, निशाणाचा येक व नगारेयाचा येक, व खासा खान म॥रनिलेचे स्वारीचे हौदेयाचा येक, ऐसे तीन आहेत. बाणांचे कैच्यांचे उंट सात व रहकलें बारा व दमानची सवाशे आहेत. महमद अनवरखानाबराबर स्वारीचा हत्ती एक व स्वार चाळीस

व पंचवीस करोल आहेत. खान म॥निले डेरदाखल जालियावर राजे रघुनाथदास भेटीस गेले होते. अबदुलखैरखानांहीं दोन घोडे निळे व दहा खोन पारँचे राजाजीस नजर केली. पैकीं एक घोडा व पांच खोन पारचे घेतले. त्याज-महमद अनवरखानांनीं दोन घोडे व कांहीं वस्त्रें नजर दाखविलीं. पे॥ एक घोडा व वस्त्रें घेतलीं. तदनंतर राजे शहरांत आपले हवेलीस आले. खान म॥रनिलेची फौज बाळाजी महादेव यांनीं पाहिली. ते फौजेचा म॥र बाळाजी महादेव येथें सांगत होते कीं तिसा रुपयांचे किंमतीपासून पांचशें रुपयांचे किमतीपावेतों घोडीं आहेत. बहुतकरून खोगीरभर्तीच फार आहे. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. काल संध्याकाळीं छ २३ मिनहूस खानाकडे गेलों होतों. तेथें खानाजवळ मोगलीये आले होते. त्याजमध्यें एक मोगल अबदुलखैरखानास भेटोन आला. तो खानाजवळ पारसी भाषेंत बोलत होता कीं खान म॥रनिले बहुत मुमूर्षु आहेत. आह्मी भेटावयास गेलों तेव्हां निद्रिस्त होते. आह्मी गेलियावर उठोन बैसले. नेत्र पीतवर्ण जाले आहेत. तबीयत बहाल नाहीं. दोन तीन दिवस तबियत बहाल होतपर्यंत नवाबाची मुलाजमत करीत नाहीं. समाधान जालियावर नवाबाची मुलाजमत करतील ह्मणोन बोलत होता. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. राजश्री मोरोपंत महायात्रेस परवांचे दिवशीं येथून रवाना जाले. संन्यास घ्यावयाचा विचार होता परंतु राहिला. सेवेसी विदित जालें पाहिजे. नासरकुलीखान मोगल मातबर येथें आहे. त्याणें कमाणगराचे चौधरी यांस कांहीं चीज विकावयास दिली होती. रुपये न पावले ह्मणोन त्याचे घरास चौकी पाठविली. चौधरी सांपडला नाहीं ह्मणोन त्याचे बायकोस नेऊन कैद केलें आण घरीं चौकी बसविली. हें वर्तमान राजेयांस विदित जालियावर राजाजीनें बकशीस आज्ञा करून नासरकुलीखान यास बेअब्रू करून पादचारी नेला. पालखींत बैसों दिला नाहीं. नेऊन फजित करून सोडिला. नेते समयीं दोन चार माणसें जखमीं

३४ वस्त्रें.

झाली. हंगामा जाला होता. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. सेवेसी श्रुत जालें पाहिजे हे विज्ञापना. राजश्री शामजीपंत येहीं सेवेसी विनंतिपत्र लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल, हे विज्ञापना.

मराठी ग्रंथ संग्रहालय

[ ८ ] ॥ श्री ॥ १ अक्टोबर १७५१.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी:—

विनंति सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन स॥ नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान त॥ छ २१ माहे जिलकाद पावेतों मे॥ शहर औरंगाबादेस यथास्थित असे. स्वामीचीं आज्ञापत्रें छ १८ जिलकादचीं कित्ते दोन तीं छ २४ जिलकादीं प्रविष्ट झालीं. तेथें आज्ञा कीं खजाना देविला ह्मणतात आण देत नाहीं याचा विचार काय ? महाराव जानोजी जसवंत निंबोळकर यांस निरोप देणें लागतो. खराखुरा खजाना देवविला असिला व पदरीं पडत असेल तर तैसेंच लिहिणें. म॥रनिलेस निरोप देऊं. खानासीं इतकेंच बोलणें कीं येथून खजाना रवाना जाल्यास पुढील स्नेहांत मजा पडेल. देतों देतों ऐसें मात्र बोललां आण मातबर इकडून येईल तेव्हां द्यावा ऐसें मनांत असिलें तर तें उत्तम नाहीं. खजाना येऊन पावलियावर अगर तेथून रवाना जालियावर सर्व जाबसालांत जीव पडेल. लौकिक विरुद्धचा वारेल. विठलराव येऊन पावले नाहींत ह्मणोन तपाशिलें स्वामीची आज्ञा. आज्ञेप्र॥ अर्थ सविस्तर खानास विदित केला.

३५ जानबा निंबाळकर ह्या वेळीं पुण्यांत वसले होते. " जानबा आमचे मित्र पुणियांत तीन महिने येऊन बसले आहेत. " ( पत्रें व यादी १६८ ) ह्मणून ह्याच जानबाविषयीं नानासाहेब वकीलानें पत्रें व यादींतील १६८ व्या पत्रांत लिहितात. जानबा निजामाकडून त्याचे दरबारीं वकीलीस आले होते.

खान बोलिले कीं खजाना देतात यांत संदेह नाहीं परंतु अद्याप निशा करून देत नाहीं. यास्तव राजाजीस पैगाम पाठवून निशा करून देवविती. बऱ्हाणपुरास तीन लाख रुपये देवविले ते पदरीं पडिले कीं काय ह्मणोन खानांनीं सेवकास पुसतां उत्तर दिलें कीं बऱ्हाणपुरीं तीन लाख रुपये देवविले त्याजपैकीं एक लक्ष चाळीस हजार रुपये मात्र वकिलास मोजून दाखविले. परतु पैका अबदुलखैरखानाचे हवेलींतच आहे. वकिलाचे तावडीला पैका जाला नाहीं. खानांनीं स्वामीचे आज्ञेप्र॥ अर्थ राजाजीस नथमल वकिलाबराबर सांगोन पाठविला. सेवक खानाजवळ या गोष्टीचा मजकूर नित्य करितो कीं जासूद जोडी रवाना व्हावयास खोटी आहे. आपण सांगतील त्याप्रे॥ लेहून पाठवितों. या मजकुराचा जबाब जलद आणविला आहे. छ २७ जिलकादीं खान सेवकास खुलवतांत बोलिले कीं खजना देतात, परंतु थोडकीसी दिकत आहे. तो मजकूर उदेक सांगों. छ २८ जिलकादींखानाकडे गेलों. मजकूर पुसतां बोलिले कीं खजाना खामखा देतात. दिकतीची गोष्ट आहे ते तुह्माजवळ सांगतां येत नाहीं. परंतु तुमची निशा झाली पाहिजे याजकरितां बोलतों. परंतु तुह्मी हे गोष्ट कोणाजवळ नै[36] बोलावी व रावसाहेबांस लेहून न पाठवावी. खुलासा हाच कीं येथें खजानेयांत पैकीं नाहीं. इतकी दिकत. खजाना आणविला आहे. चहूं पांचां रोजांत येऊन पोंचेल. आलियावर निशा करून देतील. पांचां सातां रोजांची दिरंगी खजानेयाचे येण्याकरितां मात्र आहे. याजकरितां तुह्मीं रावसाहेबांस मोघमच लिहिणें कीं पांचासातां रोजांत खजाना देतात. संशय नाहीं. हे हलकी गोष्ट न लिहिणें ह्मणोन बोलिले तें वर्तमान सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. मग त्यांचा अंतर्भाव काय आहे तो कळत नाहीं. बहुधा ऐवज नसेल हेंच खरें. येथें सिबंदीकरितां बहुत गवगवा आहे. खान बोलत होते कीं रावसाहेबांचे डेरे जालयाचे

[36] ह्मणजे बोलावी.

[37] पेशव्यांना ह्या वेळीं 'खर्चाची' टंचाई होती त्याला टोंचून हें रामदासपंताचें वर्णन आपल्या स्वतःला उद्देशून बोलणें आहे.

वर्तमान येथें आलें आहे. आतां नवाबाहि लवकरच कुच करणार आहेत. सेवेसी विदित जालें पाहिजे. छ सविसांचे रोजीं रविवारीं फिरंगी यांचा सण होता. फरंगी येथें आमच्यामांत राहतात. रविवारीं प्रातःकाळीं फरंगी यांनीं वीस एकवीस तोफा सोडिल्या. तदनंतरें सर्व फरंगी पेठणदरवाजाबाहेर बाग आहेत त्या बागांत गेले होते. तेथें आपला सण केला. नृत्यांगना नेल्या होत्या. संध्याकाळचे समयीं राजे रघुनाथदासाहि नृत्य पहावयास गेले होते. तिकडून दीड प्रहर रात्रीस मोठे जुलमानें फरंगियांसहवर्तमान शहरांत आलें. सेवेसी विदित होावयाकरितां विनंति लिहिली आहे. दुसरी उडवार्ता ऐकिली कीं राजश्री मल्हारबा होळकर फौजसुद्धां झांसीसें[38] दाखल जालें. ब्राह्मणपुरी रवाना अटकाविला हें वर्तमान ऐकोन बहुत संतप्त आहेत. जरीदा होऊन ब्राह्मणपुरीचे पारिपत्यास येणार ह्मणोन वर्तमान आढळलें. स्वामींचे सेवेशी कासीदहि आले आहेत. आढळलें वर्तमान सेवेसी विनंति लिहिली आहे. सत्य मिथ्य कळत नाहीं. सेवेसी श्रुत जालें पाहिजे. दमाजी गाईकवाड यांचा भाऊ केदारजी ह्मणोन कोणी गुजराथेंत आहे. त्याणें व बाणराव दि॥ मजकूर या दोघांनीं फौजबंदी बहुत केली आहे[39]. ह्मणोन येथें दाट अवई आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

———

३८ अंतर्वेदींतील पठाणाशीं लढाई आटपून होळकर १७५१ च्या अक्टोबरांत झांशीस आले.

३९ ह्यावरून दमाजी १७५१ च्या अक्टोबरांत कैदेंतच होता व त्याचा कोणी कदेरजी नांवाचा भाऊ त्याच्याकरितां गुजराथेंत फौज जमवीत होता असें दिसतें. रघुनाथरावाच्या बरोबर दमाजीला देऊन गुजराथेंत नानासाहेबांनीं कधीं पाठविलें ह्याचा उलगडा करणें जरूर आहे. १५ मार्च १७५१ त दमाजीचा सातान्याजवळ गेंड्याच्या माळावर पराभव झाला ( पत्रें व यादी १६८ ). पुढें महिन्या पंधरा दिवसांत नानासाहेब पुण्यास येऊन त्यांनीं दमाजीला कैदेंत ठेविलें. तो १७५१ च्या अक्टोबरांत कैदेंतच होता. पुढें १७५१ च्या नोव्हेंबरांत व डिसेंबरांत पेशव्यांच्या निजामाशीं कुकडी नदीवर झटापटी झाल्या व १७५२ च्या जानेवारांत तह झाला ( पत्रें व यादी १६१ ). तह झाल्यावर लवकरच रघुनाथरावदादांना गुजराथच्या स्वारीस पाठविलें ( पत्रें व यादी ३५५, १६१ ).

[ १ ] ॥ श्री ॥ ९ अक्टोबर १७५१.

पु॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीः—

कृतानेक विज्ञापना. अबदुल गैरखान नवाबास भेटले. ते समयीं खान मशारनिल्हेनें नवाबास बिगाड करावया मजकुरांत नवाबास सला दिला कीं गनीमाईत या दिवसांत फितुर आहे. प्रधानपंतहि बेफाम आहेत. हा समय उत्तम आहे. आपण सर्व गोष्टीनें सर्गुदा आहा यास्तव साधले प्रसंगास आळस न करावा. आह्मी जईफ जालों आहे. बहुत दिवस वाचत नाहीं. सरकार कामावर खर्च व्हावें हे आपली उमेद आहे यऱ्हवीं तऱ्हीं आपण बहुत दिवस वांचत नाहीं. व्यर्थ मरावें ते साहेब चाकरीवर हक व्हावें यांत उत्तम आहे, ह्मणोन कितेक प्रकारें मसलहत दिली. नसीरजंग व राजाजीहि

१०-हा " दमाजी गायकवाड याची वर्तणूक बहुत सुरळीतपणाची होती ( पत्रें व यादी ३८३ ) असें नानासाहेबांचे प्रत्ययास आल्यावरून व दमाजीनें ताराबाईची बाजू सोडून दिली ह्मणून रघुनाथरावाबरोबर ( धा. रा. च. पृ. १८ ) किंवा बहुशः रघुनाथरावाच्या अगोदर ( ग्रांट डफ भाग १८ टीप ) दमाजीला नानासाहेबांनीं गुजराथेंत पाठवून दिलें. ही रघुनाथरावाची गुजराथेवरील, ग्रांट डफ ह्मणतो त्याप्रमाणें दुसरी स्वारी नसून, तिसरी स्वारी होय. रघुनाथरावाची गुजराथेवरील पहिली स्वारी १७५० त झाली ( लेखांक २ ). परंतु ह्या स्वारींत गुजराथेंत त्यांच्या हातून फारसें काम झालें नाहीं. रघुनाथरावाची गुजराथेवरील दुसरी स्वारी १७५१ त झाली. ह्या स्वारींत कांहीं काम करावयाचें तों निजाम पुण्यावर चाल करून आला; तेव्हां दादांना देशीं परत यावें लागलें. नतर देशीं स्वस्थता झाल्यावर दमाजी गायकवाडाला पुढें पाठवून रघुनाथरावदादा गुजराथेवरील तिसऱ्या स्वारीस गेले. रघुनाथरावाच्या ह्या गुजराथेवरील तिसऱ्या स्वारीच्या १७५२ सालावरून ग्रांट डफनें जी उडी मारिली आहे ती १७५५ सालावर एकदम उतरली आहे. मधील तीन सालांचा इतिहास ग्रांट डफनें अजीबात गाळला आहे. १७५२, १७५३, १७५४, १७५५ सालांत रघुनाथरावानें केलें काय ह्याचा पत्ता मुद्दा ग्रांट डफला बिलकुल लागला नाहीं. त्यामुळें त्याच्या इतिहासाला बहुत कमीपणा आलेला आहे. ह्या कमतरतेचा विशेष प्रपंच पुढील एका टीपेंत योग्य स्थळीं केला आहे.

४० संपन्न. ४१ वार्धक्यानें क्षीण. ४२ धन्याच्या सेवेंत मरावें.

होते. खान मशारनिले दुर्बुद्धि सांगोन गेलियावर मागें नसीरजंग व राजाजी बैसोन महसलत करितां, नसीरजंगांनीं बहुत प्रकारें परिमार्जन केलें कीं हे गोष्ट उत्तमांत दिसत नाहीं. मागें थोरले नबाबानें बहुत यत्न केला होता तो व्यर्थ जाला ह्मणून सख्य संपादून होते. आतां तुह्मी विरुद्ध करूं ह्मणतां; ऐशास तुमच्यानें गनीमाई मोडवत नाहीं व गनीमाच्यानेंहि तुह्मांस मोडवत नाहीं. नाहक लौकिक करून घ्यावा. सीबंदी खालें यावें. मुलकाचा पाटावरवंटा होईल. बरा दिसत नाहीं. ऐसें बहुत प्रकारें परिमार्जन केलें. हें वर्तमान दरबारचें शहरांत आवई फुटली. पांचासाता ठायीं आईकिलें. खरें खोटें कळत नाहीं. बहुतां मुखीं आईकिलें ह्मणून सेवेसी विनंति लिहिली आहे. अबदुल खैरखानाजवळ पांच हजार फौज आहे. त्यामध्यें कांहीं लोक राजश्री हरी दामोदर याजकडील आहेत व कांहीं मानाजी निकमाकडील आहेत. राऊत चांगले नाहींत. बारगीर भरतीचा आहे ह्मणोन लोक बोलतात. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली असे. अबदुल खैरखानाहि व्यथेंत आहेत; आरोग्य नाहीं. समीप होतील ह्मणोन लोक बोलतात. सेवेसी विदित जालें पाहिजे. हे विज्ञापना. सरकारची कासीद जोडी हुजरून राजश्री मल्हारजी

४३ निजामुल्मुल्कानें.

४४ हा शब्द संन्यासी, साधु, संत यांच्या मृत्यूला लाविण्याचा प्रघात आहे. परंतु तो येथें द्वेषजन्य थट्टेनें खैरखानाला लाविला आहे.

४५ पुण्याहून उत्तर हिंदुस्थानांत जातांना कासीद औरंगाबादेवरून जात. पुणें, नगर, कायगाव, औरंगाबाद, अजंटा, बऱ्हाणपूर, हांडिया, सीहूर, सिरोंज आणि झांशी; हा हिंदुस्थानांत जाण्यास अगदीं जवळचा रस्ता होय. मराठ्यांची राजधानी पुणें. तेव्हां पुण्याहून झांसीस जाण्यास कायगावटोक्यावरून व अजंट्याच्या घाटांतूनच रस्ता जवळ असे. पुण्याच्या पश्चिमेस इंग्रजांची राजधानी मुंबई आहे. तेव्हां, कासारघाटानें नाशीक, मनमाड, धुळें, हा रस्ता घेऊन मग बऱ्हाणपुराला इंग्रजी रस्ता मिळतो. भाऊसाहेब पानिपताला उदगिराहून अजंट्याच्या घाटांतून हांडियावरूनच गेले. महाराष्ट्रांतून हिंदुस्थानास जाण्यास एकंदर तीन मार्ग आहेत. एक कोंकण गुजराथेंतून अमदावादेवरून रजपुतन्यांत जातो. दुसरा घाटमाथा व वेरुळचे डोंगर ह्यांच्यामधून मालेगावावरून, सेंधव्याच्या घाटांतून महेश्वर, इंदूर, उज्जैन इत्यादि शहरांवरून रजपुतान्यांत जातो. तिसरा पुणें, औरंगाबाद, अजंटा व हांडियावरून हिंदुस्थानांत जातो.

ोळकर याजकडे जात होती ते येथें शहाचे चौकीवर आढळली. त जोडी
ाक व मल्हारबा कडून कासीद जोडी हुजूर जात होती तहि येथें चौकीस
आढळली. येकूण दोन्ही कासीद जोडिया राजे रघुनाथदास यांहीं अटकवून
बैसविल्या आहेत, ह्मणोन सरकारचे जासूद दरबारचे व्रातमीवर असतात
त्यांनीं सांगितलें. जासूद बोलिले कीं हें वर्तमान मनोहरपंतास विदित केलें.
मनोहरपंत बोलिले कीं दरबारास गेलियावर मनास आणूं. सेवेसी विदित
जालें पाहिजे. हे विज्ञापना.

---

[ १० ] ॥ श्री ॥ १ अक्टोबर १७५१.

पु॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान

कृतानेक विज्ञापना. नळदुर्गवाले यांचा कासीद दिलीस गाजुदीखानाकडे कागद व पांच मोहरा नजर व कांहीं वस्त्रें घेऊन जात होता तो ब्न्हाणपुरास आढळला. तेथून येथें पाठविला. त्याचा शिरच्छेद करावयाची आज्ञा राजाजीनें केली. नबाब बोलिले कीं इतका त्याचा अपराध नाहीं. शिरच्छेद न करावा. मग त्यास गाढवावर बैसवून विपत्य करून सोडिला. नळदुर्गवाले यांचा कासीद ह्मणून लोक ह्मणतात. सत्य मिथ्या कांहीं कळत नाहीं. आढळलें वर्तमान सेवेसी विनंति लिहिली आहे. राजश्री शिवराम गोविंद भिडे यांचे मारिफत कांहीं बाणदार सरकारांत चाकर आहेत. त्यांजपैकीं चौगजण बाणदार तनखा न पावली ह्मणोन निघोन आले. ते येथें राजे रघुनाथदास यांजकडे नोकर जाले. ते चौघेजण आपले बराबर दुसरे वीस पंचवीस बाणदार घेऊन शिवराम नाइकाचे दुकानीं जाऊन मा॥रनिलें गुमास्ते चिंतामण केशव यांजपाशीं तनखेकरितां बहुत हंगामा केला. त्यां

आवसाल करावयाचा तो करून पंधरा रोजांचा वाइदा केला आहे. हें वर्तमान सेवकास विदित जालें त्याजवरून सेवेसी विनंति लिहिली आहे. चिंतामण केशव यांनींहि सेवेसी विनंत लिहिलीच असेल. पाजी लोकांचा विचार आहे. त्यांची तनखा राहिली असली तर देववणार स्वामी धनी आहेत. हे नाजूक गोष्ट येथें नाभाट जालियास अवघी गाठ पडेल. स्वामीधनी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. नासरकुलीखान याची अप्रतिष्ठा राजाजीनें केली, हें वर्तमान पूर्वील विनंतिपत्रीं सेवसी विनंति लिहून पाठविली आहे, त्याजवरून विदित झालें असेल. अलीकडे शोध मनास आणितां निजामअली नवाबाचे बंधु हे राजे रघुनाथदास यांजवर रुष्ट आहेत. त्यांनीं राजेयास मारावयाचा प्रयोग करून महजर केला. त्याजवर मातबराच्या मोहरा घेत चालिले. या प्रयोगास पांच सातजण मिळोन मोहरा केल्या. त्यामध्यें नासरकुलीखानानें मोहर केली होती. पुढें ही गोष्ट प्रकट होऊन राजेयांस विदित जाली. त्याजवरून निजामअली यांस निग्रह केला व नासरकुलीखानास बेवकर केलें. वरकडांचे तलासांत राजे आहेत. हें वर्तमान एका मातबर कायतानें सांगितलें. तें सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. येथें शोध घेतां राजाजीवर अवघे रुष्ट आहेत. कोण प्रसंगीं काय होईल कळत नाहीं. राजाजीस मोठा भरवसा फरंगीयाचा आहे. सेवेसी विदित जालें पाहिजे हे विज्ञापना. नवाब आज बुधवारीं प्रतिपदेस राजेयास जाणार होते, परंतु आज राहिले. उदैक जाणार आहेत. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. हे विज्ञापना.

---

४६ १ अक्टोबर १७५१

[ ११ ] ॥ श्री ॥ १४ आक्टोबर १७५१.

श्रीमंत राजेश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीः—

विनंति सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेवून स॥ नमस्कार कृ-तानेक विज्ञापना. स्वामींचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान त॥ छ ५ माहे जिल्हेज पावेतों मे॥ शहर औरंगाबादेस यथास्थित असे. स्वामींचें आज्ञापत्र खासदस्तुरच्या पुरवण्या दोन—एक राजश्री शामजी गोविंद यांचे नांवची व एक सेवकांचे नांवची—छ २९ जिलकादच्या सादर त्या छ २ जिल्हेजीं चतुर्थ प्रहरीं प्रविष्ट जाल्या. लखोटा फोडून शामजीपंताची पुरवणी त्यांस दिली. सेवकानें आपले नांवची पुरवणी अक्षरशा वाचून मनन करून कृतार्थता मानिली. आज्ञेप्रमाणें कोणाजवळ कांहीं बोलत नाहीं. खानाजवळ नित्य जाऊन आज्ञेप्र॥ स्नेहभाषणच करितों. व जें वर्तमान आढळतें तें विनंतिपत्रीं लेहून पाठवितों. स्वामीचे आज्ञेविरहित अणुप्रमाण कार्य करीत नाहीं. पूर्वील खासदस्तुराचे पुरवणियांचा अर्थ शामजीपंतांचे विचारें विदित करावयाचा जाला तो म॥रनिलेहींच खानांस व राजाजीस निवेदिला. सेवक सन्निध मात्र होतां. म॥रनिलेनें आपले व सेवकांचे आज्ञापत्रांचा अर्थ एकत्र करून निवेदिला. सेवकांचे आज्ञापत्रीं आज्ञा होती कीं हें पत्र वाचून दाखवणें. सेवकास स्वामींचे आज्ञेविना दुसरें कर्तव्य नाहीं. सेवक अज्ञान आहे. स्वामी कृपादृष्टीनें पालन करून परवर्दा करीत आहेत. वरकड येथील वर्तमान तर नवाब रोजेयांस छ १ जिल्हेजीं गेले ते छ ३ मिनहूस रात्रौ शहरदाखल जाले. आतां बाहेर डेरे करावयाची बोली आहे. जागा जागा तयारी होत आहे. कोणी ह्मणतात कीं उदैक साबे तेरिखेस पेशखाना बाहेर निघणार. कोण्ही ईद जालियावर ह्मणतात. या प्रकारचें येथील वर्तमान. परंतु येथें सिबंदीचा गवगवा बहुत जाला आहे. सिबंदी दिलियाविरहित फौज बाहेर पडत नाहीं. सिबंदी द्यावयास येथें

ऐवज नाहीं. खुदावंदखान हैदराबादेहून चाळीस लक्ष रुपये खजाना घेऊन येत आहेत. ते आलियावर सिबंदी देतील. येथूनहि कांहीं लोक खुदावंदखानास आणावयास रवाना होत आहेत. येथें आज दोन तीन दिवस हुलड झाली आहे कीं श्रीमंतीं यशवंतराव पवार दहा हजार फौज जरीदा करून खुदावंदखानावर पाठविले आहेत. खजाना अटकावून आणावा हे वार्ता येथें दाट राजाजी पावेतों आहे. या वर्तमानावरून कितेकांचा आव गेला आहे. जर हे गोष्ट सत्य असली, खजाना सरकारांत हस्तगत जाला, तर हे सहजच गर्वहत होत आहेत. व येथें लोक ह्मणतात कीं दोन महिने श्रीमंतीं असेंच यांस दबकाऊन राखिलेयास हे आपलेयांत आपण मरतात. यांस मारावें लागतच नाहीं. लौकर दारमदार जाला तर यांची स्थिती राहेल ह्मणोन सर्वत्र ह्मणतात. यांस सिबंदी व खानगी खर्च मिळोन निम्य लक्ष रुपये खर्च आहे. दरमहा तीस लक्ष रुपये पाहिजेत. खजान्यांत तो पैका नाहीं. हैदराबादचा खजाना आणविला आहे. यावा तर तोहि आला तरी तितक्यानें बेगमी होत नाहीं ह्मणोन लोक ह्मणतात. यास्तव या दिवसांत यांस प्रतापाचें दर्शन जालियानें याचा गर्व हत होईल. स्वामींचा पुण्यप्रताप यांजवर गालिब आहेच. काल छ ४ रोजीं सलाबतजंग व राजाजी ऐसे अबदुलखैरखानाकडे गेले होते. डेरे बाहेर करावयाचे विचारांत आहेत. नवाबाचे बहिणीचें लग्न आहे व नवाबहि आपलें लग्न करणार. हीं कार्यें करून घ्यावीं; ईद करावी; पश्चात् निघावें ह्मणोन घालमेल आहे. काय करितील पाहावें. रिक्तपाणी पडिले आहेत. उगाच आव मात्र धरितात. प्रसंगास गंधर्वनगरा-भास दिसतो. याजकारितां यांजवर या दिवसांत सलाबत गालीब जालियानें यांची गुर्मी राहणार नाहीं ऐसें आहे. स्वामी समर्थ आहेत. सरकारच्या कासीद जोडिया दोन येथें राजाजीनें अटकावून ठेविल्या आहेत. हें वर्तमान सेवकानें खानास हटकिलेयावर बोलिले कीं आह्मास विदित नाहीं. याउपर

४७ गंधर्वनगराप्रमाणें अवास्तव.

राजाजीस सांगोन सोडवितों. आज उद्यांत कासीद सोडवून घेतों. येथें राजा-
जीनें शहरचे गर्दनवाईस मोठी खबरदारी मांडिली आहे. चौकीदारांस
ताकीद जाली आहे कीं कोणाचा जासूद येईल अगर शहरांतून
जाईल त्यास रुजू करावें यास्तव लोकांस कागदपत्र पाठवावयाचा
संशय निर्माण जाला आहे. कालच सरकारची जोडी खासदस्तुराच्या
पुरवण्यांचीं आज्ञापत्रें घेऊन आली. त्या जासुदांनीं झोळणे बाहेर ठेऊन
सडे होऊन चौकीवरून निभाऊन शहरांत आले. त्यास बाजपूस चौकी-
दारांनीं केली. खालीं पाहिलें ह्मणोन सोडिलें. ऐसा प्रसंग येथें जाला आहे.
याजकरितां हुजरून जोडी रवाना होईल तिणें सातारेयास यावें. तेथें झोळणें
ठेऊन खालीं होऊन पत्र येथें पोंचवावें. ऐसी आज्ञा जासुदास जाली
पाहिजे. येथूनहि याच रीतीनें विनंतिपत्रांची रवानगी करीत जाऊं. सेवेसी
श्रुत जालें पाहिजे. येथें एक पडेगोसावी बेगमबेगमपुरियांत आहे. खाना-
कडे जातां वाटेवर आढळतो. त्याणें अकस्मात् एक दिवस सेवकास सांगि-
तलें कीं तुह्मी पेशवे यांचे वकील आहां. आह्मीं स्वप्न पाहिलें कीं बारा-
मतीवाला कोणी आहे तो घालमेलींत आहे. तर हें वर्तमान तुह्मी जरूर
आमचें नांव घालून श्रीमंतास लेहून पाठवणें. त्याजवरून सेवेसी विनंति
लिहिली आहे. राजश्री बाबूजी नाईकांकडील वकील कृष्णाजी रघुनाथ
राजाजीकडे जात येत असतां कांहीं उत्तेजन देतात ह्मणूनाहि येथें लोक बोल-
तात. सारांश येथें वळवळ करीत आहेत. सप्तऋषीवरील मातुश्रींचेहि येथें
कागदपत्र येतात. जाबसाल जात असतात. लक्ष्मण खंडागळा नवाबकडील
याचा व रघूजी भोसल्याचा हेंर्षामर्ष जाला ह्मणोन येथें गप उठली आहे.

---

४८ बाबूजी नाईक बारामतीकर. ४९ क्षुद्र किड्यांसारखी. ५० सातारा.

५१ येथें ताराबाईचा नाजूक थट्टा केला आहे. डोंगरांवरून जशा, सोनजाई, वनजाई, इत्यादि आया असतात तशी सप्तऋषी ह्मणजे सातारच्या किल्यावरील आई ह्मणजे ताराबाई. ताराबाई ह्या वेळीं वृद्ध झाली असून ह्मातार्‍या मांजराप्रमाणें फार खुनशी झाली होती. तेव्हां लोकं तिला रानच्या देवांची उपमा देत.

५२ तंटा, लढाई.

सत्य मिथ्य कळत नाहीं. गायकवाडाचे भावांनीं सोनगडाकडे फौज जमविली आहे. दहा वीस हजार जमा झाला आहे. नवाबास सामील होणार. त्यांचा भरोसा राजाजीस बहुत आहे ह्मणोनहि येथें लोक बोलतात. मागें सेवेसी विनंति पत्रीं लि॥ होती कीं नळदुर्गवाल्याचा कासीद दिल्लीस गाजूदीखानाकडे जात होता तो बऱ्हाणपुरीं सांपडला. येथें आणून गाढवावर बैसवून सोडिला. ऐशास वर्तमान मनास आणितां तो कासीद चित्रदुर्गवाल्याचा होता. पांच मोहरा नजर व पत्र घेऊन जात होता. चौघेजण होते. त्यांत तिघे पळाले. त्यांत एक सांपडला. त्याची गत येथें सदरहू प्रे॥ जाली. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. येथें शहरांत §सजगूरजोंधळें दर रुपयास तीस शेर मिळतात. हरभरे पंधरा शेर, गहूं १६ शेर, तूप भाद्रपदांत रुपयाचे निम शेर होतें. मग पाऊण शेर जालें. मग शेरभर, मग सवा शेर, आतां दीड शेर आहे. तेल चार शेर आहे. दूध नवदहा शेर. लांकडें रुपयाची एक मण. चारा फार महर्ग झाला आहे. एका जनावरास पावल्याची वैरण पुरत नाहीं. याप्रे॥ वर्तमान आहे. राजश्री शामजीपंत सांगत होते कीं राजांजीचे चित्तांत बिगाड करणें हा निश्चय जाला आहे. खान मध्यें परिमार्जन करितात यास्तव यांस हरएक मसलहत कळों न देतां कलह आरंभावा. निमित्य कीं पेशवे नित्य दबावितात. आज समय आहे. या समयीं अनमान केलियास पुढें पेशवे यांच्या फौजा जमा जालियावर आह्मास सोडितात हें होत नाहीं. यास्तव कलह करावा. मग होणें तें होऊंदे. हा निश्चय झाला आहे. शाहनवाजखान व राजाजींचें एक मत आहे. शहानवाजखानाकडील एका मातबर गृहस्थानें सांगितलें ह्मणोन बोलत होते. ते सेवेसी विनंति ल्याहावी लागली. सेवेसी श्रुत जालें पाहिजे. स्वामी धणी समर्थ आहेत. हे विज्ञापना.

---

५३ केदारजी इत्यादिकांनीं. § बाजरी, जोंधळे.

५४ राजाजीस सल्ला मुसाबुसीकडून मिळे. अर्थात् राजाजींचे बेत ह्मणजे मुसाबुसीचेच बेत होत. बुसीच्याच सल्यावरून मराठ्यांच्या हद्दींत लढाई नेण्याचा घाट निजामानें घातला.

[ १२ ] ॥ श्री ॥ १४ अक्टोबर १७५१.

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी:—

कृतानेक विज्ञापना. खजाना येथें दोन लक्ष अठावन हजार रुपये पोता-पैकीं देववून मग नवाब रोजेयांस गेले. त्यापैकीं दहा हजार रुपये मात्र राजश्री बाळाजी महादेव यांहीं मोजून घेतले. अरकाटी, गंजीकोटी रुपये देतात. तदनंतर खजानेयाचा दरोगा रोजेयांस गेला होता तो अद्याप आ-लाच नाहीं. खजाना द्यावयाची घालमेल दिसते. परंतु देतील. ब-हाणपुरी पा।वणेतीनलाख रुपये देवविले ते हरबाजीराम वकील याचे मारीफत बाळाजी-पंताचे कारकून व खजानची याचे पदरीं पडिले. तेथून हरबाजीरामानें अहमद मीरखानाचें दस्तक घेऊन बदरका मागोन खजाना रवाना करावा ते त्यां-च्यानें न जालें. नवाबाचे दस्तक पाठवाल ह्मणोन त्यांणीं बाळाजीपंतास लिहिलें. येथें खानास वर्तमान विदित करितांच खानांनीं राजाजीस सांगोन दस्तक व अहमद मीरखानास बदरकेयाबाबे पत्र ऐसीं राजाजाचीं घेतलीं. राजाजीनें आपले मोहरेनसीं दस्तक व अहमद मीरखास पत्र दिलें. हीं पत्रें नबाब रोजेयांस गेले होते तेथें राजाजी व खान गेले होते तेथें घेतलीं. छ ४ तेरीखेस बाळाजीपंतीं आपलें पंचवींसेक राऊत व पन्नास प्यादे देऊन दोन कागद ब-हाणपुरास पाठविले आहेत. या उपरी खजाना येईल. राजश्री मानाजी निकम यास बदरकेयास स्वार पाठवावयाकारितां बाळाजीपंतीं लिहिलें होतें व सेवकाजवळोन लेहविलें होतें. त्याचा जाब काल आला, मशारनिल्हेचे कारकुनाचा. त्यांत लिहिलें आहे कीं आह्माजवळ राऊत ना-हींत. याच प्रकारचें वर्तमान आहे. मशारनिलेचे राऊत व प्यादे गेले आहेत. स्वामीचा पुण्यप्रताप समर्थ आहे. खजीना येईल व कितेक जिन्नस सुटींत गेला त्याची यादबस्त खानाचे मारिफत राजाजीजवळ गेली आहे.

५५ पुढें खजीना न येऊन लवकरच लढाई सुरू झाली.

त्याचा जाबसाल करून देतों ह्मणोन राजाजी बोलत आहेत. सेवक खानाजवळ या गोष्टीकरितां नित्य बाजीद आहेच. आजहि बाळाजीपंताचे कारकून खजानेयांत पैका द्यावयास गेले आहेत. दहा वीस हजार आज पदरीं पडितील ह्मणोन बोलत होते. खजानेयांत ऐवज नाहीं. मेळवामेळव करितात. हैदराबादेचे खजानेयाची वाट पाहत आहेत. हा ऐवज आठा चहूं रोजांत देतील ह्मणून बाळाजीपंत बोलत होते. हे विज्ञापना.

---

[ ११ ] ॥ श्री ॥ १३ नोवेंबर १७५१.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामींचे सेवेसीः—

विनंति सेवक रघुनाथ गणेश कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान तागायत छ ५ मोहरम पावेतों मे॥ लष्कर नवाब सलाबतजंग यथास्थित असे. छ मा॥रीं मौजे कुंपटीहून लष्कराचा कुच जाला सानवाकोशाचा. मौजे केदल व पावल मुलखडीचे तीरीं मुक्काम जाला. दरकुच अहंमदनगरास जातात. तेथें जनाना ठेवून व बहुतेक बाहेर ठेवून जरीदा होहून पुण्यास येणार. खानअजम सैदलस्करखान यांचे डेरे दोन होते. पैकीं आजच येक माघारा पाठविला. कायगांवीं अगर पुढें दरयेक गांवीं ठेवावयास सांगितला आहे. राजाजीनें खानास येक लक्ष रुपये पेशगी आज प्रातःकाळीं पाठविली. आज्ञा केली कीं स्वारास एकेक महिना पेशगी बिलाकसूर देणें. दोन महिनेयांची तलब राहिली तो ऐवज खजानेयावर

---

५६ हें पत्र लिहिल्यापासून नवव्यादिवशीं २२ नोव्हेंबरास पेशव्यांची व निजामाची कुकडीनदीवर ग्रहणाच्या दिवशीं गांठ पडली. पेशवे कळस, खेड व वडगांव या गांवांवरून कुकडीवर गेले व निजाम कुपटी, केदल, पावळ, व नगरावरून कुकडीवर आले.

देवविला आहे. याजप्रमाणें लष्करांत वांटणी केली व करीत आहेत. हणवंतराव निंबाळकर काल छ ४ रोजीं लष्करदाखल जाले. दोन हजार राऊत बराबर आले आहेत. काल संध्याकाळापूर्वी महमदअनवरखान नवाबानें पुढें पाठविलेयावर रावमशारनिल्हे नवाबाचे मुलाजमतीस आले. सेवेसी विदित जालें पाहिजे. सुभानजी थोरातहि दोन कोस स्वारांनसी कालच आले. पांढरेहि आले. सासात कोस स्वार आहेत. आघाडीस राहिले आहेत. हणवंतराव निंबाळकर यांची फौज खुदावंदखान खजाना घेऊन आले त्याजबराबर आली. हालीं खासा दोन हजार फौजेनसी आले. येकूण चार हजार फौज आहे. नवाबाची फौज जमावत चालली. आजता। वीसेक हजार फौज जमा जाली आहे. आणीकहि जमा होतच आहे. आणीक वर्तमान आढळलें कीं राजाजीनें महाराव यांस पत्र पाठविलें कीं तुह्मी फौजसुद्धां येणें; सटवाजी जाधवराव यांस निरोप देणें व स्वामीसहि पत्र पाठविलें कीं तयार व्हावें; व खानास हरकारेयानें खबर दिली कीं महाराव जाधवराव यांस घेऊन लष्करांत येत आहेत. ही गोष्ट खानच बोलत होते. स्वामीजवळ फौज जमा जाली नाहीं. चार पांचेक हजार स्वार आहेत. स्वामींचा मुकाम पुण्यासमीप कळसावर आहे ह्मणान येथें बातमी आहे. खानहि याचप्रमाणें बोलत होते. सेवकानें जाधवराव यांजकडे पत्र लेहून जासूदजोडी काल पाठविली ते अद्यापवर आली नाहीं. आज संध्याकाळपावेतों आली तर येईल. विनंतिपत्र लिहीत असतांच जाधवराव यांकडे जोडी पाठविली होती ते आतांच आली. जाधवराव यांनीं सेवकास पत्र पाठविलें. तेथें लिहिलें आहे कीं तुह्मी वर्तमान लिहिलें तें कळलें; स्नेहाचे विचारें त्यांनीं आह्मास बोलाविलें त्यावरून आलों; आह्मी जवळच आहों; भेटीचे विचारें कडून जाल्यास होईल; न होय तर उत्तम; येथील बातमी मात्र वरचेवरी अंतस्थाची खबर आह्मांस व श्रीमंताकडे रोजच्या रोज लेहून पाठवीत जाणें, ह्मणोन छ ४ मोहरमचें पत्र आलें. जाधवराव व महाराव एकत्र आहेत. सिंगवेंपिंपळगावास उभयता होते. तेथून कालच कुच करून सातआठ कोस

वरते निंबदन्हारेयाचे रुखें मौजे राजेवाडीवर मुकामास आले ह्मणोन जासूद सांगत होते. विनंतिपत्र लिहीत असतां दर्याजी जासूद खानाचे जासुदाकडे पाठविला होता. त्यानें येऊन वर्तमान सांगितलें कीं खानाचे बातमीचे जासूद स्वामीचे लष्करांतून आतांच आले ते सांगत होते कीं स्वामीचा मुकाम खेडानजीक वडगांवावर आहे. बराबर फौज वीसेक हजार आहे. हें वर्तमान आतांच कळलें तें सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. नवाबानें खानास आघाडी सांगितली. परंतु अद्याप आघाडीस गेले नाहींत. पिछाडीसच राहत असतात. खान आज जरीदा जाले. बहुतेक वस्तभाव माघारी लाविली. तुरकाबादेस ठेवावयास सांगितली आहे. नवाबाबरावर फौज पंचवीस हजार पावेतों जमा जाली आहे. आढळलें वर्तमान सेवेसी विनंति लिहिली आहे. सेवेसी श्रुत जालें पाहिजे हे विज्ञापना. या मुकामाहून वामोरी खालती तीन कोश आहे. विदित जालें पाहिजे. राजश्री शामजी गोविंद शहरांतून काल लष्करांत आले हे विज्ञापना. राजेश्री मनोहरपंतीं आज प्रातःकाळीं विनंतिपत्र लेहून दिलें. सेवक मजलीस आलियावर विनंतिपत्र लिहिलें आहे. सेवेसी श्रुत जालें पाहिजे हे विज्ञापनां.

---

[ १४ ] || श्री || १३ सप्टंबर १७५३.

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीः—

कृतानेक विज्ञापना. छ ११ माहे जिलकाद सोमवारीं नासरजंगपेठेहून निघोन शहर दाखल व्हावयास आलों. गोलकुंडा किला पाठीमागें टाकून

---

५७ मुकामास ५८ १७५१ तील ह्या लढाई संबंधीं आमचे जवळील पत्रें येथें संपलीं.
५९ हें पत्र १७५३ च्या सप्टंबरांत लिहिलेलें आहे. कारण ह्याच्याच जोडीच्या लेखांत

कारवानासमीप येतां तेथें चौकीवर नवाबगजफरजंग मुसाबुसी यांचा हरकारा सेवकाचा मार्ग लक्षीत बैसला होता. त्याची भेट होतांच बोलिला कीं तुमचेच खबरकरितां मजला येथें बैसविलें आहे, नवाब तुमची वाट पहात आहेत, एसें बोलोन जलदीनें खबर पोंचवावयास गेला. सेवक कारवानांचे सिरें यास येऊन मुचकुंदा नदीचे पुलासमीप गोसावी यांचा मठ होता. रम्य स्थल पाहोन स्नानसंध्येस उतरलों. दोघे लढाईत व दोघे जासूद नवाबाकडे पाठविले. मागितलें कीं आमची सलाम सांगावी आणि आह्मास रहावयास जागा शहरामध्यें मागोन जागा करार करतील तो पाहोन येणें. येथोन निघोन शहरांत जाऊन लढाइत जासूद नवाबाकडे गेले. नवाब चारमहाली-मध्यें राहिले आहेत. खबर पोंचतांच बहुत संतोष मानून तोफा मारविल्या. लढाइत जासुदास पांच रुपये इनाम दिधला. सेवकास रहावयास जागा तयार करविला. राजश्री दीनानाथ गोविंद यास बोलावून आणून सेवकाकडे

---

सोळा ह्या पत्रांत रघुनाथराव थाळनेरास असल्याचें लिहिलें आहे. १७५३ च्या एप्रिलांत अमदाबाद सर करून हिंदुस्थानांत जाण्यास रघुनाथराव थालनेरास आले होते. तेव्हां १७५३ हा सन ह्या पत्राचा खास होय. ह्या पत्रांत ११ जिलकादीं सोमवार, १२ जिलकादीं मगळवार, १३ जिलकादीं बुधवार, १४ जिलकादीं गुरुवार दिला आहे. व हे वार व तारीखा बरोबर आहेत. मोडकांच्या जंत्रींत ११ जिलकादीं रविवार दिला आहे. त्याचा अर्थ खालीं दिल्याप्रमाणें समजावयाचा. मुसलमानी दिवस अस्तमानीं सुरू होतो ह्मणजे हिंदूच्या रविवारीं अस्तमानीं ११ तारीख सुरू होते व हिंदूंच्या सोमवारीं दुपारीं ११ तारीख असून सूर्यास्ताला संपते. ह्मणजे मोडकांची जंत्री वाचतांना मुसलमानी पत्रांतील तारखा व दिवस बरोबर आहेत किंवा नाहींत ह्याचा पडताळा पाहावयाचा असल्यास, दिवसा घडलेल्या गोष्टींचा संबंध येईल तेव्हां मोडकांच्या जंत्रींतील तारखेच्या पुढील वारचा दिवस तारखेचा घ्यावा व रात्रीं घडलेल्या गोष्टीचा संबंध असेल तेव्हां तारखेच्या समोरील वाराची रात्र घ्यावी.

६० नवाब गजफरजंग हा किताब मुसाबुसीला औरंगाबादेच्या दरबारांत मिळाला होता. सध्याच्या इजिप्तांत कांहीं इंग्रजांना पाशा, सरदार वगैरे किताब मिळविण्याची हौस वाटत असलेली आपण पहातों त्याप्रमाणेंच गेल्या शतकांत फ्रेंच लोकांना निजामच्या दरबारांत मुसलमानी पदव्या मिळविण्याची मोठी फुशारकी वाटे. इजिप्तांत मुसुलमानी पदव्या प्रथम नेपोलियनच्या वेळीं फ्रेंच लोकांनीं घेतल्या. त्यांचेंच अनुकरण इंग्रजांनीं प्रस्तुत काळीं केलें आहे.

पाठविलें. मागितलें कीं वकील कोठें उतरले आहेत तो जागा पाहोन आजचा रोज त्यांस तेथेंच असों देणें. आजचे रोजांत जागा तयार होईल. उदैक रुमीखानास पाठवून त्यांस भेटीस आणवूं ह्मणोन सांगोन पाठविलें. मा॥निले आह्मास भेटले. बोलिले कीं तुमचे येण्याची प्रतीक्षा बहुत करीत होते. तुह्मी आले ऐकोन बहुत संतोष पावले. यांचा मनोभाव श्रीमंत स्वामींच्या ठायीं दृढतर आहे. आज तुह्मी येथेंच राहुटी देऊन राहावें. उदैक रुमीखानास घेऊन येतों. समारंभें भेटीस †नेऊन ऐसें बोलोन गेले. छ १२ रोजीं भोमवारीं प्रात:काळीं राहुटीमध्यें सेवकानें बिछाना टाकून सिद्धता केली. विडे, पान वगैरे साहित्य आणिलें. प्रांत:काळचा घटिका सासात दिवस आला तों दिनानाथपंत रुमीखानाकडे आले. रुमीखानाची स्वारी तयार जालियावर पंत मा॥निले सेवकाजवळ आले. बोलिले कीं रुमीखान भेटीस येतात त्यांस वस्त्रें दिलीं पाहिजेत. बोलिलों कीं खान मा॥निलेच्या वस्त्रांविषयीं हुजूर विनंति केली होती, परंतु सिरिस्ता नाहीं ह्मणोन दिलीं नाहींत. प्रस्तुत प्रसंग संपादिला पाहिजे. तर नवाबास दहा वस्त्रें दिधलीं आहेत. त्यांजमध्यें लाल दुपटा सवाएकसष्टांचे आंखचा आहे तो द्यावा. ऐसा करार करोन दुपटा काढून ठेविला. इतकेयांत रुमीखानाची स्वारी आली. पालखींत बसोन आले. बराबर दोन तीन कसेबरखंदाज, गाडदी व निशाण व वाद्यें ऐसे समारंभानें आले. भेट जाली. बहुत संतोष पावले. समाधानाच्या गोष्टी केल्या. स्वामीच्या प्रतापाचें स्तोत्र बहुत केलें. रामदासपंताचें[६१] दुराचरण आठविलें. नवाबगजफरजंग यांचा स्वामीच्या ठायीं निखालस स्नेह तेंहि वृत्त सांगितलें. तदनंतरें त्यांस दुपटा पांघरविला. विडे, पान देऊन त्यांजबराबर सेवक व दिनानाथपंत ऐसे निघाले. खान मा॥निलेनें अवघे आपले लोक उभयतां सेवकांचे घोडेयांपुढें लावून आपली पालखी घोडेयांमागें चालविली. याप्रमाणें समारंभानें भेटीस आणिलें. नवाबानेंहि चारमहालीमध्यें समारभ केला. तमाम गाडदी फरंगी कमरबस्ता करून दुतर्फा उभे केले होते. चारमहालीचे तला-

६१ रामदासपंत १७५२ च्या एप्रिलांत मारला गेला. † नेऊं.

वाचे पाळीवर एकीकडे वीस तोफा गाडियावर मांडिल्या आहेत;[62] दुसरेकडे वीस गाडे दारूचे संदुखाचे आहेत; गरनाळाचे कितेक गोळे पडले आहेत; उभयतां सेवक व खान मा॥रनिले चारमहालीस आलियावर खान मा॥निले येहीं उभयतां सेवकांस पुढें करून आपण पाठीमागें राहोन पाश्चांत[63] चक्राम-धोन माडीवर दर्शनास नेले. सेवकाबराबरील लोक अववेच समागमें घेतले. कोणास मना केलें नाहीं. माडीवर गेलों. वरती फिरंगीयांची मजालीस केली होती. खुरशा मखमालजरबाबी मढोन मांडिल्या होत्या. उभयतां सेवकांक-रितां दोन खुरसिया नवाबाचे खुरसीनजीक ठेविल्या होत्या. ¶नवाब अंदर होते. सेवक खुरसीयांवर बैसलों. क्षणैकानें नवाब आले. सेवकास भेटले. सन्मान करून बैसविलें. सेवकानें एक मोहोर व पांच रुपये नजर दाखविली. ते कबूल केली. तदनंतरें उभयतां स्वामीची दुवा सांगोन पत्राची थैली होती ते रुजू केली. ते स्वहस्तें घेतली. त्याउपर सरकारांतून वस्त्रें दिल्हीं. तीं सनगें दहा. त्याजपैकीं दुपटा रुमीखानास दिला. बाकी नव सनगें होतीं. ते खानामध्यें घालून रुजू केलीं. बहुत संतोष मानून मान्य केलीं. स्वमुखें स्वामीचा कुशलार्थ पुशिला. घटिका एक बैसले होते. तदनंतर उठोन खल-वतांत सेवक उभयतांस घेऊन गेले. बोलिले कीं रावसाहेबांजवळ आमचा दुसरा विचार नाहीं. आह्मी एकवचनी आहों. जो स्नेह संपादिला त्यांत दुसरा विचार नाहीं. प्रस्तुत मजकूर बोलावें तर तुह्मी श्रमानें आले आहां वास्तव तुह्मीं आश्रमास जावें. उदैक परस्परें बोलणें तें बोलोन सैद लश्करखान व रावअजम यांचा सांप्रत स्नेह कसा आहे तो सांगावा. सेवक बोलिला कीं स्नेह राहणें तो खरेपणावर राहतो. दगाबाजीचे कर्तृत्वास स्नेह कळतच आहे. प्रस्तुत त्यांचे स्नेहाचा विचार असाच कांहीं आहे. सविस्तर विदित केला जाईल. या गोष्टीवरून संतोष पावोन सेवकास रुखसत केलें. ते समयीं बोलिले कीं हिंदुस्थानचे राजेयांचीं आह्मांस[64] पत्रें आलीं आहेत. ऐसें बोलोन

६२ तत्कालीन वस्तुस्थितिदर्शक वर्तमानकाल. ¶ बुसी

६३ पाश्चात्यांच्या चालीप्रमाणें रचलेल्या सैन्याच्या चक्रव्यूहांतून.

६४ यावरून मुसाबुसीचा पत्रव्यवहार हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांशीं होता असें

खुरसीवर सातआठेक पत्रांच्या थैल्या होत्या त्या हातीं घेऊन दाखविल्या. बोलिले कीं आह्मांस रावसाहेबांजवळ प्रपंच नाहीं. इतकें बोलिले. मग विडे दिधले. अत्तर लाविला; गुलाबदानी स्वहस्तें घेऊन गुलाब सेवकाच्या आंगावर घातला. ते समयीं सेवकास चार वस्त्रें—येक दुलोसी चिराव, गोशपेश व पटका सफेद दुलोसी किनारेयाचा व महमुदी जरीबुटेयाचा—ऐशीं दिलीं. नवाबानें आपले खजमतगाराजवळ देऊन सेवकाचे बिराडीं पोंचवावयास सांगोन रुखसत केले. उभयतां सेवक निघोन शहरामध्यें बागांत बंगला आहे तें स्थळ सेवकास नेमिलें. तेथें येऊन राहिलों. दिनानाथपंत आपले बिराडास गेले. तदनंतरें घटकादोहोंनीं खासा रुमीखान पालखींत बसोन सेवकाजवळ आले. पांचशें रुपये नवाबानें जियाफत मेजवानी पाठविली ते सेवकास दिधली. विडे घेऊन गेले. छ १३ जिलकाद बुधवार पौर्णिमा भेटीस जावें तों नवाबानें सांगोन पाठविलें कीं आज दिवस फटकाळ आहे. उदैक भेट होईल. याजकरितां भेटीस न गेलों. छ १४ जिलकादीं गुरुवारीं दोनप्रहरां सेवकास चोपदार पाठवून बोलावून नेलें. दिनानाथपंतहि होते. भेटीनंतरें जाबसाल जाले ते अलाहिदा पुरवणीचे विनंतिपत्रीं लिहिले आहेत त्याजवरून सेवेसी विदित होतील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञा-

---

दिसतें. १७५२ सालापासून बुसीचें वजन निजामाच्या दरबारीं पराकाष्ठेचें वाढलें होतें. फार काय, तोच तेथील मुख्य सूत्रधार होता. बुसी जर पंधरा वीस वर्षें निजामाच्या दरबारीं रहातां व लालीनें बेवकूबपणानें त्याला परत बोलाविलें नसतें व पारिस येथील त्यावेळच्या मुत्सद्यांनीं लालीच्या कृत्याला अनुमोदन दिलें नसतें, तर फ्रेंच लोकांच्या राज्याची हिंदुस्थानांत सध्यां आहे ह्याहून शतपट जास्त मर्यादा असती. बुसीनें नानासाहेब पेशव्यांकडेहि संधान बांधिलें होतें. परंतु नानासाहेबांच्या अलौकिक मुत्सद्दिगिरीपुढें बुसीला नमूनच वागावें लागें. गाजुद्दिखान मेल्यावर व भालकीची लढाई झाल्यावर सलाबतजंगाला पेशव्यांशीं तह करावा लागला. त्यांत मुसाबुसीनें पेशव्यांस निजामाचें नुकसान करून नानासाहेबांचें प्रेम संपादण्याकरितां एक सबंद सुभाच्या सुभा देवविला. इतकें झाल्यावर बुसीशीं वरकरणी प्रेम दाखविण्यास पेशव्यांनीं यत्किंचित्हि कमी केलें नाहीं. शेवटीं बुसीची अंतस्थ भूतृष्णा केवढी आहे हें नानासाहेबांनीं ओळखून, त्याला निजामाच्या दरबारांतून वर्षादीड वर्षांत पिटाळून लाविलें.

पना. छ १३ जिलकादीं रुमीखान नवाबाजवळोन आपले घरास आले. त्यांस शरीरीं विकृती जाली. यास्तव छ १४ जिलकादीं खलवतांत बोलीचे प्रसंगीं खान मा॥रनिले दरबारास आले नव्हते. नवाबाचे मुनशी अबदुल रहिमानखान मात्र होते. छ १४ जिलकादीं अगोदर दीनानाथपंत नवाबाजवळ गेले होते. सेवकांस पाचारणें आलियावर गेलों. सेवसी वि॥ व्हावयाकरितां वि॥ लि॥ आहे. हे विज्ञापना.

---

[ १५ ] ॥ श्री ॥ १५ सप्टंबर १७५३.

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी:—

कृतानेक विज्ञापना. छ १६ जिलकादीं दोन प्रहरां राजश्री दीनानाथ गोविंद व सेवक ऐसे नवाब गजफरजंग यांचे मुलाजमतीस गेलों. छ १४ जिलकादीं बोली जाली ते मजकूर अलाहिदा विनंतिपत्राचे पुरवणींत लिहिले आहेत. तें पत्र त्यांस अक्षरशा सार्थ वाचून दाखवूनं समजाविलें. अबदुल रहिमानखान मुनसी समीप होते. पत्र आइकोन बहुत संतोष पावले. बोलिले कीं ज्याप्रमाणें तुह्मी आह्माजवळ बोलिलेस व त्याचे जबाबांत आह्मी तुह्माजवळ बोलिलों तेच मजकूर येक जरा तफावत न करितां कलमबंद केलें; सदर्हूप्रमाणें आमचा करार आहे ह्मणोन रावसाहेबांस लिहिणें. आणीक बोलिले कीं कर्नाटक नवाब सलाबतजंगांहीं आमचे खावंदास दिधलें; आह्मीं आइकतों कीं रावसाहेब महमद अलीखांनाची कुमक करणार; कर्नाटकांत

---

६'१ १७५३ च्या प्रारंभास सलाबतजंगानें डुप्लेला कर्नाटकचा नवाब नेमिलें व महमद अल्लीला काढून टाकिलें. महमदअल्लीच्या बाजूला इंग्रज होते. महमदअल्लीच्या विरुद्धपक्षाला निजामाची मदत होती तेव्हां अर्थात् महमदअल्लीची बाजू नानासाहेबांनीं घेतली. ह्या पत्रांत बुर्गा जिचा उल्लेख करतो ती होळहोन्नूरची स्वारी होय.

फौज पाठवणार; याजकरितां रावसाहेबांस ल्याहावें कीं महमदअल्लीखान तगीर. सनद आमचे खावंदास जाली. मुलुक आमचे हाताखालें आला. महमदअल्लीखानाकडे त्रिचनापल्ली व अर्काट मात्र आहे. त्याजवळ फौज नाहीं. सर्वा गोष्टीनीं अर्जीज आहे. रावसाहेबांची आमची दोस्ती. रावसाहेबीं येक गुमास्ता आमचे खावंदाजवळ पाठवावा. चौथ सरदेशमुखींचा पैका होईल तो आह्मी देऊं. याजमुळें मुलुक आबाद राहील. दुतर्फा किफायत आहे. महमदअलीखानास आमचा वसवाद असिला तर आपण त्यास कौल देऊन[६६] बोलवावें. आह्मी नवाब सलाबतजंगाजवळोन त्यास दुसरा मुलुक देववूं; हा आमचा करार आहे; ह्मणून बोलिले. त्याप्रमाणें सेवेसी विनंति लिहिली आहे. काय आज्ञा ते करावयास स्वामी समर्थ आहेत; येविसीं त्यांहींहि सेवेसी विनंति लिहिली आहे. दुसरें बोलिले कीं गोवेरनदोर[६७] यांहीं आह्मास लिहून पाठविलें आहे. साता रोजांनीं खत आलें. लिहिलें आहे कीं मुरारराव[६८] घोरपडे यांहीं तीरचनापलीस आमचे फौजेबराबर राहोन बहुत ज्यांफीशानी केली. सुभानराव मुरारराव यांचा भाऊ कामास आला. याजकरितां तुह्मी रावसाहेबांस लेहून पाठवावें कीं मुरारराव आपले जाणोन यांजवर मेहेरबानी करावी, ह्मणोन लिहिलें आहे; तर तुह्मी हे गोष्ट रावसाहेबांस लेहून मुरारराव याजवर नेकनजर धरीत तें करावें व आमचें गोवरनदोरास रावसाहेबांचें खत आणवावें कीं तुमचे लिहिलेप्रमाणें मुसाबुसी यांहीं मुरारराव यांविषयीं आह्मांस सांगितलें. आह्मी त्याजवर खुष आहों. येखलासांत तफावत होणार नाहीं. ऐसें पत्र आलियानें आमचे खावंद

---

६६ महमदअल्ली ह्या वेळीं इंग्रजांच्या हातांत होता. त्याच्या स्वाधीन अर्काट व त्रिचनापल्ली हे दोन किल्ले मात्र होते. तेथें इंग्रजांचा वर्चष्मा होता तो अजीबात नाहींसा व्हावा ह्या हेतूनें पेशव्यांकडून महमदअल्लीस कौल देऊन आणवावें ह्मणजे इंग्रजांना ह्या दोन किल्यांत रहाण्याचें कांहीं एक कारण रहाणार नाहीं अशी योजना बुसीनें घाटली होती.

६७ डुप्ले.

६८ १३ जून १७५२ त क्लाइवनें त्रिचनापल्लीचा किल्ला घेतला. तोंपर्यंत मुरारराव घोरपडे महमदअल्ली व इंग्रज ह्यांच्या बाजूला होता. पुढें तो डुप्लेच्या विनवणीवरून फ्रेंचांना मिळाला.

आह्मावर संतोषी होतील ह्मणून बोलिले. त्याजवरून विनंति लिहिली आहे. कृपा करावयास स्वामी समर्थ आहेत. दुसरें बोलिले कीं नसीरजंगामध्यें व आह्मामध्यें पहिली नाखुषी बहुत होती. हल्लीं त्यांहीं महमद हुसेनखान दिवाण याजबराबर कसम खाऊन सांगून पाठविलें कीं तुह्माजवळ आमचा दुसरा विचार नाहीं. तुह्मी आह्मी एक आहों. हा आपला करार आहे ह्मणोन ऐशास त्यांहीं कसम खाऊन सांगोन पाठविलें. त्याप्रमाणें आह्मीं त्यास वचन दिधलें कीं तुह्मी निखालस असलियास आमचाहि तुम्हाजवळ दुसरा विचार नाहीं. हे गोष्ट रावसाहेबांस आह्मी लिहितों. तुह्मी लेहून नसीरजंगाशीं रावसाहेब बेवसवास राहात ते गोष्ट करावी. आधीं तर नसीरजंग निखालस आहेत. ||मबादा त्याजवळोन कांहीं तफावत नजरेस आला तर आह्मास सांगावें. आह्मी त्यास राहावर आणूं, निदान तंबी करूं, ह्मणोन बोलिले. त्याप्रमाणें सेवेसी विनंति लिहिली आहे. दुसरें बोलिले कीं गुदस्ता आमचे मारिफतीनें तह जाला त्याप्रमाणें करार असावा. तुमचे दोस्त ते आमचे दोस्त. आमचे दोस्त ते तुमचे दोस्त. आमचे दुशमन ते तुमचे दुशमन. तुमचे दुशमन ते आमचे दुशमन. याप्रमाणें खातरेस आणोन अमलांत आणावें ह्मणून बोलिले. तेणेंप्रमाणें सेवेसी विनंति लिहिली आहे. सदहू विनंतिपत्र नवाब गजफरजंग यांहीं अक्षरशा आइकिलें. सेवेसी श्रुत जालें पाहिजे हे विज्ञापना. आणीक बोलिले कीं नवाब सलाबत येहीं आह्मांस लिहिलें आहे जे रावअजम फौज जमा करितात. गुदस्ताहून ज्याजती फौज धरिता याचा सबब काय ? ह्मणोन येविषईं रावसाहेबांची मर्जी काय आहे ह्मणोन पुसिलें. सेवक बोलिलों कीं फौज सालाबाजप्रमाणेंच आहे. रावसाहेबांस काजकामें बहुत आहेत. येक तर मोगलाचा दगाबाजीचा रूख नजरेनें पाहिला तर याजकरितांहि खबरदार राहावें लागलें. दुसरें गुजराथेंत व दिल्लीस फौज रवाना करणें. ऐसीं कितक कामें आहेत परंतु फौज अद्याप जमा जाली नाहीं, व रावसाहेबाहि डेरे दाखल जाले नव्हत. फौजेस ताकीद जाली आहे. फौज जमा केलीच पाहिजे. फौजेखेरीज काजकामें कसीं होतील ? ह्मणोन बोलिलों. आणीक मुसाबुसी बोलिले

|| तशांत.

कीं नसीरजंगांनीं आह्मांस लिहिलें आहे कीं सालमजकुरीं आह्मास पेशकसीच्या ऐवजाकरितां श्रीरंगपट्टणास जावें लागतें. सरकारांत खजाना नाहीं. सीबंदीस ऐवज पाहिजे. याजकरितां श्रीरंगपट्टणास जाऊन ऐवज आणून सरंजाम करावा लागतो ह्मणोन लिहिलें आहे. हें वर्तमान तुह्मी रावसाहेबांस लेहून पाठविणें. त्याजवरून सेवेसी विनंति लिहिली आहे. सेवक बोलिला कीं रावसाहेबांचा ऐवजहि पट्टणवाले याकडून येणें आहे. सालगु॥ पेशजीची बाकी होती त्यापैकीं कांहीं ऐवज आणिला. सेवेसी विदित जालें पाहिजे हे विज्ञापना.

---

[ १६ ] ॥ श्री ॥ १७ सप्टेंबर १७५३.

पु॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीः—

कृतानेक विज्ञापना. छ १८ जिलकादीं दोन प्रहरां नवाब गजफरजंग मुसाबुसी यांचे भेटीस गेलों ते समयीं सरकारचे पत्राचे जाब तयार करून थैली करून सेवकाजवळ स्वानगीस दिली. ते समई बोलिले कीं आह्मास रुकुनुदौलों नासिरजंग यांहीं पत्र पाठविलें तें तुह्मी आइकिलें आहे; त्याची नक्कल रावसाहेबांस पहावयास पाठवितों. सेवक बोलिला कीं उत्तम आहे. मग तेच समई अबदुल रहिमानखान येहीं त्या पत्राची नक्कल करून सरकारचे थैलींत घालून सेवकाजवळ दिली व बोलिले कीं तुह्मी रावसाहेबांजवळोन आलेस, हें वर्तमान नवाब सलाबतजंग व रुकुनुदौला नसिरजंग यांस कळलें असेल व लोकांचे लिहिलेयावरून कळेल, परंतु आह्मास लिहिलें

६९ ह्यांनाच धाकटे नासीरजंग म्हणण्याची चाल असे. थोरले नासीरजंग १७५० च्या डिसेंबरांत मारले गेले.

पाहिजे; काय ल्याहावें ? सेवक बोलिला कीं आह्मास पुसता तर इतकें ल्यांहावें कीं आह्मी दूरदस्त होतों; मागें कितेक वसवासाच्या गोष्टी जाल्या; याजकरितां आह्मी रावसाहेबांस लेहून वकील आणविला. वकील आलियावर रावसाहेबांचे तर्फेनें कितेक वसवास होता तो दूर झाला याजवरून संतोषी जाले. बोलिले कीं याप्रमाणें लिहितों, व बोलिले कीं औरंगाबाजेहून सफीउल्लाखान व परशरामपंत ऐसे थालनेरास रावअजम रघुनाथराव यांजकडे जाबसालास गेले आहेत. तुह्मी रावसाहेबांस लिहून पाठवावें कीं साहेबीं रावअजम रघुनाथराव यांस लिहून पाठवावें कीं मोगलाकडून जाबसालास वकील आले आहेत, त्याजजवळ जाबसाल न करावा. नवाब गजफरजंग मुसाबुसी यांचे मारीफत जाबसाल करावा लागतो. तह त्यांचे मारीफत जाला ह्मणून लिहून पाठवून जाबसाल मौकूफ करवावा. आह्मीहि नवाब सलाबतजंग व रुकुनुदौला यांस लिहितों कीं आह्मी रावसाहेबांस लिहून रघुनाथराव यांस लेहविलें कीं जाबसाल करणें तो गजफरजंग यांचे मारिफत करावा लागतो. त्याचे मारिफत जाबसाल होईल. शहराहून जाबसालास वकील आले असतील त्यामारिफत त्याजवळ जाबसाल न करावा. त्याप्रमाणें तिकडून आमचे मारीफतीखेरीज जाबसाल होणार नाहीं. तुह्मीहि याप्रमाणेंच अमलांत आणावें. आह्मी औरंगाबाजेस आलियावर जें करणें तें करूं ह्मणोन लिहून पाठवितों. आह्मीं आपले मारीफतीखेरीज कोण्हांचें चालों देत नाहीं. मध्यें कोणी जो दिगर करील त्यास तंबी करूं ह्मणोन बोलिले. त्याजप्रमाणें सेवेसी विनंति लिहिली आहे. मुसाबुसी येथून विजयादशमी जालियाउपर कुच करितील. कुच करून निघालियावर स्वामीचे दर्शनलाभास यावें हा त्यांचा इरादा आहे. सेवेसी श्रुत जालें पाहिजे हे विज्ञापना. मुसाबुसी यांहीं सेवेस

७० रघुनाथराव हिंदुस्थानांत जाण्याकरितां अमदावादेहून १७५३ च्या भाद्रपदांत म्हणजे सप्टेंबरांत थालनेरास आले होते.

७१ ह्यावेळीं बुसीनें सलाबतजंगाला अगदींच संपुष्टांत आणिलें होतें. सर्व तहरह बुसीच्या मार्फत झाले पाहिजेत इतकी व्यवस्था झाल्यावर निजाम फ्रेंच लोकांचा अंकित झाला नाहीं असें कोण न म्हणेल ?

पत्राची थैली दिली ते जासुदाबराबर सेवेसी पाठविली आहे. सेवेसी श्रुत जालें पाहिजे हे विज्ञापना. रुमीखानांहीं सेवकाची व गजफरजंग याची भेट केली आण घरीं आले. आजारी पडिले आहेत. अद्याप बाहेर निघाले नाहींत. जाबसालासमई हाजीर नव्हते. सेवेसी श्रुत जालें पाहिजे हे विज्ञापना. मुजफरखान[७२] गाडदी यांहीं मुसाबुसी यांस पत्र पाठविलें होतें, त्याचें उत्तर मा।रनिले येहीं लेहून सेवकाजवळ रवाना करावयास दिधलें तें रवाना केलें आहे. मुजफरखानास प्रविष्ट होय ते आज्ञा करावयास स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञापना.

———

[ १७ ] पै॥ छ २६ मोहरम. ॥ श्री ॥ १६ नोव्हेंबर १७५३.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी:—

विनंति सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन सा॥नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान ता॥ छ २० माहे मोहरम पावेतों यथास्थित असे. येथील वर्तमान ता॥ छ १३ मोहरम सविस्तर विनंतिपत्रीं लिहून जासूदजोडी सेवेसी पाठविली. त्या विनंतिपत्रावरून सविस्तर वृत्त सेवेसी विदित होईल. मुसाबुसी मजलदरमजल छ १९ मोहरमीं राक्षसभुवनास गौतमीचे उत्तरतीरीं मुकामास आले. छ १८ रोजीं गेवराईचे मुकामीं नवाब सलाबतजंगांहीं सीतुरस्वार पाठविला; मुसाबुसी यांस लिहिलें कीं जलद येऊन पोंहचणें. मुसा मरलो फरासीस दहा स्वारांनसी हैदराबादेहून दोन मजला करून भालकीवर मुसाबुसी याजवळ

[७२] ज्यानें भाऊसाहेबांस पुढें मारण्याचा प्रयत्न केला तो मुजफरखान हाच. कुकडी नदीवर लढाई झाल्यानंतर मुजफरखान पेशव्यांच्या नोकरीस राहिला.

आला. तें वर्तमान पूर्वीं सेवेसी विनंतिपत्रीं लिहिलें आहे. त्याजबराबरील फरंगी मागाहून येत होते. ते फरंगी शंभर, त्याजमध्यें चार सरदार, ऐसे छ १७ रोजीं आले. मुसाबुसी मागें येतां मौजे पिंपळनेर बीबीचें येथील गांवकरी यांनीं मुसाबुसी यांचा बैल संदुकांचा नेला. मागाहून गारदी येत होते त्यांस कळतांच गांवचे पाटलास सदहू बैल सुद्धां घेऊन आले. पाटला-जवळोन दीडशें रुपये गुन्हेगारी घेऊन सोडिला. सेवेसी श्रुत होय. ख्वाजे न्यामदुलाखान यांजकडे हस्तनापुरचें वर्तमान लिहिलें आलें. बोलत होते कीं जयसिंग याचा लेक§ पातशाहास भेटला त्याचे मारीफतीनें जाँटेहि पातशहास मिळाले. फेरोजजंग याचा लेक वजिराजवळ युद्धप्रसंग करीत आहे. अद्याप लढाई काईम आहे. कितेक हत्ती व उंट वजिराचे फेरोजजंगाचे लेकानें आणिले. वजीर सफैजंग लढाई लढत नाहीं याजकरितां फैसला होत नाहीं. प्रस्तुत पातशहाचा जोरा आहे ह्मणोन बोलत होते. सेवेसी विदित व्हावया-करितां विनंति लिहिली आहे. मुसाबुसी कितेक गोष्टी बोलिले ते मजकूर अलाहिदा विनंतिपत्राचे पुरवणींत लिहिले आहेत. त्याजवरून त्यांहीं सेवेसी पत्र दिल्हें. ते थैली सेवेसी पाठविली आहे त्याजवरून विदित होईल. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

७२ सुरजमल जाट हा सफदरजंगाला मिळाला होता. वजीर सफदरजंगाचें व फेरोजजंगाचा लेक जो मीरशाबुद्दिन अथवा धाकटा गाजुद्दिन याचें वाकडें होतें. पातशाहा गाजुद्दिनाच्या तंत्रानें चालत असे. गाजुद्दिनाच्या घरवुडव्या पोरकटपणाला त्रासून सफदरजंग लखनौला निघून गेला. तेव्हां सुरजमलजाट मात्र गाजुद्दिनाच्या तडाक्यांत सांपडला. गाजुद्दिनाचे साहाय्यकारी होळकर व शिंदे होते. त्यांच्या साहाय्यानें पुढें गाजुद्दिनानें पातशाहाहि पदच्युत केलें व दुसरा अलमगीर नांवाचा पातशाहा तख्तावर बसविला.

§ माधोसिंग.

[ १८ ] पै॥ छ २६ मोहरम ॥ श्री ॥ १६ नोव्हेंबर १७५३.

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी:—

कृतानेक विज्ञापना मुसाबुसी सेवकाजवळ बोलिले कीं नवाब सलाबतजंग यांहीं रुकुनुदौला यांचे मसलहर्तानें आमचा गिल्लीं गोरंदोर यास बहुत लिहिला कीं मुसाबुसी यांहीं आमचा मनसबा खराब केला; मुलुक गनीमास दिधला; गनीमाचा घावडाव यांस कळत नाहीं; गनीमास दबाऊन हालखुद राखावें तेव्हां गनीम रास येतील; राव प्रधान यांस येक सुबा दरोबस्तव आणिखी मुलुक दिधला. याजकरितां मुसाबुसी यांस खुबवजा ताकीद करून रवाना करावें ह्मणोन कैवजां लिहिलें. आह्मांवर येतराजी व्हावी आह्मी फिरोन न यावें, ऐसाच सलाबतजंग व रुकुनदौला यांचा मनसबा होता. आतां आमचे गोरंदोर थोर. त्यांस सारा मजकूर उमजला होता. सबब त्यांहीं जबाब लेहून पाठविला कीं मुसाबुसी आहेत ते आमचे बेटे आहेत. त्यांहीं राव प्रधान यांसीं सुलुख केला तो तुमचे रजामंदीनें जाणोनच केला. त्यांहीं जें केलें तें फिरत नाहीं. तुह्मी त्यांचे कराराप्रमाणें राव-

७४ भालकीच्या लढाईपासून मुसाबुसीचें वजन निजामाचें दरबारांत अती वाढलें. सर्व तहरह बुसीनें करावें असें झालें. पेशव्यांशीं तह करण्याचा वेळ आला त्यावेळीं बुसीनें पेशव्यांस निजामच्या राज्यांतील सबंद एक सुभा दिला. त्यामुळें निजाम फारच हलका झाला. निजामाला हल्का करावा हा बुसीचा बेतच होता. तोच बेत नानासाहेब पेशव्यांचाहि होता. ह्या दोघांनीं गुप्त तह करून निजामाला पुष्कळच बुचाडिलें. तेव्हां निजामानें डुप्लेकडे अर्ज केला; परंतु बुसी डुप्लेच्याच मतानें चालत असल्यामुळें, डुप्लेनें बुसीस संभाळून घेतलें व ह्यापुढें अशा तक्रारी आणूं नयेत ह्मणून वरती आणखी धमकी दिली. येणेंप्रमाणें निरुपाय होऊन सलाबतजंगाला बुसीची खुशामत करणें भाग पडलें. ही खुशामत वरकरणी होती हें जाणून बुसी आपले वरिष्ठ दर्जाचे यजमान व स्नेही जे नानासाहेब पेशवे त्यांच्यापाशीं मोगल लोकांच्या लुचेगिरीचें व फ्रेंच लोकांच्या सचोटीचें वर्णन ह्या पत्रांत करीत आहे.

प्रधान यांसीं सुलुख राखाल तर बेहतर बात आहे. कांहीं नौदींगर करून बिघाड करूं म्हणाल तर आह्मी तुमचे रफीक नाहीं, रावप्रधान यांचे रफीक आहों, ह्मणोन लिहिलें व आह्मांसाहि लिहिलें त्याजवरून सलाबतजंग व रुकुनदौला बहुत पस्तावलें कीं आह्मांस सर्व प्रकारें भरंवसा तुमचा असतां तुह्मी ऐशा गोष्टी करिता. अज्याईब आहे! हालीं सलाबतजंग यांहीं रुकुन-दौला यांचे मसलहतींनें आम्हांस कितेक समाधानाच्या गोष्टी लिहिल्या कीं तुमचा गिल्ला लिहिला नाहीं. गनीमाचा घावडाव तुम्हांस कळत नाहीं. तुम्ही येतच आहां. तुमची आमची मुलाजमत लौकरच होईल. जें करणें तें तुमचे मसलहतीनें करूं म्हणोन कैवजा लिहिलें. ऐसें बोलोन तें पत्र सेव-कास वाचूनहि दाखविलें. त्यानंतर बोलिले कीं आह्मी लोक कोण करीने-याचे व मोगललोक व मोगलाईचे मराठे सरदार कोणे करीनेयाचे हे राव-साहेब बेहतर जाणत असतील व रावसाहेब आह्मास कलमीं करीत असतात कीं मोगल लोक मनांत खोटे, बाहेर नीट, याजवरून रावसाहेब खुब जाण-तात. आह्मी लोक एकवचनी, जो करार केला तो केलाच, त्यांत तफावत होऊं देणार नाहीं. आपले सुखुनाबद्दल दौलतेनसी व ज्यानानसीं कोसीस करूं. मोगल लोक काबुची आहेत. रावसाहेबांचे दौलतेची रोजबरोज तरकी होते, हे गोष्ट त्यांस खुष लागत नाहीं. वेळ पाहोन दगा करावयास जपतच आहेत. ईलाज न चाले; तेव्हां खुशामतीसाहि हजीर. ऐसे या लोकांचे करीने आहेत. रामदासपंताचे हंगामेयांत काय काय दगाबाजी केली तें अलमावर रोशन आहे. रावसाहेबाचे ताळे बुलंद ह्मणोनच ते बाजी सर केली. सालगुदस्तां महाराव येहीं मल्हारराव होळकर यांस फोडावयाचा मन-सबा केला. लेकिन शेवटास न गेला. मग पस्तावोन खुशामतीस लागले. पुढेंहि दगाबाजीस चुकणार नाहींत. आह्माजवळहि येखलास करावयास चाहतात. आतां आह्मी कोणास पछाणत नाहीं व आह्मास दगाबाजीचा येखलास करितां येत नाहीं. आह्मी रावप्रधानसाहेबांस मात्र जाणतों. रावसाहेबांचे दौलतेची तरकी पाहोन खुशवक्त होतो. व याहून तरकी व्हावी ऐसें चाहतों. याजकरि-

रितां रावसाहेबीं या लोकांस नजरेंतच धरावें. रावसाहेबांचा व आमचा येखलास एक विचार असतां दुसरेयाची गुंजाईष आहे ऐसें नाहीं. हें गोष्ट तर काय ? कित्येक उमदे उमदे मनसुबे खातीरख्वाह होतील. तूर्त आह्मी शहरास जात आहों. यख्तीयार आमचाच आहे. आह्मी रावसाहेबांजवळ निखालस येखलास राखितों. ह्मणूनच दिलांतील मजकूर खोलून बोलतों. व पेस्तराहि जे काम करणें तें रावसाहेबाचे इतिलासिवाय करणार नाहीं. आह्मी रावसाहेबांजवळ येखलास केला तो थोडके रोज चालावयाचा केला नाहीं. पुस्तदरपुस्त चालावा ह्मणोन केला. आह्मी गेलों, आमचा भाऊ दुसरा आला, तर हाच करार आहे. इतकें बोलोन सेवकास बोलिलें कीं रावसाहेबांचे तर्फेनें आह्माजवळ वकिली तुमची आहे. तुह्माशिवाय दुसरा वकील आह्मी चाहत नाहीं. परशरामपंत वकील रावसाहेबांचे नवाब सलाबतजंगाजवळ आहेत त्यांस आह्मी बहुत चाहते होतों. आतां त्याजवळोन तफावत दिसोन आला. याजबद्दल आमचे दिल त्यास चाहत नाहीं. तफावत कोण तो ह्मणाल तर आह्मी हैदराबादेस आलों, तसेंच औरंगाबादेस येत होतों. आह्मास लेहून पाठविलें कीं तूर्त न यावें, तेथेंच राहावें. येथें आलियानें रुकनदौला यास वसवास येईल ह्मणोन कैवजा लिहिलें. आह्मी सचोटीचा माणूस जाणून राहिलों. पेस्तर रुकुनदौला याचे मारिफत सुलह करून मग आह्मास लिहिलें कीं आतां तर काम जालें; तुह्मी आले असतेत तर खूब होतें. याजवरून दगाबाजी कळली व आणीकहि कित्येक गोष्टी आहेत. याजबद्दल त्यास आमचे दिल चाहत नाहीं. याप्रमाणें तुह्मी रावसाहेबांस लेहून पाठविणें ह्मणोन बोलिले. त्यावरून सेवेसी विनंति लिहिली आहे. सदर्हू विनंतिपत्र अक्षरशा सॉर्थ मुसाबुसी यांहीं आईकिलें. सेवेसी श्रुत जालें पाहिजे. छ १९ रोजीं शहरांतून नथमल दी॥ सैदलस्कर खान व गुलाममहमदखान ऐसे उभयता

---

७४ फ्रेंच किंवा उर्दू भाषेंत तर्जुमा केलेलें. बुसीचा दुभाषा अबदुलरहिमानखान नांवाचा होता. त्याला फ्रेंच भाषा येत असे.

मुसाबुसी याजकडे आले आहेत. गोटाबाहेर राहिले आहेत. अद्याप भेट जाली नाहीं. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[ ११ ] पे॥ छ १० र॥वल. ॥ श्री ॥ ५ जानेवारी १७५४.

श्रीमंत राजश्री
स्वामीचे सेवेसीः— पंतप्रधान

विनंति सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान ता॥ छ ४ माहे रबिलावल पावेतों मे॥ काळाचौतरा समीप शहर औरंगाबाद येथें यथास्थित असे. येथील वर्तमान तागायत छ २३ सफर हुजूर विनंतिपत्रीं लेहून पाठविलें आहे त्यावरून विदित जालें असेल. नवाब सलाबतजंगांहीं त्वरेनें बाहेर निघावें हा मुसाबुसी यांचा विचार. याजकरितां नवाबानें छ २७ सफरीं वेदमूर्ति राजश्री सखंभट जोशी व उमापती जोशी वगैरा जोशी ऐसे पुणतांबेकर चार पांच जोशी मेळऊन मुहूर्त पाहिला. जोशांनीं छ १९ र॥वल व छ २५ र॥वल ऐसे दोन मुहूर्त सांगितले. हे मुहूर्त लांब. यास्तव शहानवाजखान वगैरे मोगलिये यांहीं छ ३० सफर करार केला. छ ३० सफरीं डेरे बाहेर होतात म्हणोन आवई गरम होती. निदान ते दिवशीं बाहेर निघाले नाहीं. मुख्य गोष्ट द्रव्य नाहीं. याजकरितां बाहेर निघणें होत नाहीं. फीलखाना व अस्तबालास व उंटास दाणा नाहीं. फाके गुजरतात. सफसीलानखानास हैदराबादचा मामला सांगितला. सालाख रुपये तूर्त द्यावयास करार केला; पे॥ तीन लाखाच्या कबजा व तीन लाख रुपये रोख. त्याचा सरंजाम अद्याप नाहीं. कालिकादास, नवाबाचा मोधी, त्याचे देणें पांचसालाख रुपये नवाबाकडे आहे. द्यावयास ऐवज नाहीं. यास्तव कालिकादासास सफसीलान-

खानाची पेशकारी सांगितली. इतकेयानेंच तूर्त त्याची समजावीस केली. लष्करास तूर्त दुमाहा तलब देणें. नवाबाचा खास खर्च दरमहा लाख सवालाख. रुपयेयास जागा नाहीं. याजकरितां बाहेर निघत नाहीं. पुढें काय मनसबा करितील तो पाहावा. नवाब सलाबतजंगाच्या चित्तांत बाहेर निघावयाचें नाहीं. मुसाबुसी नवाबास बाहेर काढणार. मीरमहंमदहुसेनखान यांचा पेशकार ब्रीजलाल व त्याचा भाऊ गुलाबराय उभयतांस छ १ र॥वलीं शहानवाजखानांहीं कैद करून मुसाबुसी यांजकडे पाठविलें. पेशकार मजकुरानें हैदराबादेस पैका बहुत मेळविला आहे. याजकरितां त्याजजवळ पैका मागत आहेत. सेवेसी विदित जालें पाहिजे. सुरतेकडून फरासिसाचा सामान पांच सात हजार बंदुका व चाळीस पन्नास तोफा व गरनाळा ऐसा सरंजाम येत आहे. सुरतेहून सामान निघाला ह्मणोन छ २ र॥वलीं मुसाबुसीकडे पत्रें आलीं. त्याजवरून खुशाली केली. दाहावीस तोफा मारिल्या. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. हे विज्ञापना.

---

[ २० ] पै॥ छ १० र॥वल ॥ श्री ॥ ५ जानेवारी १७५४.

पु॥ श्रीमंत राजश्री * पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीः—

कृतानेक विज्ञापना. माधवसिंग जयनगरास आले. सरकारची फौज जयनगरासमीप आठदाहा कोशांचे अंतरायानें आहे. जाबसालास माधवसिंगाकडून वकील आले आहेत ह्मणोन सराफयांत लिहिलीं आलीं. आढ-

---

७५ ह्यावरून दादासाहेब १७५३ च्या डिसेंबरांत जयनगरासमीप आले होतें असें होतें. दादा थालनेराहून १७५३ च्या सप्टेंबरांत निघाले.

ळलें वर्तमान सेवेसी विनंति लिहिली आहे. मुसाबुसी यांचे अंतर्याम तो सरकारतर्फेसी निःकपट आहे. परंतु प्रस्तुत नौनिगादास्त करीत आहेत. सुरतेकडून बंदुका वगैरे सामान येत आहे. मुसा मरलोहि फुलचरीस गेला. पुढें काय मनसबा करणार आहेत कळत नाहीं. राजश्री नागोराव राहुजी प्रस्तुत येथें मुसाबुसी व शहानवाजखान वगैरे यांजवळ जाबसालांत आहेत. मा।रनिलेचा सेवकाचा परिचय नव्हता. राजश्री शामजीपंत टकले यांहीं सेवकांस सांगितलें कीं नागोरावजी सरकारतर्फेचे आहेत. सालगुदस्ता यांहीं सरकारकामांत कोसीस बहुत केली. हुजूराहि रुजू आहेत. तुह्मास हरयेक गोष्ट पुसणें तर यांस पुसावी. सांगतील ह्मणोन बोलिले. व नागोरावजी प्रस्तुत येथें बहुत पेश आहेत. स्वामीचे प्रतापाचा स्तव बहुत करीत असतात. मा।रनिले येहीं सेवेसी विनंतिपत्र लेहून दिल्हें तें सेवेसी पाठविलें आहे. त्याजवरून विदित होईल. नागोराव याचे पत्राचें उत्तर पाठवावयाची आज्ञा करावयास स्वामीधणी समर्थ आहेत. मार्गशीर्षमासांत ये जागा तीन वेळां पर्जन्यवृटी जाली. पौषमासींहि सप्तमी इंदुवारीं पर्जन्यवृष्टी जाली. सेवेसी श्रुत जालें पाहिजे. राजश्री परशरामपंत वर्तमान लिहीत असतील. त्या गोष्टी प्रमाणांत आहेत. सेवकास आढळले मजकूर विनंति लिहिली आहे. राजश्री शामजी गोविंद येथून छ २ रा।वलीं स्वार होऊन हुजूर आले आहेत. येथील सविस्तर वर्तमान विदित करितील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

७६ ३१ डिसेंबर १७५३.

[२१] पै॥छ१०र॥वल एकादशी ॥ श्री ॥ ५ जानेवारी १७५४.

पु॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीः—

वृतानेक विज्ञापना. छ३ रबिलोवलीं तृतीयप्रहरानंतरे त्रिचनापल्लीहून चार जोडिया हरकारे आले. फरासिसांचा मोर्चा त्रिचनापल्लीस होता. फरासिसांहीं त्रिचनापल्ली फते केली. कोटांत लोक शिरले; ठाणें काईम केलें; ह्मणोन वर्तमान आलें. त्याजवरून मुसाबुसी यांहीं बहुत खुशहाली केली. पन्नास पाऊणशें तोफांचे आवाज केले. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. प्रस्तुत मुसाबुसी काहीं नौनिगादास्त ठेवीत आहेत. हजारेक गाडदी नव ठेवितात ह्मणोन वर्तमान आहे. ख्वाजे कलंदरखानास पेशजी नवाबाचे अमलांत मचलीबंदरचा मामला सांगितला होता. त्यांजकडे नव दाहा लक्ष रुपयांची तकरीर निघाली. वाजपुरा व्हावी तो खानमा।रनिले पळोन फुलचरीवालेयाचे आसरेयास गेले. पुढें नवाब वारला. नासरजंग ठिकाणीं लागले. प्रस्तुत खानमा।रनिले मुसाबुसीसमागमें हैदराबादेस आले. दोनेक महिने जालियावर मृत्यु पावले. त्यांचे पुत्र अॅबदुलरहिमानखान मुसाबुसी यांजवळ कुल यख्तीयारी. त्यांस सीहजारी मनसब व नोबत निशाण व कलंदरखान किताब दिधला. तें वर्तमान हुजूर विनंतिपत्रीं लेहून पाठविलें आहे. ख्वाजे अबदुलराहिमान यांहीं बापाचे मामलेयाची फारीखती सलाबतजंगाजवळोन घेतली. छ १ रबिलोवलीं नथमलांनीं आणून दिली. सेवक समीप होतों. सेवेसी विदित जालें पाहिजे. राजश्री परशरामपंत अबदुलहादीखानाचे कामकाजांत बहुत बाजीद होते. शेवट त्यांचे चालिलें नाहीं. तो मामला न्यामदुलखानास जाला. विदित जालें पाहिजे. मुसाबुसी व न्यामदुलाखान सरकारांत लग्नकार्याचे आहेरांचीं वस्त्रें पाठवीत आहेत.

५७ अबदुलरहिमानखानाचा हा पूर्ववृत्तांत इंग्रजी इतिहासकारांनीं दिला आहे.

येकादो रोजां रवानगी होईल. साल गु॥ भालकीचे मुकामावर मोगलानें सला केला त्या दिवसांत सैदलस्करखानांनीं आपणाकडील भीलालखान दिलीस पाठविला होता. हालीं त्यांस फरोजजंगाचे लेकानें कैद केलें ह्मणून वर्तमान आलें तें सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. सैदलष्करखान अद्याप वसवासांतच आहेत. मुबारजखान व महमदअनवरखान व हैदरयारखान वगैरे तमाम ख्वाजे अबदुलरहमानखानाकडे येत जात असतात. प्रस्तुत येथें प्राबल्य मुसाबुसी यांचे आहे. नवाब सलाबतजंगास कोणी पुसत नाहीं. तुर्त नवाबास बरें वाटत नाहीं. छ १९ र॥वल व छ २५ र॥वल दोन तेरिखा डेरे बाहेर करावयास करार केल्या आहेत. निघतील तेव्हां खरें. आढळलें वर्तमान सेवेसी विनंति लिहिली आहे. सेवेसी श्रुत जालें पाहिजे हे विज्ञापना.

---

[ २२ ] पै॥ छ १० र॥वल ॥ श्री ॥ ५ जानेवारी १७५४.

पु॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी:—

कृतानेक विज्ञापना. अबदलहादीखानाजवळोन जबरदस्तीनें मुसाबुसी यांहीं नेलें. मुकाम करविला. तेव्हां अबदुलरहमानखानास नवाबानें बोलावून मजकूर मनास आणितां नवाब बोलिले कीं आह्मी त्यास रुखसत केलें नाहीं. जागा गळीच झाली ह्मणोन दुसरे जागा रहावयास जात होते ह्मणोन संपादणी केली. अबदुलहादीखानानें अडीच लाख रुपयांच्या कबजा छ २ र॥वलीं प्रहररात्रीं शहानवाजखानाजवळ रुजू केल्या. त्या कबजांमध्येंहि दिक्कत निघाली व दीडलाख रुपयास जागा नाहीं. सबब शहानवाजखान

रागास आले. हादीखानानें अजीजी बहुत केली कीं या मामलेयाकरितां कर्जबाजारी जालों. अतःपर मामला न सांगा, तेव्हां जीव द्यावा लागेल. याउपर शहानवाजखान यांहीं मुसाबुसींचें मनोगतानुरुप सदहू अदवानीचा मामला ख्वाजे न्यामदुलाखानास करार केला. हादीखानास नांदेड माहोराकंड मामला सांगणार. ख्वाजे न्यामदुलाखानास आजउद्यां खलअत होईल. सेवेसी श्रुत जालें पाहिजे. सफसीलानखानास हैदराबादचा मामला सांगितला. कालिकादास पेशकार जाला. खानमा॥निले छ २ रा॥वलीं मुहूर्तानें प्रस्थान करून आपले बागांत जाऊन राहिले. तीन लाख रुपये रोख व तीन लाख रुपयाचा कबजा येकूण सालाख रुपये द्यावयाचा करार जाला. त्याचा सरंजाम होत आहे. येकदो रोजा ऐवजाची निशा करून देऊन मग हैदराबादेस जातील. ब्रीजदास हैदराबादचा पेशकार व त्याचा भाऊ गुलाबदास या दोघांस शाहानवाजखानांनीं कैद करून मुसाबुसीचे स्वाधीन केलें. ब्रीजदासावर तकरीर निघाली आहे. जाबसाल अद्यापवर कांहीं नाहीं. पुढें काय निकाल पडेल त्याप्रमाणें सेवेसी विनंति लेहून पाठवितां. नवाब सलाबतजंगाचे शरिरीं सावकाश नाहीं. गोंवर निघतो ह्मणून आवई बोलतात. समाचार घेतां गोंवर नाहीं, ज्वरच आहे. छ ३ रोजीं कांहीं उपशम जाला ह्मणून लोक बोलतात. कोण्हीं बोलतात कीं नवाबानें धास्ती घेतली सेवेसी श्रुत जालें पाहिजे. छ २७ सफरीं मुसाबुसी सैदलष्करखानाचे परामर्शास गेले होते. प्रस्तुत खानमा॥निले आजाराची सबब करून घरांत आहेत. शहानवाजखानाचा व खानाचा येक विचार आहे. परस्पर येकयेकाकडे जात येत असतात. सेवेसी विदित जालें पाहिजे हे विज्ञापना.

[ २३ ] पै॥ छ २७ रा।खर. ॥ श्री ॥ २० जानेवारी १७५४.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीः—

विनंति सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान त॥ छ १७ माहे रबिलाखर पावेंतों फरासिसांचे सैन्यांत समीप शहर औरंगाबाद येथें यथास्थित असे. येथील वर्तमान आढल्याप्रमाणें त॥ ७ रबिलाखर सेवेसी विनंतिपत्रीं लेहून पाठविलें आहे त्याजवरून विदित होईल. छ ९ रबिलाखर शनवारीं काळेचौतिरयाहून मोगलाचा कुच जाला. ते दिवशीं अभ्रागमानें दुर्दिन जाला; वायु झडाडी सुटला व वातचक्राकारितां धुळोरा उठला. अंधीं झाली. त्याच संधीस मुसाबुसी यांचा दप्तरनवीस जगन्नाथराव याजवर गाडदी यांहीं दगा केला. चारमाही तलब देणें राहिली आहे याजकरितां हंगामा झाला. जगन्नाथरायास मारकूट जाली त्याचा डेरा फाडीत होते. चार घटिका मोठा कजिया झाला. गाडदी बोलत होते कीं रामदासपंत मेला ते दिवशीं अशीच वांभळ पडली होती. आजहि तोच प्रकार आहे. यांस मारून टाकावा. ऐशींहि दुर्वाक्यें बोलिले. व लोक बोलत होते कीं आज मोगलाचा कुच जाला आहे. हा मोगल माघारा येत नाहीं. मृत्यु पावेल. ऐशीं नानाप्रकारचीं दुश्चिन्हें जालीं. येका कोशाचें कूच करून इटखेडेयावर मुकामास आले. रामदासपंतहि याच मार्गें वाळजेचें रुखें कूच करून निघाले होते. ख्वाजे न्यामदुल्लाखान येहीं कुच केलेंच नाहीं. काळेचौतरेयावरच आहेत. प्रस्तुत फरासीस हरावलीस आहेत. नवाबाचे डेरे मात्र आहेत. सभोंवती फरंगी, गाडदी यांची चौकी आण कोण्ही नाहीं. शहानवाजखान छ ७ रोजीं संध्याकाळीं काळेचौतरेयावर डेरदाखल झाले. बाकी लोक अद्याप शहरांतच आहेत. शागीर्दपेशा कितेक शह-

रांतच आहेत. सैदलष्करखान याजबराबर निघत नाहीं, शहरांत राहतात. त्यास शहरांत सुभेदारी सांगोन ठेवितात ह्मणून बोली आहे. दोन हजार स्वार तैनात करून ठेवणार याप्रमाणें करार होता. मागती मनसबा फिरला. सैदलष्करखानास वराडचा सुभा सांगितला. औरंगाबादेस अद्याप कोण्ही सुभेदार करार जाला नाहीं. सेवेसी विदित होय. सुभानजी थोरातानें छ १० रबिलाखरीं नवाबाची मुलाजमत केली. बराबर पंचवीसेक घोडीं होतीं. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे हे विज्ञापना.

---

[ २४ ] पै॥ छ २७ र॥खर ॥ श्री ॥ २० फेब्रुवारी १७५४.

पु॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीः—

कृतानेक विज्ञापना. मोगलाचा कुच काळेचोतरेयाहून पुण्याचे रुखें इटखेडेयावर जाला होता. छ ९ र॥खरीं ईटखेडेयावर आले. येथें मनसबा घाटत होता कीं रावप्रधान सालगुदस्ताहि करनाटकांत गेले. सालम॥गिहि तिकडेंच मुतवजे जाले. तेव्हां आह्मी मुलुकगिरी कशाची करावी? याजकरितां पुण्याचे रुखें दबाव टाकीत जावें ह्मणजे सहजेंच माघारे फिरोन येतील. पुण्याकडे काय ह्मणोन दबाव टाकिला ह्मणतील तर त्यांस जाब आहे कीं तुह्मी आह्मा शिवाय काय ह्मणोन कर्नाटकांत जाता? सालगुदस्तां तुह्मी गेलेत. सालम॥री आह्मी जाऊं. ऐसे ऐसे मनसबा करीत होते. फार-करून स्यामदुल्लाखान तहवरजंगाचा विचार होता. सामर्थ्य तो नाहीं. परंतु

७८ ह्या पुण्यावर चालून येण्याच्या हुलकावणीचा वृत्तांत ग्रांटडफच्या इतिहासांत दिला नाहीं.

उगेच मनसबे करीत होते. सेवक मुसाबुसीजवळहि बोलिलों. ते बोलिले कीं आह्मी सहसा हे गोष्ट होऊं देणार नाहीं. प्रस्तुत धारूरचे घाटें जावयाचा करार केला. ईटखेडेयावर सात मुकाम होते. छ १६ रबिलाखरीं शनवारीं ईटखेडेयाहून कूच केलें. सातारेयाचा डोंगर डावा टाकून पांच कोश जळगांवावर मुकामास आले. कुचाचे समईं सैदलष्करखान शहरांतून दोन तीनशे स्वार व पांचसातशें गाडदी इतके जमावानसीं आले. नवाबाजवळोन वराडांत जावयास रुखसत जाले. नवाब स्वार होऊन निवालेयावर सैदलष्करखान मुसाबुसीचे डेरेयास आले. मुसाबुसी येहीं खानास घोडा येक व वस्त्रं दिलीं. तदनंतरें खानांहीं ईटखेडेयाचे मुकामीं डेरा उभा केला होता. त्या डेरेयास मुसाबुसी आले. तेथें चार घटिका होते. खानांहीं वस्त्रं दिलीं. मग खान शहरांत गेले. मुसाबुसी मुकामावर आले. आज रविवार छ १७ रोज लष्करचा मुकाम जाला. अद्याप शहरांतून बहुत लोक येणें आहेत. करनाटकांत जावयाचे दिवस राहिले नाहीं. हैदराबादेस छावणीस जातील असें दिसतें. अद्याप नवाबाची फौज जमा जाली नाहीं. फौजेचा दंगा चुकला नाहीं. ख्वांजे न्यामदुलाखान अद्याप काळेचौतरेयावरच आहेत. त्यांचा कुच जाला नाहीं. मुसाबुसी यांहीं खानास घोडा एक व शिरपेंच दिधला. तसाच खानांहीं मुसाबुसीस घोडा एक व शिरपेंच दिधला ह्मणोन अबदुलरहिमानखान बोलत होते. मसलहतीचा विचार अबदुलरहमानखान यांस पुशिला कीं कर्नाटकांत जावयाचे दिवस राहिले नाहीं; काय विचार केला? बोलिले कीं तूर्त कृष्णातीर पावेतों जातों, पुढें विचार करणें तो केला जाईल. सेवेसी श्रुत जालें पाहिजे हे विज्ञापना.

———

[ २५ ] पै॥ छ २७ रा॥खर ॥ श्री ॥ २० फेब्रुवारी १७५४.

पु॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीः—

कृतानेक विज्ञापना. मिरजाअबदलाबेग व यादगारबेग व ईनायदुलाबेग हे तिघे भाऊ शिकंदरे पातशहाचे घराणयाचे सीपाही चांगले व खुदा-तरसी फकीरी तौरानें राहतात. रामदासपंताचे हंगामेयांत मोगलाचे लष्क-रांत सेवकास भेटले होते. कितेक भविष्याच्या गोष्टी सेवकाजवळोन हुजूर लेहविल्या होत्या. त्याप्रमाणें घडोनाहि आलें. सांप्रत छ ९ रविलाखरीं मिरजा अबदलाबेग सेवकास भेटले. बोलत होते कीं आपला धाकटा भाऊ यादगारबेग रावसाहेबांचे बांदगीस गेला आहे. त्यास जाऊन दोन महिने जाले. आपण दोघे भाऊ ये जागा आहों. मोगल लोक आह्मास चाहत नाहीं व आह्मीहि त्यांची परवा धरीत नाहीं. तूर्त मोंगलांचे दौलतेची अखेरी आली. रावसाहेबांचे ताले बुलंद. दीनबदीन दौलतेची तरकी आहे. याजबदल पांच वख्त उजू नमाज करून ईलाहीनजीक रावसाहेबांचे हक्कामध्यें दुवायाद करीत आहों. प्रस्तुत आह्मास 'बशारत जाली आहे कीं लढाईमध्यें तमाम मोगल मारले गेले. सलाबतजंगास कबरेमध्यें गाडावयास नेलें. शहानवाजखानास जखमा लागल्या. बहुत जेर ज़ाले. तोंडांत पाणी घालितात. मुसाबुसीचें शीर कापिलें. लष्कर गारत जालें. रावसाहेबांचे झेंडे औरंगाबादेंत दाखल जाले. अवरंगाबादचें अलम तमाम

---

७९ १७५४ पूर्वी शिकंदर नांवाचे पातशाहा दिल्लीचे तख्तावर दोन होऊन गेले:— शिकंदरलोदी व शिकंदर सूर. पैकीं शिकंदर लोदीनें इ. स. १४८८ पासून १५१८ पर्यंत राज्य केलें. हा पातशाहा मोठा तेजस्वी होता. तो हिंदूंचा अतिशय छळ करीत असे. अर्थात् , मुसलमान लोकांत त्याला फार पूज्य मानीत असत. त्याच्या वंशांतील हे तिघे बंधू असावेत. ह्या शिकंदराचा पुत्र जो इब्राहिम त्याला बाबरानें पानिपत येथें १५२६ त मारून टाकिलें. तेव्हां त्याच्या घराण्यांतील पुरुष व स्त्रिया दक्षिणेंत पळून आल्या असाव्या.

हवेलीधाबेयावर चढून तमाशा पाहते. मोगलाई बुडोन राहिली. अत:पर फते रावसाहेबांची आहे. आजच मोगलाचा कुच जाला. अंधी आली. बाद केलें. दीन गाईब जाला. बावजबुन सुटला. गरद बहुत उठला. याचा विचार हाच कीं प्रस्तुत मोगल निघाले आहेत हे जिवंत नाहीं; मुर्दे जात आहेत. बारा कोसाहि निभत नाहीं. आपआपल्यांत कटोन मरतील. निजामअली व सलाबतजंग या दोघांतून येक जण पळोन रावसाहेबांचे आसरेयांत जाईल. यामध्यें खता नाहीं. आतां रावसाहेबीं ढील न करावी. *दक्षणेचा बंदोबस्त करावा. आमचे दिलांत रावसाहेबांचें कदम पहावयाची उमेद बहुत आहे. लेकिन बेसरंजाम आहों. मेहेरबान होऊन थोडाबहुत सरंजाम फर्मावितील तर जाऊन मुलाजमत करूं ह्मणोन बोलिले. हें वर्तमान हुजूर विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. याचा विचार पाहतां मिरजाअबदला बहुत थोर आहे. शिकंदरचे घराणेयाचा खरा. मनसुबेबाज, चतुर आहे. हुजूर दृष्टीस पडिलिया ध्यानास येईल. कृपाळू होऊन आज्ञा केली तर हुजूर येईल. बेखर्ची आहे. माणुस माकुल दिसतो. सेवेसीं विदित व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

" *दक्षणेचा बंदोबस्त करावा; " " दक्षण सारी मोकळी करावी, " हीं वाक्यें १७५० पासून १७६० पर्यंतच्या अवधींत महाराष्ट्रांत सर्वांच्या तोंडीं झालीं होतीं. सलाबतजंगाचें पारडें इतकें हलकें झालें होतें कीं, त्याच्या राज्यांतील मुलसमानास देखील मोगलांचें राज्य बुडतें असें वाटूं लागलें; इतकेंच नव्हे, तर तें बुडावें अशी इच्छाहि पुष्कळांस झाली. सलाबतजंगाच्या घरांत भावाभावांत कलह होता. शहानवाजखानासारखे राजद्रोही मुसुलमान व जानवा निंबाळकरासारखे दुटप्पी मराठे सरदार त्याच्या दरबारांत होते; अशी स्थिति सलाबतजंगाची होती. तशांत बुसीसारख्या भुकेल्या परद्वीपस्थाच्या हातीं राज्याचीं मुख्य सूत्रें होतीं. तेव्हां ह्या संधीस निजामाचें राज्य बहुतेक लयास जाण्याचीच वेळ आली होती, यांत कांहीं नवल नाहीं; परंतु इतकें होऊनहि सलाबतजंग वाचला तो एका गोष्टीनें वाचला. ती गोष्ट ही कीं, बुसीला घालवून देण्याची बुद्धी त्याला ह्याच वेळीं झाली. नाहींतर नानासाहेब व बुसी ह्या दोघांनीं मिळून सलाबतजंगाची राख उडवून दिली असती.

[ २६ ] श्री ॥ १ ॥ ३० जानेवारी १७५०

श्री

राजा शाहु नरपति
हर्ष निधान बाळाजी
बाजीराव प्रधान.

आदनापत्र राजश्री पंडित मुख्य प्रधान वचनात. बकसीरामको मालम होय संमत १८११[८१] सुहुरसन खमसैनमयावआलीफ. तुम और पंडेत बाबू-

---

८० इचलकरंजी येथील रा. रा. रघुनाथ पांडुरंग दातार यांच्या दफ्तरांतील लेखांक २६ पासून लेखांक ५० पर्यंतचीं पत्रें आहेत. लेखांक ४८ हें पत्र मात्र ह्या दफ्तरांतील नाहीं. रा. रघुनाथ पांडुरंग दातार ह्यांचे खापरपणजे वावूराव महादेव दातार हे होत. हे गोपाळराव गणेश बर्वे ह्यांच्या दिमतीस होते. गोपाळराव गणेश बर्वे व त्यांचे बंधू ह्यांनीं हिंदुस्थानांत बऱ्याच कामगिऱ्या केलेल्या आहेत असें अनुमान आहे. त्या कामगिऱ्या कोणत्या ह्याचा विशिष्ट निर्देश उपलब्ध असलेल्या कोणत्याहि महाराष्ट्राच्या इतिहासांत केलेला नाहीं. गोपाळराव गणेश, रामाजी अनंत, नारो शंकर, लक्ष्मण शंकर, अंताजी माणकेश्वर, खंडागळे, पांढरे, गोविंदपंत बुंदेले, विठ्ठल शिवदेव व त्यांचें बंधू, मल्हारराव होळकर, जयाप्पा, दत्ताजी, जनकोजी, इत्यादि अनेक महाराष्ट्रीय वीरांचीं व मुत्सद्यांचीं चरित्रें मुद्देसूद व तारीखवार अशीं अद्याप लिहावयाचींच आहेत. गोविंदपंत बुंदेले, विठ्ठलशिवदेव, मल्हारराव होळकर, व शिंदे घराणें यांचे इतिहास लिहिले गेले आहेत. परंतु ह्या इतिहासांत व चरित्रांत मुद्देसूद, तारीखवार व विस्तृत अशी माहिती बिलकुल नाहीं.

८१ शाहूमहाराज १७४९ च्या डिसेंबराच्या १५ व्या तारखेस वारले व हें पत्र नानासाहेब पेशव्यांनीं अंतर्वेदींतील बक्षीराम नांवाच्या जमीनदाराला ३० जानेवारी १७५० त लिहिलें आहे. धाकटे रामराजे ह्यांचा अभिषेक ४ जानेवारी १७५० ह्मणजे शके १६७१, शुक्ल ( विकारी ह्मणून धाकटे रामराजे ह्यांच्या चरित्रांत चुकून पडलें आहे ) नाम संवत्सरे, पौष शुद्ध अष्टमीस झाला. तेव्हां हें पत्र शाहूराजाच्या मृत्यूनंतर ४५ दिवसांनीं व रामराजाच्या अभिषेकानंतर २५ दिवसांनीं लिहिलें आहे. ह्यावरून रामराजाचा शिक्का अभिषेकानंतर २६ दिवस तरी चालू झाला नव्हता असें दिसतें.

८२ हें पत्र लिहिण्याच्या तारखेस सुहुरसन खमसैनांत विक्रमसंवत् १८०६ होता, १८११ नव्हता. हें पत्र खरें असल्यास संवत् चुकणें सर्वस्वीं आश्चर्यकारक आहे. शाहूराजा वारला असतांहि त्याचा शिक्का चालविणें व संवत् चुकणें, ह्या दोन चुकांमुळें ह्या

राय वैसे येकदिल होय के सीरकारका कामकाज करना. बाबूरावके कहा-
माफीक तुमने रहना या मे अछा हे. यो बातका बुभाट आवे तो मुलाजा नु
होगा. ताकीद जाणावी. जाणिजे. छ ४ रबिलावल. आज्ञाप्रमाण.

लेखन सीमा

---

[ २७ ] ॥ श्री ॥ ३ सप्टेंबर १७५३.

राजश्री गोपाळराव गणेश स्वामी गोसावी यांसिः—

विनंति उपरि— थालनेरीहून भाद्रपद शुद्ध त्रयोदशीस खासास्वारी मुहूर्ते
डेरे दाखल होईल. पुढें मजल दरमजल उभयता सरदार सहवर्तमान फौजे-
निसीं हिंदुस्थान प्रांतीं येत असो. याजउपरि इकडील कांहीं गुर्ता राहिला
नाहीं. तुह्मीं आपल्याकडील वर्तमान वरचेवरी लिहीत जाणे. जाणिजे. छ५
जिलकाद. ते प्रांतीं लौकरच येतों. सर्व बंदोबस्तें होऊन येईल. हे विनंति.

---

पत्राच्या खरेपणाचा संशय येतो. कदाचित् नक्कल करणाऱ्याचा संवत् लिहितांना हस्तदोष
झाला असावा. तरी मूळपत्र पाहिल्या शिवाय ह्या संबंधीं ठाम असें कांहींच लिहितां येत
नाहीं.

८३ १० सप्टंबर १७५३ ला रघुनाथराव थालनेराहून हिंदुस्थानास जाण्यास डेरेदाखल
होणार होते.

८४ ह्मणजे अमदावाद सर करून गुजराथेचा बंदोबस्त झाला.

८५ श्रीक्षेत्र काशी व अंतर्वेदीतील स्थलें ह्यांचा.

[ २८ ]

॥ श्री ॥ २८ अक्टोबर १७५३

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
गोपाळराव गणेश स्वामी गोसावी यांसिः—

पोष्य रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. सरकारांत पुस्तकाचें प्रयोजन आहे. त्यास, पुस्तकें बितपशिलः—

शिरोमणी[८६]
१ लीलावतीशिरोमणी
१ बौध्याधिकारशिरोमणी
१ प्रत्यक्षशिरोमणी
१ गुणशिरोमणी
१ पदार्थखंडणशिरोमणी
५

सांख्यसूत्र व भाष्यप्रस्थान
१ सूत्रें
१ भाष्य
२

स्मृतीः—
मनुस्मृति, याज्ञवल्क्य, पाराशर वगैरे
स्मृति १८
वेदभाष्य चहूंवेदींचें त्यांत
जें मिळेल तितकें येकूण कलम १

येणेंप्रमाणें पुस्तकें मेळवून उत्तम अक्षर आणि वित्पन्न ब्राह्मणाचे हातें प्रती करून सदहूं पुस्तकें लेहून पाठविणें. जाणिजे. छ ३ जिल्हेज. बहुत काय लिहिणें हे विनंति.

पै॥ छ १ मोहरम, कार्तिक श्रु॥ २ भानुवासर, द्वितीय प्रहर.
मु॥ नजीक अवऱ्या प्रांत अंतर्वेद.

---

८६. शिरोमणीभट्टानें केलेला ग्रंथ तो शिरोमणी. हा ग्रंथ तर्कशास्त्रावरील आहे. मुळांत खालीं दिलेले पांच शिरोमणी त्याचे भाग होत. मनु, याज्ञवल्क्य, नारद, विष्णु, शंख, आपस्तंब, इत्यादि १८ स्मृती. विद्यारण्याचें चारी वेदावरील भाष्य.

[ २१ ] ॥ श्री ॥ ७ मार्च १७५४.

राजमान्य राजश्री बाबूराव महादेव दि॥ गोपाळराव गणेश गोसावी यांसि:——

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार. सु॥ अर्बा खमसेन मया व अलफ. तुह्मी पत्र पाठविलें, प्रविष्ट जालें. सफदरजंग श्री क्षेत्रींचे अंमलाची पेरवी होऊं देत नाहीं, हा मजकूर विस्तारें करून लिहिला तो कळला. ऐशास, येथील उपराळा ठरावयाचा मजकूर लालानरसिंगदास यास ताकीद कर्तव्य तें करीत आहों. परस्पर ते सफदरजंगास लिहीतच असतील. तुह्मी त्यासी शोरश्य राखोन अंमलाची पेरवी होय तें करणें. जरी अमल ते चालो न देत तरी तुह्मी आह्माकडे उठोन येणें. पांच शिरोमणी व पद्मपुराण संपूर्ण व यजुर्वेदभाष्य व सामभाष्य हे तुह्मी लिहिविले आहेत. ते तयार जाले असले तरी पाठवणें. तयार जाले नसले तरी खामखा तयार जलदीनें करविणें. पुस्तकें तयार जाल्याशिवाय क्षेत्रींहून न निघणें. जाणिजे. छ १२ जमादिलावल आज्ञाप्रमाण. पुस्तकाची जरूर दरकार आहे तरी तुह्मी खामखा श्रीस जाऊन लेहून घेऊन येणें. त्याखेरीज आल्यास बरें नाहीं. आणि श्रीचे अमलाविसी जसें केलेलें तसें बोलून जाहलें तरी करणें. वर्तमान लिहीत जाणें.

लेखन सीमा

---

८७ ह्यावरून सफदरजंगानें १७५४ साला पूर्वी. काशी क्षेत्रीं अंमल बसवून देण्याचें कबूल केलें होतें असें दिसतें; परंतु श्रींत अंमल बसविण्याकरितां बाबूराव महादेवास जेव्हां पेशव्यांनीं पाठविलें तेव्हां तो अळमटळम करूं लागला. जयाप्पाच्या मनांत श्रींत अंमल बसविण्याचें फार होतें हें [illegible]र्दील कांहीं पत्रांवरून दिसून येईल; परंतु पुढें लवकरच १७५५ त जयाप्पा वारल्यामुळें काशी[illegible]डे मोहीम करण्याचें तहकूब राहिलें तें दोन तीन सालें तसेंच राहिलें. नंतर १७५८।५९ [illegible] दत्ताजी शिंद्यांच्या मनांत काशी घ्यावयाचें आलें; परंतु अबदालीच्या दंग्यामुळें व पानिपत[illegible]या गर्दीमुळें तें काम तहकूब करावें लागलें. पुढें केव्हांहि मराठ्यांच्या हातीं तें क्षेत्र आलें [illegible]नाहीं.

वा. १. ३



[ ३० ] ॥ श्री ॥ ९ मार्च १७५४.

राजश्री बाबूराव महादेव गोसावी यांसिः—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री जयाजी शिंदे दंडवत. सु॥ अर्बा खमसैन मयावअलफ. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. सविस्तर कळलें. ऐशियास, राजश्री गोपाळराव गणेश येथें येऊन सविस्तर वर्तमान श्रीमंत राजश्री दादास्वामीस निवेदन केलें. तदनुसार तिकडील बंदोबस्त होणें तो थोडक्याच दिवसांत होऊन येईल. तुर्त म॥निलेस अंतर्वेदीत सरकार कोळें येथील मामलत सांगोन पाठविले असेत. त्यांणींहि तुह्मास सविस्तर लिहिलें असेल. तुह्मीं कोणे गोष्टीची चिंता न करणें. जाणिजे. छ १४ जमादिलावल. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

शिक्का. मोर्तब सुद.

---

[ ३१ ] पै॥ छ १ जमादिलाखर. ॥ श्री ॥ २६ मार्च १७५४ पैवस्ती.

राजश्रियाविराजित राजमान्यराजश्री बाबूराव स्वामीचे सेवेसीः—
सेवक रामाजी अनंत साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावोन लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. ऐशियास, तुमचा उपराळा करून श्रीचें काम शेवटास न्यावें यापरतें दुसरें अधिकोत्तर नाहीं. त्या प्रे॥ येथें राजश्री गोपाळराव आलियावर श्रीमंतास व सरदारांस जे विनंति करण्याची ते केली. व येथून नवाब सफदरजंग यास लेहून त्याजकडून वकिलास सांगोन त्याजक-

---

८८ जयाप्पा व मल्हारराव दादासाहेबांपाशीं कुंभेरीस असतांना हें पत्र लिहिलें आहे ( लेखांक ३३ पहा )
८९ कोळजकेश्वर.

डोन नवाबास अर्जी लेहविली. परंतु त्याजवरच मदार नाहीं. राव मशारनि-लेम अंतर्वेदींत मामलत सांगोन पाठविलें. तेथील बंदोबस्त करून मशारनिले येथें लवकरच येतील. उपरांतिक पक्का विचार होणें तो होऊन येईल. तुह्मी आपली खातरजमा राखोन कोणेविसी चिंता न करणें. येविसी श्रीमंतांनीं तुह्मास लिहिलें असेल त्याजवरून कळेल. ज्या प्रे॥ श्रीमंतांची आज्ञा होईल त्या प्रे॥ च वर्तणूक करावी. येथील सर्व वर्तमान तुह्मी जाणतच आहा. बरें, इतके दिवस झाले. आतां थोडक्यासाठीं उतावळी न करावी. हे या प्रांतांत आहेत तों पावेतों वाट पाहावी. नाहीं तरी मग पुढें जें होईल तें पाहतच आहों. बहुत काय लिहिणें. लोभ असो दिजे. हे विनंति.

---

[ ३२ ] पै॥ छ ५ रजब.      ॥ श्री ॥      १० एप्रिल १७५४.

राजश्री बापूराव महादेव गोसावी यांसिः--

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री जयाजी शिंदे दंडवत. सु॥अर्बा खमसैन मया अलफ. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. तेथें नवाबखान[५०] लष्करांत आल्यावरी, त्यासीं संभाषण केल्यावरी त्याच्या जाबसालाचें वृत्त तपशिलें लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐशास, येविसी जें लिहिणें तें श्रीमंत राजश्री दादासाहेब यांणीं तुह्मास लिहिलेंच आहे. त्याप्रे॥ वर्तणूक करणें जाणिजे. छ १६ माहे जमादिलाखर. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

शिक्का      मोर्तब सुद.

---

५० हा नवाबखान कोण ?

[ ३३ ] पे॥ छ ५ रजब. ॥ श्री ॥ ११ एप्रील १७५४.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाबूरावजी स्वामी गोसावी यांसः— पोष्य रामाजी अनंत स॥ नमस्कार विनंति येथील कुशल तागायत चैत्रवद्यें ४ मु॥ प्रांत जाटवाडा ठाणें कुंभेर जाणून स्वकीये कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. पत्र पाठविलें तें पावलें. तेथें कितेक मजकूर. नबाबाच्या शैन्यांत आल्यानंतर त्यासी बोलाचाली जाल्याचें वृत्त ता॥वार लिहिलें तें कळलें. ऐशास, त्याचा जाबसाल श्रीमंत राजश्री दादासाहेब तुह्मास लिहितील त्यावरून कळेल. त्याच्या आज्ञेप्रमाणें वर्तणूक करणें. सारांश गोष्ट कीं तुमचें तेथें प्रयोजन नसिलें तरी मग उगेंच तेथें राहावेंसें काय आहे ? येथें खावंदाजवळी येऊन वर्तमान सांगावें. मग पुढें जशी आज्ञा करतील त्याप्रमाणें वर्तणूक करावी. कागदींपत्रीं कांहीं काम होतें असा अर्थ नाहीं. राजश्री गोपाळराव कौलेस आहेत. तुह्मास कळावें ह्मणून लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ ३४ ]

॥ श्री ॥ १५ मे १७५४.

चिरंजीव राजश्री गोपाळराव यांसी प्रती गोपाळराव गणेश आशीर्वाद उपरि येथील कुशल ता॥ छ २१ रजब जाणोन स्वकीये लिहीत जाणें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान विदित जाहालें. उंटे, नोबत व घोडीं पाडाव करून आणिलीं म्हणोन लिहिलें तें कळलें; बहुत संतोष

---

११ ह्या वेळीं कुंभेरचा वेढा चालला होता.

१२ हा गोपाळराव कोण व ही कोणत्या लढाई संबंधीं हकीकत आहे तें सांगतां येत नाहीं. हा गोपाळराव गोपाळराव गणेशाचा संबंधीं असावा एवढें मात्र पत्रावरून दिसतें.

जाहाला. ऐशास, तुम्ही कर्ते, यशस्वी आहां; कामाकाजास पाठविल्यास यशच मिळवाल हा भरवसा चित्तांत जाणोन खावंदचाकरीस शिपाईपणाची शर्त केली आणि चिरंजीवपणाचें नाव रक्षिलें. बहुत समाधान जाहालें. या उपरि पुढेंहि सवाई यश संपादाल यांत संशय नाहीं. उप्रांत पुढील विचार तर तुह्मी एकाएकीं त्याजवर चढून न जाणें. तेच कदाचित् चढून आल्यास ठाण्याबाहेर मोर्चे बंदी करून राहावें. आणिक मागाहून कुमकहि पाठवून देऊं; चिंता न करणें. जेणेंकरून खावंदाचा नक्ष राहे तें करावें. यमतुका ? कडील आज प्रहर दिवसास पत्रें आलीं तेथें लिहिलें होतें कीं जमीदाराकडील भीड ? प्यादे होते ते सर्व याजकडे मिळाले. जमीदाराचा भरवसा नाहीं. आपले हुजुरातचे स्वार दोनतीनशें आहेत. ते थोडेच आहेत. त्यास चिंता नाहीं. आणीकहि कुमक जगदाप याजकडे पाठवावी लागते. ऐशास, आज संध्याकाळ पावेतो पाठवून देतों. तिकडून तुह्माकडे येतील. आज येथून कूच करून नारोशंकर याच्या गोटाजवळ मुक्काम केला. बहुत काय लिहिणें. तुह्मीं शर्त केली ! बरं! तुमची आमची भेट झाल्यावर सर्व गोष्टी ईश्वर उत्तम करील. कांहीं चिंता नाहीं. बहुत शहाणपणें राहावें. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

---

[ ३५ ] ॥ श्री ॥ १७ मे १७५४.

राजमान्य राजश्री बाबूराव महादेव नि॥ गोपाळ गणेश गोसावी यांसि:— सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार सु॥ आर्बा खमसैन मयावअलफ. सांप्रत येथील मजकूर. नवाब मनसूरअलिखान[९३] यास जाटाचें फत्तेचें पत्र

[९३] सफदरजंग ह्याला मनसुर अलीखान हें नांव होतें. त्याला जाटाच्या फत्तेचें ह्मणजे कुंभेर घेतल्याचें पत्र रघुनाथरावानें पाठविलें. अशा करितां कीं ही वातमी ऐकून त्यानें नरम यावें. सफदरजंगाचें व सुरजमल जाटाचें सख्य होतें. ह्या दोघांनीं गाजुद्दिनाविरुद्ध

थैली पाठविली आहे, त्यास प्रविष्ट करोन मस्तोत्तर देऊन पाठविणें. जाणिजे. छ २३ रजब. आज्ञा प्रमाण.

शिका

लेखन सीमा

[ ३६ ]

॥ श्री ॥

४ आगष्ट १७५४.

राजमान्य राजश्री बाबूराव महादेव दि॥ गोपाळराव गणेश गोसावी यांसिः—

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार सु॥ खमसखमसेन मया व अलफ. तुह्मीं पत्र पाठविलें प्र॥ जालें. पे॥ अरले व पे॥ कथीत तालुका विजापूर येथील मामलत राजश्री व्यंकाजी रंगनाथ याजकडे आहे. त्यास महमदकुलीखान प्रयागचा सुभा खळ करितो. त्यास ताकीद सफदरजंगापासून करावयाबद्दल साहित्य पत्रें हुजूरचीं पाठवावीं व कांहीं फौज देऊन याचा उपराळा करावा ह्मणून तुह्मीं विनंतिपत्रीं लिहिलें तें कळलें. अशास, साहित्य पत्रें सफदरजंगास व मानाजी पायगुडे व गोविंद बल्लाळ यांसी उपराळा करावा याबद्दल लिहिलें आहे. तुह्मी नवाबापासोन महमदकुलीखान यासी ताकीद करविणें. मवासाचें पारपत्य करावयाचा उपराळा गोविंद बल्लाळ व मानाजी पायगुडे करतील. महमदकुलीचा उपसर्ग, धनवडसिंगाचा उपसर्ग न करणें ऐसी ताकीद सफदरजंगापासोन करणें. जाणिजे. छ १४ सवाल. आज्ञाप्रमाण. लेखन सीमा

लढाई चालविली होती. परंतु गाजुद्दिनाच्या बाजूला मराठे होते व त्यांनीं जाटाचा पराभव केला होता. तेव्हां सफदरजंग अर्थातच एकटा राहिला. अशा समयीं पत्राचा दपटशा गेला असतां तो काशी बाबूराव महादेवाच्या हातीं देईल या उमेदीनें हें पत्र लिहिलें आहे.

[ ३७ ] ॥ श्री ॥ १९ आगष्ट १७५४.

राजश्री बाबूराव महादेव गोसावी यांसीः—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री जयाजी शिंदे दंडवत. सु॥ खमसखमसैन मया व अलफ. तुह्मीं पत्र पाठविलें तेथें श्रीक्षेत्रीचें व अंतर्वेदीप्रांतचें व मनसूरअल्लीखान याजकडील वर्तमान तपशिलें आषाढमासचें लिहिलें तें कळलें. त्या प्रांतें फौज आल्याविना सरकारचा अंमल बसत नसे ह्मणून लिो. त्यास, सांप्रत आह्मास श्रीमंत राजश्री दादासाहेब यांणीं गुजराथची फौज दहाबारा हजार देऊन मारवाड प्रांतें रवाना केलें. ते छ १६ सवालीं मेडत्यास आलों. राजे रामसिंग राठोड याचे लोक यांसी येऊन भेटत चालले. आजपर्यंत बारा पंधरा हजार फौज राठोड जमा जाले. आणखी येतच आहेत. बिजेसिंग राठोड मेडत्यांतच दबोन राहिला असे. आह्मी बाहेर त्याजभोंवताले असो. त्याचे लोक नित्यानीं पळोन आपल्याकडे येत चालले आहेत. धर सुटला असे. सत्वरींच मारवाड प्रांतींचें काम विल्हेस लावून, बंदोबस्त करून, तुह्मांकडे अंतर्वेदींतून अविलंबेंच येतों. जे जे मवासी करीत आहेत त्यांचें पारपत्य यथायुक्त करून श्रीक्षेत्रास अंमल खुलासा करणें हे गोष्ट चित्तांत फारशी आहे. सत्वरीच येणें होईल. चिंता न करणें. जाणिजे. छ २९ माहे सवाल. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

शिक्का

मोर्तब सुद

---

९४ जयाजी शिंदे दादासाहेबांच्या सैन्यांतून मारवाडास जाण्यास १०रमजान म्हणजे २ जुलै १७५४ स विभक्त झाले ( पत्रें व यादी ३२ ). ते १६ सवालीं म्हणजे ६ आगष्ट १७५४ स मेडत्यास पोंचले. हें पत्र १९ आगष्टाला मेडत्याच्या भोंवतीं जयाप्पानें वेढा दिला असतां लिहिलेलें आहे.

[ ३८ ]                    ॥ श्री ॥        २२ आगष्ट १७५४.

राजमान्यराजश्री बाबूराव महादेव दि॥ गोपाळराव गणेश गोसावी यांसिः—

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार सु॥ खमसखमसैन मया व अलफ. तुह्मीं एक दोन पत्रें पाठविलीं, प्रविष्ट जालीं. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. याउपरि जालें वर्तमान वरचेवरी लिहीत जाणें. सांप्रत सफदरजंग कोठें आहे. त ? मनसबाविचार आचार काय आहे ? हें वृत्त सविस्तर बारीक मोठें मनास आणोन लिहिणें. पोथ्याविसीं पेशजीं लिहिलें आहे. त्याप्रमाणें पुस्तकें तयार करून पाठविणें. तुह्मीं सफदरजंगाचा निरोप घेऊन देशास जाणार. याजकरितां गोपाळराव यांनीं रामचंद्रभिकाजीस पाठविलें. त्यास, तुह्मी व ते एक विचारें राहून कामकाज करीत जाणें. येविशीं रामचंद्र भिकाजीसहि पत्र सादर केलें आहे. जाणिजे. छ ३ जिलकाद. आज्ञाप्रमाण.

लेखन सीमा

---

[ ३९ ]                    ॥ श्री ॥        २९ आगष्ट १७५४.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाबूरावजी स्वामी गोसावी यांसः—

सेवक रामाजी अनंत सा॥ नमस्कार विनंति येथील कुशल त॥ छ २९ सवाल मु॥ मेडते प्रांत मारवाड जाणून स्वकीये कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वृत्त कळलें. येणें प्रमाणेंच सदैव वृत्तांत त॥ वार लेहून पा॥ जाणें. तुह्मी दिलीचा मजकूर लिहिला.

ऐसीयास, आह्मी दिल्लीच्यों कामांत नाहीं. दिल्लीचें जें बरें अगर वाईट तें सर्व श्रीमंताकडे व राजश्री सुभेदाराकडेच आहे. आह्मी प्रस्तुत मारवाडच्या कामास आलों आहों. ईश्वरी कृपेनें ईकडील कॉम सिद्धीस गेलियावर त्या प्रांते येऊन. आबांचा ? आमचा स्नेह आहे त्या प्रे॥च आहे. दुसरा विचार नाहीं. तुह्मी कोणे गोष्टीची चिंता न करणें. बक्षीरामाचा मजकूर लिहिला तरी त्यांनी सनदेसिवाय खर्च केला तरी मजुरा पडणार नाहीं. तुह्मी श्रीमंत राजश्री दादास्वामीसहि वरचेवर लिहीत जाणें. तेथून ताकीदपत्रें पाठवितील. येथील पत्रें पाठविलियानें काय होणें ? जेव्हां त्या प्रांतें फौज येईल तेव्हां सारेंच उत्तम होईल. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ ४० ] ॥ श्री ॥ ३ अक्टोबर १७५४.

राजमान्य राजश्री बाबूराव महादेव गोसावी यांसः--

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार सु॥ खमसखमसैन मया व अलफ. तुह्मी पत्र पाठविलें प्रविष्ट जालें. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. गंगावन

---

९५ ह्या लिहिण्यावरून कुंभेरीस बखरींत ( भाऊसाहेबांची बखर पृष्ठ ७ ). लिहिल्याप्रमाणें शिंदे होळकरांचें भांडण झालें होतें असें म्हणण्यास फारशी हरकत नाहीं. आतां भांडण्याचें स्वरूप बखरींत वर्णिलेल्याप्रमाणेंच होतें किंवा काय ह्याचा मात्र उलगडा अन्य पुरावा सांपडल्या शिवाय करतां येत नाहीं.

९६. बंगाल्यावर स्वारी करण्याचा उपदेश शिंद्यांना मल्हाररावहोळकरानें १७५८ त दिला असें भाऊसाहेबांची बखर पृष्ठें ४०।४१ त वर्णन केलें आहे. परंतु पूर्वेकडे स्वारी करून श्रीक्षेत्र काशी घेण्याचा शिंद्याचा इरादा निदान १७५४ पासून होता असें ह्या पत्रावरून दिसतें

तुह्मी पाठविलें तें पावलें. मार्गी आगरीयासी जाटांनीं लुटलें. दुसरें चवरीबद्दल गंगावनें पाठविलीं आहेत ह्मणोन लिहिलें. त्यास, हुजूर आलियावरी जाब लिहिला जाईल. राउत सीबंदी आहे. त्याची सनद पाठवावी ह्मणोन लिहिलेत त्यास, पेशजी गोपाळराव गणेश याणी तुह्मास नेमणुक करून दिल्हीच आहे. त्याची सनद हुजूरची असावी. त्यास, खासास्वारी त्या प्रांतास आलियावरी मनास आणून आज्ञा करणें ते केली जाईल. हल्लीं सफदरजंग कोठें आहेत ? पुढें इरादा त्याचा काय ? हें सविस्तर वरिचेवरी लिहीत जाणें. साठ हजार रुपये धनवडसींगापासोन तनखाचे ऐवजीं पावले ते त्याणींच मार्गात दगा करून घेतले. याजकरितां जजावल ? सफदरजंगाचे तुह्मी धनवडसिंगावरी केले आहेत. त्यास ते रुपये आले किंवा नाहीं हें लिहीणें. जाणिजे. छ १५ जिल्हेज. लेखन सीमा

---

[ ४१ ] ॥ श्री ॥ १८ अक्टोबर १७५४.

राजमान्य राजश्री बाबूराव महादेव दि॥ गोपाळराव गणेश यांस:—

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार सु॥ खमसखमसैन मय्या व अल्लफ. तुह्मी पत्रें दोन पाठविलीं, पावलीं. लिहिलें वृत्त सविस्तर कळलें. सफदरजंगाचें वर्तमान लिहिलें तेंहि कळलें. याजउपरि नवाब सुजातदौला काय विचार आचार करितात ? मनसबा डामडौल कसा आहे ? हे वरचेवरी सविस्तर लिहून पाठवीत जाणें. जाणिजे. छ १ मोहरम. लेखन सीमा

---

[ ४२ ] श्री १० नोंवेंबर १७५४.

राजमान्य राजश्री बाबूराव महादेव दि॥ गोपाळराव गणेश गोसावी यांसि:—

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार सु॥ खमसखमसैन मया व अलफ. तुह्मीं पत्र पाठविलें प्रविष्ट जाहलें. लिहिला मजकूर कळला. याजउपरि जाहलें वर्तमान लिहित जाणें. येथीलँ कामकाजाचा निर्गम जाहला. जाणिजे. छ २४ मोहरम. लेखन सीमा

---

[ ४३ ] ॥ श्री ॥ १५ जानेवारी १७५५.

राजश्री बाबूराव महादेव गोसावी यांसः—

(छ) अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ जयाजी शिंदे दंडवत. सु॥ खमसखमसैन मया व अलफ. तुह्मी पत्र पाठविलें तें पावलें. तपसीलवार वर्तमान लिहिल्याप्रमाणें कळों आलें. मनसूरअलीखान याच्या पुत्रास शिष्टाचार युक्त पत्र फारसी पे॥ असे. हें त्यास देणें. आणि श्रीमंत राजश्री दादासाहेब तुह्मास आज्ञा ज्याप्रमाणें करतील त्याप्रमाणें वर्तणुक करणें. लालाबकसीराम यास ताकीद द्यावीसें लिहीलें त्यावरून त्याजला लिहिलें. असे कीं तुह्मी उभयता येक चित्तें वर्तोन राहत जाणें. द्वैत न दाखवणें. ऐसें त्यास लिहिलें असे. तरी बकसीराम व तुह्मी येक विचारें राहून हरयेक कामकाज करीत जाणें. जाणिजे. छ २ राग्वर बहुत काय लिहिणें. हे विनंति.

मोर्तब सुद

---

९७ येथील म्हणजे दिल्ली येथील. रघुनाथराव १७५४ च्या आगष्टांत दिल्लीस पोहोंचला होता ( पत्रें व यादी ३२ ).

९८ सफदरजंग अथवा मनसूरअलीखान हा १७ अक्टोबर १७५४ त वारला. त्याच्या पुढें त्याचा पुत्र शुजातदौला अयोध्येचा नवाब झाला.

[ ४४ ] ॥ श्री ॥ १५ जानेवारी १७५५.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाबूरावजी स्वामीचे सेवेसी:—
सेवक रामाजी अनंत स॥ नमस्कार विनंति येथील कुशल त॥ छ २ रा॥खर मु॥ नेंगेर प्रांत मारवाड जाणून स्वकीये कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. पत्र पाठविलें तें पावलें. तेथें लिहिलें वृत्त त॥वार कळलें. फारसी कागद तुमचेंच नांवे लिहून नवाब सुजातदौलाबहादर यांसी पाठविला असे. व बकसीराम यानें तुमच्या इतल्याखेरीज हरयेक कामकाज न करणें ऐसें पत्र त्यास लिहिलें आहे. त्या प्रे॥ त्यास देणें आणि श्रीमंत राजश्री दादा-से॥च्या आज्ञे प्रे॥ वर्तत जाणें ह्मणजे उत्तम असे. तुह्मी आह्मास वारंवार लिहितां परंतु आह्मी इकडे आलों. तुह्मी तिकडे राहीलां. राजश्री गोपाळ-राव कुंभेरीस आले होते त्याचे साइत्य ईश्वरें केलें. तुमचा भोग सरला नवता ! बरें ! आतां श्रीमंतासमागमें देशास यावें. घर सोडून फार दिवस जाहाले. पुढें मागती गोपाळराव तुह्मी सारेच काशीस याल. कांहीं चिंता न करावी. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ ४५ ] ॥ श्री ॥ २० जानेवारी १७५५.

राजश्री बाबूराव महादेव गोसावी यासि:—
छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री जयाजी शिंदे दंडवत सु॥ खमसखमसैन मया व अलफ राजश्री गोपाळरावजी हुजूर आह्मा जवळ आले. त्यांनीं कितेकाप्रकारचें तुमचे चाकरीचें वर्तमान सांगितलें. त्यावरून कळेल. ऐशास, तूर्त तुह्मी श्रीक्षेत्रास असणें. इकडे यावयाची तातड सहसा

११ २५ जानेवारी १७५५ सनागोरचा वेढा चालला होता.

न करणें. पेस्तर तिकडील बंदोबस्त होणें तो मनोदयानरूप होईल. चिंता करणेंविशीं नको. जाणिजे. छ ७ माहे रविलाखर. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

मोर्तब सुद

श्री

पे॥ छ १६ रविलाखर. मु॥. विजफपुर ?

---

[ ४६ ] ॥ श्री ॥ ५ फेब्रुवारी १७५५.

राजमान्य राजश्री बाबूराव महादेव दि॥ गोपाळराव गणेश गोसावी यांसिः—

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार सु॥ खमसखमसैन मया व अलफ. वे॥ राजश्री नारायणभट सात्विक व गंगारामभट सफरे व गुंडभट यांणीं विदित केलें कीं आपण त्रिवर्गांहीं गणेशदास प्रयागदास याचे दुकानची हुंडी नव हजाराची श्रीक्षेत्रींहून महू कूपा येथील केली होती. त्यास, सावकाराचे दिवाळे निघालें. याजमुळें आपले रुपये फसले. त्यास, सावकाराचा कांहीं देवघेव अजमगडचे राजाकडे वगैरे जागाजागा आहे व हालीं दुकान श्रीक्षेत्रीं आहे. त्यास, तें अवघें जप्त करून आमचे रुपये वसुलात येतें करावें ह्मणून. त्याजवरून तुह्मांस लिहिलें असे. तरी तुह्मीं सुजाअतदौले याजपासून अजमगडचे राजास वगैरे जागा जागा देवघेव असेल तेथें व हवेली दुकानें असतील त्याजवरी जोरा पोहचावून यांचे रुपये वसुलात येत तें करणें. वे॥ मूर्तीचें अवश्यक जाणून यांचे रुपयांची पैरवी वसुलाची काढोन देणें. जाणिजे छ २२ रा॥खर. आज्ञाप्रमाण.

लेखन सीमा

---

[ ४७ ] ॥ श्री ॥ ९ फेब्रुवारी १७५५.

राजमान्य राजश्री बाबूराव महादेव दि॥ गोपाळराव गणेश गोसावी यांसः—

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार सुहुरसन खमसखमसैन मया व अलफ. तुह्मी पत्र पाठविलें प्रविष्ट जाहालें. लिहिलें वृत्त अवगत जाहालें. याज उपरि जालें वर्तमान वरचेवरी लिहीत जाणें. असेंच सर्वदा कच्चें वर्तमान लिहीत जाणें. यानंतर येथून गिरमाजी व्यंकटेश व माधवराव पाठविले आहेत. हे पोहोंचल्यावरी तेथें रंग कसा पडतो, काय मजकूर होतो, तो सविस्तर लिहिणें. जर तेथें जीव असला तरी काशीचा कमाविस गोपाळराव गणेश याचे तर्फेनें करणें. नाहीं तरी गिरमाजी व्यंकटेशाबरोबर तुह्मी येणें. खर्च सात हजार पडला वगैरे तपशील ओढगस्तीचा विस्तार लिहिला तरी ओढ तूर्त तशीच सोसणें. काम जाहल्यावरी सारेंच सोईस पडेल. जर काम न जाहालें तरी तुह्मी हुजूर येणें. मग वाजवी खर्च असेल तो दिल्हा जाईल. व तुह्मी गिरमाजी व्यंकटेश, माधवराव यास ताकीद करोन कामें सरकाराचीं होत तें करणें. मागाहून गोपाळरावहि येणार. आठपंधरा दिवसा हुजूर पोहोंचतील. जाणिजे. छ २७ राखर.

लेखन सीमा

---

[ ४८ ] ॥ श्रीराम ॥ ४ मार्च १७५५.

अल्लाहू

रावसाहेब मुष्फिक् मेहरबान् मादने खूबीहाय बेकरान् सलामत्. बादेश् इब्राजे मदारिजे इश्तिआक् व आर्जूए दर्याफ्ते मुलाकाते फिरावां

---

अल्लाहू

रावसाहेब प्रिय मेहेरबान अमर्याद गुणाची खाण सलामत् आशीर्वाद. आपल्या सुखदायक दर्शनाची व भेटीची इच्छा फार आहे असें दर्शवून विनंति केली जाते कीं श्रीमंत दादासाहेबांनीं सरकारांतून चारशें रुपये दरसाल

मुसरात के अहमुल् मतालिबस्स मक्षूफ राये इत्तेहाद यक्तिजाय नमूदा मी आयद:—के दर ई ऐयाम खुदावंदे नियामत् दादासाहेब व किब्ला मद्दजिल्लहू अज सरकारे फैजासारे खुद् चहार सद रुपिया सालाना बनामे बरखुरदार लाला धीरधर बतकरूर फरमूदा परवाने तनखाहे मुब्लिघ मरकुम ध्या जां जुमला दुसद रुपिया दरमाहे हाल व दुसद रुपिया दरमाहे आसाढ बनामे रावसाहेब मेहेरबान कलां मिनूजुमूले एवजे असाव्विर वगैरा मरहेमत् फरमूद. बिनाबरां आदमे अजूरदारां पेष आं मुष्फिक् मय परवानय तनखा बजिनुस् इब्लाघ याफ्त: चूं शादीये कारेखैरे आजिजा दरपेषस्त व ई नियाजमंद अज पुश्तयानी खानजादे कदीम ज़नाब फैज माआब पेशवासाहेब व किब्ला मद्दजिल्लहू अस्त; अगर तवज्जुह नमूदा हुंडवी चाहार सद रुपिया लुत्फ फरमायंद एहेतिमाल बर तवज्जुह सामी खाहद बूद. व बराय हरकार व खिदमती के काबिले एहकर बाशद बेतकल्लुफ इमा मीफर्मूदा बाशंद की दर सरंजाम आं सादत मी दानद; व अगर बफ़ौर यक नफर कासीद बर जिम्मय खुद् क़बूल नुमायंद व मीदाद बाशंद ता दर इरसाले अखबाराते लवाजिमे बंदगी व इखलास वजारत.

---

चिरंजीव लाला धीरधरच्या नांवे मुकरर केले आहेत व त्याचा परवानाहि येणेंप्रमाणें लिहून दिला आहे कीं त्यांपैकीं ह्या महिन्यांत दोनशें व आषाढमहिन्यांत दोनशें रुपये बड्या रावसाहेबांच्या नांवें असाव्वराच्या ऐवजांतून देण्याचा हुकुम फर्माविला आहे. ह्मणून तनख्याचा असल परवाना देऊन अजुरदार इसम आपणाकडे पाठविला आहे. कारण कीं सेवकाच्या मुलीचें लग्न करावयाचें आहे. सेवक श्रीमंत पेशवेसाहेबांचा खानेजाद गुलाम आहे. ह्मणून कृपा करून चारशें रुपयांची हुंडी पाठविली तर सेवकावर बहुत मेहेरबानी होईल. सेवकाकडून चाहेल ती सेवाचाकरी करून घेण्यास स्वामी समर्थ आहेत. सेवकाचे हातून सेवा घडल्यास मोठा भाग्योदय झाला असें समजेन. आपण एखादा भरवशाचा काशीद पाठविल्यास इकडील खरी बातमी पक्का शोध लावून पाठवून देईन.

बिलफेल रूवे दादे दरबारेवाला वगैरा बिदीं. मिनवालस्त के बंदगाने हजरत कदर कुदरत दर किले मुबारिक नुजूले इजलाल मीदारंद व नवाब वजीरुल्मुल्क बहादुर गाबेगा बराय मुजरा बजनाबेवाला मीरवंद. राजे अंताजी पंडत फिरिस्तादे दादासाहेब व किब्ले मद्दजिल्लहुल आली दर हुजूरे पुरनूर आमदे दर हवेलिये नवाब इसहाकुखां मरहूम इकामत वरजीदा व किशनराव बलाल[१] हमूराह् हस्तंद. मुजिबे अम्रे दादासाहेब खुदायगान व नवाबसाहेब तकरुर मीनुमायंद के कूच करदा पेष दादासाहेब तश्रीफ बरंद. चुनाचे नव्वाबे मुअज्ज इले नीज् तय्यारीये कूच मीकुनंद. लाकिन् मरजी नीस्त के बेरूबरायंद. व दादासाहेब व किब्ला खुदायगान नौबते हाल बर दर्याये गंग घाटे कमरुद्दिननगर दायरा दारंद जाहिरा मुआमलते साअदुल्लाखान व दुंदेखान व हफीजरहितखान बर पांचदः लक् रुपिया इनूफिसाल् याफ्त. व राव मल्हारजी होळकर बाद अज इनूफिसाले मुकद्दमे मोआमलते बहालखां रोहिला जमीदारे कुंजपुरा के करीब पज् लक रुपिया फैसल गण्ता अज आंजा मुराजयत करदा बतारीखे बिस्तुंम् शेहेरे जमादिउल्अव्वल् सन् चहार दर परगने सरधना रसीद इरादे रफतने पेषे दादासाहेब व किब्ला मद्दजिल्लहू दारद. व नव्वाब अहूमदखान बंगष व राय दिलवरसिंग हमूराहे राव मुअ-

---

पातशाही दरबारची हालहवाल येणेप्रमाणें आहे. पातशाहा किल्यांत आहेत. कधीं कधीं नवाब वजीरुलमुल्क बहादूर पातशाहाला मुजरा करण्याकरितां जातात. दादासाहेबांकडून असलेले अंताजी पंडित मरहूम इसाकखांच्या हवेलींत उतरले आहेत. त्यांच्या बराबर कृष्णराव बल्लाळहि आहेत. श्रीमंतांच्या हुकुमाप्रमाणें नवाबसाहेबांना दादासाहेबांकडे जाण्यास विनंति केली आहे. तेहि तयारी करण्याच्या खटपटींत आहेत. परंतु त्यांनीं जावें अशी मर्जी नाहीं. श्रीमंत दादासाहेबांनीं कमरुद्दिननगराच्या शेजारीं गंगे-

---

१०० फसली ११६४. दिल्लीच्या दरबारांत अकबरानें सुरू केलेला फसली सन चाले.
२० जमादिलावल सन चार ह्मणजे ८ मार्च १७५५.
[१] काळे.

जिल्लेह् अन्द्. इमूरोज फर्दा ख़बरे शामिल् बूदने लष्कर मीरसद्. व जनार्जन पंडित दर ई कूचबंदी मकासेदाराने सहारणपूर व जालापूर वगैरा बमय फौजे बरखास्तह व हुजूरे दादासाहेबो किब्ला रसीदा मुलाअजमत् कुनद्. नजीबखां रोहिला बर किनारे दर्याई गंग दरमीयाने मीरापूर व घाट दारानगर बर शकर्ताल यकामत् दारद. व राव मल्हारजीराव औलादे खुद मी गोईद. व सररिश्तय रुसूखो इखलासे खुद मुस्तहेकम् दारंद. व मुआमलते खुदरा जाहेरा बतरीखे इख्फा फैसल नमूदा; लेकिन मिजाजे वहाजे दादासाहेबो किब्ला बर कश्मकशे खाने मरकूम् बूद. अलहाल बाद् अज् मुलाकाते राव मल्हारजी व ई दर्जे मुष्रत् शवद्. व हकीकते जिले लाहोर बिर्दी मिनूबालास्त:—मुष्वके जहानखां व तैमुर सुलेतान पिसरे अहमदखाने अबदाली

---

च्या घाटावर डेरे दिले आहेत. साअदुल्लाखान, दुंदखान व हफीजरहिमतखान ह्यांचा मामला पंधरा लाख रुपयाला फैसल झाला आहे. कुंजपुऱ्याचा जमीदार बहालखा रोहिला याचा पांच लाख रुपयाचा मामला फैसल

---

१०१ भाऊसाहेबांची बखर पृष्ठ ३९ पहा. मल्हारराव व नजीबखान यांचें बापलेकांचें नातें त्यावेळीं हिंदुस्थानांत सर्वांच्या तोंडीं होतें. तसेंच दादासाहेबांच्या तावडींतून नजीबखानाला मल्हाररावानें राखिलें हेंहि खरेंच आहे असें दिसतें.

१०२. १७४८ त अहमदशहा अबदालीची पहिली स्वारी झाली. १७४८ च्या जानेवारी, फेब्रुवारी व मार्च ह्या महिन्यांत तो हिंदुस्थानांत होता. १७४८ च्या मार्च महिन्यांत सरहिंदास त्याचा पराभव झाला. अबदालीची दुसरी स्वारी १७५१ त झाली. ह्या सालीं, जानेवारी, फेब्रुवारी, मार्च व एप्रिल ह्या महिन्यांत अबदाली हिंदुस्थानांत होता. ह्या मोहिमेंत त्याला लाहोर आणि मुलतान हे दोन प्रांत मिळाले. हे प्रांत जहानखान व आपला मुलगा तैमूर सुलतान ह्यांच्या स्वाधीन करून अबदाली स्वदेशास निघून गेला. पुढें १७५६ त गाजुद्दिनानें हे प्रांत तैमुरशहापासून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हां अबदाली १७५६ च्या डिसेंबरांत खैबर घाटांतून पंजाबांत उतरला व त्यानें दिल्ली वगैरे शहरें लुटून १७५७ च्या एप्रिलांत स्वदेशीं प्रयाण केलें. ही अबदालीची तिसरी स्वारी होय. नंतर अबदाली १७५९ च्या नोव्हेंबरांत चवथ्यांदा हिंदुस्थानांत आला, सबंद १७६० साल हिंदुस्थानांत राहिला व १७६१ च्या जानेवारींत पानिपत येथील लढाई खेळून लवकरच स्वदेशीं गेला. ह्या चारी स्वाऱ्यांत अबदाली नोव्हेंबरांत पंजाबांत येई. ह्मणजे सप्टें-

दर बलदय मरकूम् बकामत् दारंद. व बलदय मजकूर दर महासरे मिखानस्त. व अतराफे आं सूबा अज् ताख्तो ताराज आं जमाअत् वैराने मुतलक शूदा; व अब्दुस समदखां फौजदारे चकले सरहिंद के अज तर्फ शाहे अबदालीस्त अज जानिबे सुनाम तालुके अलौसिंघ जाट जमीदारे लखीजंगल बाद अज इन् फिसाले मुकदमे ऊ अज इश्तिहारे आमदे आमदे अफवाजे राव मल्हारजी मुआवदत् कर्दा बतारीख दों जमादिउल्अव्वल् सन चार दाखिले चकले मजकूर शूद. तय्यारीए किला व मूरचालबंदी दर शेहेर कर्द बूद; व मुलाहजे तमाम अज फौजे दखन मीदाश्त. लाकिन् अज बरगश्ते आमदने राव मोअजइलेह बखाने मरकूम इत्मीनाने खातीर गश्त. व शाहे अबदाली अज पेश्तर अज कंदाहर कूच कर्दा बजानिबे विलायते इरान् रफ्त: खबरे बाजगश्त न रसीद: चिरांके बसबबे बारीदने बर्फ कमतर खबर मीरसद.

---

झाल्यावर राव मल्हारजी होळकर सन चारच्या जमादिलावलाच्या वीसाव्या तारखेस सरधनाच्या परगण्यास जाणार व श्रीमंत दादासाहेबांना भेटणार. नवाब अहमदखान बंगष व राय दिलवरसिंग त्याच्या बरोबर येणार आहेत व लष्करांत आज उद्यां येऊन सामील होतील ह्मणून बातमी आहे.

---

चर-अक्टोबरांत अफगाणिस्थानांतून निघे. सबद हिवाळा ह्मणजे नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी, मार्च व एप्रिल, इतके महिने हिंदुस्थानांत काढी व मे-जूनच्या सुमारास हिंदुस्थानांत उन्हाळा होऊं लागला ह्मणजे स्वदेशास परत जाई. हिवाळ्यांत डिसेंबर जानेवारींत अफगाणिस्थानांत बर्फ पडून रस्ते बंद होतात व उन्हाळ्यांत मे-जूनांत बर्फ वितळून जाऊन रस्ते खुले होतात. तेव्हां हिंदुस्थानांत यावयाचें झालें ह्मणजे हिवाळा सुरूं व्हावयाच्या अगोदर अबदालीस अफगानिस्थानांतून निघावें लागे व अफगानिस्थानांत बर्फ वितळून रस्ते खुले झाले व हिंदुस्थानांत उन्हाळ्याचा कडाका सुरूं झाला ह्मणजे त्याला परत जावें लागे. मराठे पावसाळा झाला ह्मणजे दसऱ्यास सप्टेंबरांत डेरे दाखल होत व जूनमध्यें आगोठाच्या सुमारास देशीं परत येत. अबदालीहि सप्टेंबरांत निघून मे-जूनांत परत जाई. येणेंप्रमाणें हिंदुस्थानांत स्वारी करण्याचा मोसम दोघांचाहि एकाच वेळीं येई. अबदालीची तिसरी व चवथी स्वारी हिंदुस्थानांत कधीं झाली ह्या संबधीं, ग्रांटडफ्, कीन, भानू इत्यादींनीं निरनिराळे सन व तारखा दिल्या आहेत. त्यांचा खरेखोटेपणा पुढील एका टीपेंत सविस्तर दाखविला आहे.

१०३ मध्यांच्या पत्याळच्या महाराजांचे पूर्वज.

बतारीख बिस्तुम् शेहरे जमादिउल्अव्वल् सन चार मोहमद नकीखान् नाम एलची फिरिस्तादे शाहे अबदाली दर हुजूरे मुरसिले मुलाजमते नवाब-वजीर हुसूल साख्ता व नाम बराय हरजत नीस आवरदा; अज अक्ब् मुला-जमत् बहुजूरेवाला खाहद शूद. जवाबो सवाले एलची बशर्ते रर्सादने नवेदे आं मेहेरबान व ईमाय दरखास्त अखमारात् व दादन अजूरे कार्मांद इलेह व कलम खाहद आमद.

व एहवाले राजपूताना बिदीं नमत् अस्त, के राजे बिजेसिंग अज राहे बदकौलीये थानेजाते शहामत मर्तबद आपाजी शिंदियारा अज् मीरता वगैरा तालुके खुद बरदाश्ता हाला बूदंद. चूनांचे बसूने हजरत अजमीर पेष नायबे मकासदारे आं जा जमा षूद: बेरूं बरामदा दहाते जोधपुरो मीरता-रा बखाक बराबर साख्त: मीसाजंद. व राजे माधोसिंग दर जपूर वतने खुद यकामत दारद. व मुबलेधे मुदाविके नविश्तो खान् दर खिदमत दादासाहेबा किल्ला इरसाल मीदारंद. व सूरजमल जाट दर किले भरतपूर यकामत दारंद व दरींविला से लक् रूपिया मसहूबे रूपराम कटारा मोतर्मांद खुद बहु

---

सहारणपूर व जालापूर इत्यादि ठिकाणच्या मोकासदारांना घेऊन बर-खास्त फौजेसुद्धां जनार्दन पंडित श्रीमंत दादासाहेबाचे हुजूर पोहांचून सवेस दाखल होतील. नजीबखान रोहिला गंगाकिनाऱ्यानें शुकर्तालावरती मीरा-पूर व दारानगरच्या घाटांच्यामध्यें उतरला आहे. राव मल्हारजीला आपले बाप ह्मणून ह्मणतात व स्नेहाचा राबता दृढ करीत आहेत. त्यांनीं आपला मामला अंतस्थ रीतीनें बहुतेक फैसल करून घेतल्यासारखाच आहे. परंतु श्रीमंत दादासाहेबाचें लक्ष खानमजकुराच्या दुटप्पी वर्तनाकडे गेलें आहे. राव मल्हारजीची मुलाखत झाल्यावर सुवेळीं ह्यासंबंधीं खलबत होणार आहे.

लाहोरकडील बातमी येणेंप्रमाणें आहे. जहानखां व अहमदखां अब-दालीचा पुत्र तैमूर सुलतान लाहोरास आहेत. शिखांनीं शहराभोंवतीं वेढा दिला आहे. त्यांनीं भोंवतालील प्रदेश लुटून फस्त केला आहे. अबदालीनें नेमलेला सरहिंद चकल्याचा फौजदार अबदुस समदखां राव मल्हारजीच्या

जूरे दादासाहेबो किल्ला मद्दजिल्हू मिन्जुमूले मुआमलते खुद इरसाल दाश्तंद.

हकीकते दकन इन अस्त की नवाब बसालतजंग बहादूर नाजिबे सूबे दकनू दर बलदय सूबे खुजिण्त बुनियाद औरंगाबाद यकामद दारंद. व पंडतें पर्धान साहेबो किल्ले मद्दजिल्हू नजदीके तुगा दायरे फौजे फिरोजी मीदारंद. फआमा फीमाबेन नवाब मीर निजामल्लीखान् व मीर्झा मोगल बरादराने नवाब सलाबतजंग व साहेबजादे बुलंद इकबाल रावसाहेब बिस्वासराव मद्दजिल्हू नजदीके शहागड जंगोजदल बरूये कारस्त. व दत्ताजी सिंदिया हमूराहे रावसाहेब सरगर्म शुदा अंद, बाकिस्मेके खबर अज आं जा मीरसद तहरीर खाहद दर आमद. ज्यादा अय्यामे जमीयत् दायमा बाद.

---

फौजा येतात असें ऐकून लखीजंगलचा जमीदार जो अलासिंघ जाट ह्याच्या मुलखांतील सुनाम तालुक्यांतून निघून व तिकडील मुकदम्याचा बंदोबस्त करून सन चार जमादिलावलाच्या दुसऱ्या तारखेस चकले मजकूराला येऊन पोहोंचले व शहरची मोर्चेबंदी करून बसले. दक्षणच्या फौजेचें भय फार वाटत होतें. राव मल्हारजी परत जातात हें ऐकून समाधान झालें. शहाअबदाली कंदाहराहून विलायतेस इराणाकडे अगोदरच निघून गेला होता. तो आल्याची वार्ता आली नाहीं. कांहीं बर्फ पडत असल्यामुळें खबर कचित्‌च येते.

सन चारच्या जमादिलावलाच्या विसाव्या तारखेस अबदालीशहानें पाठविलेला महमद नकीखान नांवाचा पातशाहाकडे एलची आलेला. त्याची व नवाबवजीराची भेट झाली. त्यांनीं पातशहास देण्यास पत्रांची थैली आणिली आहे. पातशहाची मुलाखत लवकरच होणार आहे. तेथे झालेल्या व होणाऱ्या सालजाबाची इत्थंभूत बातमी आपल्याकडून पत्र आल्यावर व

---

१०४ हा उल्लेख सावनूरच्या लढाईचा आहे. त्यावेळीं नानासाहेब तुंगभद्रेच्या तीरीं सावनुराजवळ होते. विश्वासराव गोदातीरीं शहागडाजवळ होते. दत्ताजी शिंदे विश्वासरावाच्या बरोबर होते. सावनूरची मोहीम संपल्यावर दत्ताजी जयाप्पाला नागोरास मिळाला असावा.

मुकर्रर आं के ब्रह्ममूर्त हरकिशन जुन्नारदार अज पुरोहिताने नियाज- मंद अस्त. बराय वजे कारेखैर दारद जाहिरा बमूजिब तमस्सुकात बर् जि- म्मय अक् सरी अज साकिनाने मैनपुरी वाजिबुल आदा दारद. तव्वको अज तवज्जुहाके सामीस्त के बमूजिब इजहारे मुषारुनू इलेहे नविश्तेह खुदरा बनामे मकासेदारे आं जा परचे नविश्ता बिदेहंद के नक्दो सजावली कर्दा जरु कर्जे ऊरा वुसूल कुनानीदा बिदेहंद के अज धर्मे आं साहेब अज शार्दीये कारेखेरे सीबिये खुद् फराघत् हुसूल साख्त: शबरोज आशीर्वाद मीदाद बाशद; दर ई सूरत इमुतिनानू बर एहकर खादबूद. ज्यादा अज बंदे जादा बरखुर्दारे इकुबालमंद लालाधीरधर सलाम षोख मुष्तजाब बाद.

---

आपणाला माहिती हवी असल्यास व काशिदाला मजुरा दिल्यावर पाठवि- ण्याची तजवीज करीन.

रजपुतान्याकडील बातमी येणेंप्रमाणें आहे. राजे बिजेसिंग यांनीं मिरता वगैरे आपल्या तालुक्यांतून बदमामली करून श्रीमंत आपाजी शिंद्यांचीं ठाणीं काढून लाविलीं होतीं. ह्मणून त्यांनीं हजरत अजमेरच्या सुभ्यांत नायब म- कासेदारांच्या समोर जमून, बाहेर येऊन, जोधपूर व मिरता ह्या तालुक्यांतील गांव जमीनदोस्त करून टाकले व टाकणार. राजे माधोसिंग आपल्या वत- नाच्या ठिकाणीं जयपुरांत आहेत. तहाप्रमाणें "दादासाहेबाकडे पैसे पाठ- वून देतात. सुरजमल जाट भरतपूरच्या किल्यांत आहेत. त्यांनीं सध्यां आपला मुखत्यार रूपराम कटारा ह्याच्या हस्तें करारापैकीं तीन लाख रुपये पाठवून दिले आहेत.

दक्षिणेकडील हकीकत येणेंप्रमाणें:—दक्षणचा नाजिमसुभा नवाब सला- बतजंग बहादूर सुपीक औरंगाबादेंत आहेत. श्रीमंत पंडित प्रधान यांनीं तुंगेच्या कांठीं फौजेचा तळ दिला आहे. परंतु, नवाब सलाबतजंगाचे बंधू नवाब मीर निजामअलीखां व मीरझामोंगल ह्यांची व श्रीमंत विश्वासराव साहेब ह्यांची शहागडाजवळ लढाई चालली आहे. दत्ताजी शिंदे रावसाहेबाबरोबर आहेत खबर येईल ती लिहून पाठवूं हे विज्ञापना—

व मुनशीए सरकार रामराम बीरसद. मजमूने खतरा बसमय रावसाहेब रसानीदा जवाबे बासबाब बकलमारंद व अज नामे खुद मुतला सं.जेद.

---

१०५ हें बातमीचें पत्र दिल्लींतील कोणी मुनशानें पेशव्यांच्या कोण्या सरदाराला पाठविलें आहे. पत्रांत मुनशाचेंहि नांव नाहीं व सरदाराचेंहि नांव नाहीं. तथापि हें पत्र पूर्वेकडील कोण्या सरदाराला पाठविलें आहे, इतकें आंतील मजकुरावरून स्पष्ट आहे. ह्या सरदाराचें ठाणें दिल्लीपासून जवळच कोठें तरी असलें पाहिजे; कारण, पत्र लिहिणारा मुनशी आपल्या मुलाला ह्या सरदाराकडे पाठविणार होता. शिवाय ह्या पत्रांत, रघुनाथरावदादा, मल्हारराव होळकर, जयाजी व दत्ताजी शिंदे, कृष्णराव बल्लाळ, जनार्दनपंत फडणास, अंताजीमाणकेश्वर, नानासाहेब पेशवे, विश्वासराव, माधोसिंग, बिजेसिंग, सुरजमल्ल जाट, रूपरामकटारा, लखीजंगलचा अलासिंघ, गाजुद्दिन, नजीबखां रोहिला, सदल्लाखान, दुंदेखान, हफीज रहिमतखां, अहमदखां बंगष, समतखां, जहानखां, तैमूरशहा व अहमदशहा अबदाली, सलाबतजंग, निजामअल्ली व मीरमोंगल, इतक्या व्यक्तींचा ह्मणजे त्यावेळीं हिंदुस्थानांत प्रसिद्ध असलेल्या बहुतेक व्यक्तींचा उल्लेख केला आहे. फक्त दिल्लीच्या पूर्वेकडील ह्मणजे बुंदेलखंड व अंतर्वेद ह्या प्रांताकडील व्यक्तींचा मात्र बिलकुल उल्लेख नाहीं. ह्यावरून ज्याला पत्र लिहिलें त्याला ह्या दोन प्रांतांतील माहिती चांगली असून पश्चिमोत्तर हिंदुस्थानांतील व दक्षिणेकडील माहितीची मात्र अपेक्षा होती असें दिसतें. शिवाय हा सरदार दादासाहेबांहून दर्जानें कमी होता असेंहि अनुमान आंतील मजकुरावरून होतें. मुनशानें ह्या सरदाराला " रावसाहेब " ह्मणून पहिल्या मायन्यांत म्हटलें आहे; परंतु, " किब्ला मद्दजिल्लहू " हीं विशेषणें त्याच्या नांवापुढें जोडलीं नाहींत. रघुनाथरावदादा, नानासाहेब पेशवे व विश्वासरावसाहेब ह्यांच्या नांवांपुढें " किब्ला मद्दजिल्लहू " हें विशेषण लावावयास मुनशी ह्या पत्रांत कोठेंहि विसरला नाहीं. त्यानें रघुनाथरावाला खुदावंद म्हणून ह्या सरदाराला रावसाहेब ह्मटलें आहे. शेवटीं आशीर्वादहि दिला आहे. तेव्हां हा सरदार मराठा किंवा ब्राह्मण असावा. दिल्लीच्या पलीकडील अंतर्वेदींतील उत्पन्न ह्या सरदाराकडे असावें, ह्यावरून हा सरदार गोविंदपंत बुंदेले असावा असा तर्क होतो; ह्या पत्राचें शब्दशः भाषांतर दिलेलें नाहीं; सारांश दिला आहे. शेवटल्या प्यान्याचा सारांश मुळींच दिला नाहीं. हा सारांश पुणें येथील महाराष्ट्र कालेजांतील फारशी भाषेच्या अध्यापकांच्या साहाय्यानें काढिला आहे.

[४९] ॥ श्री ॥ १२ जून १७५५.

राजश्री गोपाळराव गणेश गोसावी यांसिः—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री जयाजी शिंदे दंडवत विनंति येथील कुशल तागाईत छ १ माहे रमजान जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत गेले पाहिजे. विशेष. पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. तेथें मजकूर कितेक तपशिलें खासगत स्वाराच्या सिबंदीविशीचा मजकूर फारच लिहिला जे श्रीमंत साहेबास हिशेबाविशी पत्र पाठविलें ह्मणजे आपला गळा उगवतो ह्मणोन लिहिलें. त्याजवरून श्रीमंतास विनंतिपत्र पाठविलें असे. हें त्यास प्रविष्ट करून आपलें काम हिशेबाकितेबाचे असेल त्याप्रमाणें अर्ज हुजूर करून करून घेणें. रा॥ छ मजकूर. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

शिक्का मोर्तब सुद

[५०] ॥ श्री ॥

राजश्री मल्हारजी होळकर गोसावी यांसिः—

छ सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री स्ने॥ रघुनाथ बाजीराव आशीर्वाद. उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत असिलें पाहिजे. विशेष. राजश्री गोपाळराव गणेश याची सोय यंदा सरकारांतून कांहीं जाहली नाहीं. यास्तव याचे बंधू राजश्री कृष्णराव गणेश पागा घेऊन आपलेकडे आले आहेत. तरी यास चाकरीस ठेवून पागेच्या

१०६ ह्या पत्राचें साल कोणतें त्याचा अंदाज होत नाहीं. गोपाळराव गणेशाच्या मोहिमांचा सालवार व तारीखवार इतिहास मिळाल्यावांचून हा अंदाज होणार नाहीं.

खर्चाप्र॥ बोली करून त्याजपासून चाकरी घेऊन याचे उर्जित होय तें सर्व केलें पाहिजे. रा॥ छ २१ रजब. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

लेखन सीमा                    सांब

---

[ ५१ ]

॥ श्री ॥        १४ फेब्रुवारी १७५७.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसीः—

पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. कुंजबिहारी बैरागी, मनसुकदास-बावा महापुरुष यांचे नातू, वास्तव्य कसबे कडा, यांनीं हुजूर कपिलसंगम श्रीकृष्णातीर येथील मुक्कामीं येऊन विनंति केली कीं अहंमदशहा पातशहा यांणीं आपणास मौजे शिराथू देखील मजरे खाजगीपूर, ता. हवेली कडा, सरकार मजकूर, सुभे प्रयाग, हा गांव दरोबस्त सदाव्रताचे बेगमीस दिला: त्याचे परवाने मनसूरअलीखान वजीर व खानखाना कमरुद्दीखान यांचे आहेत. यास मौजे मजकूरचा अंमल आपणाकडे मोगलाई अंमलांत चालत आला. सरकारांत अंमल झाल्यापासून चालत नाहीं. यास्तव स्वामींनीं कृपाळू होऊन पेशजीचे परवाने आपले जवळ आहेत ते मनास आणून सदहू गांव दरोबस्त आपणाकडे सदाव्रताचे खर्चाबद्दल करार करून द्यावा म्हणून. त्याजवरून पेशजींचे परवाने मनास आणून कुंजबिहारी बैरागी हे मनसुख-

---

१०७ जिंकलेल्या प्रदेशांतील लोकांचीं इनामें, सदावर्तें, इत्यादि पेशवे जशींच्यातशींच राखीत असत हें ह्या पत्रावरून कळून येईल. असलीं बरींच पत्रें आमचे जवळ आहेत, पैकीं मासल्याकरितां हें एक दिलें आहे.

१०८ रायचूरच्या उत्तरेस आठ कोसांवर कृष्णा व भीमा यांचा संगम.

दास महापुरुष यांचे वंशीचे. हेहि श्रीगंगातीरीं वास्तव्य करून भगवद्भक्तिपूर्वक सदाव्रत चालवितात. थोर आहेत. यांचे चालविल्यास श्रेयस्कर आहे. हें जाणून याजवर कृपाळू होऊन मौजे शिराथू, देखील मजरे खाजगीपूर, हा गांव दरोबस्त वैरागी यांस सदाव्रताचे बेगमीनिमित्त करार करून दिल्हा असे. तरी, पेशजी गांव चालत आल्याचा दाखला मनास आणून चालत आल्याप्रमाणें यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें मौजे मजकुर सदाव्रताचे बेगमीबद्दल चालवणें. प्रतिवर्षीं नूतन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रत लिहून घेऊन असल पत्र भोगवटियास याजवळ परतोन देणें. पैका घेतला असला तरी फिरोन देणें. जाणिजे. छ २४ जमादिलावल, सुरुसन सबा खमसैन मय्या व अल्लफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ ५२ ] ॥ श्री ॥ १६ फेब्रुवारी १७५७.

अपत्यें रघुनाथानें सा॥ नमस्कार. विज्ञापना. येथील क्षेम ता॥ छ २६ जमादिलोवल पावेतों यथास्थित असो. विशेष. आजी छ २४ रोजीं इंदुरास आलों. रा. मल्हारजी होळकर याची भेटी जाली. पुढें दरमजल दिल्लीस जात असो. अबदाली दिल्लीस आला, यास्तव चहूंकडून राजे व जमीदार व रांगडे लोकांच्या नजरा फिरल्या. सांप्रत भलता एखादा मनसुबा करून मुलूक अथवा रुपये मिळावयाची सोय दिसत नाहीं. जेव्हां अबदालीचें पारपत्य होईल तेव्हांच वरकड दबतील व हरएक मनुष्यास सोई पडेल. अबदालीचें पारपत्य करावें तरी फौज अद्यापि जमा जाहली नाहीं. देखील

१०९ सुद्धां.

११० हें पत्र रघुनाथरावानें १७५७ च्या मोहीमेंत हिंदुस्थानांत जातांना लिहिलें. १७५७ च्या प्रारंभीं नानासाहेब श्रीरंगपट्टणास होते.

विठ्ठलपंत आमची चार व मल्हारबा दोन, एकूण सहा हजार आहे. याखेरीज समशेरबहादर व अंताजीमाणकेश्वर व नारोशंकर पथकें मिळोन पंधरा सतरा हजार फौज...................नव्या दमाची फौज ह्मणावयास सा......................आहे. आमची व मल्हारबाची फौज ................. गुदरताची फौज चहूं .................आह्मा-जवळ जमा जाहली नाहीं. अंताजी ............च आहे. झुंजतच आहे. फौज न आलिया .......... न जातां येत नाहीं. रुपये पावावयास लोकांस दिवस लागले. याजमुळें लोक मागें राहिले. व अगोदर पैका पावला तेहि खानदानचे लोक आले नाहींत. असो. आतां या गोटीचा काय विचार ? महिन्यादीडमहिन्यांत पोहोंचतील. इतक्यांत गांठहि पडेल. जर दिलीस राहिला अथवा अलीकडे आला तरी गांठ पडेल. जर निघोन विलायतीकडे चालला तरी दोन तीन महिने लढाई होणार नाहीं. सांप्रत खबर आली कीं पहिल्या पातशाहा अलमगीर सानीसें[१] पातशाही व खानखान्यास वजिरी दिली व आपले नांवचा शाहनशाहचा कुतबा पढविला. याजवरून पहावें कीं काय विचार करितो. तमाम राजे व सुज्यातदौला वगैरे सर्वांची राजकारणें त्याजपाशीं आहेत. परंतु अद्यापि कोणी भेटले नाहीं. जाट तर झुंजू लागला. सांप्रत मनसुबा भारी आहे. फौजहि त्याची भारी आहे व कजाख शिपाई आहे. त्याचे पारपत्यास फार भारी सामान असावें. यास्तव जर दत्तबाची रवानगी इकडे लवकर जाहाली तरी जमाव लवकर पडेल. अमपाबाजेचे ... ... ... हें काम मोठें व जरूर आहे. जरी अमदाबादेकडे ... ... कडे प्रसंगानुरूप बलावूं व येतीलहि.........ची रवानगी लवकर करावी. .........

पै॥ छ १८ रज्जब, सन सबा.

मु॥ श्रीरंगपट्टण.

---

१ १ समानी वंशांतील.

[५३] ॥ श्री ॥ १६ फेब्रुवारी १७५७.

विनंति सेवक सखाराम भगवंत कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. इकडील वर्तमान सविस्तर श्रीमंतांनीं लिहिलें आहे, विदित होईल. सारांश, अबदालीची फौज भारी. तमाम रजवाडे तिकडे जाणार. बिजेसिंग, माधोसिंग यांचे वकील नेहमींच त्याजपाशीं आहेत. मुख्य दक्षिणेचा बंदोबस्त करावा हें सर्वांचे मानस आहे. आपली फौज व मल्हारबाची झाडून जमा व्हावयास फाल्गुन अखेर लागेल. तुर्त जयनगरचे रोखें जात आहों. वाटेनें राणाजी कोठेवाला याजकडे बाकीचा सालजाब होईल तो करावा तों फौजाहि येतील. भारी होऊन जावें तों तो कोणे रोखें होतो हें पाहून सडे होऊन गांठ घालावी हा विचार आहे. गोष्ट तुर्त सर्व प्रकारें भारीच आहे. आपली फौज बेदिल, हें आपणांस विदितच आहे. तथापि स्वामींचें पुण्य थोर आहे. विना याचें पारपत्य जाल्याखेरीज सोडावेंसें नाहीं. पुढें जसें वर्तमान होईल तसें विदित होईल. त्याप्रमाणें तर्तुद करावी लागेल..... श्रुत होय. हे विज्ञापना.

पै॥ छ १८ रज्जब, सन सबा.
मु॥ श्रीरंगपट्टण.

---

[५४] श्रीशंकर. २६ फेब्रवारी १७५७.

तीर्थस्वरूप[113] राजश्री भाऊसाहेबाचे सेवेसीः—

विनंति उपरि. सविस्तर मजकुराचीं पत्रें तीर्थरूपाचें नावें पाठवीत असतां त्याजवरून कळलच. सारांश, अबदाली दिलीस दाखल जाहाला.

---

११२ मराठे सर्वांना नकोसे झाले होते.

११३ ह्या पत्रांत दादासाहेबांनीं भाऊसाहेबांना तीर्थरूप ह्मटलें आहे. तेव्हां ते भाऊसाहेबांहून लहान होते हें उघड आहे. पेशव्यांच्या बखरीच्या शेवटीं काव्येतिहास-

वजीर नामर्दी करून भेटला. याजमुळें पातशाहत बुडाली व तोहि शेर झाला. सांप्रत त्याचें पारपत्य जाहाल्याशिवाय दुसरा मुलुकाचा अथवा पैक्याचा मनसुबा होणार नाहीं. यास्तव त्याचेंच पारपत्य करणें जरूर पडेल. फौज आमची फार करून आली नाहीं व मल्हारबाची मुदलीच थोडी आहे. तेहि आली नाहीं. येथील बारीक वर्तमान ये रीतीचे! तथापि ईश्वरी दयेनें व स्वामीचे प्रतापें सत्वरच पारपत्य करतों. स्वामींनीं दत्ताजी शिंदे व मुधोजी भोसले यांची गोविंद बल्लाळ वगैरे लहानथोरांची रवानगी करावी.

---

संग्रहकारांनीं पेशव्यांची वंशावळ दिलेली आहे. तींत रघुनाथरावाचा जन्मकाळ शके १६४५ व भाऊसाहेबाचा जन्मकाळ १६५५ दिला आहे; परंतु ते दोन्ही शक सापेक्ष दृष्टीनें चुकले आहेत. पत्रें व यादी वगैरें ( ४९२ ) त भाऊसाहेबांचा जन्म शके १६५२ श्रावण शुद्ध ४ स दिला आहे. तो खरा मानिल्यास दादासाहेबांचा जन्म पुढें एक दोनवर्षांनीं झाला असावा. पत्रें व यादी वगैरे ( ४९२ ) त दादासाहेबांचा व्रतबंध शके १६६१ माघ शुद्ध २ स झाला असें लिहिलें आहे. व्रतबंध फार उशिरा झाला असल्यास आठव्या वर्षीं झाला असला पाहिजे. त्यावरून दादासाहेबाचा जन्म १६५३ येतो. दादासाहेबाहून भाऊसाहेब वषसहा महिन्यांनीं वडील धरल्यास शके १६५२ त भाऊसाहेब जन्मले हेंच सयुक्तिक दिसतें. वंशावळींत जनार्दनबावाचा जन्मकाळ शके १६४९ दिला आहे तोहि चुकला आहे. कारण, लेखांक ६० ह्यांत जनार्दनबावाची स्त्री सगुणाबाई हीस दादासाहेबांनीं चिरंजीव ह्मणून ह्मटलें आहे. जनार्दनबावा वडील असते तर त्यांच्या स्त्रीस तीर्थरूप म्हणून दादासाहेबांनीं म्हटलें असतें. जनार्दनबावा दादासाहेबांहून दोन एक वर्षांनीं लहान असावेत. तेव्हां, दादा, भाऊ व बावा असा वयाच्या मानानें क्रम लागला. आतां भाऊसाहेबांचा जन्म शके १६५२ तच कशावरून ? तर जनार्दनबावा शके १६६७ त बारा वर्षांचे होऊन वारले हें पत्रें व यादी ( ४९६ व ३६२ ) त लिहिलें आहे. अर्थात् जनार्दनबावाचा जन्म शके १६५५ त पडतो. रघुनाथराव वर्ष दोनवर्षांनीं वडील धरल्यास त्यांचा जन्म शके १६५३ त येतो. व यादींत भाऊसाहेबाचा जन्मशक १६५२ म्हणून लिहिला आहे तो खरा ठरतो. तरी ह्या शकाची सत्यता खरी ठरण्यास आणखी एखादा पुरावा पाहिजे. पेशव्यांच्या बखरीच्या शेवटील वंशावळींत रघुनाथरावाचा जन्म शके १६४५ त दिला आहे. तो तर अगदींच असंभवनीय आहे. कारण, शक खरा मानिल्यास, सदाशिवरावभाऊ नानासाहेबांच्या अगदीं बरोबरीचे होतात व रघुनाथराव व नानासाहेब यांच्यामध्येंहि फारसें अंतर रहात नाहीं. नानासाहेब भाऊसाहेबाला व रघुनाथरावाला लहान पोरें समजत असत हें खालील पत्रावरून समजेल. हें पत्र मेणवली येथील दप्तरांतील आहे. हें नानासाहेब हिंदुस्थानांत स्वारीला गेले असतां लिहिलेलें आहे.

आपले मुलुकांतील चौकशीचा मजकूर मनांत होता. परंतु हा मनसुबा मातवर पडला. हा शेवटास नेल्याखेरीज कोणास आमचे विचारें दुखवूं नये. राजश्री नारो शंकर वगैरे हे महालकरी मातबर. बाज्या सरदार यांस या दिवसांत खर्च करतां येत नाहीं. याजकडे किल्ले व मुलुक मातबर. यास्तव तुर्त यांजपासूनच चाकरी घेऊन पुढें अबदालीचें पारपत्य जाहालियावरी

---

श्री

९ जुलै १७५२.

चिरंजीव राजश्री रघुनाथ यासी प्रति बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद. उपरि येथील कुशल ता। छ १७ जमादिलावल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणें. विशेष. येथून जातेसमयीं जें सुचलें तें तुह्मास सांगितलें आहे. त्याचें स्मरण निरंतर मनांत असूं देत जाणें. रघुवंश व विदूरनीत, चाणाक्य व जें तुह्मास येत असेल त्याची नेमपूर्वक चिंतणिका करून थोडेंबहुत शास्त्री यांजवळ नित्य ह्मणत जाणें. विराटपर्वापासून पुढें भारत रिकामपणीं वाचीत जाणें. नेमेकरून शंभर दोनशें दंड निरंतर काढीत जाणें. केवळ घोडीं फेरावयाचे छंदास न लागणें. वजनी, कैली, वेरीज, बरावर्द करावयाचा सराव बहुत करणें. चिरंजीव भाऊची मर्जी बहुत प्रकारें रक्षण करीत जाणें. जे आज्ञा करतील तेंच काम करावें. बहुतकरून भाऊ बरोबरच जेवीत जाणें. घोडीं वेगळीं बांधीत न जाणें. क्षुद्र मनुष्यांशीं सहवास कोणे प्रकारेंहि न करणें. मातुःश्रीबाई, ताई, अनुबाई यांसी एका दोहों दिवशीं अर्ध घटकाभर जाऊन बसत जाणें. शरीरप्रकृत नीट नाहीं यास्तव औषध कांहीं नेमेकरून घेत जाणें. भाऊ समागमें घोडीं फेरावयास जात जाणें. सातारियास जर जावयाची आज्ञा केली तर चिमणगिरी गंगाधरभटास भाऊजवळ विनंति करून बरोबर दिल्हे तर घेऊन जाणें. सातारियास गेलियावर दोहीं बाईकडे विना बोलाविल्यावांचून अथवा गोविंदराव यांणीं आपणहून सांगितल्यावांचून न जाणें. कालानुरूप वयास उचित, योग्य वेष करीत असावें. देवपूजा थोडी, परंतु एकांतीं, न बोलतां, करीत जाणें. इतरेंहि नेमेकरून करावें आणि गर्व न करावा. निरंतर साधनवृत्तीनें वडिलांची आज्ञा प्रसन्नतेनें मानावी. सावध वर्तावें सर्व जें मनेकरून समजेल तें समजावें. वडिलांची मर्जी उत्तम असलिया पुसावें. शिष्यधर्मे असलिया फार उपयोग आहे. चिरंजीव जनार्दन बहुत कामहि करून पढतात. हें हरएक गोष्टींत अधिक जाहल्यास तुह्मी मान्य पुरुष यांस असें व्हाल. विशेष काय लिहिणें. येथील वर्तमान तर उदेपुराजवळ पंचविसा दिवसांत पावलों. श्रीकृपेनें मेहनत करून दिल्लीचे सुमारें जात आहों. जसें पुढील वर्तमान येत आईल, तैसी योजना होईल. हे आशीर्वाद.

छावणीमध्यें चवकशी करणें तें करूं. तोंपर्यंत याच मनसुबियांत गिरिफ्दार आहों. अंताजी माणकेश्वर व वकील व मनसाराम लिहीत असतील. यास्तव तिकडील सविस्तर वर्तमान लिहिलें नाहीं. सांप्रत समशेरबहादर व नारोशंकर यांस अंताजीकडे जावयास एकदोन पत्रें पाठविलीं आहेत. आह्मीहि मागाहून जातों. फौज मातबर मिळाली नाहीं, यास्तव हलक्या हलक्या मजली करीत भारी होत जात आहों. रजवाडे वगैरे लहान थोर बलाविले आहेत. जाटहि जुंझावयास तयार दिसतो. त्याचा मुलूक जवळ पडला ह्मणोन त्यास जुंझणें प्राप्तच जाहालें. आह्मी गेलियावरी तोहि बहुधा येईल. स्वामींनीं शिंदे व भोसले वगैरे पाठवावे. जानोजी भोसलेहि यावयाजोगे असले तरी पाठवावे. आतां तर आह्मींच जुंझत आहों. तथापि कदाचित् लांबणीचा मनसुबा पडला, त्याची छावणी दिलीस जाहाली, आमची भोंवतीं जाहाली, तरी त्याचा उपयोग पडेल. तुर्त लडाई पडली तरीं आमची आह्मी स्वामीचे प्रतापें करीतच आहों. मागाहून होईल तें लिहून पाठवूं. रा॥ छ ७ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

मु॥ श्रीरंगपटण. पै॥ छ १९ रजब, सन सबा.

---

१७४२ त भाऊ १२।१३ वर्षांचे, दादा ११।१२ वर्षांचे व बाबा ९।१० वर्षांचे असावेत. तेव्हां १६४५,१६४९ इत्यादि शक टाकून १६५३ इत्यादि शक घेणें जरूर आहे. शिवाय दादा व बाबा ह्यांचीं लग्नें बाळाजी बाजीरावानें केलीं आहेत ( पत्रें व यादी ४९२,४७ ). ते बाजीरावाच्या मरणसमयीं अगदींच लहान ह्मणजे दादा ८।९ वर्षांचे व बाबा ६।७ वर्षांचे असावेत. तेव्हां दादांची उमर ११।१२ असती तर त्यांचें लग्न त्यावेळच्या चालीप्रमाणें बाजीरावानेंच केलें असतें. ह्या सर्व गोष्टींवरून भाऊसाहेबांचा जन्म शके १६५२ त घेणें प्रशस्त आहे. पत्रें व यादीं ( ४९५ ) त बाजीरावानें इसवी सन १७३१ त रघुनाथरावाला व जनार्दनबावाला उमाबाई दाभाडीण इजकडे भेटावयास नेलें व त्यावेळीं ह्या दोघा मुलांचीं वयें दहा दहा, बारा बारा, होतीं ह्मणून लिहिलें आहे तें सर्व कल्पनासय आहे हें वरील खुलाशावरून स्पष्ट आहे. ग्रांड डफ १७४१ सांत भाऊ दहा वर्षांचे होते ह्मणून लिहितो ( भाग १७ पृष्ठ २१७ मुंबई प्रत ).

११४ गुंतलेलें

११५ मथुरा इत्यादि ठिकाणें.

[ ५५ ] ॥ श्री ॥ २८ फेब्रुवारी १७५७.

राजश्री बाळकृष्ण आपाजी कमाविसदार नि॥ श्रीमंत्[116] राजश्री पंत-प्रधान गोसावी यांसि: छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ जन-कोजी शिंदे दंडवत. सु॥ सन्ना खमसैन मय्या व अलफ. प॥ यावल प्रांत खानदेश हा परगणा मोकासबाब खे॥[117] करून मोगलाई व स्वराज्य, गनी-माई, बाबती, सरदेशमुखी वगैरे कुलीं अंमल आह्मांकडे श्रीमंत राजश्री पंत-प्रधान स्वामींनीं इनाम करून दिल्हा असे. तेथील अंमलास राजश्री मही-पतराव नागेश यांसी पाठविलें असे. तर पां म॥चें ठाणें म॥रनिलेच्या स्वाधीन करून देणें. जागा जागा तुमचीं माणसें असतील तीं उठवून आणणें. हे आपलीं माणसें पाठवून अंमल करून घेतील. प॥[118] मजकुरीं वसूल तुह्मीं घेतला असेल त्याची रुजुवात करून देणें. जाणिजे. छ ९ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ ५६ ] पे॥छ१८ जमादिलाखर. ॥ श्री ॥ ७ मार्च १७५७.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी:—

आज्ञाधारक बाळाजी देवराव सां नमस्कार विनंति प्रार्थना. येथील वर्त-

---

११६ मुळांत ' त ' चा पाय मोडला आहे व जागजागीं जेथें सध्यां बाळबोध लिहि-ण्यांत आपण अनुस्वार देतों तेथें बहुतेक ठिकाणीं अनुस्वार दिलेले आहेत. ' यांसि ' तील ' सि ' ऱ्हस्व काढिली आहे. ह्यांवरून, चुकली माकली कां होईना, शुद्धलेखनाची थोडी बहुत अवश्यकता त्यावेळीं भासूं लागली होती असें दिसतें.

११७ खेरीज.

११८ येथें जनकोजीचा शिक्का आहे.

मान त॥ फाल्गुन वद्य द्वितीया ॥इंदुवार दरजागा हौदेगिरे जाणून स्वामीच्या कृपेनें यथास्थित असे. यानंतर बिदनूरच्या मामलतीचा निकाल जाहाला, त्याचा विस्तार राजश्री गोपाळराव याणीं तपशीलवार सेवेसी विनंति लिहिली असे. त्यावरून श्रुत होईल. जातरोखा कार्तिक पूर्णिमेच्या वाईद्यानें र॥ बसव लिंगाप्पा यांचा लिहून घेतला. हुंड्या भाद्रपद अखेरच्या बेदिकत लिहून घेतों. र॥ नरसप्पा नाईक व र॥ तुळाप्पा नाईक गुमास्ते वलबसुंदरदास यांचा कराररोखा लिहून घेतला, व साहा लाख रुपयाचा नक्त द्यावयाचा करार. याचा तसालिमातरोखा उभयता सावकारांचा लिहून घेऊन ऐनजिन्नस पाठविला आहे. व नजरेचे हत्ती दोन व घोडे साहा यावेयाविसींहि र॥ बसव लिंगाप्पास रुबरु राजश्री गोपाळराव याणीं सांगीतलें आहे. चांगले श्रीमंतांचे पसंदेस येत ऐसेच संस्थानिक पाठवितील. आजीच्या हौदेगिरेच्या मुक्कामीहून र॥ नरसप्पा नाईक नख्त ऐवजाकरितां बिदनुरास जाणार आहेत. त्या समागमीं सेवकास रवाना केलेंच तर नजरेचे हत्ती व घोडे व फर्माश लिहिली होती. आज्ञेप्रमाणें तलाश होऊन जो जिनस मिळेल तो सेवसी घेऊन येईन. बसव लिंगाप्पा येऊन भेटले तो तपशील राजश्री गोपाळराव यांच्या विनंतिपत्रीं साकल्य आहे. श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[ ५७ ]

**श्रीगणराज.** ७ मार्च १७५७.

पो॥छ १८ जमादिलाखर सन सबा. संध्याकाळीं सांडिणी स्वारा ब॥ आलें.

११ ७ मार्च १७५७. हीच तारीख पुढील पत्राची आहे. कारण, ह्या व पुढील पत्राची पैवस्ती एकच आहे व पुढील पत्राचा ह्या पत्रांत उल्लेख आहे.

११९ लेखांक ५६ व ५७ ह्या दोन पत्रांची पैवस्ती एकच असल्यामुळें त्यांच्या रवानगीच्या तारखाहि एकच धरल्या आहेत.

सेवेसी गोपाळ गोविंद व मल्हारराव भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. स्वामीनीं दस्तुरें पुरवणी लिहिली तेथें आज्ञा जे बिदनुरचें तुह्मी उरकिलें तेंच प्रमाण. परंतु पैक्याची निशा व हुंड्या व जातखत देणें तें चौकसीनें निभावें सारिखें करणें ह्मणून आज्ञा. ऐशास जें करणें तें चौक-

१२० गोपाळराव गोविंद १७५४ च्या फेब्रुवारींत कोण्या संस्थानाकडे होता तें कळत नाहीं ( ऐतिहासिकलेखसंग्रह नं. १ ). १७५५ च्या नोव्हेंबरांत सावनूरच्या स्वारींत गोपाळराव होता ( ऐ. ले. सं. नं. २ ). सावनूरकरांशीं तह झाल्यावर गोपाळरावाला पेशव्यांनीं सोंद्यास पाठविलें. तो २१ मे १७५६ त फोंड्यास होता. तेथून शिरहट्टी घेऊन गोपाळरावानें बेदनुराची खंडणी केली तों १७५७ चा फेब्रुवारी आला. पुढें श्रीरंगपट्टणची स्वारी १७५७ च्या मार्चांत झाली. त्यावेळीं गोपाळराव श्रीरंगपट्टणापाशीं होता. १७५७ च्या मार्च एप्रिलांत गोपाळराव श्रीरंगपट्टणापाशीं होता व त्याची मदत बळवंतराव मेहेंदळ्यास ह्या मोहिमेंत फार झाली ही गोष्ट ग्रांटडफ्ला माहीत नव्हती असें दिसतें. १७५७ च्या सप्टेंबरानंतर गोपाळ हरी ह्मणजे गोपाळराव गोविंद बळवंतराव मेहेंदळ्याला मदत करण्यास येणार होता असें डफ लिहितो. परंतु १७५५ पासून १७५७ पर्यंत गोपाळराव कर्नाटकांतच होता हें आह्मीं छापलेल्या पत्रांवरून व ऐतिहासिकलेखसंग्रहांतील पत्रांवरून कळून येईल १७५८।५९ त गोपाळरावाला पेशव्यांनीं हैदरावर ठेऊन दिलें होतें. त्यावेळीं हैदरानें गोपाळरावावर छापा घालून त्याला पराजित केलें. पुढें जुजबी तह करून ( ऐ. ले. सं. नं. २४ ) गोपाळराव १७६० त उदगीरच्या मोहिमेस येऊन मिळाला. उदगीरची लढाई झाल्यावर दौलताबादेचा किल्ला घेण्याचें काम पेशव्यांनीं गोपाळरावावर सोंपिलें ( ऐ. ले. सं. नं. १७।१८ ). १७६० त पानिपतास बहुतेक सर्व मराठे गेले असतां, हैदरावर दाब ठेविण्याकरितां गोपाळरावाला भाऊसाहेबांनीं देशीं ठेवून दिलें होतें. येणेंप्रमाणें १७५४ पासून १७६१ पर्यंत गोपाळरावाच्या हालचालीचा त्रोटक वृत्तांत आहे. १७५४ च्या अगोदर गोपाळराव काय करीत होता त्यासंबंधीं पत्रें अद्याप कोठें छापिलीं गेलीं नाहींत. १७६१ पासून पुढची माहिती मात्र ऐतिहासिकलेखसंग्रहांत यथास्थित येत आहे. १७६१ पूर्वीचा पटवर्धन घराण्याचा इतिहास बहुतेक अज्ञात आहे. गोविंद हरी, रामचंद्र हरी व त्रिंबक हरी ह्यांनीं कामगिऱ्या काय काय व कोठें कोठें केल्या त्याची तारीखवार माहिती पाहिजे आहे.

१२१ मल्हारराव भिकाजी रास्ते हा गोपिकाबाईचा भाऊ. हा गृहस्थ गोपाळराव गोविंदाबरोबर श्रीरंगपट्टणच्या स्वारींत होता. रास्त्यांच्याहि घराण्याचाइतिहास तारीखवार व सालवार अद्याप लिहावयाचाच आहे. ह्या घराण्यानें दुसऱ्या बाजीरावाच्या वेळीं बंडाव उठाठेव केलेली आहे.

शीनेंच करितों येविषयीं अलाहिदा परवणी लिहिली आहे त्यावरून विदित होईल. तुर्त प्रयोजन नसतां लिहितों हें बहुत गुप्त मनन करणें. तुमचे फौजेपैकीं निमे लोक घरास जाऊन आले असतील त लोक व कांहीं नवे ठेविले असतील ते व तुर्त राजश्री त्रिंबकराव तुकदेव तुमचें लगामींच आहेत. वरकड तोफखानियास छावणी करणें योग्य. आधीं राजश्री यशवंतराव यांनींच राहावें, अथवा त्यांचे स्थळीं राजश्री केशवरावहि योग्यच आहेत हुजरात पे॥ राजश्री विंसोपं[१२२] व हरबा व किरकोळ पागेचे पतके व हुजरात मिळोन पांच हजार तुमचे तेथील फौजे पे॥ अजमासें निमे येकूण बारा तेरा हजार फौज जथून छावणी करून पट्टणकराजवळून पैका मातबर घ्यावा. तैसाच चिकबालापुर, सिरें, कडपें, वेंकटेश पावेतों स्वारी करावी. तुमची सलाबत बहुत पडली आहे. येक वर्ष मेहनत सांगितल्या प्रो केली पाहिजे. किती लौकिक वाढला व सरकार कामाचें ओझें उचललें यामुळें आह्मास बहुत आनंद वाटला. आणखी येक वर्ष खासा राहिल्यास बहुत काम होईल. हिंदुस्तानांत चिरंजीव दादानीं दोन छावण्या[१२३] केल्या. दत्तबांनीं तीन केल्या. अंताजी माणकेश्वर वगैरे दोन छावण्या करीतच आहेत. परंतु कर्नाटकांत मागें फत्तेसिंग व रघूजी भोसले यांची जाली. गु॥ पर्जन्य अतिवृष्टी जाली. तथापि श्रीकृपेनें निभाऊन सीरढी व कोपल येथील काम सर करतांच चहूंकडे चौका बसला. जे लोक बहुत काहिली करितील त्यास निरोप द्यावा. नवे व जे घरास जाऊन आले असतील व हुजूरचे फौजे पे॥ पांच हजार ताबीजात करून घेऊन येक वर्ष मेहनत करून पूर्ते काम फौजेचे उस्तवारीचें करून सरकारचें कर्ज वारावयास पंचवीस उरवून देशास जावें. येक वर्ष तुह्मास अधिक राहणें पडतें. त्यास खावंदाचे कामासाठीं व आपल्या लौ-

---

१२२ पटवर्धन.

१२३ छावण्या केल्या ह्मणजे पावसाळे काढले. दादासाहेब खमस व सीतच्या दोन्ही पावसाळ्यांत ह्मणजे १७५४।१७५५ च्या पावसाळ्यांत हिंदुस्थानांत होते. दत्ताजी शिंदा अर्बा, खमस व सीत हीं तीन सालें रजपुतान्यांत होता.

किफासाठीं प्रवास करणें मर्दासच योग्य आहे. गु॥ आग्रह करून बहुत बुद्धिवाद सांगोन राहविलें. यंदा कांहींसें फळास आलें. आतां राहाच ह्मणून आग्रह करणार नाहीं. हौसेनें राहाल तरी फौजेचें साहित्य उत्तम प्रकारें करून देऊन जर नच बनेल तरी अति होष तुह्मावर नाहीं. यंदा सर्वहि उत्तमच तुह्मी केलें. यंदा तुमचे राहणें न जालिया ईकडे जुनें राखावयास व कांहीं तरी मेळवावयास सात आठ हजार फौज हरयेकसा बरें. चिरंजिव नाना राहिले तर ते अथवा बलवंतराव याजबरोबर ठेवावे लागतील. परंतु नवे नीट जथत नाहीं. एतद्विषयीं तुमचें विचारें कसें तें लिहोन पाठवणें. तुमचें विचारें होईल तैसें कर्तव्य योजना करूं ह्मणून आज्ञा. ऐशास स्वामीची आज्ञा छावणीस राहावयाची आलिया सेवक लोकांस उजूर कोणे गोष्टीचा? मुख्यत्वेंकरून लोक छावणीस राहिले आहेत. त्यांच्या घरास पैसा प्रविष्ट नाहीं. आणि दुसरी छावणी कबूल करितील न करितील हा भरंवसा वाटत नाहीं. तथापि मध्यें स्वामीची आज्ञाच जरूरीची जाली तरी लोकास सांगावयाचे रीतीनें सांगोन राहतील ते राहतील. बाकी या प्रांतांत छावणी राहून पुढें कामास उपयोगी पडेसी फौजेची नेमणुक करून दिलिया छावणीस राहणें अगाध काय? जे स्थलीं आपलेंच फौजेनसीं राहावयाची आज्ञा होते ते समयीं लोक राहतील न राहतील हा भरवसा पुरत नाहीं. यास्तव न राहाण्याचा आग्रह करावा लागतो. हल्लीं तों हुजरातची फौज द्यावयाची आज्ञा जाली. याशिवाय आमचे फौजे गे॥ राहतील ते. येणेप्रमाणें स्वामींनीं कृपाळू होऊन बेजमी केलिया श्रीव्यंकटेशाजवळ छावणीची आज्ञा जाली. तरी राहूं. मुख्य गोष्टी ज्या सेवकाचे स्वरूप स्वामीचे कृपेकरून वाढलें त्यापेक्षां प्रतिदिनीं अधिकोत्तरीं स्वामींनीं वाढवावयाचें. धन्यानीं चित्तांत आणिलें असतां सेवकानें न राहून पुढें काय मेळवावें? सेवकानें धन्याची मर्जी संपादावी यांतच सेवकाचें स्वरूप व जें आपणांस योग्य त्यापेक्षां विशेषोत्कारें सेवा करून दाखवावी. मुख्य गोष्टी तोफखाना व फौज मातबर व चौमासी पोटाची बेजमी करून दिलिया कोणे

गोष्टीचा उजूर तिळतुल्य नाहीं. अगर राजश्री नानासच ठेऊन आह्मासी त्याजवळ राहावयाची आज्ञा जाली तथापि उजूर नाहीं. स्वामीचे जागां राजश्री नाना आहेत. हुजरास चाकरी करितों अगर स्वतंत्र असतां करितों त्यापेक्षां राजश्री नानांजवळ राहून त्यांची कृपा संपादून ते स्वमुखें स्वामी-जवळ तारीफ करीत असें करून दाखवूं. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

---

[ ५८ ] ॥ श्रीशंकर ॥ १२ मार्च १७५७.

सेवेसी विज्ञापना. जानराव आइतवळे याणीं यंदा दोनचार लबाड्या केल्या. कोणत्या ह्मणाल्या तरी; एक तरी, सावनूरचे स्वारीस पागा घरीं बसविली व चाकरी सुधी न केली. आणि रुपये तरी, पागा सर-कारची, सबब देणें पडले. बारगिराचे तैनातेंत मात्र काटकुसूर केली. बाकी रुपया द्यावा लागला. या वेळेस आह्मांस राग होताच. आह्मीं स्वामीचे कानावर घालून त्यास ह्मटलें कीं तुला सरनोबत[१२४] देतों; आणि त्याचे विद्यमानें चाकरी करावी. जर कबूल न करीस तरी पागा काढून दुसऱ्यास सांगतों. ऐसें ह्मटलें. तेव्हां प्रयासें सरनोबताचें कबूल केलें. परंतु हिशेब विल्हे लावून न घेत. तेव्हां शेवटीं बेलगंगेचे तळावर हिशेब हुसेनखान कायगांवकर सरनोबत ठहरावून, विल्हे लावून, पैका घेऊन, तयारीसाठीं पाठविले. तेव्हां दुसरे दिवशीं सरनोबतास टाकून उठोन गेले. तेव्हां आह्मीं मागाहून सरनोबत त्याजपाशीं कागद देऊन पाठविले. त्यावर महिना पंधरादिवस वाट पाहिली. तेव्हां जासूद जोडी जानरायाचे नांवें मसाला[१२५] करून पाठविली. त्या जासूद जोडीस मसाला न दिल्हा व धक्के देऊन

---

१२४ सर्नोबतस्तु सेनानीः
१२५ महसूल. पैसा.

बाहेर घातलें. याप्रमाणें जासुदांनीं सांगतांच माझ्या हातापायाची आग जाहली. तेंव्हां येथून राऊत पाठवून त्यास मारावें हें मनांत आलें. परंतु, पुरती तहकीकात करून मारावें ऐसें मनांत आणून मारावें ऐसा विचार केला. ऐसियासी, जर जासुदास धक्के देवून बाहेर लाविलें तरी डोकें मारावें किंवा निदानीं हात तरी तोडून टाकावा लागेल. स्वामींस कळावें ह्मणून लिहिलें असे. याचें कसें करावें तें स्वामींनीं लिहिलें पाहिजे. परंतु, जासुदास धक्के मारिले, मसाला न दिल्हा व हुजूरहि न आले. तेंव्हां पारपत्य केलेंच पाहिजे. नाहीं तर आमची तरी अब्रू कशी राहील ? र॥ छ २१ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

पे॥ छ १३ साबान

---

[ ५९ ] **श्रीशंकर** १२ मार्च १७५७

सेवेसी विज्ञापना. स्वामींनीं लिहिलें कीं, " गोपाळ केशव वगैरे लक्ष्मण

---

१२६ यूरोपियन लष्करी कायद्यापेक्षां पेशव्यांचा लष्करी कायदा फारसा सौम्य होता असें नाहीं. आइतवळ्यानें केलेल्या अपराधाबद्दल देहांत शिक्षाच पाहिजे आहे, निदान हात तरी तोडण्याची शिक्षा मंजूर करावी ह्मणून दादा लिहितात. ह्यावरून लहान मोठ्या सरदारांना शिक्षा करण्यास मुख्य पेशव्यांची मंजुरी लागत असे हें उघड होतें. तसेंच देहांत शिक्षेपेक्षां हात तोडण्याची शिक्षा सौम्य आहे असा त्यावेळचा समज होता असें दिसतें. पाश्चात्यांच्या मताप्रमाणें देहांत शिक्षेपेक्षां हातपाय तोडणें किंवा डोळे काढणें किंवा नाक कांपणें किंवा मिशी उतरणें किंवा गाढवावरून वरात काढणें इत्यादि शिक्षेचे प्रकार कडक, निंद्य व निरर्थक, कारण ते मनुष्य प्राण्याच्या इभ्रतीला शोभण्यासारखे नसून केवळ पशु तुल्य, आहेत.

१२७ हे नारोशंकराचे बंधु. नारोशंकर, अंताजीमाणकेश्वर, गोविंद बल्लाळ इत्यादि मंडळी गैरशिस्त रीतीनें पैसा खाऊन बहुत गबर झाली होती. शिवाय ही मंडळी पेशव्यांचें नुकसान करून पठाण, रोहिले, रजपूत, इत्यादींना आंतून फूस देण्याचाहि दुष्ट क्रम चालवीत असे. हे लोक किती उद्धट व बेपर्वा झाले होते हें पुढील पत्रावरून कळेल.

शंकराचे कारभारी यांजपासून साधेल रुपया वगैरे ऐवज तो घ्यावा. कारभारी याणींच चोरी करून रुपये खादले. मागें कागदावर सरकारच्या मोहर संदुखावर करून ठेवल्या असतां ते यांणीं फाडून कागद नेले. तस्मात् पुर्ते लबाड ठहरले. यास्तव यांची जप्ती करून साधेल तें साधावें व घोडीं वगैरे जप्त करावीं. घोडियांपैकीं दोनशें घोडीं तेथें ठेवणें व बाकी हुजूर पाठविणें. " ह्मणोन आज्ञा. ऐशियांसी, आह्मीं नर्मदेचे *तळावरूनच जप्तीस पाठविले. गोपाळ केशवास हुजूर आणिलें. लबाडहि असतीलसें वाटतें. यास काढिलें तेव्हां थोडीशी लबाडी केलीच. अद्यापिहि रयतीमध्यें फितूर आहे. परंतु. आह्मीं येथें आणून थोडेंसें तडकाविलें. आतां मामला जप्त करून मामलत चालीस लाविली व यांचेंहि घर जप्त करावयास ताकीद केली. याब॥ याजपाशीं काय हातीं लागेल ? घोडीं वगैरे फारकरून लक्ष्मण शंकराचा लवाजिमा नारो शंकर याजपाशीं आहे. ते हुजूर आलियावरी त्यांचीहि जप्ती करितों. प्रतापसहा व विसाजीपंत स्वामींकडून आले त्यांसहि ओडसयास रवाना केलें आहे. स्वामींस कळावें. र॥ छ २१ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

पे॥ छ १३ साबान.

---

[ ६० ] ॥ श्री ॥ ता. १३ मार्च १७५७.

अखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्यराजश्री बाळाजी गोविंद गोसावी यांसी: सेवक रघुनाथ बाजीराऊ: नमस्कार. सु॥ सबा खमसैन मय्या व अलफ. चिरंजीव सगुणाबाई[१२८] महायात्रेस गेली आहेत. त्यांचे खर्चाची नेमणूक

* हांडियावरून. १२८ बाजीराव बल्लाळाचे सगळ्यांत धाकटे पुत्र जनार्दनबावा ह्यांची स्त्री. जनार्दनबावा इ. स. १७४६ त वारले.

करून नवद हजार रुपये तुह्मांकडून देविले. त्यास, वरात तुह्मांकडे पाठविली. त्यास, रा. गोविंद बल्लाळ देशास गेले. तुह्मीं जाबसाल केलात कीं ऐवज आह्मांकडे नाहीं; याप्रमाणें जाबसाल केले. दोनचारदां तुह्मांकडे पत्रें पाठविलीं. परंतु, ऐवज द्यावयास तुह्मांस अनुकूल न पडे. आह्मी सरकारचे चाकर[129] नाहीं, गोविंदपंताचे चाकर, याप्रमाणें नानाप्रकारच्या गोष्टी सांगितल्या. निदान पंचवीस हजार रुपये दिले. बाकी ऐवज नाहीं ह्मणोन जाबसाल केला, ह्मणोन वर्तमान कळलें. ऐशीयास, तीर्थरूपांनीं नवद हजार रुपयांची वरात तुह्मांवर केली. श्रीमध्यें[130] खर्चास ऐवज देविला असतां तुह्मीं ऐवज न दिला ही गोष्ट उत्तम न केली. सरकारचा ऐवज तुह्मांकडे असतां अशा गोष्टी सांगाव्या हें तुमच्या स्वरूपास उत्तम नव्हे. कदाचित् ऐवज नसला आणि सरकारची वरात झाली तरी तुह्मी मातबर मामलेदार. हर प्रयत्न करून ऐवज द्यावा. त्यास, हे वरात आणीक कोणाची नव्हे ऐसें जाणत असतां फार वाईट गोष्ट केली. बरें, जें केलेंत तें उत्तम केलेंत. हल्लीं हें पत्र लिहिलें असे. तरी पंचवीस हजार रुपये दिले ते वजा करून बाकी पासष्ट हजार रुपये राहिले ते झांशीस यात्रेहून आलीं आहेत त्यांजकडे पत्र पावतांच पावते करणें. यास अंतर केलेंत तरी परिछिन्न खावंदाची अवकृपा तुह्मांवर होईल. ऐसें समजोन ऐवज प्रविष्ट करणें. जाणिजे. छ २२ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें.

---

१२९ चाकरांच्या चाकरांनीं मुख्य धन्याला विचारूं नये ही नीति मराठी राज्यांत फार पूर्वीपासून शिरली होती. शिंदे आपल्याला पेशव्यांचे चाकर ह्मणवीत, आणि साताऱ्च्या छत्रपतींना ओळखीत नसत. गोविंदपंताच्या मुलाची गोविंदपंताच्या धन्याशीं हीच वर्तणूक झाली ह्यांत फारसें नवल नाहीं. त्यावेळच्या नीतीला ती अनुरूपच होती. “ राजद्वारीं वस्त्रें घ्यावयास येणें ह्मणून बहुत आग्रह केला. विनंति केली कीं आह्मास गरज काय? आमचे खावंद आपण. ह्मणोन गेलों नाहीं ” ( पत्रें व यादी ५३, नानाफडणविसाचें आत्मचरित्र ). हे विचार नानाफडणविसासारख्या पुरुषाचे! मग इतरांची गोष्ट काय पुसावी!

१३० काशींत.

[ ६१ ] ॥ श्री ॥ १४ मार्च १७५७

राजश्री बाळाजी गोविंद, कमाविसदार, महालानिहाय, प्रांत अंतरवेदी, गोसावी यांसी:

अखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्य स्ने॥ जनकोजी शिंदे दंडवत सु॥ सबा खमसैन मय्या व अल्लफ. राजश्री शिवराम देवाजी वकील दिमत नवाब अहमदखान पठाण यास पूर्वी अंतरवेद येथील ऐवजीं सन इसनेंत समाईक ऐवजीं रुपये ३०० तीनशेंची असामी दिल्ही होती. त्यास हल्लीं वाटणी जहाली.[१२३] श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीकडे रुपये ( १०० ) शंभर व राजश्री मल्हारजी होळकर याजकडून रुपये ( १०० ) शंभर, एकूण दोनशें. बाकी आह्मांकडील रुपये ( १०० ) शंभर रुपये करार करून दिल्हे असेत. तर मशारनिल्हेस आमच्या महालच्या ऐवजीं शंभर रुपये पावते करून कबज घेणें, जाणिजे. छ २३ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

पे॥ छ १० साबान.

---

[ ६२ ] श्रीगणराज. २२ मार्च १७५७.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी:—

विनंति सेवक गोपाळराव गोविंद व मल्हारराव भिकाजी कृतानेक साष्टांग

---

१२३ ह्यावरून ह्या प्रांतांत पेशवे, होळकर व शिंदे ह्यांच्या सारख्या सारख्या वांटण्या झाल्या असें दिसतें. ४५, २२॥, २२॥, १० व ५३।=, २३।-, २३।-, व ३१, ३०, ३०, ९ अशा वाटण्या पेशवे, होळकर, शिंदे व पवार ह्यांच्या माळव्यांत, राजपुतान्यांत व हिंदुस्थानांत झालेल्या होत्या असें निरनिराळ्या ठिकाणीं लिहिलेलें आढळतें. ह्या चारी वांटण्या खरोखरच झाल्या असून निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या प्रांतांकरितां झाल्या असें समजल्यावांचून गत्यंतर नाहीं. माळव्याच्या १५०लाख उत्पन्नपैकीं ७४॥ होळकराला,

नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता॥ छ १ रजब स्वामींचे कृपेकरून यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं कृपाळू होऊन छ २९ जा॥खरचीं पत्रें सांडणीस्वाराबराबर पाठविलीं तीं छ ३० जा॥खरीं बागुराहून कुच जाहालें त्यासमयीं प्रात:काळीं पावलीं. राजश्री बनाजी जाधवराव यांस पत्रें होतीं तीं त्याच सांडणीस्वाराबराबर पट्टणास रवाना केलीं. त्यावर बागुराहून ‖चंदराज पट्टणास दाखल जाहाल्यावर संध्याकाळीं छ २८ जा॥खरचीं पत्रें सांडणीस्वाराबराबरच स्वामींनीं पा॥ तीं पाहोन परमाल्हाद जाहाला. रा॥ बनाजी पंतास पत्रें होतीं तीं आज सांडणीस्वाराबराबर रा॥ केलीं. कडूरबाणावर घेतल्याचें वर्तमान पट्टणाहून बनाजीपंत व नागोपंत वकील यांचीं पत्रें द्वादशी गुरुवारचीं आलीं. ......पाशीं आलीं तींच सेवसी रा॥ केलीं आहेत. पावल्यावर साकल्यार्थ विदित होईल. त्याजवर पट्टणाहून पत्रें अद्यापि आलीं नाहींत. आल्यानंतर सेवसी पाठवून देऊं. खंडणीचा अजमास स्वामींचे आज्ञेप्रमाणेंच त्यास वरचेवर लिहीत आहों. खासा स्वारी समीप आली. आह्मीहि दरमजल पुढें जातच आहों. त्यास वरचेवर खबरी गेल्या आहेत.¶ तिकडून व इकडून मुलूख खराब होऊन ठाणींठुणीं तमाम गेलीं हें वर्तमान कळोन डोळे उघडले असतील. बनाजीपंतांशीं बोलून रा॥ करणार होते. परंतु, दुसरीं पत्रें आलीं नाहींत; आज उद्यां येतील; तेथील दम कळत जाईल तसतसा येथूनहि जरब द्यावयाचा व बोलावयाचा विचार होईल. आह्मी पुढेंच आहों. तीन साडेतीन गांवें येथून पट्टण आहे. खासा स्वारी दरमजल येतच आहे. त्या सुमारावर आह्मी पुढें पट्टणासच जाणें पडलें तरी जातों. पट्टणकराची फौज येणार तेहि बातमींत आहों. कडूरबाणावर घेतल्यावर पुढें ठाणीं घेत येथें आलों. पट्टणची पेठ चंदराज आह्मीं दोघे निश्चा-

---

६५॥ शिंद्याला व १० पवाराला १७५० त वांटून दिले असें ग्रांटडफ् ह्मणतो ( ग्रांटडफ् मुंबईप्रत, पृष्ठ २७०). ह्मणजे दरशेंकडा ४९⅔ होळकराच्या, ४२⅔ शिंद्याच्या व ६⅔ पवाराच्या वांट्यास आले.

‖ श्रीरंगपट्टणापासून दहा बारा कोसांवरील एक गांव.

¶ मेहेंदळ्यांच्या बाजूनें व पटवर्धनांच्या बाजूनें.

त्यापूर्वी पुढें लुगारे धाडून पेठ लुटून घेतली. आह्मी येतांच धास्तीनें कौलास येऊन ठाणें दिल्हें. ठाणें फार चांगलें आहे. परंतु माणूस पोंकें ! फौज गावांजवळ येतांच अवसानें जाऊन ठाणीं देतात ! स्वामीचें पुण्य विचित्र आहे ! खासा पट्टणचा हिसाब धरीत नाहीं. परंतु, एकाएकीं जाऊन थडकावें तें उत्तम नाहीं. याजकरितां मात्र हलकें दम धरीत, ठाणीं घेत, पुढें जात जात, सलाबत वाढवून जावें ह्मणोन चंद्राजपट्टणास आलों. येतांच ठाणें घेतलें. बंदोबस्तीस्तव आज येथें मुक्काम केला. उदैक कुच करून पुढें जातों. पट्टणचे वकील येतात न येतात हेंहि कळेल. डोळे उघडोन ताळ्यावर आले असले तर उत्तम ! जुजावयाचाच दम असला तर चिंता काय आहे ? §खामाखा तेथेंच जाऊन फौजेचें स्वरूप दाखवू. स्वामींनीं लि॥ कीं हैदरनाईक वगैरे जमाव जमा होऊन नदीअलीकडे राहिले असले तर खामाखा मोडून आंत घालावे. त्यांत साध्यासाध्य पाहून करावें. अलीकडे नसले तर जाऊन थडकावयाचें प्रयोजन नाहीं. यंदा मोर्चे लावावयाचीहि केवळ मसलत नाहीं. हे गोष्ट गुप्तच राखोन छावणीचा बेत सर्वत्र प्रगट करावा. गढ्या घेऊन जपून असावें ह्मणजे सहजच......त्र यास यावें तों गढ्या...
...स राहाल ह्मणजे सहजच टाकतील. ह्मणोन आज्ञा केली. ऐशास हैदरअलीखान अद्याप आला नाहीं व आणखीहि कोणी कोठून आला नाहीं. पट्टणांतहि थोडीशी फौज व गाडदी वगैरे जें आहे तेवढें मात्र आहे. ते कोणी शहराबाहेर निघावयाचे नाहींत. हैदरअलीखान वगैरे येणार ते आल्यावर पुढें बाहेर राहावयाचा विचार करणें तर करितील. बतेऱ्या बांधितात. तेथें चौक्या ठेवणें तर ठेवितील. ते शहरआसऱ्यानेंच राहतील. नदीअलीकडे राहावयाची जुरंत[१३२] काय ? आणि त्याच्या येण्याच्याहि बातमींत आहों. वरचेवर वर्तमान कळेल तसें करूं. छावणीचाच मा॥र प्रगट करावा ह्मणोन आज्ञा केली. ऐशास छावणी विषयीं पहिलीं पत्रें आलीं तेव्हां पासोनच पट्ट-

१३२ गोपाळरावाच्या १७५७ तल्या मार्चांतील ह्या मोहिमेसंबंधीं ग्रांटडफच्या ग्रंथांत एक अक्षर नाहीं. §खामखा अशींहि ह्या शब्दाचें रूप आहे.

णचे मसलतीस दबाव समजोन छावणी प्रगट केलीच आहे. स्वामीच्या पुण्य-प्रभावेंकरून लौकरच [॥]ताळ्यावर येऊन वकील पाठवितील. ठाणींठुणीं एक पट्टणावांचून कोणी टिकत नाहीं. ठाणीं घेतलीं. मुलुक खराब झाला. पुढें फारच होईल हें समजोन व पट्टणास येणार हे सलाबत जबरदस्त आहे ह्यानें भीत होऊन संस्थानचें अपेश नंदराज घेणार नाहीं.[१३३] ...............

---

[ ६३ ] ॥ श्री ॥ ३ एप्रील १७५७.

सेवेसी विज्ञापना. त॥ छ १३ रजब पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. कृष्ण जोशी यांचें पत्र शहरींहून पुण्यास छ १२ रजबीं आलें. त्यांत दिल्लीकडील मजकूर. पठाण दिल्लींत येऊन अमिरांच्या घरावर चौक्या बसवून द्रव्य कुल घेऊन रयतीस उपद्रव फार दिल्हा. आणि तिसा करोडींचें वित्त जमा करून पुत्रासमागमें दहा हजार फौज देऊन लाहोराव-रून आपल्या देशास रवाना केलें. आणि पठाण दिल्लीच्या बाहेर निघाला. समागमें गाजुद्दीखान व कमरद्दीखान याचा लेक[१३४] व बंगाल्याचे राजाचा वकील ऐसे तेथून कुच करून बलभगडाजवळ आले. तेथून जें कुच केलें ते मथुरेजवळ गेले. आंत पांच हजार जाट होते ते बाहेर आले; आणि यासीं युद्ध उत्तम प्रकारें घेतलें. परंतु, पठाण भारी. त्यास कटून मेले. आणि दोन हजार जाट पळून गेले. आणि पठाणाच्या लोकांनीं मथुरेवर हल्ला केला. त्यास दीड प्रहर लूट व कतलाम झाली. मग द्वाही अलमशाहाची फिरविली. पंचवीस लक्ष वित्त घेऊन आपला अंमल बसवून मथु-

---

॥ ताळें=मस्तक, दैव, ताळ्यावर=डोक्यावर=शुद्धीवर. १३३ ह्यापुढील तीन ओळी गेल्या आहेत. १३४ मीरमन्.

रेहून फौज गोकुळवृंदावनास पाठविली कीं लुटून घेणें. त्यास, तेथें बहिरागी दोन चार हजार [135] नांगे जमा होऊन युद्ध घेतलें. दोन हजार बैरागी मेले व दोन हजार पठाणाचें मनुष्य मेलें. इतक्यांत पठाणास जुगुलकिशोर वकील याणें सांगितलें कीं फकिरांचें स्थल आहे तेथें पैशाची जात नाहीं. तेव्हां पठाणानें स्वार पाठवून आपले लोक फिरवून आणविले. कुल बैरागी मेले, परंतु गोकुळनाथ वाचविले. जुगुलकिशोर पठाणापाशीं पेश आहे. तेथून पठाण कुच करून आगऱ्याजवळ आला. आगऱ्याची रयत बाहेर येऊन भेटली. पांच लक्ष रुपये खंडणी द्यावी असा तह जाहाला. त्यास रुपयांचा भरणा होणें तर रयतीस कठीण जालें. वायदाहि टळला. तेव्हां पठाणानें आगऱ्यावर हल्ला करून लुटून पस्त केलें व किल्ल्यास मोर्चे लावून किल्ला [136] हस्तगत केला. गाजद्दीखान किल्ल्यावर जाऊन किल्ला घेतला. शहरांत द्वाही पातशाहाची फिरविली. पठाण पांच सात दिवस येथें राहून कुच करून आठ कोस पुढें आला. तेथें मुक्काम दहावीस आहेत. दिल्लीची रयत पळून मथुरेस आली, मथुरेहून आगऱ्यास आली. आगऱ्यांत पठाण येणार ह्मणून कुल मातबर लोक होते ते व गरीबगुरीब ऐसे आगऱ्याहून राजश्री नारो शंकर व समशेर बहादर यांचे लष्करांत आले. त्यास, पठाण

---

१३५ नागे व गोंधड, दोन मठ, वैराग्यांचे, उत्तरहिंदुस्थानांत व माळव्यांत ओंकारमांधाता वगैरे ठिकाणीं प्रसिद्ध आहेत.

१३६ हा किल्ला घेतल्याचा वृत्तांत भाऊसाहेबाच्या बखरींतील वृत्तांताच्या अगदीं उलट आहे. तेथें जो पाल्हाळ केला आहे तो बराच अविश्वास्य आहे. गाजुद्दिखान किल्ल्यावर आश्रा मागण्यास गेला नसून तो ताब्यांत घेण्याकरितां गेला होता. अबदाली किल्ला न घेतां परतला असें जें बखरींत ह्मटलें आहे तसा प्रकार नसून, उलटा अबदालीनें किल्ला मोर्चे लावून घेतला. अलमशाहा व गाजुद्दिन ह्यांना अबदालीनें कैद केलें नसून, उलटें गाजुद्दिनाशीं त्यानें मित्रत्व केलें व जेथें तेथें अलमगिराची द्वाही फिरविली. अंताजी माणकेश्वरानें पठाणास चांगला हात दाखविला व तेथून निघून, बखरींत ह्मटल्याप्रमाणें तो बलभगडास न जातां, श्रीमंताच्या सैन्यांत आला. एकंदरींत भाऊसाहेबाच्या बखरींतील ३०, ३१, ३२, ३३ ह्या पृष्ठांवरील मजकूर थोडा इतिहास व बराच कादंबरी ह्यांच्या मिश्रणानें बनविलेला आहे असें ह्या पत्रावरून दिसतें.

आगऱ्यास आला, ते या फौजांनीं कुच करून झांशीच्या रोखें आल्या. समागमें रयत आली होती ते याच उभयतांनीं लुटून घेतली. मोठा विश्वासघात केला ! पंचवीस लक्षांचें वित्त घेतलें. हल्लीं झांशी जवळ येऊन पडले आहेत. उभयता मिळोन फौज दहा बारा हजार आहे. व पठाणाजवळ फौज पन्नास हजार चांगली आहे. गाजद्दीखान व खानखानांची फौज वेगळी आहे व आराबाहि आहे. खजाना पन्नास लक्ष रुपये समागमें आहेत. पठाणाचा नायब दिल्लींत बसला आहे. तो फौज वरचेवर ठेवीत आहे. तेहि फौज याजला सामील होणार ऐसें दिसतें. पठाण बंगाल्यास जाणार व [1]दक्षणेसाहि येणार. मूळ झांशीस लवकर येतो ऐशी बोली आहे. जाट आपल्या गढींत बसले आहेत. परंतु भयाभीत बहुत आहेत. श्रीमंत राजश्री दादासाहेब व मल्हारजी होळकर वगैरे सरदार कुल ज्यावहेजवळ होते. त्यास ज्यावहेपासून लाख रुपये खंडणी घेतली. उपरांतिक उदेपुरच्या राजाचा भाऊ होता तो येऊन भेटला. ह्मणूं लागला कीं माझा विभाग राजा देत नाहीं, त्यावरून ज्यावह परगणा व राणीखेडा ऐसे दोन्ही महाल श्रीमंतांनीं लुटून पस्त केले. दहा बारांचें वित्त तेथून निघालें, आणि तेथेंच मुक्काम करून राहिले आहेत. समागमें फौज चाळीस हजार आहे. वरचेवर जमा होत आहे. पठाण बहुत भारी आहे. जर पठाण झांशीस आला तर कठीण आहे. पठाणावर प्रस्तुत कोणी जावें असें दिसत नाहीं. राजश्री अंताजी माणकेश्वर यांणीं लढाई चांगली घेतली. परंतु पठाणाची फौज भारी यामुळें उपाय नाहीं. परंतु आपलीशी करून पळून आले. अंताजी माणकेश्वर याचा पुत्र पडला. परंतु पठाणास हात चांगला दाखविला. हल्लीं श्रीमंतांपाशीं आहेत. राजश्री बापूजीपंत वकील दिल्लीहून पळून मथुरेस आले. तेथून निघोन राजश्री नारो शंकर यांच्या लष्करांत आले. त्यांचे बंधु दामो-

[1]परंतु पठाण बंगाल्यासहि गेला नाहीं व दक्षिणेसहि आला नाहीं. गेला व आला असता तर, इतिहास निराळ्या तऱ्हेनें लिहावा लागला असता. ह्यासंबंधीं लेखांक ६५ तील शहानवाजखानाचें अबदालीसंबंधीं मत पहा.

दर महादेव झांशीस होते. कांहीं भ्रम झाला होता. त्यांचा काल जाहला. बापूजी महादेव झांशीस आहेत. मनसूरअलीरखानाचा लेक गंगापारच आहे. ऐसें वर्तमान सराफियांत आलें. त्याजवरून लिहिलें असे. जर श्रीमंत राजश्री नानासाहेब जातील आणि त्याचें पारपत्य उत्तम होयं तर उत्तमच आहे, नाहींतर पठाण दरमजल माळव्यांत आला तर बहुत खराबी आहे. पुढें जें श्रीस कर्तव्य असेल तें होईल. नवाब सलाबतजंग कलबर्गीयावर आहेत. त्यास शहरीं येणार आहेत. छ २७ तारखेस येथें दाखल होणार आहेत. याप्रमाणें पुण्यास लिहिलें आहे तें वर्तमान सेवेसीं लिहिलें आहे. दुसरें पत्र कृष्णाजी भैरव थत्ते यांचें छ १२ रजबीं आलें. त्यांत मजकूर कीं पठाणानें गाजुद्दीखान यास हरोली दिल्ही व पन्नास हजार फौज नवी दिल्लीमध्यें चाकर ठेविली तोफखाना तमाम सांगातें घेतला. शाहाजादा सांगातें घेतला. मथुरेंत कत्तल केली. अलमशाहाची द्वाही फिरविली. येथून आग्र्यास आला. एक मुक्काम केला. रयत लोक जाऊन भेटले. पांच लक्ष रुपये खंडणी घ्यावीशी केली, कोणास उपद्रव दिल्हा नाहीं. समशेरबहादर आग्र्यास होते तेथून निघाले. श्रीमंत राजश्री दादासाहेब व मल्हारजी होळकर उदेपुराकडे जावहाकडे गेले. लाख रुपये तेथील खंडणी केली. पठाण झांशीस येणार, तेथून पुढें कोठें येईल हें नकळे. याप्रमाणें वर्तमान[१३७] लिहिलें आलें तें सेवेसी लिहिलें आहे. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

१३७ कृष्णजोशी व थत्ते ह्या दोघांच्याहि पत्रांतील मजकूर बराच एकसारखा आहे. तेव्हां तो अगदीं विश्वसनीय आहे व त्याचमानानें भाऊसाहेबांच्या बखरींतील ३०, ३१, ३२, ३३ पानांतील मजकूर काल्पनिक आहे.

[ ६४ ] श्री भवानी प्रसन्न. ३१ मे १७५७.

तीर्थस्वरूप राजश्री राजे जीवनराव स्वामी वडिलांचे सेवेसी.—

कृपा इच्छित कृष्णाजी त्रिंबक सा। नमस्कार विनंति येथील कुशल ता। जेष्ठ शु। १३ दर जागा औरंगाबाद जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. वडिलांकडील आशीर्वादपत्रें श्रीमंत सद्गुणमूर्ति साहेबाचे आज्ञापत्रांसहवर्तमान छ १४ साबानचें येक आह्मांकडील अजुरदार कासद जोडीबराबर पाठविलें. दुसरें छ १० माहे मजकूरचें मुजरद हजूरचे कासद जोडीबराबर पाठविलें. अशीं दोन्ही पत्रें छ १ रमजानीं पावलीं. सविस्तर अर्थ कळों आला. अक्षरशाहा मजकूर नवाब समसामुद्दौला बहाद्दर यांसी पत्रें वाचून दाखवून जेहननसीन केला. सवालजबाबाहि परस्परें जाले. ते आलाहिदा मुफसल लिहितों त्याजवरून ध्यानास येणार. बहुत काय लिहूं. कृपा पूर्ण असो द्यावी. हे विनंति. रवाना छ १२ रमजान.

---

[ ६५ ] ॥ श्री ॥ ३१ मे १७५७.

पु॥ तीर्थस्वरूप रा॥ राजे जीवनराव वडिलांचे से॥:—

विनंति श्रीरंगपट्टणची खंडणी जाली; परंतु वसूल न जाला. ठाणीं घेतलीं ते सरकारांत पैका वसूल होवेंतोंवर राहिलीं तीं राखिलीं पाहिजेत. फौज मातबर पंधरा हजार या प्रांतांत ठेऊन संस्थान मजकूर व चितलदुर्ग वगैरे पाळेगारास दबाव रहावा. सिरये प्रांतीं नवाबाचे तेथें दिलावरखान आहेत. गांव खेडीं वगैरे चहूंकडे पाळेगारांनीं दबविलीं. दिलावरखां आपले

१३८ हा निजामाच्या दरबारीं पेशव्यांचा वकील पेशव्यांस त्या दरबारांतील गुप्त बातमी देत असे. हा जीवनराव खासगीवाले असावा.

पोटास व शिबंदीसच बेजार झाले. त्यांस एखादें ठिकाण रहावयास देऊन सरकारची फौज शिऱ्यांत ठेवावी; मातबर सरदार ठेवावा. सरकारांत पंधरा लाखाची जागीर परशरामपंत जिवंत असतांच समसामजंगांनीं करार केला. त्यास बारा लाखाची जागीर गुंजोटी वगैरे व बालाघाट, हरदापुर व वऱ्हाडांत महाल नेमून यादी लिहिली. ते चौकशी व वसूल तुह्मीं लिहून पाठविल्यावर सेरहसल असल्यास घेतली जाईल. बाकींत शिरें घ्यावें. ह्मणोन विस्तारें परशरामपंत[१३९] जिवंत असतां हुजूरचीं आज्ञापत्रें खासदसखत व माझीं पत्रें आशेपें॥ र॥ जालीं. सबब जें लष्कर दूर; शिऱ्याचा जबाब येईल तोंवर येथें राहणें कसें होतें? बद्दल जातां मार्गें फौजेसहित मातबर सरदार ठेवितील; शिरें घ्यावयास मुरारराव वगैरे टपलेच आहेत; यास्तव ठाणीं राखावयासी, सरदार रहावयास, जागा उपयोगी पडेल; जाग्यांत ऐवजवसुली कांहींच नाहीं व ठिकाणहि मातबर नाहीं; परंतु, आब हवा मात्र कांहींसी बरी व या प्रांताच्या ठाण्यास जवळ, यास्तव घेणें जरूर आलें. ह्मणोन लिहिलें§. अशास समसामुद्दौला ह्मणों लागले जे श्रीमंताचा आमचा करार-

---

१३९ जीवनरावाच्या पूर्वीचा पेशव्यांचा निजामच्या दरबारीं गुप्त खटपटी करणारा मुत्सदी.

१४० शिरें पेशव्यांनीं कां घेतलें त्याचें हें सबळ कारण आहे. निजामाच्या दक्षिणेकडील मुलखाचा बंदोबस्त करण्यास शिऱ्याचें ठाणें उत्तम होतें. पेशव्यांनाहि कर्नाटकांतील मुलूख राखण्यास शिरें जरूर हवें होतें. श्रीरंगपट्टणावरती पेशव्यांनीं ज्याअर्थी नुकतीच स्वारी केली होती त्याअर्थी शिऱ्यावर निजामापेक्षां पेशव्यांचा हक्क जास्त होता. १७५० त नासीरजंगानें दक्षिणकर्नाटकांत स्वारी केली त्यापलीकडे१७५७ पर्यंत निजामानें श्रीरंगपट्टणाकडे कधीं वळून पाहिलें देखील नाहीं. आतां पेशवे शिऱ्यांत ठाणें बसवितात असें पाहून निजामानें दिलावरखान नामेंकरून कोणी लेचापेचा सरदार तिकडे ठेवून दिला; परंतु त्याची खुद्द विजापूर सुभ्यांत दाद लागेना ती शिऱ्यांत कोठून लागणार? इकडे पेशव्यांचे तर शिऱ्यांत ठाणें बसलें. तेव्हां कांहीं तरी कुरापत काढून बोलणें चालवावें या निमित्तानें समसामजंग, पेशव्यांनीं अमूक तालुके घेतले, मुराररावानें अशी बदमामली केली व जानोजी भोसल्यानें तशी बदमामली केली, इत्यादि रडगाणें गात आहे.

§ येथवर पेशव्यांचा सवाल झाला. ह्यापुढें समसामजंगाचें उत्तर आहे.

मदार जाला असतां, वर्षास विजापूर सुभ्यांतील ठाणींठुणीं गांव घेतच असतात. यंदा आलमले वगैरे व तालीकोट परगण्यांतील मुद्देबिहाळ वगैरं व आणखी कितीक ठाणीं घेतलीं. त्यामध्यें मुलकांत अदनुका दिसोन येते. जे हे ह्मणतात, श्रीमंताचा आमचा स्नेह आणि करारमदार जालेत आणि श्रीमंत वर्षास गांव ठाणीं घेतच असतात. आह्मांस तव कोहें[141] जे श्रीमंताची फौज हमेशा त्या सुभ्यांत फिरती. कोण्ही आमच्या ठाण्याठुण्यास उपद्रव देईल त्यास तंबी करून ठाणीं आमचे तालुकदाराचे स्वाधीन करावीं तें एकीकडेच राहिलें. आपण ठाणीं घालितात. शिऱ्यासाठीं आह्मांस मुरारराव याचें व पाळेगारांचें भय दाखवून लिहितात जे ते टपले आहेत, घेतील. श्रीमंतीं मुरारराव यास व पाळेगारांस ताकीद उत्तम प्रकारें केलिया त्यांची काय ताकद आहे जे वाकडी गोष्ट सांगू पहातील ? ज्यानें वाकडी गोष्ट सांगितली त्यास शिक्षा करणें काय कठिण आहे ? फौजच त्या प्रांतीं ठेवणें तरी बहुत ठाणीं मातबर त्या जिल्ह्यांत आहेत ज्या ठाण्यांत सरदार राहील तेंच ठाणें मातबर. सरकारास आज्ञा व्हावी जे नवाबाकडील दिलावरखां शिऱ्यांत आहेत त्याची कुमक मदत करीत नाहीं तें न करतां* आह्मांस लोकांचें भय दाखवून आपण शिरें घेऊं ह्मणतात. तेव्हां करारमदार नवाबाचा श्रीमंताचा लोकांस कसा खरा भासेल व करारमदार कोठें राहिला ? त्या प्रांतांत आमची तेवढीच जागा नांवास मात्र राहिली आहे ते घेतल्यास लाचार ! पंधरा लाखांची जागीर द्यावयाचा करार. पैकीं बारा परशरामपंतीं करार करून यादी पाठविली. बाकीचे ऐवजांत शिरें घ्यावें ह्मणोन लिहिलें. त्यास पंधरा लाखाची परशरामपंत मागत होते, शेवटीं बारा लाखांची[142] द्यावी हा

१४१ तर सांगतात. * उलटें.

१४२. १७५२ च्या सप्टेंबरांत गाजुद्दिन वारल्यावर, सलाबतजंगाशीं पेशव्यांचा तह झाला. त्यांत तापीपासून गोदावरीपर्यंतचा पश्चिमेकडील मुलुख पेशव्यांस मिळाला. त्यापुढें १७५७ च्या आगष्ट–सप्टेंबरपर्यंत निजामाची व पेशव्यांची कोठें लढाई झालेली ग्रांटडफ्च्या ग्रंथांत सांपडत नाहीं. तसेंच निजाम व पेशवे ह्यांच्यामध्यें नवीन एखादा

निश्चय जाला. तीन हजार फौजेनिशी चाकरी करावी. जोंवर जागीरीचा ऐवज आबाद होऊन खातरख्वा हातास ये तोंपर्यंत जसा वसूल तशी दिडा-हजारांनसीच चाकरी करावी. जेव्हां नीट आबादी होऊन वसूल चांगला येऊं लागेल तेव्हां करारापें॥ ती हजारांनसी करावी. अथवा एखादें काम जरूरी पडेल तेव्हां तिन हजारांनसीच करावी ऐसा निश्चय ठहरून चुकला. महाल मोकरर जाले. त्याप्रें॥ आह्मी आपल्या करारावर कायम आहों. आतां घडी घडी असें कराल तरी कसें होईल? गुंजोटी वगैरे परगणे येथील जमीच्या मात्र सनदा रा॥ धोंडो आक्देव यांचे नांवें दिल्ह्यात तेथें अमल त्यांचा जाला. वरकड परगणे रदबदलींत टाकिलेत. अशास परशु-रामपंतांनीं केलें तें श्रीमंतीं मान्य करून दसरा होतांच हजार दीड हजार फौज चाकरीस पाठवावी. ह्मणजे सनदा करून देऊं त्याजवरून अंमल करावा. वराडचे माहाल जबून? ह्मणतात त्याच माहालावर लक्ष्मणराव खंडागळे आडचा तीहजारा फौजेनसी हमेशा चाकरी करीत होते व रघोजी भोस-ल्यास बार येत होते. रघोजी बावाचे प्रस्थ भारी जाल्यावर माहाल त्यांनीं खराब केले. श्रीमंताचे महाल जाल्यावर रा॥ जानोजी भोसल्याची ताकद नाहीं जे तिकडे पाहे. मग कोण्हाचेंहि भय तिकडे नाहींच. तालुका एका दो वर्षांत आबाद होऊन पैसे चित्तानरूप येतील. सांप्रतचा वसूल येथें कसा कळतो? केवळ वैराण नाहींत. जून आबादी आहे. तनखा वसूल

---

तह झाल्याचेंहि ग्रांटडफ् लिहित नाहीं. मग परशुरामपतानें ही बारा लाखांचा जहागीर ठरविली ती केव्हां व काय ह्मणून? १७५३ पासून १७५७ पर्यंतचा आणीक कांहीं निजामासंबंधीं पत्रव्यवहार सांपडल्यावांचून ह्या प्रश्नांचें उत्तर देणें अशक्य आहे. १७५० पासून १७६१ पर्यंत ग्रांटडफ्च्या ग्रंथांत माहिती वरवर दिलेली असते. ह्या दहा वर्षांतील लढायांचीं कारणें, लढायांचीं वर्णनें, तहांचीं मुद्देसूद कलमें, पेशव्यांच्या सरदारांचे पेशव्यांशीं कालभेदानें झालेले बुद्धिभेद, पेशवे व सरदार ह्यांचे परस्पर स्नेहसंबंध, दरबारांतील दुफळ्या, सखारामबापू, दादासाहेब, भाऊसाहेब, नानापुरंदरे, बाबूराव फडणीस वगैरे पुरुषांचे स्वभाव इत्यादि अनेक गोष्टी ग्रांटडफूनें अजीबात गाळल्या आहेत. ह्या गोष्टींचें होईल तितकें दिग्दर्शन प्रस्तावनेंत केलें आहे.

ऐसे महाल कोठें आहेत ? त्या माहालास कौल श्रीमंताचा जार. यावरी तनखाहि कदाचित् वसूल होऊं सकेल; परंतु आजच पाहिल्यास नाहीं. जो येक निश्चय झाला आहे त्याचा परस्परें निर्वाह करावा यांत उत्तम आहे हे विनंति.

राजश्री जाधवरायास चार पांच महिने कैदेंतच ठेवावें, तदनंतर श्रीमंत स्वामीच्या विद्यमानें जें करणें तें करावें. ऐसें समसामजंगास सांगावें ह्मणोन लिहिलें.[143] अशास, जाधवरायास पहिलेंच रुखसत केलें. वर्तमानहि हुजूर लिहिलेंच आहे. आतां त्याच्यानें काय होतें ? केवळ निर्जीव करून सोडिलें. ज्या गोष्टीचे भयास्तव त्यास अटकाव करावा तें त्याच्यानें कांहीं होवत नाहीं. कळलें पाहिजे. हे विनंति. रा॥ छ १३ रमजान.

विनंति श्रीमंत प्रतापवरिष्ठाभिधान राजश्री पंतप्रधान स्वामींनीं एकांतीं खिलवतांत फर्माविलें कीं जानोजी भोसले यांनीं पुण्यांत असतां करार केला कीं किल्ला गोवळेचा नवाबाचा घ्यावा, वराडांत अंमल तह नासरजंगाचे वेळेस जैसा होता त्याप्रें॥ वर्तावें, गंगथडीस घासदाणा जाजती न घ्यावा, सुरळित सदहू कराराप्रें॥ वर्तावें. ते तों एकहि गोष्ट अंमलांत न आली. बदमामली करून वराडांत पैका घेतला. गंगथडीस घासदाणा घेतला. मुलूख पायमाल केला. उपरि नवाब खुद्द. बर्दालें[144] वंजरासंगम पावेतां गेले; परंतु,

---

१४३ येथपर्यंत सवाल झाला. ह्याच्यापुढें जबाबाला सुरुवात होईल.

१४४ जानोजी भोसल्यानें निजामाला इतकें सतावून केव्हां सोडलें व निजाम वंजरासंगमापर्यंत जाऊन हात हालवीत परत केव्हां आला तो काल नक्की ठरवितां येत नाहीं. कारण ग्रांटडफ् भोसल्याच्या ह्या पराक्रमासंबंधीं व निजामाच्या ह्या व्यर्थ प्रवासासंबंधीं कांहींच सुगावा लागूं देत नाहीं. तरी ह्या गोष्टींची तारीख ठरविणें अवश्य आहे. हें पत्र समानसालच्या १३ व १४ रमजानला रवाना केलें व अधल्या दिवशीं ज्येष्ठ शुद्ध १३ ला लिहिलें आहे. ह्मणजे सबा साल संपून समान सालाला आरंभ होऊन दुसऱ्या दिवशींच हें पत्र लिहिलें आहे. ह्या पत्रांत पुढें 'हें साल गेलें' ह्मणून ज्या सालासंबंधीं उल्लेख केला आहे तें साल सबा होय. निजाम वंजरासंगमापर्यंत सबांत गेला. तेव्हां भोसल्याचा पराक्रम सबाच्या आरंभीं व सीतच्या शेवटीं केव्हां तरी झाला असला पाहिजे; ह्मणजे १७५६ च्या मार्च, एप्रिल, मे

फौज, सरदार, मराठे व फिरंगी कोणी नवतें. तंबी पोंहचून सदरहूप्रमाणें अंमलांत यावें तें न जालें. नवाब फिरले. जाधवरायाच्या मुलकाच्या बंदोबस्तास गुंतले. असो. हें साल गेलें. परंतु, पुढें आतांपासूनच माहाराव जानोजी निंबाळकर व हणवंतराव निंबाळकर यांसी सांगावें कीं दोघेजण एकेविचारें वराडांत जाऊन भोसल्यास तंबी करून सदर्हू कामें सरकारचीं करणें. उभयतां निंबाळकरास वसूल पन्नासा लाखांचा मुलूक आहे. व भोसल्यासाहि पन्नासा लाखांचा मुलूक आहे. हे ह्मणतील कीं त्याजपासी फौज फार. तरी सरकारच्या कामावरी येक वरीश आणखी पांच पांच हजार फौज ठेविली तरी काम होईल. पैका कोठें ह्मणतील तरी येक येक वरीश उभयतां निंबाळकर चाकरीस आले नाहींत. कदाचित् आले तरी जानोजीचा पुत्र सात आठशें, हणवंतराव दोन हजार. मुलुक आहे त्याप्रमाणें फौज निरंतर पांच पांच हजार यांजपाशीं असावी. दुसरे पांच पांच हजार फौज येक सालीं जाजती ठेवावी. खाविंदांचें काम करून द्यावें. तरीच जन्मपरियंत मातबरीनें मुलूक देऊन ठेविलियाचें फळ. नाहीं तरी इतका मुलूक खावंदानें त्याजवर कैसा बहाल ठेवावा. कितीदां चाकरीस नच आले. पैसा वसूल जाला तो खजाना मागें पडला त्यापैकींच खर्च करून जाजती पांच पांच हजार फौज ठेवावी. आणि खाविं-

---

जून इत्यादि महिन्यांत झाला असला पाहिजे. पुढें सवांत ह्मणजे १७५६ च्या सप्टेंबर-अक्टोबरांत निजामानें भोसल्यावर चाल केली व तो विन्मुख होऊन परत आला तों सवा साल संपलें; ह्मणजे १७५७ चा जून महिना आला व समान सालाला प्रारंभ झाला व हें पत्र लिहिलें गेलें. आतां हें नवीन साल लागलें तेव्हां निजामानें जानोजी भोसल्याला खरपूस चोप द्यावा असा पेशवे समसामजंगास उपदेश करितात. हा चोप जानोजी व हणवंतराव निंबाळकर यांच्या करवीं द्यावा असें पेशव्यांचें मत होतें. परंतु दोघे निंबाळकर निजामाविरुद्ध नुकतेच उठले होते, तेव्हां ते ह्या खटाटोपांत पडणार नाहींत हेंहि ते जाणून होते. तत्रापि निजामाचे पुरातन सेवक ह्या नात्यानें ते नाहीं ह्मणून स्पष्ट ह्मणणार नाहींत ह्या समजुतीनें पेशवे हा उपदेश निजामास करीत आहेत. शिवाय हे दोन सरदार भोसल्यावर गेले ह्मणजे निराश्रित झालेल्या निजामावर पेशव्यांना स्वारी निर्वेधपणें करतां आली असती हें नानासाहेबांचें अंतस्थ धोरण होतें. पुढें १७५७ च्या आगष्ट-सप्टेंबरांत पेशव्यांनीं जी निजामावर स्वारी केली त्याची प्रस्तावना ही जून महिन्यांत चाललेली आपण ह्या पत्रांत वाचीत आहों.

दांचें एक काम वराडचें करून घ्यावें; यांतच उत्तम. उभयतां निंबाळकरांपाशीं दहा हजार फौज प्रतिवरशीं असावी. येक साल घरांतीलच ऐवज खावंदाच्याच मुलकांत मेळविला. त्यापैकीं खर्च करून फौज ठेवावी. आणि काम करावें. तरीच खावंदानें मातबरीनें बाळगिल्याचें फळ व निंबाळकराचे सेवकधर्मास उचित असे. सदरहू मजकूर येकांतीं नवाब समसामुद्दौला बहादर यांसीं येक येक अक्षर वाचून दाखवून सदरहूप्रें॥ करवून वराडांत नवाबाचा अंमल सुरळित होय, गोवळचा किल्ला घेऊन चाकर मातबर निंबाळकर यांचीं आजमायेश होय तें करणें ह्मणोन लिहिलें.[१४५] आशास याचें उत्तर केलें जे श्रीमंताचा आमचा स्नेह. तेव्हां जें करणें तें आह्मांस श्रीमंताचेच विचारें केलें पाहिजे. जे वेळेस आह्मी भागानगरीहून निघालों आणि वराडांत जायाचा कस्त केला त्या दिवसांत श्रीमंताचीं पत्रें पावलीं जे गंगातीर परियंत जाऊन दबाव घालावा. गंगापार न व्हावें. दबावानेंच किल्याचें काम करून घ्यावें. ¶बाबूराव[१४६] कोन्हेर येतील. तह जाल्यावर तहाप्रें॥ वर्तावें. गंगापार होऊन गेले तरी आह्मांस तमाशा

१४५ येथपर्यंत पेशव्यांचा सवाल झाला. ह्यापुढें समसामजंगाचा जवाब सुरू होतो.

¶ हा जानोजी भोसल्याचा कारभारी.

१४६ ' कोन्हेर ' हें नांव ऐतिहासिकलेखसंग्रहकार आपल्या मासिकपुस्तकांतील नंबर८च्या पत्राच्या टीपेंत ह्मणतात त्याप्रमाणें गेल्या शतकांत बरेंच प्रचारांत होतें असें दिसतें. बाबूराव कोन्हेर, कोन्हेर त्रिंबक एकबोटे, कोन्हेर त्रिंबक पटवर्धन, कान्होजी आंग्रे, कान्होजी भोसले, कान्होजी गायकवाड, कान्होजी मोहिते, हीं विशेषनामें मराठ्यांच्या इतिहासांत प्रसिद्ध आहेत. कान्हेरे, कोन्हेरे, कण्हेरे हीं आडनांवेंहि कोंकणांत व देशावर ऐकण्यांत येतात. कोन्हेर, कान्होजी, कोन्हेरे, कान्हेरे, कन्हय्या, कान्हा, कान्हया, या शब्दांतील मूलप्रकृति ' कन्ह ' हा शब्द आहे. ' कन्ह ' हा शब्द प्राचीन महाराष्ट्रांत ' कृष्ण ' वाचक होता. हा शब्द निदान दोनएक हजार वर्षांचा जुना आहे हें खालील शिलालेखाच्या उताऱ्यावरून स्पष्ट आहे. हा उतारा नाशिक येथील लेण्यांतील नंबर १९ च्या लेण्याच्या उजव्या खिडकीवर असलेल्या २२ नंबरच्या लेखाचा आहे. उतारा येणेंप्रमाणें आहे.

**प्राकृत**

[ १ ] सादवाहन कुले कन्हे राजनि नासिककेन

[ २ ] समणेन महामातेन लेण कारितं

पाहतां नये. आह्मी समीप आहों. आह्मांसहि भोसल्याची कुमक करावी लागेल. जेव्हां श्रीमंताचीं लिहिलीं ऐशीं पावलीं मग पुढें कसें जावें ?यास्तव श्रीमंतांचे आज्ञेप्रे॥ गंगातीरपरियंत जाऊन गिरमाजी खंडेराव यासी मागें

---

**संस्कृत**

[ १ ] शातवाहनकुले कृष्णे राजनि नासिककेन

[ २ ] श्रमणेन महामात्रेन लयनं कारितं

**मराठी**

शातवाहनकुलांतील कृष्णराजा राज्य करीत असतां नाशिक येथील श्रमण महामात्यानें हें लेणें बांधिलें.

हा कृष्णशातवाहन ख्रिस्तापूर्वी ११० व्या वर्षी हयात होता. ह्यावरून ' कन्ह ' हा शब्द दोन हजार वर्षांचा जुना आहे हें सिद्ध आहे. हा शब्द पुढें कन्हर या रूपानें दृष्टोत्पत्तीस येतो. देवगिरी येथील ज्ञानेश्वरानें नावांजलेल्या रामदेवराव जाधवाच्या बापाचें नांव कन्हरदेव किंवा कृष्णदेव असें होतें. हा कन्हरदेव इ. स. १२४६ त गादीवर बसला. पुढें ह्या कन्हर शब्दाचीं कान्हेर, कोन्हेर इत्यादि रूपें झालीं. येणेंप्रमाणें कन्ह, कन्हराज, कन्हर, ह्या परंपरेनें कोन्हेर हा शब्द कन्ह शब्दापासून निघाला आहे व तद्वाचक कृष्ण हा शब्द संस्कृतांत आहे. आतां संस्कृत कृष्ण शब्द अगोदरचा किंवा महाराष्ट्री कन्ह शब्द अगोदरचा ? ' मराठ्यांच्या संबंधानें चार उद्गार ' काढणाऱ्या वे. शा. सं. राजारामशास्त्री कार्लेकर यांच्या मताप्रमाणें " अतिप्राचीन मऱ्हाठी " " मानवी संस्कृता " च्या प्राक्कालीन धरली तर कन्ह व कृष्ण ह्या दोन्ही शब्दांचें मूळस्वरूप " अतिप्राचीन मऱ्हाठी " व " मानवी संस्कृत " ह्या दोन भाषांची जी उगमदात्री भाषा असेल त्या भाषेंत सापडावें. " मानवी संस्कृताचें " " आर्ष संस्कृत " मूळस्वरूप; परंतु, " अतिप्राचीन मऱ्हाठी " चें कांहीं " आर्ष संस्कृत " मूळस्वरूप नव्हें. तेव्हां " आर्ष संस्कृताच्या " कालाच्या पलीकडे ह्या मऱ्हाठी कन्ह शब्दाचें मूळ शोधीत गेलें पाहिजे. कन्ह हें विशेषनाम युरोपियन लोकांत आहे. त्याची Cuhne अशी मांडणी करतात. तेव्हां यूरोपांतील Cuhne व अतिप्राचीन मऱ्हाठी कन्ह हे शब्द समस्वरूपी दिसतात, त्याअर्थी आपणां मराठ्यांचे पूर्वज व यूरोपांतील ' अर्य ' शाखेचे पूर्वज जेव्हां एका ठिकाणीं होते त्यावेळीं Cuhne, कन्ह, हें नांव प्रचारांत होतें असें दिसतें. अर्थात ' कन्ह ' हा शब्द प्राचीन किंवा अर्वाचीन संस्कृतापासून निघालेला नाहीं. हा शब्द शुद्ध प्राकृत मराठी आहे. कित्येकांच्या मतें हा शब्द मुळांत कानडी किंवा द्राविडी असावा. परंतु हा शब्द शुद्ध मराठी आहे हें जर निर्विवाद सिद्ध करतां येत आहे, तर तो कानडी आहे एवढें नुसतें बोलण्यांत कांहीं मतलब नाहीं. द्रविडांपासून मराठ्यांनीं हा शब्द घेतला असें स्पष्ट दाखवून दिलें पाहिजे.

सरवून जाधवरायाच्या तंबीकारितां चाललों. ते वेळेस गिरमाजी[१४७] खंडेराया-पुरतें सामान पुष्कळ होतें. त्या वेळेस गिरमाजी खंडेराव यानें करारमदार परशरामपंताचे मारफातीनें केला जे आह्मी इतक्यावर गंगा उतरणार नाहीं. वराडांतच जातों. असें असतां आह्मांसच इलजाम श्रीमतीं दिल्हा हें काय? आह्मी तरी त्यांचे आज्ञेप्रं॥ वर्तणूक केली. गिरमाजी खंडेरायानें करार-मदार केले; परंतु आह्मी जाधवरायाचे तालुकियांत धसलों तों त्यांनीं गंगा उतरून बेइमानी करून वरंगेल सरकार व येलगंदल सरकार व निर्मळ वगैरे कुलप्रांत धुळीस मेळविला. व इंदुराकडे फिरोन दुसऱ्यानें आले. परगणे खराब करीत बसवड वगैरे मुलुक हैदराबाद सुभ्याचा खराब करून पैसे मबलक घेतले. तसेंच वसकतेवरून घासदाणे घेत परदूर प॥ लक्ष्मणराव खंडागळे याचे जागिरींत धसले. औरंगाबादेसमीप आले होते. याप्रं॥ त्यांनीं बदमामली केली. वराडांत मनमानले पैसे घेतले. राजश्री बाबूराव कोन्हेर यासीं तह करावयासी पाठवणार होते त्यासी न पाठविलें. जे जे करार श्रीमंतासीं केले त्यांत येकाहि अमलामधें याजकडून आला हें परिच्छिन्न कळून चुकलेंच आहे. छावणी आलजपुरची तरी होऊं सकत नाहीं. कां कीं फौजा कुल वाटे लाविल्या. जुने फौजेनशीं जाणें सलाह नाहीं. चित्तांत आहे जे रमजान आंदर जालियावर ईद करून हैदराबादेस यावें. तिकडे गेल्या वेगळे हुजूरचे फौजेस खर्चास मिळणें कठीण होईल. जरी पाण्यानें उघाड दिधली तरी हैदराबादेस जावें. नाहीं तरी औरंगाबा-दचीच छावणी जाली. छावणी औरंगाबादेस हो अथवा हैदराबादेस हो, परंतु दसरा जाल्यावर परिच्छिन्न रा॥ जानोजी भोसले यांसीं समजोन घेणें जरूर. त्याचें पारपत्य आवश्यक व चित्तानुरूप करावें व करितोंच; परंतु श्रीमं-तीं मध्यें आणखी कांहीं न ह्मणावें. ज्याप्रं॥ सांप्रत लिहिलें आहे याच गोष्टीवर कायम असावें. फिरंग्यास मागें बोलावू पाठविलेंच होतें व सांप्र-तहि पत्र पाठविलेंच आहे जे तुह्मी लौकर येणें. पहिले पत्राचें उत्तर फिरं-

१४७ भोसल्याचा एक सरदार.

त्याकडून आलें जे आह्मी छावणीस तुह्मापाशींच येतों, इकडे छावणी करीत नाहीं. फिरंगीहि येतच आहेत. फिरंगी न आले तऱ्ही चिंता नाहीं. आह्मी भोसल्याचें पारपत्य उत्तम प्रकारें करतों. उभयतां निंबाळकराचा मजकूर. त्यासी अबदालीची खबर दाट होती. यास्तव रा॥ जानोजी निंबाळकरास रुखसत करतेवेळेस व रा॥ हणमंतरायाची भेटी जाली तेंव्हां सांगितलेंच आहे जे पुढें तुह्मांस मातबर फौजेनशीं यावें लागेल. त्यांनींहि कबूल केलेंच आहे. हें वर्तमान पूर्वींहि लिहिलेंच आहे. आतांहि उभयतां निंबाळकरांस फौजेविशीं पत्रें पाठविलींत. अशास तुह्मी लिहिल्याप्रें॥ फौज त्यांनीं आणावी हें तरी कळतच आहे; परंतु त्यांस लिहिलें आहे. अलबत पहिलेपेक्षां सवाई दिढी फौजा घेऊन येतील यांत संशय नाहीं. पहिलेपासूनहि मातबर फौजेनशींच चाकरी करीत आलेत व पुढेंहि ते चाकरी चांगलीच करून दाखवितील. कळलें पाहिजे. मोठा मनसबा अबदालीचा होता. तें अरिष्ट सांप्रत जगदीशें वारलेंच आहे. हे विनंति. रवाना छ १३ रमजान.

विनंति नवाब समसामजंगास श्रीमंत आपले परम मित्र जाणतात. सरकारच्या कुल जाबसालाचा जिम्मा त्यांचा आहे यांत संशय नाहीं ह्मणोन लिहिलें. अशास, शाहानवाजखानबहादर हेहि आपणांस श्रीमंताचें नायब असें मानतात. व हरघडी हेच ह्मणतात कीं श्रीमंताकडून त्या दौलतींत श्रीमंत भाऊसाहेब व या दवलतींत मी श्रीमंताशीं अंतर करणार नाहीं.

१४८ अबदाली १७५७ च्या मार्चांत दिल्लीस आला. तेथून त्यानें मथुरा, आग्रा इत्यादि ठिकाणें घेतलीं व त्यापुढें बंगाल्यावर व दक्षणेवर स्वारी करण्याचा त्याचा इरादा होता ( लेखांक ६३ ). अबदालीचा हा इरादा जेव्हां पेशव्यास व निजामास कळला तेव्हां दोघांनींहि त्याला प्रतिबंध करण्याचा बेत केला. पुढें उन्हाळा झाल्यामुळें व विशेष जोरहि न राहिल्यामुळें अबदाली विलायतेस निघून गेला; व निजामाला अबदालीवर चालून जाण्याचें श्रेय फुकाचें मिळालें असतें तेंहि मिळलें नाहीं. " अबदालीचें अरिष्ट जगदीशें वारलें, " ह्यानें निजामाचा आब वांचला. घरच्या निंबाळकरासारख्या सरदारांना आवरतां आवरतां निजामाच्या नाकीं नव आले तो अबदालीला कितीसें तोंड देता हें कळतेंच आहे !

जें काम श्रीमंताचें तें आमचें व आमचें तें श्रीमंताचें. जें काम पुणेंस पडेल तें करावेंच ऐसी निष्ठा यांची श्रीमंताचे पायाशीं आहे. सर्वस्वी श्रीमंताचाच ह्मणवितों. हे विनंति.

शाहनवाजखानांनीं वडिलांचें नांव घेऊन ह्मणों लागले जे तुह्मीं त्यास लिहिणें जे श्रीमंतास आमचे तर्फेनें पुसावें जे साहेबास आमचा करार कीं नवाबांनीं कृष्णापार न व्हावे व इकडे गंगापार न व्हावें. श्रीमंतांनींहि चार दिवस इकडे तिकडे कालक्रमणा करून कृष्णा न उतरतां पुण्यास जावें. याचा सबब अबदालीचीच आवई येऊन ठहरली होती ऐसें असतां बावजुद अबदालीची गडबड दिवसोंदिवस अधिक ऐकत असतां मुलूक आपला खालीं टाकून श्रीरंगपट्टणास आपपश्चात् न विचारितां गेलेत. जगदीशकृपेनें अबदालीहि गेला आणि मोहीमहि सर जाली ह्मणोन उत्तम जालें. येखादी नेक बाद होय तरी कैसें? श्रीमंत दादासाहेब व रा॥ मल्हारजी बावा होळकर यांजपाशीं फौज जमाव होत नाहीं. दहा पंध्रा पावेतों फौज होती; परंतु त्याचीहि फौज मोठी लढाक होती. या फौजेनें अबदालीचे फौजेवर चालून जाणें तरी कळत आहे; परंतु ते दक्षणेस चाललेच येते तरी त्याच्यानें कांहीं न होतें. त्याचे फौजेचे तोंडावर न येवत ऐसें असतां श्रीरंगपट्टणास जावयाचा कस्तम केला. हे सलाह कांय[१८९] जाणून केली होती हें कळलें पाहिजे. तरी हे श्रीमंतांस विदित करून उत्तर याचें आलें पाहिजे. हे विनंति.

वडीलपणें मजला कितेक बुद्धिवाद लिहिला व सर्फराजींचीं अक्षरें लिहिलीं त्याजवरून फारच संतोष जाहला. बुद्धि शिकवणें व सर्फराज करणें हें वडिलांस उचितच असे. त्याप्रें॥ वडील करतील हा भरंसा आहे. विशेष काय लिहूं हे विनंति. माझे बुद्धीप्रें॥ मी सरकारचें काम करीतच आहे. हे विनंति.

तीर्थस्वरूप पंत जिवंत असतां छ २४ जमादिलाखरीं हुजूर विनंतिपत्रें

---

१८९ शहानवाजखान पेशव्यांचा किर्ता अंकित झाला हें ह्या प्यान्यांत त्यानें दाखविलेल्या काळजीवरून स्पष्ट आहे.

सात बंद विस्तारें लिहिले त्याचे हर जबाब कुल चिरंजीव राजश्री नारायण-राव आपाजी याचे नांवें सादर जाले व माझे नांवें दोन वेळां दोन आज्ञा-पत्रें मुखसर सादर जालींत. आशास सांप्रत त्यांचीं उत्तरें येथून विनंतिपत्रें पाठविलीं असत त्याजवरून कळों येईल. घराऊ कामकाजाचा मजकूर लिहिला त्यासी तीर्थस्वरूप पंताचे दस्तकिती व यादी मजला ठाऊक नाहीं. व दस्तकींत यादीहि नाहीं. नवाब समसामुद्दोलासी अलीकडे पंतांनीं कांहीं मजकूरहि नवा केला नाहीं. रा॥ मुरारपतनाना यांशीं कागद आहेत ते मजलाहि कळलेच आहेत. वडाळें व पिंपळगांवचे वगैरे आहेत. त्याच्या सनदा लवकरच तयार करवितों. वडील आपले ताल्यानें राजे जालेत. ज्याचे ताले शिकंदर त्याचे मनोरथ श्री पुरवीतच आहे. नवाब समसामुद्दोलास अर्जी पाठविली ते गुजराणून जबाब हसल करून पाठविला असे. इत-क्यावर वडीलाचें पत्र त्यास हिंद्वीच येत जावें. चिंता नाहीं. येथून जबाब फारशी होत जाईल. रा॥ वेंकाजी हरी यासी खंडाळें खानापूर येथील काम करून दिल्हे. तीन चार हजार रुपये पेशगी द्यावी लागते. त्याचा सरंजाम दोचो दिवसांत होणार ह्मणजे खलत व सनद देऊन मार्गस्त केलें जाईल. रा॥ मालोजी राजे घोरपडे यांचे कार्याविशीं फारसें लिहिलें. अशास येथील प्रसंग सांप्रत काळचा कळतच आहे. आह्मी ‘सई करावयास चुकत नाहीं. रा॥ धोंडो आकदेव याचे पत्राचा जबाब व तीर्थस्वरूप पंताचे लिहिल्याप्रें॥ नांवें सनद पाठ-वून देऊं ह्मणोन लिहिलें तें कळलें. कासदास इनामवायदा चुकला तरी देणें ह्मणोन लिहिलें. अशास, त्याचा वायदा तरी बावीसावे शाबानीं त्यांनीं पावावें तें छ १ रमजानीं पावलें; परंतु वडिलांची आज्ञा प्रमाण यास्तव इनाम देऊनच मार्गस्त केलेत. श्रीमंत कृष्णा उतरल्यावर तुह्मास हुजूर बोलावणार ह्मणोन लिहिलें. त्यासी उत्तम अस. आज्ञापत्र येतांच हजूर येतों; परंतु गंगाजान्हवी मातुश्री बया-बाईचा हेत जे चिरंजीव नारायणरायास घेऊन श्रीमंतांपाशीं यावें. आपलें वर्तमान विनंति करावी. पुढें ज्याप्रें॥ आज्ञा होईल त्याप्रें॥ वर्तणूक करावी. तरी याचें उत्तर पाठविलें पाहिजे हे विनंति रा॥ छ १४ रमजान

---

१पत्न

॥ श्री ॥

पु॥ तीर्थस्वरूप राजश्री राजे जीवनराव स्वामी वडिलाचे सेवेसीः—

विनंति. त॥ माजूर येथील निशापातीचा मजकूर दोन तीन पत्रीं लिहिला होता त्याप्रमाणें नवाब समसामुद्दौलाबहादर यांसी निवेदन केला. व त्याणीं आज्ञा केली त्याप्रमाणें आपणास लिहिलेंच आहे. पाहून अर्थ ध्यानास आलाच असेल. सांप्रत नवाबसाहेबांनीं फिरोन आज्ञा केली जे मृगसाल अखेर जालें. अद्याप पैसे येत नाहींत. जागीर नवानाचे धाकटे भाऊ मीरमोगल यांची आहे. ते आपले पैशाकारितां आखड ह्मणतात. यास्तव त्याचे आज्ञेप्रमाणें लिहिलें जातें कीं तेथील ताहुदापैकीं सर्व हमेबंदी आपण लिहून पाठविली त्याप्रमाणें वायदेहि आकार जाले. तरी पैसे ताहुदाचे झाडियानसी हुंडी करून पाठविले पाहिजेत व मुतसदी यांचा खर्चहि तीर्थस्वरूप पंतांनीं ठहरविला होता त्याप्रमाणें मुतसद्दी यांचाहि ऐवज पाठविला पाहिजे. ज्या गोष्टीनें येथें आह्मास बोलावयासी उजागिरी राहे तो अर्थ केला पाहिजे. सारांश कुल पैसे लौकर पाठवावे. हे विनंति.

राजश्री शानजीपंत दि॥ शहानवाजखान याची जागीर मौजे गोसेगांव प॥ अंतुर आहे. अशास, म॥रनिलेचे जागिरीचा अंमल नवाब समसामजंगाचे जागिरीप्रमाणें घेत जाणें. ऐसें आज्ञापत्र श्रीमंताचे राजश्री नारोबा बाजी याचे नांवें हसल होत असले तरी प्रयत्न करून पाठविलें पाहिजे. हे विनंति. राजश्री अवधूतरावबावा येथें गंगाजान्हवी मातुश्री बयाबाईचे भेटीस जेष्ठ शुद्ध एकादशीस आलेत. मजलाहि दर्शनाचा लाभ घडला. दोन चार दिवस राहून नवाब समसामजंगाची भेटी घेऊन रुखसत होऊन जातील. कळावें ह्मणोन लिहिलें असे. हे विनंति. र॥ छ १४ रमजान, बुधवार.

कांहीं आज्ञापत्रें चिरंजीव रा॥ नारायणरायाचे नांवचीं होतीं व कांहीं माझे नांवें होतीं. त्यास त्याचे नांवें होतीं त्याचे जवाब त्याचेच नांवें लिहून पाठविलेत. माझें नांवें होतीं त्यांतील मजकुराचे जवाब मी विनंतिपत्रीं लिहिला. ते येका जागा पुरवणिया पत्रांच्या मिळतील, यास्तव लाखोटे वेग-

ठाले करून पाठविलेत. कळले पाहिजे. आपणास पत्राचा जवाब शहानवाजखानांनीं लिहिला तो मुनशापासून गुना जाला. मागून दुसरा तयार करून पाठवितों. हे विनंति.

---

[ ६६ ] **श्रीशंकर.** १९ जून १७५७.

सेवेसी विज्ञापना. बिजेसिंगाकडील मातबर कारभारी सांप्रत येथें आले. सांप्रत बिजेसिंगाचा भाव असा आहे कीं शिंद्याशीं व आपल्याशीं सलोख करून द्यावा. आह्मीं सांगूं तें बिजेसिंग ऐकणार व दत्तबांनींहि ऐकावें. लटका कजिया कशास करावा ? याखेरीज रुपयाची मामलत थोडीबहुत

---

१५० ह्यावरून असें दिसतें कीं विजेसिंग व रामसिंग ह्यांच्यांतील राज्याची कायमची वाटणी अद्यापपर्यंत ह्मणजे १९ जून १७५७ पर्यंत झाली नव्हती. श्रीमंत सावनूरच्या मोहिमेस जाण्यापूर्वीं ह्मणजे १७५५ आगष्ट–सप्टेंबरच्या पूर्वीं विजेसिंग व रामसिंग ह्यांची निमेनिम वांटणी झाली ह्मणून भाऊसाहेबांची बखर पृष्ठ २०।२१ त लिहिलें आहे; परंतु, ती वांटणी पुढें बिजेसिंगानें मोडली असें दिसतें. कारण अबदाली गेल्यावर ह्मणजे १७५७ नंतर विजेसिंग रामसिंगास एक खेडेंहि देण्यास तयार नव्हता. दत्ताजी ह्या वेळीं ह्मणजे १९ जून १७५७ त दक्षणेंत होता; तो आल्यानंतर त्याच्या सल्ल्यानें रामसिंग व विजेसिंग यांची पुन्हा वांटणी झाली असावी. भाऊसाहेबांच्या बखरींत नानासाहेबांनीं दत्ताजीचें सांत्वन सावनुरच्या मोहिमेच्या अगोदर केलें आहे ह्मणून ह्मटलें आहे; परंतु तें बरावर नाहीं. कारण, १७५५ च्या जूनांत किंवा जुलैंत जयाप्पा मारले गेले. नंतर चार सहा महिने वेढा चालून अंताजीमाणकेश्वराच्या हस्तें बिजेसिंगाचा व दत्ताजीचा तह झाला ( पत्रें व यादी ४५१ ). नंतर उज्जनीस येऊन व बुंदीच्या राणीला सहाय्य करून शिंदे चांभारगोंद्यास आले ( भाऊसाहेबांची बखर, २०।२१ ). ह्या इतक्या गोष्टी करून शिंद्यास चांभारगोंद्यास येण्यास १७५५ साल सबंद संपावें असा अदमास आहे. सावनूरची स्वारी १७५६ च्या मेंत संपली त्यानंतर किंवा त्या सुमारास दत्ताजीची व नानासाहेबाची भेट झाली असावी. सावनूरच्या स्वारीच्या अगोदर दत्ताजीचें सांत्वन करणें अशक्य होतें. दत्ताजीचें सांत्वन पेशव्यांच्या हातून होणें सावनूरची मोहिम संपता संपताच शक्य होतें.

करावी, चाकरी बराबर करावी. लाहोर, मुलतान, दिल्ली, आगरे, प्रयाग, जेथपर्यंत न्याल तेथपर्यंत जाऊन चाकरी करून दाखवावी. परंतु रामसिंगास राज्य देऊं नये. ऐसा भाव आहे. आह्मांस कारभारी आले आहेत त्याचे जबानीं सांगोन पाठविलें आहे कीं जें तुह्मीं सांगाल त्यास आह्मीं कबूल. बलकी, एखाद्यास राज्य देववाल तरी देऊं. ऐसें सांगोन पाठविलें आहे. परंतु आह्मीं राज्य देवविल्यानें कोठें देतील ! परंतु तोडमोड सांगू ते ऐकतीलसें दिसतें. राजश्री दत्ताजी शिंदे येतील त्यांसाहि आपण सांगावें; ह्मणजे दोघांचा सलुख करून देऊं. जर दत्तबांनीं ओढिलें तरी आमचा इलाज नाहीं; परंतु ओढिल्यास परिणाम उत्तम नाहीं. फिरोन खर्चाखालींच येतील व मामलताहि होणार नाहीं. ऐसें दिसतें. यामध्यें आपली मर्जी कशी ते ल्याहावी. आह्मीं तरी बिजेसिंगासी कबूल केलें कीं तुमचे तर्फेनें दत्तबास सांगूं व दत्तबाचे तर्फेनें तुह्मांस सांगूं. तुह्मीं दोघांनींहि ऐकावें. तें त्यांनीं मान्य केलें. तुर्त आह्मीं मोघमच ठेविलें आहे व चाकरीस बलावितों. बहुधा येतीलसें दिसतें. जेव्हां अवदाली ये प्रांतीं होता तेव्हां आमचे देखील सारे मुत्सदी ह्मणत होते कीं तुह्मीं बिजेसिंगाचे मुद्दे कबूल करून बलावा ह्मणजे तुमचें राज्य राहील. नाहीं तरी, आतां गोष्टी भारी पडली. तेव्हां बिजेसिंगाचे मुद्दे हे होते कीं मी एक खेडें रामसिंगास देणार नाहीं. अबदालीशीं लढाईची चाकरी मात्र करीन. मामलत रुपयाची सोडावी. फार तरी पांचचार लक्ष देईन. हे गोष्टी जर दत्तबांनीं कबूल केली नाहीं, तरी तुह्मीं व मल्हारबांनीं माझे सोबती व्हावें ऐसें बोलत होते. तें आमचे सारे मुत्सदी कबूल करावें म्हणत होते व मल्हारबाचाहि भाव होता. मीं साफ सांगितलें कीं तुझा मुजाका आह्मी बाळगीत नाहीं. शिंद्यापेक्षां तूं आह्मांस अधिक नाहीं. फार जाहालें तरी आह्मांबरोबर येणार नाहींस. तरी तुजवांचून काय तटलें आहे ? आमचे नशीबीं असेल तें होईल.

१५१ जयाप्पाप्रमाणेंच दत्ताजीचा व जनकोजीचा मल्हारराव द्वेष करीत असे व शिंद्याच्या शत्रूला साहाय्य करण्याची त्याला शरम वाटत नसे असें जें बखरीत लिहिलें आहे तें खरें आहे.

पुण्यप्रताप तीर्थरूप नानासाहेबांचा आमचे मस्तकीं आहे. तरी आतां अब-दालीस मारितों. तूं फार जहालें तरी तिकडे जाशील. तेहि कबूल. परंतु हे गोष्टी कबूल करीत नाहीं. तेव्हां आठ दिवस दम धरून पाहिलें. चहूं-कडून इलाज केले. परंतु मीं एकच जाब दिल्हा कीं आतां नशिबावरी बेतली. आतां दत्तबा नसतां मी कबूल करणार नाहीं. दत्तबा असता तरी सांगतो. त्याजवर रागेंहि भरतो. परंतु पाठीमागें हें कबूल न करूं. तेव्हां आठा दिवसांनीं वकिलांनीं कबूल केलें कीं आमचा व दत्तबाचा सलूख तुह्मीं मध्यें पडून करून द्यावा, आह्मी चाकरी करितों. तेव्हां वख्तावर नजर देऊन गोष्टी क़बूल केली व वकिलास पाठविलें. तो जाऊन त्याचे कारभारी घेऊन आला. याशीं बोललों ह्मणजे बिजेसिंगहि येईल. याप्रमाणें वर्तमान कच्चें स्वामीस दखलगिरी असावी ह्मणोन लिहिलें असे. दोनदा कागद वाचावा. हे विज्ञापना.

पै॥ छ २० सवाल.

---

[ ६७ ] ॥ श्रीशंकर ॥ १९ जून १७५७.

सेवेसी विज्ञापना. अबदाली[१५३] दिल्लीहून माघारा गेला. तेव्हांच आह्मी

---

१५२ हें वाक्य दादांच्या नित्यांतल्या बोलण्यांपैकीं आहे. काव्येतिहाससंग्रहांतील पत्रें व यादी ( ३३ ) त " यवनाची फौज बुडावतों " असें ह्याच मासल्याचें वाक्य आहे. हें सबद पत्र व विशेषत: शेवटलें अर्ध दादांच्या भोळ्या, तापट, विश्वासू , संतापी, माथेफिरू व एका प्रकारें लुच्या स्वभावाचें उत्तम दर्शक आहे. दत्ताजीच्या विरुद्ध आपण कालत्र-यींहि जाणार नाहीं हें नानासाहेबांना पक्कें कळावें व त्यांच्या द्वारा पत्रानें किंवा समक्ष दत्ताजीस कळावें हा हें पत्र लिहिण्याचा व तें दोनदा वाचण्यास सांगण्याचा मुख्य हेतु आहे.

१५३ ह्या पत्रावरून अबदाली दिल्लीहून माघारीं १९ जून १७५७ च्या पूर्वी बरेच दिवस गेला होता असें दिसतें. १६ फेब्रुवारी १७५७ च्या अगोदर त्याला थोडे दिवस दिल्लीस येऊन झाले होते ( लेखांक ५२ ). मथुरा, वृंदावन, आग्रा, हीं शहरें लुटल्यावर

मल्हारबास ह्मणत गेलों कीं जशी तशी माधवसिंगाची मामलत त्रिल्हेस लावून

तो झांशीस येणार होता. परंतु तसें न करतां तो लवकरच ह्मणजे सुमारें एप्रिल १७५७त परत देशीं गेला [ लेखांक ७० ]. असें असून ११ सप्टेंबर १७५७ त अवदालीनें दिल्ली लुटली ह्मणून कीन ह्मणतो तें कोणत्या भक्कम आधारावर ह्मणतो तें कळत नाहीं. तसेंच दिल्ली घेण्यापूर्वी, मथुरा, वृंदावन, आग्रा इत्यादि शहरें अवदालीनें लुटलीं व नंतर ११ सप्टेंबरांत तो दिल्लीस आला असें कीन ह्मणतो ( Fall of the Mogal Empire *pp*. 38/39). परंतु तें लेखांक ६३ ह्यांतील हकीकतीच्या विरुद्ध आहे. मथुरा, आग्रा इत्यादि शहरें अवदालीनें १७५५ त लुटलीं, मध्यें रोग उद्भवला ह्मणून तो काबुलाला परत गेला व तेथून हिंदुस्थानास १७५६ च्या प्रारंभास आला, असें डफ मराठ्यांच्या इतिहासाच्या २१ व्या भागांत लिहितो. परंतु तेंहि ह्या पत्रांशीं व कीनच्या ११ सप्टेंबर १७५७ त तो दिल्लीस आला, ह्या मजकुराशीं जुळत नाहीं. खरी गोष्ट अशी आहे कीं अवदाली चैत्रपर्यंत ह्मणजे मार्च १७५७ पर्यंत मथुरेवर होता ( लेखांक ७० ). त्यानें, मथुरा, वृंदावन, आग्रा, इत्यादि शहरें, फेब्रुवारी, मार्च १७५७ त लुटलीं व नंतर तो एप्रिल १७५७ त देशीं परतला. १७५५ त अवदाली हिंदुस्थानांत आलाच नाहीं; तेव्हां तो काबुलाला जाऊन १७५६ च्या प्रारंभीं हिंदुस्थानांत परत आला हें ह्मणणेंच असंभवनीय आहे. तो १७५६ च्या शेवटीं हिंदुस्थानांत आला व १७५७ च्या प्रारंभास त्यानें आग्रा, मथुरा इत्यादि शहरें लुटलीं व १७५७ च्या एप्रिलाच्या शेवटीं तो काबुलास परत गेला. अर्थात् १७५७ च्या सप्टेंबरांत तो दिल्लीस नव्हता. कारण रघुनाथराव १७५७ च्या जुलैंत दिल्लीस जाऊन बसले होते ( लेखांक ७१ ). ११ सप्टेंबर १७५७ ह्या तारखेंत व ११ सप्टेंबर १८५७ ह्या तारखेंत बरोबर एका शतकाचें अंतर आहे. ११ सप्टेंबर १८५७ त इंग्रजांनीं बंडवाल्यांपासून दिल्ली घेतली. तेव्हां १७५७ तल्या ज्या तारखेला अवदालीनें दिल्ली घेतली त्याच तारखेला आह्मीं इंग्रजांनीं दिल्ली घेतली, तेव्हां हा कांहीं तरी शतसांवत्सरिक दैवी योग आहे, इत्यादि विचार कीनच्या डोक्यांत येऊन, त्यानें ह्या ११ सप्टेंबरावर विशेष भिस्त ठेविली आहे. परंतु अवदाली १७५७ च्या एप्रिल,–मेंत काबुलास गेला असें आमच्या पत्रांत लिहिलें असल्यामुळें, ११ सप्टेंबर ह्या शतसांवत्सरिक तारखेस अवदाली दिल्लीस आला हें ह्मणणें निव्वळ कल्पना आहे !

तसेंच रघुनाथराव १७५६ च्या शेवटीं माळव्यांत आला असें ग्रांटडफ् लिहितो. परंतु लेखांक ( ५२ ) ह्यांत रघुनाथराव छ २४ जमादिलावल, सनसब्वांत ह्मणजे १४ फेब्रुवारी १७५७ स इंदुरास आला असें स्पष्ट लिहिलें आहे. रघुनाथराव इंदुरास असतांना अवदाली दिल्लीस होता ( ५२ ). दोन तीन महिने अवदाली दिल्लीस रहातां तर दादांनीं त्यास खास गांठलें असतें. परंतु तो राहिलाच नाहीं, तेव्हां दिल्लीस जाऊन बसण्याखेरीज व नजीबखानाचें पारपत्य करण्याखेरीज दुसरें कांहीं काम दादांस राहिलें नाहीं. नंतर गाजुद्दिनाच्या सांगण्यावरून दादांनीं लाहोरावर स्वारी केली.

दिल्लीसुभा व लाहोर हे दोनहि सुभे जप्त करा. ह्मणजे चार रुपयेहि येतील व नक्षहि होईल. अबदालीचा पिछा केला असें होईल. परंतु यांणीं लटकींचें[154] लचांडें माधवसिंगाकडे काढून तीन महिने लांबविले. आह्मांस भक्षावयास नाहीं. कर्जहि न मिळे. ऐसें झालें. सांप्रत मल्हारबाशिवाय मामलत माधवसिंगाशीं जी साधेल ती करून पुढें जाणार. येथील कारभार ओढला. फार लटकींच लचांडें काढावीं. ऐसें केल्यानें कारभार शेवटास जात नाहीं. तपशील फारच आहेत. स्वभाव स्वामीस वाकीफ आहेच. परंतु सूचना मात्र लिहिली आहे. स्वामींनीं फिकीर न करावी. आह्मी आपले कृपेकरून कारभार उत्तम प्रकारें शेवटास नेतों. कळावें. छ १ सवाल. बहुत काय लिहिणें. हे विनंति. पै॥ छ २० सवाल.

---

[ ६८ ] पै॥ छ १६ सवालसमान. श्री भवानीप्र॥[155] २१ जून १७५७.

श्रीमंत सद्गुणमूर्ति साहेबाचे से॥

आज्ञाधारक कृष्णाजी त्रिंबक सा॥ नमस्कार उपरी विनंति. किल्ले दौलताबाद[156] स्वामींनीं शहानवाजखान आपला मित्र जाणून त्यास घेणें ह्मणोन परवानगी पाठविली त्याजवरून व किल्ले मजकूर फत्ते केलियावर मुबारकबंदीचीं[157] पत्रें पाठविलीं याजवरून शहानवाजखान फारच संतोष पावला. यह-

---

१५४ मल्हारबाचें शिंद्यांशींच वांकडें होतें असें नाहीं. श्रीमंतांशींहि तो खोटेपणा करण्यास चुकत नसे.

१५५ हें पत्र १७५७ त निजामाशीं झालेल्या शिंदखेडच्या लढाईच्या वेळचें आहे.

१५६ दौलताबादेचा किल्ला शहानवाजखानानें १७५७ च्या आगस्टानंतर घेतला ह्मणून ग्राटडफ् ह्मणतो. ह्या पत्रांत १७५७ च्या जूनच्या पूर्वींच शहानवाजखानानें तो आपल्या स्वाधीन करून ठेविला होता असें लिहिलें आहे व हेंच जास्त विश्वसनीय आहे.

१५७ आनंदप्रदर्शनार्थ.

सानमंद झाला. स्वामींची मरजी कांहींक दिवसांपासून कीं किल्ला अहमर्द[१५८]-नगर सरकारांत मागावा, हें त्यास कळलें होतें व सांप्रत तीर्थरूप रा॥ जीवनराव केशव यांचेहि सांगितल्यावरून स्वामींची मर्जी त्यास पुरती कळली त्याजवरून स्वामींची खातर जरूर जाणून किल्ले अहमदनगर स्वसंतोषें स्वामीचे नजर केला. स्वामींनीं घ्यावयासीं सनद करून देतां येत नाहीं. येथील सर्व लोक शब्द लावतील. यास्तव परवानगी दिधली पुरे. स्वामीस तो किल्ला घेणें कांहीं कठीण नाहीं. परंतु येथील परवाने जागिरीचे जाल्यानंतर विनंति लिहूं तेव्हां किल्यास माहसरा करावा, आतांच आरंभ न करावा, व चर्चाहि या गोष्टीची न व्हावी. कांहींक दिवस गोष्ट चित्तांतच राहिली पाहिजे. कविजंग तेथें आहे. त्याणें तेथें राहिल्याचीहि चिंता नाहीं. कदाचित् त्यानें तेथें नसावें, नवाबापाशीं यावें, अशी सलाह असलिया आज्ञा सादर व्हावी. ह्मणजे त्यास तेथून येथें आणावयाचा प्रयत्न केला जाईल. सविस्तर तीर्थस्वरूप राजश्री जीवनराव केशव यांचे विनंतिपत्रावरून अर्थ कळों येईल— हें विनंति.

रा॥ छ ११ सवाल.

---

[ ६१ ] ॥ श्रीशंकर ॥ १२ जुलै १७५७.

सेवेसी विज्ञापना. बापूजी महादेव व ¶दामोदर महादेव वगैरे वकील यांचें पारपत्य करावें, जप्ती करावी, कां कीं ते हुजूर येत नाहींत व चाकरी यथास्थित करीत नाहींत ह्मणोन आज्ञा. ऐशीयासी, त्यांचें पारपत्य करणें अगाध नाहीं. एक हुजूर आले नाहीं हें तो खरेंच. परंतु त्यासहि एक सबब होता. कोणता ह्मणावा ? धोंडीबा नाईक नवाळे यांजपासून

१५८ अहमदनगरचा किल्ला कविजंगानें पुढें उदगीरच्या लढाईच्या अगोदर पेशव्यांना प्रसिद्धपणें दिला. सध्यां गुप्तपणें तो पेशव्यांच्या हातीं पडल्यासारखाच होता.

¶ पत्रें व यादी १६२ त ह्या दामोदर महादेवाचा उल्लेख आहे.

मागील स्वारीमध्यें आह्मीं कर्ज दहा लक्ष पर्यंत घेतलें त्यामध्यें त्यांणीं परगणे तोडून दिले होते. त्याचा वसूल करून धोंडीबा नाईक यास देणें ह्मणोन त्यास चाकरीच सांगितली होती. ते वसूल करीत होते. मध्यें वजिरांनीं लबाडी करून थोडे बहुत रुपये परगण्यापैकीं घेतले. याजमुळें त्या बखेड्यांत वगैर बखेड्यांत होते. सारांश लबाड तर आहेतच, परंतु फार हरामखोरी केवळ आंगीं लावीन ह्मटल्यास नाहीं. स्वामींनीं लिहिलें कीं मल्हारबास पुरतें हातीं घेऊन मग पारपत्य करावें. दामोदर व पुरुषोत्तम यांची जप्ती करावी व त्यांस दूर केलें अशी शौरत करावी ह्मणजे हलके पडतील ह्मणोन आज्ञा. तरी इतकें कांहीं संकट नाहीं. मल्हारबाचा त्याचा पेंचच आहे. दिल्लीहून आणीन ह्मटल्यासहि शंभर राऊत धरून आणतील. तेथें कांहीं विशेष नाहीं. सांप्रत दामोदर तर वारले. बापू व दामोदर येथें आणून स्वामींकडे पाठवूं इतका अगाध त्याचा मजकूर काय आहे ? परंतु केवळ बेअब्रू करावे इतका अन्याय नाहीं. थोडे बहुत अन्याय, तरी बहुतच आहेत, त्याप्रमाणें पारपत्य करावेंच लागेल. स्वामी करतीलच. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

पै॥ छ २४ जिलकाद. श्रावण वद्य एकादशी.

---

[ ७० ]

॥ श्रीशंकर ॥ १२ जुलै १७५७.

सेवेसी विज्ञापना. यंदा फौज चैत्र वैशाखांत आली व अब्दाली चैत्रपर्यंत मथुरेवर होता. याजमुळें आह्मास एखादा मनसुबा करावयास न

१५९ कांहीं मनसुबा करून पैसे मिळवावे व पुण्याहून पैसे मागविण्याचें प्रयोजन पडूं नये असा रघुनाथरावाचा मनापासून इरादा होता. परंतु, अवदालीनें दिल्ली भोंवतील सर्व प्रांत वेचिराख केल्यामुळें त्याचा निरुपाय झाला. मल्हारबाहि अडथळे आणूं लागले.

फावलें. अंतर्वेद वगैरे अंमल उठला होता, याजमुळें सखारामपंताबराबर पांच हजार फौज देऊन सखाराम व विठ्ठलपंत व गंगोबा ऐसे वीस हजार फौज अंताजी देखील अंतर्वेदींत पाठवून बंदोबस्त केला. वैशाख व ज्येष्ठ दोन महिने आह्मास रिकामे सांपडले. त्यामध्यें पहिली गडबड जाहाली होती ते वारली; व जेपूरचे अकरा लक्ष घेतले. त्यांपैकीं साहा तुर्त व पांचाचा ओला आहेत. ऐवज येईल तेव्हां प्रमाण ह्मणावा. याप्रमाणें जाहालें. सारांश, आह्मांस रुपयांची ओढ भारी आहे; यास्तव स्वामींनीं ऐवज देववावा. असो. स्वामींसहि ओढ असेल, कर्ज करीत असतील; याजमुळें आह्मीहि कळेल तसें चालवूं. परंतु, कडाकुरा येथील तरी ऐवज गोविंद बल्लाळ व गोपाळराव गणेश यांजपासून रसद देववावी. हिकडे महागाई फार, याजमुळें लोकही कर्जदार झाले आहेत; यास्तव जरूर जाणोन लिहिलें असे. तरी याप्रमाणें करावें. येविसी अलाहिदा पत्रेंहि पाठविलीं आहेत. गोविंदपंतापासून कदाचित् स्वामींनीं रसद घेतली असली तरी मोबदला ऐवज त्याजपासून आह्मास देववावा. दहा लक्ष दोघांकडील होतील. याखेरीज मग जसें बनेल तसें करतों. स्वामीपावेतां स्वामींचे दयेनें फौजेचा बोभाट[१६०] येणार नाहीं. यंदा दिवसगतीमुळें ऐवज वसूल न जाहाला;

---

तेव्हां निरुपाय होऊन त्यानें हें पत्र पुण्यास लिहिलें. पुढें मल्हाररावांनीं अडथळे अतिशयच जेव्हां आणिलें, तेव्हां दादांनीं मामलत रगडून करून कशीवशी पोट भरण्याची व्यवस्था केली.

१६० ह्यावरून दादा सदा कर्जबाजारी असत असें दिसतें. १७५४ च्या मोहिमेंतहि दादा कर्ज करून आले होते व तें त्यांनीं धोंडीबा नाईक नवाळे ह्याच्यापासून घेतलें होतें ( लेखांक ६९ ). तेव्हां दादा इतर सरदारांप्रमाणें स्वारीहून पैसे कमावून न येतां गमावून येत असत असा जो त्यांच्यासंबंधीं बोभाट होता ह्मणून बखरींत लिहिलें आहे तें खरें आहे असें दिसतें. ह्या दिल्लीलाहोरच्या स्वारींत असा बोभाट येऊं द्यावयाचा नाहीं असा दादांचा विचार होता हें ह्या पत्रावरून उघड आहे. परंतु हा विचार पुढें खोटा ठरला हें इतिहासप्रसिद्ध आहे. लाहोरच्या मोहिमेंत "लुटीनें पेंढारी व लष्कर कुबेर जाहले," ह्मणून भाऊसाहेबांच्या बखरींत ( पृष्ठ ३६ ) ह्मटलें आहे. मग दादाच तेवढे ऐशीं लक्ष रुपये कर्ज करून कां आले तें कळत नाहीं. मल्हारराव होळकर त्यांच्या बराबर

सबब लिहिलें असे. इटावें, फफुंदेचा ऐवज अंताजीस देववावा लागेल. सर्व स्वामींस कळावें ह्मणोन लिहिलें असे. बहुत काय लिहिणें. जुने महाल अंतर्वेद वगैरे आहेत. त्याची रसद आह्मी घेत नाहीं. जरूर जाणोन लिहिलें असे. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

पै॥ छ २४ जिल्काद, श्रावण वद्य ११.

---

[ ७१ ] ॥ श्रीशंकर ॥ १२ जुलै १७५७.

सेवेसी विज्ञापना. अबदाली जर कदाचित् मार्गशीर्षपौषांत आला तरी इकडे मनसुबा भारीच आहे. गुजरातेची[१६१] मजकूर थोडकाच आहे. तिकडे

---

होते, परंतु त्यांना कोठें कर्ज झाल्याचें लिहिलेलें नाहीं. दादांना कर्ज कोणच्या कारणानें झालें ह्या मुद्याचा खुलासा केलेला कोठें बखरींत दिसत नाहीं. दादा खुषींत असतां त्यांना फसवून मल्हाररावानें तर ह्या स्वारींत मिळालेला पैसा लाटला नसेल? अबदालीनें मुलूख लुटून नेला व त्याच्या पाठोपाठ दादा गेले तेव्हां त्यास किफायत कांहीं एक झाली नाहीं ह्या ह्मणण्याचा "पेंढारी व लष्कर कुबेर जाहाले" ह्या ह्मणण्याशीं विरोध दिसतो. बहुशा मल्हाररावानें दादांस फसविलें असावें हाच तर्क खरा वाटतो. पैसे उपटण्याकरितां मल्हारराव काय काय खेळ करीत असत हें लेखांक ७१ त नामी वर्णिलें आहे.

१६१ ह्यावरून व लेखांक ५२ यावरून १७५७ तहि गुजराथेकडे अमदावाद इत्यादि ठिकाणीं गडबड झाली होती असें दिसतें. अमदाबाद "कायमची" १७५५ एप्रिलांत अमलांत घेतली ह्मणून मराठी दफ्तरावरून डफ लिहितो व हें त्याचें ह्मणणें खरें आहे. परंतु ती १७५३ च्या एप्रिलांत रघुनाथरावानें सर केली होती हें खरें असून त्याला ग्राह्य नाहीं. कां कीं रघुनाथरावाची गुजराथेवरील दुसरी स्वारी १७५४ त सुरू झाली असें घेऊन त्यानें गणित केलें आहे व हेंच त्याच्या चुकीचें मुख्य कारण आहे. रघुनाथरावाची गुजराथेवरील दुसरी स्वारी कधीं झाली व तो १७५२, १७५३, १७५४, १७५५, ह्या सालीं कोठकोठें होता हें कळलें असतां रघुनाथरावानें १७५३ च्या एप्रिलांतच अमदावाद सर केली असली पाहिजे व १७५५ च्या एप्रिलांत मराठ्यांच्या दुसऱ्या कोणी सरदारांनीं तिजवर कायमचा अंमल बसविला व रघुनाथराव त्या वेळीं ह्मणजे १७५५ एप्रिलांत

दोनचार हजार फौज सदाशिवराव रामचंद्र याचे कुमकेस पाठविली तरी तें काम होई ऐसें आहे. हिकडे दत्ताजी शिंदे याची रवानगी करावी. जर

---

मुळीं गुजराथेंत नव्हताच इत्यादि गोष्टी कळून येतील. रघुनाथरावाची गुजराथेवरील पहिली स्वारी १७५० त झाली (लेखांक २). परंतु ह्या स्वारींत त्यांच्या हातून गुजराथेंत फारसें काम झालें नाहीं. रघुनाथरावाची गुजराथेवरील दुसरी स्वारी १७५१ त झाली. ह्या स्वारींत कांहीं काम करावयाचें तों निजाम पुण्यावर चाल करून आला; तेव्हां दादांना देशीं परत यावें लागलें. नंतर देशीं स्वस्थता झाल्यावर दमाजी गायकवाडास पुढें पाठवून १७५२ च्या जानेवारीं– फेब्रुवारींत (पत्रें व यादी ३६३) रघुनाथरावदादा गुजराथेवरील तिसऱ्या स्वारीस गेले. ते गंगातीरानें गुजराथेंत उतरून २५ जानेवारी १७५३ च्या सुमारास तिकडील मुलुकाचा बंदोबस्त करूं लागले (पत्रें व यादी १४). २७ मार्च १७५३ त अमदावाद रघुनाथरावाशीं झुंजत होती (पत्रें व यादी २८). १७५३ च्या एप्रिलांत अमदावाद सर करून जुनांत ते थालनेरास आले व तेथून १० सप्टेंबर १७५३ त हिंदुस्थानांत जावयास डेरे दाखल झाले (लेखांक २७). २० मार्च १७५४ च्या अगोदर सबंद गुजराथ मराठ्यांकडे झाली, इतकेंच नव्हे, तर द्वारकाहि झाली, असें वासुदेव दीक्षितानें रघुनाथरावाला लिहिल्यावरून रघुनाथरावानें ती गोष्ट २० मार्च १७५४ च्या पत्रांत कबूल केली (पत्रें व यादी २७). २० मार्च १७५४ नंतर दादांना मथुरा हस्तगत झाली (पत्रें व यादी २७). १ आगस्ट १७५४ त रघुनाथराव दिल्लीस होते (पत्रें व यादी ३१, ३२). एप्रिल (वैशाख) १७५५ त रघुनाथराव रोहिलखंडांतून दिल्लीस परत आले (४५१ पत्रें व यादी). ह्यावरून १७५५ च्या एप्रिलांत रघुनाथराव दिल्लीस होते हें स्पष्ट आहे. १७५३ सालच्या जूनपर्यंत दादा गुजराथेंत होते. त्या वेळीं त्यांनीं अमदावाद सर केली, परंतु तींत कायमचा अंमल बसविला नाहीं; तो १७५५ च्या एप्रिलांत श्रीपतराव शेणवी ह्मणून पेशव्यांच्या पदरचा कोणी सरदार होता त्याच्या हस्तें बसविला. येणेंप्रमाणें १७५३ च्या एप्रिलांत रघुनाथरावानें अमदावाद घेतली ह्यांत शंका नाहीं, असें रा० नातू महादजीच्या चरित्रांत लिहितात तें खरें आहे. परंतु अमदावादेंत कायमचा अंमल १७५५ एप्रिलांत बसला हें जें ग्रांडडफ म्हणतो तेंहि कांहीं चूक नाहीं. ग्रांड डफची चूक एवढीच आहे कीं १७५५ तील अमदावादेच्या कायमच्या अंमलासंबंधानें त्यानें रघुनाथरावाचें नांव जोडलें आहे.

रघुनाथरावाच्या गुजराथेंतील दुसऱ्या स्वारीचा शक चुकल्यामुळें ग्रांड डफनें पुढें बऱ्याच चुक्या केलेल्या आहेत. त्या सर्वांत मोठी चूक ह्मटली ह्मणजे जयाप्पाच्या मृत्यूसंबंधीं होय. कुंभेरीचा वेढा, मेडत्याची लढाई, नागोरचा वेढा, रघुनाथरावाची रोहिलखंडांतील कुमाऊच्या पहाडापर्यंत मोहीम, बुंदेलखंड, रजपुताना, अंतर्वेद, रोहिलखंड, इत्यादि प्रदेशांत मराठ्यांच्या सरदारांचीं कारस्थानें, मोहिमा, अंमल, इत्यादि प्रकरणें

अबदाली आला तरी त्याचें पारपत्य केलेंच पाहिजे. न आला तरी कासी,

ग्रांटडफ्नें अजीवात गाळलीं आहेत. तीं क्षुल्लक होतीं ह्मणून तीं त्यानें वगळलीं असा अर्थ नाहीं; तर त्या प्रकरणांची त्याला माहिती न मिळाल्यामुळें फारशी ओळखच नव्हती हें तो स्वत:च कबूल करतो.

जयाप्पाच्या मृत्यूची तारीख आपल्याला कोठें सांपडली नाहीं ह्मणून ग्रांटडफ्नें आपल्या इतिहासाच्या एकविसाव्या भागांत ह्मटलें आहे. त्याला तारीख सांपडली नाहीं इतकेंच नव्हे तर जो सन सांपडला आहे तोहि अगदींच चुकलेला आहे. ग्रांटडफ्नें जयाप्पाच्या मृत्यूची हकीकत मागला पुढला कांहीं एक संबंध नसतां मध्येंच एका ठिकाणीं घुसडून दिली आहे. ग्रांटडफ्च्या मतें जयाप्पाच्या मृत्यूचें साल इ. स. १७५९ हें होय. परंतु तें साल खरें नव्हे हें पुढील तारखांवरून कळून येईल.

१७ मे १७५४ पर्यंत कुंभेरीचा वेढा चालला होता ( लेखांक ३५ ). तेव्हां कुंभेरीच्या वेढयाचें साल काव्येतिहाससंग्रहकार ह्मणतात ( भाऊ साहेबाची बखर पृष्ठ १२ ) त्याप्रमाणें १७५३ नसून १७५४ होय. पुढें जयाप्पा १० रमजान खमसखमसैनांत ह्मणजे २ जुलै १७५४ त रघुनाथरावाच्या सैन्यांतून कदाचित् कुंभेरीहून ( भाऊसाहेबाची बखर पृष्ठ ११ ) किंवा बहुश: मथुरेहून ( पत्रें व यादी ४५१ ) किंवा कदाचित् दिल्लीहून ( पत्रें व यादी ३२ ) निघून मारवाडास गेला तों १६ सवालीं ह्मणजे ६ आगष्ट १७५४ स मेडत्यास पोहोंचला ( लेखांक ३७ ). २० आगष्ट १७५४ च्या अगोदर जयाप्पानें कृष्णगड घेतला ( पत्रें व यादी ३९८ ); व १५ नोव्हेंबर १७५४ च्या एक महिना अगोदर त्यानें विजेसिंगाला मेडत्याच्या लढाईत चीत केलें ( पत्रें व यादी ३९३ ). १५ जानेवारी १७५५ त नागोरचा वेढा चालला होता ( लेखांक ४४ ). ४ मार्च १७५५ च्या सुमारास विजेसिंगानें मिरता वगैरे ठाणीं लुटलीं; तीं जयाप्पानें पुन्हां घेतलीं ( लेखांक ४८ ). १२ जून १७५५ त जयाप्पानें गोपाळराव गणेशास पत्र लिहिलें ( लेखांक ४९). त्यानंतर सन सीतखमसैनच्या १५ सवालचें ह्मणजे २५ जुलै १७५५ चें रामाजी अनंत दाभोळकर याचें नानासाहेब पेशव्यांस पत्र आलें, त्यांत जयाप्पाच्या मृत्यूची वार्ता लिहिली होती ( पत्रें व यादी ३५२ ). ह्यावरून जयाप्पा २५ जुलै १७५५ च्या अगोदर वारले हें उघड आहे व ग्रांटडफ्चें १७५९ साल चुकलें आहे हें स्पष्ट होतें. आतां हें १५ सवालचें पत्र सीत सालचेंच कशावरून? तर पत्रें व यादीं ( ३८६ ) त जयाप्पाच्या मृत्यूचा उल्लेख केला आहे व तें पत्र २२ जिल्हेज सन सीत खमसैन मध्या व अल्लफांत लिहिलें आहे. त्याच पत्रांत ३५२ पत्राचा उल्लेख केला आहे. ह्यावरून १७५५ हें जयाप्पाच्या मृत्यूचें साल होय हें खास आहे. आतां ह्या मृत्यूची तीथ कोणती तें पाहूं. पत्रें व यादीं ( ४५१ ) त जयाप्पा ज्येष्ठ वद्य ७ मास मारले गेले ह्मणून अंताजी माणकेश्वर लिहितो. सीत सालीं ज्येष्टाचे दोन महिने होते. पैकीं दुसरा ज्येष्ठ १५ सवालच्या ह्मणजे

बंगाला, ये प्रांतीं स्वारी केलियास चार रुपये आकारताल. कपाळ स्वामींचें

२५ जुलैच्या जवळ जवळ आहे. ज्येष्ठ वद्य ७ अथवा ३० जून १७५५ ही जयाप्पाच्या मृत्यूची तारीख ठरते. आतां जयाप्पासारखा मोठा सरदार वारला, तेव्हां त्याच्या मृत्यूची बातमी लगेच त्याच दिवशीं किंवा फार झालें तर दुसऱ्या दिवशीं नानासाहेब पेशव्यांना गेली असावी असाहि तर्क करणें साहजिक आहे. ह्या तर्काप्रमाणें २४ किंवा २५ जुलै १७५५ ही जयाप्पाच्या मृत्यूची तारीख होते.

जयाप्पासंबंधीं येथें विचार चालला आहे त्याअर्थी जयाप्पाच्या मारवाडांतील मोहिमेसंबंधीं भाऊसाहेबांच्या बखरींत कित्येक चुका झाल्या आहेत त्या येथें दाखवून दिल्यास योग्य होईल. (अ) कुंभेरीचा वेढा झाल्यावर व जाटांशीं तह केल्यावर रघुनाथरावदादा देशीं परत आले व मल्हाररावानें इंदुरास येऊन छावणी दिली असें भाऊसाहेबांच्या बखरींत (आवृत्ति दुसरी पृष्ठ १२) त ह्मटलें आहे. परंतु कुंभेरीचा वेढा १७५४ च्या मेंत संपल्यावर (लेखांक ३५) दादासाहेब व मल्हारराव दिल्लीच्या कामास गेले (लेखांक ३९); ते १७५५ च्या पावसाळ्यानंतर दसऱ्यास पुण्यास येऊन सावनूरच्या स्वारीस मिळाले. मल्हाररावाला इंदुरास कांहीं दिवस स्वस्थपणें राहण्यास वेळच मिळाला नाहीं. (ब) जयाप्पा एकदम कुंभेरीहून निघाला तो नागूरास आला, तेथेंच त्याची व विजेसिंगाची प्राणांतिक लढाई झाली व नंतर कुंभेरीहून निघाल्यानंतर सव्वा वर्षानें ह्मणजे पधरा महिन्यांनीं जयाप्पा मारला गेला, इत्यादि विधानें ह्या बखरीच्या १२ पासून १८ पृष्ठांत केलेलीं दृष्टोत्पत्तीस येतात. जयाप्पा कुंभेरीहून निघाला तों मेडत्यास त्यानें विजेसिंगाला गांठला. नंतर त्यानें कृष्णगड घेतला; व पुढें तो नागोरास गेला. जयाप्पा कुंभेरीहून २ जुलै १७५४ स निघाला (पत्रें व यादी ३२) व ३० जून १७५५ ला तो मारेकऱ्यांच्या हातून मारला गेला (पत्रें व यादी ४५१). तेव्हां कुंभेरीहून निघाल्यापासून मरेतोंपर्यंत सुमारें १२ महिन्यांचा अवधी गेला. कृष्णगड घेऊन व मेडत्याची लढाई खेळून नागोरच्या वेढ्यास जयाप्पा सुमारें १७५४ च्या नोव्हेंबरांत लागावा. तेथपासून मरेपर्यंत आठ महिने होतात. तेव्हां नागोरचा वेढा सरासरी आठ महिने चालला असतां जयाप्पा मेला. (क) मेडत्याच्या लढाईंत दत्ताजी शिंदे होता ह्मणून हा बखरकार लिहितो. परंतु तो १७५५ च्या मार्चांत विश्वासरावाबरोबर शहागडाजवळ होता (लेखांक ४८) व तेथून लवकरच जयाप्पाच्या मृत्यूच्या पूर्वीं नागोरास आला असावा. (ड) रामसिंग व विजेसिंग ह्यांची वाटणी करून देऊन सावनूरच्या लढाईच्या अगोदर दत्ताजी चांभारगोंद्यास आला व तेथें पेशव्यांनीं त्याचें सांत्वन केलें असेंहि हा बखरकार लिहितो. परंतु नागोरास महिना दोन महिने राहून (पत्रें व यादी ४५१) व नंतर बुंदीकोटयाच्या राणीस मदत करून शिंद्यास चांभारगोंद्यास येण्यास बराच वेळ लागावा व सावनूरची स्वारी अर्धीमुर्धी झाल्यावर मग शिंदे देशीं यावें असा तर्क आहे. ह्यासंबंधीं १५० टीपेच उत्तरार्ध पहा.

थोर आहे. प्रयत्न आमचा आहे. तेथें चार रुपये आकारतील ऐसा भरंसा वाटतो. वरकड हिंदुस्थानांत कोठें जीव दिसत नाहीं. जाटांत जीव आहे, द्रव्यवान आहे, परंतु किले मातबर आहेत व मोठा काबूकौर[१६२] आहे. सारांश मातबर मनसुबा केल्याखेरीज ऐवज भारी दिसत नाहीं. दत्तबास पाठवावें ह्मणजे अबदालीचे कामास येतील. तो न आला तरी बंगालियाचा कारभारास कामास येतील. येथें दोन महिने जाहाले. माधवसिंग[१६३] मामलती करीत होता. परंतु मल्हारबा न आइकत. हजारों कजिये माधवसिंगावर काढिले. तो किल्यांत पंधरा वीस हजार फौजेनशीं; आह्मी मल्हारबा बारा चौदा हजारानशीं; बाहेर मल्हारबाची तरी दीडदोन हजार पर्यंत फौज येथें आहे. लटके आपले घराऊ हिशोब काढून मामलत न करीत. आह्मास बाहेर कर्ज देखील भक्षावयास न मिळे. रोज गांव मारून खावे. सांप्रत या मुलुखांत गढ्या फार बांधल्या[१६४] आहेत. झुंजल्याखेरीज दाणा नाहीं, रुपया नाहीं, कर्जहि न मिळे. तेव्हां आह्मीं मल्हारबास टाकून मामलती रगडून केली. त्याचे कानावर घालूनच केली. परंतु कष्टी जाहाले. अकरा पैकीं सहा लक्ष आले, त्या पैकींहि त्याची वांटणी दोन लक्ष देणें पडली. बाकी चार लक्ष आह्मांस ऐवज आला. सारांश मल्हारबा ज्या त्या कारभारांत ओढितात. आह्मी सोशितों. निदानीं येक येक दोन दोन फाके लष्करास जाहाले. तेव्हां येणेंप्रमाणें केलें. पुढें त्यास घेऊन जातों. समजावीसहि करूं. परंतु खुलासा लिहिला आहे. दत्तबा आलियानें परस्परें वर्म असतें. याजमुळें ओढणार नाहीं. आपल्यांत दुही पडते. तेव्हां शत्रूस बळ फावतें. ऐसे हजारों पेंच होतात. कोठवर ल्याहावे ? संकलित लिहिले असेत. बहुत काय लिहिणें. रवाना छ २४ सवाल. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना. पै॥ छ २४ जिलकाद, श्रावणवद्य ११.

---

१६२ छिद्रान्वेषी.

१६३ जयनगरकर. जयनगरच्या माधवसिंगाकडून खंडणी घेण्याकरितां दादा ह्यावेळीं दिल्लीस मुख्य ठाणें ठेवून गेले होते असें दिसतें.

१६४ कधीं अबदालीच्या व कधीं मराठ्यांच्या भयास्तव.

[ ७२ ] ॥ श्री ॥ जुलै १७५७.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री माहादाजी नारायण स्वामी गोसावीं यांसीः—स्ने॥ बाळाजी गोविंद नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मांकडील बहुत दिवस पत्र येऊन तिकडील वर्तमान कळत नाहीं. त्यास तिकडील सविस्तर वर्तमान लिहीत जाणें. खेतसिंगांकडील[१६५] अनुसंधान श्रीमंत राजश्री दादास्वामीकडे गेले. वकील मातबर गेले. येथें कळलें. व श्रीमंतींहि आह्मांस लिहिलें कीं वकील आह्मांकडेस आले. तुह्मांकडे कांहीं बोलीचाली आली किंवा नाहीं तें लिहोन पाठवणें. श्रीमंताकडील कारकूनहि गेले. ऐसें येथें ठीक कळलें. आणि तुह्मीं तिळमात्रहि संभूत लिहिलें नाहीं हें अपूर्व भासतें ! असो. कारकून गेले तें कोठें आहेत ? काय करितात ? कोणाचे अनुसंधानानें गेलें ? तें तपसीलवार वर्तमान ठीक मनांस आणून आह्मांस लिहोन पाठवणें. देशीं तीर्थरुपासहि तपशीलवार लिहोन पाठवणें. म्हणजे तेथें जी खबरदारी करणें तीं करतील. ठीक बातमी हिंदुपतीची व खेतसिंगाची व कारकून बुंदेलखंडांत गेले

---

१६५ हिंदुपत बुंधेले यानें अमानसिंगास ठार मारलें व आपला धाकटा भाऊ दिवाण खेतसिंग यास हाकून दिलें. खेतसिंग रघुनाथराव दादाकडे आश्रा मागण्याला गेला; परंतु हिंदुपतीला गोविंदपंत बुंदेले व त्यांचे पुत्र बाळाजी गोविंद यांचा आश्रा असल्यामुळें खेतसिंगाची बरेच दिवस पेशव्यांच्या दरबारांत दाद पोहोंचली नाहीं ( पत्रें व यादी ११० ). शेवटीं कांहीं प्रांत खेतसिंगांस हिंदुपतीकडून पेशव्यांनीं देवविला. ह्याचवेळीं, माधवसिंग जयनगरकर, रामसिंग मेडतेवाले व पृथ्वीसिंग पन्नावाले इत्यादि रजपूत लोकांचीं राजकारणें पेशव्यांच्या दरबारीं लागलीं होतीं. खेतसिंगाकडील राजकारण रघुनाथरावाकडे जावें व त्याची आपल्याला बातमीहि कळूं नये ह्याबद्दल बाळाजी गोविंद आपल्या कारकुनाला दोष देत आहे व तो दोष देणें रास्त आहे. गोविंदपंत बुंदेल्यांना जर बुंदेलखंडाचे मुख्याधिपति केले होते तर त्यांच्या प्रांतांतील राजेरजवाड्यांच्या तकरारी त्यांच्या द्वारा गेल्या ह्मणजे ठीक पडेल असें गोविंदपंताचें मत होतें. परंतु, गोविंदपंत गैरविश्वासी कामें करतात असा संशय आल्यावरून पेशव्यांना स्वतंत्रपणें बुंदेलखंडांतील राजांची व्यवस्था करणें भाग पडलें असें दिसतें. गोविंदपंत खरोखरच विश्वासार्ह माणूस नव्हता हें पुढच्या एका पत्रांत कलमवार सिद्ध केलें आहे.

आहेत त्यांची मनांस आणून आम्हास लिहिणें. त्यांचें लिणें तपसीलवार तीर्थरुपाकडेस सत्वर लिहोन पाठवणें. केवळ सुस्त न राहणें. वरचेवर लिहीत जाणें. हिंदुपत कोठें आहे ? काय करतो ? खेतसिंग कोठें आहे ? काय करतो ? तो ठीक बातमी सायंत पत्रीं लिहिणें. तीर्थरुपाकडेस जोडी पाठवण्यास ढील तीळमात्र न करणें. आह्मी तुर्त दिल्लीस लष्करीं श्रीमंताचे असो. श्रीमंत राजश्री दादास्वामी जेनगरास होते तेहि आले. येक दोन रोजीं दिल्लीस येतील. भेटी घेऊन बीदा होऊन येतों. तुह्मी आपलें कामकाज कैसें करितां ? पैसा टक्का येतो वाट काय करितात, तें लिहिणें. रसद यंदा ॥येथें देणें लागत्ये. त्यास ऐवज जोडिला पाहिजे. सावकारहि कोणी मातबर नाहीं. त्यास तुह्मांकडेस काय ऐवज आहे तो लिहिणें. कांहीं सावकाऱ्यांत मिळाला तरी मेळवोन लिहोन पाठवणें.

---

[ ७३ ] ॥ श्री ॥ २२ आगष्ट १७५७.

श्रीमंत¶ राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसीः

विनंति सेवक दत्ताजी शिंदे कृतानेक विज्ञापना. सेवकाचें वर्तमान तागाईत छ ६ जिल्हेज पर्यंत यथास्थित असे. विशेष. आज्ञापत्र रविवारचें पाठविलें तें येथें सोमवारीं दोन प्रहरां पावलें. जीवनराव यांचीं पत्रें आलीं तीं बजिन्नस पहावयास रवाना केलीं असत. पाहून आपल्या मतें निश्चय कैसा

---

॥ लेखांक ७० पहा.

¶ लेखांक ७३ पासून लेखांक १२० पर्यंतचीं सर्व पत्रें शिंदखेडच्या लढाईच्या अगोदरचीं आहेत. हीं पत्रें वाई येथील, गोविंदराव भानूंच्या जवळचीं आहेत. हीं पत्रें मूळ बाबूराव फडणिसाच्या दफ्तरांत असलीं पाहिजेत. कारण बाबूराव फडणीस विश्वासरावाबरोबर शिंदखेडच्या मोहिमेंत होता. इतकेंच नव्हे तर मोहिमेचीं सर्व सूत्रें त्याच्या हातीं होतीं.

तो सत्वर लेहून पाठवावा. आमच्या मतें बराच विचार आहे. या गुत्यांतून मोकळें व्हावें, ह्मणून आज्ञा केली. तर जीवनरायानें[१६६] लिहिलेयाप्रमाणें झालें तर उत्तम आहे. पंचवीसा लक्षा रुपयाची जाहागीर, दोन स्थळें, चांगलीं, कज्जा न होतां, मोगल देऊन सलूख करीत असले तर बरेंच आहे. हें साधल्यावर पुढें आणखी त्याजपासून घेतलें जाईल. दिवसेंदिवस मोगल क्षीण होत जाईल त्याप्रमाणें वरचेवर पुढें आणखीहि साधलें जाईल. ऐसें करितां मोगलानें अनुसंधान लावून फौज जमा करून बळ धरलें तर आह्मीहि जात आहों. स्वामीच्या तेजप्रतापेंकरून मनोदयानुरूप होऊन येईल. जे दिवशीं आह्मी बाहेर निघालों तेंच दिवशीं चारशें पांचशें स्वार नगरास पाठविले. त्यांनीं किल्याभोंवतीं चौक्या बसवून रसद बंद केली असे. गंगातीरासहि पांचशे साशे स्वार पाठविले असत. जो कोणी आह्मांजवळ येतो त्यासी वरचेवर तिकडेच पाठवितों. आह्मांपाशींहि पाचशे साशे लोक जमा आहेत. मागूनहि फौज येऊन जमा होतच आहे. हळू हळू मजली ती ती चौ चौ कोसांच्या लोकाकरितां करून गंगातीरास जातों, तों लोकहि कुलीं जमा होतील. इतक्यांत जीवनराव याजकडीलहि पत्रें येतील. त्यांत धातुपोषण आहे किंवा निश्चयात्मक करार करून देतील हेंहि कळों येईल. शहरींहून आमची बातमीची खबर आली आहे. मोगलानें तमाम सरदार, मराठे व फिरंगी, यांसी पत्रें पाठविलीं आहेत. आणि वरचेवर सांडणीस्वार जात आहेत कीं सत्वर येणें. निजामअल्लीकडे पत्रें वऱ्हाड प्रांतीं गेलीं असेत. त्यांनींहि तेथून कुच केलें. त्या ब॥ च्यार पांच हजार फौज आहे. शहरांत नवी फौज ठेवितात. याप्रमाणें वर्तमान आलें असे. कदाचित् बसालतजंगानें हे कुलीं जमा व्हावयानिमित्य जीवनरायासी अनुसंधान लावून जमा झाल्यानंतर पुन्हा दुसरी गोष्ट सांगितलीच, तर चिंता काय आहे? स्वामीच्या आशीर्वादें करून सर्व पाद्राक्रांत होऊन केला मनसबा शेवटास जाईल. मोगलाचीं पत्रें सरदारास व निजामअल्लीस व फिरंगीयांसी गेलीं आहेत.

१६६ जीवनराव खासगीवाले.

जमा होतील किंवा नाहीं हें न कळे. आलें वर्तमान सेवेसी विनंति लिहिली असे. श्रीमंत राजश्री रावसाहेबहि येतील ह्मणोन आज्ञा केली, तर बहुतच उत्तम असे. साहेब आल्यावर आमच्या हातें सेवा चाकरी होईल त्याचा मजुरा होऊन येईल. खावंद संनिध असल्यास आह्मी सेवा चाकरी करून दाखवूं ते स्वामीस विदित होईल. रामरायास जरूर पाठविणें ह्मणोन आज्ञा, तर म॥ निल्हेस सत्वरींच सेवेसी पाठवून देतों. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञप्ति.

पे॥ छ ७ जिल्हेज, मंगळवार, प्रहर रात्र आवशीची.

---

[ ७४ ] ॥ श्री ॥ ता. ९ सप्तंबर १७५७.

श्रीमंत राजश्री रावसाहेबाचे सेवेसीः—

विनंती सेवक जनकोजी शिंदे कृतानेक विज्ञप्ती. सेवकाचें वर्तमान ता॥ २४ छ जिल्हेज पर्यंत यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री नानासाहेबाचें आज्ञापत्र गर्भ्यांच्या पिंपळगांवच्या मुक्कामीं आलें होतें. त्यांत आज्ञा

---

१६७. विश्वासराव ह्या वेळीं १५।१६ वर्षांचा असावा. विश्वासरावाची निजामावरील ही दुसरी स्वारी होय. विश्वासराव १७५५ च्या मार्चांत निजामाच्या भावांची टेहळणी शहागडाजवळ करीत होता हें लेखांक ४८ त लिहिलें आहे. त्यावेळीं विश्वासरावाचें वय तेरा चवदा वर्षांचें असावें. ह्यावरून अठराव्या शतकांत मनुष्यांच्या पराक्रमाला सुरुवात फार लवकर होत असे असें दिसतें. भाऊसाहेब राज्यकारभारांत बारातेराव्या वर्षी पडले. स्वतः नानासाहेब लहान असतांच बाजीरावाबरोबर किंवा चिमाजीआप्पाबरोबर मोहिमेस जात. शिवाजी महाराज तर सातव्या वर्षींच दिग्विजय करूं लागले. परशरामभाऊ पटवर्धनानें बालवयांत मुलुखगिरीचें सुख पहाण्यास आरंभ केला (ऐ. ले. सं. न. ६). पानिपतच्या लढाईंत जनकोजीचें वय कांहीं विशीच्या पलीकडे फारसें नव्हतें. तो १७५५त मेडत्याच्या लढाईंत प्रमुखपणें हजर होता (भां. सा. ब). पानपतच्या लढाईंत नानाफडणिस सोळा सतरा वर्षांचा होता. रघुनाथराव दादा अति मठ ! त्यांनीं गुजराथेवरील पहिली स्वारी आपल्या वयाच्या अठराव्या वर्षी केली. रघोजी भोसला बारा वर्षांचा असतांना

कीं मोगलाचा व आपला सलूख झाल्यादाखलच आहे; शहानवाजखान यास जाहागीर द्यावयाची रदबदल मात्र राहिली आहे. तेहि थोडक्या गोष्टीसाठीं तोडितात असा अर्थ नाहीं. गंगातीरास जाऊन जीवनरायास बोलावूं पाठवणें, म्हणोन आज्ञा होती. त्यावरून नेवासें नजीक मुक्काम करून स्वामीची मार्गप्रतीक्षा करीत असो. चार पांच रोज मुक्काम मजकुरीं झाले. स्वामीचें येणें कितीका रोजांनीं होईल तें आज्ञा करावी. शेहरीहून[१६८] बातमीचें वर्तमान आलें आहे कीं निजामअली एका दो रोजांनीं शहरास दाखल होणार. जानबा निंबाळकर कुच करून गेले. हणमंतराव निंबाळकर याकडील शाहाजी सुपेकर व फिरंगोजी पवार याजबरोबरी फौज देऊन शहरास रवाना केलें. दिवसेंदिवस भारी होत आहेत. गंगा उतरून जावें तरी वकील शब्द ठेवितील कीं सलूख बिघडला. न जावें तरी ते बळावत *चालले. याच्याविशीं आज्ञा काय ते लिहून पाठवावी. त्याप्रमाणें वर्तणूक केली जाईल.

---

आपला चुलता जो कान्होजी भोसले त्याजबरोबर स्वारी शिकारीस जात असे (ना. भो. व. पृ. २९). असले हवे तितके दाखले आणीक कितीतरी देतां येतील. सारांश सांगण्याचा मुद्दा काय कीं त्यावेळीं मराठेशाहींत लढायांचा, दरबारांचा व एकंदर संसाराचा अनुभव मनुष्याला फार लवकर येऊन मोठा उत्कटहि येई. सऱ्यां बारातेरा वर्षांच्या सुमारास पोरें इंग्रजी अक्षरें शिकण्यास लागतात. त्याकाळीं प्रांत काबीज करण्यास व संसार चालविण्यास बारातेरावर्षांच्या उमरीचा पुरुष योग्य समजत असत. एकंदर आयुष्यक्रम त्यावेळीं भरीव असून सध्यांच्या सारखा पोकळ नव्हता. संसाराची जबाबदारी व जगाचा अनुभव बालवयांतच कळूं लागल्यामुळें त्यावेळचे लोक अल्पवयांत मरूनहि प्रस्तुत कालच्या लोकांपेक्षा जास्त दिवस जगत व सहस्रपटीनें जास्त महत्वाचीं कामें करीत असेंच कबूल करणें निर्विवाद आहे.

१६८ औरंगाबादेहून.

* नानासाहेबपेशवे, शहानवाजखान व जीवनराव ह्या तिघांनीं सलाबतजंगाला धरून कैदेंत घालण्याची मसलत रचली होती. तेव्हां ऐनवेळेच्या अगोदर पेशव्यांच्या सरदारांनीं गंगा उतरून दौलताबादेवर चालून जाऊन सर्व रंग बिघडवून टाकूं नये ह्मणून मोंगलाचा व आपला सलूख होत आहे, तेव्हां तुह्मी गंगा उतरून येऊं नका, असें पत्र पाठवणें पेशव्यांस भाग पडलें.

आह्मांपाशीं फौज सासात हजार जमा झाली. आणखीहि वरचेवर येत आहे. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञप्ति. पै॥ छ २६ जिल्हेज, रविवार प्रहर दिवस, सायंकाळ.

---

[ ७५ ] श्रीदत्तात्रय. १६ सप्टंबर १७५७.

पै॥ छ १ मोहरम शुक्रवार संध्याकाळ.

श्रीमंतसद्गुणस्वभाव राजश्री रावसाहेबाचे सेवेसी:—

आज्ञाधारक जीवनराव केशव साष्टांग नमस्कार विनंति. येथील क्षेम ता॥ छ १ मोहरम शुक्रवार प्रातःकाळ सूर्यउदये यथास्थित असे. विशेष. प्रार्थना ऐसीजे:—निजामअली शहरापासून तीसा कोसांवर जाफराबादेस आला. तदनंतर बसालतजंगाचा व निजामअलीचा पेच मातबर पाडला. येथून थोरले नवाब सलाबतजंग याचें पत्र व बसालतजंगाचें पत्र निजामअलीस पाठविलें कीं येकंदर पुढें न येणें, वराडांत जाणें. भेटीचा मजकूर तरी आह्मी थोडक्या दिवसांत येऊं. भेट होईल ऐसें पत्र गेलें. निजामअली येकंदर पुढें येणार नाहींत. आले तरी यास मुस्तेद करून लडावीन. निजामअली मारला जाईल. महाराव आले ते भयाकरितां उगेच आहेत व मजलाहि वळखतात. गोड गोष्टी बोलतात. §दौलताबादेचे मोर्चे आज शुक्रवारीं संध्याकाळ पावेतों उठवून रविवारीं हाकीमम॥अलीखा यास घेऊन स्वामीपाशीं येतों. गंगेअलीकडे कांहीं फौज राजश्री शिंदे सुभेदार याची आली ह्मणऊन मोगलास कळलें तरी येक राऊत गंगेअलीकडे न यावा. मजला लटकेपणा येईलसें न करावें. मोगलाच्या करारमदारांत तिळभर अंतर नाहीं. मोठी गोष्ट निजामअलीस न येणें ह्मणोन पत्रें गेलीं. आला तरी पारपत्य याजकरींच करवीन.

§ शहानवाजखान दौलताबादेच्या किल्यांत बसला होता. त्याच्या भोंवतीं सलाबतजंगाच्या लोकांनीं वेढा घालून मोर्चे दिले होते. ते सलाबतजंगाला उठवावयाला सांगावें ह्मणून पेशव्यांनीं जीवनरावास हुकूम केला होता.

ऐसा मोठा पेच पाडिला. वेगळीं वेगळीं चहूंकडे राजकारणें राखून ठेविलीं आहेत. तरी गंगेअलीकडे स्वार येक येऊं न द्यावा. पांचशें स्वार गंगा उतरोन उत्तरतीरीं आले. त्यास आज्ञा सादर व्हावी कीं पलीकडे जात. सेवक रविवारीं नवाब सलाबतजंगापासून रुसकत जाला. चार वस्त्रें व येक हत्ती रोडसा म्हातारा इनाम या सेवकास दिल्हा. काल छ ३० जिल्हेजीं गुरुवारीं नवाब बसालतजंगापासून रुसकत जाला. चार वस्त्रें व येक शिरपेच जडावाचा सामान्यसा नवाबांनीं आपल्या हातें पागोट्यावर बांधला. गंगेअलीकडे येक राऊत येऊं न द्यावा. निजामअली मोठे वळे फिरे ऐसें केलें. माझ्या करारांत अंतर न पडे ऐसें केलें पाहिजे. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना. मोर्चे उठवितेवेळेस दौलताबादेस हा सेवक जाईल. शहानवाजखानाची भेट होईल. हे विज्ञापना.

---

[ ७६ ] **श्रीदत्तात्रय.** १८ सप्टंबर १७५७.

पै॥ छ ३ मोहरम संध्याकाळ.

अर्ज विज्ञापना ऐसीजे. येथील क्षेम ता॥ छ ३ मोहरम रविवार प्रातःकाळ मुकाम शहर सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. प्रार्थना ऐसीजे. दौलताबादेचे मोर्चे कांहीं लोक उठोन आले. कांहीं लोक पावसाकरितां राहिले आहेत, ते आज दोन प्रहर पावतों येतील. कराररमदार जाले ते प्रमाणच आहेत. निजामअली दर कुच येत होते त्याचा व बसालतजंगाचा पेच मातबर मोठे हिकमतीनें पाडिला. याजहातीं निजामअलीस लिहविलें कीं तुह्मी पुढें न येणें. लक्षप्रकारें निजामअली फिरून जाईल, स॥ जे भोसल्याचा निजामअलीचा पेच मातबर पाडिला. येथून यास्तव फिरून जातील. कदाचित् रेटून येऊं लागले तरी यास ह्मणजे बसालतजंगास बाहेर काहडितो, लडावीन. कदाचित् याचे कुमकेस सरकारची फौज पाहिजेसी जाली तरी विनंति लिहीन. याच कामासाठीं येक अगर दोन दिवस लागतील. तद-

नंतर हकीमजीस घेऊन हुजूर येतों. माझा गुंता नाहीं. परंतु निजामअली फिरवून वराडांत जाये उपाय आरंभला आहे, तो एका दिवसानीं निदानी दोदिवसांनीं सिद्धीस जाये ऐसें आहे. यास्तव आजचा उद्याचा दिवस राहिलों. रुसखत तरी याजपासून जालोंच आहें. पूर्वी विनंति लिहिलीच आहे. निजामअलीच्या लष्करांतून आपाजी धोंडाजी यांस पत्रें आलीं तीं व रघुनाथपंत मुनसी, वकील जानोजी भोसले याचा, यास यशवंतराव कोनेर याचें पत्र आलें तें व रामचंद्र कोनेर ह्मणजे बाबूराव कोनेर याचें पत्र अप्पाजीपंतास आलें तें बजिनस सेवेसी पाठविलीं. वाचून सहित हें विनंतीपत्र हुजूर पुण्यास रवाना करावयाविसी आज्ञा करावी. महाराव जानोजी निंबाळकर याचें पत्र श्रीमंत स्वामीस आहे तेंहि पुण्यास रवाना करावयास आज्ञा. महाराव जानोजी निंबाळकर यांणीं राजश्री रावफडणीस यास पत्र लिहिलें. तेंहि पाठविलें असे. निजामअलीकडील जवाब संध्याकाळ पावेतों नवाब साहेबांस येईल. तदनंतर जे तदबीर होईल ते विनंति केली जाईल. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

माझें पत्र परभारें हुजूर पुण्यास जात नाहीं यास्तव जें लिहिणें स्वामी ल्याहावयास समर्थ. चित्तास आल्यास माझें विनंति पत्र बजिनस इरसाल करावें. हे विज्ञापना.

मी येथें सुखें बसलों नाहीं. सरकारच्या मातबर कामासाठीं राहिलों. याहि उपरि आज्ञाच अशी असली तरी सोमवारीं स्वार होऊन येतों. हकीमजींचे लोक फौज, तईनाती, गारदी, बंदी वगैरे बाहर निघाल्यास येक दिवस लागेल. मोगलाई कारभार! अमासुस्त. डेरा मात्र हकीमम॥अलीखाजीचा शहराबाहेर रंभापुरियाजवळ दिल्हा असे. हे विज्ञापना.

**या पत्राव॥ लोकांचीं पत्रें आलीं तीं प॥ असेत.**

१ अप्पाजी पंतास रामचद्र कोनेर याचें.
१ जानोजी निंबाळकर याचें सरकारांत आलें तें.
३ कित्ता कागद
५

१ रघुनाथपंत मुनसी यास येशवंतराव कोनेर याचें.
१ बाबूराव फडणीस यास जानोजी निंबाळकर याचें आलें तें
२

[ ७७ ] ॥ श्रीदत्तात्रय. ॥ १८ सप्टेंबर १७५७.

पे॥ छ ३ मोहरम अवशीची सवा प्रहर रात्र.

अर्ज विज्ञापना ऐसीजे. येथील क्षेम ता॥ छ ३ मोहरम रविवार दोन प्रहर मुकाम शहर सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. प्रार्थना ऐसीजे. दौलताबादचे मोर्चे कुल उठले. कुल सरदार सैदअकबरखान, मेटीअलीखा व मुरादखा व नसीरजंग वगैरे कुल आपल्या घरास आले. याउपरि दौलताबादेंत गल्ला वगैरे जे चित्तास येईल तिकडून जावा न्यावा. कोणी मुजाहीम नाहीं. याउपरि आज अगर उद्यां अगर परवां निजामअल्लीचा गुंता उरकून सेवेसी खान अलीशान हकीमम॥अलीखा यास घेऊन येतां. सर्व फैसला करार जाल्याप्रमाणें अमलांत येईल. निजामअलीसी यासी पेच मोठे हिकमतीनें पाडला. आतां पस्तावले. परंतु मोठें काम हें खावंदास कळावें. मी येथें रिकामा बसलों नाहीं. सरकार कामावर बसलों. हुजूर पत्र पावतांच न आलों ह्मणोन रागास न यावें. जानोजी भोसले यासीं व निजामअल्लीसी पेच मोठे ¶हुनेरे पाडला. श्रुत असावें. महाराव जानोजी केवळ निखालस सर्व प्रकारें दौलतखा स्वामींचा आहे. आद्यंत गोष्टींत तिळभर पिळपेंच न देखिला. नित्य एका दिवसा आड भेट होत असती. जिकडे स्वामींची मर्जी तिकडे माहराव जसवंत निंबाळकर; यांत अंतर नाहीं. हकीमम॥अलीखास घेऊन येतां. किल्याचे मोर्चे उठले. आतां तरी मोगलाच्या करारमदाराचा इतबार असावे. ज्या राजकारणांत पीळपेंच असेल त्या कामांत मी येणार नाहीं. मी कांहीं मातबर नाहीं, गरीब असे. माझे विनंतींना इतबार असावा. हे विनंति. हेंच पत्र हुजूर पुण्यास जावें. खोजे रहमदुलाखाबहादर व हकीमम॥अलीखा याचा रुका आला तो बजिनस पाठविला, पावेल.

---

¶ युक्तीनें.

[ ७८ ] **श्रीभवानीप्रसन्न.** २२ सप्टेंबर १७५७

पे॥ छ ७ मोहरम गुरुवार तृतीय प्रहर.

श्रीमंत सद्गुणनिधान साहेबाचे सेवेसीः—

आज्ञाधारक कृष्णाजी त्रिंबक साष्टांग नमस्कार उपरी विनंति. आजी गुरुवारीं छ ७ मोहरमीं येथें कांहीं कवतुक जालें तें विनंति करितों. काल नवाब सलाबतजंग राजश्री जानोजी निंबाळकर यांचे घरास रंभापुऱ्यास संध्याकाळीं येकबयेक विसापंचविसा माणसानसी गेले होते. मागून वाद्य व सवारीचा सरंजाम जाऊन पावला. तिकडून येतां बसरंजाम आले. इतकें काल जालें होतें. आज प्रातःकाळींच गजराचे वेळेस स्वारी तयार करविली जे बेगमचे मुकबऱ्यास जातो. त्याजवरून कितेकांनीं त्याच वेळेस येऊन बसालतजंगास सांगितलें जे शहानवाजखानाकडे दौलताबादेस रातोरात श्रीमंताची फौज येऊन त्यास घेऊन श्रीमंतापासी टोक्यास गेले व नवाबांनींहि स्वारी तयार करविली. नवाबहि तिकडेच जाणार. काल जानोजीनीं हेच मसलहत केली होती. त्याचे बलें नवाब निघून जाणार. ऐसें बसालतजंगास सांगतांच बसालतजंग स्वार होऊन नवाबाचे घरास गेले व शहरचे दरवाजे बंद करविले. ऐसी हुलड येक प्रहर दिवसापरियंत जाली. शेवटीं शाबीत जालें जे सर्व लटकें. नवाब बेगमचे मुकबऱ्यास जाणार. तव्हां बसालतजंग उठोन आपले घरास आले. जालें वर्तमान विदित व्हावें ह्मणोन विनंति लिहिली असे. हे विनंति.

फिरंग्यांकडील वर्तमान आलें जे छ १० जिल्हेजीं ईसाकपटणीहून डेरे बाहेर केले होते जे इकडे यावें. तदनंतर छ १४ माहे मजकुरीं तेथून दिढा कोसाचें कुच केलें. पुढें कुचदरकुच इकडे येणार. इतकें वर्तमान आलें. विदित होय. हे विनंति.

हें वर्तमान श्रीमंतसगुणमूर्ति साहेबांस लिहिलें नाहीं. हेंच विनंति-

पत्र पुण्यास रवाना करणें उचित असलें तरी रवाना करणार स्वामी समर्थ असेत. हे विनंति.

---

[ ७९ ] ॥ श्री ॥ २३ सप्टंबर १७५७.

पे॥ छ ८ मोहरम शुक्रवार दोन प्रहर दिवस.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसीः—

विनंति सेवक शामजी गोविंद सा॥ नमस्कार विनंति येथील कुशल ता॥ छ ४ मोहरम मुकाम उतरादीपेठ प॥ अंबडापुर प्रतीतातीर दर लष्कर नवाब निजामुदौला स्वामीचे कृपादृष्टींनें यथास्थित असे. यानंतर आज्ञापत्र छ २२ जिल्हेजचें जासुदासमागमें सादर जालें तें मुकाम मजकुरीं कालीं पावलें. पत्रीं आज्ञा कीं नवाब कोठवर आले, कोणे मुद्यावर येतात, ते बातमी वरचेवर लिहित जाणें. ऐसीयास अलजपुरीं नवाब असतां नवाब सलाबतजंग व बसालतजंग यांणीं लिहिलें कीं शहानवाजखान बागी होऊन दौलताबाद बळाऊन बसला आहे. त्याचें पारपत्य करावें लागतें. तर रात्रीचा दिवस करून फौजसमेत येऊन पोहचणें. त्यावरून तीन चार हजार फौज व तोफखाना समागमें होता तो व इभरामखान गाडदी यास हजार स्वार, तीन हजार गाडदी व बारा तोफानसी, पंच्यायशी हजार रुपये दरमाहा निखालेस द्यावे या करारानें, चाकर ठेऊन अलजपुरीहून कुच करून मुलकापासून अललहीसाहा ? थोडाबहुत वसूल घेऊन खर्ची करीत करीत येथवर आले. राजश्री जानोजी भोसले सेनासाहेबसुभा यांणीं आपणाकडील कमावीसदारांस लिहिलें कीं नवाब मुलकापासून थोडाबहुत वसूल घेऊन शहरास जातात. त्यास तुह्मी जमीदारांस ताकीद करून देविणें, अडथळा न करणें. त्यावरून कमावीसदारांनीं जमीदारांस रुजू करून

लाख दोन लाखाची वाट करून देविली. राजश्री मुधोजी भोसले याजकडे मलकापूर, आकोट, आमोद वगैरे सोळा महाल सरंजामाचे आहेत. त्या माहालावरी तफरीक तीस हजार आली. त्याची निशा कमावीसदारापासून करून घेतली प॥. अंबडापुर येथील जमीदारांकडे पेशकश व नजर बारा हजार रुपये करार केले. पांचसा मुकाम पर्जन्याकरितां अंबडापुरीं मुकाम जाले. याउपर कुच दरकुच शहरास येत आहेत. बाळापुरानजीक होते. तेथें श्रीमंताचीं पत्रें आलीं कीं उतावळी करून तुह्मी शहरास यावेंसें नाहीं. आलियास तुमचे आमचे स्नेहास अंतर पडेल. त्यास नवाबांनीं उत्तर पाठविलें कीं या दिवसांत जावयाचें आपणासहि जरूर नव्हतें. परंतु नवाबाचीं पत्रें वरचेवर येतात कीं सीताब येणें, त्यावरून खावंदाचा हुकूम बजाऊन आणावा जरूर, यास्तव येत असों; परंतु आह्मी शहरास पावलियावर श्रीमंताचे स्नेहाची वृद्धि अधिकोत्तर होय तेच करून. ह्मणऊन उत्तरें गेलीं आहेत. विदित होय. लक्ष्मण खंडागळे व रामचंद्र जाधवराव यांसहि याचीं पत्रें गेलीं होतीं. त्यास खंडागळे जाफराबादेचे मुकामास येऊन भेटणार. त्याजब॥ हजार स्वार आहेत. रामचंद्र जाधवहि गंगेवर आले ह्मणोन वर्तमान आहे. याउपरि होईल तें वृत्त वरचेवर सेवेसी लिहिलें जाईल. सेवकापासी जासूद बहुत नाहीं. दोन तीन जोड्या आहेत. त्या वरचेवर पुण्यास रवाना कराव्या लागतात. यास्तव दोन चार जोड्या सेवकाकडे पाठवणार स्वामी खावंद आहेत. सेवेसी विदित होय. हे विज्ञापि.

---

८० ]

॥ श्रीशंकर ॥ २५ सप्टेंबर १७५७.

पे॥ छ १० मोहरम रविवार सा घटका दिवस प्रातःकाळ.

श्रीमंत सद्गुणमूर्ती साहेबाचे सेवेसीः—

आज्ञाधारक कृष्णाजी त्रिंबक सा॥ नमस्कार उपरि विनति. छ २ मोहर-

मचें आज्ञापत्र सादर जालें तें छ ९ माहे मजकुरीं पावलें. मस्तकीं वंदिलें. तुवां पत्र पाठविलें तें पावलें, त्याचें उत्तर सरकारची यापूर्वी जोडी आली होती ती येथेंच राहिली होती, तीजबराबर सविस्तर वर्तमान लिहून पाठविलें असे. त्याप्र॥ वरचेवर वर्तमान लिहीत जाणें. नवाबाजवळ नवी फौज किती ? मनसबदार कोण कोण ? किती फौजेनें जमा जाहलें ? निजामअली कोठें आहेत ? त्याजपाशीं गाडदी व तोफखाना काय ? फौज काय ? जानोजी भोसले याची फौज कोण ? किती आहे ? तें सर्व लिहिणें. भोसल्यांचे वकिलाकडून लेहून करवावयाचा प्रकार पेशजी लिहिला होता त्याचें काय कसें केलें ? तें सर्व लिहिणं करणें. निजामअलीचाहि प्रकार पेशजीच्या लिहिल्याप्रे॥ करावयाचें करणें. वरचेवर वर्तमान लिहित जाणें. पंचवीस लाखांची जागीर सरकारांत द्यावी, नगर द्यावें. शाहानवाजखानास तीन लाखांची जागीर व दौलताबाद व अंतूर दोन्ही किल्ले करार करावे, इतके मजकूर कबूल केले ह्मणोन जीवनराव यांणीं लिहिलें. त्यावरून चिरंजीवास व दत्तबास सलुख करावयाविशीं लिहिलें आहे. सत्वर पंचविसांचे परगणे मात्र चांगले निवडून घ्यावें, भेटावें, सलुख जाहीर करावा ऐसें लिहिलें आहे. परंतु फौजा जमा करितात. निजामअली येणार. इब्राईमखान जुंजाच्या गप्पा मारतात. त्यास तुर्त सलुख लाऊन ठेवावा. फौजा जमा जालीयावर कजीयास उभें राहावें ऐसा भाव आहे. किंवा शुद्ध भाव आहे हा शोध घेऊन लिहून पाठवीत जाणें ह्मणोन आज्ञा. ऐशास येथील वर्तमान हुजूर वरचेवर विनंति करीत असतोच. सांप्रत येथें फौज नवाबाची मुगली, कदीम व नवी व किरकोळ मनसबदार मिळोन पांच हजार व हणमंतराव निंबाळकर दोन हजार व जानोजी निंबाळकर हजार व मुधोजी नाईक निंबाळकर व नागोजी माने व बाजीराव घोरपडे वगैरे किरकोळ मऱ्हाठे पांचशें येकूण साडेआठ हजार फौज येथें आहे. वरकड कोणी अधिक आगळी लिहितील तर लिहोत. परंतु इतकीच फौज आहे. निजामअलीहि पांचहजार फौज, नवे तीन हजार गाडदी व तोफा गाड्यांच्या

व सरकारच्या यांच्या मिळोन पन्नास. याखेरीज बाण वगैरे सरंजाम चांगला आहे ह्मणून नवाबाचें येथें वर्तमान आलें. व शामजी गोविंद टकले यांचें पत्र मजला आलें. त्यांत वर्तमान त्यांनीं लिहिलें आहे. तें पत्र बजिनस हजूर पाठविलें आहे. त्यावरून सविस्तर अर्थ ध्यानास येईल. भोसले यांची फौज तर त्याजबा नाहीं ह्मणून वर्तमान आहे. मी येथून भोसले याचे वकिलाकडून वरचेवर लिहिवीत गेलों. मजला कळला तसा प्रकार येथील भासवीत गेलों. त्याजवरून बाबूराव कानेरे यांचें पत्र मजला आलें तें यापूर्वीं बजिनस हजूर पाठविलेंच आहे. पाहून अर्थ ध्यानास आलाच असेल. व रा॥ येशवंतराव कानेर हे निजामअली समीप होते. त्यासहि वरचेवर लिहित गेलों. त्याचेंहि उत्तर रा॥ रघुनाथपंत वकील यांसी आलें त्याची नकल घेऊन यापूर्वीं जोडी रवाना हजूर जाली त्या पत्राबा॥च रवाना करीत होतों. परंतु ते नकल चुकून राहून गेली ते सांप्रत पाठविली आहे. त्याजवरून अर्थ कळों येईल. अस्सल पत्र रा॥ यशवंतराव याचे तीर्थस्वरूप रा॥ जीवनराव केशव यांनीं रघुनाथपंतापासून घेतलें होतें तें त्यांनीं हजूर पाठविलें असेल. निजामअलीनें न यावें हा प्रकार केलाच आहे. व अलीकडे नवाबाचीं पत्रें त्यांस पाठविलीं आहेत कीं तुवा सहसा न यावें. त्यास पत्रें पावलीं त्या संधींत त्यानें अंबडापुराहून कुच करून, धोत्र्यासमीप पेनगंगा आहे तेथवर तीन कोस येऊन राहिला. मुकाम आहेत. मोठ्या संशयांत पडला जे भावाकडे जावें तर तेथील प्रकार विशकलीत दिसतो; माघारें परतून जावें तर वराडांत कोणी पुसणार नाहीं; जे भावानें पिटून लाविलें अशा संकटांत पडून आहे. परंतु लोकांत ह्मणतात जे राजश्री विठल सुंदर दिवाण बालापुरास कांहीं कर्जवाम मेळवावयास गेला आहे, त्याची मार्गप्रतीक्षा करितात. तो आला ह्मणजे पुढें अवरंगाबादेस जाऊं असें ह्मणोन कालक्रमणा करितो. व नानाप्रकारचे विचार आचार इब्राइमखान वगैरे करीतच आहेत. त्याचा याचा पेच पडला. परंतु यासहि संशय आहे जे इब्राइमखान वगैरे सामान त्याजपाशीं चांगलें आहे. जरी रेटून

आलाच तरी कलह वाढेल, हेहि खराबीच. याजकरितां काल बसालतजंगांनीं आपला दिवाण जव्हायरमल्ल व पेशकार बिरजनाथ हे दोघेजण त्यास समजाऊन मावारे वाटे लावावयास पाठविले. ते व कांहीं मेवा वगैरेहि पाठविला. जाहिरी तरी कृत्रिम कांहीं भासत नाहींच. स्वामीचाच स्नेह संपादून रहावें ऐसा भाव दिसतो. तीर्थस्वरूप रा॥ जीवनराव यांनीं सर्वप्रकारें आपली खातरजमा करून घेतली आहे. खोजे रहमदुलाखान व हकीम महमदअल्लीखान हे मध्यस्त. यांचें वचन प्रमाण घेतलें आहे. स्वामींनीं मजला लिहिला मजकूर तीर्थस्वरूप जीवनराव यासीहि लिहिला होता, त्यांचें पत्र मीं पाहिलें व हेंहि पत्र त्यांस दाखविलें व त्याचेच खातरजमेवरून भरंवसाहि पुरता. कृत्रिम कोठें आढळत नाहीं. तो आला तरी लढाईस सिद्ध होऊं ऐसें हे ह्मणतात. इतका अकृत्रिम प्रकार दाखवून जरी चित्तांत कृत्रिम भाव असला तरी दो चौ दिवसांत कळेल. जरी निजामअल्ली येऊंच लागला आणि हे लढाईस बाहिर न निघेत तरी परिच्छिन्न कृत्रिमसें कळेल. परंतु कृत्रिम विचार करावयाची हिंमत सहसा होणार नाहीं. जालीच तरी श्रीकृपेनें याचें पारपत्य करणें कांहीं कठीण नाहीं. परंतु त्याचें येणें या न येणें याकरितां सरकारचें काम बंद ठेवावें हें सलाह नाहीं. त्याच्या येणें या न येणेंयाचा जसजसा प्रकार घडेल तसा घडो. तशासारखी फिकीर त्याची श्रीकृपेनें होईल. परंतु जो करार व मदार ठहरला आहे त्याचे महाल वगैरे घ्यावयाजकरितां श्रीमंत साहेबजादे याजपाशीं मोगलाकडील हकीम महमदअल्लीखानास नेऊन अशाच संधींत दबून दबकाऊन चित्तानरूप काम माहालाचें करून घ्यावें हेंच सलाह आहे. जरी अशा संधींत मोगलाकडील गृहस्थ नवे आणा वाहिल्या, हवाल्यावर टाकीत, तरी आपण सावध व्हावें. स्वामी ज्यास हातीं धरतील त्यास नमूदांत आणितील हें सर्वांस कळलें आहे. अशा संधींत चित्तानरूप माहाल घ्यावयाची वेळ आहे. जरी निजामअल्लीचा लडा वारल्यावर काम करून घेऊं घाटल्यास विलंबावर पडत पंधरा वीस दिवस गुजरून गेले. आणखीहि इतकेंच

दिवस गुजरून जातील. इतक्यांत फिरंगी समीप येऊन पावले तरी त्याच्याहि येणेयाचा एखादा बहाना काढितील जे त्याच्या सलाहानें करावें लागलें; असें करितां लांबण फार पडेल. फिरंगियांनीं इसाकपटणींहून छ १७ जिल्हेजीं डेरे बाहीर केले होते. छ १४ जिल्हेजीं दिढा कोसाचें कुच इकडे यावयाकरितां केलें होतें. त्यास तेथून निघोन पंचवीस दिवस जाले. पाहवें कोठवर आले असतील ? निजामअली चाळीस पंचेचाळीस कोसांवर आणि आपली फौज गंगातीरीं पंधरा कोसांवर. ऐसें असतां आपलें काम त्याचे येणेयाचे संशयाकरितां बंद ठेवणें सलाह माझे बुद्धीस तरी येत नाहीं. इकडे आपलें काम माहाल वगैरे निवडून घावयास शुरू केलिया अधिक निजामअलीवर दबाव पडेल कीं आतां कांहीं बाकी राहिली नाहीं व याचा ग्रहस्त येऊन गुंतल्यावर आणखी कारभार काय करणार ? माहाला तपसील करून देतीलच ह्मणजे जागा जागा कमावीसदार पाठवावेच. सहजच गुंता उरकेल. व लोकांचे तर्कवितर्क दूर होतीलें. नाहींतर संशय दूर होत नाहींत. मी आपल्या बुद्धीनें लिहिलें असे. वरकड करणार जें समयोचित असेल तेंच करीत असतील. परंतु फिरंगी समीप येऊन पावले तरी हैदरजंगास स्वामी पुरते जाणतात जे कसे काव्यादाव्याचा मनुष्य आहे. दिसता प्रकार सविस्तर विनंति लिहिली. पुढें समयोचित सलाह असेल तें करणार स्वामी समर्थ असेत. हे विनंति. रवाना छ ९ माहे मोहरम.

---

[ ८१ ] **श्रीदत्तात्रय.** २५ सप्टेंबर १७५७.

पे॥ छ १० मोहरम रविवार साघटका दिवस प्रातःकाळचा.

अर्ज विज्ञापना ऐसीजे येथील क्षेम ता॥ छ ९ मोहरम मंदवार तीन चार घटिका रात्र मुकाम शहर सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष.

प्रार्थना ऐसीजे: आज्ञापत्र सादर जालें तेथें आज्ञा कीं शुक्रवारीं कुच करावें तों नवा दिवस. शनवारीं वर्ज वार. रविवारीं कुच करून पेडापुरावर मुकाम फर्मावणार. शहरच्या पूर्वेस जावयाचा निश्चय असतां सांप्रत त्वा लिहिलें जे बाणशेंदरेया रोखें जावें ऐसी नवाबाची मर्जी. यास्तव बाणशेंदरें हिकडेच मुकामात करूं ह्मणोन विस्तारें आज्ञा. ऐसीयास नवाबाची मर्जी तो पूर्वेस शहरच्या डोंगर आंगें यावें. यांत निजामअल्लीवर दबाव व चारा आहे व हकीमजीस जवळच घेऊन येतों. कामें सत्वर उरकावीं. तदनंतर आणखी कामास मुतवजे व्हावें. आज्ञापत्र ऐसें आलें जे श्रीमंत प्रताप वरिष्ठाभिधान राजश्री पंतप्रधान साहेबाची आज्ञा जे कासारबारीकडे जावयाची व खानदेश जुनें काम व गुजरात मोठें काम, हीकडे दबाव. ऐसीयास कासारबारी फार दूर; बाणशेंदरें जवळ. परंतु उगेच तिकडे जाणें उचित नाहीं. रोख दाखवावा कीं शहरच्या पूर्वेस मुकामास जावयासि कुच फर्माविलें. व दोन कुचे, येक अवल कुच, पेडापूर; दुसरें पुढें तीन चार कोस. तदनंतर नवाब बसालतजंगाकरीं स्वामीस लिहीवीन कीं बाणशेंदरें या डोंगराआंगें मुकामात करावे. हकीमजीसहि पाठवितों. तुर्त शहरच्या पूर्वेस न जावें. तदनंतर बाणशेंदरेया रोखें मुतवजे व्हावें. ऐसी विनंति लिहिली. सांप्रत आज्ञापत्र सादर जालें त्यांत आज्ञा साफ कीं बाणशेंदरें इकडेच जातों, ऐसे जाहेर साफ नसावें. चिंता जाहेर ऐसें नसावें. खानदेश वगैरे मनसुब्यामुळें बाणशेंदरेया रोखें मुतवजे व्हावयाचें असो. परंतु जाहेर हेंच असावें कीं शहरच्या पूर्वेस चारा आहे तेथेंच मुकामात करावी. याच गोष्टीच्या पोटांत निजामअल्लीवर दबाव. तो पुढें एकंदर येऊं पावणार नाहीं. दुसरे फौज स्वामीब॥ किती हें कळावें, तैशासारिखी विनंति, जेथें मुकामात करणें उचित तेथें करावे, असी केली जाईल. निजामअल्लीस स्वामी गंगा उतरल्यावर खबर कळेल, तो काय मनसुबा करितो हेंहि कळेल. खुलासा रविवारीं कुच करून पेडापुरावर यावें तोंवर आणखी नवाबाच्या व सरकारच्या कार्यास उचित ऐसीच विनंति करीन. सांप्रत आपाजी धोंडाजी यांचे

विद्यमानें निजामअलीचें राजकारण आलें कीं श्रीमंत माझी दस्तगीरी करतील तर चित्तानरूप सलूख करीन. फिरंग्यास एकंदर येऊं देणार नाहीं. भोसले यासी जेसें सांगाल तेसें करीन. त्याजला उत्तर दिल्हें जे हा मजकूर हुजूर लिहितों; हुजूरून पुण्याचा जाब यावयास दाहा दिवस लागतील; तोंवर तुह्मी पुढें येऊं नये; याल तर सरकारची फौज धाऊन येऊन गळां पडेल; काम तुमचें सर्व नासेल; यास्तव जवाब येईल तोंवर उगेंच राहाणें. राहातील. दरमियानच्या दिवसांत हकीमजीस घेऊन येतों. गुंता उरकून घेऊं. निजामअलीनें पन्नासाच्या जागीरी दिधल्या तर कार्याच्या नाहींत. बदमामली असे. परंतु फिरंग्यास एकंदर येऊं देणार नाहीं, स॥ इभराइमखा गारदी फिरंग्यांचा दुषमन त्याजव॥ आहे. बसालतजंग प्रामाणिक यासच स्थापावें आणि सरकारचें काम करावें. हणमंतराव निंबाळकर व महाराव जानोजी या सेवकानें आपले सूत्रीं लाऊन घेतले. जालें राजकारण यांत पीळपेच नाहीं. निजामअली न यावा इतकाच मात्र तरतूद. व जें राजकारण आलें तें खावंदास ल्याहावें. कदाचित् निजामअली भावास जाहेर सलूख दाखऊन आला आणि दगा केला तर हेंहि सूत्र असावें, यास्तव लाऊन ठेविलें असे. शहानवाजखानाकडे पैगाम केला आहे. त्याणें माझे मुद्दे माफीक काम केलें तरी बरेंच आहे. लक्षप्रकारें करावेंसें आहे. कदाचित् उचित रीतीनें पैका कबूल न केला तरी किल्ला नवाबास घ्यावयाची परवानगी द्यावी. आणखी जागीर नवाबाबरीं सरकारांत देवितों हाहि मजकूर उगाच लिहिला असे. खातरेंत असावें. नवाबसाहेब थोरले नवाब सलाबतजंग यांणीं एकांतीं हकीमजीचें विद्यमानें दोन मसविदे, येक बसालतजंगास पत्र, ऐसे हुजूरचे पुण्याहून आणवावे व त्याच पत्रांत जबाब श्रीमंत स्वामीस बसालतजंगांनीं ल्याहावा ह्मणोन मसविदा आहे तोहि घालावा. तरी हे विनंतिपत्रासहित मसविदे दोन्ही पारसी बजिनस हुजूर पाठवावे. त्याप्रमाणें पत्रें तेथील आणवावीं. निजामअलीचे तर्फेनें दोघे भले माणूस मुसलमान नवाबापासीं जबाबसालास रा॥ जाले. उदईक येतील. येथूनहि

दोघे रुखसत जाले. तेहि उदईक जातील. हकीमजीस व या सेवकास हुजूर यावयास विलंब नाहीं. परंतु निजामअलीचें निस्तुक जालें पाहिजे. नवाब सलाबतजंगांनीं लेहून बसालतजंगास पत्रें आणविलीं ऐसें नसावें. श्रीमंतासच थोरले नवाबाचें फार अगत्य यास्तव लिहिलें ऐसें असावें. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[ ८२ ] श्रीदत्तात्रय. २६ सप्टेंबर १७५७.

पे॥ छ ११ मोहरम सोमवार प्रात:काळ सूर्योदय.

अर्ज विज्ञापना ऐसीजे. येथील क्षेम ता॥ छ १० मोहरम रविवार दीड प्रहर रात्र मुकाम शहर सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. प्रार्थना ऐसीजे. आज्ञापत्र सादर जालें तेथें आज्ञा कीं खासा स्वारी गंगातीरप्रांतें येऊन बारा दिवस जाले. जीवनराव येऊन कामकाज विल्हे लावीत नाहींत. तेव्हां काय प्रकार आहे हें कांहीं कळत नाहीं. हे सुधे नाहीं ह्मणोन लोक चर्चा करितात. पाहातां बारा दिवस येऊन जाले. तुमचें येणें होत नाहीं, तेव्हां संशयास जागा होते, यास्तव तुह्मी उदईक येथें येऊन सर्व कामें विल्हेस लावणें. अत:पर निजामअलीच्या येण्या न येणियाची वाट न पाहाणें. तुह्मीं पेच पाडून ठेविलाच आहे. तुझा बंधु यास तेथें ठेऊन हकीमम॥अलीखास घेऊन हुजूर येणें. तुझ्या येण्यानें सलुख खराखुरा जाला हा लौकिक होऊन, कामें विल्हेस लागून, दुसरेकडे मुतवजे होणें. कामें मंजूर आहेत ह्मणोन विस्तारें आज्ञा. ऐसीयास येथें चिरंजीव अवधूतराव केशव यास ठेऊन सेवक व हकीमम॥अलीखा सोमवारीं छ ११ मोहरमीं येथून स्वार होतों. दोहीं दिवसांनीं पायावर डोकी ठेऊन मी आपल्यास सनाथ करून घेतों. ज्ञाली मामिलियेत यांत पीळपेच नाहीं.

कदाचित् बसालतजंग मेला अगर कोण्ही दगा करून धरला तरी राजकारणास आठचार दिवस विलंब लागेल. वरकड गुता नाहीं. निजामअलींत यात पेच पाडलाच आहे. सर्व मतलब सख्तहि करून घेतले. माहाल नेमावे आणि परवाने करावे. अहद पैमान व्हावे तें सर्व स्वामीपासीं आल्यावर अर्ज करितों. यापूर्वी दोन तीन आज्ञापत्रें सादर जालीं त्यांत खुलासा जे बाणशेंदरे प्रांत कनड व कासारबारी या डोंगरांत चारा आहे व पाणी उत्तम मनसुबे फार पोटांत याच गोष्टीचा आहे ते त्याजवरून नुवाबसाहेबास या सेवकानें सांगितलें कीं निजामअली जाफराबादेपलीकडे त्याच डोंगरांत दाभाडी वगैरे येथें चारा आहे. श्रीमंत सद्गुणस्वभाव राजश्री रावसाहेबाकडेच मुतवजें होणार व मुक्कामातहि करणार, यास्तव नवाबसाहेबीं बहुत स्नेहानें लिहिलें कीं इकडे न जावें. बाणशेंदरेयाचे रोखें जावें तेथें मुक्कामात करावें. हकीमुमा।अलीखा व जीवनराव यास सोमवारीं र॥ करितों ह्मणोन नवाबांनीं लिहिलें आहे तो खालिता बजिनस पाठविला. पावेल. जवाब उत्तम गोड पाठवावा. बाणशेंदरेकडेच जातो ह्मणोन ल्याहावें. उदईक सोमवारीं हकीमजी डेरे दाखल होतील. मंगळवारीं दोनप्रहरा येथून चालतील. बुधवारीं सेवेसी येतों. मजला विलंब नाहीं. परंतु मोगलाई कारभार सुस्त फार असे. खुलासा हकीमजीस घेऊन सेवेसी पोहचलोंच यांत संशय नाहीं. बाणशेंदरें प्रांत कनड येथें मुक्काम करावें. शहरापासून चवदा कोसांवर असावें. दौलताबादेपासून आठ नव कोस पलीकडे असावें. डोंगरचारा आहे तेथें जावयास मार्गी लहान लहान कुच चव चव कोसाचे करावे. इतकियांत निजामअलीची खबर कळेल. नवाबहि बाहेर निघतील. दो ती दिवसांनीं जसवंताच्या तलावावर राहतील. रूख निजामअलींकडील तरी बसालतजंग जीवंत आहे तरी याच्या बोलल्या गोष्टींत तिळभर अंतर नाहीं. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

[ ८३ ] **श्रीदत्तात्रय.** २६ सप्टेंबर १७५७.

पे॥ छ ११ मोहरम सोमवार दीड प्रहर दिवस सायंकालचा.

अर्ज विज्ञापना ऐसीजे. येथील क्षेम ता॥ छ ११ मोहरम सोमवार चार घटका दिवस प्रथम मुकाम शहर सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. प्रार्थना ऐशीजे आज्ञापत्र छ १० रविवार चार घटका रात्रचें पाठविलें तें येच समयीं पावलें. सत्वर हुजूर हकीमम॥अलीखा यास घेऊन येणें. तुझ्या येण्यास फार गुणक? जातात ह्मणोन विस्तारें आज्ञा. ऐसीयास आज हकीमजीस बाहेर डेऱ्यादाखल करवितों. उदईक सहित खानम॥रनिले सेवेसी येतों. निजामअली जाफराबादेच्या पलीकडे साता कोसांवर आहे. त्याचे भले माणुस दोघे येथें आले. जवाबसाल तेहि भले माणुस सहीत याचे सुफीबेगखा व जवाहरमल व त्रीजनाथ हे तिघेजण जातात. नवाब बाहेर निघतात. जसवंताच्या तळावावर शहरच्या पूर्वेस राहतील. श्रीमंत प्रतापवरिष्ठाभिधान राजश्री पंतप्रधानसाहेबाचें आज्ञापत्र या सेवकास सादर जालें तेंहि पावलें. शहानवाजखानाकडे भला माणूस पाठविला. जवाबसाल ठीक करितों. परवाने जागीरीचे शहानवाजखानाचे तयार होतील ते स्वामीपाशीं येतील. परभारे येक काडीचें काम त्याजला ईतला दिल्हें नाहीं व पुढें ईतला देणार नाहीं. नजराहि माकुल माझे मुद्दे माफीक ठीक करितो. परवाने जागीर स्वामीपासी परगणे नेमस्त होतील. परवानेहि आह्मीच आपल्यापाशीं ह्मणजे सरकारांत ठेऊन घेऊं. निजामअलीकडील राजकारणें लाऊन ठेविलींच आहेत. राजश्री आपाजी धोंडाजी यास जाहेर उगच ब॥ घेतलें. बातन निजामअलीचें राजकारण लाविलें यास्तव आपाजीपंतास ब॥ घेऊन येतों. जाल्या कराराप्रमाणें हकीमजीस घेऊन येतों. आज सोमवारीं मुकाम पेडापुरावरच जाला. उत्तम. उदईक मुकामाविसी आज्ञापत्र सादर करावें. येथून विनंतिपत्र अर्ज होईल त्याप्रमाणें करावयास स्वामी समर्थ. नवाब बसालतजंग जीवंत आहे तर जालें राजकारण कारभार तिळभर यांत तफावत नाहीं.

निजामअली याजला कुराण देऊन येईल आणि दगा करील तरी न कळे. जालें तरी नफा आणखी होईल. खुलासा हकीमजीस घेऊन सेवेसी पोहचलों जाणावें. सर्व मजकूर रूबरू अर्ज करीन. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[ ८४ ] ॥ श्री ॥ २६ सप्टेंबर १७५७.

पे॥ छ ११ मोहरम सोमवार अवशीची चार घटका रात्र.

श्रीमंत राजश्री विश्वासराव स्वामींचे सेवेसीः —

विनंति सेवक कृष्णाजी रघुनाथ सा॥ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल ता॥ आधिक शुद्ध १२ म॥ शहर जाणून स्वामींनीं निजानंदलेखन आज्ञा करीत असिलें पाहिजे. विशेष. येथील वर्तमान तो राजश्री जीवनराव व हकीम महमदअलीखा आज सेवेसी येणार. निजामअलीचें वर्तमान तो जाफराबादेहून कुच करून काल गिर्नानदीवर आले. तेथून कुच करून दाभाडी अलीकडे येणार. येका दो दिवसांत शहरास दाखल होतील. निजामअलीच्या तर्फेनें येक भला मनुष्य येथें सलाबतजंगाजवळ आला होता. कितीकश्या स्वच्छतेच्या गोष्टी सांगितल्या. त्याजवरून यांनीं जवाहिरमल मुनसी त्यासमागमें देऊन आज रवाना केलें. निजामअलीचा मतलब कीं येथें येऊन यासी भेटावें व चार दिवस राहावें. मग आपल्या तालुकियास जावें. निजामअलीसमागमें चार हजार पांच हजार पावेतों स्वार आहेत. लक्ष्मणराव खंडागळे व गिरनोजी आटोळे हे दोघे मराठे समागमें आहेत. ईभराईमखा गाडदी त्यासमागमें आहे. त्याजपाशीं दोन अडीच हजार गाडदी व पंचवीस जर्ब तोफा त्यासमागमें आहेत व सरकारच्या दाहा तोफा इतका सरंजाम त्यासमागमें आहे. कळावें. बहुत काय लिहिणें. कृपालोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ ८५ ] पे॥ छ ११ मोहरम. ॥ श्री ॥ २६ सप्टेंबर १७५७

राजश्री बाबूरावजी दाम मोहबतहू येत जाद दोस्ता

बादज दुवा आ की जे कांहीं तुह्मी रायजगंनाथ यांसी बोललेत सविस्तर त्याचे लिहिल्यावरून विदित जाहलें. त्यासी जो कांहीं करार श्रीमंत रावसाहेब करमफर्मा रावपंतप्रधान यांचे समक्ष तुमचे विद्यमानें भवानीशंकरांहीं केला असेल तो आह्मांस प्रमाण असे व तुह्मांस ठाऊक आहे व पंत म॥रेचा जाबसाल तुमचेच विद्यमानें असे. आतां पुन्हा उत्तर प्रतिउत्तर उचित नाहीं. भवानीशंकरांहीं लिहिलें होतें कीं रावसाहेब मेहरबान र॥ विश्वासराव व तुह्मी त्या प्रांतीं येतात. आपले मतलब मंजूर करायास राजे जगंनाथास पाठवणें कीं शहर जवळ असे, वकीलास ताकीद करतील. श्रीमंतजीपासून आज्ञा रायमजकुरची पाठवायाची घेतली असे. त्यास तुमचे लिहिल्यावरून त्यास पाठविलें असे कीं र॥ विश्वासरावजी सेवेसी व तुह्मापाशीं हजर असेत. आणखी उत्तर प्रतिउत्तर त्याशीं नाहीं. जें कांहीं भवानीशंकरांहीं करार केला आहे तो प्रमाण असे. तुह्मी प्रारंभापासून सर्व गोष्टींस जाणत असा. आतां लिहिणें प्रयोजन नाहीं. जें कांहीं सर्व स्नेहाचें असे तें करणें. कामाचे मुख्य तुह्मीच असा. ज्यादा काय लिहिणें. हे कितावत.

---

[ ८६ ] ॥ श्री ॥ २३ सप्टेंबर १७५७.

पे॥ छ ११ मोहरम प्रहर दिवस चढता सोमवार.

श्रीमत् राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसीः—

आज्ञाधारक गणेश संभाजी सा॥ नमस्कार विज्ञापना. ता॥ छ ८ मोहरम पावेतों सेवकाचें व प्र॥ म॥रचें वर्तमान यथास्थित असे. स्वामीनें आज्ञापत्र पाठविलें तेथें आज्ञा जे आटोळे वगैरे पथक ताकीद करून पाठवणें. त्यावरून त्याचे घरोघर जासूद ढलायेत प॥ आहेत. परंतु अद्यापि कोणी एक राऊत आला नाहीं. येक हणमंतराउ आटोळे मात्र हाजीर आहेत. वर

कड कोणी येक आला नाहीं. सेवकानें मागती श्रीमंतास आर्जदास्त लिहिली कीं गडबड फार आहे. कांहीं जमाव आणिखी देविला पाहिजे. त्यावरून कुल आटोळे व गाढवे यांस पत्रें आलीं कीं जालनापुरीं गडबड आहे तों तेथें तैनात राहणें. ऐसीं पत्रें आलीं, परंतु कोणी येक आला नाहीं. घरोघर माणसें तों बैसलीं आहेत. आलियावर लिहून पाठवूं. वरकड निजामअली-कडील वर्तमान वरच्यावर लिहिणें ऐसी आज्ञा. त्यास वराड प्रांत परगणे-परगणेयांतील साहुकार व जमीदार यांजपासून जबरदस्तीनें पैका कांहीं हातीं लागला तो घेत आले. बाळापुरीं कोणी तुळसाजीपंत आहे, त्याणें कांहीं मामलतीवर कर्ज दिल्हें. ऐसे मिळोन पांच सालाख रुपये पावेतों बाळा-पुरीं जमा कांहीं जाले. कांहीं येणें तें घेऊन आपण घाट चढावे तों आपली खासी स्वारी गंगातीरीं आली. मग घाट चढणें कठीण होईल या दहशतीनें विठोजीपंत दिवाण मागें पैक्यासाठीं ठेऊन आपण घाट चढले; ते अंबडा-पुरावर आठ मुक्काम केले. तेथून अलीकडे पांच कोस उतरापीपेठ अंबडा-पुरची आहे तेथें येऊन चार दिवस जाले. शेत कापून चारितात व घरें कुल अंबडापुर परगणेयाची जाली. पाऊस दीड मास या प्रांतें नाहीं. त्यामुळें काडी गवताची नाहीं व खरीफ वाळते गेले. ते जागीर त्या परग-णेयाचे असोन लुटितात. शहरास ताबडतोब यावें त्यास पुण्याहून पत्रामागें पत्रें श्रीमंताचीं येतात कीं तुह्मी शहरास हरगीज न येणें. हा येक सबब. दुसरें निजामअली बराखुद मीच नवाब ऐसें जाणोन वराड प्रांतें व वरघाटें जागिरा लोकांच्या दूर करून नव्यास देऊं लागले. ईभरायमखान गाडादियासी जाफराबाद किल्ला कबिले ठेवावयासी द्यावयाची तजवीज जागीर सुद्धां परगणा द्यावा हें नवाब सलाबतजंगानें ऐकिलें. त्यावरून निजा-मअलीस लिहिलें कीं तुह्मास वराड प्रांत दिल्हा आहे तेथील कारभार करणें. बावगी वर्तणूक न करणें. त्यावरून चित्तांत संकोचित होतें. मध्यें शहान-वाजखानाचा सलूख जाला ऐसें बसालतजंगानें लिहिलें होतें त्याजवरून थांबले राहिले व तलबगाडदी फिरंगी याची तलब चढली ते दोन लाख

रुपये मागतात. हाहि बखेडा आहे. दिवाण विठोजीपंत बाळापुराहून अद्यापि आले नाहीं. त्याची मार्गप्रतीक्षा करितात. फौज स्वार मोगल सात आठ हजार आहेत व छ ५ मोहरमी जानराव आटोळा पहिलेपासून भोसलेयाचा चाकर आहे. तो चारशें रावतांनसी दाखल जाला व त्याच दिवसीं त्याकडील किरकोळ पथकें निजामअलीपाशीं सात आठेकशें राऊत आले. याच वाटेनें खंडागळा जमा होत होत हजारेक रावतानशीं जाऊन दाखल जाला. याउपरी मागती शहरास येणार ही बातमी दाट आहे. बातमीवर माणसें पाठविलीं आहेत. जैसें वर्तमान येत जाईल तैसें लिहून पाठवीत जाईन. चरण पहावयाचा बेत सेवकाचा फार आहे. परंतु निजामअली शहरास जाई तोंवर गडबड फार आहे. यासाठीं आजपावेतों मार्ग पाहिला. सुबत्ता पाहून येईन. निजामअली या प्रांयाची, सात परगणे मोगलाईचे जागिरीचे जुजबी वस्ती राहिली आहे, तेथें खंडणिया घेतात ऐसें वर्तमान आहे. सेवेसी श्रुत होय. शहरीचें वर्तमान सलाबतजंग कांहीं विदहीसे जाले आहेत. बसालतजंग कारभार करितात. ते बाहेर निघून जाऊं पाहतात. त्याची रखवाली बसालतजंग करितात. ऐसें वर्तमान ऐकिलें. लिहिलें आहे. बहुत काय लिहूं. हे विज्ञापना.

---

[ ८७ ] ॥ श्री ॥ २७ सप्टेंबर १७५७.

पै॥ छ १२ मोहरम मंगळवार दोन घटका रात्र आवशीची.

अर्ज विज्ञापना ऐसीजे. येथील क्षेम ता॥ छ १२ मोहरम मंगळवार मुकाम शहर सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. प्रार्थना ऐसीजे. आज्ञापत्र सादर जालें त्यांत आज्ञा तुह्मी लिहिता कांहींच आणि सांप्रत शामजी गोविंद व गणेश संभाजी यांणीं लिहिलें कांहीं वेगळें. निजामअली येतो. काय मसलत आहे ? साफ लिहिणें. ऐसियास निजामअली क्रियेप्रमाण भेटीसाठीं मात्र येतो. मधून फिरोन गेल्यानें वराडांतील अमल उठेल.

यास्तव भेट घेऊन मागती जाईन ऐसें कुराण पाठविलें. परंतु चित्तांत निजामअलीच्या खोटाई आहे तर हेहि सिद्ध आहेत. लढाई मातबर होईल. निजामअलीस मारून घेतील. निजामअली येथें येऊन उभयतां बंधू येक होऊन स्वामीपाशीं फिरोन गोष्टी सांगतील. ऐसें जालें तरी ज्या हातें पत्रें सेवकानें लिहिलीं तो हात आपल्या हातें तोडून टाकीन व मी आपली जिव्हाहि छेदून टाकीन. उभयतां भावांचा पेच पाडलाच आहे. सर्व जो मजकूर पूर्वी लिहिला त्यांत येक तिळभर अंतर पडलें तर हात तोडून टाकीन. असो. फार काय विनंति ? हुजूर यावयास आज निघालों. हकीमजीहि बारा घटकानंतर बाहेर साताऱ्यापासीं डेरे दाखल जाले. येथें प्रकाराप्रकारचे पेच पाडले. निजामअली सुद्धां गरीबीनें यास भेटोन गेला तर उत्तम. न गेला तरी लडाई होईल. नवाब सलाबतजंग व बसालतजंग आज बाहेर निघाले. सिद्ध जाले. स्वामीहि जवळच आहे. जे जेळेस नवाब सलाबतजंग ईशारा करतील तेव्हां कुमक करावी लागेल. सर्व अर्थ उदईक रूबरू अर्ज करीन. हकीममाअलीखा यांणीं पत्र लिहिलें तें अक्षरशा वाचून पाहावें व वाजदअलीखा दिवाण निजामअलीचा फार मुसाहेब, तेथें सर्व अधिकारी, मातबर विश्वासूक. वाजदअलीखा यांणीं सेवकास पत्र लिहिलें तें बजिनस हुजूर पाठविलें. पाहावें. सर्व पत्र हुजूर पुण्यास रवाना करावयास स्वामी समर्थ. सेवेसी श्रुत होय. हे विनंति.

---

[ ८८ ] ॥ श्री ॥ २७ सप्टेंबर १७५७.

पे॥ छ १२ मोहरम मंगळवार संध्याकाळ.

श्रीमंतराजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी:—

विनंति सेवक शामजी गोविंद सा॥ नमस्कार विनंति ऐसीजे. येथील कुशल ता॥ छ ११ मोहरम दरलष्कर नवाब निजामुदौला सांगवी प॥ जाफराबाद येथून कुच होता स्वामीचे कृपादृष्टीकरून यथास्थित असे. यानतर

येथील वर्तमान सविस्तर अंबडापुरीहून कुच जालियावर सेवेसी लिहिलें आहे. प्रणीतातीरीं सा मुकाम करून शहरास पत्रें पा। होतीं व येक ग्रहस्थहि बसालतजंग याकडे पाठविला आहे. शहरचीं उत्तरें आलीं. रा। लक्षुमणराव खंडागळे पांच सातशें स्वारानसीं त्याच मुकामीं येऊन मुलाजमत केली. दुसरे रोजीं कुच करून आठ कोस वरुड पा। मा।र येथें मु।।स आले. उतरते डेरां आपण दरबारास गेलों तों नवाब जनान्यांत होते. सैद वाजदअलीखा भेटले. यांसी मजकूर केला कीं श्रीमंताकडील फौजा शहराचेच नजीक येऊन पोहचल्या. नवाब जलदी करून शहरास जातात. यामुळें नाहक उपाधीस कारण. त्यास ह्मणों लागले कीं नवाब सलाबतजंग बसालततजंग याचा दारमदार होणार तो जाहला. शहानवाजखान याचाहि काजिया फैसल होऊन किल्यास नवाबाकडील माहासरा होता तो उठला. श्रीमंताकडील लोकांनीं किलेयावर अनुकाहि चढविला. आतां कांहीं खलष राहिला आहे ऐसें नाहीं. आह्मी येथवर आलों. त्यास याउपर खावंदापावेतों येकवेळ खमखा जाऊन परतोन येऊन खावंदापासीं आपला आहवाल जाहीर करणें व श्रीमंताचे कृपेची वरकी करून घेणें या दो कार्यास्तव नवाब जातात. छ मजकुरीं दाभाडी परगण्यांत येथून बारा कोसांवर मु।।स जाणार. तेथून कडसांगवी; तेथून शहरास दाखल व्हावयाचा निश्चय जाहला असे. विदित होय. हे विज्ञाप्ति.

---

[ ८९ ] ॥ श्री ॥ २७ सप्टेंबर १७५७.

पे॥ छ १२ मोहरम मंगळवार मध्यानरात्र.

उपरि निजामअल्ली आज दोन गांवावर आले. शहरीहून आठी कोसांवर छ १४ मोहरमीं शहरांत दाखल होणार. बसालतजंग आजच सलाबतजंगास घेऊन बाहीर काळेचुन्यावर येऊन डेरे दाखल जाहले. फौजाहि

बाहेर निघते. यांचा व निजामअल्लीचा संकेत आहे कीं तुह्मी आलेत ह्मणजे येथून कुच करावें. त्याजपाशीं अद्याप फौज मिळाली नाहीं. सावध नाहींत तों आपण जाऊन गाठ घालावी. उभयतां मिळोन फौज पंधरा हजार शिवाय गाडदी तोफखाना आहे. ऐशीयास तुह्मी बहुत सावध असणें. यांचा पक्का विचार जाला आहे. सूचनार्थ लिहिलें असे. परिच्छिन्न दग्याचा विचार आहे. कळलें पाहिजे. तुह्मांस भरोसा देत असतील त्यावर न राहाणें. सावध असणें. आह्मांस आढळांत गोष्ट आली ते लिहिली असे. आह्मी लिहिलें असें कोण्हास कळों न देणें.

---

[ ९० ] ॥ श्री ॥ २७ सप्टेंबर १७५७.

पे॥ छ १२ मोहरम, मंगळवार प्रातःकाळ, सूर्योदयसमयीं.

अर्ज विज्ञापना ऐसीजे. येथील क्षे॥ ता॥ छ ११ मोहरम सोमवार अडीच प्रहर रात्र मुकाम शहर सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. दोन आज्ञापत्रें—येक जाणारडाक, दुसरे चार शुतर स्वार—सादर जाहालीं ते आजच दिढा प्रहरा रात्रीस पावलीं. आज्ञा कीं दोनसें रोखें गेलियास निजामअल्लीचा रोख सुटतो व मागें पडतें, यास्तव कसनेरच्या डोंगराकडे गेलिया उत्तम, ह्मणोन विस्तारें आज्ञा. ऐसियास कसनेरचा डोंगर उत्तम असे. दोन कुचें करून कसनेरच्या डोंगराकडे मुतवजे यावें. चारा डोंगरास फार आहे. जिरायताविशीं ताकीद जाहाली पाहिजे. उदईक छ १२ मोहरमीं मंगळवारीं हकीममहमदअल्लीखान यास घेऊन सेवेसी येतों. आज आतांच हकीममहमदअल्लीखानास नवाब बसालतजंग यापासून रुखसत करून घरास आणिलें. उदईक मंगळवारीं बारा घटकानंतर भद्रा सरल्यावर सेवक सहितखानम॥रनिले येथून स्वार होतों. आतां विलंब नाहीं. निजामअल्लीहि चालला. येतों. परंतु कांहीं चिंता नाहीं. यासी कुरान वगैरे अहद पैमान करून येतों. एक दोन दिवस राहून मागती फिरोन

जाईल असा करार करितों. व हे ह्मणजे बसालतजंग मुरतेदहि आहेत. व उदईक मंगळवारीं विसा घटकानंतर बाहेर डेरेदाखल होतील. स्वामींनीं मंगळवारीं कुच करून कसनेरच्या रोखें पुढें पूर्वेस यावें. ह्मणजे बसालतजंगास आसरा व निजामअल्लीवर दबाव. हकीमजीस घेऊन सेवेस येतों. जवळ सर्व कामें उगवून घ्यावीं. सेवकास यावयास विलंब लागल्याबद्दल वसवासाहि फार जाले. परंतु मी कांहीं रिकामा सुखवस्त बसून राहिलों नाहीं. सरकार कामास्तव राहिलों. मी खबर कैसी लिहितों यांत कांहीं संशय यास्तव महाराव जानोजी जसवंत निंबाळकर व माधवराव मोरेश्वर यांजकडे खासे खिजमतगार पत्रें साहित वेगळी खबर काय असेल ती कळवून सादर जाहाली ते लिहितील. सेवक उदईक येथून हकीमजीस घेऊन स्वार होतों. सर्व मजकूर रुबरुच अर्ज करीन. महाराव जानोजी जसवंत फार निखालस व सरकारचे मर्जीप्रे॥ वर्तावें. वर्ततात यांत संशय नाहीं. व मजसीहि मैत्रिकी या दिवसांत फार जाहाली. व जसवंतरावहि सरकारचे मर्जीप्रे॥ आहेत. येथें चिरंजीव अवधुतराव यास ठेविलें. खोजेरहिमदुलाखा बहादर व नवाबसाहेब व नवाब बसालतजंग यांसीं मुकाबला घालून ठेविला. याउपरि पत्र सादर होईल तरी चिरंजीव अवधुतराव केशव याचे नांवें जाहालें पाहिजे. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[ ११ ] छ १२ मोहरम ॥ श्री ॥ २७ सपटंबर १७५७.

राजश्री विश्वासरावजी गोसावी यांसि

छ श्रीमंतसकलउत्तमगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृतचारुस्वभाव व स्ने॥ महाराव जसवंत निंबाळकर दंडवत विनंति उपरि येथील क्षेम त॥ छ १२ मोहरम जाणोन निजानंद लिहिणें. विशेष. कृपा करून पेंडापुरच्या मुकामींचें पत्र पाठविलें तें पावोन समाधान जालें. आपण समीप आलों

असतां पत्र न पाठविलें ह्मणोन लिहिलें. ऐसियासी राजश्री राजे जीवनरावजी प्रतिदिवसीचें वर्तमान लिहितात याजकरितां पत्र लिहिण्यास अंतर जालें. माफ केलें पाहिजे. इकडील वर्तमान तर याजपूर्वी आपण राजश्री बाबूरावजीस लिहिलें होतें कीं तूर्त दोन चार रोज राजश्री राजे जीवनराव यांसीं तिकडे येणें मसलहत नाहीं. हें वर्तमान आपल्या श्रवणाभिरूढ व्हावें ह्मणोनच त्यांस लिहिलें होतें. सारांश, आपणांस श्रवण जालेंच असेल. सांप्रत राजे मा।रनिले यांनीं जाबसालाचे गुंते कुल उगविले. कांहीं संदेह राहिला नाहीं. उदईक राजे मा।रनिले व हकीम महमदअलीखान आपले सेवेसी येतात. विस्तरें वर्तमान निवेदितील. व घरचा पेंच उगवावयासाठीं निजामुद्दौला बहादर यांजकडून दोघे भले माणूस नवाब बसालतजंग यांजकडे आले होते ते व इकडूनहि सोफीबेगखान वगैरे तिघेजण भले माणूस ऐसे तिकडे गेले. पुढें यांचा त्यांचा भेटीचा सिद्धांत होईल तो लिहिजेल. हे विनंति.

---

[ ९२ ] ॥ श्री ॥ २८ सप्टेंबर १७५७.

ते॥ छ १३ मोहरम बुधवार त्रितीयप्रहरदिवस.

श्रीमंत राजश्री राउसाहेब स्वामीचे सेवेसीः—

आज्ञाधारक गणेशसंभाजी सा॥ नमस्कार विज्ञापना. ता॥ छ १२ मोहरम संध्याकाळ ........ घटिका दिवस पावेतों सुखरूप असे. विज्ञापना ऐसीजे: निजामअलीखान यांणीं अकरा कोसांची मजल करून दाभाडीवर मुकाम केला होता. आज पहाटे प्रहररात्रीं कुच करून आजी अकरा कोस वरूडनजीक शहर तेथून पांच कोश आहे तेथें गेले. उदईक दाखल कदाचित् होतील. तेरावी तेरीख आहे. बहुधा चौदाव्ये तेरखेस पोंहचतील. बहुत काय लिहूं. हे विज्ञापना. या प्रांतीचें वर्तमान होईल तें वरच्यावर

लिहीत जाईन. हे विज्ञापना. स्वामीचें आज्ञापत्र याच घटिकेस पावलें. हे विज्ञापना.

---

[९३] ॥ श्री ॥ २८ सप्टंबर १७५७.

पे॥ छ १३ मोहरम बुधवार सवाप्रहर रात्र प्रारंभ.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसीः—

आज्ञाधारक गणेश संभाजी सा॥ नमस्कार विनंति. ता॥ छ १३ मोहरम पावेतों स्वामीचे कृपेकरून सुखी असो. विज्ञापना ऐसीजे: निजामअलीखान याचें काल वर्तमान लिहिलें होतें तें छ १२ रोजीं मौजे बानगांव प॥ पिंपरी नजिक वरुड येथें मुकाम होता. आज शहरानजीक कोसावर राहणार. उदईक नवाबाच्या भिटी होणार. सेवेसी श्रुत होय. सरकारचे जासूद पत्र छ ११ रोजचें घेऊन आले तें काल संध्याकाळच्या दिडा प्रहरा दिवसा पावलें. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

---

[९४] ॥ श्री ॥ २९ सप्टंबर १७५७.

पे॥ छ १४ मोहरम गुरुवार सा घटका दिवस प्रातःकाळ.

विनंति सेवक शामजी गोविंद सा॥ नमस्कार विनंति. येथील ता॥ छ १३ मोहरम बुधवार आवशीची सा घटका रात्र होती. स्वामीचे कृपादृष्टीकरून मोरगांवावर यथास्थित असे. यानंतर मुकाम मजकुरास येतांच विनंतिपत्र शिवाजी दि॥ नारोजी ना॥ याब॥ पाठविलें आहे. पावलें असेल. अलीकडे सोफीबेग अर्जबेगी नवाब सलाबतजंग येथील नवाबाकडे कांहीं पैगाम घेऊन आले होते. त्यांणीं चार घटका खलबत करून मागती गेले. याचा आजचा मुकाम शहरानजीकचा होता. त्यास त्यांणीं सांगोन पाठविलें कीं

वरुडावरून परभारेंच गधेलीवर जाऊन मुकाम करणें. त्यावरून वरुडापासून रव गधेलीकडे फिरविली. चिखलठाण्यापावेतों पोंचली. तेथून मागती मसलत फिरवून मुकाम नारेगांवावर आणिला. सोर्फीबेग अर्जबेगी यांचें यावयाचें कारण मनास आणितां यांणीं मुलाजमतीस उदईक पांचसाशें स्वारांनीं जरोर यावें. बहुत फौज व तोफखाना न आणावा. त्यास हे गोष्ट यांणीं कबूल न केली. मातबर सरंजामानसी येऊन ह्मणोन परिच्छिन्न सांगितलें आणि उदईक मुलाजमत करणार. बहुधा बसालतजंग पेशवा येतीलसें दिसते. व येथून बमाय फौज व तोफखाना समेत कुच करून शहरानजीक जाऊन उतरणार. यांतहि त्याची खिलाफ मर्जी दिसते. सेवेसी कळावें. नवाब शहरास पोहोंचले. मसलहतीस येईल तर एखादें पत्र नवाबास थैली पाठवावयाची असिली तर पाठवावी. मजकूर आगतस्वागत आणि सेवकाचे पत्रावर घालून ल्याहावें. तो ऐसा ल्याहावा कीं पत्र दाखवणें पडलें तर कार्यास येई. राजश्री जीवनराव व हकीमम॥अलीखान आजी शहरींहून रवाना जाले आहेत. सेवेसीं आलेच असतील. छ मजकुरीं लष्करावर टोळधाडी उत्तरेकडून चौके वगैरे पहाडीकडून कोटीशा निखल अभ्राप्रमाणें येऊन पूर्वेकडे गेली. कांहीं अग्नईकडे गेली. लष्करावर दोन तीन घटका होते. विठोजी सुंदर दिवाण पांचशें स्वारांनसी बाळापुराहून उद्या येणार. सेवेसी विदित होय. हे विनंति.

---

[ ९५ ]

॥ श्री ॥ ३० सप्टेंबर १७५७.

पे॥ छ १५ मोहरम शुक्रवार प्रहर दिवस प्रातःकाळ.

सेवेसी विनंति सेवक शामजी गोविंद सा॥ नमस्कार विनंति येथील कुशल ता॥ छ १४ मोहरम गुरुवार मुकाम नजीक शहर काळाचबुत्रा दरलष्कर निजामुद्दौला स्वामीचे कृपादृष्टीकरून यथास्थित असे. कालीं रात्रौ सेवेसी

विनंति विनंतिपत्र पाठविलें आहे तें पावलेंच असेल. प्रातःकालीं नवाबांनीं कुच करून शहरानजीक आले. तिकडून नवाब बसालतजंगासमागमें दरगाकुलीखान व हैदरयारखान खोजे रहमतुलाखान वगैरे मोठेसे थाटानें आले. परस्परें तोफखान्याची कोटबंदी करून उभे राहिले. जसवंताचे तळ्यापाशी परस्परें भेटी जाल्या. बसालतजंग यांणीं अकरा मोहरा नवाब निजामुदौला यास नजर करून अदाबाब जाऊन आणून आणखी लोकांनीं नजरा करून उभयतां नवाब आपलाले हत्तीवर स्वार जाले. समागमेंच सलाबतजंग याचे डेरियास काले चबुतरियापाशी आले. नवाब सलाबतजंग दिवाणखानियाचे डेरियांत मसनदेवरच होते. त्यास निजामुदौला यांनीं सलामगाबापासून अदाबाब जाऊन आणून पुढें मसनदेपाशीं जाऊन नजर अकरा मोहरा व कांहीं रुपये करून नवाब उभे राहून भेटले आणि आपणापाशीं बसविले. बसालतजंग आपले काईद्यानें बसले. निजामुदौलायाकडील वाजदअलीखान व सैदकाबीलखान व बक्षी वगैरे यांणीं नवाब सलाबतजंग यास नजरा करून काईद्याप्रमाणें उभे राहिले. घटका येक जालियावर त्रिवर्ग नवाब व वाजदअलीखान ऐसे खलवतेंत दोन घटका बसोन रुसखत होऊन आपले डेरियास लष्करांत आले. सेवेसी विदित व्हावें बद्दल विनंति लि॥ असे. याउपर होईल वृत्त तें दिनचर्येंचें लिहिलें जाईल. विदित होय. हे विनंति.

---

[ १६ ]

॥ श्री ॥

३० सप्टेंबर १७५७.

पे॥ छ १५ मोहरम शुक्रवार दोन प्रहर दिवस.

सेवसी विनंति. निजामुद्दौला नवाब सलाबतजंग याचे डेरियांतून उठोन बसालतजंग याचे डेरियास आले. तेथें घटका बसले. त्यांनीं येक हस्ती व दोन घोडीं नजर केली ते घेऊन आपले डेरियास आले. नवाब सलाबतजंग यांणीं या भेटीस वस्त्रपात्र कांहीं दिल्हें नाहीं. हे विनंति.

[१७]

॥ श्री ॥ ३० सप्टेंबर १७५७.

पे॥ छ १५ मोहरम शुक्रवार दीड प्रहररात्रउर्वरित.

सेवेसी विनंति. सेवक शामजी गोविंद सा॥ नमस्कार विनंति येथील कुशल त॥ छ १५ मोहरम शुक्रवार तिसराप्रहर स्वामीचे कृपादृष्टीकरून यथास्थित असे. यानंतर आज प्रातःकाळीं विनंतिपत्र पाठविलें आहे तें पावलेंच असेल. दोन प्रहरा नवाब बसालतजंग नवाब निजामुदौलायाचे डेरियास येऊन येक प्रहर उभयतां खिलवतेंत बसोन परस्परें सभाई होऊन आणशफत जाहाली ह्मणोन येक गृहस्थाचे द्वारें शोध लागला, त्यावरून विनंति लिहिली असे. राजश्री विठोजी सुंदर दिवाण बाळापुरीं राजश्री येशवंतराव कानेरे व कृष्णाजी गोविंद यापासीं ऐवज आणावयाबद्दल राहिले होते, त्यास तूर्त दीड लाख रुपयाचा निकाल करून घेऊन आले. छ मा॥रीं लष्करांत दाखल जाहले. विदित होय. हे विनंति.

---

[१८]

॥ श्री ॥

पे॥ छ १५ मोहरम शुक्रवार दीडप्रहर रात्र उर्वरित.

श्रीमंत सद्गुणमूर्ती राजश्री राऊसाहेबाचे खिजमतीसः —

आज्ञाधारक गुणाजी माणकोजी नाईक दंडवत विनंति. आज्ञेप्रमाणें रात्रंदिवस सरकार कामावर सेवक देवडीवर हजर असतो. जे खबर रुहकार होईल ते वरचेवर खिजमतीस जाहीर केली जाईल. हे विनंति.

[१९]

॥ श्री ॥ ३० सप्टेंबर १७५७.

पे॥ छ १५ मोहरम शुक्रवार दीडप्रहररात्र उर्वरित.

श्रीमंत सद्गुणमूर्ति राजश्री रावसाहेबाचे सेवेसीः—

आज्ञाधारक कृचेश्वर त्रिंबक दि॥ नारायणराव आपाजी वकील सा॥

नमस्कार विनंति उपरि येथील क्षेम त॥ छ १५ मोहरम श्रीमंताचे कृपेकरून कुशल स्वकीय लेखकास आज्ञा केली पा॥. विशेष. छ १४ रोजीं दोनप्रहर चार घडी दिवसा निजामअल्ली येऊन नवाब सलाबतजंग वगैरे कुल अमीर गेले होते. निजामअल्लीनीं नजर पाच मोहरा, रुपये ११ सलाबतजंगास गुजाराणिल्या. हें वर्तमान छ १४ चे पत्राब॥ सविस्तर रवाना केलें आहे. विदित जालें असेल. छ मजकुरीं दरबार केला. बसालतजंग वगैरे लोक आले. चार घटका खलबत केलें. दरबार बरखास्त झाला. त्याउपरि बसालतजंग निजामअल्लीचे डेरियास आले. तेथें इब्राामखान गाडदी, लक्ष्मणराव खंडागळे, खोजे रहीमतुलाखान मिलोन खलबत केलें. गाडदी वगैरे यांनीं विस्तारहि दिधला कीं चार कोस श्रीमंतजीकडे दबाव टाकावा. कांहीं किल्याकडेहि रुख दाखवावा. हें वर्तमान येका मातबराचे जबानीं आलें. सेवेसी विनंति केली. उदईक तहकीक करून लिहिलें जाईल. गुणाजी हरकारे सरकार यांणींहि या मजकुराची बातमी आणिली. लहान मोठें वर्तमान सेवसी वरचेवर लिहील. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ १०० ] **श्रीदत्तात्रय** १ आक्टोबर १७५७.

अवधूतराव केशव.

अर्ज. विज्ञापना ऐसीजे. हिंदुस्थानाकडील वर्तमान आलें कीं गाजुद्दीखान वजिरांहीं श्रीमंत राजश्री दादासाहेबासी सलूक करून उभयतां एकचित्त होऊन नजीबखान रोहिला जेर केला. तेव्हां येऊन भेटला असे. वजिरांहीं बंगाल्यांतील पैका आणिला होता. पातशहाचे खजान्यांत एक करोड बत्तीस लाख रुपये दाखल केले. पुढें आतां मोहीम लाहोरावर श्रीमंत व वजीर करीत आहेत. पंधरा हजार स्वार अंताजी माणकेश्वर याजबरोबर देऊन तमाम ठाणीं पठाणांची उठवून आपलीं बसवीत आहेत.

दिल्लीहून कूच करून अकबरपूर पावेतों गेले आहेत. दोन पातशहांजादे[१६९] समागमें घेतले आहेत. लाहोरींहून पठाणाहि बाहेर निघाला आहे. दिल्लीकडे येतो वार्ता असे. लाहोरचा सुभा श्रीमंतांस दिधला असे. वरकड मुलकांतील पैसा निमेनिम वाटून घ्यावा. पातशहास दरमहा बांधला आहे तो निमेनिम देत जावा. इतक्यावर जें वर्तमान होईल तें विनंति लिहूंन[१७०]. येथील दरबारचें वर्तमान छ १६ रोजीं नवाबास कन्या जाहाली. ह्मणोन प्रात:कालीं बिसालतजंग व तमाम अमिरांनीं नजरा केल्या. राजश्री जानोजी निंबाळकराहि आले होते. तेथून बिसालतजंगाचे डेऱ्यांत जानोजी महाराऊ आले. च्यार घटका बसले होते. दोन प्रहरा निजामुदौला तो[१७१]शाचा पोशाक करून मुबारक[१७२]बादीस आले. नजर केली. दोन घटका बसून मग बिसालतजंगाचे डेऱ्यास आले. तेथें एक प्रहर बसून खिलवत केली. मग तीन रकम जवाहीर व नव पार्चे[१७३] नजर केले. नवाबांनीं आपली स्वारी बागांत जायासी तयार करविली होती. तेथून परस्परें निजामदौलाचे डेऱ्यास जाणार होते. हा काळवर तिघे बंधू समाधानेंकरून आहेत. नवाबास निजामदौला ह्मणों लागले कीं तुह्मीं आह्मांस §आसफजाचे ठायीं आहांत. लोकांनीं नाहक तुमचे मनांत वसवास घातला असे. मनांत कृत्रिम असेल तर कुराणावर हात ठविला. तेव्हां नवाबांहीं उत्तर केलें कीं दौलत सलतनत अवघी तुमची आहे. ऐशीं परस्परें स्नेहाचीं भाषणें करून येवेळेपावेतों समाधानें आहेत. उदईक जें वर्तमान होईल तें लिहून. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

पे॥ छ १७ मोहरम, रविवार, अडीच प्रहर दिवस चढता.

---

१६९ अलीगोहर आणि जवानबख्त हे दोघे असावे.

१७० लिहूं. पुष्कळ मराठी पत्रांत आणि विशेषत: कोकणांतून वर आलेल्या लोकांच्या पत्रांतून अनुस्वाराचे ठिकाणीं निराळा सबंद न लिहावयाची गेल्या शतकांत चाल होती असें दिसतें ( पहा पत्रें व यादी १५८, १८४, १६६ ).

१७१ भरजरीचा. १७२ आनंदप्रदर्शनार्थ. १७३ वस्त्रें. § निजामुन्मुल्काचे

[ १०१ ] ॥ श्री ॥ १ आक्टोबर १७५७.

पे॥ छ १६ मोहरम मंदवार प्रहररात्र.

श्रीमंत सद्गुणमूर्ती राजश्री रावसाहेबाचे सेवेसीः—

आज्ञाधारक कचेश्वर त्रिंबक दी॥ नारायणराव आपाजी वकील श्रीमंत सा॥ नमस्कार विनंति उपरि येथील क्षेम ता॥ छ १६ मोहरम मंदवार श्रीमंताचे कृपेकरून कुशल. छ १६ रोजीं सलाबतजंग दरगाकुलीखानाचे बागामध्यें सयरेबदल तिसरा प्रहरा गेले. बा॥ पंनास माणूस, पंचवीस स्वार होते. त्याउपरि अलजपुरचा अधिकारी व बसालतजंग येकत्र होऊन निजामअल्लीचे सेरियांत तिसरा प्रहरा खलबत केलें. त्यास निजामअल्लीनें आपलें वर्तमान मार्गीचें सीपाहचें देण्याचें कुल श्रुत केलें. यांणीं आपले येथील व राजकी किल्याचे व श्रीमंताचे स्नेहाचा विस्तार कुल जाहीर केला. त्यास ज्येष्ठांनीं उत्तर दिधलें कीं आमचे विस्ताराचा तुह्मीं निर्वाह करणें अगर तुह्मांस आपले ताबेदारीमध्यें ठेवणें आहे तर आह्मी तुमचे विस्तारावेगळे नाहीं. तुह्मांस अनकूल येत नाहीं तरी आमचे सलाहप्रमाणें तुह्मी चालावें. ऐशीं परस्परें भाषणें जालीं. बसालतजंगांनीं उत्तर केलें कीं सलाबतजंगास श्रुत केलिया त्याचे विचारें जें मुकरर होईल त्याप्रमाणें आपण उभयतां वर्तणूक करावी. र॥ विठोपंत दिवाण निजामअल्ली छ १५ रोजीं सायंकाळीं शहरास दाखल जाले. पत्र प्रहरा दिवसा रवाना जाले. सायंकाळ पावेतों वर्तमान जें कांहीं लहान मोठें येईल तें सेवेसी विनंतिपत्र लिहीलें जाईल. बहुत काय लिहिणें. हें विज्ञप्ति.

---

[ १०२ ] ॥ श्री ॥ १ आक्टोबर १७५७.

पे॥ छ १६ मोहरम प्रहर रात्र मंदवार.

सेवेसी विनंति सेवक शामजी गोविंद सा॥ नमस्कार विनंति येथील वर्त-

मान त॥ छ १६ मोहरम मंदवार दोन प्रहर स्वामींचे कृपादृष्टीकरून यथास्थित असे. यानंतर येथील वर्तमान तर नवल विशेष लिहिजेसें नाहीं. नवाब सलाबतजंग यास पुत्र जाहला आहे. त्याचे मुबारकबादीस त्याचे दर्शनास नवाब निजामुदौला गेले आहेत. सायंकाळीं आपले डेरियास येतील. दौलताबादेस मागती चौक्या पाठविणार ह्मणोन येक दोघे बोलत होते; परंतु केवळ प्रमाणांत नाहीं. तथ्य असिल्यास सविस्तर मनास आणून विनंतिपत्रीं लिहिलें जाईल. सेवेसी विदित होय. हे विनंति.

---

[ १०३ ] ॥ श्री ॥ २ आक्टोबर १७५७.

पे॥ छ १७ मोहरम रविवार प्रहर दिवस बाकीचा.

श्रीमंत सद्गुणमूर्ती राजश्री रावसाहेबाचे सेवेसीः—

आज्ञाधारक कचेश्वर त्रिंबक दी॥ नारायणराव वकील श्रीमंत स॥ नमस्कार विनंति उपरि येथील क्षेम त॥ छ १७ मोहरम प्रातःकाळ आपले कृपेकरून कुशल. यानंतर हैदराबादेकडील वर्तमान. मुजफरखान गाडदी याणें गडबड मांडिली आहे. एक ठिकाण गडबड करून घ्यावें ऐसा त्याचा मनोदय. हें वर्तमान मुख्यास येथें आलें. हे पुढें तदबीर काय करितात हें लिहिलें जाईल. ईब्रामखान गाडदी याचे देवडीवर गुणाजी नाईक दोन माणसें हरकार ठेऊन आपण हजर राहत आहे. लौकिक बोलवा आहे कीं गाडदी याचे पोटामध्यें खोटाई आहे. मुख्यापासून आज पावेतों दुसरी गोष्ट निघाली नाहीं. पुढें जें वर्तमान होईल तें विनंति केली जाईल. पूर्वीं पांच सा पत्रें सविस्तर सेवेसी विनंतिपत्रें लिहिलीं सेवेसी पावलीं असतील; परंतु उत्तर येक सादर न जालें. याकरितां सेवकाचें पत्र सेवेसी कोण्ही पोहचावितो कीं नाहीं हेंहि कळत नाहीं. आतां कृपा करून उत्तर सादर केलें पाहिजे. हे विनंति.

---

[ १०४ ] ॥ श्री ॥ ४ आक्टोबर १७५७.

पे॥ छ १९ मोहरम मंगळवार दोन प्रहर दिवस.

महीपतराव लक्ष्मण

सेवेसी विज्ञापना ऐसीजे:— परवाचे दिवशीं नवाबास मोहोरकबंदी याव्यासी राजश्री जानोजी निंबाळकर आले होते. मुबारकबादी देऊन नवाब बसालतजंगाचे डेऱ्यांत येऊन बसले. तेथें उभयतांसी भाषण जाहलें कीं नवाबास दौलताबादेस शहानवाजखानापाशीं पावतें करावें, हा आळा निंबाळकरास आला होता त्याचा परिहार जाला. नवाब बसालतजंगास कळलें कीं यांजपासून ही गोष्ट सहसा होणार नाहीं. तेव्हां नबाबांहीं गळ्यांत हात घालून पोटासीं धरले. तुह्मापासून उमेद मोठीसी आहे. चित्तांत किलमिष होता तो दूर केला असे. सेवेसी श्रुत होय. वेदमुहूर्ती दीक्षित महाराव जानोजीचे घरास आले होते. साताऱ्यास उपद्रव फार लागला आहे. आह्मी जावें कीं राहावें ? महारावजीनें समाधान केलें कीं तुह्मास काय चिंता आहे. समाधानें राहाणें. आज सायंकाळीं मुरादखान व विठ्ठल सुंदर महारावजीपाशीं येऊन मसलत एकांतीं करीत बसले होते. महारावजीकडील विठ्ठलरावहि होते. चौघेजण चार घटकापर्यंत दिवाणखान्यापुढें बाग आहे. तेथें बसोन एकांत केला. मनास परस्पर आणिता निजामअल्लीस महाराव अद्यापि भेटले नाहींत. भेट घ्यावी ह्मणत होते. उत्तर महारावजीनें केलें कीं आह्मांस भेटीवाचून काय प्रयोजन ? त्याचे भावासी भेटलों, तें त्यासीच भेटलों. तें व हे एकच आहेत. हरयेकापाशीं राहोन नोकरी करावी. बहुतेक भेटीस उद्या परवा जातील. राजश्री वेंकटराव निंबाळकरहि भेटले नाहीं. याची जाल्यावर त्याची होईल. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

[ १०५ ]

॥ श्री ॥ ५ अक्टोबर १७५७.

पे॥ छ १९ मोहरम मंगळवार दोन प्रहर दिवस.

सेवेसी भगवंतराव यादव दी॥ अवधूतराव केशव सा॥ नमस्कार विज्ञापना ऐसीजे:—कालचें वर्तमान श्रीमंत बाबासाहेबाचे पत्रांत लिहिलें त्याजवरून अवगत जालें असेल. आज छ १८ मोहरमीं खोजे रहमतुलाखान बहादूर यांचे येथें गेलों होतों. पुसूं लागले कीं कांहीं राजियाकडील पत्र आलें कीं काय ? आपण उत्तर जवळ जाऊन दिल्हें कीं काल हकीम महमदअलीखानजीचे भेटीचें वर्तमान राजाजीचे पत्रावरून श्रुत केलें. त्याजउपर आज पत्रें आलियावर निवेदन केलें जाईल. मग फतहुदीअलीखान याची भेट घेतली. हे ह्मणों लागले कीं विशेष कांहीं नाहीं. मागती भेटणें. पुरता शोध घेऊन सांगणें. त्याचे घरीं जाऊन जें सांगेल तें लेहून पाठवितों. हकीमजींहीं पत्र फतहुदीअलीखानजीस आपले इनामाचे गांवाविषयीं व परंडियाचे जाहागिरीविषयीं लिहिलें होतें. त्यास परवानगी इनामाचे गांवची व परंडियाचे जागिरीची ऐसे कागद दोन खोजे रहिमतुलाखानबहादूर यांहीं लालामहाराय वकील याचे हवाला केलें ऐसें हकीमजीस सांगणें. आज छ १८ सोमवारीं दरबार जाला. हैदरयारखान सेरजंग यास पंचहजारीची तसलिमात जाली. पालखी झालदार इनायेत जाली. सयद कबीरखान बक्षी पातशाही यास झालदार पालखीची तसलिमात जाली. इजाफा पंचहजारीचा होणार. सफसीलानखान उभयतां अबदुल हुसैनखान हयदराबादेची सुभेदारी कुल इजारा केली. त्याजकडे रु॥ लाखो सरकारचे आहेत. त्याजकरितां अबदुल हुसेनखान सफसीलानखानाचा पुत्र येथें आहे त्याजवर तगादा ह्मणोन त्याणें जे जे अमील सफसीलानखानाचे अमलचे होते त्यांची इसमनवेशी लेहून दिल्ही. बहादूरसिंग बऱ्हाणपूरकर अमील त्याचे वेळेस होता. त्यास पंनास गाडदी पाठवून बेहुरमत करून नेलें. कळावें. आज छ १८ नवाब निजामुद्दवला बहादूर आसफजंग स्वार होऊन शहरास आले होते. बादली निमे अस्तीन त्याले

व कलगी खोविली होती. चार घटका बसले होते. स्वारीसमागमें स्वार पांचशें व गाडदी वगैरे होते. शाहामाहमुदजीचें त्याचें भाषण काय जालें आणि तबरुक काय दिधला याचा शोध पुरता सवसगियापासून घेऊन सेवेसी लिहितों. निजामुदवला शहरांत आले ह्मणून त्याचे मुख्य मुसाहेब वजीदअलीखान त्याची भेट जाली नाहीं. उदईक मागती जातों. आज्ञा होती कीं लालामाहाराय वकील याची भेट घेत जाणें आणि वर्तमान शोध घेऊन लिहिणें. त्याजवरून आज छ १८ चार घटिका रात्र जालियावर माहाराय वकिलाचे घरीं गेलों होतों. त्यास ज्या युक्तीनें पुसावयाचें त्या युक्तीनें पुशिलें. त्याणें सांगितलें कीं लक्षुमणराव खंडागळे व इभराईमखान गाडदी हे दोघे एकत्र होऊन या विचारांत आहेत कीं दुर्गस्थाचें यश आपण घ्यावें. त्याजकडे सूत्र लावून लिहिलीं पुसलीं करितात. आज निजामुद्वलास शब्द देतात कीं श्रीमंताकडे दारमदार करणें काय उचित होतें? यांस सारेंच आज द्यावें. खोजे रहिमतुलाखान बहादूर बास्तेकर याजवर शब्द आणावा ऐसा मनोदय आहे. आजी मुख्य बंदगानअलीस शून्यातुल्य करावें हा हेत त्याचा आहे. बाह्यात्कारें तिघे बंधु एकत्र होऊन विचार करितात; परंतु परस्परे संकोचित आहेत. वडिलाच्या उतराईंत आहेत ऐसें लालामाहारायानें सांगितलें. आजी ह्मणों लागले कीं मी इभराईमखान गाडदी याचेथें गेलों होतों; गोष्टीनें गोष्टी निघाली; त्यास आह्मीं इभरामखानास ह्मटलें कीं श्रीमंताशीं बिघाडून कोठें राहूं? पाहातां येकल्या रघोजी करांडियाच्या वोहपियानें बरें न आलें. तुह्मांस कांहीं दोन चार परगणे मागणें तरी मागून आपल्या तालुकियास जाणें. श्रीमंताकडील दारमदार जाला तो कायम करवितांच तुमचें बरें आहे. ऐसे संशय कितेकाप्रकारें त्याचे पोटांत घातले. ऐसें माहाराजें सांगितलें; परंतु हे गोष्टी दृढ नाहीं. ईश्वरसत्तेनें सर्व शत्रूचे तर्कवितर्क लयातें पावतील. इभराईमखान गाडदी याची तलब एक लाख दरमाहा आहे. त्यांजपैकीं जातीचे पंचाणणव हजार व पांच हजार शागीर्दपेशा. त्याचे त्यास

आतां गाडदी ह्मणतो कीं शागीर्दपेशाचे तों इनाम आहे; माझे तलबेंत मजुरा न घेणें. ऐसा बखेडा आहे. खोजे रहिमतुलाखान याचे लेकीस बरें वाटत नाहीं ह्मणून तिसरा प्रहरां सैन्यांतून शहरास घरीं जात असतात. बाबासाहेब आज छ१८ रात्रीं स्वार होऊन सैन्यांत त्याचे घरीं गेले होते. ते डेरियांत नव्हते. मग माहाराज अपूर्ण बहादूर जानोजी जसवंत निंबाळकर याचेथें गेले होते. सेवकाहि समागमें होता. त्याजउपर शहरांत आलियावर महाराय वकिलाचे घरास गेला. त्याचें वर्तमान ध्यानास आणून पुढें खोजे रहिमतुलाखान बहादूर याचे घरीं रात्रीं गेलों तों घरांतून बाहेर निघोन सैन्यांत डेरियास जात होते ते आपण जाऊन बाबासाहेबाचे तर्फे त्याचे लेकीचे खैरयतीचें वर्तमान पुशिलें आहे. आणि नकाहत ? असतां आपले भेटीस्तव सैन्यांत गेले होते. आपण घरीं आले ह्मणून भेटी न जाली. मजला खितमतींत पाठविलें आहे. राजाजीचेंहि पत्र आलें. हकीमजीस साहेबजादियाचे मुलाजमतीचें बाहरमद केलें. वितिपात जालियावर भाषण होईल. मग इतला दिधली जाईल. ऐसें अवधूतरावजीस लिहिलें आहे. आजी हजरतेस बहुत बहुत स्तवीत आहेत. आणि लिहिलें आहेत कीं रोयेदाद जरूरी असेल ते हजरतेस पुसोन लिहीत जाणें. आजी त्याचा खुलासा काढावयास हे गोष्टी बोललों कीं हजरत खातरजमा ठेवीत. साहेबजादियापाशीं व श्रीमंत पंतप्रधान साहेबापाशीं हजरेतचा स्तव फार केला आहे. कोण्ही मुखालीफ हरदाज कसील इभराईमखान वगैरे करील तरी त्याचें पारपत्यें बरें होईल. मग ह्मणों लागले कीं राजाजीस लिहिणें कीं कोण्ही बरदाज नाहीं. खातरजमा ठेविजे. मुजफरखान गाडदी यास चौ घटिकांत काढून दिधलें. त्याजपुढें इभराईमखान काय काळ आहे ? ऐशा गोष्टी बहुत मजबूदीनें खुश होऊन सांगितल्या. हयदरजंग राजबंदरीस पावले. हें सर्व वर्तमान बाबासाहेबास इतला देऊन त्याचे आज्ञेप्रमाणें सेवेसी लिहिलें असे. आजी तोफांचे आवाज दहा वीस केले. लोक बोलत होते कीं लेक जालियाचे खुसीचे किंवा मलमुर होय ह्मणून याचा संशय कांहीं नाहीं. परंतु जें आढळलें

तें सेवेसी लिहिलें असे. फतहुदीअल्लीखान निजेले सांगोन पाठविलें कीं पाहाटे बाहेर येणें. त्यास प्रातःकाळीं जाऊन त्याची भेटी घेऊन शाहाजीचे येथील व आणखी वर्तमान शोध करून इतला देतों. हे विज्ञापना. छ १८ दीडप्रहर रात्र.

---

[ १०६ ] ॥ श्रीदत्तात्रय ॥ ५ आक्टोबर १७५७.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसीः—

विनंति आज्ञाधारक अवधूतराव केशव स॥ नमस्कार विज्ञापना त॥ छ १८ मोहरम सोमवार प्रहर रात्र सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. छ १७ तेरखेचें आज्ञापत्र सादर जाहलें तें आज तिसरे प्रहरीं पावलें. त्यांत आज्ञा सादर जाहली कीं बारीक मोठें वर्तमान लिहीत जाणें. आज्ञेप्रमाणें आलाहिदा सेवेसी लिहिलें आहे त्यावरून श्रुत होईल. आणखी शहरचे लोक बारीक मोठें वर्तमान लिहितात त्यास स्वामीचे प्रतापें त्या सर्व गोष्टी मिथ्या असेत. आज रात्रीं आतांच खोजे रहिमतुलाखानांनीं मजला बोलाऊन नेऊन सांगितलें कीं लोक इभराईमखान गाडदी व लक्ष्मण खंडागळे वगैरे लबाडींत फिरतात; परंतु त्यांच्यानें कांहीं कोणाच्यानें होणें नाहीं; आपले घरीं लबाडी बोलतात त्यास मनाई कां करावी ? त्याहींमध्यें या शहरचा अलम येक येक प्रकारचा आहे. आह्मीं जो श्रीमंताचे सेवेंत करारमदार केला आहे त्याप्रमाणें राजे जीवनराव यास ल्याहावें कीं श्रीमंतास विनंतिअर्ज करून सत्वर निर्गमांत आणावा. येणेंप्रमाणें सांगितलें तें सेवेसी विनंतिअर्ज केली. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

[१०७] ॥ श्री ॥ ५ आक्टोबर १७५७.

पे॥ छ १९ मोहरम मंगळवार सा घटका रात्र उर्वरित.

सेवेसी विज्ञापना ऐसीजे. काल छ १८ मोहरमीं दीडप्रहर रात्रीं पत्र बाबासाहेबीं डाकेचे जासुदाबा। पाठविलें त्याजवरोन अवगत जालें असेल. छ १९ मंगळवारीं प्रात:काळीं शोध केला तो लोक आले कीं काल निजामुदौला बहादुर आसफजंग तकियांत गेले होते. यापूर्वीं विठोजी सुंदराहि तकियांतून होऊन आले. मग निजामुदौला गेले. जेव्हां तकियांत गेले तेव्हां शहामहमुदजी मशीदींत निमाज पढावयास गेले होते. निजामुदवला शाहामुसाफ़र याचे दरगांत जाऊन जीयारत केली. मग शाहासाहेब निमाज पढलियावर ऊजरियांत जेथें बसतात तेथें घेऊन गेले. वजीदअलीखानाहि समागमें होते. गोष्टी मातत तों चरपरेपण दिसोन आलें. शेवटीं गोष्टी शाहानवाजखानाची दरमियान आली. त्यास शाहजीहि बोलले कीं तो सैद आहे. आणि दाना व शिंदवी आहे. रहम त्याचे बाकांत जरूर आहे. वाजीदअलीखान नाहीं. लुकमा दिधला कीं जे आपण ह्मणतात तें सत्य आहे. त्यास शाहानवाजखानास पत्रें कांहीं वाजीदअलीखानाची गेलीं आहेत. शाहजीहीं निजामुदवलास पागोटें १ व कमान १ व तरवार येक ईनायत केली. अत्तर वगैरे दिधलें. हें वर्तमान शाहाजीकडील असे. दुसरें, रा॥ लक्ष्मणपंत टकले याची भेट जाली. त्याजकडून कळों आलें कीं शामजीपंत निजामुदौलास रुकसत मागत होते कीं साहेबजादे हुल्या एकबल यांचे भेटीस जाऊं. मग वराडांत जाऊं अगर जे आज्ञा करितील तें करूं. त्याचें उतर शामजीपंतास दिधलें कीं आह्मीच चालणार वराडांत. न॥ जाऊं या. तुह्मांस रुकसत करूं. दोन रोज ठेविलें आहे. शामजीपंत राहत नाहींत. निजामदवल्याचे सैन्यांत डेरा देऊन राहिले आहेत. आपण बाबासाहेबांस पुसोन सैन्यांत त्याचे भेटीस गेलों होतों. भेटी जाली. बहुत स्नेहांत माहाराजाचे दाखवून खुलासा पुसला. त्यास शामजीपंत ह्मणों लागले कीं राजाजीचा आमचा स्नेह पूर्व आहे. आह्मी येथवर उमेद देवितों. चत-

कोर मिळाली तर त्यांत त्याची आर्धी आह्मासीं वाटून खावी; त्यास स्मरण असेल कीं नाहीं. राजकी वर्तमान तों जोंवर निजामदवला शहरीं पावलें नव्हते तोंवर याचे कारभारी आह्मासी साफ गोष्टी सांगत होते कीं नवाब निजामदवलाचा हेत कीं शहरांत गेलियावर श्रीमंताकडील दारमदार जाला तोच सिद्धीतें पावावा व त्याचें यश घ्यावें. येथें आलियावर आह्मासी विचार चोरीत आहेत. खुलासा कळों देत नाहींत. बाह्यात्कारें तों नरमत्व रक्षितात; परंतु अंतर साफ दिसत नाहीं. ह्मणून आह्मीहि आपणास वोढून चढविलें आहेत. फार लागले जात नाहींत. शेवटीं कुंभाराची सून उकरडियावर येईल ऐसें बोलले. दुर्गाचें पुढिले ह्मणों लागले कीं अजून कांहीं सैनिक तेथें पाठवावें ऐसें नाहीं. ऐसें जालें तरी दारमदार कोठें राहिला ? हे करणार नाहींत हें त्याचें जबानीनें वर्तमान. यानंतर काल चार घटिका दिवस राहतां राजश्री वासुदेव दिक्षीत सातारकर माहाराज अर्जूनबहादर जानोजी जसवंत निंबाळकर याचे येथें आले होते. उभतांचा एकांत जाला. त्याजउपरि विठोजी सुंदर व मुरादखान ऐसे गेले होते. कांहीं कागदहि घेऊन गेले होते. एकांतीं याचें व त्याचें बोलणें जालें. ते उठोन गेलियावर शामजीपंत टकले मये लक्ष्मणपंत गेले होते. यास भेटी पानें देऊन रुकसत केलें. हें वर्तमान आजी सेवकास कळलें. सेवक बाबासमागमें रात्रीं याचे येथें गेलों होतों. तेव्हां न कळे. महाराजाचेंहि पत्र त्यास तेच वेळेस आलें तें बाबासाहेबांदेखतां महीपतराऊजीनें वाचून दाखविलें. शामजीपंतानें दरहिकायत हेहि बोलले कीं निजामदवला जातीनसी साफ आहे. परंतु येकदोघेजण बुद्धीचे भ्रवशक आहेत ते उगेच शिगुसे करावयाच्या विचारांत आहेत; परंतु शेवट होणार नाहीं. आह्मी तों उत्तर देऊन चुकलों कीं श्रीमंतास बिघाड करून यश नेणार नाहींत. तुमचे वडिलीं व नासरजंगाहीं इतकें केलें. शेवटीं देऊनच सलुख केला. ऐसें आह्मी बोललों. ऐसे दरहिकायत शामजीपंताहीं मजपाशीं सांगितलें. कळावें. ह्मणोन लिहिलें असे. आजी छ १२ दीड प्रहर दिवस चढलिया बंदगान अली

हिरवे हवदियावर स्वार होऊन दोन अंबारिया जनानियाच्या व येक हत्ती निशाणाचा व स्वार शंभर वगैरे घेऊन निजामदवलाच्या डेरियास गेले. चार घटिका तेथें होते. वाजीदअल्लीखानाच्या भेटीच्या उद्देशें गेलों होतों तों नवाब सलाबतजंग त्याचे धणियाचे येथें गेले. त्याजकरितां भेटीचा योग न पडला. महमदगऊसखान हकिमजीचा आप्त. त्याणें सांगितलें कीं मीं त्याचे कानावर घातलें आहे. त्याचा समय मोठे पाहाटेचा आहे. त्यास पाहाटेच येणें. त्यास प्रातःकाळींच जाऊ. भेटीनंतर सेवेसी लिहितों. सर्व वर्तमान बाबासाहेबास सांगोन सेवेसी लिहितों. याजपैकीं उत्तम जाणावें. तें हकिमजीस इतकी इतला द्यावी. मजला त्यासी गरज नाहीं. महाराजाचा आज्ञांकित आहें. त्यांहीं महाराजादेखतां सांगितलें कीं मजलाहि इतला होय. याजकरितां विज्ञापना केली असे. सारांश स्वामींहीं यश थोर संपादिलें ह्मणून कितेकांस असह्य जालें आहे. परंतु ईश्वरसत्तेनें तेच पराभवातें पावतील. चिंता नाहीं. महाराज स्वामिकार्यावर एकनिष्ठ आहेत. हें नियत पूर्ण यशच आहे. पत्र लिहिलियावर खोजे रहिमतुलाखान बहादूर यांचे येथें गेलों होतों; पुसूं लागले कीं काय वर्तमान. उत्तर दिलें कीं खैरियत आहे. राजाजीची आज्ञा कीं प्रतिदिनीं दर्शन घ्यावें. जो इरश्याप होईल तो अवधूतरावजीस इतला देऊं. राजाजीस ल्याहावें. त्यांहीं उत्तर दिलें कीं राजाजीस लिहिणें कीं कोणे गोष्टीनें वसवसा न कीजे. चर्चा ज्या ऐकत असाल त्याचा इतबार न कीजे. नवाब बसालतजंग डेरियांतून आपले हवेलींत आले आहेत. मागती जातील. फतहुदीअल्लीखानजीची भेटी जाली. त्यांहीं पत्र हकीममहमदअल्लीखानजीस पारसी लिहिलें आहे तें पाठविलें आहे. त्यास पावतें करावें. जबानीं मजला फतहुदीअल्लीखानजी ह्मणों लागले कीं हकिमजीचें येक काम तो जालें. दुसरे परगणियाचे पुसिलें त्यास उत्तर खुलासियाचें खोजे रहिमतुलाखान बहादूर यांहीं दिधलें नाहीं. मागती पुसोन लेहूं ऐसें हकिमजीस सांगावें. जर आज्ञा होईल तर त्याचे कार्याचें पत्र पारसी त्यास वेगळें लिहीत जाऊं. महाराजाचे हस्तें पावतें होईल. याविशीं जैशी आज्ञा. अर्जी भगवंतराव यादव.

---

[ १०८ ] ॥ श्री ॥ ४ आक्टोबर १७५७.

पे॥ छ १९ मोहरम मंगळवार दोन प्रहर दिवस.

सेवेसी महिपतराव लक्ष्मण स॥ नमस्कार विज्ञापना ऐसीजे. येथील वर्तमान त॥ छ १८ मोहरम सोमवार चार घटका रात्र पावेतों प्रताप स्वामीचा यथास्थित जाणोन स्वानंदलेखनास आज्ञा केली पाहिजे. विशेष. दरबारचें वर्तमान आज हैदरयारखान सेरजंग यांस पंचहजारी मनसब व झालरदार पालखी जाली. तसलिमात केली. पालखींत बसोन आपले हवेलींत शहरामध्यें दोन घटका दिवस राहतां आले. दरगाकुलीखान कालपासून आपले हवेलींत आले. आज दरबारास लष्करांत गेले नाहीं. उदईक जाणार आहेत. सैदकबीरखान पातशाही बक्षी यासी झालरदार पालखीची तसलिमात जाली. सरमस्तखानाचे पुत्रास व सुलतानखान जमातदार यास मातमीचें खलअत जालें. खोजे रहमतुलाखान पुसत होते कीं हकीम महमदअल्लीखान व तीर्थरूप राजश्री जीवनराव भेटले. इतकें वर्तमान मात्र कळलें. त्याजवर कांहीं वर्तमान गोष्ट मात जाली हें कांहीं लिहिलें आलें आहे कीं काय ? उत्तर केलें जें वर्तमान आलें तें निवेदन केलें. पुढें येईल तें निवेदन करून. नवाब निजामुदवला तिसरे प्रहरा स्वार होऊन पैठणदरवाजानें शहरांतून नवाब सलाबतजंग याचे मातुश्रीपाशीं गेले होते. तेथून शहामहमुदचे भेटीस गेले. परस्परें भाषण जाहलें. मग आपले डेऱ्यास आले. वाजीदअल्लीखानाचा व विठल सुंदर याचा मनोदय कीं जो करारमदार बोली जाली आहे त्यांत निजामुदौलास मेळवून यश द्यावें. निजामुदौलाचे मनांत तो कांहीं नाहीं. जे बसालतजंगानें केलें तें मान्य आहे. परंतु संगतीचे लोक खेळ करीत आहेत. इब्राईमखान गाडद्यास लाख रुपये दरमहा करून नोकर ठेविलें. त्यास येथें आल्यावर बंधूचे विचारें मनसुभा आहे कीं बारा लाख रुपये नगद कैसे अनकूल पडतील. याजपेक्षां जागीर द्यावी. राहील तरी ठेवावा. नाहीं तरी आज्ञा द्यावी. नांदेड तिही लाखांचे व माहूर तिही लाखांचे एकूण सा लाखांचे द्यावे. ऐशी चर्चा आहे. कबूल न करील तरी रुखसत करावे.

पुढें निजामुदौलास बालाविलें ह्मणोन शिबंदी ठेऊन आलों. त्यास खर्च जाहाला त्यास जागा नाहीं. याजकरितां बालाघाटचे माहाल जागीर करून घ्यावी ऐसा मनोदय आहे. पुढं काय होईल तें पाहावें. नवाब बसालतजंग निजामुदौलास मेजमानी करीत आहेत. हैदरयारखानाचे बागांत तयारी मेजमानीची. रोशनी व दारू वगैरे लवाजमा भक्षायाचा, वस्त्रें, जवाहीर द्यावयासी पंचवीस तीस हजार रुपये तयारीस लागले आहेत. उद्यां अगर परवां बागांत नेतील. आजचे घडीपावतों बंधू बंधू स्नेहेंकरून आहेत. पुढें काय होईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

---

[ १०९ ] ॥ श्री ॥ ६ आक्टोबर १७५७.

पा॥ छ २१ मोहरम गुरुवार सूर्योदय.

राजश्री राजे जीवनरावजी गोसावी यांसीः—

दंडवत विनंति उपरिः—येथील वर्तमान तर छ १८ मोहरमीं राजश्री विठलपंत दिवाण यांणीं येऊन नवाब निजामदौला बहादर याचे मुलाजमतीचा मजकूर दरपेश केला. त्यासी उत्तर केलें कीं बंदगानअलीच्या आज्ञेविरहित हें करणें नाहीं. त्यावरून त्यांणीं गुलाम नक्षबंदखान यांसी सांगोन मुख्यास विनंति करून खानमजकुराचे हातचीं परवानगी आणविली. त्यासी आह्मीं राजश्री विठलराव यांसी पाठवून गुलाम नक्षबंदखान यासी सांगितलें कीं मुख्याचे हातचें पत्र असावें, त्याविरहित आह्मी तिकडे जाणार नाहीं त्यांणीं नवाब बसालतजंगबहादर याचे हातचें आज्ञापत्र हासल करून पाठविलें. त्यावरून छ १९ मिनहूस मंगळवारीं राजश्री विठलपंत दिवाण संध्यासमयीं येऊन मुलाजमतीस घेऊन गेले. मुलाजमत जाली. ज्या ज्या प्रसंगोचित इस्तियाकमुस्ताहा गोष्टी बोलावयाच्या त्या नवाब निजामदौला बहादूर यांणीं बयान केल्या. तदोत्तर खिलवतांत गेले. तेथेंहि शिष्टाचारविस्तार व आपलें वर्तमान

सांगितलें कीं आपण तरतुदीनें येथें आलों. सहा सात हजार फौज व पांच हजार गाडदी नोकर ठेविले यामुळें दाहा पंधरा लाखा रुपयाखालें आलों. उत्तर प्रतिउत्तर प्रियभाषण बोलणियांत आलें कीं आपण तों दाहापंधरा-लाख रुपयाखालें आलों ह्मणतात; परंतु आमचेमतें पन्नास लाख रुपये आपण मेळविले. जे येसमयीं आपलें येणें गोया करामात जाली. ऐसे समयो-पयोगीं बोललों. त्याउपर येक रकम शिरपेंच मुरसा आह्मास देऊन व सहित समागमीं अत्तर व पानदान देऊन रुखसत केलें. हवेलीस आलों. तुह्मास कळावें ह्मणून लिहिलें असे. हे विनंति.

---

[ ११० ] ॥ श्री ॥ ६ आक्टोबर १७५७.

पे॥ छ २१ मोहरम सूर्योदय.

सेवेसी महिपतराव लक्षुमण सा॥ नमस्कार विज्ञापना ऐसीजे:—

येथील वर्तमान ता॥ छ २० मोहरम बुधवार सायंकाळ जाणून स्वानंद-लेखनास आज्ञा केली पाहिजे. विशेष. छ १८ रोजीं निजामुद्दौला शाहमह-मुदचे तकियांत गेले होते. तेथें खलबत केली कीं शहानवाजखानास लिहिणें. आमचे विद्यमानें येऊन मुलाजमत नवाबसाहेबाची करणें. तुमची तकसीर माफ करून जागिरा व मकान राहावयासी देवीत आहोंत. किल्ला सोडून द्यावा. बरोबर वाजदअल्लीखान होते. मुरादखान व विठल सुं र उभयतां राजश्री जानोजी निंबाळकर याजपाशीं याचे मसलतीसाठीं परवां पाठविले होते. खलेल करूं ह्मणत आहेत. परंतु बिसालतजंगाची मिजाज सरकारकामावर कायम आहे. तिळतुल्य अंतर दिसत नाहीं. दरमियानचे लोक निजामदौ-लाची मिजाज बाहरम करून फितवा करावयाचे विचारांत गडबड करीत आहेत. परंतु बिसालतजंगापुढें कारस्तानी चालेल ऐसा अर्थ नाहीं. निजामअल्लीसी बहुत सलुख करून मेळवून घेतलें आहे. हैदरयारखानाचे

बागांत मेजवानीचा सरंजाम होतो. उभयतां वडील बंधूस नेऊन मेजवानी शुक्रवारीं करणार आहेत. तयारीसाठीं काजीजखान कोतवाल चार-पांच दिवस जाले कीं बागांत जाऊन मजलिसीचा सरंजाम आतषबाजी व रोषनी वगैरे तमाम बागाचे आसपास चउत्रे बांधले आहेत. निजामअल्लीहि जवाहिर व कापड भावास द्यावयास खरीद करीत आहेत. तेहि आपले डेऱ्यास नेऊन मेजमानी करण्याचे विचारांत आहेत. इतकियावर काय तजवीज होईल तें न कळे. शहानवाजखानांहीं शहामहमूद यास उत्तर लिहिलें कीं पूर्वीपासून जा-बसाल श्रीमंताशीं आहे. आतां अनेकाकडे लावणें उत्तम नाहीं. जें करणें तें श्रीमंत करतील. मेव्याच्या डाल्या तिघां भावांस पाठविल्या आहेत. अर्जी केली कीं बरावाईट तुमचा आहे. बेहत्तर जाणाल तें करणें. श्रीमंताचे ताकीदपत्र शहानवाजखानास आलें होतें कीं तुमची मर्जी कामाकाजाची व सलुख क-रावयाची अनेकाकडून होत्ये, हा भावार्थ काय आहे तो लिहिणें. उत्तर गेलें कीं जें होणें तें स्वामीचे विचारें होईल. उपडाचे पैगाम येतात; परंतु जें होणें तें साहेबाचे सलानें होईल. इतक्यावर काय होईल तें न कळे. शहरांत बाजारअफवा कीं मोर्चे पाठवूं ह्मणतात. परंतु हे गोष्ट होतां दिसत नाहीं. इतक्यावर भगवत् इच्छा न कळे. सैदलष्करखानाचा भाऊ दिल्लीहून सैद आरफखान आले आहेत. त्यास सैदलष्करखानाचा किताब जाला असे. हैदराबाजेचे कोतवालास खलात जाला. थोरले नवाब ऐशआराम व बागाची सईल करीत आहेत. वरकड कामकाज बसालतजंग करितात. बहुत काय लिहिणें. हें विज्ञापना. राजश्री जानोजी निंबाळकर काल निजामअल्लीस भेटले. कळलें पा॥ हे विज्ञापना.

---

[ १११ ]

॥ श्री ॥ ६ आक्टोबर १७५७.

पे॥ छ २१ मोहरम गुरुवार सूर्योदय.

सेवेसी भगवंतराव यादव सा॥ नमस्कार विज्ञापना ऐसीजे:——

आज छ १९ मोहरमीं संध्याकाळीं पत्र बाबासाहेबाचे पत्रांत मलफुफ

करून पाठविलें तें पाऊन सविस्तर अवगत जालें. अस्सल पत्र रवाना केलियावर फतहुदीअलीखान बहादूर यांचे येथें गेलों होतों. वर्तमान ध्यानास आणिलें तों सर्व कुशल असे. नवाब निजामुद्वलासी व बसालतजंगासी स्नेह फार जाला आहे. हायदऱ्यारखान दिवाण याचे बागांत जियाफत मुकरर जाली आहे. माजजखान कोतवाल दिश्वड त्यांचे बागांत जाऊन चहुतरे वगैरे तयार करितात. आराईश मोठी करणार. आतशबाजीहि तयार करविली आहे. तेथें सोडतील. शहानवाजखानाचे दारमदारांत निजामुद्वला येत आहेत. इभराईमखा गाडदी व खंडागळे हे जाबसाल आणवींत आहेत. त्यांचेहि लेख यांजला येतात. कळावें ह्मणोन लिहिलें असे. बसालतजंग हवेलींत आले होते ते मागती डेरियास गेले. वराडप्रांतीचे बालाघाट व पायाघाटचे माहाल कुल निजामुद्वला दरखास्त करितात. बसालतजंग पाईंघाटचे कांहीं देतात. ऐसी रदबदल आहे. काबिलखानास बाळापूरचे काम देतात. पयसा मागत आहेत. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

---

[ ११२ ] ॥ श्री ॥ ६ आक्टोबर १७५७.

पे॥ छ २१ मोहरम गुरुवार सूर्योदय.

भगवतराव यादव.

फतहुदीखान याचे जबानीं हिंदोस्तानचें वर्तमान ऐकिलें कीं वजीर व श्रीमंत दादासाहेब व आणखी सरदार फौजेचे एकत्र होऊन पठाणास जेर केलें. पठाण दबला. शेवटीं सलूख पठाणानें करून गेला. वजीर व दादासाहेब एकत्र होऊन पुढें लाहोराकडे चाल केली. आतां याजपुढें कोण्हीं धीर धरीत नाहीं. कळावें. हे विज्ञापना.

---

[ ११३ ] ॥ श्री ॥ ६ आक्टोबर १७५७.

पे॥ छ २१ मोहरम गुरुवार सूर्योदय.

सेवेसी भगवंतराव यादव सा॥ नमस्कार विज्ञापना ऐसीजे:- आज छ २० मोहरमीं दरबार जाला. हसनअल्लीखान कोतवाल हयेदराबादेस आला. वस्त्रें त्यास इनायेत जालीं. मुगटराय नामे बकाचाकीचा मुशरीफ होता. त्यास जिजायल आदाजाचे मुशरीफचा शिरपेच जाला. पहिले दरोगा जिजायल आदाजाचा शहानवाजखानाचे येथें होता. त्यास इस्तकमलचें वस्त्र जालें. त्याजउपरांतिक बंदगानअल्ली व नवाब बसालतजंग आंत उठून गेले. मग बसालतजंग स्वार होऊन नवाब निजामुदवलाचे डेरियांत गेले. समागमें गुलाम नक्षबंदखान व आर्जबेगी वगैरे होते. आपणाहि त्याचे सैन्यांत गेलों होतों. दीड प्रहर दिवस जालिया वाजीदअल्लीखान व विठोपंत दिवाण व रहिमतुलाखान, गयासखानाचा पुत्र, ऐसे खिलवतेंत होते. माजनखानें कोतवाल बाहेरले दिवाणखानियांत होते. मग बसालतजंग निजामुदवल्याचे डेरियांत आले. सैन्यांतून फिरतेवेळे। महाराज अर्जुनबहादुर जानोजी जसवंत निंबाळकर याचे हवेलींत गेलों तों रा॥ विठलराव बाहेरून आले. त्याची व खंडेरावजीची भेटी झाली. विठलरावजीस बाबासाहेबाचा नमस्कार सांगून वर्तमान पुसलें. त्यास त्यांहीं सांगितलें कीं परवा विठोजी सुंदर दोनदां आले. आजी साहेबास ह्मणजे महाराजे अर्जूनबहादुर यांस ह्मणों लागले कीं आमचे यजमान निजामुदवला तुमचे हवेलीवरून दोनदां गेले आणि तुह्मी भेटले नाहींत. त्यास साहेबीं ह्मटलें कीं आह्मी ज्याचे तावेदार त्याची मरजि पाहिजे. आणि आह्मास भेटलियावांचून गरज काय ? हें वर्तमान विठोजीपंतीं गुलाम नक्षबंदखानास सांगितलें. त्यांहीं नवाब बसालतजंगास सांगून परवानगीचा रुका आपले मोहरेनसी साहेबाचे नांवें पाठविला. साहेबीं उजूर केला कीं मी जात नाहीं. मागती नवाब बसालत यांणीं आपले हातें रुका लिहिला कीं निजामुदवला आमचे भाऊ आहेत, त्यास आवश्यक भेटावें. आग्रह देखून साहेब काल थोडासा दिवस राहतां भेटीस गेले. निजामुदवलाहि गोष्टींत

गोष्ट काढून बजिकीर केला कीं आह्मांस आगोदर बोलाविलें, मग मवकुफ केलें, मागती बोलाविलें. याजकरितां आपण पंधरा सोळा लाखाचे खिसारतेंत आलों. त्याचें उत्तर साहेबीं दिधलें कीं तुह्मीं पन्नास लाख रुपये मिळविले. नवाब निजामुदवलांहीं पुसिलें कीं कैसें ? यांणीं उत्तर दिधलें कीं या दिवसांत येऊन भावास भेटले, शरीक जालें हे आबरु व नाम जाले, हेच लाखों रुपयांचे जागा आहे. मग साहेबाची तारीफ फार केली कीं तुह्मी आमचे वडिलापासून दवलत पाहात आहां. ऐसी तारीफ करून शिरपेच मुरसा आपलें हातें बांधिला. मग साहेब रुकसत होऊन घरास आले. हें वर्तमान राजाजीस लिहिलें आहे. ऐसें विठलरावजींनें सांगितलें तें सविस्तर बाबासाहेबास निवेदन केलें. त्याजउपर श्रीमंत साहेब जादियाचे पत्र लाला माहाराय वकील यास व हकीम महमदअल्लीखान याचीं पत्रें दोन येकूण पत्रें तीन पावलीं ते पावतांच माहारायास पावती केलीं. त्यांत येक पत्र खोजे रहिमतुलाखान बहादुर व येक फतहुदीअल्लीखान बहादुर यास होतें तें पत्र माहारायानें उभयतांस पावती केलीं व मुसाहेबखानाचें पत्र म्यां जाऊन दिधलें. सालारजंगाचा खलिता श्रीमंत बाबासाहेब आपण जाऊन दिधला. सेरजंगांहीं देतील. आपण संध्याकाळीं खोजे रहिमतुलाखान बहादुर याचे येथें गेलों होतों. तेथें खोजे कमालुद्दअल्लीखान काजी व फतहुदीअल्लीखानजी बसले होते. दोन तीन घटका बसले. मग बाबासाहेबाचे तबियतीचे वर्तमान पुसलें. उत्तर दिलें कीं आतां आराम आहे. परंतु नाकुवत फार आहे. मग ह्मणों लागले कीं आमची दुवा फार फार सांगणें. मग अलीकडे हिकडील पुसिलें कीं कांहीं यार मदाराचा जाबसाल लागला आहे कीं नाहीं ? स्वामीचे पत्रीं लेख नवता आणि बाबासाहेबाचाहि हेत नवता. मग उत्तर दिधलें, जाबसाल दरपेशच आहे, होईल. मग उत्तर दिल्हें कीं राजाजी जैसें लिहितील तैसा इतला आह्मास देत जाणें. अवश्य ह्मणून आलों. त्यास महारायास पत्रें दिधलीं. त्याची तबियत कहली ताप आली हें मी पाहून गेलों होतों. खोजे रहमतुलाखानांहीं माहारायास बोलाऊं पाठविलें होतें.

त्यांणीं सांगोन पाठविलें कीं मजला ताप घाम फार आला आहे. आज्ञा होईल तरी ऐसा येईल. मग ह्मणों लागले कीं सकाळीं येणें. आपण हकिमजीचीं पत्रें आलीं त्यावरून कळलें असेल ऐसें ह्मटलें नाहीं. सबब कीं इशारा नव्हता. आणि परभारें त्याचे वकिलानें दिल्ही ऐसेच कळावें ह्मणोन हे गोष्ट खोजे रहमतुल्लाखानापाशीं ह्मटलें नाहीं. कळावें. उदईक महारायास जाब मागून सेवेसी लिहिलें जाईल. माहाराय ह्मणत होते कीं हकीमजीनें मजला कांहीं लिहिलें नाहीं. संकलित लिहिलें आहे. दुसरें ह्मणत होते कीं मी एकदा वाजीदअल्लीखानास भेटलों. त्यास मजकुर केला. जो सलुक श्रीमंतांहीं केला तो कायम करवालिया उत्तम आहे याची मवाफिकत कामास येईल. त्यासी बिगाडून पुरी पडणार नाहीं. जर अगोदर श्रीमंताकडील दृष्ट स्नेहाची करते तर रघूजी करांडियाचा पडचाकर काशास करिता. आतांहि श्रीमंताचा स्नेह संपादावा. त्याचीं पत्रें भोसलियासहि यावीं ह्मणजे त्याजवर दबाव राहील. घरांत कांहीं मागणें असेल तर भावासी थोडें बहुत मागणें. परंतु श्रीमंतांशीं स्नेह ठेविजे. ऐशा गोष्टी सांगितल्या. त्याणें मागती बोलाविलें. त्याचेजवळ दीड प्रहर रात्र याजकरितां जाणें जालें नाहीं. परंतु एकदो रोजा जाईन. दुसरें, जानोजी जसवंत व विठोजी सुंदर व मुरादखान ऐसें चाहत नाहीं. हें यश अणिकास द्यावे. परंतु यश राजेबहादुर ह्मणजे स्वामीस येईल ऐसे सांग कळावें ह्मणोन लिहिलें असे. सरफराजखान सुभेदार हैदराबादेचा रुखसत जाहला. व जे दिवशीं पालखी झालरदार शौरजंगास आली ते दिवशीं सरमस्तखानाचे पुत्रास मातमचा खिलयत जाहाला. निजामुदौल्याचे सैन्यामध्यें गेलों होतों. तेथें शोध करितां कळलें कीं महमद असलमखासुभेदार बुराणपूर शोरबा चेवीस निजामुदवलास पाठविलें. त्याची रसीद घ्यावयास त्याचा खानसामा आला होता. कळावें. सैदलकरखानाचा भाऊ जरीफखान. त्यास— सैदलष्करखान बहादर यास— किताहाब सैदलष्करखान बहादुर जाहाला. हे विज्ञापना.

———

[ ११४ ]　　　　॥ श्री ॥　　　　७ आक्टोबर १७५७.

पे॥ छ २२ मोहरम शुक्रवार संध्याकाळ.

श्रीमंत सद्गुणमूर्ति राजश्री रावसाहेबाचे सेवेसी:-

आज्ञाधारक कचेश्वर त्रिंबक साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील क्षेम ता॥ छ २२ मोहरम पावेतों साहेबाचे कृपावलोकनेंकरून कुशल असे. विशेष. छ १६ चीं विनंतिपत्रें दोन प्रविष्ट होऊन आज्ञापत्र सादर जालें तें लाखोटा छ मजकुरीं, दुसरें छ १७ चें आज्ञापत्र खुलें राजश्री अवधूतरावजीपाशीं सादर जालें तें छ १९ रोजीं पावलें. मस्तकीं वदून परम सनाथ जालों. आज्ञेप्रमाणें सरकार कामावर गुणाजी ना॥ हरकारे यास ताकीद करून बातमी वगैरे वर्तमान शोध करून विनंतिपत्र पे॥ जाईल. यानंतर छ ११ माहे मजकुरीं मुसाबुसी व हैदरजंग फिरंगी हैदराबादेस दाखल जाले. वर्तमान तांब्रास आलें. छ २० रोजीं निजामअली याचे घरीं जानोजी निंबाळकर दोन घटका रात्रीस आले. सा घटकापर्यंत खलबत केलें. त्या उपरि निंबाळकर रुखसत होऊन गेलियावर लक्ष्मण खंडागळे यास बोलावून चार घटका खलबत केलें. किले आरकामध्यें सरंजाम गोळी वगैरे तयार करीत आहेत. कितेक वतमान तहकीक होऊन कितक जबानी हरकारे बातमी लिहिले जाते. हुजूरचें पत्र खुलें सादर होतें याविशीं हरकारे यास ताकीद जाली प॥ कीं हरयेकापाशीं न दाखवीत. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

---

[ ११५ ]　　　　॥ श्री ॥　　　　८ आक्टोबर १७५७.

पे॥ छ २३ मोहरम मंदवार प्रातःकाळ.

सेवेसी भगवंतराव यादव सा॥ नमस्कार विज्ञापना. ऐसीजे. आज छ २१ मोहरमचें वर्तमान तर आपण प्रातःकाळीं शोधार्थ गेलों होतों. मुरादखानें बाजीदअलीखाजीशीं फार रत्न केला आहे. दोन हजार स्वारांचा

हुकूम ठेवावयाचा यांसी केला. आजी नाजुक जागा ठिकाणींचे ग्रहस्थाचे मुखें ऐकिलें कीं मुरादखानास निजाममुदौलांहीं सेहजारी व साहेबनवबत करावें. हें वर्तमान ऐकिलें. विठोजी सुंदर यास शामजी टकलियांनीं आपले घरीं भोजनास नेलें होतें. तेथून सयदकाबीलखानाचे घरीं जाऊन वाडखोळ खलबत केलें. विठोजीपंताचे घरचीं लोकाची बोली कीं निजामुदौला सलाबतजंगास व बसालतजंगास ह्मणतात कीं आह्मी खिसारतेखालें आलों; तलबाहि लोकांची देणें आहे. पंधरा लक्ष नगद दीजे आणि ब्राह्मणपुरी व अवरंगाबाद, वराड दरोबस्त दीजे. आज बाबासाहेब स्वार होऊन सैन्यांत शेरजंगाचे येथें गेले होते. खोजे रहमतुलाखान डेरियांत नव्हते. शहरांत जुमियाची निमाजमत यास आले होते. बाबासाहेब गांवांत त्याचे घरीं आले. खलिता त्यांस दिधला. आणखी विचाराची गोष्टी पुसिली कीं शेखअलीखान जुनेदी व रहिमतुलाखान यांहीं ,काय पेगाम केला. मुरादखानास निजामुदौलांनीं निगादास्त फर्माविली, जागा जागा विचार होतात, हे काय गोष्ट ? इतला दीजे कीं त्यासारखी पैरवी अमलांत येईल. राजांहीं श्रीमंतास नवाब बसालतजंगाचे कार्यावर तुमचे वास्तियाकरितां मुतवजे केलें आहे. तुह्मी गोष्ट स्पष्ट सांगावी कीं त्याच पलियावर आणिलें जाईल. त्यास याचें उत्तर हेंच दिल्हें कीं पेगाम जो शेखअलिखानाबा॥ व रहिमतुलाखानाबा॥ पाठविला तो जाहीरच असे. सारांश कांहीं मागत आहेत. कांहीं भावास भाऊ देतील. वरकड त्यांहीं काय करणें आहे ? श्रीमंतांशीं कांहीं त्याच्यानें बिघाडवत नाहीं. अगर भावासी बिघाडतील तर हिदायतमुदीखानानें कोणता जय पावला ? आह्मी तो महजूद आहों. याहीवर दरदेगय बात काय आहे न कळे. ऐशा गोष्टी तो मजबुतीच्या बाबासाहेबीं सांगितल्या. परंतु अंतरंगींचा साक्ष ईश्वर असे. वाजीदअलीखान व रहिमतुलाखान एकत्र जाले होते. परंतु काय भाषण जालें हें न कळे. बाह्यात्कारें तो बहुत खुषीनें बाबासाहेबहि बोलले. परंतु अंतरंगींची गोष्ट ईश्वर जाणें. दिसोन येतें कीं निजामुदौला याजपासून कांहीं घेतल्यावां-

चून उगा राहात नाहीं. विठोजीपंत व मुरादखान वाजीदअल्लीखाना बहुत विचार सांगत आहेत. शहरांत तमाम प्रगट जालें कीं मुलुख माग आहेत. कळावें. खोजे रहिमतुलाखानाचे खलितियाचा जाब आलियाव बाबासाहेब रवाना करतील. लाला महारायास तो फार बरें वाटत नाही ताप येतो. निजून राहिले आहेत. दरबारास जात नाहींत. हकिमजीचें पत्र त्यास दिल्हें. त्यांत पत्र खोजे रहिमतुलाखान बहादूर व फतहुदीअल्लीखानाचे होतें तें माहारायांनीं दिल्हें. खोजे रहमतुलाखांनीं जाब लेहून महारायासी पाठविला. त्यास आपण जाब मागावयासी गेलों होतों. उत्तर दिल्हें कीं पाठविलें. तेथें हकीमजीपाशीं शोध घ्यावा. साहेबज्यादे आणि तुशलीमेत्र यांचें पत्र स्वामींहीं मुसस्तायेदखानास पाठविलें तें त्यास दिल्हें. जाब घेऊन पाठविला असे. तो जाब साहेबज्यादे हुलाएकबलयास गुजराणावा. दुसरें पत्र स्वामीस पैठणचे चलहुचे तुमचेसाठीं व सकोपंताचे गुमास्तियाचे बिजहराबमोजीब गौर करणे याविशीं लिहिलें तें सकोपंताचा गुमास्ता सेवेसी प्रविष्ट करील. त्याजप्रमाणें गौर करावा. हे विज्ञापना.

---

[ ११६ ]

॥ श्रीगणराज ॥ ८ आक्टोबर १७५७.

पे॥ छ २३ मोहरम मंदवार प्रात:काळ.

सेवेसी विठल शामराज व गुणाजी नाईक मु॥ शहर नौरंगाबाद जुना बाजार चरणावर मस्तक ठेवून सा॥ नमस्कार अनुक्रमें दंडवत विज्ञापना. येथील वर्तमान ता॥ भाद्रपद वद्य शुक्रवारपर्यंत स्वामीच्या कृपादृष्टीकरून स्वस्त असो. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालों ते आज प्रहरा दिवसा मुकाम मजकुरास दाखल जालों. नाइकाची आमची भेटी जाली. एके जागाव आहों. दों प्रहराउपरांतिक लष्करांत गेलों. थोडे बहुत सैन्य पाहिलें. नाईकांनींहि कितीक जबानी मजकूर सांगितला. आज दिनचर्येचें वर्तमान नवाब

सलाबतजंग हजीमहंमदअल्लीखानाच्या बागांत प्रहरादिवसा उपरांतिक सहल करायास दोन जनाने हत्ती व कांहीं खानग्या घेऊन गेले होते. ते एक घटका रात्रीं डेरेदाखल जाहले. निजामअल्लीखानाचे एथें पिछले प्रहरीं दिवसा इभ्रामखान गाडदी व कविजंग व शेखअल्लीखान जुनेदी याचा जावाई दखनीमिया व मुरादखा हे चौघे व नवाब निजामअल्ली ऐसे पांचजण एक घटका रात्रपर्यंत खलबत झाले. उपरांतिक उठोन आपलाल्या डेऱ्यास गेले. नवाब बसालतजंगाच्या येथंहि पिछले प्रहरीं दरबार जाला होता. मातबरपैकीं हैदरयारखान दिवाण व दरगाकुलीखान व मीरसेदू कोतवाल व कमालदी हुसेनखान व खोजे अबदूलरहमान बक्षी व मीरनजरखा बक्षी व मिस्त्रीखा मनसबदार वगैरे ऐसे मिळोन सा घटकापर्यंत दरबार जाला होता. खलबतचें वर्तमान कांहीं कळण्यांत आलें नाहीं. परंतु बाहेरील वर्तमान जिनसीने तोफखान्याचे बैल तमाम नध्यगांव गणोरीच्या डोंगरांत चराईस लाविले व मुसाबुसी फिरंगीहि हैदराबादेस दाखल जाल्याचें वर्तमान काल येथें आलें. फिरंगीहि लौकरिच मजलदरमजल यास सामील होणार. तो येऊन पोंहचतोंवर सला अथवा लढाई होत नाहीं ऐसा रंग दिसून येतो. कितीक मातबर माणूसच बोलतात जे फिरंगी आल्याशिवाय सला बिघाड होत नाहीं. यांनीं दिरंगाखालें घातलें आहे. सल्याचा रंग दिसत नाहीं. बारीक मोठें वर्तमान सर्व तहकीक जाल्यावर सेवेसी लिहितों. हे विज्ञप्ति.

---

[ ११७ ] ॥ श्री ॥ ८ आक्टोबर १७५७.

छ २३ मोहरम मंदवार प्रातःकाळ.

सेवेसी महिपतराव लक्ष्मण सा॥ नमस्कार विज्ञापना ऐसीजे:— येथील वर्तमान ता॥ छ २२ मोहरम शुक्रवार सायंकाळ जाणून प्रताप स्वामीचा यथास्थित असे. विशेष. दरबारचें वर्तमान निजामुद्दौलांहीं इमामुद्दौलास सांगून पाठविलें

कीं आह्मांस शिबंदीचें देणें आहे. सोळा लक्ष रु॥ द्यावे. उत्तर सांगून पाठविलें कीं तुह्मी वडील आहांत, खजान्याचा झाडा मनास आणोन पैसा खजान्यांत असलिया घेऊन जाणें. पैसा असतां तरी शिपाई लोकांचा दंगा बंदगानअल्लीवर कशास होता ? परस्परें जालें वर्तमान तुह्मीं ऐकिलें असेल. कोणे प्रकारें शिपायांची समजावीस करून थोपाथोप केली आहे. एवंच कांहीं जागिरा बालाघाट परगणें घेतील ऐसें दिसतें. शहानवाजखानाचा मनोदय आहे कीं निजामुद्दौलास आपल्या कामांत आणावें. इब्राईमखान गाडदी याचे मारफातानें पूर्वीं लष्करांतहि जाफराबादचे मुक्कामीं पत्रें गेलीं होतीं. हल्लीं आतां येथें आलियावर नजर पांच मोहरा व मेव्याची डाली आणि अर्जी गाड्याचे मारफातीनें गुजरीन जाबसाल लागला आहे. पुढें काय होईल तें पहावें. वाजदअल्लीखान आज इमामुद्दौलाचे घरास आले होते. खाजे रहमदुल्लाखान निरोप घेऊन बाहेर आले तों वाजदअल्लीखान व ते एक ठायीं बसोन गोष्टी जाल्या. मग वाजदअल्लीखान आंतील डेऱ्यांत बसालतजंगापाशीं गेले होते. मग काय विचार झाला असेल तो मनास आणून उदयिक लेहूं. इमामुद्दौला निजामुद्दौलास ह्मणों लागले कीं एक सरदार रघोजी करंड्या जानोजी भोसल्याचा होता. त्यासी तुमच्यानें बरें ठवलें नाहीं. तो भोसल्या श्रीमंताचा आज्ञाधारक. जें कांहीं त्यास आज्ञा व्हावी त्याप्रमाणें वर्तणूक करावी. ऐसा प्रताप श्रीमंताचा आहे. त्याशीं आपण स्नेह करून असल्या उत्तम आहे. इतक्यावर तुमच्या मनांत येत नसिलें तर तुह्मीं वडील आहांत. आपलें उत्तम जाणाल तें करणें. आह्मी तुमचे हमराहा आहांत. उत्तर कांहीं केलें नाहीं. उगेच राहिले. इमामुद्दौलाच्या केल्यास मोडवतें ऐसा अर्थ दिसत नाहीं. हा कालवर इमामुद्दौलाची मिजाज सरकारकामावर कायम आहे. निजामअल्लीवर शिबंदीचा दंगा अखेरचांद जाल्यावर होणार आहे. विठल सुंदर दोन लाख घेऊन आले ते वाटले. कोणास दोन, कोणास तीन रु॥ देऊन चांदापावेतों समजाविलें आहे. आज निजामअल्लीपाशीं वाजदखान व इब्राईमखान व मुरादखान व विठल सुंदर दो प्रह-

राउपर मसलत करीत असले होते. ते तिसरा प्रहर जाला होता, उठले नाहींत. निजामुद्दौलाचे मानस कांहीं नाहीं. परंतु हे चौघे मिळून खेळ करूं ह्मणतात. परंतु इमामुद्दौलापुढें पेश नेतील ऐसा प्रसंग नाहीं. निजामअल्लीनें पांच हजार स्वार ठेवावयाचा हुकूम वाजदअल्लीखानास केला. पैकीं दोन हजार मुरादखानास सांगितलें कीं तुह्मीं ठेवणें. मागील शिबंदीचें देणें तोच दंगा होणार ! पुढें ठेवून काय देतील तें पहावें ! शामजी टकले तेथील वर्तमान लिहीत असतील. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

---

[ ११८ ]

॥ श्री ॥ ९ आक्टोबर १७५७.

पे॥ छ २४ मोहरम रविवार प्रातःकाळ पाच घटिका दिवस.

श्रीमंत सद्गुणमूर्ति राजश्री रावसाहेबाचे सेवेसीः—

आज्ञाधारक कचेश्वर त्रिंबक साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील क्षेम ता॥ छ २४ मोहरम शनवार कुशल. यानंतर कृपावलोकनेंकरून छ २२ रोजीचें आज्ञापत्र सादर जालें तें छ २४ रोजीं एका प्रहरा पावलें. शिरसा वंद्य करून भूषण जालें. राजश्री विठोपंत आज्ञेप्रमाणें छ २३ रोजीं शहरास पावले. नवाब दरगाहकुलीखान याची भेटी घेतली. छ मजकुरीं गाडदी याच्या लोकांनीं कोण्हास इतला न कळता सातारियास जाऊन पंचवीस मनुष्यं घोडे हरपले हा बहाणा करून धुंद केली. दीक्षित स्वामीचे गुमास्तियास घेऊन लष्करांत रात्रीस आले. निजामअल्लीस तेचसमयीं अर्ज जाला. त्यांनीं इभराईमखान गाडदी यास ताकीद केली तो मुलकीर झाला कीं इतला नाहीं, त्यावरून माणसास ताकीद केली. वराडच्या गृहस्थाचा मनोदय आहे कीं शिबंदीचे ऐवजामध्यें वडील बंधूपासोन तालुका शहराचा घ्यावा. परस्परें जाबसाल खलबत वाजदअल्लीखान व विठोपंत वगैरे बऱ्या बाबत आहेत. निश्चय मुकरर जाला नाहीं. दौलताबादकराचाहि जाबसाल एका दोघा गृहस्थाचे विद्यमानें जाबसाल सुरूं आहे. पक्क जालिया लिहिला जाईल.

खान अलम व आजेचंद रोजे खबरेहून शहरास दाखल जाले. मुलाजमत होणार. सातशें स्वार समागमें आहेत. सुलतानजी व जानोजी वगैरेची मुलाजमत निजामअल्लीची जाली. येक दोन खलबती जाल्या. इभरामखान गाडदी व खंडागळे यांची मुलाजमत निजामअल्लीचे मारफातीनें जाली. हें वर्तमान पूर्वी र॥ कृष्णाजीपंताचे पत्रीं लिहिलें होतें. विनंति करून श्रुत जालें असेल. श्रीमंतजीच्या थैल्या बसालतजंग व खोजे न्यामतुलाचे नांवें आल्या. त्या राजश्री विठलपंताच्या हस्तें गुजरल्या. उत्तर दिधलें कीं जाब उदयिक देऊं. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

---

[ ११९ ] ॥ श्री ॥ ९ आक्टोबर १७५७.

पे॥ छ २४ मोहरम भानुवासर, प्रातःकाळ पांच घटिका दिवस.

सेवेसी विनंति सेवक शामजी गोविंद साष्टांग नमस्कार विनंति येथील वर्तमान त॥ छ २३ मोहरम शनवार सायंकाळपर्यंत स्वामीचे कृपादृष्टीकरून शहरीं असो. यानंतर काल छ २२ रोजीं शुक्रवार जुमा होता. सर्व कारभारी आपले आपल्या घरीं होते. वाजदअल्लीखान व मुरादखान व विठोजी सुंदर व निजामुद्दोला ऐसे सायंकाळीं एकांतांत होते. विशेष नव्हतें ह्मणून विनंतिपत्र न पाठविलें. आज छ मजकुरीं प्रातःकाळीं वाजदअल्लीखान व विठोजी सुंदर दिवाण बसालतजंग याचे डेरियास गेले. चार घटका त्रिवर्ग एकांतीं होते. मतलब मनास आणितां निजामुद्दौला यांनीं आपले जाबसालांत शेखअल्लीखान व रहिमदुल्लाखान गयासखानाचे पुत्र यांस बसालतजंगाकडे घातले आहेत. त्यांनीं नवाब निजामुदौला यांची बरखास्त सात आठ लाख रु॥ आह्मास द्यावे, वराड प्रांत दरोबस्त पायाघाट बालाघाट निखालस जागिरींत घ्यावे, तिसरें वाजदअल्लीखानास चार हजारी बलाये जागीर व झालरदार पालखी द्यावी, याच जाबसालाबद्दल जाऊन फिरून निजामु-

दौला याकडे आले. त्रिवर्ग खिलयतींत होते.' इतक्यांत कविजंग व मुरादखान आले. त्यास खिलवतेंत बोलावून दोन प्रहर पावेतों एकांत जाला. सबब मनास आणितां शहानवाजखान याचा जाबसाल मुरादखान याचे मारफातकी होणार ते तो जाले. श्रीमंताची दोहींकडून बनली. तुह्मापासून जागीर घेतली; आपणापासोन द्रव्य घेणार. एकूण दोहींकडून नवाबाचें नुकसान. यास्तव निजामुदौला यांनीं आपणास पदरीं घ्यावें. थोडी बहुत सेवा करून दाखवीन. त्यास या जाबसालांत रा॥ जानबा निंबाळकर व कविजंग यांस घेऊन निजामुदौलाशीं बोलत असतात. नवाब बुभुक्षित बनले तरी करावयासी चुकत नाहीं ह्मणून एके द्वारें शोध लागला. त्यास आढळलें वर्तमान विनंति केली आहे. सरकारचे पत्राचे जाब सेवकाचें नावें येतात. त्यास लाखोटा उकलला जातो. विदित होय. राजश्री रामचंद्र जाधवराव शहागडास आलियाचें वर्तमान आहे. आगाजीसरगर व खाजे अलम याचे पुत्र व खंदारवाला राजा ऐसे त्रिवर्ग सात आठशें स्वारांनिशीं अष्टीस बाहेर बुणगे ठेवून सडे आले. सलाबतजंग याची मुलाजमत जाली. तिसरे प्रहरीं सलाबतजंग यांणीं दरबार करून निजामुदौला यास दरबारास बोलाविलें. त्याप्रमाणें नवाब व मीरमुसाखान, वाजदअल्लीखान जरोरच गेले. चार सा घटका दरबारांत होते. मुसाबुसी व जाफरअल्लीखान खुदावंदखानाचे पुत्र याकडे सलाबतजंग, बसालतजंग यांणीं सांडणीस्वार रवाना केला कीं जलद येऊन पाहोचणें. सेवेसी विदित होय. हे विनंति.

---

[ १२० ] ७ नोव्हेंबर १७५६.

॥ श्री ॥

राजश्री रामाजी महादेव यांसि:—

छ अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य स्ने॥ दमाजी गायकवाड समशेर बहादूर दंडवत सु॥ सबा खमसेन म॰ा अलफ. प्रांतांत बखेडा मोगलाचा.

विशेषात्कारें धवळके, नडियाद घेऊन ठाणीं बसाविलीं. हजूर फौजेचें जाणें जलद त्या प्रांतीं होत आहे. तर राजश्री धोंडो मल्हार यांस घेऊन तुह्मीं त्वरेनें येणें. छ १३ सफर.

श्री मार्तंडचरणीं तत्पर पिलाजीसुत दमाजी गायकवाड निरंतर.

---

[ १२१ ] ॥ श्री ॥ ६ डिसेंबर १७५७.

राजश्रियाविराजितराजमान्यराजेश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यासीः—पोष्य बाळाजी बाजीराऊ प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्माकडेस बुंदेलखंड वगैरे मामलत आहे. त्यास सरकार जमाबंदी देखील मोकासे व इनामदार व जकाती कुळ आकार होईल त्याजवर श्रीवैजयोगिर्गीचे देवालयाचे बगमीस धर्मादाय पट्टी रयेत निसबत एक साला दर सद्द रु. ॥॰ नीम- प्रमाणें द्यावयाचा करार करून हें पत्र तुह्मांस सादर केलें आहे. तर कुल आकार होईल त्याजवर सदरहूप्रमाणें धर्मादायपट्टीचा ऐवज जमा करून राजेश्री शंकराजी केशव यांजकडे पावता करून पावलियाचा जाब घेणें. जाणिजे. छ २३ रा॥वल सु॥ समान खमसेन मया व अलफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति. बार.

---

[ १२२ ] ॥ श्री ॥ २२ फेब्रुवारी १७५८.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्रि बाळाजी गोविंद स्वामी यासीः— पे॥ बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून

---

१७४ कोळवणांत.

१७५ वसईचा सुभा.

स्वकीय लिहिणें. विशेष. राजश्री माधवराव नारायण व चिंतामणराव नारायण पाटणकर यांस चिरंजीव राजश्री दादासाहेबाकडे रवाना केले आहेत. त्यास चिरंजीवाची स्वारी लांब गेली; आणि वाट[176] न चाले; निभाव न होय तरी तुह्माजवळ रहातील. यास रोजमुरा.

| दीडमाही रुपये | | आठवडा रुपये | | |
|---|---|---|---|---|
| ५० | माधवराव नारायण | २ | माधवराव नारायण | १ |
| ६० | चिंतामणराव नारायण | ४॥ | चिंतामणराव नारायण | २ |
| ११० | | ६॥ | | ३ |

एकूण एकशें दहा रुपये दीडमाही व साडेसहा रुपये तीन राऊतास आठवडा पावत आहे. याप्रमाणें रोजमुरा सदर्हू प्रे॥ देत जाणें. जाणीजे. छ १३ जमादिलाखर, सु॥ समान खमसैन मय्या व अल्लफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ १२३ ]     ॥ श्री ॥     २२ एप्रिल १७५८.

तालीक

राजश्री कमाविसदार वर्तमान व भावी प॥ इटावे प्रांत अंतरवेद गोसावी यांसि:—

स्नेहांकित रघुनाथ बाजीराऊ नमस्कार व आशीर्वाद. सु॥समान खमसैन मय्याअल्लफ. वे॥ हर गोविंद विश्वनाथ बिन पेमनाथ ब्राह्मण कानकुडष यांणीं हुजूर कसबें लाहोरचे मुक्कामीं येऊन विदित केलें कीं “पातशाही बेगम यांणीं मौजे कनकपूर प॥ मजकूर येथील सायरपैकीं रोज चार आणे करून दिल्हे होते. याप्रमाणें चालिलें. सरकारचा अंमल जाहालियापासून

---

१७६ नवीन जिंकलेला देश असल्यामुळें वाटेंत दगा होण्याची भीति होती.

१७७ लेखांक ५१ टीप पहा.

रोज चालत नाहीं. तरी सुदामंतप्रमाणें करार करून घ्यावा ह्मणोन ". त्याजवरून हे सनद सादर केली असे. तरी मौजे मजकूरचे सायरपैकीं पातशाही बेगम यांणीं दिल्याप्रमाणें च्यार आणे दररोज करार केले असेत. तरी मोगलाई अमलांत रोज चालत आलियाचा भोगवटा मनास आणून त्याप्रमाणें चालवणें. मोगलाई अमलांत चालत आलें असेल तें बंद न करणें. चालत नसेल तें न चालवणें. प्रतिवर्षी नवीन आक्षेप न करणें. या सनदेची नक्कल घेऊन अस्सल पत्र भोगवटियास परतोन देणें. जाणिजे. छ १३ साबान. आज्ञा प्रमाण. मोर्तब सुधा शिक्का आहे. बार ही आहे.

---

१ मे १७५८.

[ १२४ ] ॥ श्री ॥

राजश्री कमावीसदार, वर्तमान व भावी, परगणे फफुंद, प्रांत अंतरवेद, गोसावी यांसः—

स्नेहांकित रघुनाथ बाजीराव नमस्कार व आशीर्वाद. सु॥ समान खमसेन मय्या व अल्लफ. बिबी रहिमां वगैरे यांणीं हुजूर कसबे लाहोरचे मुकामीं येऊन अर्ज केला कीं नवाब मनसूरअली व वजीर यांणीं परगणें मजकूरचे सायरपैकीं रोज सहा आणे करून दिल्हे होते त्याप्रमाणें चालिले. सरकारचा अंमल जाहालियापासून चालत नाहीं. तरी सुदामंतप्रमाणें करार करून द्यावें ह्मणोन. त्याजवरून हे सनद सादर केली असे. तरी मनसूरअलीखान वजीर यांणीं दिल्हाप्रमाणें परगणें मजकूरचे सायरपैकीं दररोज रुपये ।= सहा आणे करार असेत; तरी सुदामंत चालत आल्याचा भोगवटा मनास आणून मोगलाई अमलांत चालत आलें असेल त्याप्रमाणें चालवणें. चालत असेल तें बंद न करणें. चालत नसेल तें न चालवणें.

---

१७८ लेखांक ५१ टीप पहा. हिंदुमुसलमान हा भेद धर्मांत किंवा इनामांत पेशवे ठेवीत नसत.

दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें. या पत्राची नकल घेऊन हें सनद भोगवटियास परतोन देणें. जाणिजे. छ २२ साबान. आज्ञा प्रमाण.

---

[ १२५ ] ॥ श्रीराम ॥ ४ मे १७५८.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गोविंद बल्लाळ स्वामीचे सेवेसीः

सेवक गोविंद भिकाजी कृतानेकशिरसाष्टांगनमस्कार. विनंति. उपरि येथील वर्तमान चैत्र वद्य १२ जाणून स्वामींनीं आपलें निजानंदवैभव दरघडी लिहीत जाणें. तेणेंकरून सेवकास आनंद होय. विशेष. येथील वर्तमान तर, नवाब जाफरआलीखान[१७९] पटण्ये प्रांतीचा बंदोबस्त करायानिमित्य आले आहेत. आह्मीहि समागमें आहों. पटण्येचा बंदोबस्त तर राजा रामनारायण मात्र येऊन भेटला. आगखी जमीदार कोणी भेटले नाहींत. गयेचा सुंदरशा राजे येऊन भेटला. उभयताची मामलत, पटणची सुभेदारी, नवाब जाफरअलीखानानें आपले लेकाचे नांवें केली. त्याची नायब राज-सुभेदारीचीं वस्त्रें राजे रामनारायणास दिलीं. इकडील बंदोबस्त करून नवाब जाफरअलीखान ता॥ छ १६ साबान कुच करून बंगाल्यास मजल दरमजल जात आहेत. पुढें जें कांहीं वर्तमान होईल तें सदैव लिहिलें जाईल. विशेष. सेवकानें श्रीमंत राजेश्री दादासाहेबास विनंतिपत्र पाठविलें, कांहीं खर्चीविसी. त्यास, सेवकावर कृपावंत होऊन रुपये ५०० पांचशेंची वरात स्वामीचे नांवाची पाठविली आहे. आणि सेवकाचे पत्रांत लिहिलें आहे कीं तुह्मीं वरात रुपये ५०० पांचशांची आपले मनुष्यासमागमें पाठवून देणें. ते तुह्मास पांचशे रुपयांची हुंडी करून ऐवज पावता करतील. त्यास, स्वामीजवळ रेसान कासीद समागमें वरात पाठविले आहे.

---

[१७९] मिरजाफर जून १७५७ पासून सप्टेंबर १७६० पर्यंत बंगाल, बहार व ओरिसा या प्रांतांचा इंग्रजांच्या मदतीनें, नवाब झाला होता.

नीस, स्वामींनीं कृपा करून पांचशें रुपयांची हुंडी करून मकसुदाबादेस ऐवज पावता होय तें करणें. हुंडी मकसुदाबादेच्या कासीदासमागमें पाठवून देणें. परंतु कासीदास लवकर विदा करणें. जरूर. बहुत दिवस न ठेवणें, आह्मांवर खर्चाची बहुत तंगचाई आहे, तें पत्रीं लिहितां पुरवत नाहीं. याजकरितां सेवेसी विनतिपत्र पाठविलें आहे. स्वामींनीं सेवकावर कृपा करून लवकर कासिदासमागमें हुंडी करून रेसन कासीदास लवकर रवाना करून देणें. त्यापैकीं रुपये ५ पांच रेसन कासीद यांस खर्चास देणें. बाकीची हुंडी करून पाठवणें. त्या प्रांतीचें वर्तमान नवल विशेष कांहीं आलें असेल तर लेहून पाठवून देणें. बहुत काय लिहिणें. कृपालोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ १२६ ] ॥ श्री ॥ १४ फेब्रुवारी १७५१.

पा। छ १५ जा॥खर, तिसा, माघ वद्य द्वितीया.

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान त॥ छ १३ माहे जमादिलाखर पर्यंत यथास्थित असे. विशेष. सरकारचे खिजमतगार राजश्री स्वामीकडे चौकीस आहेत. त्यांस सरकारांतून सालमजकूरचे दसरियाचें कापड देविलें आहे. त्याची चिट्ठी फडणिसाकडील जाहाली. खिजमतगारांनीं चिट्ठीप्रें॥ कापड घ्यावें तें न घेतां श्रीमंत महाराज मातोश्री *आईसाहेब यांजबरोबर तातडीनें निघोन आले. कापड घेतलें नाहीं. त्यास, हालीं सदर्हू खिजमतगारांपैकीं मनाजी जाधव व कुसाजी ढमढेरा दोन असामी कापडाची चिट्ठी घेऊन स्वामीकडे आले आहेत. तरी जामदारखान्यांत सदर्हू चिट्ठीप्रें॥ कापड द्यावयाची परवानगी देऊन यांची सत्वर रवानगी करावी. येथें चौकी नाजूक आहे. यास्तव खिजमतगार सत्वर माघारे पाठवावे. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

* ताराबाई ह्यावेळीं सुमारें ऐंशी वर्षांची असावी; तरी देखील तिचा मानीपणा व हट्टीपणा तिळमरहि कमी झालेला दिसत नाहीं.

[ १२७ ] ॥ श्री ॥ ४ मार्च १७५९.

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ता॥ छ ४ रजबपर्यंत यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं भवानी आवरी व गुणाजी भोता खिजमतगार याजबरोबर शिक्ककटार राजश्री नाना पुरंधरे याचे घरीं सासवडीं होतीं ती देऊन पाठविली ते पावली. आज्ञा कीं तुह्मी तेथें राहाल तोंपर्यंत तुह्माजवळ शिक्केकटार ठेवणें. तुह्मी येऊं लागाल तेव्हां †शिक्ककटार सासवडास नाना पुरंधरे याजकडे पावती करणें. ह्मणून आज्ञा. त्याप्रं॥च होईल. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[ १२८ ] ॥ श्री ॥ २ एप्रिल १७५९.

तीर्थरूप राजश्री गोविंदपंत दादा वडिलाचे सेवेसी:—

अपत्यें बाबूरावें दोनी कर जोडून शिर साष्टांग नमस्कार विनंति ता॥ चैत्र शुद्ध ५ पंचमी प॥ सुखें असो. विशेष. वडिलीं गंगाजळाच्या कावडी सुमार २० वीस पाठविल्या त्या प्र॥ येथें पावल्या. आज्ञेप्रमाणें जेथें द्यावयाची त्याप्रमाणें दिलीः—

| | |
|---|---|
| ७ श्रीमंत नाना स्वामीकडे | १ बावधनीं तीर्थरूप मातुश्रीस प॥ |
| २ श्रीमंत भाऊ स्वामीकडे | ५ रा. महादोबाबा |
| २ श्रीमंत दादा स्वामीकडे | १ बाबूराव फडणीस |
| १ श्रीमंत सौ॥ पार्वतीबाईकडे | १ सखारामपंत बापू |
| १२ | ८ |

† पुरंधरे पेशव्यांचे मुतालीक. तेव्हां पेशव्यांची शिक्केकटार पुरंधऱ्यांजवळ असे हें रास्तच आहे. हें पत्र साताऱ्याहून लिहिलेलें आहे.

१८० गोविंदपंत बुंदेल्याचे कनिष्ठ बंधू; गोविंदपंतांचे पुणें येथें पेशव्याचे दरबारीं वकील.


येणेंप्रमाणें वीस कावडी दिली. वडिलांस कळावें. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विज्ञापना.

---

१८१ येणेंप्रमाणें नानासाहेबांच्या दरबारीं त्यावेळीं कर्ते मुत्सद्दी कोण होते हें ह्या यादीवरून कळण्यासारखें आहे. स्वतः नाना, गोपिकाबाई, भाऊ, दादा, महादोबा पुरंधरे, बाबूराव फडणीस, सखारामबापू. हे त्यावेळचे कर्ते मुत्सद्दी होत. पार्वतीबाई कोल्हटकरांची मुलगी व पांडववाड्याच्या कोल्हटकरांचा व वावधनच्या खेरांचा विशेष घरोबा म्हणून पार्वतीबाईचें नांव ह्या यादींत आहे. गोविंदपंतांची आई वावधनीं रहात असे हें ह्या यादीवरून निष्पन्न होतें. नाना पुरंधरे वगैरे दुय्यम प्रतीचे मुत्सद्दी आणीक होतेच. परंतु वर निर्दिष्ट केलेल्या सात मंडळांच्या हातीं राज्याचीं सर्व सूत्रें होतीं. सखारामबापूचें वजन पुढें तर फारच झालें; परंतु त्याहिवेळीं बरेंच होतें. विश्वासराव नुकते कामकाजांत पडूं लागले होते. माधवरावांचें वय ह्या वेळीं अवघें तेरा वर्षांचें होतें; तरी ते १७५६ तील सावनूरच्या स्वारींत हजर होते. नानाफडणीस व मोरोबादादा दरबारांतील कानूकायद्यांचा नुकता कोठें अभ्यास करूं लागले होते. नानाफडणीस शके १६६३ च्या ज्येष्ठांत व मोरोबा १६६४ च्या अश्विनांत जन्मला. नानाफडणिसाचा बाप जनार्दनपंत इ. सन १७५६ च्या शेवटीं वारला. नानाफडणिसाची जन्मकुंडली प्रसिद्धच आहे. मोरोबादादाची तितकी नाहीं म्हणून येथें देतों. ही कुंडली मोरोबादादाच्या पुण्यांतील वाड्यांतील एका लहानशा रुमालांतील आहे.

स्वस्तिश्री शके १६६४ दुंदुभिसंवत्सरे अश्विने मासि शुक्लपक्षे षष्ठीसहसप्तम्यां तिथौ भृगुवासरे मूलनक्षत्रे ।

**अथ जन्मलग्नं सखेटं.**




ह्यावरून मोरोबादादाहून नाना वडील होते हें उघड आहे. ह्यास आणीक पुरावा पाहिजे असल्यास खालील पत्र वाचावें.

॥ श्री ॥

चिरंजीव राजश्री मोरोबादादा यासी बाळाजी जनार्दन आशीर्वाद. उपरि येथील कुशल

[१२१]

॥ श्री ॥ २२ एप्रिल १७५९.

( नकल ).

कोलनामा लिख दयौ श्रीमहाराजाधिराजश्रीमहाराजश्रीराजाहिंदुपतिजु देवकौ एते श्रीमुख्यप्रधान श्रीबालाजी बाजीराव जीनै. आपर. श्रीराजा अमानसिंघजुसौ अरु तुमसौ आपुसमे कजिया भयौ. अमानसिंघजुसे सु इहि बातकौ हम छान तपाउस करौ. सु तुमारी तरफकी चुक कछु नाहीं है की ए बातकौ खुनखुतरा तुमसौ कोऊ कबहुनकरे. श्रीराजासभासिंघजुकौ दरोबस्त राज्य तुह्मारो है. तिलक राज्यकौ हम तुमकौ करौ. अरु श्रीराजा सभासिंघजु श्रीदिवान खेतसिंघजुकौ जागा दई हती. सो तुम श्री पंडित गोविंदराईके आगे होई जागा दई. सो अपनी पाई तुह्मारी सेवा करै. हुकुममै रहै. तुमते बाहिरै न परै. अरु तुह्मारे राज्यपर हमारे पैसा लगे है, सु अपनी जागीरके बरहुकुम तुमकौ पैसनकौ जुवाव करै. अरु राज्यपर देसविदेसकौ खर्चु आनि लगे सु अपनी जागाके बरहुकुम हमेस सामिल रहै. जो इन बातनमै तफावत करै तौ इनके लानै हम तुमसौ कछु रदबदल न करै; अरु न ए हमलगा आवै; न हमारी तरफके काहु सिर-

---

त॥ छ २३ ज॥वल मु॥ कोरेगांव यथास्थित असे. विशेष. वाकीजावता फारकरून तयार झाला आहे. कांहीं होणें आहे तो महिनापंधरा दिवशीं होईल. त्यास तो पाहून ठीक करावा लागतो. त्यास माहितगारीनें राजश्री महादाजीपंत गुरूजी व नारोपंत पाळदे यांणीं दिवसामध्यें प्रहरभर अवकाश करून पाहावा ह्मणोन सांगितलें होतें. त्यावरून त्यांणीं पहावयास प्रारंभ केला असेल. त्यास आपणहि त्यांस वरचेवर सांगोन बाकीजाविता ठीक करवावा. उभयतांस शैल्यांचा प्रकार फार आहे. याकरितां आपण त्यांस ताकीद करून ठीक करवावा. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे. हे आशीर्वाद. राजश्री नाना पुरंधरे यांजकडे कारकून फार जलद गेला पाहिजे. नाहीं तर तेथील गळाठा फार आहे. याजकरितां मर्जीस आलें तर लक्षुमणपंत देशमूख चांगले चौकस शहाणे माणूस आहेत यांस पाठवावे. नाहीं तर जो आपल्या मर्जीस येईल तो रवाना करावा. परंतु सत्वर रवानगी होय तो अर्थ केला पाहिजे. फौजहि फार जमा झाली आहे. यास्तव सूचनार्थ लिहिलें असे. हे आशीर्वाद.

हें पत्र मोरोबादादांच्या दफ्तरांतील आहे.

दार लगा जाई; तौ इनकी बात कछु ना सुनै. अरु तुह्मारे भैयाभतीजे चाकर भले मानस तुमतै वाहिरे परिकै हम लगा आवै तिनकी बात कवहू न सुनै. ताके वीच ताके हजूर श्रीसमसेरबहादुरजु, श्रीगोविंदराई. कोलनामा. सही मिति जेष्ट वदि १० सं. १८१५ मुः दुलारा.

---

[ १३० ] ॥ १ ॥ १७ जून १७५९.

टीप लिखि दइ. श्रीमुख्यप्रधान श्रीबालाजीबाजीरावजूकौ एते श्रीमहाराजाधिराजश्रीमहाराजाश्रीराजा हिंदुपतिजू देवनै. अपर. श्रीराजा अमानसिंघजुसौ व हमसौ आपुसमे कजिया भयौ. अरु श्रीदिवानखेतसिंघजू हमतै बाहिरे परे हते. तिहि पाइ श्रीसमशेरबहादूरजु आये. हमसो रदबदल करीताकौ आपुसके कजिया भये केवा श्रीदिवानखेतसिंघजुसौ हमसौ सलूक कराइ दयौ. ताके वा राज्यके तिलकके नजरानेके दैनै मानै रुपैया लाख ५००००१ ) अंकेय लाख पाच येक उपरकी किस्तै करि दइ.

संवत् १८१६ की सालंम संवत् १८१७ की सालमे दैइ

१६७००० १६७०००

संवत् १८१८ की सालमे दइ

१६६००१

सुये रुपैया तीन वरसकै किस्तनवरहुकम आलमगिरी भरि दैइ. असाढवदि ५ सौमे संवत् १८१५. मुः जैतपूर.

---

[ १३१ ] ॥ श्री ॥ १५ जुलै १७५९.

राजश्री गोविंदपंत गोसावी यांसः—

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्य स्ने॥ समशेरबहादर

सलाम. विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावोन वर्तमान सविस्तर कळलें. रा। नारो रघुनाथ याजन्॥ हुंड्या पा॥. रुपये १५६००० येकलक्षछपन्नहजाराच्या पावल्या व राजे हिंदुपत यांजकडून टिक्याच्या करारांची याद पाठविली ती पावली. कळलें पाहिजे. रा। छ १९ माहे जिल्काद. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे हे विनंति.

पे॥ भा॥ वद्य ७ संवत् १८१५.

---

[ १३२ ] ॥ श्री ॥ २ जुलै १७५८.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री बाळाजी गोविंद स्वामी गोसावी यांसी:—

पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार. विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें.

विशेष—तुह्मांकडे सालमजकूरचे रसदेचा[२] ऐवज येणें रुपये.

५५०००० प्रांत बुंदेलखंड.

४५०००० प्रांत इटावे, फफुंद, सकुराबाद.

१००००० प्रांत डेरापूर, मंगळपूर.

३००००० सरकार कडाकुरा.

---

१४०००००

---

१८२ गोविंदपंताला पुण्यास भराव्या लागणाऱ्या रसदेचा ऐवज सालदरसाल वदलत असे. १४ जून १७५६ त सबा खमसैनच्या सालाकरितां गोविंदपंतापाशीं पेशव्यांनीं १३ लक्ष सातहजारांचा करार केला होता हें पुढील पत्रावरून कळेल.

॥ श्री ॥

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ

स्वामीगोसावी यांसी:

पोष्य बाळाजीबाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्व

एकूण चवदा लक्ष रुपये येणें. त्यास प्रस्तुत फौजेचे खर्चास व श्रावणमासचे दक्षणेस ऐवज पाहिजे. याजकरितां हें पत्र तुह्मांस लिहिलें असे. तरी सदरहू ऐवजाचा भरणा सरकारांत करावयाविशीं राजश्री बाबूराव नरसी यास लिहून पाठवणें. त्याप्रमाणें ते भरणा करितील. सालमजकुरीं चिरंजीव राजश्री दादाकडे ऐवज द्यावयाचें प्रयोजन लागणार

---

कीय कुशल लिहिणें. विशेष. तुह्मांकडे प्रांत हिंदुस्थानचे महालाची रसदेचा करार वितपशील. रुपये.

| | |
|---|---|
| ५५७००० | प्रांत बुंदेलखंड. |
| ७५०००० | प्रांत अंतर्वेद. |
| १३०७००० | |

( खालीं भरणा कसा झाला याचा तपशील दिला आहे. )

१५ रमजान. सु॥ सबाखमसैन मय्या व अल्लफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

संवत् १८०६, सु॥ खमसैन मय्या व अल्लफ, १६४९ । ५० ह्या सालाकरितां गोविंदपंताकडे ३९१६०६ ची नेमणूक पुण्याहून झाली. ही नेमणूक प्रांतांतील मुख्य तालुक्यांचीं ठिकाणें, किल्ले, गढ्या व हिऱ्याच्या खाणी ह्यांचा बंदोबस्त राखण्याकरितां लागणाऱ्या स्वार, प्यादे, कारकून व खासा ह्यांच्या पगाराबद्दल दिलेली होती. ह्यांत खासा गोविंदपंत ह्याजबद्दल खालील तपशील आहे.

| | |
|---|---|
| २२९० | गोविंदबल्लाळ. |
| १२०० | खासा. |
| १००० | पालखी. |
| ५० | आफ्तागिरी. |
| ४० | दिवट्या. |
| २२९० | |

ह्यावरून गोविंदपंताला पालखी शके १६७२ तच मिळाली होती असें दिसतें. शके १६८१ सालीं आपल्याला पालखी मिळावी ह्मणून गोविंदपंतांनीं खटपट केली ह्मणून 'बुंदेलखंड प्रकरणांत' रा. पारसनीस लिहितात तें ज्यास्त खुलासा झाल्याशिवाय ग्राह्य दिसत नाहीं. मध्यें गोविंदपंताची पालखी काढून घेतली होती कीं काय ? किंवा वंशपरंपरा अगर तहाहयात पालखीचा मान त्यांना हवा होता कीं काय ? व तो त्यांना अगोदर मिळाला नव्हता कीं काय ?

नाहींसें दिसतें. तथापि रसदेपैकीं कांहीं ऐवज त्यांणीं मागितला तर त्याप्रमाणें त्याजकडे देणें. बाकी ऐवज हुजूर पाठवणें. जाणिजे. छ २५ सवाल.

सदर्हु रसदेचे ऐवजीं तूर्त येथें सातलक्ष रुपयांचा भरणा करवणें. बाकी सात लक्ष रुपये राहिले, ते दसरापर्यंत चिरंजीवाकडे लागले तरी त्याजकडे देणें; नाहीं तरी, हुजूर पाठवून देणें. कांहीं बाबूरायापासून घेऊं. परंतु तुह्मीं भरणा लिहिलेप्रमाणें लेहून करवणें. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ १३३ ]

॥ श्री ॥ २५ जुलै १७५९.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री जनार्दनपंत स्वामीचे सेवेसीः

पोष्य गोविंद बल्लाळ सा॥ नमस्कार. विनंति उपरि येथील कुशल ता॥ श्रावण शुद्ध १ मुक्काम सेगरनदी जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. त्यास, येथील वर्तमान तर लोकांनीं हद्द केली आहे. आपले महमदखान पांच हजार अर्जबाब मागतात, तेव्हां पार उतरून येणार. त्याचप्रमाणें रा॥ पाराजीपंतहि अडोन बसले. लोकांनीं गवगवा केला आहे. एकंदर ते उतरून येत नाहीं. लाख रुपये आज येथें द्या तेव्हां पुढें पाय घालून. असे नानाप्रकारें पंच देऊन घेऊन त्यास आह्मी दिक्क[१८३] जालों. आज बलबेर येथें पावलों असतों. एकंदर सिलेदार कोणी पाय घेत नाहीं. आह्मीं पुढें जावें तेव्हां मागून यावें. सेगरनदी पार आह्मी जालों तेव्हां मागून आले. असो. आज तीन रोज जाले. पाराजीपंत यांणीं मोठा आडथळा केला. त्यास, बरें, खावंदाचें काम, यासमयीं त्यांणीं

१८३ ह्यावरून गोविंदपंताची वरकरणी तरी पैशाची फार अडचण झाली होती असें दिसतें.

आपले लोकांस सांगून समय साधावें तें कांहीं दिसत नाहीं. त्यास काय इलाज करावा ? आह्मी दिक्क झालों. असो. चिरंजीव राजश्री बाबास व शिवरामपंत यांस पाठवणें. ते येथें येतांच आह्मी उमरगडीं येऊन. तुह्मी उमरगडीं येऊन चिरंजीव राजश्री बाबा व शिवरामपंत यांस पाठवणें. काय करावें ? सर्वांचें एकचित्त असतें तेव्हां कार्य होतें. रुसव्याखालींच दिवस गेले. पुढें काम कधीं व्हावें ? सत्वर चिरंजीव बाबा येथें येतांच मी उमरगडीं येईन. हिशेबाचें काम चालेल. वरकड भेटीनंतर बोलोन. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ १३४ ] ॥ श्री ॥ १९ आगस्ट १७५९.

चिरंजीव राजश्री बाबा प्रति गोविंद बल्लाळ आशीर्वाद. उपरि येथील कुशल ता॥ भादो वद्य १२ जाणून आपलें कुशल लिहित जाणें. विशेष. तुह्मीं काळीं चिठी पाठविली त्यांत राजश्री जनार्दनपंत यांहीं आपले चित्तीं संशय मानून रुमाल ठेऊन गेले हें लिहिलें. त्यास, आह्मी त्यासीं दुसरा विचार धरीत नाहीं. त्यांची कैदकानूंत काडीइतकी तफावत करीत नाहीं. त्यास, त्यांजलाहि आह्मीं पत्र लिहिलें आहे. जामदारखानियावर कारकून ते ठेवणार तर सुखरूप ठेऊत. आह्मांस त्यांचे कारकून राहिलियानें वाईट काय ? ज्यामध्यें त्यांचें समाधान तें आह्मांस करणें. सुखरूप त्यांचा कारकून जामदारखानियांत ठेवणें. वरकड येथील वर्तमान तर काळीं बिठुराहून कुच करून चचेडीस आलों. रा॥ गोपाळराऊ यासी बिदा करून देतों. दोन कारकून त्याचे रुजवातीस देऊन आह्मी एका दोन रोजांनीं येथील निर्गम करून उमरगडीं येतों आणि सत्वरच श्रीमंत रा॥ भाऊस्वामीकडे जाऊं. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे. हे आशीर्वाद.

---

[ १३५ ] ॥ श्री ॥ २० सप्टेंबर १७५९.

पु॥ तीर्थरूपराजश्री गोविंदपंतदादा वडिलांचे सेवसी:

विज्ञापना. श्रीमंत राजश्री माधवराव यांणीं मजला आज्ञा केली कीं पंतास लिहून आँरणें ४, उत्तम, लढावयासी योग्य असे आणून देणें. ह्मणोन आज्ञा केली, त्यावरून वडिलांस पेशजी लिहिलें आहे. तरी आरणें उत्तम तरणें बळकट चांगलें चार आधीं यावें. नित्य आह्मांस पुसतात कीं पंतास लिहिलें कीं नाहीं ऐसें नित्य पुसतात याजकरितां जलदीनें पाठवावें. मित्ति भाद्रपद वद्य १४ हे विज्ञापना.

---

[ १३६ ] ॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री राउस्वामीचे सेवेसी:

विनंति सेवक बापूजी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल ता॥ छ १५ सफर पावेतों मुकाम दिल्ली यमुनातीर स्वामीचे कृपावलोकनंकरून यथास्थित असे. विशेष. काशिद्राबराबर एक दोन पत्रें पाठविलीं होतीं. सेवेसी प्रविष्ट जाहालींच असतील. यानंतर लष्कर यमुना दिल्लीजवळ उतरोन अंतर्वेदींत भागीरथीतीरीं जाणार. ऐसा मजकूर आहे. कळलें पाहिजे. दिल्लीचा कारभार झाला. अंतर्वेदींत जाऊन, जाटाची मामलत करून, रोहिले, सुजातदौला याचा कारभार करून, पुढें बंगाल्यास जावें ऐसा विचार आहे. विदित जालें पाहिजे. हे §विज्ञापना.

---

१८४ माधवराव बल्लाळाला कांहीं अक्षरें बोबडीं बोलण्याची व लिहिण्याची लहानपणापासून संवय असून ती थोडी मोठेपणींहि राहिली होती असें दिसतें. ह्या पत्रांतील 'आरणें' हा शब्द 'हरणें' ह्याबद्दल आहे. पत्रें व यादींत (१८१) 'हातचें' बद्दल 'आतचे' माधवरावानें लिहिलें आहे. बाबूरावानें 'आरणें' हा शब्द माधवराव ज्याप्रमाणें बोलत त्याचप्रमाणें कौतुकानें व थट्टेनें लिहिला आहे. ह्या वेळीं माधवराव १४।१५ वर्षांचे असावे.

§ हें पत्र शिंदे लाहोरच्या स्वारीहून परत दिल्लीस आल्यावर लिहिलें आहे. नानासाहे-

[ १३७ ] ॥ श्री ॥ २१ आक्टोबर १७५

दस्तक सरकार राजश्री जनकोजी शिंदे. ताहां कमाविसदारांनीं व जक तदारांनीं व बाजे राहादारांनीं व जमीदारांनीं व चौकीदारांनीं महालां‍ हाय. सु॥ सितैन मय्या व अल्लफ. राजश्री त्रिंबक कृष्ण व राजे जनार्दन अप्पाजी फडनवीस दिंमत राजश्री गोविंद बल्लाळ हे दक्षिणप्रां ते जात आहेत. त्यांजबराबरी उंटें व स्वार व पडतळें व प्यादे भार बरदारी व तटें, बैलें आहेत व माणसें व बटकी असेत. तरी त्यांसी राहादारियानें कोणे बाबें मुजाहिम न होणें. एके घडीचा खोळंबा कोणा- हिविसीं न होतां सुरक्षित जाऊं देणें. नदी, नाला, नावांवरी पार करून देत जाणें. मुक्कामाचे जागा गांवगन्नाचीं माणसें जागले रात्रौ आपलाले हद्दपार बदरका माणसें व स्वार देत जाऊन पुण्यापावेतों सुखरूप पोहोंचा- वीत जाणें. तांकीद असे. जाणिजे. छ २९ माहे सफर.

---

[ १३८ ] ॥ श्री ॥ आक्टोबर १७५९.

पु॥ राजश्री जनार्दनपंत स्वामीचे सेवेसीः

विनंति उपरि. इकडील वर्तमान तर श्रीगंगापार झालों. परंतु परम-

---

वांच्या मनोदयानुरूप त्यांचा रोख रोहिले व सुज्यातदौला यांना शासन करून बंगाल्यास जाण्याचा होता. रोहिल्यांशीं झटापटी होतात न होतात तों अबदाली आला व शिंद्यांना बंगाल्यांत जाण्याऐवजी पाठमोरे वळून कुरक्षेत्राकडे कुच करून जावें लागलें.

१८५ त्रिंबक कृष्ण कानिटकर—मुजुमदार

१८६ जनार्दन आप्पाजी येरंडे—फडणीस.

१८७ हा जनकोजीच्या कारकुनाचा हस्तदोष आहे. कारण जनकोजीच्या प्रांताची हद्द पुण्यापासून अनेक योजनें लांब होती.

१८८ सरकारी कामदारांचा आतांप्रमाणें त्यावेळीं मोठा दरारा असे असें दिसतें. कारण एका घडीचाहि खोळंबा न करितां त्यांना पोहचविण्याची सर्व रामोशी, खलाशी, इत्यादि लोकांना सक्त ताकीद असे.

कष्टें झालों! त्यास, जीवावरील जोखीमधारा मोठी कठीण! त्यास पार येऊन जलालाबादेजवळ रोहिले, नजीबखांनाचा लेक, दुंदेखांनें, सादुल्लखान, हफीज रहिमत, दाहा हजार फौज, दाहा हजार प्यादे जमा झाले आहेत. बाण, जेजाला, तोफा समागमें आहे. लढाई एक दोन जाली. तोफा, बाण, तोफा हिरोन घेतली. रोहिले याजकडील चाळीस पन्नास घेतली. घेरून आह्मी आहों. रोहिले याचे लष्करी पीठ चार शेर जालें. घुगरी खातात. नजीबखानाच्या पुलापावेतों गांव जाळिले. पुलाजवळ पन्नास घोडे घेतले. पुलाच्या दोन नावा तोडून टाकिल्या. नजीब चार रोजांत तेथून निघेल. त्यास, आह्मी या घोरांत पडलों. त्यास, पंधरा रोजांत येथील मुकदमा फडशा होईल. हाफिजाकडून रात्रौ पत्रें आलीं. नरम जाले. सलूक करतील. तुह्मी प्रसंगीं जाता. येथील सर्व तुह्मांस सांगितलें आहे. कोणी गोष्ट आह्मांकडील संशयाची चित्तांत न आणणें. ज्यामध्यें आमचें बरें तें जरूर जरूर तुह्मी कराल. दरबारीं नानाप्रकारें नालिशी चुगली कारितात. त्यास, बहुता ब्राह्मणांचें अन्न आहे. मजला साफ पैसेयास तफावत करणें नाहीं. येथून येतांच परगणेयांत जाईन. गांवचा पाहून पैसानपैसा ठिकाणीं लावीन. सं० १८१३, सं० १८१४ दुसाला हिशेब जाले. रुजुवात करून जे कसर रयत व मामलेदार यांजकडे निघेल ते सरकारी जमेस येईल. सं० १८१५, सन तिसा हिशेब व रुजुवात होणें तेहि होईल. दरबारचा रंग पाहिला. खावंद चौकशी करूं लागला. आतां पैसेयाचा लोभ धरून मेळविली अबरू ते कां गमवावी? त्यास, आह्मीं सर्व आपले ध्यानांत आणून सर्व तुह्मांस सांगितलें आहे. कांहीं सांगावयास विसरलों असलों तर सर्व तुह्मीं स्मरण धरून सर्व उत्तमच करणें. आह्मी भवसमुद्रीं पडलों आहों. पार करणार ईश्वर आहे. मागाहून

---

१८९ जावताखान.

१९० नजीबखानाचा सासरा.

१९१ एक रोहिला सरदार.

१९२ रोहिल्यांचा मुख्य सरदार.

साद्यंत तुह्मांस व चिरंजीव बाबूराऊ यास लिहून पाठवितों. यासमयीं आह्मी येथें गुंतलों आहों. सर्व भरंसा आह्मांस तुमचा आहे. वरचेवर वर्तमान लिहीत जाणें. श्रीरंगपट्टण[१९३] गार्दियांनीं घेतलें. मोटें संस्थान

---

१९३ कवाइत शिकलेल्या लोकांचा सरदार हैदरअल्ली याला अनुलक्षून हें वाक्य आहे. ह्यावेळीं ह्मैसूरचा चिक्क कृष्णराज ह्मणून कोणी राजा होता. नंदीराज हा त्याचा मुख्य दिवाण होता. राजा दुर्बल व मंत्री दुर्बुद्धि असल्यामुळें हैदर नाइकाच्या तडाक्यांत हें संस्थान सांपडलें. रोमन पातशाहांना प्रिटोरियन गार्द्यांनीं किंवा तुर्कस्थानच्या पातशाहाला जानिझारींनीं जसें धाव्यावर बसविलें होतें तसेंच हैदर नाइकाच्या गार्द्यांनीं चिक्क कृष्णराजालाहि बसविलें व आपला नाइक जो हैदर त्याच्या हातांत मुख्य सत्ता दिली. निरनिराळ्या काळीं व निरनिराळ्या स्थळीं इतिहासाची पुनरावृत्ति होते ह्मणतात ती ही अशी होते. हैदराचें वय ह्यावेळीं सुमारें ५८ वर्षांचें होतें व त्यानें ह्मैसूर संस्थानची चाकरी सुमारें २६ वर्षें केली होती. १७६० त हैदरानें श्रीरंगपट्टण घेतलें ह्मणून वुइल्क्स ह्मणतो. परंतु तें १७५९ च्या आगस्ट सप्टंबरांत त्यानें घेतलें असावें. कारण आमचें हें पत्र आक्टोबर १७५९ त लिहिलें असावें असा अंदाज आहे व गोविंदपंताला श्रीरंगपट्टणची बातमी पोंहचण्यास निदान दीड दोन महिने लागावे. तेव्हां १७५९ च्या आगस्ट—सप्टंबरांत हैदरानें श्रीरंगपट्टण घेऊन तें संस्थान विच्छिन्न केलें असावें हेंच विशेष संभवनीय दिसतें. दिल्लीहून श्रीरंगपट्टणास पत्र जावयास एकदां ४३ ( लेखांक ६ ) व एकदां ५२ ( लेखांक ८ ) दिवस लागले होते. हिंदुसंस्थान विच्छिन्न झालें हें ऐकून गोविंदपंताला साश्चर्य खेद झाला असें दिसतें. सर्व मराठ्या सरदारांचें लक्ष्य ह्या विलक्षण उलाढालीकडे लागलें होतें; असाहि गोविंदपंताच्या उद्गारावरून तर्क होतो. ह्यासंबंधीं उल्लेख, कदाचित् सबंद पत्रें, मिरज मळ्यांतील पत्रांत असलीं पाहिजेत. कारण ह्यावेळीं गोपाळराव गोविंद ह्मैसूर प्रदेशांत होते. परंतु हैदरानें केलेल्या ह्या उलाढालीसंबधीं उल्लेख ऐतिहासिक लेखसंग्रहांतील पत्रांत कोठें केलेला आढळत नाहीं. ग्रांटडफनेंहि ह्या प्रसंगाचा कोठें निर्देश केला नाहीं. हा प्रसंग मराठ्यांना मोठा महत्वाचा होता. हैदर मध्यें आला नसतां तर श्रीरंगपट्टण खास मराठ्यांच्या हातीं पडलें असतें, मराठ्यांचा व मद्रासेकडील इंग्रजांचा निकट संबंध ह्याचवेळीं येता व महाराष्ट्राच्या इतिहासाला निराळेंच वळण मिळतें. येणेंप्रमाणें हैदरानें दक्षिणेस व अवदालीनें हिंदुस्थानांत मराठ्यांच्या आड येऊन इंग्रजांना पुढें येण्यास संधि करून दिली. ज्यावेळीं हा प्रसंग घडून आला त्यावेळीं त्याच्याकडे सर्व मराठ्या सरदारांचें लक्ष लागून गेलें होतें यांत संशय नाहीं. उत्तरेकडे अवदालीचा शह जर ह्यावेळीं बसला नसतां तर " सगळी दक्षिण मोकळी करावयाची " असा सदाशिवरावभाऊचा बेत होता.

विच्छिन्न जालें ! निजामअल्ली तूर्त बिघाड करीत नाहीं. सलूखच आहे. मी सुचित झालों ह्मणजे तपशीलवार तुह्मांस लिहून पाठवून देतों. तुह्मीं मार्गीं सावधपणें जाणें. वरचेवर आह्मांस वर्तमान लिहीत जाणें. आह्मी येथें येऊन गुंतलों. लढाईचा कारभार. सरकारी कार्य. कसें जावें ? हें कार्य जालियावर परगणेयांत येतों. दरबारचें काम कळेल त्या प्रकारें साधावें. बहुत काय लिहिणें. कृपालोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ १३९ ] ॥ श्री ॥ १७५९.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री जनार्दनपंत स्वामीचे सेवेसीः—

पोष्य गोविंद बल्लाळ सा।। नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. तुह्मी बीदा होऊन गेला. आह्मी श्रीगंगेच्या पायघाटें उतरोन जलालाबादेस गेलों. मध्यें त्याचें ठाणें सबळगडीं होतें. ते उभाउभी आवईनेंच सोडून जलालाबादेस आवघे रोहिले गेले. आवसा पाहून हुंदेखान वगैरे चौघेजण याचे कुमकेस होते. आह्मी गेलियाउपरि मामलत विल्हे लावा ऐसा पैगाम आफीजरहिमत याजकडून आला. तों अगोदरच रोहिल्याचें व सुजातदौल्याचें सूत्र जालेंच होतें. तो दरकूच लखनऊहून रामगंगेस पूल बांधोन पुढें उमराव वगैरे दाहा बारा हजार प्यादीं, कांहीं निम्मे स्वार, ऐसा जलालंबादेस आले. अटकेपलीकडून अबदाली चाळीस हजार फौजेनिसी लाहोरास येऊन खासा राहून पुढें जाहानखान वगैरे सरदार पंधरा हजार स्वारांनिसी सरदेवर आले. राजश्री साबाजी पाटील अलीकडे आले. एवंच दंगा व्हावयासी जालें आहे. आपल्या फौजा राजश्री मल्हारबा पंधरा दिवसांत येतील. त्यांचे यांचे एक झुंज जाल्यावर सर्व उत्तमच आहे. नाहीं तर कठीण काम ! दंगा व्हावयासी उशीर नाहीं. त्यास तुह्मीं तूर्त जावयाची उतावळी सर्वथा न करणें. पंधरा दिवसांत सर्व ठीक

होतें. तुह्मीं पंधरा दिवस इटावीसच राहून मागाहून सविस्तर आह्मी लिहून पाठवितों. एकंदर न जाणें. दक्षणेकडेहि मोगलासी कजीया. मार्ग निभावत नाहीं. तुह्मीं पुढें न जाणें. आह्मी मुजरद जोडी पा॥ त्याजबद्दल लिहून पाठवून. पुढें एकंदर न जाणें. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे. हे विनंति.

———

[ १४० ] ॥ श्री ॥ ४ नोव्हेंबर १७५९.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री जनार्दनपंत
स्वामींचे सेवेसीः

पोष्य गोविंद बल्लाळ साष्टांगनमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय तागाईत कार्तिक शुद्ध १५ पावतों लिहिलें पाहिजे. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें हरिद्वाराचे मुक्कामीं पावलें. सविस्तर कळों आलें. तिकडील वर्तमान लिहावें ह्मणून लिहिलें. त्यास, आह्मी श्री गंगापार उतरून जलालाबादेपावेतों गेलों. तेथें जाबताखान नजीबखानाचा लेक होता. त्यास सादुलाखान, दुंदेखान व हापसरहीम रोहिले तमाम सामील जाहले. रोज लडाई होई. रोहिलेच शिकस्त खाऊन जात. ये॥ दाहाबारा रोज होतों. पेंढारी यांणीं तमाम मुलूख लुटिला, शहरें लुटिलीं, जाळलीं. कोठें मुलखांत दाणा, गुरूं अगर वस्तभाव राहिली नाहीं. त्याजवर नवाब सुजातदौले रोहिल्याचे कुमकेस आले. त्याजवरून फौजा फिरान माघाऱ्या आल्या. त्याचेहि वकील जाबसाल आले आहेत. सुजातदौल्याशीं ठीक करून मग फौजा फिरोनहि पार

१९४ हें पत्र कार्तिक शुद्ध १५ चें आहे. पूर्णिमेला मराठ्यांचें सैन्य हरिद्वाराला पोहोंचून निदान बारा दिवस झाले होते. तेव्हां भाऊसाहेबाच्या बखरींत ( पृष्ठ ५१ ) मराठे कार्तिक शुद्ध प्रतिपदेस हरिद्वारास गंगापार झाले ह्मणून ह्मटलें आहे तें संभाव्य असून, टीपेंतील कार्तिक वद्य प्रतिपदा ही तीथ अगदींच अग्राह्य आहे. भाऊसाहेबाच्या बखरींतील सर्व तिथी दक्षिणी मित्तीच्या आहेत.

जातील. तुह्मी पुढें इटावी, कोच, झांशी जागजागा पावाल. तेथून सुखरूप पावलियाची व नवल विशेष वर्तमान असलेलें तें लिहीत जाणें. अब्दाली[१९५] कुरुक्षेत्रास येऊन पोंचला. यास्तव चोंहींकडे दंगा दिसतो. देशींहि दंगा ह्मणून ऐकतों. याजकरितां तुह्मीं जावयाचा विचार एकवार न करावा. खजिना सरकारचा झांशीस लावून द्यावा. तेथें किल्ला आहे. जाऊन राहील. तुह्मीं एकंदर जायाचा विचार न करावा. सांबाजी[१९६] शिंदे येऊन फौजेंत सामील झाले. अबदाली सतलज नदीवर आहे. खासा लाहोरास आहे. जहानखान सतलज नदीवर आहे. तुह्मीं पुढें एकंदर न जाणें. मागाहून मुजरत जोडी तुह्मांकडे पाठवितों. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ १४१ ]

॥ श्री ॥ ७ नोव्हेंबर १७५९.

विनंति. वेदमूर्ति राजश्री बापुभट झांशीस होते. त्याचें पत्र आलें होतें कीं, आह्मी छ २९ सफरीं निघोन मजलदरमजल श्रीस गेलों. तुह्मीं पितांबर आणविला आहे. त्यास, तेथें गेल्यानंतर पितांबर मुजरद माणसाबरोबर पाठवून देतों असें लिहिलें होतें. त्यास, वेदमूर्ति क्षेपनिक्षेप गेले. तुह्मांस पितांबर खामाखाय पाठवून देतील. चिंता नाहीं. आपण पितांबराची दुसरी तर्तूद न करावी. क्षेपनिक्षेप लवकरच होईल. कळलें पाहिजे. येथील मजकूर तरी आज छ १६ रौवलीं ऐसी आवई पडली कीं नजीबखान बाहेर निघाला; अवघ्या फौजा तोंडावर

---

१९५ अबदालीच्या फौजेची आघाडी.

१९६ ह्या पत्राप्रमाणें सावाजी शिंदे ४ नोव्हेंबर १७५९च्या आंत किंवा त्या दिवशीं फौजेंत येऊन मिळाले असें होतें. परंतु पुढील पत्रांप्रमाणें ते १० नोव्हेंबराला सामील झाले असें घ्यावें लागतें. पहिल्या पत्रांत साबाजी ह्मणजे सावाजीचें सैन्य व दुसऱ्या पत्रांत सावाजी खुद्द असा लाक्षणिक अर्थ घेतल्यावांचून गत्यंतर नाहीं.

असतां बुनग्यांत गलबल होऊन तिहीं[१९७] लष्करचे बुनगे आंग बिलगून चार कोस गेले; शिंदे स्वारीहून आल्यानंतर मागती याच मुक्कामीं राहुट्या झाल्या; ऐशी लटकीच आवई पडली. त्याप्रमाणें बंदोबस्तीचा[१९८] मजकूर ऐसा आहे. गंगेपार फौजा गेल्या होत्या, त्या सुजातदौला आला असें वर्तमान ऐकून फौजेनें आवई खाऊन गंगेआलीकडे अवघी फौज आली. कित्येक गंगेमध्यें वाहवले, कित्येक मोरेले गेले. त्यांणीं चडीस परीधाराजवळ पलीकडील आंगें ठाणें बसविलें. त्या फौजेची दहशत भारी पडली आहे. गोसावी सुजातदौल्याकडील पांचहजार फौजेनिशीं तो[१९९] पुलावरून नजीबखानाचे लष्करांत आला. याउपरि बुनगे मागें आठा कोसांवर ठेवून, सड्या फौजा करून, या तळावर असावें याप्रमाणें करणार आहेत. लाहोराकडे अबदाली आला. त्याची व साबाजी पाटील याची लढाई झाली. त्याची फौज भारी ऐसें देखोन साबाजी पाटील मजलदरमजल येथून आठाकोसांवर आले आहेत. उदईक साबाजी पाटील लष्करांत येणार. अबदाली सिदरेवर आहे. अद्यापि आला नाहीं. परंतु येणार ही गडबड आहे. दिल्ली अगदीं पळोन गेली. §वजीर व पा-

१९७ दत्ताजी, जनकोजी व गोविंदपंत ह्या तिघांच्या सैन्यांतील बुणगे.

१९८ भाऊसाहेबाची बखर पृष्ठ ५२ पहा.

१९९ हिंदुस्थानांत आवयांचें महत्व विशेष आहे. ज्या स्थळीं किंवा ज्या काळीं किंवा ज्याच्या संगतीस असतां कांहीं अरिष्ट आलें त्या स्थळीं किंवा काळीं किंवा त्याच्या संगतीस पुन्हा येण्याचा प्रसंग आला असतां हिंदुस्थानांतील माणसें घावरतात ही अनुभवांतील गोष्ट आहे. अशा आवयांवर विश्वास ठेऊन गडबड होऊं देणें ह्मणजे बंदोबस्त करणें नव्हे असा गोविंदपंताच्या लिहिण्याचा मतलब आहे.

§ ग्रांटडफ आपल्या इतिहासाच्या एकविसाव्या भागांत (पृष्ट ३११ मुंबईप्रत) लिहितो कीं वजिरानें जाटापाशीं आश्रा घेतला. परंतु ह्या पत्रांत गोविंदपंत ह्मणतो कीं वजीर मराठ्यांच्या लष्करांत पांचसहा रोजांत येणार. पुढें वजीर दत्ताजीच्या लष्करांत येऊन दाखलहि झाला लेखांक (१४३). दत्ताजी अबदालीस भिडण्याकरितां सरदेस गेला तेव्हां जनकोजीला व गोविंदपंत बुंदेल्याला त्यानें दिल्लीकडे जाण्यास सांगितलें व त्यांच्या बरोबर गाजुद्दिनालाहि धाडलें. (लेखांक १४७). ह्यावरून

लशाहा मल्हारजी होळकर याजकडे जाणार ऐसें आहे. आपण राजश्री पंतांनीं मजकूर लिहिला त्याजवरून कळों येईल. राजश्री बाबूराव याजकडून पत्रें आलीं. त्यांत मजकूर कीं फडनिसांनीं आपले घरास राजश्री नारोपंतास वर्तमान लिहिलें. त्यांनीं श्रीमंतांस तींच पत्रें नेऊन भाऊसाहेबांस दाखविलीं. त्यास, त्यांजपाशीं बातमीच होती. तें वर्तमान थोरल्यास कळतांच तेच निघोन भाऊंकडे आले. मग पत्रें पाहिलीं. त्यांत मजकूर लिहिला होता त्याचीं कलमें.

---

गाजुद्दिन वजीर जाटाकडे न जातां दत्ताजीकडे आसऱ्याकरितां आला हें उघड आहे. त्यानें आपले कबिले मात्र जाटाच्या मुलुखाकडे पाठविले.

२०० हीं दोपांचीं एकंदर नऊ कलमें भाऊसाहेबांनीं गोविंदपंताविरुद्ध काढिलीं आहेत व तीं खरीं आहेत हें लेखांक [ ३६ ] त गोविंदपंतानें कबूल केलें आहे. तेथें तो ह्मणतो, " दरबारचा रंग पाहिला. खावंद चौकशी करूं लागला. आतां पैशाचा लोभ धरून मेळविली अब्रु ते कां घालवावी ? " ह्मणजे चौकशीच्या पुढें आपल्या अब्रूचा टिकाव लागणार नाहीं असें गोविंदपंतास स्पष्ट वाटत होतें. गोविंदपताचे हिशेब वर्षाचेवर्षास यावयास दिरंग लागत असे हें त्यांनीं १७५६, १७५७ व १७५८ ह्या सालांच्या हिशेबाची रुजवात आक्टोबर १७५९ त करून दिली ( लेखांक ३६ ) ह्यावरून कळून येईल. " मराठ्यांच्या पराक्रमांत " पृष्ठ १०८ रा. पारसनीस यांनीं रा. नातू यांनीं " महादजीच्या चरित्रांत " गोविंदपंताविरुद्ध आणिलेला आरोप निराधार आहे असें कांहीं विशेष पुरावा न देतां ह्मटलें आहे. ह्या ह्मणण्यांत विशेष तात्पर्य नाहीं हें लेखांक १३८ यावरून कळेल. रा. नातूंच्या आरोपाविरुद्ध पुरावा आणतांना " पेशव्यांकडेच त्यांची जास्त बाकी निघते " ह्मणून " पराक्रम " कार ह्मणतात, परंतु " जास्त बाकी निघण्याशीं " व वेळेवर हिशेब पाठवून दिल्याशीं काय संबंध आहे नकळे. सध्यां गोविंदपंताच्या दप्तरांत वार्षिक हिशेब असतील व त्यांत पेशव्यांकडे बाकी जास्त निघतहि असेल, परंतु हिशेब वेळेवर रुजुवातीला जात नसत हा आरोप कांहीं तेवढ्यानें टळत नाहीं. हिशेब वेळेवर रुजुवातीला न गेले व वसुलानंतर दोनतीन सालांनीं गेले ह्मणजे रयतेकडे व मामलतदाराकडे कसर किती निघते ह्याची चवकशी करण्यास फार पंचाईत पडते. कित्येक कुळें मरून जातात, कित्येक फरारी होतात व कित्येक बेकार होतात. त्यांच्यापासून ठरावापेक्षां जास्त पैसा मामलतदारांनीं काढिला असल्यास, तो सरकाराला समजून येण्यास एकच उपाय असतो. तो हा कीं वेळेवर हिशेबाची रुजु-

मागील जमा आहे त्यापैकीं सोडून देऊन जमा कमी करतात. कलम १

दोन रुपये मागें ज्या महलांत सिबंदी प्यादे होते त्याचा खर्च होता तो जास्ती वाढविला. ज्या ठिकाणीं पांच प्यादे राहिले होते तेथें हल्लीं पंचवीस ठेवितात. कलम १

फौज नेमणूकप्रमाणें ठेवावी ते मन मानेल तसी ठेऊन चार रुपये खर्च करावा ऐसें चित्तांत जाणून खर्च बहुत करितात. कलम १

वांटणी केली त्यास शिंद्याकडे एक परगणा पांचा लाखाचा गुजाराविशीं होता तो दिल्हा व जे सिबंदी बहुत नलगे ते परगणे त्याजकडे दिल्हे बहुत सिबंदी लागती ते परगणे सरकारांत ठेविले. कलम १

उभयता चिरंजिव भेटी व नजराणे आंतस्ते घेतात. कलम १

आह्मी कर्ज जमा धरून सीलेदार यास मात्र रोजमारा देतों; महालाचा अगर आणीक कोठील दाखला आजपर्यंत किमपि नाहीं. कलम १

आह्मांकडे माणूस आलें त्यास बरें पहात नाहीं; मग जमीदार आला तरी तो जीवें कैसा राहील ? या दहशतीमुळें कोणी येऊन आह्मांस भेटत नाहीं. कलम १

---

वात करून घेऊन संशयाच्या स्थळीं कामगार पाठवून चौकशी करणें. ही चौकशी होऊं नये ह्मणून पेशव्यांचे कित्येक सरदार हिशेवाचे ताळेबंद वेळेवर पाठवून देत नसत. हाच प्रकार गोविंदपंत बुंदेल्यांनीं केला व ह्मणून प्रत्यक्ष परगण्यांत जाऊन चौकशी करण्याकरितां येरंडे व कानिटकर यांस पेशवे यांनीं पाठवून दिलें. वेळेवर हिशेब पाठवून देत नाहींत ह्या आरोपाचा हा असा अर्थ आहे. कानिटकर मुजुमदार व येरंडे फडणीस नेमून देऊन श्रीमंतांनीं गोविंदपंताचा मोठा गौरव केला असें रा. पारसनीस यांचें मत आहे ( मराठ्याचे पराक्रम, बुंदेलखंड प्रकरण, पृष्ठ १०३ ). परंतु, तसा कांहींएक प्रकार नसून, गोविंदपंतासारख्या ओढाळ सरदाराला वठणीस आणण्यास फडणीस हे कामगार नेमिले गेले व त्यामुळें श्रीमंतांनीं आपला गोविंदपंतावरील अविश्वास स्पष्टपणें व्यक्त केला. गोविंदपंत कितीं अपराधी होते ह्याचा अंदाज करावयाचा असल्यास, त्यांनीं फडणिसांना जीं गयावया करून पत्रें लिहिलीं आहेत तीं वाचलीं असतां उत्तम होईल. ह्याच आशयानें गोविंदपंतांचीं दहावारा पत्रें आह्मीं येथें दिलीं आहेत.

येथील अर्थ दुसरा वकील आल्याखेरीज कांहीं समजत नाहीं. कलम-रुजवात यथास्थित होणार नाहीं. कलम १

येथील जुने कारभारी आहेत ते मन मानेल तैसें कारभारांत पडोन जें मिळविणें तें मिळवितात. कलम १

सदर्हुप्रमाणें राजश्री बाबूरायास भाऊसाहेबीं बोलावून नेऊन येणेंप्रमाणें कागद फडणिसांचे आले आहेत. तरी तुह्मीं सावध असणें. त्याजवरून हें वर्तमान दहा बंद अगदीं तपशीलवार लिहून आजुरदार पाठविला तो छत्तीसावे रोजीं येथें आला. याप्रमाणें बजिन्नस बाबूरायाचें पत्र आलें तेंच बजिन्नस वाचून मला दाखविलें आणि ऐशा गोष्टी सांगितल्या. हे विनंति.

---

[ १४२ ] ॥ श्री ॥ ८ नोव्हेंबर १७५९.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री त्रिंबकपंतनाना व
राजश्री जनार्दनपंत स्वामींचे सेवेसीः

पोष्य गोविंद बल्लाळ साष्टांगनमस्कार विनंति. उपरि येथील कुशल ता॥ मार्गशीर्ष वद्य ४ मु॥ सुकरतला जाणून स्वकीय कुशल करीत असिलें पाहिजे. विशेष. आह्मी श्री गंगा उतरून पार गेलों. आठ दाहा रोज पार तमाम जागा लुटिली, जाळिली. त्यास, रोहिलेहि आपली जागा बतंग जाले. त्यास, राजश्री साबाजी पाटील शिंदे यासीं व अबदालीसी लढाई जाली. त्याजवर अबदाली भारी फौजेनिसीं आला. त्याजवर हे दरमजलींनीं येथें लष्करीं दाखल जाले. अबदालीचे फौजीये यामुळें दिल्ली तमाम पळाली. उजाड जाली. पातशा, वजीर

२०१ ह्या लढाईचा उल्लेख भाऊसाहेबाच्या बखरींत नाहीं. इफनें तर हें बहुतेक प्रकरण गाळल्यासारखेंच केलें आहे.

२०२ ता० ८ नोव्हेंबर १७५९.

हे येथें या लष्करीं दाखल होणार. त्यास, याप्रकारें वर्तमान जालें. काळीं पत्रें पुणेयाहून चिरंजीव बाबूराव यांचीं आलीं. त्यांत जो भावार्थ होता तो सायंत रा॥ दादोपंत, भास्करपंत यांस सायंत सांगितला. तेहि तुह्मांस तपसीलवार लिहितील. त्याजवरून कळों येईल. दरबारची, खावंदांची मर्जी एक प्रकारची जाली. आह्मी येथें येऊन गुंतलों. त्याजकरितां तुह्मीहि येथें आलां. तुह्मांस एक जमीदार अगर पाटील तोहि भेटला नाहीं. तुह्मीं तरी काय करावें ? खावंदाजवळ गेला. त्यांणीं पुसिलें कीं तुह्मीं कोण प्रकारें तरतूद केली. त्यासमयीं तुह्मांस केली असेंहि ह्मणतां नये; न केली असेंहि ह्मणतां नये. दोहींकडून तुह्मी काईल व्हाल. तेव्हां आह्मांवर शब्द. येणेंप्रमाणें जालियास आमची नुकसानी. कां कीं ? दोन सालें झालीं. तुह्मी एका गांवांत माहीत नाहीं. तुह्मांस तरी काय शब्द ? त्यास, आह्मी येथें गुंतलों नसतों तर या चार महिन्यांत तुह्मी सर्व कामकाजांत माहीत होता. आणि सर्व तुमचे नजरेंत येतें. तेंहि न जालें. त्यास, समय ह्मणावे तरी हिंदुस्थान गडबडलें आहे. त्यास, जर तुह्मांस आमचें बरें करणें तर आपण राहावें. मीहि आठ पंधरा रोजांत हरप्रकारें निकाल करून तुह्मांजवळ येतों. ज्याप्रमाणें श्रीमंत स्वामींची मरजी त्याप्रमाणें मजला करणें आणि तुमची खुषी तेंच मजला करणें. सारांश, तुमचे गेलियानें आमचा नाश होतो. श्रीमंत स्वामीचे दरबारचे दरबारचा मजकूर तुह्मांस सर्व कळलाच आहे. त्यास, आह्मी मोठे समुद्रांत पडलों आहों. त्यास, यासमयीं तुह्मीं उतावळी करावीसी नाहीं. बरें ! तुह्मी समयानुरूप आह्मांजवळ आला तर तुमचे आलियानें उभयपक्षीं उत्तम व्हावें. त्यास, तुह्मांस आह्मीं शब्द लावावा तर तुह्मांवर शब्द काय ? आह्मी येथें गुंतलों याजकरितां इतके दिवस जाले. तुमचेंहि प्रत्ययास येतें. चार जमीदार येते. कामकाज चालीस लागतें. त्यास, मी येथें गुंतलों त्यामुळें तेहि

आले. त्यास, जर तुह्मांस आमचें बरें करणें तर तुह्मीं देशास प्रस्तुत न जाणें. मजला येऊं देणें. तुमचे चित्तानुरूप परगण्याचें मागील तीन साला व पुढील जैसें पाहिजे तैसें तुमचें ठीक करून देऊन. मी येथें गुंतलों नसतों तर सर्व जमीदार तुह्मांस भेटते. कामकाज ठीक सुतीं लागतें. तें न जालें. येथें दिरंग जाला. याजकरितां तुह्मांसहि वाईट लागलें. त्यास, यासमयीं तुह्मीं चित्तांत दुसरा अर्थ एकवार न आणितां तुह्मीं राहावें. खजिना पुढें जाऊं द्यावा. यांत कांहीं दुसरा अर्थ चित्तांत न आणावा. जर तुह्मी जावयाचें कराल तर एकंदर न करणें. समय आहे. सर्वकाळ सारखा असत नाहीं. एकच वेळ समय पडतो. मी त्या प्रांतीं असतों तर इतकें कशास होतें ? मजला इकडे यावयास आणि कामकाजास दिरंग व्हावयास गांठ पडली. त्यास, तुह्मी याजउपरि खार्यीनखौंयी[२०३] जावयाचें, न करावें. तुमचे गेलियानें आमचें काम नासतें. दूरंदेशीं पाहणें. दूरंदेश ! रांगडा! परमुलूख ! जिवावरील खेळ ! याजप्रमाणें आहे. आह्मी च्यार रुपयास गुंतलों. काल, देश, वर्तमान, लोकांचें देणें याजमुळें रात्रंदिवस जिवास घोर ! तुमचे मनीं संशय आला. दोन वर्षें जालीं. कांहींच परगण्याचें आवसान न सांपडे. हेंहि खरेंच! त्यास, याजमागें इकडील गुंतेयामुळें जालें तें चित्तांत न आणणें. याजउपरि माझे यावयाचा मात्र गुंता आहे. त्यास, मी सत्वर येथें हरकोणास ठेवून येतों. विलंब करीत नाहीं. तुह्मीं चित्तांत संशय दुसरा अर्थ न आणतां राहणें. वरकड वर्तमान वरचेवर लिहीत जाऊन. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति.

---

२०३ अवश्य.

[ १४३ ] ॥ श्री ॥ ११ नोव्हेंबर १७५९.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री त्रिंबकपंतनाना व
रा॥ जनार्दनपंत स्वामीचे सेवेसीः

पोष्य गोविंद बल्लाळ सा॥ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल ता॥ मार्गेशीर्ष वद्य ७ मु॥ सुकरतला जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. परवाचे रोजीं पत्र तुह्मांस मुजरद जोडी चिरंजीव बाबा जवळ पाठविली. परंतु मार्गीं गडबड जाली. याजकरितां पावेल न पावेल ह्मणून हल्लीं मुजरद जोडी पाठविली आहे. त्यास, आपण देशास जावयाचें तूर्त न करावें. श्रीमंत स्वामींची मरजी दरबारची एक प्रकारें जाली. आह्मी येथें गुंतलों. दिवसगत लागली. त्याजमुळें तिकडील रुजवात वगैरे कामकाजें आटकोन राहिलीं. त्यास जो विचार आहे, दरबारचा, तो सर्व आह्मीं पेशजी पत्रें पाठविलीं त्यांत लिहिला आहे. श्रीमंत स्वामींची बहुतच मरजी बारीक जाली आहे. येथें गुंतलों त्याजकारितां दिवसगत लागली. तुह्मांस परगणेयांतील जमीदार व कांहींच रुजू न झालें. तुह्मांस तरी आह्मीं काय शब्द लावावा ? त्यास, तुह्मीं दोन मास देशास जावयाचें एकंदर न करावें. तुह्मी गेलियावर आह्मांवर पेंच हक्कनाहक्क येतो. श्रीमंत हेंच ह्मणतील, बाहाना करून राहिले. तर जर आह्मी बाहाना करून राहों तर आह्मांस नफा काय ? खावंदाची मरजी प्र॥ कार्य जाहलियानें खावंद राजी; आपला फडशा. त्यास, येथें दिवसगत लागली तरी तुह्मांस दखलगिरी न जाली. हेंहि खरें. त्यास, आह्मीं तुह्मांस हजार प्रकारें लिहिलें तरी येथें गुंतलों खरें ? त्याजमुळें सर्व कामें नाशिलीं. दरबार सर्व सोडून येथें गुंतलों. घरचें कांहीं असो. परंतु दरबारचा फडशा जाला ह्मणजे सर्व मेळविलें. त्यास, दोन मास देशास जावयाचें एकंदर न करणें. तुमची आमची भेट जालियावर सर्व दरबारचें वर्तमान सांगूं. वरकड रा॥ भास्करपंत व दादोपंत यांस तपशीलवार सांगितलें आहे. दरबारीं कोणाची मुरवत अब्रू तीळमात्र राहिली नाहीं. मीहि तिकडे असतां

तर या चारसा महिन्यांत सर्व कामें फडशा होतीं. परंतु आमचे राशीस कोण ग्रह आला त्याणें येथें आणून फसविलें! बरें! आतां तों कांहीं म्हणतां नये. हेंहि कार्य सरकारचें मागें ठीक झालें असतें. चिरंजीव बाबाची तुमची गांठ पडली असती म्हणजे आह्मी सुचिंत होतों. तेहि सत्वर माघारे जाऊं ह्मणून तेहि राहिले. त्यास, याजउपरि तुह्मीं देशास जावयाचें न करणें. कांळीं[२०४] रा। साबाजी पाटील येथें फौज सुद्धां आले. सुरजमल्ल जाट याजकडीलाहि फौज काळीं पाच हजार आली. रा। मल्हारराऊ सुभेदार हेहि जयनगराकडे आले. त्यांजकडेहि सांडणी व कासीद गेले. तेहि सत्वरच येतील. येथेंहि फौज मातबर जमा जाली. सुजातदौले व रोहिले एक जाले. परंतु गंगापार होऊन त्याजला येवत नाहीं. असो. आह्मी चारसा रोजांनीं पा' शा वजीर दिलीहून शाहाडोलेयांत काळीं डेरे देऊन राहिलों. दरमजलींनीं तेहि पाचवे सावे रोजीं येथें दाखल होतात. पातशा वजीर यांचे कबिले जाटाचे मुलकाकडे अगरेयास गेले. अबदाली लाहोरास दाखल जहानखान ह्मणून जाला. इकडें यावें हा इरादा आहे. त्याजमुळें या प्रांतीं गडबड फार जाली. दिल्ली वोस जाली. वरकड वर्तमान तर अधिकोत्तर काय लिहावें? या समयीं तुह्मीं जावयाचें न करणें. आह्मांवर हकनाहक पेंच येतो. आह्मी सर्वस्वें गुंतलों. कर्जे लोकांचीं देणें. येथें येऊन चार पेचांत पडलों. त्यास, पातशा वजीर येथें दाखल होतांच आह्मी निरोप घेऊन तिकडे येतों. फरुकाबादवाला व आह्मी एकत्र होऊन सर्व रोहिले व सुजातदौले एकत्र जाले. तिकडे कोणी नाहीं. त्याजला पायबंद फरुकाबादेस पुल बांधोन पार गडबड करून जागा जाळावी, लुटावी. त्यास, चिरंजीव बाबास फौजेंत देऊन तुह्मी आह्मी आपले कामास लागों. याप्रमाणें येथें ठहराव जाला. पातशा वजीर दरमजलींनीं येत आहेत. ते येतांच आह्मी येथून निघोन येतों. याप्रमाणें काली रात्रौ पाटिलबावाशीं खलबत जालें. तुह्मांस

२०४ काळीं ह्मणजे काल, १० नोव्हेंबर १७५९.

कळावें. तुह्मीं एकंदर जाण्याचें न करणें. समय घडीघडी येत नाहीं. आह्मांस इकडे गुंतावयास, सरकार कार्यास विलंब व्हावयास गांठ पडली. त्यास, तुह्मी शहाणे आहां. सर्व तुह्मांस कळतें. आम्हांस पेंचेंतून काढणें. मीहि कोणावर पेंच येऊं देणार नाहीं. दोन मास सबुरी करणें. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति.

मिती मार्गेश्वर शुद्ध २ सन
सितैन मु॥ इटावें.

---

[ १४४ ] ॥ श्री ॥ १३ नोव्हेंबर १७५९.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री त्रिंबकपंतनाना व राजश्री जनार्दन-
पंत स्वामीचे सेवेसीः—

पोष्य गोविंद बल्लाळ सा॥ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल ता॥ मार्गशीर्ष वद्य ९ जाणून स्वकीय लिहिलें पाहिजे. विशेष. येथील वर्तमान कितेक तुह्मांस दोन तीन पत्रीं लिहिलेंच आहे. आम्हींहि येथून विदा जाहलों. दरमजल तिकडे येतों. तुम्हीं येकंदर जाण्याचा विचार न करावा. मार्गशीर्ष वद्य १० बुधवारीं आह्मीं निरोप[२०५] घेतला. तेथें फौज फार जमा झाली. लाहोराकडून तमाम फौज आली. त्यास, तुह्मीं एकंदर न जाणें. इकडे अबदालीचा दंगा फार झाला. दिल्ली पळाली. पातशाहा वजिराचे कबिले आगरेयास गेले. पातशाहा वजीर येथें येतात. आह्मी दरमजलींनीं येतों. याउपरि गुंता नाहीं. वरकड चिरंजीव बाबा तुह्मांस सांगतील. मार्गीं दंगा जाला, माणूस निभावत नाहीं. इकडे फार कजीया झाला. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति.

---

२०५ इटाव्यास येण्यास. १४ नोव्हेंबर १७५९.

[ १४५ ] ॥ श्री ॥ २१ नोव्हेंबर १७५९.

श्रीमहाराजाधिराज श्रीमहाराजा श्रीराजा खेतसिंघजूदेव. एते. श्रीपंडित मुख्य प्रधान श्रीबालाजी बाजीरावको आसिर्वाद वचना. उहाके स्माचार सदा भले चाहिजे. इहाके स्माचार भले है. आपरंच. तुमारे तरफ सीरकारका रुपया आवनेका है. सो तुम देत नही. ढील करते है. ऐसो हजूर जाहीर भयो. सो य बात नीकी नाहीं. तौ देखतपाती सीरकारका रुपया झाडियेसे पं० श्री गोविंद बलाल इतने तरफ देना. ढील नकीजौ. रुपया देनेकू ढील लगी तो तुमारे परगनाकी जैफती होगी. मिती मार्गशीर्ष सद २ संवत् १८१६ मु: पुना. विशेष क्या लिखिये.

---

[ १४६ ] ॥ श्री ॥ २४ नोव्हेंबर १७५९.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री त्रिंबकपंतनाना व राजश्री जनार्दनपंत स्वामीचे सेवेसी:

पोष्य गोविंद बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल तागाईत मार्गसीर शुध ५ जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे. विशेष. सविस्तर चिरंजीव बाबांनीं लिहिलें त्याजवरून कळलें. त्यास, तुह्मी राहिला येणेंकरून आह्मांस फार संतोष जाला. तुह्मी येथें लष्करीं फार श्रमी जाला. तुह्मांस तरी आह्मीं काय शब्द लावावा ? तुह्मांस कांहींच परगणे यांत दाखलगिरी न जाली. इकडे येऊन बहुत दिवस गुंतलों त्याजकरितां तुह्मांसाहि संशय जाला. त्यास, सविस्तर चिरंजीव बाबा तुह्मांजवळ बोलिले त्याचप्रमाणें आह्मी करून. त्यांत काडीइतकें अंतराय होणार नाहीं.

२०६ सरकारचा कारभार देण्याला मध्याहिंदुस्थानांतील राजेलोक बहुशः दिरंग लावीत त्यामुळें जरबेनें लिहिणें पेशव्यास भाग पडे. त्यानें त्यांना राग येऊन आंतून तरी शत्रूस मिळण्यास ते तयार असत.

आह्मीं येथून निरोप मार्गसीर वद्यं १३ घेतला. दोन चार रोज किरकोळी गुंत्याकरितां राहिलों. प्रस्तान राजश्री रामाजीपंतभाऊ यांचे घरीं ठेविलें. त्या सकाळीं सुजातदौला याची आवई जाली कीं फौजसुद्धा अलीकडे झुंजावयास येतो. त्याजकरितां राहिलों. आज त्याजकडील वकील त्रिंबकदास आला. त्यास, उदईक हफीज रहिमत येणार. त्यास सलूख किंवा बिघाड दोहींतील एक पाहून जाणें ह्मणून पाटीलबावांनीं सांगून पाठविलें. आमचे बुनगे तीन कोस मागें गेले. सडे येथें आहों. उद्याच्या रोजांत सर्व कळेल. दर मजलीनें इटावियांस येतों. तुह्मीं एकंदर जावयाचें न करणें. तुमचे मर्जीप्रमाणें, श्रीमंत स्वामीचे आज्ञेप्रमाणें, चिरंजीव बाबा तुह्मांसी बोलिले, त्याचप्रमाणें करून. दुसरा अर्थ चित्तांत एकंदर न आणणें. अबदाली लाहोरास आला. शीखांसी मोठी लढाई जाली. दोन हजार अबदालीची फौज मारली गेली. जाहानखान जखमी जाला. ते लाहोराकडेच आहेत. मागें फौज तीन हजार व पाईचे माणूस तीन हजार होते, मुलतानाकडे. त्यास, लाहोराअलीकडे सुखरूप आले. दुवाबेयांत गवार मिळोन गळाठा केला. शतद्रूनदी उतरता पलीकडे कांहीं राहिले, कांहीं आलींकडे आले. तेथें दगा जाला. चार हजार उंट, चाळीस रुपयास बोगदी[२०९] उंट मिळाला. मोहर रुपये लुटिले गेले. काळीं उघडीं माणसें पायीं उतारा पांचशें आलीं. हजार घोडे लहान थोर आले. वरकड मारले गेले. मोठी बदनक्षी झाली. दिल्ली पळाली. तमाम मुलूख इकडील पळाली. असो. अबदालीचा शह भारी येऊन पडला, इकडे रोहिले, सुजातदौले एक जाले. दोन शह पडले

२०७ १८नोव्हेंबराला न जातां १७ नोव्हेंबराला जाण्याचा बेत झाला ! मनांतून फडणिसांना भेटण्याचा आशयच नव्हता. तेव्हां दोन चार रोज रहावें लागलें व आतां २४ नोव्हेंबराला झाल्या हकीकतीचें पत्र लिहितात.

२०८ ह्या लढाईचा उल्लेख भाऊसाहेबाच्या बखरींत नाही. डफनें तर हेंहि प्रकरण गाळलेंच आहे. ह्या लढाईंत अबदालीची बरीच बदनक्षी झाली. दोन हजार माणूस ठार झालें. हजार घोडे शत्रूनें धरून नेले. पांचशें माणूस उघडे बोडकें पळून आलें.

२०९ शब्द लागत नाहीं किंवा अर्थ कळत नाहीं.

आहेत. गडबड मुलखांत फार जाली. श्रीमंत स्वामींचे दैवेंकरून सर्व उत्तमच होईल. तमाम परगणेयाचे कारकून बोलावणें. मी सत्वरच येतों. येथें गुंता नाहीं. रोहिलेयासी सलूख तरी येतों, बिघाड तरी येतों. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ १४७ ] ॥ श्री ॥ २१ डिसेंबर १७५९.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री त्रिंबकपंतनाना
व राजश्री जनार्दनपंत स्वामीचे सेवेसी:

पोष्य गोविंद बल्लाळ सा॥ नमस्कार विनंति येथील कुशल ता॥ पौष शुध २ जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. येथील कुशल वर्तमान चिरंजीव बाबास लिहिलें आहे, त्याजवरून कळेल. आह्मीं शिंदे यांचा निरोप घेतला. यमुनेवर आलों. त्यास पारूंन दिल्लीवरून रूपराम कटारे तुह्मीं जाणें ह्मणून सांगितलें. बुनगे पार गेले. सडे अलीकडे आज राहिलों. पार जाऊन दिल्लीकडून त्यामागें मथुरेजवळ उतरावयास येतों. र॥ भास्करपंतदादा खंदापार आहेत. चिटणिसीचें काम दादोपंत यांचें होतें. देतों. पार उदयिक जातों. त्यांचेंच पत्र तुह्मांस येईल कीं चिटणिसी आह्मी लिहूं लागलों, ह्मणून लिहतील. त्याजवरून कळेल. आह्मी पार उतरलों. काय निमित्य तरी? अबदालीची फौज सरदेआलीकडे वीस कोस, कुरुक्षेत्राहून पंधरा कोसांवर; तो आला. त्यास सडी फौज र॥ दत्ताजी शिंदे घेऊन पुढें गेले. त्याचें व ह्याचें अंतर दाहा कोसांचें राहिलें. याजकरितां आम्हांस सांगून पाठविलें कीं आह्मी सडे गेलों. आह्मीं अबदाली रेटिला तर फार उत्तम जालें. र॥ जनकोजी शिंदे, गाजुद्दीखान वजीर व आह्मी राहिलों. त्यास, बुनगे घेऊन र॥ जनकोजी शिंदे, गाजुद्दीखान घेऊन पाटीलबावाकडे

---

२१० पार होऊन.

जातील. आह्मी दरमजलींनीं येऊन. जर करितां अब्दाली न रेटे तर बुनगे घेऊन आह्मी व रूपराम कटारे जाटाची फौज असे दिल्लीवरून दरमजलींनीं बुनगे घेऊन येऊन. चमेल पार करून देऊन. आह्मी इटावेयाजवळ पार येऊन. याजकरितां दोन रोज राहिलों. अब्दाली व पाटीलबावा सात कोस अंतर. आज लढाई[२११] अगर प्रातःकाळीं होईल. ईश्वर ज्यांस[२१२] यश देईल त्यास सुखें देऊं! तुह्मांस चिरंजीव बावांनीं राहविलें. त्यास, गडबडीचा समय. याजकरितां चार रोज लागले. तर संशय न धरणें. श्रीमंत स्वामींचे प्रतापें बहुत भाग्यें अब्दाली माघारा जाण्यांत उत्तम आहे. ईश्वर उत्तमच करील. रुमाल, कारकून आणविले. गडबड जाली. खळबळ जाली. याजकरितां आह्मांस येथें राहणें नाहीं. बुनगे घेऊन येऊन. तर मी व एकटे आपले फौजेनिशी येऊं तर या पत्रामागें मागें येऊन पावतों. चार रोज लागले ह्मणून उदास न होणें. कार्तिक वद्य[२१३] ५ श्रीमंत स्वामींनीं अमदानगरचा किल्ला घेतला: अमलदारास ताकीद पाठवून हिशेब जलदीनें आणवणें. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति. अब्दालीची गडबड फार आहे. हे विनंति.

---

[ १४८ ] ॥ श्री ॥ २९ डिसेंबर १७५९.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री बाळाजी गोविंद स्वामी गोसावी यांसी:

---

२११ २२डिसेंबर १७५९.

२१२ हें वाक्य मोठें अर्थप्रचुर आहे. गोविंदपंत बुंदेले, जनकोजी शिंदे व गाजुद्दीखान ह्यांनीं दिल्लीकडे जाण्यास निरोप घेतला त्यावेळीं निदान गोविंदपंताचें तरी दत्ताजीशीं भांडण झालें असावें. नाहीं तर गोविंदपंतानें असे उदासीनपणाचे उद्गार काढले नसते. "ईश्वर ज्यास यश देईल त्यास देवो!" ह्मणजे दत्ताजीस यश आलें काय किंवा अब्दालीस आलें काय, गोविंदपंताला त्याची पर्वा नाहीं!

२१३ १० आक्टोबर १७५९ रोजीं अहमदनगरचा किल्ला पेशव्यांच्या हातीं कविजंगानें दिला.

पो॰य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणें. विशेष. रावरायसिंग व दिवाण मुकुंदसिंग बुंधेले यांसी पेशजी होळकर शिंदे यांणीं बुंदेलखण्डची वाटणी केली ते समयीं परगणा मोधा दरोबस्ती करार करून दिल्हा होता. त्यास राजे जगतराज याणीं जबरदस्तीनें रायसिंगापासून निमे परगणा घेतला; निमे परगणा यांस दिल्हा आहे. ऐशास, हालीं जगतजाट वकील दिमत मजकूर याणीं हुजूर येऊन विनंति केली कीं निमे परगणा आह्मांपासून जगतराज यांणीं घेतला आहे तो सोडऊन देववावा. त्याची नजर लाखरुपये आपण सरकारांत देऊं व निमे परगणा सुटोन येईल त्यापैकीं निमे सरकारांत घ्यावा ह्मणोन त्याजवरून राजश्री कृष्णाजी अनंत यांचे विद्यमानें यांजकडील करार:

नजर परगणा मोधा निमे रायसिंगाकडे चालत नाहीं तो जगतराज व पहाडासिंग, §गुमानसिंग खुमानसिंग याजपासून घेऊन रायसिंगाकडे चालता करून देणें त्याची नजर करार रुपये.

१०००० २ सरकारची नजर.

५०००१ सन इहिदे.

५०००१ सन इसने.

१००००२

१२००० कित्ता.

१०००० रामचंद्र गणेश याचे.

२००० कृष्णराव बल्लाळ याचे.

१२०००

११२००२

§ बुंदेलराज्यांतील हरगड येथील गुमानसिंग.

एकलक्ष बाराहजार दोन रुपये करार केले असत. दरोबस्त प॥ सोडऊन सदरहू नजरेचा ऐवज वसूल घेऊन सरकारांत पावता करून पावल्याचा जाब घेणें. कलम १

परगणे मोधा दीड लाख रुपयांचा आहे. त्यापैकीं निमे पाऊणलक्षांचा रायसिंगाकडे चालत आहे. बाकी निमे परगणा जगतराज व पहाडसिंग, गुमानसिंग यांणीं घेतला आहे. तो तुह्मीं सोडवणें. त्यापैकीं निमे साडेसततीस हजारांची जागा रायसिंग यासीं देऊन बाकी निमे साडेसततीस हजारांची जागा तुह्मीं आपणाकडे घेऊन त्याची कमावीस तुह्मीं करून कच्चाहिशेब सरकारांत देत जाणें. तेथील आकार होईल त्यापैकीं कारकुनास व शिबंदी खर्च लागेल तो कार्याकारण करून बाकी ऐवज सरकारांत पावता करून पावल्याचे जाब घेत जाणें. तेणेंप्रमाणें मजुरा पडेल. कलम १

येणेंप्रमाणें दोन कलमें करार करून दिल्हीं असेत. सदहू लिहिल्याप्रमाणें वर्तणुक करणें. जाणिजे. छ ८ जमादिलावल सु॥ सितेनमय्या व अल्लफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ १४९ ] ॥ श्री ॥ २९ डिसेंबर १७५९.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री जनार्दनपंतदाजी स्वामीचे सेवेसीः—

पोष्य बाबूराव नरसी कृतानेक नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. सांप्रत पत्रें येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी ऐसें न कीजे. सदैव परामृश करीत असावें. देशींचें वर्तमान तरी मोगलासीं बिघाडाचा मजकूर जाला. थोरले श्रीमंत येथें †सिद्धटेकावरी एका दो रोजीं पुढें जातील. श्रीमंत भाऊसाहेब राक्षसभुवनांतून

† दौंडाजवळ पेडगांवापासून दोन कोसांवर भीमेच्या कांठीं गणपतीचें स्थान. अष्टविनायकांपैकीं.

दोन मजलीं पुढें गेले. मोगल दाहा लक्षाची जाहागीर व परांडे येथील किल्ला देत होता, परंतु श्रीमंतीं मान्य केलें नाहीं. त्याचे गळा पडावयाचा मजकूर आहे. आठा पंधरा रोजांत गांठ पडावी ऐसें आहे. सविस्तर वरचेवर लिहीतच आहों. राजश्री चिटकोपंत सुखरूप आहेत. तुह्मांस पत्र दिल्हें तें पाठविलें आहे. श्रीमंतांबराबर आहेत. कळावें. सर्वदा पत्र पाठवून सांभाळीत असावें. मित्ती पौष शुद्ध १०. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ १५० ] ॥ श्री ॥ ३ जानुआरी १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री त्रिंबकपंतनाना व राजश्री जनार्दनपंत स्वामीचे सेवेसीः—

सेवक गोविंद बल्लाळ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल ता॥ छ १३ जमादिलावलपर्यंत मुकाम नजीक सोनपथ येथें यथास्थित असे. विशेष. आमचें लौकर त्या प्रांतास येणें होत नाहीं याकरितां आपण देशास जाऊं ह्मणतात ह्मणून चिरंजीव राजश्री बाबांनीं कितेक तपशिलें लिहिलें. त्यास, आह्मीं दाटून तिकडें न यावें ऐसें नाहीं. शुक्रतालाहूनच निघोन यावें तों अबदालीची फौज आली. अकस्मात् अबदालीच येऊन पोहोंचला. त्याजवरून दिवसेंदिवस गुंता पडत गेला. याउपरि राजश्री पाटीलबोवा फौजसुद्धां दिल्लीस जाणार. अबदाली व रोहिले शुक्रतालींच आहेत. आह्मीं पाटीलबावाचा निरोप घेतलाच आहे. दिल्लीपावेतों बरोबरीच येऊन. दिल्लीपुढें मजलदरमजल त्या प्रांतास येतों. येविशीं संशय आपले चित्तांत एकंदर न आणावा. खामखा जलदीनें येऊन पोचतों. आज[२१४] येऊन दिल्लीस दाखल

---

२१४ मागील वाक्यापर्यंत सोनपतास असतांना छ १३ जमादिलावरीं गोविंदपंतांनीं हें पत्र लिहिलें. नंतर कांहीं कारणानें तें तसेंच ठेवून दिल्लीस आल्यावर येथून पुनः पुढें लिहिलें. येथून पुढच्या सगळ्या पत्रांची शाई निराळी आहे.

जाले. बुनगे जाटाचे मुलखांत रवाना केले. आपण सडे होऊन यमुनापार शामलीभिरट्यारोखें जातात. आह्मी मथुरेवरून येतों. राजश्री मल्हारजीबावा बळवड्यास[२१५] लागले होते. ते बळवडा घेऊन ठाणें बसवून झीलडेयास आले. दरमजलींनीं येतात. ते व हे एक झालियाउपरि बंदोबस्त उत्तमच होईल. चिंता नाहीं. आह्मी उगेंच येथें काय ह्मणून राहून ? अबदाली अकस्मात् आला. याचे कबिले बुनगेयांत टाकून येतां नये. आतां हेहि खासा बुनगेयांत आले. आह्मांस निरोप दिल्हा. बुनगेहि रवाना केले. दरमजलींनीं येतों. रुमाल[२१६] पाठविले नाहीं ह्मणून तुह्मास संदेह आला. तर पहिलें पत्र पावलें असतें तर पाराजीपंत याचीं माणसें गेलीं, त्याजबराबर पाठवितों. ते सिकंदरेयास पावलियावर तुमचें व चिरंजीव बाबांचें पत्र पावलें. तेच रोजीं कुच जाहले. ते तमाम मुलखांत गडबड जाली. माणूस निभावेनासें जालें. कागदाचें काम; रुमाल मार्गी गेले तर कामच नासेल,

---

२१५ मल्हारराव होळकर ११ नोव्हेंबर १७५९ च्या सुमारास जयपुरास आले ( लेखांक १४३ ). तेव्हां मदतीस येण्याकरितां शिंद्यांनीं त्यांस पत्रें धाडलीं परंतु ३ जानेवारी १७६० पर्यंतहि त्यांस मदतीस येण्यास फावलें नाहीं. मध्येंच जयपूर संस्थानांतील लहानसहान ठाणीं उगाच घेत बसून त्यांनीं निरर्थक कालक्षेप केला. शेवटीं १० जानेवारी १७६० रोजीं दत्ताजी लढाईत पडल्यानंतर दुसरे दिवशीं कोटपुतळी येथें शहाजणें वाजवीत मल्हारबा जनकोजीस येऊन मिळाले ( भाऊसाहेबाची बखर पृष्ठ ७७ व लेखांक १५३ ). दत्ताजीच्या मृत्यूची वार्ता आपल्यास माहीत नाहीं असें दाखविण्याकरितां शहाजणें वाजवावीं लागलीं ! इतकें जवळ असून मल्हाररावाला दत्ताजीच्या मृत्यूची वार्ता कळली नाहीं हें संभवत नाहीं.

२१६ फडणीस इतके दिवस रुमालाचीच वाट पहात बसले होते व त्याकरितां त्यांनीं गोविंदपंताला वारंवार लिहिलेंहि होतें. असें असल्यामुळें, पत्र वेळेवर पावलें नाहीं ह्मणून रुमाल पाराजीपंतावरोबर पाठवतां आलें नाहींत ही सबब अगदीं लंगडी होती. गोविंदपंताच्या मनांतून रुमालहि पाठवावयाचे नव्हते व स्वतःहि जावयाचें नव्हतें. अबदाली अकस्मात आला व त्यामुळें गडबड झाली ही सबब गोविंदपंताला वरी मिळाली होती असें नाहीं. कारण शुक्रतालास दत्ताजीला अबदाली भेटल्यापासून गोविंदपंतांनीं शत्रूशीं झुंज घेतल्याचा कोठें दाखला नाहीं. दत्ताजीच्या पाठीमागें सरकत सरकत ते दिल्लीकडेसच येत होते.

ह्मणून राहिलें. काम विलंबावर घालावें ह्मणून राहिलें नाहीं. बरें, आह्मी लिहितों तें प्रमाण नसेल. काय निमित्य कीं दिवसगत कामास लाविलियास कांहीं नफा आह्मांस असेल. तर सरकारी कार्य जितकें उरकलें, फडशा झालें तेंच उत्तम आहे. बरें! येथें राजश्री भास्करपंत, दादोपंत आहेत. हे तो सांगतील. आह्मी मथुरेवरून येत आहों. कांहीं सरकारी पथकें ठेवावीं लागलीं. जे राहतील ते ठेऊन. आह्मी दरमजलींनीं येतों. तुह्मीं उतावळी न करणें. आह्मी येथें एकंदर राहत नाहीं. इलाज काय करावा? अबदाली अकस्मात् आला. यास इलाज काय? बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ १५१ ]

॥ श्री ॥ ९ जानुआरी १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री जनार्दनपंतदाजी स्वामींचे सेवेसीः

पोष्य बाबूराव नरसिंह कृतानेक नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. सांप्रत पत्र येऊन परामृश होत नाहीं. तरी ऐसें नसावें. निरंतर पत्रीं सांभाळ करीत असलें पाहिजे. यानंतर देशींचें वर्तमान तरी मोगलाशीं बिघाड जाहला. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब पेंरळीनजीक[२१८] गेले. मोगलास यांस

---

[२१७] १० अक्टोबर १७५९ रोजीं कविजंगानें श्रीमंतांच्या हातांत नगरचा किल्ला दिला ( लेखांक ४५ ). त्यावर्षी दसरा १ अक्टोबर १७५९ रोजीं पडला होता. भाऊसाहेबांच्या कैफियतींत ( पृष्ठ ३ । ४ ) कार्तिक शुद्धांत ह्मणजे २१ अक्टोबरानंतर नगरचा किल्ला भाऊंनीं स्वतः घेतला ह्मणून ह्मटलें आहे तें अर्थात् बरावर नाहीं. भाऊसाहेब वानवडीस असतां विसाजी कृष्णानें नगरचा किल्ला फितुरानें घेतला हीच गोष्ट खरी आहे हें पुढें १९ फेब्रुवारी १७६० चें पत्र दिलें आहे त्यावरून निश्चित आहे. १५ जमादिलाखरीं ह्मणजे ३ फेब्रुवारी १७६० रोजीं उदगीरची लढाई झाली. तोंपर्यंत, ह्मणजे नगरचा किल्ला घेतल्यापासून अथवा १० अक्टोबर १७५९ पासून तों ३ फेब्रुवारी १७६० पर्यंत, सरासरी चार महिन्यांचा अवकाश रहातो. त्या अवकाशांत पेशवे व निजाम हे दोघे

चाळीस कोसांचें अंतर आहे. आजकरितां गांठ पडली असेल. श्रीमंतापाशीं पंचवीस हजार फौज आहे. आणखी वरचेवर फौजा जमा होत आहेत. मोगलापाशीं दहा हजार फौज आहे व दहा बारा हजार गाडदी आहेत. श्रीमंताचे पुण्यप्रतापें त्यांनें पारिपत्य उत्तम प्रकारें होईल. उभयपक्षीं मुकाबला जाहलियाचें वर्तमान आलेयानंतर सविस्तर मागाऊन पाठवितों. तुमचे बंधू चिटकोपंत येथें सुखरूप आहेत व राजश्री नारोपंत नाना पुण्यांत आहेत. वरकड वर्तमान उत्तम आहे. आपणाकडील वर्तमान

---

काय करीत होते, त्यांच्यामध्यें काय बोलणीं चाललीं होतीं, ते परस्परें कोठकोठें होते, पेशव्यांस नगरचा किल्ला फितुरानें तरी घेण्यास, लोकांना गोड दिसतील व स्पष्टपणें सांगतां येतील अशीं, काय कारणें सांपडलीं, इत्यादि गोष्टींसंबंधीं ग्रांटडफासुद्धां सर्व इतिहासकारांचें व बखरनविसांचें मौन आहे. मागचा पुढचा कांहीं एक संबंध न सांगतां एकदम पेशवे नगरचा किल्ला घेतात व नंतर कांहीं दिवसांनीं कोणे एके समयाचे ठायीं लढाई होऊन निजामाचा पराभव होतो इत्यादि पौराणिक कथांसारिखा कथाभाग इंग्रजी व मराठी बखरींतून लिहिलेला आढळतो. पेशव्यांच्या बखरींत ( ह्या बखरीसारखी अविश्वसनीय बखर दुसरी एखाद दुसरीच असेल ) तर " किल्ला सरकारांत घ्यावा " असें श्रीमंतांस वाटल्यावरून नगरचा किल्ला श्रीमंतांनीं घेतला, अशी स्वभावोक्ति लिहिली आहे! ( १ ) निजामानें पेशव्यांस दहा लाखाची जागीर व दोन किल्ले देऊं केले होते ते तो देईना ( १९ फेब्रुवारी १७६० चें पत्र ); तेव्हां (२) विजयादशमीच्या मुहूर्तानें ( १ अक्टोबर १७५९ ) नाना, दादा, भाऊ व राव हे सर्व डेरेदाखल झाले. ( भाऊसाहेबांची कैफियत ); इतक्यांत ( ३ ) नगरचा किल्ला घेतल्याची बातमी आली ( लेखांक ४५, १० अक्टोबर ); तों ( ४ ) भाऊसाहेबाला मारण्याचा प्रयत्न झाला ( कैफियत पृष्ठ २ ); त्याचा निकाल लाविल्यानंतर ( ५ ) पेशवे मंडळी नगरास गेली (१९ फेब्रुवारी १७६० चें पत्र) ; नंतर (६) नाना सिद्धटेकीं व भाऊसाहेब राक्षसभुवनीं २९ डिसेंबर १७५९ पर्यंत होते (लेखांक १४९) ( ७ ) तेथें मोगल " दहा लाखाची जागीर व परांडे येथील किल्ला देण्यास " तयार झाला, पण तें बोलणें आतां इतका खटाटोप व त्रास झाल्यावर पेशवे कबूल करीतना ( लेखांक १४९ ) ( ८ ) तेव्हां लढणें हाच मोगलाला शेवटचा उपाय राहिला; मग ( ९ ) भाऊसाहेबांनीं परळीवरून जाऊन मोगलाला उदगीर येथें गाठला. इतक्या प्रकरणांपैकीं कांहींचा नामनिर्देश आमच्या ह्या पत्रांत आला आहे. उदगीरच्या लढाईचें वर्णन पुढील एकदोन पत्रांत दिलें आहे.

लिहून पाठवावें. वारंवार आपणास पत्रें पाठविलीं. उत्तर येत नाहीं. तर ऐसें न करणें. पत्र पाठवीत जावें. राजश्री चिटकोपंते[२१८] यजमानांचा निरोप घेऊन जाणार. कळावें. मिती पौष वद्य ७. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ १५२ ]

॥ श्री ॥ १० जानुआरी १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यासीः— पोष्य रघुनाथ[२१९] बाजीराव नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत जाणें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लिहिला अभिप्राय विदित झाला. प्रस्तुत इकडे मोगलाचा कलह प्राप्त जाहला आहे. याचा निर्गम थोडकियाच दिवसांत होऊन येईल. तदनंतर त्या प्रांतें फौजा रवाना होतील. प्रस्तुत मल्हारबाहि जवळ असतील त्यांस मेळवून दोन्ही सरदार येकत्र असलियास उत्तम रीतीनें पठाणाचें पारिपत्य होईल. पठाणांत कांहीं फार बेंल[२२०] नाहीं व त्यांनीं मागील वर्षी दहशतहि खादली आहे. सारांश एकदिल फौज असलिया तें काम सहजांत आहे. तुह्मी शाहणे तेथें आहां. हरकसें चौरं[२२१] दिवस रंग राखा-

---

२१८ ह्या चिटकोपंतनानांवरती नानासाहेब पेशव्यांची पूर्ण मर्जी बसत चालली होती. ती इतकी कीं दरबारचें बहुतेक सर्व काम हे चिटकोपंतनानाच करूं लागले होते.

२१९ दादा उदगीरच्या लढाईत होते हें ह्यावरून उघड आहे. दादा बिथरले होते तेव्हां ते या लढाईत नसावेत अशी शंका काव्येतिहाससंग्रहकार आणतात ( कैफियत पृष्ठ ४ ). परंतु दादांचें तें इतिहासप्रसिद्ध बिथरणें उदगीरच्या लढाईनंतरचें आहे. उदगीरच्या लढाईच्या अगोदर दादा ताळ्यावर होते व त्यांनाच पुढें अबदालीवर हिंदुस्थानच्या मोहिमेस पाठवावयाचा प्रथम बेत होता ( पुढील पत्रें पहा ).

२२० दादांनीं अबदालीची येथें खरी किंमत केली आहे. दोन्ही सरदारांची " एकदिल फौज असलिया तें काम सहजांत आहे " असा त्यांचा अनुभव होता.

२२१ आह्मी येईतोंपर्यंत.

लच. जाणिजे. छ २० जमादिलावल. सविस्तर तीर्थरूप लिहितील त्याजवरून कळेल. हे विनंति.

---

[ १५३ ] ॥ श्री ॥ १२ जानुआरी १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री त्रिंबकपंतनाना व राजश्री जनार्दनपंत स्वामीचे सेवेसीं:

पोष्य गोविंद बल्लाळ सा॥ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत जाणें. विशेष. इकडील वर्तमान सर्व चिरंजीव बाबाचे पत्रीं लिहिलें आहे त्याजवरून कळेल. आह्मी सर्व सुखरूप आहों. रा. दादोबा, भास्करपंत सर्व सुखी आहेत. होणार बलवत्तर[२२२] तें जालें! रा. मल्हारजीबावाहि आज आले. हेहि दिलीकडे जातील. रेवडीपासून आह्मी इटावेयाजकडे येऊं. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ १५४ ]

॥ श्री ॥ १३ जानुआरी १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यासः

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. वजिराकडील व अबदाली व सुजाअतदौला व रोहिले वगैरे त्या प्रांतींचें वर्तमान विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐशास, प्रस्तुत अबदाली कोठें आहे? राजश्री जनकोजी शिंदे व दत्ताजी शिंदे कोठें आहेत? राजश्री मल्हारजी होळकर त्या प्रांतें गेले तेहि येऊन पावलेच असतील. कोणकोणाचा

[२२२] दत्ताजीच्या मृत्यूस अनुलक्षून हें ह्मणणें आहे.

प्रकार कसा आहे तें विस्तारें वरच्यावर लिहीत जाणें. इकडील वर्तमान तरी निजामअलीखानांनीं जागीर दाहा लाखाची व नगर व परांडा दोन किल्ले सरकारांत द्यावयाचा करार केला असतां द्यावयास अनमान करूं लागले. यास्तव डेरेदाखल होऊन फौज जमा केली. नगरचा किल्ला घेतला. बाकी जागीर व येक किल्ला येणें. यास्तव दरमजल मोगलाच्या सुमारें उदगीरीनजीक आपली फौज मातबर जमा जाहाली. येका दो दिवशीं गांठ पडेल. मोगलाची फौज ह्मणावी तरी बसालतजंग त्याचा भाऊ फुटोन करनाटकास[223] गेला. मुसाबुसीहि अरकॉटास[224] गेला. इभराइमखान त्याजकडून निघोन सरकारांत येऊन चाकर जाहला. हणमंतराव निंबाळकर व जानोजी निंबाळकर व लक्षुमणराव खंडागळे आपलाल्या घरींच आहेत. तिगस्तां तुह्मीं मोगल पाहिला होता त्यापेक्षां यंदा थोडका आहे. येथील मुकदमा सत्वरच फैसला होईल. चिरंजीव राजश्री दादाचें येणें अविलंबेंच त्या प्रांतीं होईल. तुह्मीं तिकडील वर्तमान वरच्यावर लिहीत जाणें. रवाना. छ २३ जमादिलावल. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[१५५] ॥ श्री ॥ २३ जानुआरी १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्य राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि: पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. तुह्मीं पत्र पौष वद्य[225] ४ पाठविलें तें छ २६ जमादिलावलीं प्रविष्ट जाहलें. अबदालीची व सरदार व वजिराचे फौजेची संनिधता जाली. अबदालीची फौज भारीच आहे. स्वामीचे प्रतापें-

---

२२३ अदवानीस.

२२४ १८ जून १७५८ त बुसीला लालीनें पांडिचेरीला परत बोलाविलें. निजामाच्या राज्यांतील फ्रेंचांची सत्ता बुसीबरोबर नाहींशी झाली.

२२५ ता. ७ डिसेंबर १७५९ चें पत्र १६ जानुआरी १७६० ला पोहोचलें.

करून याचा पराजय होईल ह्मणोन विस्तारें लिहिलें. परस्पर वर्तमान आलें कीं अबदालीसी सरदारांसी मुकाबला होऊन लढाई[२२६] बरें वजनें समशेरासमशेर जाहली आणि तुह्मीं कांहींच लिहिलें नाहीं ! तरी सविस्तर वर्तमान जलद लिहीत जाणें. अबदालीचे फौजेचें बळाबळ कसें आहे ? फौज कशी आहे? सरदार परम धीर्यवान मर्द पराक्रमी आहेत. ते हिमतीस, बहादुरीस चुकतील असा अर्थ नाहीं. अबदालीस हतप्रभाव करावयाच्याच प्रयत्नांत, मनसुबियांत असतील. राजश्री मल्हारजी होळकर येऊन सामील जाहले न जाहले तें लिहणें. प्रस्तुत सरदार कोठें व अबदालीची फौज कोठें आहे? तो काय विचारावर आहे ? तें वर्तमान या दिवसांत जलद जलद आपल्याकडील देखील वर्तमान लिहीत जाणें. जाणिजे. छ ४ जमादिलाखर सु॥ सितैन मय्या व अल्लफ. + बहुत काय लिहिणें, या दिवसांत जलद वर्तमान लिहीत जाणें. हे विनंति.

---

[ १५६ ] ॥ श्री ॥ २९ जानुआरी १७६०.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गंगाधर यशवंत स्वामी गोसावी यांसिः पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. राजश्री दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे याची व अबदालीची गांठ पडून येक दोन युद्धें झालीं ह्मणोन वर्तमान आलें. राजश्री मल्हारबासहि वर्तमान आलेंच असेल. मल्हारबास

---

२२६ " लढाई बरें वजनें झाली " ती पौष शुद्ध ५, २४ डिसेंबर १७५९ रोजीं झाली. पौष वद्य ४ ला सरदारांची व अबदालीची संनिधता झाली. लढाई होण्यास

+ येथपासून खुद्द खाशांचें अक्षर आहे. ह्या पत्रापासून पुढें जेथें + अशी खूण लागेल तेथपासून पुढचा मजकूर खुद्द खाशांच्या हातचा आहे असें समजावें.

वारंवार जावयाविषयीं पत्रें पाठविलीं. बहुधा गेलेच असतील. तुह्मीं सर्वांनीं येकचित्तें करून मेहनत करून अब्दालीचें पारपत्य करून अटकपार करावा हें सर्वोत्कर्ष उत्तम आहे. + जरूर आधीं जावें. जैयेनगरचें[227] जेव्हां ह्मटलें तसें होईल. छ १० जमादिलाखर. हे विनंति.

---

[ १५७ ] ॥ श्री ॥ २९ जानुआरी १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यासी: पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. तुह्मीं दोन पत्रें एक पौष वद्य ३० दुसरें पौष शुद्ध ७ कुंजपुरचें मुक्कामचें पाठविलें तें माघ शुद्ध १० प्रविष्ट जाहालें. अब्दाली तीस पसतीस हजार फौजेनिशीं चालोन आला. याजकरितां नजीबखानाचा मुर्कदीमा[228] तैंच ठेऊन सरदार व वजीर अबदालीवर चालोन गेले. समागमें आह्मांसहि आणिलें. पौष शुद्ध ५ पंचमीस गांठ पडली. युद्ध जालें. वजीर व राजेश्री जनकोजी शिंदे बुनगेसहित मागें राहिले. राजश्री दत्ताजी शिंदे सडे होऊन गांठ घातली. त्यास अब्दालीची फौज भारी; तथापि दत्ताजीबावांनीं बरें वैजनें[229] नरम केलें. त्यांनीं डांगर

---

२२७ मल्हारराव ह्यावेळीं जयनगर ऊर्फ जयपूर प्रांतीं होते किंवा नाहीं ह्याचा संशय प्रॉटडफ्‌ला आला होता. परंतु तो जयनगर प्रांतींच होता ह्याचा उल्लेख लेखांक ४१, ५५ व ५९ ह्यांत हवा तितका केला आहे.

२२८ ह्यावरून नजीबखानाशीं सलूखाचें ह्मणण्यासारखें कांहींच बोलणें झालें नाहीं असें दिसतें. अबदालीच्या येण्याच्या अगोदर नजीबाला पुरता चोपला पाहिजे होता. परंतु गोविंदपंतांसारख्यांकडे नजीबाचीं व सुजाउदवल्याचीं राजकारणें असल्याकारणानें (लेखांक ३७) विलब होऊन मराठे ह्यावेळीं दोन शहांच्या मध्यें सांपडले.

२२९ ही लढाई २४ डिसेंबर १७५९ रोजीं झाली. ती बरें वजनें झाली ह्मणून पेशव्यांना बातमी दोन तीन ठिकाणाहून आली. तेव्हां भाऊसाहेबांच्या बखरींत (पृष्ठ ६० । ६१) "मराठ्यांचीं तोंडें काळीं खापरासारखीं दिसों लागलीं" ह्मणून ह्मटलें आहे तें ग्राह्य दिसत नाहीं.

धरून अंतरवेदींतून दिल्लीस यावें, नजीबखानास सामील करून घ्यावें, असा त्याणीं विचार केला. नजीबखानहि त्यास येऊन सामील जाला. सरदार त्यास घेरून आहेत. तथापि तो भारी. स्वामींनीं राजश्री मल्हारजीबावा, पत्रें पाठवून ते, लौकर येत तें करावें व दहा हजार फौज एक सरदार साळ-सुद मुलूख कौलीं न लुटी ऐसा ग्वालेरेसमीप पाठवावा. जमीदारांनीं हराम-जादगी केली. ऐन हंगामींच बखेडा जाला ह्मणोन विस्तारें लिहिलें तें क-ळलें. ऐशास अबदाली आला. याजकरितां राजश्री दत्ताजी शिंदे व जन-कोजी शिंदे रोहिल्याचा कारभार ठऊन गेले. तेच समयीं राजश्री मल्हारजी होळकर यांसहि सामील करून जावयाचें होतें. तें न केलें. मल्हारबांनीं आधीं काम कोणतें करावें ? मग कोणतें करावें ? माधोसिंगाचा मजकूर काय ? जेव्हां ह्मटलें तेव्हां पारपत्य होतें. तो विचार त्यांनीं न केला. दत्तबा तो इश्वराचे घरचे शिपाई ! त्यास अबदालीची तमा काय ? जाऊन गांठ घातली. ते त्यास सोडतील ऐसें नाहीं. मल्हारबास वारंवार जावया-विशीं पत्रें पाठविलीं. बहुतकरून मल्हारबा जाऊन सामील जालेच असतील. प्रस्तुतहि त्यास पत्र पाठविलें आहे व दत्तबासहि पत्र पाठविलें असे. तें त्यास देणें. अबदालीचें पारपत्य करावयाविशीं मनःपूर्वक तुह्मी सर्व मेहनत करीत असालच. करावी. दहा हजार फौज पाठवावयाविशीं लिहिलें. तरी इकडे निजामअलीखानांनीं बिघाड केला. त्याजवरी चिरंजीव राजश्री भाऊ व दादा व राव गेले. उदगिरीसमीप गांठ पडली. एक दोन जुंझें चांगलीं जालीं. त्याच्या गटांत गोळे चालविले. एक दोन हत्तीनिशीं ठार व एक हत्ती ठार जाला. मोगल नरम जालाच आहे. हा गुंता सत्वरच वारतो. चिरंजीव राजश्री दादासच अविलंबें रवाना करून. तुह्मीं तिकडील वर्तमान वरच्यावर लिहीत जाणें. च्यार दिवस अधिक आगळे दादासाहेबास लागले तर फौज दाहा हजार त्वरेनेंच पाठवितों. तुह्मीं आपले कमाविसदारांस वर-कडास लेहून खबरदारीनें राहात, जमीदार लबाडीवर येऊं न पावत

तें करणें. शामलाचें असाध्य स्थल[२३०] उंदेरी, समुद्रांतील जागा, अरमार व लोकांनीं मेहनत करून चंद्र २९ जमादिलावलीं फत्ते करून जंजिरा काशावर गेले. तिकडील धर सुटला आहे. +तेंहि कार्य व्हावेंसें आहे. चंद्र १० जमादिलाखर. हे विनंति.

---

[ १५८ ]

॥ श्री ॥ २९ जानुआरी १७६०.

पु॥ राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

नमस्कार विनंति उपरि. अबदाली जवळ आला. दत्तबा सडे होऊन गेले. यंदा अबदाली भारी आहे. बहुत तिकडे मिळाले आहेत. सत्वर फौज दहा हजार रवाना करावी. जमीदार सर्व फिसादीवर आहेत. म्हणून विस्तारें लिहिलें तें अवगत जाहालें. तिकडे फौज पाठवणें जरूर आहे. परंतु निजामअल्लीसीं जुंझ प्रारंभ जाहाल्यास पंधरा दिवस जाहाले. मोंगल थोडा आहे. सरकारची फौज चाळीस हजार जमा जाहाली. इब्रामखान त्याकडील मातबर गाडद्याचा सरदार तिकडून फुटून[२३१] आला. यंदा गाडदी बारा हजार

---

२३० उंदेरी १९ जानेवारी १७६० त घेतली. हें स्थल घेण्याकरितां पेशवे वर्षदीडवर्ष खटपट करीत होते ( पत्रें व यादी ८३।७६।३७९ ). उंदेरी, कासें इत्यादि स्थलें मुंबईभोंवतीं आहेत.

२३१ इब्राइमखानाला सलाबतजंगानें काढून टाकिलें असें ग्रांटडफ म्हणतो. परंतु तो फुटून आला असें ह्या पत्रांत लिहिलें आहे. आतां तो फुटून कधीं आला ? ग्रांटडफच्या मतें ह्या वर्षाच्या मुलुखगिरीस प्रारंभ व्हावयाच्या अगोदर म्हणजे १ अक्टोबर १७५९ च्या अगोदर त्याला पेशव्यांनीं नौकरीस ठेविलें. तेव्हां मुजफरखान म्हणून जो पेशव्यांच्या पदरीं गार्द्यांचा नाईक असे त्याला ती गोष्ट बरी वाटेना. म्हणून त्यानें भाऊसाहेबाचा खून करण्याचा प्रयत्न केला व हा सर्व प्रकार ह्या मुलुखगिरीच्या अगोदर घडला. परंतु " फुटून आला " असें ज्याअर्थीं बाळाजी बाजीरावानें शब्द लिहिले आहेत त्याअर्थीं हें फुटणें दोन्ही सैन्यांची हालचाल होऊं लागल्यावर झालें असावें असा तर्क आहे. मुजफरखानानें भाऊसाहेबाला मारण्याचा प्रयत्न केला तो दसऱ्यानंतर केला असें भाऊसाहेबांच्या कैफियतींत म्हटलें आहे.

आहे. तोफा मारितात. दर रोज त्यांचे हत्तीवरील सरदार पडतात श्रीकृपेनें सत्वरच मोगलाचें पारपत्य होईल. हें काम होतांच तिकडे फौज रवाना होईल. मल्हारबास वारंवार पत्रें रवाना केलीं आहेत. परंतु त्याचे प्रकृतीस तुह्मी जाणता. या दिवसांत दत्तबाकडील वर्तमान जरूर जलद कळलें पाहिजे. जलद वर्तमान तिकडील सर्व लिहीत जाणें. मनसूरअलीचे लेकाचे घरचें कच्चें वर्तमान लहान मोठें सर्व आणून लिहिणें. श्रीकृपेनें फाल्गुनअखेर येथील काम होईल. तदोत्तर बहुत फौज हिंदुस्थानांत रवाना होईल. उदेरी घेतली. कासाही घेतला. मग जंजिरा हातपाय मोडले. यंदा दाहीकडे कलह एकदांच प्राप्त आहे. श्रीकृपेनें उत्तमच होईल. काशीचा गुलाबसाखरकंदाची गैर जरूराती. उत्तम फर्मास जरूर रवाना करणें. सांप्रत आमचे शरीरप्रकृत उत्तम आहे. छ १०जमादिलाखर. हे विनंति.

---

हा प्रयत्न कार्तिक शुद्धांत झाला असें कैफियतीचें ह्मणणें आहे तें मात्र चूक आहे. कारण मुजफरखान अर्धा कार्तिक महिना कोंकणांत होता असें पत्रें व यादी ९६ ह्यांतील मजकुरावरून सिद्ध करितां येईल. हें पत्र १३ रबिलावल सन सीतैनाला रवाना केलें आहे. ह्या पत्रांत १४ रबिलावलीं महादाजी केशव याजकडून पत्र आलें तें पावलें असें लिहिलें आहे. परंतु पत्र १३ रबिलावलीं रवाना केलें असल्यामुळें १४ रबिलावलचा त्यांत वृत्तांत येणें अशक्य आहे. १४ रबिलावलच्या बद्दल १२ रबिलावल असें वास्तविक पाहिजे आहे. तसेंच १४ रबिलावल शनवार ह्मणून तेथें लिहिलें आहे. परंतु १४ रबिलावलीं सोमवार आहे. १२ रबिलावलीं शनवार पडतो. तेव्हां १४ रबिलावलाच्या बद्दल १२ रबिलावल असेंच असलें पाहिजे हें निःसंशय आहे. ह्याच पत्रांत रबिलावर ह्मणून लिहिलें आहे; परंतु तो लेखकाचा हस्तदोष आहे. ह्या १३ रबिलावलच्या ह्मणजे ४ नोव्हेंबर १७५९ च्या पत्रांत मुजफरखान कोंकणांत कोळ्यांचें बंड मोडीत होता ह्मणून लिहिलें आहे. तेव्हां भाऊसाहेबावर मुजफरखानानें मारेकरी घातले ते ४ नोव्हेंबरच्या नंतर घातले असावे हें निर्विवाद आहे. ह्या चार नोव्हेंबरच्या नंतर इब्राइमखान फुटून आला असावा. तो येणार हें पक्कें समजल्यावर मुजफरखानानें आपला निंद्य हेतू तडीस नेण्याचा प्रयत्न केला असावा. हा मारेकरी घालण्याचा प्रकार पुणें येथें घडला असल्यास भाऊ नोव्हेंबर महिन्यांत पुणें येथें होते, दसऱ्याला सुमुहूर्तानें बाहेर मात्र पडले व तेथूनच निजामाशीं बोलणें व इतर कारभार करीत होते असें उघड ठरतें.

[ १५९ ]

॥ श्री ॥ ३० जानुआरी १७६०

राजश्री दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे गोसावी यांसि:

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्य स्ने॥ बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत असलें पाहिजे. विशेष. तुमची व अब्दालीची गांठ पडून युद्ध झालें ह्मणून परस्परें वर्तमान येतें. परंतु तुमचें पत्र येऊन सायंत वर्तमान कळत नाहीं. अब्दालीपाशीं फौज किती आहे? त्याचा जोरा कसा आहे? तुह्मी कोणे जागा आहां? व अब्दाली कोठें? त्याचा कस्त कसा आहे? राजश्री मल्हारजी होळकर यांस वारंवार पत्रें पाठविलीं कीं तुह्मांस जाऊन सामील होणें. बहुधा ते तुह्मांजवळ पावलेच असतील. तरी सविस्तर वर्तमान लिहिणें. इकडील वर्तमान तर निजामअलीखानांनीं बिघाड केला. त्याचे पारपत्यास चिरंजीव राजश्री भाऊ व दादा व राव गेले. एक, दोन युद्धें झालीं. त्यास नरम करणें तें केलें. हा गुंता सत्वरच उरकतो. चिरंजीव राजश्री दादा अविलंबेंच त्या प्रांतें येतील. तुह्मीं तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. अब्दालीच्या पराजयाचें वर्तमान सत्वर लिहावें. +प्रथम तजविजीनें संभाळून काम करावें. जातीनशीं जाया होऊं नये. सरदारीनें काम करावें. ईश्वर यश देईल. छ ११ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

---

[ १६० ]

॥ श्री ॥ ३० जानुआरी १७६०

...रूप राजश्री गोविंदपंत दादा वडिलांचे सेवेसी: अपत्यें बाबूराव ...कार विनंति तागाईत माघ शुद्ध ॥१३ भौमवार, मु॥ अमदा-... यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्रें पाठविलीं तीं प्र॥ होऊन

---

...ासाहेबांच्या राजनीतीच्या धोरणाचें प्रथम सूत्र आहे.

... जंत्रींत माघ शु॥ १३ ला बुधवार आहे.

सविस्तर वर्तमान कळलें. अबदाली अंतरवेदींत आला, दंगा भारी आहे, ह्मणोन लिहिलें. त्यास, श्रीमंतांचीं पत्रें प्रविष्ट करून उत्तरें घेऊन पाठविलीं आहेत. राजश्री मल्हारजी होळकर येऊन सामील जाहलेच असतील. त्यांचीं पत्रें काल श्रीमंतांस आलीं कीं आपण जलदीनें निघोन शिंदे यांकडे गेलों ह्मणून त्यांनीं लिहिलें होतें. ते आले असतील. उभयतां येकत्र जालिया अबदालीचें पारपत्य करितील, यांत गुंता नाहीं. देशीहून फौज पाठविणें ह्मणोन आपण श्रीमंतांस लिहिलें. त्यास, तूर्त मोगलाचे शहास गुंतले आहेत. उदगिरीचे अलीकडे साहा कोसांवर मोगल आहे. त्यास, श्रीमंत राजश्री भाऊसाहेब चौगीर्द फौजा बसवून उतरले आहेत. माघ शुद्धं[२३३] प्रतिपदेस व द्वितीयेस ऐशीं दोन रोज दोन युद्धेंहि जालीं. इब्राहीमखान गारदी पहिला निजामअलीकडे होता तो तेथून सोडून येऊन सरकारांत चाकर राहिला आहे. त्यानें प्रथम तोंड लाविलें. व आणखी पतकेंहि दाहापांच कुमकेस होतीं. युद्धप्रसंग बराच जाहाला. त्यास, मोंगलाकडील दोन तीन सरदार मातबर पडले. रेणकोदास ह्मणोन पांच हजार फौजेचा सरदार होता तो कामास आला. व आणखी बरेंच माणूस दोन च्यार पडलें. गारदी दोनशें अडीचशें पावेतों मारिले. तीन हत्ती तोफांचे गोळ्यानें वारले. सरकारचे गारदी पंचवीस पन्नास गेले व शेंपन्नास जखमी जाहले. शेंपन्नास घोडेहि जखमी जाहले. त्याजवरी खाविंदाचा रोख धारूरचा आहे. धारुरास आलाच असेल. सरकारच्या फौजा चौगीर्द चालतात. दाणावैरण त्यांस मिळों देत नाहीं. त्याचें लष्करांत दाणावैरणीचा आकांत आहे. दाणे पांच शेर जाले आहेत. लौकरीच गुंता उरकावा सारखा आहे. त्याचा मजकूर मराठे कोणी सामील जाहले नाहीं. त्यास, जाधवराव मात्र सामील जाहले आहेत. धारुरास येऊन

२३३ १९ व २० जानेवारी १७६० पहिलीं दोन युद्धें झालीं. नंतर धारूराच्या अलीकडे शेवटलें उदगीर येथील युद्ध झालें. इब्राईमखानाचा मोड होऊन त्याचीं ११ निशाणें गेलीं ह्मणून काव्येतिहाससंग्रहकार ( भाऊसाहेबाची कैफियत पृष्ठ ४ टीप ) ह्मणतात तें हें युद्ध नसून शेवटलें युद्ध आहे.

व्यंकटराव निंबाळकर यांस सामील करावें, तद्नोत्तर जानोजी निंबाळकर यांसहि मेळवावें, ऐशा मजकुरांत आहे. परंतु धारुराअलीकडे येऊं देत नाहीं. तेथेंच गुंता उरकेल ऐसें दिसतें. त्याजपाशीं फौज बारा हजार आहे. गारदी दाहा हजार आहेत. तोफा शंभर आहेत. येणेंप्रमाणें सरंजाम आहे. सरकारी सामान भारी आहे. चाळीस हजार फौज आहे. महिना पंधरा रोजांत गुंता वारला तर फौजा तिकडे येतील. नाहीं तरी मग फौजा अखेर सालीं येत नाहींत. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब व दादासाहेब यांचे पत्रांचीं उत्तरें आणवून पाठविलीं आहेत. +बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विज्ञापना.

पै॥ चैत्र वद्य[234] ३, मु॥ ग्वालेर.

---

[ १६१ ] ॥ श्री ॥ ३० जानुआरी १७६०.

राजश्री मल्हारजी होळकर गोसावी यासिः

सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्य स्ने॥ बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत असलें पाहिजे. विशेष. राजश्री दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे अबदालीवर गेले. त्यांची यांची गांठ पडून युद्ध जालें. ह्मणोन वर्तमान आलें. आपणांसहि वारंवार पत्रें पाठविलीं. अबदालीचें पारपत्य आधीं करावें. माधोसिंगाचा मजकूर आपणांस अगाध नाहीं. जेसमयीं चित्तावर धराल तेसमयीं कराल. तर लौकर जावें ह्मणोन लिहिलें होतें. बहुधा आपण गेलेच असतील. उभयतां एकत्र होऊन अबदालीस हतप्रभाव केल्याचें वर्तमान सत्वर ल्याहावें. इकडे निजामअलीखानांनीं बिघाड केला. त्याजवर चिरंजीव

---

२३४ हें पत्र गोविंदपंतास ग्वालेरीस पोहोंचलें. शिंदे होळकरांचा पराभव झाल्यावर वारी ग्वालेरीस येऊन बसली. फडणिसांना भेटण्यास इटाव्यास गेली नाहीं. पत्र ४ मार्च १७६० रोजीं पोहोंचलें.

राजश्री भाऊ व दादा व राव गेले. उदगिरीसमीप गांठ पडून युद्ध झालें. त्यास नरम केलें इकडील निर्गम सत्वरच होईल. चिरंजीव राजश्री दादा तिकडे अविलंबेंच येतील. + जरूर आधीं अबदालीवर जावें. तें काम नीट जाहालिया सहजांत जयनगरचें (व) गैरे काम होईल. छ ११ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें. हे आर्शीवाद.

---

[ १६२ ] ॥ श्री ॥ ४ फेब्रुवारी १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री जनार्दन-
पंत स्वामीचे सेवसीः

पोष्य गोविंद बल्लाळ सा॥ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल ता॥ फाल्गुन वद्य ३ मुक्काम नजीक संबलगड जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आह्मी कबिले बुनगे पावावयास आलों. तें संबलगडाजवळच चमेल उतरून पाविलें. कालीं फाल्गुन वद्य[२३५] ३ रविदारीं मध्यरात्रीं राजश्री दत्ताजी शिंदे यांस पुत्र जाहला. उत्साहाकरितां आज मुक्काम केला. उदयिक पंचमीस कूच करून दरमजलींनीं येतों. वरकड भेटीनंतर सविस्तर बोलोन. फार श्रम जाहले. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति.

पे॥ फाल्गुन वद्य १२.

---

२३५ दत्ताजींची स्त्री भागीरथीबाई ईस पुत्र फाल्गुन वद्य ३ रविवारीं मध्यरात्रीं ह्मणजे ३ फेब्रुवारी १७६० रोजीं झाला. दत्ताजी १० जानेवारी १७६० रोजीं वारला (लेखांक १६५). तेव्हां दत्ताजींच्या मृत्यूनंतर पंचविसाव्या दिवशीं दत्ताजीस पुत्र झाला. दत्ताजींच्या दहाव्या दिवशीं बुणगे चम्रेलीवर आले; तेथून निघून कुवारी नदीवर त्यांनीं तेरावा केला व पुढें पांच दिवसांनीं कुच केलें, असें भाऊसाहेबांच्या बखरीं (पृष्ठ ८०) त ह्मटलें आहे. परंतु तें चूक आहे. तेराव्या दिवशीं उत्सव करितां आला नसता व साखराहि वांटण्यास हरकत येती. वाचकांना गहिंवर यावा एतदर्थ भाऊसाहेबांची बखर रचणाऱ्यानें येथें स्वतःच्या कल्पनेंतील कादंबरीचा अंश मिश्रित केला आहे हें उघड आहे.

[ १६३ ] ॥ श्री ॥ ८ फेब्रुआरी १७६०.

श्रीमंतराजश्री भाऊसाहेबांचे सेवेसी:

श्री सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्यआज्ञाधारक संताजी वाघ दंडवत विज्ञापना येथील कुशल तागाईत माघ वद्य सप्तमी पावेतों साहेबाचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण आजच हिंदुस्थानचे स्वारीस सुमुहूर्तें निघून डेरियास आलों. याउपरि मजलदरमजल तीर्थस्वरूप राजश्री मामाजवळ फौजसुद्धां जाऊन दाखल होतों. आह्मांस सर्वस्वें आश्रा स्वामीचे पायाचा आहे. पूर्वीपासून एकनिष्ठ सेवकव्रत मात्र जाणत आहों. सर्व निर्वाह करणार धनी समर्थ आहेत. वरकड वर्तमान राजश्री हरि वल्लभ यांनीं विज्ञापनापत्र लिहिलें आहे, त्यावरून विदित होईल. कृपाळू होऊन पत्राचें उत्तर आज्ञापत्र पाठवावें. बहुत काय लिहिणें. कृपा कीजे. हे विज्ञापना.

पे॥ छ २१ जमादिलाखर.

---

[ १६४ ] ॥ श्री ॥ १४ फेब्रुआरी १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. " अबदाली नजीबखानाकडे जाऊन त्यास व पारच्या रोहिल्यास मेळवून घेऊन दिल्लीच्या रोखें आला. उद्या परवा मुकाबला होईल. " ह्मणोन लिहिलें तें कळलें. बहुधा मुकाबला जाला असेल. परस्परें मुकाबला जाल्याचें वर्तमान येतें. परंतु तुह्मीं कांहींच लिहिलें नाहीं, हे कोण गोष्ट ! लडाई कसकशी जाली ? राजश्री मल्हारजी होळकर व राजश्री जनकोजी शिंदे व दत्ताजी शिंदे येकत्र होऊन युद्ध जालें किंवा जनकोजी शिंदे

यांचेच फौजेशीं युद्ध जाहलें ? तें तपशीलवार लेहून पाठविणें. प्रस्तुत सरदार मनसुबा काय करितात ? व अबदाली कोठें आहे ? काय मनसुबा करितो, ते बातमी येतच असेल. सविस्तर लिहिणें. या दिवसांत तुह्मीं जलद जलद वर्तमान लिहीत जाणें. जाणिजे. छ २६ जमादिलाखर, सु॥ सितैन मय्या व अल्लफ. + इकडील मोंगल मारल्यादाखल करून पंचेताळिसांची[२३६] जागीर, बराणपुर, अशेर, दौलताबाद घेतली. गुंता उरकला. याउपर सत्वर फौजा पोहोचल्या. जाणिजे. मल्हारबांनीं जाट, मनसुरअल्लीचा लेक लगामीं राखावा. बाजी राखावी. हे विनंति.

---

[ १६५ ] ॥ श्री ॥ १५ फेब्रुवारी १७६०.

तीर्थस्वरूप राजश्री गोविंदपंत दादा वडिलांचे सेवेसी:

अपत्यें बाबूराव दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विनंति तागायत माघ वद्य १४ पावेतों मुक्काम अमदानगर येथें लष्करांत यजमानापाशीं सुखरूप असो. विशेष. वडिलांचीं पत्रें दक्षणी मित्तीचीं पौष वद्य ७ सप्तमीचीं आलीं ते येथें माघ शुद्ध १० दशमीस पावलीं. पत्रार्थ आज्ञेप्रमाणें करून सरकारीं पत्रें सरकारांत दिलीं. त्यांत मजकूर उदईक शिंदे यांजशीं व अबदाली याजशीं युद्ध प्रसंग आहे याजप्रमाणें वर्तमान. त्यास, छ २०[२३७] विसावे जमादिलावलीं ‖बडाऊच्या घाटीं अबदालीशीं आपले फौजेशीं युद्ध जाहलें. रा० पाटीलबावांस मानेवर गोळी लागली. रणांत राहिले. ह्मणून पत्रें छ २५ जमादिलावलीचीं पुरुषोत्तमपंत याचीं आलीं. हेंच वर्तमान अ-

---

२३६ तह होत असतांना हें पत्र लिहिलें आहे. निजामानें जेवढें प्रथम कबूल केलें तेवढें येथें लिहिलें आहे.

२३७ १०जानेवारी १७६०, पौषवद्य ८.

‖ 'बराऊ' ( नातूकृत महादजींचें चरित्र पृष्ठ ३०१ ).

गोदर चवदावे रोजीं दिल्लीहून सावकारी[238] शहरास आलें, याजप्रमाणें. शिंदे-यांशीं लढाई जाली. पाटील युद्धांत गोळी लागून राहिले. याजप्रमाणें उज्जेनहून गोविंद विश्वासराव यांचीं पत्रें साडेसा रोजांचीं आलीं उज्जेनहून. त्या मागून उज्जेनहून दुसरें पत्र आलें कीं रणांत पाटीलबुवा राहिले. आपले फौजेचा भणाण जाहला. मग पेंढारी रण सोधावयास गेले. अबदाली दिल्लींत गेला. त्यांणीं रण सोधिलें तों पाटीलबुवा रणांत जीवंत सांपडले. पेंढारी उचलून लष्करांत घेऊन आले. याजप्रमाणें उज्जनहून पत्रें आलीं. आपली फौज पळाली ते कोटपुतळीनजीक सांवर धरून रा॥ जनकोजीबावा मुकाम करून राहिले. बुनगे सडे हत्ती उंटें राहिलीं. लुटिलीं गेलीं. तों मुकाम मजकुरीं रा॥ मल्हारजीबावा होळकर फौजसुद्धां आले. उदईक भेटी होतील ह्मणून पत्रें वकीलांचीं उज्जेनीचे पत्रांत भेटले. अबदाली याणें तेमूर-पातशा बसविला, त्याची दोही फिराविली, गाजुद्दीखान लष्करीं आले, त्याजबराबर पातशाहाजादा आले, याजप्रमाणें येथें वर्तमानें[239] आलीं. परंतु तेथून कोणाचें पत्र आलें नाहीं. त्यावरून यजमान फार श्रमी. आपलीं पत्रें रोज जलद येतात. या दिवसांत पत्रें यावीं ते येत नाहींत. काय विचार आहे हा न कळे. ऐसियास, वडिलीं सविस्तर वर्तमान लिहून पाठविणें. सविस्तर जरूर जलद वर्तमान लिहून पाठवणें. मजला फार चिंता लागली आहे. वडील तेथें होते. परंतु बुनगेयांत होते. ते चाकरी वडिलास सांगितली आहे ह्मणून पत्रें येथें वकिलांचीं आलीं होतीं. सविस्तर लिहून पाठवावयास आज्ञा करावी.

देशाकडील वर्तमान तर मोगलाशीं बिघाड जाहला होता तें वर्तमान

---

२३८ सरकारी बातमीपेक्षां सावकारी बातमी जलद येत असे.

२३९ ( १ ) पाटीलबोवा रणांत राहिले. ( २ ) पाटीलबोवा रणांत जिवंत राहिले व त्यांना बुणग्यांनीं परत आणिलें. ( ३ ) पाटीलबोवांचें शीर कुतुबशानें कापून नेलें व धड तसेंच रणांत ठेविलें ( भाऊसाहेबाची बखर पृष्ठ ६९ ), ह्यांपैकीं खरी बातमी कोणती? दिल्लीच्या सावकारी पत्रांत, पुरुषोत्तमपंताचे पत्रांत व गोविंद विश्वासरावाचे उज्जनीचे पत्रांत पाटील रणांत राहिले, असा मजकूर आहे. बखरींत लिहिल्याप्रमाणें दत्ताजीचें शीर भर रणांत कुतुबशानें कापून नेलें असतें तर ती बातमी निदान दिल्लीच्या बातमी-

सविस्तर सेवेसी लिहिलें होतें. अलीकडील वर्तमान तर मोगलास उद गिरींस नजीक बेदर येथें गांठ श्रीमंताची पडली. तेथें युद्ध जाहलें. परं ते माफक. त्याजवर मोंगल आवशास आला. वाटेस युद्ध होत आला आवशाहून धारूरास येणार. वीस कोस आवशाहून धारूर. त्यास तीन मुक़ाम, दाहा कोस मोंगल आला. धारुरास र॥ व्यंकटराव निंबाळकर, लक्षुमणजी खंडागळे व आणखी कांहीं मराठे ऐसी सात आठ हजार फौज जमा झाली. ते सामील करून घ्यावी याजकरितां मोंगल चालिला. तों श्रीमंत भाऊसाहेब, दादासाहेब यांणीं मनसुबा केला जे दहा कोस धारूर राहिलें. धारूरास गेला, मराठे मिळाले ह्मणजे विचार पडेल, हें उत्तम नाहीं. ते करार झाला. माघ वद्य २ द्वितीयेस रविवारीं मोंगलाचे कुच आहे. युद्ध उत्तम करावें; मरेल तो मरो. याप्रमाणें मातबर सरदार होते. त्यांशीं सर्वांहीं करार याजप्रमाणें केला. त्याप्रमाणें प्रातःकाळीं कुच जाहलें. दोन प्रहरां मुकामास न येतां नळावर आध कोसांवर मोगल आवळून राहिला. आह्मांकडील तोफ लागली. त्याजवर दोन प्रहरां युद्ध जाहलें

---

दाराला तरी कळली असती. पुरुषोत्तमपंताचें पत्र युद्ध झाल्यावर पांच दिवसांनीं लिहिलें आहे. तो खुद्द सैन्यांत किंवा त्याच्या आसपास होता असें वर "आपले फौजेशीं" ह्या प्रयोगावरून दिसतें. तोहि पाटील रणांत राहिले एवढेंच लिहितो. त्यामागून उज्जनींहून दुसरें एक पत्र आलें त्यांत पेंढारी पाटिलबावांना जिवंत लष्करांत घेऊन आले असें लिहिलें होतें. ह्या चारी पत्रांत शिर कापल्याचा मुळींच उल्लेख नाहीं. तेव्हां बखरींत जें हृदयद्रावक वर्णन केलें आहे तें शुद्ध काल्पनिक आहे अशी बळकट शंका येते. तशांत बखरींत राजाराम चोपदाराचें कुतुबशाशीं जें भाषण लिहिलें आहे तेंहि थोडेसें नाटकीं, अप्रासंगिक, व ह्मणून साक्षात् घडलेलें नसावें, असें दिसतें. भाऊसाहेबांची बखर लिहिणाऱ्याला खुलवून लिहिण्याची चटक लागल्यामुळें मोठें नुकसान झालें आहे. १७५२ पासून १७६१ पर्यंत हिंदुस्थानांत ज्या ज्या कांहीं गोष्टी घडल्या त्या त्या त्याला चांगल्या माहीत होत्या. त्या त्यानें जशाच्या तशाच दिल्या असत्या आणि तिखट मीठ लावून झणझणीत करण्याचा प्रयत्न केला नसता ह्मणजे मोठी बहार झाली असती.

२४० ३ फेब्रुवारी १७६० अगर १५ जमादिलाखर, सु॥ सीतैन ( लेखांक १६६, पत्रें व यादी १७० ). पत्रें व यादींतील १७० हें पत्र १७५९ त लिहिलें असा काव्येतिहासकारांचा आशय दिसतो. परंतु तो चुकीचा आहे.

त्याजकडील चंडोल अगदीं बुडविला. दहा अकरा हत्ती, पंधरा पावेतों तोफा आणिल्या. त्याजकडील याजखेरीज सात आठ मातबर सरदार मारिले गेले, गाडदी प्यादे यांस नीत नाहीं. याजप्रमाणें आह्मांकडील पांच सात-जण केशवराव पानसी तोफखानेयाचे दरोगे, याजप्रमाणें पांच सात उार. शंभर दीडशें राऊत तीन चारशें पावतों जखमी. याजप्रमाणें जालें. त्याजवर मोंगल तेथें राहिला. बरा नाहीं. आंत जखमी बहुत. मातबर चार असामी होत्या त्या मारिल्या गेल्या. यांजमुळें दहशत मोगलानें फार खा-दिली. उपाय नाहीं. आतां जर हे आपणांवर चालोन येतील आपणांस बुडवितील यांत गुंता नाहीं. याजप्रमाणें अंधेशा पुरता चित्तीं आणऊन सल्ल्यावर घातलें, मोगलानें. त्याजवर त्यांनीं त्यास जागा मनास येईल त्याप्रमाणें किल्ले जागा मागितली. त्याजवर त्याणें यास बजित फार येऊन दिली. साठी लाखाची[२४१] जागा स्वदेशीं अंबेड, पुलंबारी, नांदेड याजप्रमाणें खास जागीर द्यावी; किल्ले दोन, आसेरी, दवलताबाज, शहरें दोन, विजापूर, बराणपूर, याजप्रमाणें घेऊन सलुख झाला. दवलताबाजेस रा॥ गोपाळराव गोविंद गेले. आसेरीस रा॰ बच्याजी विश्वनाथ बरवे; विजापुरास नागोराम वामोरीस असतात ते; असे रवाना झाले. किल्ले हस्तगत झाले ह्मणजे मोग-लानें कूच करावें. जेथें आहे तेथून निजामअल्ली याणें आलजपुरास जावें. जागा खाऊन असावें. सलाबतजंग यांणीं भागानगरीं असावें. मराठे निंबाळ-कर यांणीं त्याजकडे जाऊं नये चाकरीस. याजप्रमाणें करार झाला. कहीं मोगलाची मोकळी मात्र झाली. आपली फौज ज्याप्रमाणें आहेत भोंवतालीं

२४१ ह्या तहाप्रमाणें, अशेर, दवलताबाद, सोल्हर, मुल्हेर, नगर आणि बऱ्हाणपूर असे सहा किल्ले मिळाले. पैकीं नगरचा किल्ला पेशव्यांनीं अगोदरच घेतला होता. ग्रांट-डफ शिवनेर ह्मणून ह्मणतो ती चूक आहे. अंबेड, फुलंबरी, नांदेड आणि विजापूर हे प्रांत जागीर मिळाले. ग्रांटडफच्या मुख्य लिहिण्यांत बऱ्हाणपूर नाहीं. बाकी ...पैंत ' बुलंदी बऱ्हाणपूर ' ह्मणून यादींत ह्या शहराचा समावेश त्यानें केला आहे. ...ीं कायमचीं कलमें अंमलांत येईतोंपर्यंत कांहीं जुजवी अटी घातल्या होत्या. त्या पत्रांत ...ढे दिल्या आहेत.

त्याप्रमाणें आहेत. मोठा नक्ष झाला. श्रीमंत नानासाहेब यांचे ताले शिंकंदर आहेत. ज्याकडे वाईट नजरेनें पाहतील त्याचें चूर्ण होईल. याजप्रमाणें मोगलानें दिलें. आतां मोगलामध्यें होशा तिलतुल्य राहिला नाहीं. जहागीर कोणती घेतली त्याची याद आली नाहीं. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. नगरहून श्रीमंत नानासाहेब कूच करून गंगातीरास पैठणास फाल्गुन शुद्ध प्रतिपदेस जाणार. तिकडून श्रीमंत भाऊसाहेब येणार. गंगातीरास आलिया यांची त्यांची भेट सत्वरच होईल. भेट जाल्याउपरि श्रीमंत दादासाहेबाची रवानगी सत्वर तिकडे करणार यांत गुंता नाहीं. तूर्त फिकीर तिकडील यजमानास लागली आहे. पत्रें आलीं, वर्तमान कळल्या संतोष आहे. हबसी याजकडील उंदेरी घेतली. कासे यास आरमार लागली. तेहि सत्वर फडशांत गोष्ट आहे. मोगलाचा रेच उतरल्यानें सर्वांचा माज मोडिला यांत गुंता नाहीं. वरकड वर्तमान मागाहून सविस्तर लिहून पा॥. मिति माघ वद्य १४ शुक्रवार. हे विज्ञापना. श्रीमंतांस पत्रें देऊन उत्तर घेऊन पाठविलें आहे. र॥ शिंदे, होळकर यांस पत्रें सरकारीं घेऊन पाठविलीं आहेत. पा॥ हे विज्ञापना.

पे॥ मित्ती चैत्र वद्य १२ सं. १८१६.

---

[ १६६ ] ॥ श्री ॥ १९ फेब्रुआरी १७६०

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसी: पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर वरच्यावर लिहीत जाणें. इकडील वर्तमान तरी निजाम आलीखानानीं जागीर व दोन किल्ले देऊं केले असतां पुढें पाहूं लागले. याजकरितां आह्मी बाहेर निघालों. फौज पाठवून नगरचा किल्ला घेतला. मागाहून आह्मीं नगरास येऊन तेथें

बंदोबस्त करून दरमजल येऊन उदगिरीस मोगलास गांठले. पांच सात मजली पुढें चालिला. चंद्र १५ जमादिलाखरीं चंडोलावर हल्ला करून मारून लूटून फस्त केला. तेव्हां मोगल जेर होऊन जागीर व अशर, बऱ्हानपूर, दौलताबाद, विजापूर, मुल्हेर किल्ला याप्रमाणें तह केला. हें वर्तमान तुह्मांस कळावें यास्तव लिहिलें असे. सारांश, मोगल फार तरतुदीनें जुंझला. बहुता प्रकारें त्यास झुंझावयाची गांठ घालितां छातीचा कोट करून चंडोलावर फौजा उडवल्या. चारसा घटका[242] तीर तरवार, गोळा गोळी, बाण, हात, धोंडा याप्रमाणें मारीत मारीत खासियाचे अंबारीपर्यंत मोकळा केला. कादरखान मातबर गाड्याचा सरदार ठार झाला. शोकतजंग हत्तीसुद्धां धरून आणिला. त्यास जखम होती. तो मेला व सुरेराव[243] निरमळकर जखमी आहे. तोफा पंधरा व हत्ती आठ, अंबारी, हौदे निशाणाचे आले. सरकारचे मातबर बराणजी मोहिते व भगवंतराव शिंदे व महादजी सालोंखी व केशवराव पानशी व सखोजी घाटगे आणखी ठार झाले व जखमीहि झाले. तीर्थरूपाच्या पुण्येंकरून मोठी फत्ते झाली. या जुंजानें मोगलांत बाकी न रहातां साठ लक्षांची जागीर व सदरहूप्रमाणें स्थळें घेतलीं. याउपरि इकडील गुंता उरकला. चिरंजीव राजेश्री दादा फौजसुद्धां दरमजल त्या प्रांतीं येतील. + इकडे मुलुख स्थळें चांगलीं मिळालीं, परंतु खर्च जाहला. कर्नाटकची स्वारी न झाली. तिकडेहि अबदालीचा पेच. पैका मिळायाचें झालें नाहीं. तिकडील पेचामुळें इकडे आटोपावें लागलें. नाहीं तरी सारी

---

२४२ ह्यावरून पेशव्यांच्या व निजामाच्या सैन्यांत कोणकोणत्या हत्यारांचा उपयोग होत असे हें दिसतें. कित्येक नुसत्या हातानेंच लढत. कित्येक गोफणीनें धोंडे फेंकीत. कित्येक तिरकामठ्यानें तीर मारीत. कोणी नुसती तरवार चालवीत. कित्येक बाण फेंकीत व इब्राईमखान गार्दी व केशवराव पानशी तोफा मारीत. ह्या असल्या गौडबंगाली सैन्याला इंग्रजांचीं कवायतीं पलटणें वाऱ्यासारखीं उडवून देत ह्यांत कांहीं नवल नाहीं.

२४३ ह्या सुरेरावांनीं निजामाविरुद्ध नुकतेंच बंड केलें होतें.

दक्षिण मोकळी[२४४] होती. असो. तिकडील वर्तमान वरचेवर आठा रोजा-आंड तुह्मीं लिहीत जाणें. मामलियाचा ऐवज बाकी फार आहे. दहावीस लाख जरूर पाठवणें. चंद्र १ रजब. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ १६७ ] ॥ श्री ॥ १५ मार्च १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:-

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. तिकडे अबदालीची गडबड जाहाली यास्तव लौकर फौजा येती[२४५]. त्यास मोगलावर जरब बसून मोगलाचा

---

२४४ भाऊसाहेबाच्या मनांत श्रीरंगपट्टणाला जाऊन तें हैदरच्या हातून काढावयाचें होतें व कायमची सर्व दक्षण मोकळी करावयाची होती.

२४५ (अ) अबदालीची गडबड हिंदुस्थानांत फार झाली यास्तव लवकर फौजा पाठवून द्या अशा अर्थाचीं पत्रें पेशव्यांस आलीं व ह्मणून विजयादशमीच्या मुहूर्तें ह्मणजे १ अक्टोबर १७५९ रोजीं भाऊसाहेब डेरेदाखल झाले व रघुनाथराव घरीं राहिले असें रा. नातू " महादजीच्या चरित्रांत " ( पृष्ठ ५६ ) लिहितात. कुमक घेऊन येण्याबद्दल निकडीचीं पत्रें आल्यावरून विजयादशमीला हिंदुस्थानांत जाण्यास पेशवे डेरेदाखल झाले हें मत होण्यास रा. नातूंना कारण येणेप्रमाणें झालें. गिलचे पाठीवर असतां शिंदेहोळकरांच्या फौजांनीं शिकंदरशहरावर हल्ला १७५९ मार्चांत केला व नंतर होळकराचा पराजय होऊन सरदारांच्या फौजांनीं जयपूर व केरौलीच्या आसपास तळ १७५९ च्या जूनांत दिला; त्या तळावरून सरदारांनीं पेशव्यांस कुमके बद्दल पत्रें पाठविलीं व तीं पत्रें दसऱ्याच्या अगोदर महिना दीड महिना पोहोंचून हिंदुस्थानांत स्वारीला जाण्याचा पेशव्यांचा निश्चय झाला, असें रा. नातूंचें गणित आहे. परंतु शिकदरशहरावरती हल्ला शिंदेहोळकरांनीं १७५९ मार्चांत केला नसून १७६० च्या पहिल्या मार्चाला केला व केरौलीच्या आसपास त्यांनीं तळ दिला तो १७५९ च्या जूनांत नसून १७६० च्या एप्रिल-मेंत दिला; तेव्हां, पेशव्यांना कुमकेस येण्याविषयींचीं पत्रें उदगीरची मोहीम होत असतां गेलीं हें खालील तारखांवरून समजून येईल.

मे १७५८ त रघुनाथरावदादा लाहोरास होते ( लखांक १२४, पत्रें व यादी ३४१ ).
पुण्यास परत जातांना त्यांना जनकोजी व दत्ताजी वाटेंत भेटले. २४ डिसेंबर १७५८ त
लाहोराकडील बंदोबस्त करण्यास दत्ताजीनें अवश्य जावें, कारण तेथील सुभा अदिना-
वेग मृत्यू पावला, अशा अर्थाचें पत्र नानासाहेबांनीं धाडिलें ( पत्रें व यादी ३८८ ).
२४ फेब्रुवारी १७५९ पर्यंत दत्ताजी लाहोरास गेला नव्हता ( पत्रें व यादी ३७३ ).
२१ मार्च १७५९ त दत्ताजी लाहोरास होता व नानासाहेबांचें त्या तारखेचें पत्र त्याला
सतलज नदीवर २२ एप्रिल १७५९ त मिळालें ( पत्रे व यादी ३६२ पैवस्ती ). तेथून
परत आल्यावर सुजाअतदौल्यावर स्वारी करण्याचा दत्ताजी व जनकोजी यांनीं बेत
केला व ते शुक्रतालास वैशाख शुद्ध १० शके १६८१ त ह्मणजे ६ मे १७५९ त आले
( भाऊसाहेबाची बखर पृष्ठ ४७ ). तेथें नजीबखानानें त्यांना भाद्रपदमासपर्यंत
ह्मणजे आगस्ट–सप्टेंबरपर्यंत खेळविलें ( भाऊसाहेबाची बखर पृष्ठ ४८ ). तों इतक्यांत
दसरा ( १ अक्टोबर १७५९ ) आला ( भाऊसाहेबाची बखर पृष्ठ ४९ ). नंतर कार्तिक
शुद्ध प्रतिपदेस ( २२ आक्टोबर १७५९ ) दत्ताजी हरिद्वारास भागीरथी-
पार झाले ( भाऊसाहेबाची बखर पृष्ठ ५१ व लेखांक १४० ). १० नोव्हेंबर
१७५९ रोजीं सावाजी शिंदे दत्ताजीस सामील झाले ( लेखांक १४३ ). तेव्हां
अवदाली लाहोरास दाखल झाला होता ( कित्ता ). नंतर २४ डिसेंबर १७५९
च्या प्रातःकाळीं अवदालीशीं दत्ताजीचें झुंज झालें ( लेखांक १४७ व भाऊसाहेबाची
बखर पृष्ठ ५९ ). पुढें १० जानेवारी १७६० रोजीं जनकोजी व दत्ताजी यांचें
अवदालीशीं वडाऊच्या घाटीं दुसरें युद्ध झालें, त्यांत दत्ताजी रणांत पडले ( लेखांक
१६५ ). जनकोजी पळाले ते कोटपुतळीस आले, तेथें मल्हारराव त्यांस भेटले
( लेखांक १५३, १२ जानेवारी १७६० ). तेथून मंडळी सवळगडास आली, तेथें
भागीरथीबाईस पुत्र ३ फेब्रुवारी १७६० ह्मणजे उदगीरची लढाई ज्या दिवशीं
झाली त्या दिवशीं झाला ( लेखांक १६२ ). इकडे गिलच्यांना पाठीवर घेऊन जन-
कोजी व मल्हारराव शिमगी पौर्णिमेपर्यंत धूम रंगण घालीत होते. त्यांच्यापैकीं शे-
टियाजी खराडे व संताजी वावळे यांस पुढें दोनच्यार दिवसांनीं ह्मणजे ४ किंवा
५ मार्च १७६० च्या सुमारास अवदालीनें गाठून मारून टाकिलें ( भाऊसाहेबाची
बखर पृष्ठ ८३ व ऐतिहासिकलेखसंग्रह नंबर १७ व २० ). ह्याच सुमारास पेशव्यांचें व-
ऱ्हाणपुरास ठाणें बसलें ( लेखांक १६७ व ऐतिहासिकलेखसंग्रह नंबर १४ ). ह्या वेळीं
मल्हारराव नरवर प्रांतीं होते ( ऐतिहासिकलेखसंग्रह नंबर १७ ). पुढें ऊन सोसत
नाहीं ह्मणून अवदाली जयपूर प्रांतांतून माघारा अंतर्वेदींत गेला व मल्हारराव व
जनकोजी शिंदे तेथेंच आसपास राहिले ( ऐतिहासिकलेखसंग्रह १४, २२; एप्रिल,

त्याचा गुंता नाहीं. ब्ऱ्हाणपुरांत अम्मल जाहाला. शहर हवालीं जाहालें. एक दोन स्थळें हवालीं होणें तीं होतील. इकडील मोंगलाची गरमी

मे, १७६० ). येणेप्रमाणें १७५९ च्या मार्च महिन्यांत दत्ताजी व जनकोजी लाहोरास होते व १७५९ च्या जून महिन्यांत अंतर्वेदींत सुजाअतदौल्यासी लढाई करण्याच्या खटपटींत होते. अर्थात्, "महादजीच्या चरित्राच्या" ५४।५५ पृष्ठांवरील तारखा एका वर्षानें चुकल्या आहेत हें स्पष्ट आहे. शिकंदर शहरावर सरदारांनीं हल्ला केला तो शिमगी पौर्णिमेला ह्मणजे १ मार्च १७६० रोजीं केला व १७६० च्या एप्रिल-मेंत शिंदे, होळकर, जयपूर प्रांतीं धापा टाकीत बसले. ह्यावेळीं ह्मणजे एप्रिल-मेंत भाऊसाहेब खेचीवाड्याच्या पुढें चालून गेले होते ( ऐतिहासिकलेखसंग्रह' नंबर २२ ). तेव्हां शिंदेहोळकरांनीं केरौलीचे आसपास १७५९ जूनांत तळ दिल्यानंतर उदगीरची मोहीम झाली व तदनंतर भाऊसाहेव हिंदुस्थानच्या स्वारीस निघाले असें जें रा. नातूंनीं लिहिलें आहे तें ह्या तारखांचा बरोबर मेळ न बसल्यामुळें झालें ह्यांत शंका नाहीं. तसेंच विजयादशमीच्या वेळेसच रघुनाथरावाचा जावयाचा बेत रहित झाला असेंहि रा. नातू " महादजीच्या चरित्राच्या " ५६ व्या पृष्ठांत लिहितात, तेंहि चूक आहे. कारण उदगीरच्या मोहिमेंत दादा होते ( लेखांक १५७, १५९, १६१, १६५); इतकेंच नव्हे, तर हिंदुस्थानच्या मोहिमेसहि त्यांनाच पाठविण्याचा उदगीरची मोहीम संपेतोंपर्यंत विचार होता.

( ब ) " शिंदेहोळकरांचीं " ( १७५९ जूनचीं किंवा नंतरचीं ) " निकडीचीं पत्रें आल्यामुळें, पेशव्यांनीं हिंदुस्थानांत फौज पाठविण्याचा निश्चय केला व स्वारीस रघुनाथरावानें जाण्याचें ठरलें. " परंतु, " विजयादशमीच्या मुहूर्तें रघुनाथरावाचा जाण्याचा बेत रहित झाला. " असें रा. नातू " महादजीच्या चरित्रांत "( पृष्ठ ५५ ) ह्मणतात. ह्यांत एकंदर पांच विधानें रा. नातू ह्यांनीं केलीं आहेत. ( १ ) शिंदेहोळकरांचीं निकडीचीं पत्रें विजयादशमीच्या अगोदर आलीं. ( २ ) विजयादशमीच्या अगोदर पेशव्यांचा हिंदुस्थानांत फौज पाठविण्याचा निश्चय झाला. ( ३ ) विजयादशमीच्या अगोदर रघुनाथरावानें जावें असें ठरलें. ( ४ ) विजयादशमीच्या दिवशीं किंवा नंतर रघुनाथरावाचा बेत रहित झाला. व ( ५ ) अबदाली १७५९ मार्चच्या अगोदर हिंदुस्थानांत आला. पैकीं, मागील तारखांकडे पाहिलें असतां पांचव्या विधानांत कांहीं अर्थ नाहीं. कारण १७५९ च्या मार्च व एप्रिल महिन्यांत दत्ताजी सतलज नदीवरून लाहोरचा बंदोबस्त करीत होता; अर्थात्, अबदाली त्यावेळीं हिंदुस्थानांत नव्हता, हें स्पष्ट आहे. अबदाली नोव्हेंबर १७५९ त लाहोरास दाखल झाला ( लेखांक १४० ); तेव्हां दसऱ्याच्या ह्मणजे १ अक्टोबर १७५९

राहिली नाहींच. भागानगराकडे जातील. त्यास चिरंजीव राजश्री दादांनीं यावें, परंतु तीर्थरूपांची आज्ञा आह्मींच जावें ही जाहाली. त्यांज-

च्या अगोदर निकडीचीं पत्रें येण्याचें कांहींएक कारण नव्हतें; इतकेंच नव्हे, तर निकडीचीं पत्रें नोव्हेंबर १७५९ पर्यंत आलीं नाहींत. त्याच्यानतर मात्र निकडीचीं पत्रें येऊं लागलीं तींहि प्रथम शिंद्यांनीं पाठविलीं नव्हतीं; गोविंदपंतानें पाठविलीं होतीं. येणेंप्रमाणें पहिल्या विधानांतहि कांहीं तथ्य नाहीं. आतां दुसऱ्या विधानाकडे वळूं. विजयादशमीनंतर एका महिन्यानें अवदाली लाहोरास आला. तेव्हां विजयादशमीच्या दिवशीं व त्याच्या अगोदर एक दोन महिने पेशव्यांचीं खलवतें चाललीं असतील तेथें अवदालीवर हिंदुस्थानांत मोहीम करावयाच्यासंबधीं बोलणें वस्तुतः कांहींच निघण्याचा संभव नव्हता. कारण, त्यावेळीं शिंद्यांच्या रोहिल्यांशीं व दुरून सुजाअतदौल्याशीं झटापटी चालल्या होत्या व अवदाली येणार ह्याची वार्ताहि नव्हती. काशी, बंगाल, अयोध्या, पाटणा, इत्यादि पूर्वेकडील प्रांतांवर स्वारी करण्याचा शिंद्यांचा विचार होता व त्या कामीं मदत करण्याकरितां दादांना दसऱ्यास पाठवून देऊं ह्मणून आश्वासन होतें ( पत्रें व यादी ३७३ ). परंतु, दसऱ्याच्या सुमारास शिंद्यांवरती कोणताहि मोठा घोर प्रसंग न आल्यामुळें, बंगाल्याकडेहि त्यांच्या हातून प्रस्तुत कांहीं काम न झाल्यामुळें व रोहिल्यांशीं लहानसान झटापटी करण्यांत ते गुंतले आहेत असें समजल्यामुळें, हिंदुस्थानच्या मोहिमेचा विचार सोडून द्यावा लागला व दादांची मोहीम जेथल्या तेथेंच राहिली. जर दसऱ्याच्या अगोदर अवदालीनें शिंद्यांस पछाडलें असतें व शिंद्यांचीं पेशव्यांना मदतीकरितां येण्याचीं निकडीचीं पत्रें आलीं असतीं तर दसऱ्याला पेशवे तडक हिंदुस्थानाकडे चालून गेले असते व नगरचा किल्ला हातीं आला असतांहि निजामासारख्या लुंग्यासुंग्या शत्रूशीं सहा महिने लढत बसण्याचें व सरदारांच्या मदतीच्या आड येण्याचें साहस नानासाहेबांसारखा मुत्सदी कधींहि न करता. येणेंप्रमाणें हिंदुस्थानांत मोहीम करण्याचा ह्यावर्षीं बिलकुल विचार नव्हता. भाऊसाहेबाच्या मनांत ह्यावर्षीं निजामाला पालथा पाडण्याचे व श्रीरंगपट्टण हाताखालीं घालण्याचे बेत घोळत होते. ह्याच हेतूंच्या फलप्रीत्यर्थ राजकारण करून नगरचा किल्ला भाऊसाहेबांनीं घेतला व पुढें निजामावर चालून अर्धा अधिक रस्ता आटोपतात तों उत्तरेकडून अवदालीच्या दंग्याच्या वातम्या येऊन थडकल्या. तेव्हां हिंदुस्थानांत मदतीला जावें लागणार असें पेशव्यांना पक्कें कळून चुकलें. तावडतोब जाऊं ह्मटलें तर इकडे मसलत ही अशी अर्धामुर्धी गुंतलेली होती. ती बऱ्या बेतानें उरकून लवकर जावें ह्मटलें तरी महिना दोन महिने लागणार. तेव्हां उदगीरच्या लढाईच्या मोहिमेंतून दादा लवकरच येतात ह्मणून नाना, दादा,

वरून छ २५ [२४६] रजबीं हिंदुस्थानांत यावयास निराळे जाहालों. चिरंजीव राजश्री विश्वासराव बरोबर आहेत. त्यास, अबदालीकडील खबर वरचेवर कळली पाहिजे. तुमच्या तालुकियाचा बंदोबस्त कसा आहे तें सर्व लिहिणें. मल्हारबा, जनकोजी शिंदे यांजकडील बातमी जलदीनें येत नाहीं. तरी तेथें कोण्ही ठेऊन तिकडील बातमी जलदीनें पाठवीत जाणें. सुजाअतदौला सर्व प्रकारें स्नेह राखितात. सरदारांनीं [२४७] व चिरंजीवांनीं त्यांचे टायीं ममतेंत अंतर केलें नाहीं. या दिवसांत त्यांणीं सरदाराचे विचारें अबदालीचें पारिपत्य करावें, हेंच त्यास उचित आहे. त्यांणीं अबदालीस सामील होणें; अबदालीची नड हिंदुस्थानचे पातशाहींत रुतों देणें हें अयोग्य! याचा

---

भाऊ ह्यांनीं सरदारांना पत्रें पाठविलीं (लेखांक १५२, १५४, १५७, १५८, १५९, १६०, १६१, १६५). भाऊसाहेबाचे मनांत ह्या सवंद वर्षांत उत्तरेकडे जावयाचें नव्हतें हें लेखांक १६५ च्या शेंवटच्या कांहीं वाक्यांवरून कळून येईल. "तिकडेहि अवदालीचा पेच. तिकडील पेंचामुळें इकडे आटोपावें लागलें. कर्नाटकची स्वारी न झाली. नाहीं तरी सारी दक्षिण मोकळी होती." हे भाऊच्या डोक्यांत विचार होते. तेव्हां दसऱ्याच्या अगोदर हिंदुस्थानांत मोहिम करण्याचा विचार नव्हता हें निश्चित आहे. हिंदुस्थानांत मोहिम झाली तर दादांनीं जावें असा दसऱ्याच्या अगोदर फेब्रुवारीं १७५९ च्या सुमारासच वेत झाला होता ( पत्रें व यादी ३७३ ). तो वेत दसऱ्याच्या अगोदरहि फिरला नाहीं; कारण मोहीमच झाली नाहीं व दसऱ्याच्या नंतरहि उदगीरची लढाई संपेतोंपर्यंत फिरला नाहीं. उदगीरची लढाई होऊन आंबेपडदुरास जेव्हां स्वाऱ्या आल्या तेव्हां तो वेत फिरला. येणेंप्रमाणें ह्या पांचहि विधानांचें निरसन झालें. यःकश्चित् तारीख चुकली असतां इतिहासकार काय काय बुचकळ्यांत पडतात ह्याचा हा एक मासला आहे.

( क ) आफगाण लोक १७५९ च्या सप्टेंबरांत यमुना उतरून अनुपशहरीं आले ह्मणून कीन ह्मणतो ( Fall of the Mogul Empire p.41 ). १७५९ च्या नोव्हेंबराच्या सुमारास अबदाली लाहोरास आला ( लेखांक १४३ ) त्याअर्थी हें विधान निराधार आहे.

२४६ १४ मार्च १७६०.

२४७ १७५५ त सुजाअतदौल्यानें प्रयाग देऊन कांहीं पैसा देण्याचें दादांपाशीं कबूल केलें होतें. पुढें प्रयाग न देतां पैसा देण्यास त्यानें दोन तीन वर्षें लाविलीं.

विचार काय केला असे ? पुढें मातबर फौजेनसी मजलदरमजल खासा स्वारी जलदीनें येऊन पोहोचेल. तरी याचा विचार लिहिणें. व त्याजकडील कोण्ही इतबारी मातबर वकील हुजूर यावा हें जरूर व्हावें. लिहिल्या-अन्वयें तरतूदहि व्हावी. तुह्माकडील दोन तीन सालाचे[248] हिशेबाचे झाडे तयार असावे. व यंदा अबदालीचे गडबडीमुळें रुपया प्रथम मिळणें लांब आहे. त्यास, खर्चास रुपयाची तरतूद जाहाली पाहिजे. बाकी[249] किंवा साल मजकुरचा ऐवज, कांहीं पुढील ऐवजपैकीं याप्रमाणें, वीस लाख रुपयेपर्यंत तरतूद करून माळव्यांत पोहचतांच ऐवज कांहीं येई, कांहीं पुढें येऊन पोहोचत, हें जरूर करणें. हिंदुपत वगैरे रजवाडे आपले फौजेनसी सामील व्हावे. पारचे[250] रजपूत पूर्ते तुमचे लगाचे असतील. ते मातबर आल्यास उपयोगी असेहि यावयास सिद्ध करावें. मागून लिहिलें ज्या रोखें घेऊन यावें असें लेहून पाठवूं त्या रोखें आणावें. मुख्य गोष्ट बातमी फार जलद चांगली जलद पोंहोचाविणें. पैकियाची तरतूद जरूर करणें. + जाणिजे. अबदाली जयनगर पलीकडे आहे. तेव्हां तुमचे तालुकियांत फार पेंच नाहीं. बारीक, लबाडी कोणी करील तर तुह्मी गेलां[251] आहां, नीट कराल. अबदालीचें पारपत्य

---

नंतर १७५८ त दादांशीं काशी, अयोध्या खास यावयाचा करार केला व प्रयोगा-संबंधीं चालवाचालव केली व तिन्ही शेवटीं दिलीं नाहींत. ह्यास मुख्य कारण दादांचा नेभळा कारभार झाला. पुढें हें काम विठ्ठल शिवदेव यांजवर सोंपवून दादा देशीं आले. परंतु, विठ्ठल शिवदेवानेंहि ही मामलत बारा लाखांवर चुकविली. येणेंप्रमाणें सर-दारांचे व खुद्द दादासाहेबांचे सुजाअतदौल्यावर बरेच उपकार झाले होते ( पत्रें व यादी ३६२ व ३७३ ). तशांत गोविंदपंताचें व सुजाअतदौल्याचें विशेषच रहस्य होतें. १२ जुलै १७६० च्या पुढें सुजाशीं भाऊंचा पत्रव्यवहार सुरू झाला ह्मणून " महादजीच्या चरित्रांत " रा. नातू लिहितात. परंतु, १२ जुलैच्या बरेंच अगोदर ह्मणजे १४ मार्चच्या पुढें लवकरच पत्रव्यवहार सुरू झाला असें दिसतें.

२४८ ह्मणजे आतांपर्यंत हे झाडे तयार नव्हते असा अर्थ झाला.

२४९ गोविंदपंताकडे बाकीहि निघत होती हें स्पष्ट आहे.

२५० चमेल पारचे.

२५१ " आह्मी लवकरच तिकडे जातों " अशा अर्थाचें भाऊंस गोविंदपंतानें पत्र लिहिलें असावें व त्याचा अनुवाद भाऊंनीं ह्या पत्रांत केला आहे. हें पत्र लिहि-

येथील वर्तमान सविस्तर अंबडापुरीहून कुच जालियावर सेवेसी लिहिलें आहे. प्रणीतातीरीं सा मुकाम करून शहरास पत्रें पा। होतीं व येक ग्रहस्थहि बसालतजंग याकडे पाठविला आहे. शहरचीं उत्तरें आलीं. रा। लक्षुमणराव खंडागळे पांच सातशें स्वारानसीं त्याच मुकामीं येऊन मुलाजमत केली. दुसरे रोजीं कुच करून आठ कोस वरुड पा। मा।र येथें मु।।स आले. उतरते डेरां आपण दरबारास गेलों तों नवाब जनान्यांत होते. सैद वाजदअलीखा भेटले. यांसी मजकूर केला कीं श्रीमंताकडील फौजा शहराचेच नजीक येऊन पोहचल्या. नवाब जलदी करून शहरास जातात. यामुळें नाहक उपाधीस कारण. त्यास ह्मणों लागले कीं नवाब सलाबतजंग बसालततजंग याचा दारमदार होणार तो जाहला. शहानवाजखान याचाहि काजिया फैसल होऊन किल्यास नवाबाकडील माहासरा होता तो उठला. श्रीमंतांकडील लोकांनीं किलेयावर अनुकाहि चढविला. आतां कांहीं खलष राहिला आहे ऐसें नाहीं. आह्मी येथवर आलों. त्यास याउपर खावंदापावेतों येकवेळ खमखा जाऊन परतोन येऊन खावंदापासीं आपला आहवाल जाहीर करणें व श्रीमंताचे कृपेची वरकी करून घेणें या दो कार्यास्तव नवाब जातात. छ मजकुरीं दाभाडी परगण्यांत येथून बारा कोसांवर मु।।स जाणार. तेथून कडसांगवी; तेथून शहरास दाखल व्हावयाचा निश्चय जाहला असे. विदित होय. हे विज्ञापि.

---

[ ८९ ] ॥ श्री ॥ २७ सप्टेंबर १७५७.

पे॥ छ १२ मोहरम मंगळवार मध्यानरात्र.

उपरि निजामअली आज दोन गांवावर आले. शहरीहून आठीं कोसांवर छ १४ मोहरमीं शहरांत दाखल होणार. बसालतजंग आजच सलाबतजंगास येऊन बाहीर काळचुऱ्यावर येऊन डेरे दाखल जाहले. फौजाहि

बाहेर निघते. यांचा व निजामअल्लीचा संकेत आहे कीं तुह्मी आलेत ह्मणजे येथून कुच करावें. त्याजपाशीं अद्याप फौज मिळाली नाहीं. सावध नाहींत तां आपण जाऊन गाठ घालावी. उभयतां मिळोन फौज पंधरा हजार शिवाय गाडदी तोफखाना आहे. ऐशीयास तुह्मी बहुत सावध असणें. यांचा पक्का विचार जाला आहे. सूचनार्थ लिहिलें असे. परिच्छिन्न दग्याचा विचार आहे. कळलें पाहिजे. तुह्मांस भरोसा देत असतील त्यावर न राहाणें. सावध असणें. आह्मांस आढळांत गोष्ट आली ते लिहिली असे. आह्मी लिहिलें असें कोण्हास कळों न देणें.

---

[ ९० ] ॥ श्री ॥ २७ सप्टेंबर १७५७.

पे॥ छ १२ मोहरम, मंगळवार प्रातःकाळ, सूर्योदयसमयीं.

अर्ज विज्ञापना ऐसीजे. येथील क्षे॥ ता॥ छ ११ मोहरम सोमवार अडीच प्रहर रात्र मुकाम शहर सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. दोन आज्ञापत्रें—येक जाणारडाक, दुसरे चार शुतर स्वार—सादर जाहालीं ते आजच दिढा प्रहरा रात्रीस पावलीं. आज्ञा कीं दोनसें रोखें गेलियास निजामअ-ल्लीचा रोख सुटतो व मागें पडतें, यास्तव कसनेरच्या डोंगराकडे गेलिया उत्तम, ह्मणोन विस्तारें आज्ञा. ऐसियास कसनेरचा डोंगर उत्तम असे. दोन कुचें करून कसनेरच्या डोंगराकडे मुतवजे यावें. चारा डोंगरास फार आहे. जिरायताविशीं ताकीद जाहाली पाहिजे. उदईक छ १२ मोहरमीं मंगळवारीं हकीममहमदअल्लीखान यास घेऊन सेवेसी येतों. आज आतांच हकीममहमदअल्लीखानास नवाब बसालतजंग यापासून रुखसत करून घरास आणिलें. उदईक मंगळवारीं बारा घटकानंतर भद्रा सरल्यावर सेवक साहितखानम॥रानिले येथून स्वार होतों. आतां विलंब नाहीं. निजामअल्लीहि चालला. येतों. परंतु कांहीं चिंता नाहीं. यासी कुरान वगैरे अहद पैमान करून येतों. एक दोन दिवस राहून मागती फिरोन

जावें, ऐसा सिद्धांत होऊन पडद्दुराहून वद्य एकादशीस कूच करून मु॥

७ मार्च १७६० च्या सुमाराला तें सर्व गाडें फिरलें व भाऊसाहेबांनीं जावें असें ठरलें. कोणी जावें याचा निश्चय होण्याचे अगोदर ह्मणजे उद्‌गीरची लढाई झाल्यावर लागलेंच लहान मोठ्या सरदारांना हिंदुस्थानच्या मोहिमेस पाठविण्याचा क्रम सुरू झाला होताच. संताजी वाघ, इब्राइमखान गार्दी, दमाजी गायकवाड ( ऐतिहासिकलेखसंग्रह नं. १४ ) इत्यादि मंडळी लगेच डेरेदाखल सुद्धां झाली (लेखांक १६३). आतां खाशांपैकीं ह्मणजे दादाभाऊंपैकीं कोणीं जावें हाच सिद्धांत काय तो ठरावयाचा होता. तो सिद्धांत सात आठ दिवसांत ठरून भाऊंनीं जावें असा १३ मार्चला कायमचा निश्चय झाला व दादांनीं घरचा कारभार पहावा असें ठरलें ( ऐतिहासिकलेखसंग्रह नं. १४ ). आतां दादांना घरीं रहाण्यास व भाऊना स्वारीस जाण्यास कारणें काय झालीं? मोहिमेहून दादा कर्ज करून येत ह्मणून भाऊ त्यांना टोंचून बोलले, सबब दादांनीं मोहिमेस जाण्याचें नाकारलें, हें एक विधान आहे. त्यांत तथ्य किती आहे त पाहूं. दादा लाहोरच्या मोहिमेहून आले ते साठ लक्ष ( भाऊसाहेबाची कैफियत ), ऐंशी लक्ष ( ग्रांटडफ ), अठ्ठयायशी लक्ष ( काशीराज ), एक कोट ( नातूकृत महादजींचें चरित्र ), रुपये कर्ज करून आले, असे निरनिराळे कर्जाचे आंकडे आहेत. पैकीं ग्रांटडफने दिलेला आकडा खरा घेऊन ( त्यानें पेशव्यांचे हिशेब तपासले असें धरून ) पेशव्यांना ह्या कर्जाचें मोठें ओझें वाटलें कीं काय तें पाहूं. पेशव्यांना कर्जाचें ओझें वाटलें असतें तर दादांची हिंदुस्थानच्या मोहिमेवर पूर्वीपासून योजना त्यांनीं करून ठेविली नसती. शिवाय ऐंशी लक्षांचें कर्ज ह्मणजे त्याकाळीं मोठीशी बाब नव्हती. दादासाहेबाचा एकट्याचा वार्षिक खर्च ऐंशी लाखाचा असे ( ऐतिहासिकलेखसंग्रह नं. ५५L ). पानिपत होऊन माधवरावाच्या हातीं राज्य आलें तेव्हां दौलतीला काय तें एक दीड कोटीचें कर्ज होतें ( ऐतिहासिकलेखसंग्रह नं. ५५L ). तेव्हां पानिपताच्या अगोदर पेशव्यांना फारसें कर्ज होतें व दादासाहेबाच्या ह्या कर्जाचें त्यांना ओझें वाटलें असें दिसत नाहीं. शिवाय नुकताच ६२ लक्षांचा मुलुखहि त्यांना मिळाला होता. १७५९ फेब्रुवारीला पेशव्यांना ७० लाख रुपये कर्ज होतें व तीस लाख रुपये त्यांनीं नुकतेच फेडले होते ( पत्रें व यादी ३७३ ). दादांची लाहोरची मोहीम संपल्यावर सहा महिन्यांनीं हें ७० लाख कर्ज राहिलें असें पेशवे लिहितात. दादा कर्जे करीत असत; परंतु त्यानें ह्मणजे ते नालायक ठरले गेले होते असें बिलकूल नाहीं. तेव्हां दादासाहेबाच्या न जाण्याबद्दल हें कर्जाचें जें कारण देतात तें प्राय: लौकिक असून खरें नाहीं असें वाटतें. खरें कारण आमच्या मतें अगदींच निराळें असावें. कोटेंहि गेलें तरी दादांचा कारभार सरळ असे. ते सांबासारखे भोळे होते. त्यांना त्यांच्या वेळची मंडळी उपहासानें रांव ह्मणून ह्मणत असत. यामुळें पदरचे सरदार व बाहेरचे शत्रू त्यांच्या

मजकुरास आले. तेथून फाल्गुन वद्य त्रयोदशीस श्रीमंत राजश्री भाऊसाहेब

---

उदारपणाचा व भोळेपणाचा फायदा घेऊन दौलतीचें नुकसान करीत व ह्या गोष्टी
दादांच्या ध्यानांत वेळीं येत नसत. दादांनीं दोन स्वाऱ्या हिंदुस्थानांत केल्या, पण
मिळकत कवडीचीहि केली नाहीं. मल्हारराव होळकर, अंताजी माणकेश्वर, गोविंद-
पंत, सुजाअतदौला, नजीबखान, नारोशंकर, लक्ष्मणशंकर, दामोदर महादेव ह्या सर्व
मंडळीनें दादांना फसवून दौलतींचें नुकसान केलें होतें. तसें नुकसान ह्या मोहिमेंत
होऊं नये; मल्हारराव व गोविंदपंत ह्यांच्यासारख्या वृद्ध हितशत्रूंना खोडून काढावें;
व एकंदर मनसबा मोठ्या खोल शहाणपणानें उरकावा, एतदर्थ नानांनीं भाऊंची
योजना ह्या मोहिमेवर केली व हीं आंतील कारणें जाहीर करण्यासारखीं नसल्यामुळें,
दादांच्या कर्जबाजारीपणाचें मोठे प्रदर्शन केलें. मल्हारराव दौलतीच्या विरुद्ध काम
करीत आहे हें ते जाणून होते. ह्या शठशिरोमणीचे डावपेंच हाणून पाडण्यास
भाऊसारखाच मनुष्य, अवदालीसारखा शत्रु पुढें उभा असतां, पाठविणें जरूर होतें,
आणि ह्मणून भाऊंचीच योजना ह्या कामावर मुकरर झाली. आतां अशी शंका
निघण्याचा संभव आहे कीं अगोदर तरी दादांची नेमणूक करण्याचें काय कारण होतें?
त्यावेळीं दादांच्या आंगचा हा भोळेपणा नानांना माहीत नव्हता कीं काय? तर
ह्याला उत्तर असें आहे कीं, दादांची योजना जी प्रथम झाली होती ती दत्ताजी व
जनकोजी बंगाल्यावर मोहीम करतील व त्यांच्या मदतीला इकडून दादांना पाठवितां येईल,
ह्या अंदाजावरती झाली होती ( पत्रें व यादी ३७३ ). पुढें डिसेंबर-जानेवारींत अब-
दालीच्या हस्तें शिंद्यांच्या पराजयाचीं जेव्हां वर्तमानें आलीं तेव्हां कायमची योजना
होईतोंपर्यंत "दादा अविलंब येतील" असेंच लिहिणें भाग पडलें. नतर दक्षिणेंतील
" मोगलाचा कारभार निर्गमांत " आल्यावर उत्तरेकडील मोहिमेवर कोण
येतो तें जाहीर करणें योग्य वाटलें. येणेंप्रमाणें दादांचा भोळेपणा हा भाऊंच्या
जाण्याचें मुख्य कारण आहे. नानाभाऊंचा मत्सर, दादा व सखारामबापू यांचा स्नेह,
गोपिकाबाईचा द्वेष, इत्यादिहि दुसरीं आनुषंगिक कारणें असतील; परंतु त्यांचा
येथें विचार करण्यास अवकाश नाहीं. भर नालबंदी व एक क्रोड रुपये खजिना
बरोबर देत असल्यास दादा जाण्यास तयार होते; परंतु नानासाहेबांना ह्या अटी
पसंत पडल्या नाहींत. कारण, नानासाहेबांचे मनांत दादासाहेबांस पाठवावें असें
निखालस नव्हतें; असें भाऊसाहेबाच्या बखरीं ( पृष्ठ ८७ ) त लिहिलें आहे. पुढें
भाऊसाहेब मोहिमेला निघाले तेव्हां त्यांच्याबरोबर पन्नास हजार सैन्य होतें. त्या
सर्व सैन्याला भाऊसाहेबांनीं तमाम नालबंदी दिली व कांहीं खजिनाहि बरोबर घेतला.
( लेखांक १६९ व भाऊसाहेबांची बखर पृष्ठ ८७।९० ). तेव्हां दादासाहेबाला नालबंदी
व खजिना मिळणार नाहीं ह्मणून सांगितलें व भाऊसाहेब जाऊं लागले असतां भर

डेरादाखल झाले.या लष्कराहून पुढें दोन कोसांवरी मुकाम केला आहे. दोन चार रोज मुक्काम करून लोकांचे हिशेबकितेब आजमास मनास आणून दरमजलींनीं येऊन पोंहचतात. पावणा लाखपर्यंत फौज जमा जाहली आहे. पन्नास हजार फौजेनिशीं हिंदुस्थानांत येत आहेत. पंचवीस हजार फौज देशीं राहिली. निजामअली व बसालतजंग व सलाबतजंग ऐसे त्रिवर्ग एकत्र जाहले. कलबुर्गेयास जाणार होते. फौज दाहा पंधरा हजारपर्यंत आहे. लबाडी करावयास चुकणार नाहीं; याजकरितां श्रीमंत दादासाहेब यांजपाशीं पंचवीस हजार ठेवून गंगातीरीं ज्येष्ठमासपर्यंत दादासाहेब राहणार. श्रीमंत राजश्री नानासाहेब दरमजल पुणियास जाणार. कर्नाटकांत रा॥ विसाजी कृष्ण बिनीवाले यांजबरोबर दाहा हजार फौज व दाहा तोफा देऊन रवानगी जाहली. बंदोबस्त यथास्थित केलाच आहे. पुढें अबदालीचे पारिपत्याबद्दल श्रीमंत येत आहेत. यांची सलाबत पुण्यप्रताप भारी आहे. त्याचें पारपत्य होतें. कांहीं चिंता नाहीं. मित्ती फाल्गुन वद्य १४. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विज्ञापना.

---

[ १६१ ] ॥ श्री ॥ २० मार्च १७६०.

तीर्थस्वरूप राजश्री गोविंदपंत दादा वडिलांचे सेवेसी:—

अपत्यें बाबूराव स॥ नमस्कार विनति तागाईत चैत्र शुद्ध ३ तृतीया मु॥ सिंदखेड वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं फाल्गुन शुद्ध तृतीयेचीं

---

नालबंदी व खजिना साक्षात् काढून दिला ही अशी उघड तिरस्काराची कृती नानासाहेबासारखा पुरुष करणार नाहीं ह्याची प्रत्येक इतिहासज्ञाला खात्री आहे. दादासाहेबांनीं जावें हें नानासाहेबांच्या मनांत. अबदाली हिंदुस्थानांत अलीकड आल्यापासून व दोन मोहिमांचा अनुभव घेतल्यावर, निखालस नव्हते, हें जें बखरकार ह्मणतात तेंच खरें आहे.

२५५ फाल्गुन शुद्ध तृतीयेला ह्मणजे १९ फेब्रुवारी १७६० ला अबदाली अवसान

पत्रें पाठविलीं तीं फाल्गुन वद्य चतुर्दशीस मुक्काम मजकुरीं पावलीं. सविस्तर वर्तमान कळलें. श्रीमंतांस पत्रें होतीं तीं दिलीं. पत्रें पाहून बहुत संतोषी जाले. अबदालीची हिंमत बहुत दिसोन येत होती. परंतु त्याणें अवसान टाकिलें. हें आयकोन बहुत समाधान पावलें. देशींचें वर्तमान तरी श्रीमंत नानासाहेबांच्या व श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांच्या भेटी पडदुरचे मुक्कामीं फाल्गुन वद्य पंचमीस होऊन पांच सात मुक्काम तेथें झाले. तदोत्तर फाल्गुन वद्य एकादशीस मुक्काम मजकुरास आले. तेथून श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांची रवानगी फाल्गुन वद्य त्रयोदशीस जाली.[२५६] डेरादाखल जाले. लोकांचा

---

टाकतो असें गोविंदपंताला वाटलें. परंतु, शिमगी पौर्णिमेच्या दिवशीं, १७६० च्या मार्चच्या चवथ्या पांचव्या तारखेस शटियाजी खराडे व आनंदराव यादव ह्यांना जेव्हां त्यानें कापून काढिलें असें गोविंदपंतानें ऐकिलें असेल, तेव्हां अबदालीनें अवसान टाकिलें कीं काय तें त्याला चांगलेंच कळलें असेल!

२५६ मोडकांच्या जंत्रींत फाल्गुन वद्य त्रयोदशीला छ २६ रजब येतो. लेखांक १६७ त पंचवीस रज्जबीं हिंदुस्थानास जावयास निघालों ह्मणून भाऊसाहेब स्वतः लिहितात. बाबूराव ह्या व मागील पत्रांत फाल्गुन वद्य त्रयोदशीला ह्मणजे मोडकांच्या जंत्रीप्रमाणें २६ रज्जबाला भाऊसाहेब निघाले ह्मणून लिहितो. तेव्हां ह्या चंद्राचा व तिथीचा मेळ कसा बसणार? चंद्र २५ ला भाऊ निघाले हें खास आहे. मूळ पत्रांत पंचविसाचा आंकडा आहे ह्याची आह्मांला पूर्ण खात्री आहे. वद्य त्रयोदशीला निघाले ह्मणून बाबूराव दोनदां लिहितो. तेव्हां चंद्रांत, तिथींत, जंत्रींत किंवा दोन्ही पत्रांत कोठें तरी चूक आहे हें उघड आहे. ही चुकी शोधून काढण्यास चंद्राचा नीट तपास करूं. पंचवीस चंद्र शुक्रवारीं आहे. परंतु, मुसलमानांचे वार रात्रीं सुरूं होतात. तेव्हां पंचवीस चंद्र हिंदूंच्या गुरुवारीं संध्याकाळीं सुरूं होऊन हिंदूंच्या शुक्रवारीं संध्याकाळाला संपतो. हिंदूंच्या गुरुवारीं संध्याकाळीं एकादशी आहे व शुक्रवारीं दिवसा १२ द्वादशी आहे. एकादशीस पडदुराहून शिंदखेडाला भाऊ गेले असें बाबूराव लिहितो ( लेखांक १६८।१६९ ). त्या जाण्याच्या वेळीं पंचवीस चंद्र असल्यास भाऊसाहेब एकादशीच्या रात्रौ गेले पाहिजेत हें निर्विवाद आहे. भाऊसाहेबाच्या बखरीं ( पृष्ठ ८९ ) तहि " भाऊसाहेब शिवालिखिताच्या मुहूर्तें रात्रीं बाहेर पडले " ह्मणून लिहिलें आहे. तेव्हां भाऊंचा २५ वा चंद्र ह्मणजे बाबूरावाची एकादशी होय हें निश्चित आहे. मुहूर्तानें प्रस्थान ठेवण्याकरितां भाऊ ( हिंदूंच्या ) गुरुवारीं संध्याकाळीं पडदुराहून शिंद-

दीलदिलासा करून तमाम नालबंदी दिली. पन्नास हजार फौज समागमें येत आहे. देशी श्रीमंत राजश्री दादासाहेब पंचवीस हजार फौजेनिशी राहिले. गंगथडी बालाघाट इतक्यांत राहणार. सलाबतजंग व निजामअली एकत्र होते. बसालतजंग अदवानीकडे होता. तोहि येऊन त्यास भेटला. तिघे एकत्र आहेत. कलबुरगेयास जाणार होते. फौज त्यांची आहे ती आहे. लबाडी करावयास चुकणार नाहींत. याजकरितां देशीं नेहमीं पंचवीस हजार फौज ठेविली. कर्नाटकांत विसाजी कृष्ण याजबराबर दाहा हजार फौज देऊन रवाना केलें. येणेंप्रमाणें बंदोबस्त ठीक केला आहे. श्रीमंत भाऊसाहेबासमागमें मुत्सदी राजश्री बळवंतराव गणपत व नाना पुरंदरे व महीपतराव चिटणीस ऐसे येत आहेत. थोरले श्रीमंतापाशीं राजश्री सखारामपंत व कृष्णराव पारसनीस ऐसे राहिले. वडिलांस कळावें. मित्ती. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विज्ञापना.

पै॥ मिती वैशाख शु॥ ४

---

[ १७० ] ॥ श्री ॥ २९ मार्च १७६०.

अखंडित लक्ष्मी अलंकृत जनार्दन आपाजी गोसावी यांसिः-

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ इहिदेसीतैनमयावअलफ.[२५८]

---

खेडास आले. तेथें शुक्रवारीं राहिले व शनवारीं कुच करून गेले. तेव्हां चंद्र, तीथ, व जंत्री हीं तिन्ही बराबर असून मूळ पत्रांतच थोडीशी संदिग्धता आहे. एकादशीस शिंदखेडास आले व त्रयोदशीस रवानगी झाली असें लिहिल्यामुळें रवानगीचा दिवस तोच मुहूर्तानें निघण्याचा दिवस असा वाचकाचा तर्क होतो.

२५७ ग्रांटडफ २०००० घोडेस्वार व १०००० पायदळ निघतांना भाऊबराबर होते ह्मणून ह्मणतो. एतिहासिक लेखसंग्रह नं. १४४ त २५००० फौज भाऊबराबर गेली ह्मणून लिहिलें आहे.

२५८ सितैन मया व अलफ असें पाहिजे. सरकारीपत्रांत साल चुकावें हें आश्चर्य आहे. गोविंदपंतांनीं अजूनहि हिशेब दिले नव्हते.

तुमचें हुजूर प्रयोजन आहे. तरी पत्रदर्शनीं हुजूर येणें. हिशेबकितेबाचा गुंता आहे ऐसा पर्याय लावून राहाल तर गोष्ट कार्याची नाहीं. हिशेबकितेब तुम्हीं तयार केले असिले, जलद येत असिले, तर बरोबर घेऊन येणें. विलंब आसिला तर तुह्मींच येणें. जाणिजे. छ ११ साबान. आज्ञाप्रमाण.

---

[१७१]

॥ श्री ॥ २ एप्रील १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्य राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:— पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मांकडून पत्रें येऊन वर्तमान कळलें नाहीं तरी सविस्तर लिहिणें. खासा स्वारी मजलदरमजल त्या प्रांतें येत आहे. येका दो रोजीं बऱ्हाणपुरास दाखल होईल. तेथून पुढें दरकुच येणार. तुह्मांकडे बाकीचा ऐवज फार येणें तो पुढील रसदेचा मिळोन पंचवीस लाखाची तरतूद करून ठेवणें ह्मणोन पेशजी लिहिलें आहे व हल्लीं हें पत्र लिहिलें असे. तरी पंचवीस लाखांची तरतूद सत्वर करून ठेवणें व पांच साहा लाख पुढें आह्मांकडे लौकर रवाना करणें. येविसी विलंब न लावणें. वरकड आपल्या ठाण्याठुण्यांचा बंदोबस्त कसकसा आहे ? तिकडील मंडळीला इकडील लक्षानें कोण आहेत ? कोणाचें राजकारण कसें आहे ? किंवा सारेच तिकडे आहेत ? हें वर्तमान तपशिलवार लिहिणें. तुह्मींहि युक्तिप्रयुक्तीनें राजकारण राखून जे इकडे नसतील ते हाताखालीं घालणें. जलद

---

२५९ ह्मणजे ४ एप्रिल १७६० ला बऱ्हाणपुराला भाऊ पोंहचणार असें होतें. आंबेपडदुराहून भाऊ फाल्गुन वद्य १३ ला ह्मणजे १५ मार्च १७६० ला निघाले. तेथून निघून चार दिवस त्यांनीं दोन कोसांवर मुक्काम केला. व तेथून निघून ४ एप्रिलला बऱ्हाणपुरास पोहचणार होते. ह्मणजे आंबेपडदुराहून बऱ्हाणपुरास आठव्या दिवशीं न पोहोंचतां ( नानूकृत महादजीचें चरित्र पृष्ठ ५८ ) वीस दिवसांनीं पोहोंचले.

जोडी बराबर सविस्तर लिहीत जाणें. + हिंदुपत वगैरे बुंदेले यांणीं दारूगोळी वगैरे सरंजामानसी व फौजसुद्धां हुजूर चाकरीस यावेंच हेंहि करणें. जाणिजे. छ १५ शाबान, सु॥ सितैन मया व अलफ. तुह्मांकडील बातमी वरचेवर यावी ती येत नाहीं. तर जरूर डाक बसवून वर्तमान पाठवीत जाणें. जाणिजे. छ म॥ आह्मी दरमजल [२६०] मधील वाटेनें येतों. आठा रोजा नर्मदापार होऊं. सुजादौला, पादशाहाजादा, बंगालवाले, सर्व आपलियास अनकूळ होतेसें राजकारण करणें. खबर त्याची व सरदार व अबदाली डाक बसवून आठा रोजा आड पत्र येईसें करणें. ऐवज बाकी फार तुह्मांकडे आहे. जरूर वीस पंचवीस पाठवून देणें. छ १५ साबान. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

पे॥ छ १७ रमजान.

---

[ १७२ ] ॥ श्री ॥ ११ एप्रिल १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः-

पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. माघ वद्य पंचमीचें तुह्मीं पत्र पाठविलें तें चैत्र वद्य दशमीस दोन महिने पांच रोजांनीं प्रविष्ट जालें. लिहिलें वर्तमान साद्यंत अवगत जालें. याउपरिहि तिकडील वर्तमान सविस्तर वरचेवरी लिहीत जाणें. चिरंजीव राजश्री भाऊ व राव तिकडे गेले. त्यांजकडे तुह्मीं येऊन सर्व निवेदन करणें. इकडेहि वर्तमान लिहीत जाणें. जाणिजे. छ २४ साबान, सु॥ सीतैन मय्या व अलफ

पे॥ आषाढ वद्य ४.

---

२६० ही वाट कोणती त्याचें विवरण मागें केलें आहे.

[ १७३ ] ॥ श्री ॥ २८ एप्रिल १७६०

पु॥ राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:-

विनंति उपरि. सुजाअतदौला मातबर फौज आलियावरी खामखा इकडे येईल; अबदालीकडे जात नाहीं; म्हणोन विस्तार लिहिला तो कळला. एशियास सुजातदौला याचा व मल्हारबाचा पहिल्यापासून स्नेह आहे. त्यास येथंहि त्यांणीं स्नेहच जोडला आहे. पुढंहि त्यास हेंच पाहिजे कीं चकत्याची[२६१] पातशाही व हे सर्व अमीर आह्मीं एक होऊन अबदालीस काढून द्यावें. त्यांणीं त्यास साफ जाब द्यावा. आह्मीं यांणीं एक होऊन ज्या गोष्टीनें त्याजवर वजन पडून त्याचें पुर्ते पारपत्य घडें तें करावें. हें तुह्मीं शहाणिया माणसाबरोबर सांगून पाठवून त्यास सर्व प्रकारें इतबार येई तें करून त्याचा दुसरा विचार न राहतां एक पक्षीं होऊन येत तें करणें. सुजाअतदौलाचें राजकरण एक पक्षीं ठीक करून दाखविणें. हे गोष्ट या समयीं फार उपयोगी आहे. तुह्मी शहाणे, सर्व प्रकारें. त्यांशीं राजकारण राखून आहां. त्याचा हाच प्रकार जलदीनें होऊन यावा हेंच चांगलें. तर सविस्तर करणें व लिहिणें. अलीगोहर याजकडीलहि प्रकार लिहिला तो कळला. त्यास याउपरि त्याचीं पत्रें वर्तमान येईल तें लिहीणें. त्यांणींहि यावें. सुजाअतदौला ते तिकडून आह्मी इकडून सार जमा होऊन एक होऊन यतां असें जाहलियावर मग अबदालीनें काय करावयाचें आहे? सर्व चित्तानरूप घडेल. या समयीं सुजाअतदौला यांणीं स्नेहाची वृद्धि करावी हेंच बरें आहे.

---

२६१ बाबरानें स्थापन केलेल्या पातशाहीस चकत्याची पातशाही म्हणण्याची गेल्या शतकांत चाल असे. मोगल लोकांत चकते म्हणून एक कूळ असे त्या कुळांत बाबराचा जन्म झाला. हिंदुस्थानांत आल्यावर बाबरानें तें आपलें आडनांव केलें. जसा अहमदशहा दुराणी, तसा बाबरशहा चकते. चकते हा शब्द भाऊसाहेबाच्या बखरीच्या ९४ पृष्ठावर आलेला आहे. ह्या शब्दाची मांडणी इंग्रजींत Chaghtai अशी करतात. पितृपक्षाकडून बाबराचा संबंध तैमुरलंगाशीं पोहोंचे, म्हणून बाबरानें स्थापिलेल्या पातशाहीला तैमुरियाची पातशाही हीहि संज्ञा दिली जात असे. बाबराच्या मातृपक्षाचें आडनांव मोगल होतें, म्हणून बाबराला व त्याच्या वंशजांना मोगल म्हणतात.

आह्मांस तर चकतेयाची पातशाही राखणें. यासाठीं अबदालीशीं सलुख करणें नाहीं. आह्मी सरदार एक जाहालियावरी सर्व गोष्टी उत्तमच घडून येतील. या ऐशास यांणींहि सामील होऊन चित्तापासून सोबती व्हावें. ह्मणजे आह्मांस पुर्ता याचा भरंवसा जाहला. मागें बोलत होते तें निदर्शनास आलें. न केलिया आमचा शब्द मात्र राहील आणि आह्मी तो श्रीकृपेनें थोडक्याच दिवसांत पोहचून शत्रूचें निराकरण करितों. सर्व हे प्रकार त्यांसी समजसपणें बोलोन त्याचा निश्चय करून लेहून पाठविणें. जाणिजे. + मागें सरदारांनीं त्याची स्थापनाच पठाणाचे वेळेस §केली. आतां हिय्या वाढवून नेहमीं आमचे होऊन सोबती लढाईस होतील तर पातशाहातचे बंदोबस्ताचें काम त्याचे हातें घेऊं. दोहीं डगरींवर असल्या आपले घरींच कामाचे. सत्वर बोलून उत्तर भावगर्भ लिहिणें. रा॥ छ ११ रमजान. हे विनंति.

---

[ १७४ ] ॥ श्री ॥ २८ एप्रिल १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. अबदालीमुळें मुलकांत दंगा फार. फौज मातबर आली ह्मणजे दबावानें जाईल; अथवा राहीला तर मातबर झुंज होईल. पन्नास हजार फौजेनिंसी जलदीनें मदत जाहाली पाहिजे. ह्मणजे इकडीलहि बंदोबस्त राहील ह्मणोन पत्र लिहिलें तें कळलें. ऐशियास, अबदाली हावभरी जाहाले आहेत. यामुळें फौजानें आव टाकला. त्यास, सांप्रत आह्मी सीहोरास[२६२] आलों. मातबर

§ वजीर मोडला, पळाला असतां फिरोन फत्तेच्या मसनदींवर बसविला (पत्रें व यादी १६२).

२६२ ह्मणजे आंबेपडदुराहून निघाल्यापासून, फार झालें तर, चवेताळिसाव्या दिवशीं भाऊ सीहोरास पोहोंचले. बारा किंवा तेरा एप्रिलच्या सुमाराला नर्मदेवर

फाज व गोर्डदी[२६३] व तोफखाना बरोबर आहे. इकडील बुंधेले व संस्थानिक सर्व बरोबर जमा करून नरवरच्या सुमारें येतों. पुढें जिकडे सोई दिसेल तिकडे जाऊं. माधोसिंग व बीजेशिंग व कोटेवाले राणाजी यांस सर्वांस पत्रें, वकील, पाठविले आहेत. सर्व इकडील तिकडील दोहीं राजकारणांवर आहेत. परंतु आमचे येण्यामुळें एक पक्ष धरून सर्व जमा होतील. याच प्रकारें त्यांसहि लिहिलें असे. हे सर्व एक होऊन मल्हारबा, जाट यांसहित अबदालीचें पारपत्य करावें हाच विचार आहे. त्यास, तुह्मीं तिकडील बंदोबस्त उत्तम प्रकारें राखून तुह्मीं हुजूर यावें. हिंदुपत, खेतासिंग, व तिकडील धुमे चांगले माणूस सर्वहि जे उपयोगी ते जमा करून आणावें. त्यास, तुह्मांस तिकडील दत्तियाचे पेंचामुळें इकडे यावयास फौवेलेना[२६४], तर तिकडील बंदोबस्त उत्तम प्रकारें राखणें. आण तुह्मीं आपले तरफेनें शहाणा कारकून मातबर हिंदुपतीकडे पाठवून, त्यास फौजसुद्धां सत्वर हुजूर लावून देणें. वरचेवरी तिकडील वर्तमान लिहीत जाणें. जाणिजे. रवाना छ ११ रमजान. हे विनंति.

---

हांडिया मुक्कामीं पोहोंचले ( लेखांक ६९ ). उज्जनीला जाऊन भाऊनीं सैन्याची गणती केली ह्मणून रा. नातू लिहितात. परंतु मधल्या रस्त्यानें हांडियावरून सीहोरास गेल्यावर उत्तरेचा रस्ता टाकून पश्चिमेकडे उज्जनीस जाण्याचें कांहीं प्रयोजन नव्हतें. भाऊंच्या मनांत उज्जनीला जावयाचें असतें तर ते खांडव्यावरून व मोरटक्यावरून इंदुराला येऊन मग उज्जनीला जाते. परंतु रजपुतान्यांतील पश्चिमेकडील रस्त्यानें जाण्याचा त्यांचा बेत नव्हता; मधल्या रस्त्यानें जाण्याचा बेत होता.

२६३ गार्डदी व तोफखाना यांचें महत्व भाऊच्या डोक्यांत पूर्णपणें बिंबलें होतें. इंग्रज व फ्रेंच लोकांना वीस पंचवीस वर्षें झुंजतांना पाहून कवायती पलटणीचें महत्व भाऊसाहेबाला पूर्ण कळून चुकलें होतें. भाऊनीं प्रथम मुजफरखानाला चाकरीस ठेविलें तें मुसावुसीला १७५१ त कुकडी नदीवर लढतांना पाहून ठेविलें.

२६४ अखेरीस शेवटपर्यंत गोविंदपंत भाऊसाहेबाच्या सैन्याला येऊन मिळाला नाहीं हें पुढें दिसून येईल. सध्यां दतियाचा पेंच मध्यें आला ! पुढें आणीकहि किती एक पेच मध्यें आले !

[ १७५ ] ॥ श्री ॥ २८ एप्रिल १७६०.

राजश्रि बाळाजी गोविंद गोसावी यांसि:

अखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्य स्नेहांकित मल्हारजी होळकर दंडवत. विनंति उपरि तुह्मीं राजश्री मकाजी मिते व गंगाधर विश्वनाथ याजबराबर तोफा सुमारें ५ पांच व बैल सर ५९० पांचशें नव्वद पाठविले ते सरकारांत पावले असत. सु॥ इहिदे सितेन, मय्या[२६५] व अल्लफ. रवाना छ ११ रमजान. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ १७६ ] ॥ श्री ॥ २८ एप्रिल १७६०.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यासि:

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. लढाईचा मोकदमा[२६६] आहे. याकरितां

---

२६५ अजून इहिदेसितैन लागावयास अवकाश होता. लेखांक १७० तहि असेंच इहिदे सितेन ह्मणून ह्मटलें आहे, इहिदे सितैन मय्या व अल्लफ हा आर्वी सन आहे, दुसरा कोणताहि सन नाहीं. हा इहिदे सितैन चार जूनला सुरू होणार होता. तेव्हां २९ मार्चला व २८ एप्रिलला 'इहिदे सितैन' ह्मणून ह्मणण्याचें कारण नव्हतें; नुसतें सितैन ह्मणावयाचें. तेव्हां आर्वी, फसली व हिजरी ह्याखेरीज चवथा आणीक एक सन होता कीं काय ? किंवा आर्वी सन मृगापासून न मोजतां चैत्रापासून मोजावयाचा असा नानासाहेबांनीं व मल्हाररावांनीं विचार केला होता कीं काय ? लेखांक १६४ हें बाळाजी बाजीरावाचें पत्र आहे. तें १४ फेब्रुवारी १७६० त ह्मणजे माघ अखेर लिहिलेलें आहे. ह्या पत्रांत सितैन मय्या व अल्लफ ह्मणून स्पष्ट सन दिला आहे व सितैन मय्या व अल्लफ आर्वी सन आहे हें उघड आहे. त्याच्या पुढलें पत्र, आह्मांला उपलब्ध असलेलें असें २९ मार्चचें आहे. तें चैत्रांत लिहिलें आहे व त्यांत इहिदे सितैन ह्मणून साल घातलें आहे. तेव्हां आर्वी सन मृगाला आडनीड सुरू होत असे तो चैत्राला सुरू करून शालिवाहन शकाशीं जुळता करून घ्यावयाचा असा पेशव्यांचा व होळकरांचा विचार होता असें दिसतें.

२६६ आहिरवाड्यांतील आहिरांनीं दंगा केला होता. त्यांना मोडून काढण्याकरितां

सरकारांत प्याद्याचें प्रयोजन आहे. तरी तुह्मीं चांगला प्यादा मर्द माणूस याप्रे॥ ३००० तीन हजार सत्वर हुजूर पाठविणें. एक महिना प्याद्यास तेथें खर्चावयास देऊन रवाना करणें. बराबर कारकून देणें. येथें आलियावरी माणुस पाहून करार केले जातील. तरी प्यादे दिरंग न लावितां पाठवून देणें. माणुस केवळ कमाविसदारी तहसीलच्या कामाचें असें न ठेवणें. चांगलें मर्द झुंजाचे उपयोगी पडे याप्रे॥ तलाश करून ठेवून पाठविणें. + जाणिजे. छ ११ रमजान, सु॥ सितैन मय्या व अल्लफ. बहुत काय लिहिणें. वहिली व सागरपैकीं हजार पाठवणें, ऐसीं पत्रें येथून पाठविलीं आहेत. तोफखानासुद्धां भारी जमावानें लढाई करावी लागते. बाहेरील कुमकेयाचा भरंवसाच आहे. सुजा-दौला, फरुकाबादवाले अनुकूल होत असें राजकारणहि करणें. हिंदूपत वगैरे बुंधेले जलद येत व चांगले प्यादे सागर, राहिली वगैरे तुमचे आढळाचे, अंतरवेदींतील चव्हाण, आडारु वगैरे चांगले लोक प्यादे दोन तीन हजार पाऊण महिना पंधरा रोजांत येऊन पावतेसें करणें. तिकडे शह असल्यास तुह्मांस राहावें लागेल. शहाणें आहां. कांहीं फौज व नवे प्यादे ठेवून सत्वर पाठवणें. ऐवजाविसीं प्रकार पेशजी लिहिला, तों अलीकडे तुमचीं पत्रें येतात त्यांत खराबीच लिहिली येती. असो. गारा वगैरे सर्व आफत असली तरी दाहा वीस लाखांची तरतूद जरूर कर्ज अगर मामलतचे ऐवजीं मिळोन सत्वर करणें. गैरहंगाम येणें. शत्रू प्रबल, बाहेरील ऐवज तूर्त कोठें आहे ? यास्तव जरूर तरतूद करणें. तपशील लेहून न पाठवणें. कामाचे प्रसंगीं जो तरतूद करील ते कामावर पडेल. हे विनंति. पे॥ छ ९ सवाल.

---

चांगले लढाऊ लोक पाहिजे होते. ह्याचा किंचित् उल्लेख ऐतिहासिकलेखसंग्रहांतील नंबर २५ च्या सारांशांत केल्यासारखा दिसतो. हा सारांश ज्या तीन फुटकळ चंदावरून रा. खरे यांनीं काढिला आहे ते सबंद छापिले असते तर कदाचित् बरें होतें.

[ १७७ ] ॥ श्री ॥ २९ एप्रिल १७६०

पुरवणी राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः—

विनंति उपरि सरकारांत गुलाबाचें प्रयोजन आहे. तरी भागिरथीच्या पाण्याचा गुलाब चांगला एक मण, वरकड गुलाब चार मण, एकूण पांच मण गुलाब चांगला बहुत बेश पाठवून देणें. +रवाना छ १२ रमजान. हे विनंति. शंभर जेजाले व दोनतीनशें बंदुका खरेदी करोन सत्वर पाठवणें. हे विनंति.

---

[ १७८ ] ॥ श्री ॥ २ मे १७६०.

पु॥ राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः—

विनंति उपरि तुम्हीं अबदालीच्या लष्करांतून बातमी[२६७] यावयाची तजवीज केली. तें फार उत्तम केलें. या उपरि तिकडील बातमी रोजचेरोज कच्ची लिहून यावी. त्यास येथें आलियावरी पैका काय मिळाला ? व बराबर खर्च त्याचा किती आहे ? खासा फौज त्याचे देशची किती ? कोण कोण सरदार ? किती जुमलेदार ? नजीबखान व रोहिले वरकड किती ? पायाचे माणूस किती ? तोफा किती ? कशा आहेत ? सेर जाहले, बुणगे लाविले, ते कोठें गेले ? याची काय तजवीज आहे ? मुलकांत अम्मल कोणत्या जागा कसा आहे ? हें कुल वर्तमान बारीक बारीक कळावें असें जरूर करणें. सेट्याजी खराडे याचे पुत्र व आनंदरावराम याची खबर आहे कीं जिवंत सांपडले आहेत. त्यास तुम्हीं त्याचा शोध तेथें करवून हे कोठें आहेत ? कसे आहेत ? तेंहि बातमी कळे असें करणें. जाणिजे. छ १५ रजान. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

२६७ गणेश पंडित ह्मणून कोणी अबदालीचे सैन्यांत पेशव्यांचा बातमीदार राजरोस रहात असे, असें काशीराज लिहितो.

[ १७९ ] ॥ श्री ॥ २ मे १७६०.

पु॥ राजश्रि गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यासि:—

विनंति उपरि. सुजाअतदौला राजकारणें चहूंकडून सोडून एक पक्षी होतात याप्रे॥ आढळलें आणि इकडून त्याची निशा पडली पाहिजे, यासाठीं तुमचेंहि जाणें जाहालियास जावें. त्याची निशा करावी. आणि त्यास भरंवसा पुरवून आपलें करावें. तुमचे जाणियास सोई नाहीं व इतबार न पुरें; तुह्मी सर्व त्या प्रांतीचे अकारीम, जावें न जावें; असें असल्यास कोण्ही शाहाणा इतबारी पाठवणें. लिहिल्याप्रे॥ सर्व करणें. जाणिजे. + मुख्य गोष्टी अबदालीकडे साफ जाहिराना व अंतस्थें कळवावें कीं आह्मी हे एक जाहालों. व पुढें त्यांसाहि पत्रें जाबसाल आमचे जाबसालाप्रे॥ जात जावे कीं हे तेमूरियाची पातशाही; याचा बंदोबस्त कळेल तसा आह्मी राजश्रीपंतप्रधान याचे इतफाकानें करूं; तुह्मीं या गोष्टींत न पडावें आणि रोहिल्यामुळें हावभरी न होणें; पुढें भारी पडेल याचा पूर्ता विचार करणें. आह्मांस तरी तुमचें मसलतींत मिळणें नाहीं: या भावें त्यास कळवावें. आणि आपले फौजसुद्धां येऊन पोहचून शत्रूचें निराकरण होऊन येई तें करावें. बांदेजफते दिल्लींतील पातशाहीचा बंदोबस्त त्याचे आमचे विचारें होऊन येईल तोच केला जाईल. जाणिजे. छ १५ रमजान. हे विनंति.

[ १८० ] ॥ श्री ॥ ता॥ ६ में १७६०.

राजश्रिया।विरा।जितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि: पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार. विनंति उपरि येथील जाणोन स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. सुज्याअतदौला यास येथून पत्र लिहिलें असे. व

मलकाजमानी तेथें गेली आहे ह्मणोन वर्तमान आहे तिजला पत्र लिहिलें असे. त्यास दोन्हीं पत्रें तेथें पाठवावीं. सुजादौलाचें सुजादौलास द्यावें. मलकाजमानी तेथें असेल तरी द्यावें, नाहीं तर न द्यावें. त्यास, सुजाअतदौला यास मुख्यत्वें हेंच लिहीलें असे, कीं तुम्हीं अबदालीस साफ ल्याहावें आणि आम्हांकडे यावयाची तयारी करून यावें. पुढें एक होऊन अबदालीचें पारिपत्य करून पातशाहीचा बंदोबस्त तुमचे आमचे विचारेंच होऊन येईल. त्यास, पहिले वजीराचा प्रकार तुम्हीं बोलत होतां. त्याविशीं सरदारानेंहि त्यास उमेदवार करून वकील पाठविला असे. तुम्हीं त्याचे अन्वयें त्याशीं बोलावें. आणि सर्व प्रकारें त्याची निशा स्नेहाविशीं करून दृढीकरण करावें. अबदालीस तिकडून साफ केलें. सुजाउद्दवलाचा भरंवसा तुटून ते निराश होत इकडे येतात हें केलें तें करावें. या समयीं तुमची कारीगारी काम करून दाखवावयाची हेंच आहे. मलकाजमानी तेथें असेल तरी तीस हें पत्र देऊन तिचाहिं भावगर्भ कळावा. अबदालीकडून राजकारणाची निराशा होऊन तीहि लगामी लागेली[२६९] तरी लावावी. परभारेंच या अन्वयें पत्रें सुजाअतदौलास गेलीं असेत. + आह्मीं सुरोंजेस आलों. अहिरांनीं फार लबाडी केली. यास्तव कांहीं फौज पाठविली. खेचीकडे बाकीचे कांहीं उगवून दरमजल नरवरावरून पुढें जातों. वरचेवर सरदारांचें[२७०] लिहिलें येईल

२६९ मलकाजमानीनें आपली मुलगी अबदालीचा पुत्र तैमूरशहा यास नजीबखानाचे सांगण्यावरून १७५७ च्या मोहिमेंत दिली होती असें बखरकार लिहितो. तें खरें असतें तर मलकाजमानी सुजाउद्दवल्याकडे पळून न येतां आपल्या व्याह्याकडे निर्भयपणें गेली असती. दिल्लीची पातशाही तैमूरशाहास देण्याचाहि नजीबखानाशीं तिनें करार केला होता ह्मणून भाऊसाहेबाच्या बखरींत ह्मटलें आहे ( पृष्ठ २७ ). परंतु, तैमूरशहास पातशाही दिल्यावर जिच्या संरक्षणार्थ तिनें इतका खटाटोप केला ह्मणून बखरनवीस ह्मणतो ती बाबर चकत्याची पातशाही कायम कशी रहाती ? हा विरोध इतका कांहीं स्पष्ट आहे कीं भाऊसाहेबाच्या बखरींतील २२ पासून २८ पृष्ठांपर्यंतच्या मजकुरावरती फारच संभाळून विश्वास ठेवणें जरूर आहे.

२७० भाऊसाहेबाना सरदारांनींच मदतीकरितां मुद्दाम बोलाविलें होतें. भाऊ रस्त्यावर असतां कोणत्या मार्गानें यावें, कोणत्या न यावें ह्यासंबंधीं पत्रव्यवहार भाऊंचा व सर

तसे सारे येक जागा होऊं. माधवसिंग दोहींकडे. राजकारण तिकडेच फार. आह्मांकडे येऊं ह्मणतात. बोलावूं गेले. वरकडासाहि पत्रें गेलीं. येतील ते जमा करीतच आहों. सुजादौलाचें काम ठीक करणें. वरचेवर बातमी चहूंकडील वर्तमान व अबदालीकडे बातमी ठेविली तेथील वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. बाहेरील ऐवज तूर्त मिळणें नाहीं. खर्च भारी. लढाईचा प्रसंग! पेशजी लिहिलेप्रमाणें दाहापासून वीस लाखपर्यंत तरतूद जरूर करणें. रवानगीचे हेच दिवस. लवकर तरतूद होऊन महिन्यांत ऐवज येईसा करणें. त्याकडील ल्याहावयाचा प्रसंग नाहीं. बुंदेले वगैरे तुमचे तालुक्याचे रजवाडे व प्यादे दोन तीन हजार नवे चांगले ठेवून पाठवणें. दारू व शिसें पंचवीस चाळीस खंडी जमा होईसें करणें. र॥ छ १९ रमजान. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

प॥ मित्ती ज्येष्ठ शुद्ध २ भृगुवार. मु॥ इनपामऊ नजीक शादार ?

---

[ १८१ ] ॥ श्री ॥ ७ मे १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद स्वामी गोसावी यांसि:

पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल

---

दारांचा होत असे. भाऊ येत आहेत हें त्यांना दोन तीन महिने माहीत होतें. असें असून पुढें आग्र्यास भाऊ पोहोंचले तेव्हां आपण खासा काय कारणास्तव आला ह्मणून मल्हारराव भरसभेंत गर्जों लागले ह्मणून भाऊसाहेबाची बखर लिहिणारा ह्मणतो तें बरेंच अविश्वसनीय आहे असें वाटतें. जर किरकोळ सरदारांनीं काम भागण्यासारखें असतें तर भाऊ स्वत: खाचित जातेना. अबदालीच्या हातून हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व सरदारांनीं एकेकदां थप्पड खालली होती. तेव्हां भाऊंचीच वाट शिंदेहोळकर पहात होते. अर्थात् होळकरांना भाऊंस कडक बोलण्याचें कांहींएक कारण नव्हतें. एकंदरींत बखरींत वर्णिलेला हाहि प्रसंग अवास्तव आहे अशी जबर शंका येते.

जाणोन स्वकीय लिहीत जाणें. विशेष. राजश्री *पाराशर दादाजी यांच्या फौजेनें शिकस्त खादली, लुटली, नागवली, सिलेदार उठउठोन जातात, ह्मणोन राजश्री रखमाजी दादाजी यांणीं विनंति केली. त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी मशारनिल्हेस हुजूर पाठवून देणें. जाणिजे. छ २० माहे रमजान, सु॥ इहिदेसितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

८ मे १७६०.

[ १८२ ] ॥ श्री ॥

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि: पे॥ बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. सांप्रत तुह्मांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तुह्मीं कोठें आहां ? अंतरवेदीच्या अमलाचें वर्तमान काय ? सरदार कोण जागा आहेत ? रोहिले अबदाली कोणे ठिकाणीं आहेत ? त्याजकडील वर्तमान येतच असेल तर सविस्तर लिहीत जाणें. +तुह्मीं पत्रदर्शनीं चिरंजीवाजवळ येऊन सर्व हिशेब कच्चें यथार्थ समजावून कृपा संपादणें. कच्चें वर्तमान जलद सविस्तर लिहीत जाणें. छ २१ रमजान. बहुत काय लिहिणें

---

११ मे १७६०.

[ १८३ ] ॥ श्री ॥

राजश्री बाळाजी गोविंद गोसावी यांसि:—

अखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्य स्ने॥ मल्हारजी होळकर व जनकोजी

---

* हे दादोपंत वाघ ( धाकटे रामराजे यांचें चरित्र पृष्ठ १७ ) यांचे पुत्र असावे. ७७१ टीप २६५ पहा.

शिंदे दंडवत विनंति उपरि. अंतर्वेदींत ........................ ................ यासी आज्ञा केली. त्यास तुह्मांपाशीं श्रीमंताकडून हुजूरातचीं पथकें फौज होती ते उठोन गेली ह्मणोन तुमचें पत्र आलें. त्यावरून हल्लीं तुह्मांस लिहिलें असे. तर रांगडे, स्वार, प्यादे, नवी शिबंदी, अगत्यागत्य प्रसंगानुरूप लागेल तशी गुजरशीनें ठवून अंमल कायम करून, सरकार काम करणें. खर्च शिबंदीचा लागेल तो मनास आणून मजूरा दिल्हा जाईल. सु॥ इहिदे सितैन मय्यां अल्लफ. जाणिजे. छ २४ रमजान. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

श्री ह्माळकांत चरणीं तत्पर.
खंडोजी सुत मल्हारजी होळकर.
बार

---

[ १८४ ]

॥ श्री ॥ ११ मे १७६०.

राजश्री बाळाजी गोविंद गोसावी यांसि:—
अखंडितलक्ष्मीआलंकृतराजमान्य
से॥ मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे दंडवत विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणें.

विशेष. बुंदेलखंडा बकशी व सुमेरसाचा पुत्र रतनसा यांणीं दंगा[२७२] केला. त्यांस आपले मायेंत घेणें. प्रसंगानुरूप कांहीं अगत्याअगत्य खर्चवेच लागला तर समयावर दृष्टी देऊन करणें. बुंदेलखंडाचे ऐवजीं मजुरा पडेल. त्याजला हातीं घेऊन तूर्त समाधान करून हातीं घेणें. याची पुढें दिक्कत पडेल. यास्तव अनमान करून नुकसानी कराल, ऐसें सर्वथा न करणें. प्राप्त

२७२ बुंदेलखंड, आहिरवाडा, खेचीवाडा, रजपुताना, अंतर्वेद येथील बहुतेक राजेरजवाडे पेशव्यांच्या विरुद्ध होते.

समयावर दृष्टी देऊन वर्तणूक करून ज्यांत सरकार काम तें करणें. सु॥ इहिदे सितैन मय्या व अलफ. रा॥ छ २४ रमजान. बहुत काय लिहिणें. हे विनंति.                मोर्तबसुद, बार.

---

[ १८५ ]                ॥ श्री ॥                १४ मे १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजेश्री गोविंद बल्लाळ
स्वामी गोसावी यांसिः—

पोष्य सदाशीव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जाणें. विशेष. चितपावन कऱ्हाडे यांचा कजिया[२७३] श्रीतें[२७४] लागला आहे. आतां फारच वाढला असे. त्यास, परस्परें कजिय वाढून एक प्रकार दिसावें हें नसावें. त्यास, जिकडून वाढला असेल तिकडून निराकरण करावें. म्यास्तव लिहिलें असे. त्यास इतकें वाढावयाचें कारण काय ! आतां तट कोणे गोष्टीचा पडला आहे तो लिहिणें. येथूनहि लिहावयाचें असेल तें लिहून पाठवूं. तुह्मीं कऱ्हाडियांस लिहून कजिया न वाढून नीट होईल तें करणें. + वर्तमान कळलियावर दुतर्फा लेहून मोडून टाकावे. लागेल तर लेहून पाठवणें व तुह्मींहि हाच यत्न करणें कीं कलह न वाढे. रा॥ छ २७ रमजान. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

पे॥ छ १२ सवाल.

---

२७३ कज्याचें स्वरूप काय होतें तें कळतें तर बरेंच अभ्यसनीय होतें.
२७४ काशींत. इतर अक्षरांपेक्षां श्री नीटनेटकी काढिली असून श्री आणि त यांच्या मध्यें योग्य असें अंतर ठेविलें आहे.

[ १८६ ]　　॥ श्री ॥　　१४ मे १७६०.

पु॥ राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि :

विनंति उपरि यमुना पार लष्कर उतरावें लागतें. यास्तव तुह्मीं अंत-
रवेदींतून नावा कुल जमा करून एक जागा कोण्हाचा उपद्रव नावेस न
लागे ऐसें ठिकाणीं ठेवणें. खासा स्वारी पुढें आलियावरी आज्ञा होईल
त्या स्थळीं आणायास येतील. +तुमच्या जिल्ह्यांत असतील त्या कुल
दक्षणतीरीं आपलें जबरदस्तीखालीं जमा करणें. वरचेवरी बातमी वर्तमान
लिहीत जाणें. खासा स्वारी अरूण प्रांतखेची येथें आली. दरमजल नर-
वरच्या सुमारें ढवलपुरचे घाटें उतरोन गिलच्याचे पारपत्यास जातों. हिंदुपत
वगैरे बुंदेले लौकर येत तें करणें. पैका जरूर पेशजी लिहिलेप्रमाणें पाठवणें.
या कामास विलंब आळस न करणें. जाणिजे. लिहिलेप्र॥ सारा ऐवज
तयार करणें. तूर्त पांच लाख जरूर पुढें ग्वालेरी सुमारें पाठविणें. हिंदु-
पत वगैरे पत्रें फार दिवस गेलीं. सारे सत्वर पंधरा रोजांत येऊन पावतेसे
करणें. सुजाअतदौलाचें उत्तर आह्मांकडे येतों असें आलें. परंतु पुर्ता
भाव शुद्ध पाहून लौकर येतसें करणें. रोहिल्याकडे तुमची डाक बसलीच
आहे. फौज कोणे सरदारांची किती ? रमजान झालियावर उमेद कोणती ?
सडे करे जाले ? बहुत जलद दो रोजाआड आह्मांस बातमी येसें करणें.
जयनगरवाले याचे सरदाराचे प्रस्तुत फारच बिघडले आहे. [illegible] गोडहि
लिहितात. एकपक्षीं पुर्ते जाले तर निखालसता करने [illegible]णूं. सर्वांस बुंधेले
याचा भरंवसा फार. ते सत्वर येतसें करणें. [illegible]ाल खेचीकरहि येणार.
अहीर वगैरे लबाड्या सर्वांनीं मांडल्या. बंदोबस्त करून जाणें. पुढील लौकर
जाणियास ठीक पडत नाहीं. कार्याकारण करणें तें करून पुढें जातों. नजी-
बखान तो अबदालीच आहे. त्याखेरीज त्रकड रोहिले फुटतील तर फो-
डावे. महमदखान बंगस याची निष्ठा तुह्मी फार लिहीत होतां. ते प्रस्तुत
जाऊन तेथें मिळाले. तेहि येथील स्नेह राखतात. त्यांणीं व हफीज रह-
मतखान पहिले रुजू होते त्यांणीं अंतस्थ इकडील आश्वासन घेऊन त्याचा

बुद्धिभेद करून माघारें कुच करवावें; आपण निराळें व्हावें. यांत ते वांचून अबदालीनजीबखानांचें पारपत्य होईल. ते निष्ठा राखितात. यास्तव त्यांस सूचना असावी. करतील तर उत्तम. न करतील तर सरदार जाट आह्मी एक जाहालियावर त्यांस पुर्ते भारी आहों. परिणाम त्यांणीं आपला पहावा. नजीबखान तर मूलच आहे. त्याचें बोलणें प्रमाण नाहीं. बातमी जलद पोहोचावणें. बुंधले वगैरे फौज ऐवज सत्वर पाठवणें. रा। छ २७ रमजान. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ १८७ ] ॥ श्री ॥ १५ मे १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. रामगड जाटाचा घेऊन पुढें अंतर्वेदींत अंमल करणार ह्मणों तर मजलदरमजल आह्मी सिरोंजेस आलों. याउपरि ग्वालेरीवरून ढवळपुराचे सुमारें येतों. राजेरजवाडे यांस पत्रें गेलीं आहेत. बुंधेल्यास गेलींच. तेहि जमा होतील. मातबर फौज व तोफखाना गाडदी व दोन्हीं फौजा सरदारांच्या व जाट इतके येथें गाडून उभे राहून चालून घेऊन तेव्हां अबदलीच्यानें दम धरून उभे राहणें तोफाचे माराखालीं बार येणें कळतच आहे ! सुज्याअतदौला सर्व प्रकारें स्वामीची फत्ते इछितात ह्मणोन लिहिलें, तर हेंच त्यास योग्य आहे. त्यांचा आमचा स्नेह तसाच आहे ! आह्मीं जवळ आलियावरी ते येऊन सामील होणार. त्यांस हें करणें उचित आहे. सरदारांनीं वकील त्यांजकडे त्यांची निशा व्हावी ह्मणोन पाठविले आहेत. त्यास, तेहि पोहोचले असतील. तुह्मांसहि विस्तारें लिहिणें तें लिहिलें असे. याउपरि त्यांणीं उलग न राहतां,

एकपक्षीं होऊन मोठें काम हें करावें:—चकत्याची पातशा कायम करावी. हेंच आह्मांस त्यास योग आहे. याउपरि जलदी करणें हेंच लायक आ(हे). माधवसिंगाचा दंगियाचा वगैरे सर्व प्रकार कळला. त्यास हा प्रकार खराच. परंतु इतकेंहि सोडून निखालस होऊन येतात. असें जाहल्यास मागील रफे-दफे करून त्यासहि भेटीस बोलवावें हेंच केलें असे. येतात न येतात हेंहि कळेल. परंतु त्यास अबदालीचा भरंवसा पु(र)त नाहीं. इकडे नीट वर्तत नाहीं. याउपरि सर्व समजून नीट जाहलें तर बरेंच आहे. फार करून होतीलच. अंतर्वेदींतील अम्मल जबरदस्तीनें राखिला तसाच राखावा. आमचे येणियाची आवाई तेथें गेलियानें ते घाबरे होऊन आपला देश जवळ करावयाची तजवीज करीत असतील. त्यास, याची बातमी बारीक बारीक तुमची डाक बसली असे तिकडून वरचेवरी आणून लेहून पाठविणें.+ सुजादौलाविसी दुसरा प्रकार न होई इतकेंच करणें. हेंच जरूर आहे. सुजादौला पुरते आपले हो-ऊन कुमकेस यावें. काम जालियावर त्याचे हातें मोठें काम घेऊं. मळमळीत असलें तरी घरींच राहावें. तिकडे न जावें. हें तरी व्हावें. आबदलीचे लष्करांत तुमची बातमी गेलीच आहे. चहूंकडील बारीक खबर राखून लिहिणें. हिंदूपत वगैरे बुंदेले व कांहीं प्यादे व ऐवज खर्चास हरतरतूद करून जरूर पाठवणें. आम्ही सुरोंजेहून नरवरावरून जातों. पुढील सरदारांचे लिहिलेप्रमाणें ढवलपूर अगर कुरोली ग्वालेरकडून जाऊं. अहिरांनीं लबाडी केली वाट चालत नाहीं. आम्ही पुढें गेलों. आतां नरवराकडेहि नीट वाटेनें पत्रें येत जाईसें करणें. बंगालियाकडील खबर राखोन लिहीत जाणें. बुंदेले-याचें सामान आपला कोणी प्यादा देऊन सत्वर येईसें करणें. तुह्मीं ठाणीं, मुलूख, काईम राखणें. दुवाबानें अबदाली माघारा चालला तर तुह्मीं त्या मार्गेंच मागें येणें. खातरजमा बंदोबस्ताची असेल तरी फौजसुद्धां तुह्मीं चमेलकाठीं येणें. हे विनंति. पै॥ मित्ती ज्येष्ठ शु॥ ८.

---

[ १८८ ] ॥ श्री ॥ १९ मे १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. पत्र पाठविलें तें पावलें.

+ सुजाअतदौला सर्वप्रकारें आपलेकडे येणार, आपण जलदीनें यावें, ह्मणजे येऊन मिळतील, तिकडे जातच नाहींत, ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशियास सुजाअतदौलाचा सर्व प्रकारें दुसरा विचार नाहीं, आणि हल्लीं तुमचे लिहिल्यावरून व त्याचें पत्र आलें त्याजवरून फारच खातरजमा जाहली. आह्मीं मालनास आलों. दरमजल पाहारीवर येऊन पुढें सरदारांस सामील होतों. राजेरजवाडे येतील ते घेऊन येतों. तुह्मीं सुजातदौलाशीं बोलोन सर्व पक्कें करून एकपक्षीं करणें. आग्रियाआलिकडे सरदारांची गांठ पडतांच त्यांचेंहि येणें व्हावें हें जरूर व्हावें. हल्लीं त्यांस पाठविलें असें तें देणें. तुह्मींहि लिहिणें. मजबुदी पक्की करणें.

महंमदखान बंगस यास पत्र पाठविलें असे. तें त्याजकडे रवाना करणें. त्यास इतकेंच लिहिलें असे कीं तुह्मीं स्नेहाचे रीतीनें फार चालत आला. पुढें जें उचित तेंच करावें. तुह्मीं त्याशीं कितेक मंत्र भेदपुरःसर उपयोग जाणून बोलावयाचें बोलणें. तें प्रस्तुत ते तिकडील पक्षीच आहेत. उगाच राबता असावा. हाफीद रहमदखान यासहि पत्र लिहिलें आहे. देणें. दोनी पत्रांचे मसुदे पाठविले आहेत. हाफीज रहमतखान बंगस फुटतील तर फोडावे.

प्रस्तुत यमुनेपार अंमल त्याचाच आहे. तुमचीं ठाणीं जीं काय आहेत तीं आहेतच. त्याचा बंदोबस्त करून तुह्मीं सत्वर चमेल खासा स्वारी उतरलियावरी हुजूर येऊन फौज सुद्धां मिळणें. बुंधेले वगैरे कांहीं तुमची फौज चमेलतीरीं हुजूर सामील व्हावी. तुह्मींहि बनेल तरी यावें. अगर सुजादौला तुह्मी मिळोन दरमजल यावें. तिकडे काम नाहीं. येथें मोठे लढाईस सामील नाहीं असें न होई तें करणें. तुमची डांक असून रोज खबर येत नाहीं असें कामाचें नाहीं.

बुंधेले वगैरे ग्वालेरीस ठेवावे ह्मणोन तर पाहारीनजीक येतों. तेथून पुढें येतेसमयीं हाहि प्रकार करणें तसा करूं.

ऐवजाचा बोभाटच लिहिला तो खराच आहे. परंतु तूर्त वोढ आहे. बेगमी खर्चाची तुह्मींच तजवीज केली पाहिजे. पेशजीं लिहिलेप्रमाणें करणें. पांच सात सत्वर येऊन पावेतसें करणें.

रवाना छ ३ सवाल. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

पैवस्ती छ १० सवाल.

---

[ १८९ ] ॥ श्री ॥ २१ मे १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री बाळाजी गोविंद स्वामी गोसावी यांसि:

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. राजश्री शामजी रंगनाथ यास सुजातदौला याजकडे वकीलीस पाठविले आहेत. त्याजबरोबर निसबत नारायणराव बापूजी याजकडील स्वार दिल्हे आहेत. त्यांस रोजमरा आठवडा रुपये.

| | | |
|---|---|---|
| २५ | स्वरुपजी मुळे स्वार | १० |
| ४७॥ | कानोजी हरपले | १९ |
| १२॥ | लक्ष्मण बाबाजी | ५ |
| ८५ | | ३४ |

एकूण ३४ चौतीस स्वारांस रोजमरा आठवडा रुपये पंच्याशी याप्रमाणें, महिन्याचे आठवडे चार, जोपर्यंत मशारनिल्हे कामकाजास तेथें राहतील तोंपर्यंत सदरहूप्रमाणें, रोजमरा प्रांत बुंदेलखंड वगैरे महाल येथील ऐवजा देत जाणें. + जाणीजे. छ ५ सवाल सु॥ सितैन मय्या व अलफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

[ १०० ] ॥ श्री ॥ २३ मे १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः पो॥ सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करणें. विशेष. राजश्री शामजी रंगनाथ यांस सुजाउद्दवले यांजकडे र॥ केलें आहे. तरी हे तेथपर्यंत सुरक्षित पोहोंचत तें करणें. पेशजीं तुह्मांस बुंधेले सरंजामसुद्धां सत्वर येऊन सामील व्हावे, दारुगोळ्याचा सरंजाम करून पाठवावा व ऐवजाची तरतूद करून पाठवून द्यावा, याविशीं लिहिलें होतें. त्याप्रमाणें तर्तूद करून सत्वर दारूगोळा व ऐवज सत्वर येई तें करणें, व बुंधेलेहि जमावसुद्धां जलद येऊन पावत तें करणें. र॥ छ ७ सवाल. + बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ १९१ ] ॥ श्री ॥ २८ मे १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. तुह्मीं पत्र ज्येष्ठ शुद्ध द्वितीयेचें पाठविलें तें छ १० सवालीं प्रविष्ट जाहालें. त्यांत अबदालीची लष्करची बातमी तपशीलवार लेहून पाठविली व कितेक मजकूर लिहिला तो सर्व कळला. त्यास, याच प्रकारें बारीक मोठें वर्तमान लिहिणें. 'प्रस्तुत वर्तमान आहे कीं माघारा जाणार. अफीज रहिमतखान मथुरेस जाटासी बोलावयास आला आहे. गंगोबासहित जाटहि गेला आहे. काय होईल तें लेहूं. जाहानखान व नजीबखान ईटावेकडे गेले ह्मणोन खबर आहे. त्याचोंहि वर्तमान लिहिणें.

२७५ पुढें लवकरच सुजाउदौला मिळाला नसता तर अबदाली बहुशः माघारा गेला असता. सुजाउदौल्याची मातबरी भाऊ व अबदाली दोघेजण जाणत होते (पुढील वाक्यें व काशीराजाची बखर).

सुजाअतदौला याचा प्रकार तपशीलवार लिहिला कीं वजिरी यावी व अलीगोहर पातशा करावा, याविशीं निश्चयपूर्वक लिहिलें यावें ह्मणजे याचा गुंता नाहीं, होऊन येतो, ह्मणोन. तर याचा जाबसाल तुह्मी पहिला तुह्मी बोलत होता त्यास वाकीफ आहां. दुसरे कोण्ही मातबर यासारिखा असल्याखेरीज बंदोबस्त व्हावयाचा नाहीं. व शाहाजादाहि आणावा येविसी वारंवार लिहिलीं गेलींच आहेत. दुसरा विचार सुजाअतदौलानें न करितां यावें हेंच उत्तम आहे. तुह्मीं याप्रें॥ करणें. कदाचित् आमचा पक्का दस्तावेज गोऊन मग यावें हा प्रकार मनांत आणून जाबसालावरी घालतील तर न घालावा. आह्मी लौकरीच सरदारांजवळ जाऊं. भेटी होतील. त्यांणीं जाबसाल काय कसा केला तो पुर्ता समजोन तुह्मांसाहि लेहून लौकरीच पाठवितों. परंतु त्यांणीं लवकर यावें, शत्रूचा पराजय करावयास सामील व्हावें, हेंच उचित आहे. + त्याचे वजिरीचा मजकूर पहिलाच आहे. तुह्मीच बोलत होतां. आतांहि मातबरावांचून बंदोबस्त होणार नाहीं. त्यांणीं घरचें काम जाणन सत्वर यावें. मोठें काम जालिया त्याचे हातें इछित काम होईल. याचा निश्चय, पांच सात रोजांत सरदार जवळ होतील, मग लेहून पाठऊं. लक्ष्मीनारायणाचे हातें सरदारांनीं निशा पाठविलीच असेल. र॥ छ १२ सवाल. बारीक जलद बातमी दररोज येई असें करणें. नजीबखान काय तजवीजेंत? पैकियाचे तगाद्यामुळें पाय काढला अशी खबर आहे. ठीक आणून लिहिणें. ठाणीं खबरदार राखणें. हे विनंति.

---

[ १९२ ] ॥ श्री ॥ २९ मे १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:
पो॥ विश्वासराव[२७६] बल्लाळ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून

---

२७६ विश्वासरावाचीं दहापांच पत्रें आमचेजवळ आहेत. परंतु ती बहुतेक अलेकम-

स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान सविस्तर कळों आलें. ऐशियास, एतद्विशींचा सर्व अर्थ तीर्थरूपांनीं लिहिला आहे त्यावरून कळेल. खासास्वारी मजल दरमजल ग्वालेरपर्यंत आली. लौकरीच चमेल उतरून आगऱ्याचे रोखें जाऊं. तिकडील सर्व वर्तमान वरचेवरी लिहीत जाणें. जाणिजे. छ १३ सवाल सुा। सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

मराठी ठाणे

[ १८३० ] ॥ श्री ॥ २९ मे १७६०.

पुो। राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः—

विनंति उपरि. काशीच्या ब्राह्मणांस वर्षासनाचा ऐवज चार पांच साला पावत[२७७] नाहीं ऐसा बोभाट येतो. त्यास, येविशींचें वर्तमान कसें काय तें सविस्तर लेहून पाठवणें ह्मणोन पेशजी तुह्मांस लिहिलें होतें. त्याचा जाब आला कीं ऐवज पावोन दीक्षितांचीं कबजें घेतलीं आहेत. ऐशास, यांप्रा। असोन वारंवार बोभाट येता हें काय ? याउपरि तुह्मांकडून ब्राह्मणांचा ऐवज कोण्हे सालांत कसा पावला आहे त्याचीं कबजें असतील तीं हुजूर पाठवणें व बाकी राहिली असेल तेहि तपशीलवार लिहिणें. जाणिजे. छ १३ मवाल, सु॥ सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

सलामकीचीं आहेत. विश्वासरावानें आपल्या दक्षिणेंतील मित्रांना पत्रें पाठविलीं असावीं. शिंदखेडच्या मोहिमेंत विश्वासरावाबरोबर बाबूराव राम फडणीस होते. तेव्हां मोरोबा-दादांच्या दप्तरांत त्या मोहिमेसंबंधीं पत्रें सांपडावीं. परंतु सध्यां तें दप्तरच मालकांच्या हलगर्जीपणामुळें नाहींसें झालें आहे. उदगीरच्या व पानिपतच्या मोहिमांसंबंधीं विश्वास-रावाचा पत्रव्यवहार पेण येथील कोल्हटकरांच्या येथें सांपडावा. विश्वासरावाचे मित्र कोणकोण होते ह्याचा बखरींतून किंवा इतरत्र कोठें पत्ता लागत नाहीं.

२७७ गोविंदपंताविरुद्ध हीहि तक्रार ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

[ १९४ ] ॥ श्री ॥ ३० मे १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:—

पो॥ सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. ठाणें इटावें येथें तुह्मांकडून पदमसिंघ चौधरी राहातो. त्या ठाणियास रोहिल्याची फौज येऊन वेढा घातला आहे ह्मणोन परस्पर कळलें. ऐशियास, तुह्मीं त्याचें साहित्य करून बंदोबस्त केलाच असेल. खासा स्वारीहि आज छ १४ सवालीं[२७८] ग्वालेरीस येऊन दाखल जाहाली. येथून दरकुच तिकडे येऊन सर्व गोष्टी उत्तमच होतील. ठाणेदारांस धीर भरंवसा देऊन दमानें राहे तें करणें. पेशजीं तुह्मांस ऐवजाकरितां लिहिलें आहे त्याप्रे॥ कांहीं ऐवजाची तर्तूद जरूर होऊन येई तें करणें. बातमीचें वर्तमान वरचेवरी जलद जलद लेहून डाकेबराबर पाठवीत जाणें. हाफीजखान, गंगाधरपंत मथुरेस आले. तोहि प्रकार कसकसा होतो तो कळेल. आह्मींहि आंग्र्याचे सुमारें जाऊन अबदालीचें पारपत्य करूं. ईटाव्याच्या ठाणेदारास बहुत प्रकारें धीर भरंवसा देऊन ठाणें चांगले तऱ्हेनें कायम राहे ते गोष्ट करणें. यमुनेचे अंग मोकळें आहे. बेहेडों[२७९] थोर आहेत. कुमक पावती करोन ठाणें न जाई तें करणें. ठाणें मजबूत. तुमचा बंदोबस्त. रोहिले दहा हजार फौज आहे, तोफा नाहीं. उगेच आवाईनें ठाणीं पळतात. हें कामाचें नाहीं. बहुत तर-

२७८ ३० मे १७६० ला भाऊ ग्वालेरीस आले व तेथून त्यांनीं कुच १७ सवालीं ह्मणजे २ जून १७६० ला केलें ( लेखांक १९५ ). ४ जूनला भाऊ चमेलनदीच्यातीरीं ( लेखांक १९६ ) व ८ जूनला ढवलपूरपासून चार कोसांवर उत्तर तीरीं आले [ लेखांक १९९ ]. शिंदे होळकर व जाट यांचीं सैन्यें भाऊसाहेबाला २५ जूनच्या अगोदर दोनचार दिवस येऊन मिळालीं. नजीखान व जाहानखान यांनीं इटाव्याला शह दिला होता. त्यांना हुसकून लावण्याकरितां ८ जून पासून १२ जुलैपर्यंत चमेलउत्तरतीर व आग्रा ह्याच्या मधील प्रदेशांत भाऊसाहेबांस राहणें भाग पडलें. चमेलउत्तरतीरापासून आग्रा कायतें आठरा कोस होते. दोनचार दिवसांत आग्र्यास जाऊन पोहोचूं ह्मणून भाऊ गोविंदपंताला लिहीतहि होते.

२७९ नाले यांच्यामुळें झालेली खोल दरड [ पत्रें व यादी १६२ ].

तूद करोन ईटावें राखणें. पंधरा रोजांत सर्व फौजा एक होऊन फडशा होईल. तुमचीं वारंवार बातमीचीं पत्रें आलीं तीं पावलीं. उत्तरेंहि वरचेवर येथून गेलीं आहेत. सुजादौला तूर्त निकाल पाडून गेले. उत्तम. फिरोन अलीकडे गोहर येऊन त्यांकडे न येत, ईकडील सूत्र मजबूत राही तें करणें. छ १४ सवाल. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ १९४ अ. ] ॥ श्री ॥ ३० मे १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गो॥ :—

पो॥ बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. प॥ जलालीबिजराम व कसबे कासगज येथील कमाविस राजश्री अंताजी माणकेश्वर यांजकडे आहे ती त्यांजकडून दूर करून माहाल सरकारांत ठेऊन तुह्मांस जप्ती सांगितली असे. तरी सनद पावतांच सदरहूप्रं॥ महालची जप्ती करून ऐवज सरकारांत जमा करणें. जाणिजे. छ १४ सवाल सु॥ सितैन मया व अलफ. हे विनंति.

---

[ १९५ ] ॥ श्री ॥ २ जून १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

पो॥ सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून

---

२८० अंताजी माणकेश्वरावर नानासाहेबांची इतराजी पैशाकरितां पूर्वींपासून होतीच [ पत्रें व यादी ३३७ ]. ही पैशाकरितां इतराजी भाऊसाहेबांच्या सांगण्यावरून झाली असली पाहिजे हें उघड आहे. पूर्वीं दादासाहेबांकडून अंताजीपंताचे पारिपत्य व्हावें तसें झालें नाहीं. आतां खुद्द भाऊसाहेब हिंदुस्थानांत गेले. तेव्हां अंताजी माणकेश्वरासारख्यांचा मुलाहिजा ह्यापुढें राहणें दुरापास्त होतें.

स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. खासास्वारी आज छ १७ सवालीं ग्वालेरीहून कुच होऊन पुढें आगऱ्याकडे जावयास दर कुच चालली. पांच चार दिवसां सरदाराची भेट होऊन पुढें नजीबखान व जाहानखान वाढोन आले आहेत त्यांचे पारपत्याची तजवीज होऊन येईल. सर्व गोष्टी बऱ्या होऊन येतील. तुह्मीं आपलेकडील तमाम ठाणेदारांस ताकीद करून, ठाण्यांठाण्यांत दम धरून कायम राहात निकड पडल्यास चांगले तऱ्हेनें जुंझत, ऐसें करणें. केवळ दुरील अवाईनें ठाणीं टाकून पळोन जातात ऐसें नसावें. जो ठाणें टाकून अवाईनेंच येईल त्याचें पारपत्य तुह्मीं उत्तम प्रकारें करावें; ह्मणजे दुसऱ्या ठाणेदारांस असें वाटेल कीं ठाणें टाकून गेल्यानें अबरू राहत नाहीं; तेव्हां ठाणें टाकून निघूं नये, जुंझून मरावें हेंच बरें आहे. अबरूनें दम धरून राहून जुंझतील तेव्हां इकडीलहि कुमक चांगली पोहचून शह वारेल. त्याजपाशीं तोफखान्याचीहि ईबारत नाहीं, ऐसें आहे. तरी याप्रमाणें सारे ठाणेदारांस ताकीद करणें. बंदोबस्त ठीक राखणें. वरचेवरी वर्तमान सर्व लिहित जाणें.+ चमेल ढवलपुराचे खालीं चार पांच कोशीं उतरून सरदारांकडे जाऊं. यमुनेस उतार जाहाल्यास नजीबखान वाढला आहे त्याचें पारपत्य करणें हेंच काम आहे. मुख्यत्वें मोठें पारपत्य जाहालियावरी ठाणींठुणियांचा बंदोबस्त उत्तम प्रकारें होऊन येईल. तूर्त आपल्या जागा मात्र खबरदार राखणें. असेंहि करितां एखादे जागा ठाणियास पेच पडला तर कांहीं चिंता नाहीं. परंतु थोडी फौज पाठवून कामाहि नाहीं, येथेंहि नाहीं, असें नसावें. याजकरितां पाठवीत नाहीं. अगरियाचे सुमारें जाणें जाहालें ह्मणजे या दबदबियानें ते सर्व येकत्र होतील, तिकडे राहाणार नाहींत असेंहि वाटतें. वरचेवरी बारीक मोठें वर्तमान बातमीचें सर्व लिहिणें. जाणिजे. छ १७ सवाल. चवथे रोजीं चंमल पार होऊं. सरदाराहि [२८१] मथुरेचे सुमारें येतील. मग सर्व मिळोन पार यमुना होऊं अगर तुह्मांकडे फौज पाठवणें तरी पाठवूं. तोंपर्यंत ठाणीं

२८१ भाऊसाहेबांना शिंदेहोळकर मथुरेचे सुमारें भेटले.

काईम राखणें. फौज प्यादे जमाव असून ईटाव्यासारखे ठाण्यांतील कमाविसदार पळतात, अपूर्व आहे! ठाणेदारानें मरावें तेव्हां निघावें. नजीबखान फौज थोडी. तोफखाना नाहीं. आह्मी चमेल पार जालिया तेहि माघारे फिरतील. तुह्मांकडे मातबर मामला. तुमची पत असोन आह्मांस ऐवज मिळेना! बंगसाचे[282] वेळेस बाबूजी नाईकानें[283] पाई पैजारा चढवून रु॥ कर्ज मेळविलें. आतां सर्व अनुकूल असून न मिळे यांत परिच्छिन्न तुह्मांस शब्द लागेल. निकडीचे समयीं तरतूद न होई तर मातबरी काय कामाची! सत्वर पांच लाख रवाना करणें. सर्व त्यापुढें समजावणें. तूर्त पांच लाख महिनाभरांत. दोहोंत आणखी दाहा लाखांची तरतूद करणें. छ मजकूर. बहुत काय लिहिणें. हे विनंति. सुजादौलाकडील सूत्र बळकट करणें कीं तिकडे न जात. हे विनंति.

---

४ जून १७६०.

[ १९६ ] ॥ श्री ॥

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः—

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. खासास्वारी नजीक चमेलकुवार नदीवर आली. येकादो दिवशीं चमेल उतरून पलीकडे जाऊं. लौकरीच सरदाराची भेट होईल. हाफजीरहिमतखान आले आहेत. त्याचाहि जाबसाल

---

२८२ महमदखान बंगसावर बाजीरावानें १७३३ त स्वारी केली. ती छत्रसालाच्या विनवणीवरून केली. त्यावेळीं बुंदेलखंड मराठ्यांच्या हाताखालीं आलें नसल्यामुळें आसपासचे सावकार व जमीदार यांजकडून पैसा मिळण्याची अतिशय अडचण असूनहि बाजीरावाचा हस्तक जो बाबूजी नाईक त्यानें पाई पैजारा चढवून कर्ज मिळवून दिलें आणि आतां सर्व सोई असून गोविंदपंताला ऐवज मिळेना. तेव्हां भाऊसाहेबांच्या मनांत गोविंदपंताविषयीं राग आला तो यथान्याय आहे.

२८३ बाबूजीनाईक बारामतीकर.

होणें तो होत आहे. कांहीं ठहरून गेले तर जातील. राहिले तरी त्याचे पारपत्याचा विचार उत्तम रीतीनें केला जाईल. सुजाअतदौला यांणीं वजिरीचीं वस्त्रें व पातशहा शाजादियास करावा हें अबदालीनें केलें तें कबूल केलें आहे ऐसें, वस्त्रें घेतलीं त्यांत निघतें. आणि माघारे गेले होते तेहि फिरोन आले, असेंहि आहे. याजवरून त्याचा प्रकार एक प्रकार दिसतो. त्यास, अबदालीजवळून वजिरी घ्यावी, अलीगोहर याची स्थापना करवावी, रोहिले यांचे तलडूं राखावें, हें कांहीं सुजाअतदौलास उचित नाहीं व याचा आमचा घरोबा, सरदारांशीं स्नेह, व हे हिंदुस्थानचे पातशा, यांणीं त्या पातशाचे हातें स्थापना करून घेणें हें सहसा करणार नाहींत असें वाटतें. याप्रें॥ संदेह प्राप्त होतात. तरी, याचा मजकूर कसा आहे तो मनास आणणें. त्याचा त्याचा बनाव न पडे तें करणें. सरदारांनींहि त्यास खोलून लिहिलें असेल. आह्मी व सरदार एक जाहालियावरी याविशीं लिहून पाठऊं. त्यास सर्व प्रकारें सुजाअतदौला यांणीं ईकडील लक्षाप्रें॥ करणें हें उत्तम. याच डौलावर त्यास राखणें. त्याचे मातुश्रीचें राजकारण तुह्मांसीं आहे. तिकडूनहि त्यांस बोध करवणें. वर्तमान लिहिणें. ईटावे येथील ठाणें कायम आहे, झुंजत आहे. आतां ईकडील उपरामुळें रोहिले ठहरूं पावणार नाहींतसें वाटतें. तुह्मी त्यास हिंमत देऊन लिहिणें. ज्यांत दमधरी तें करणें. रामचंद्रभट पुराणिक यांस दोन तीन पत्रें पाठविलीं. परंतु त्याचें उत्तर येत नाहीं. त्यास, ते कोठें आहेत, श्रीस गेले न गेले, तें सर्व लिहिणें. + जाणिजे. छ १९ सवाल. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ १९७ ] ॥ श्री ॥ ४ जून १७६०.

अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्यराजश्री विसाजी गोविंद कमाविसदार पा॥ सागर दि॥ राजश्री गोविंद बल्लाळ गोसावी यांसि:—

सेवक सदाशिव चिमणाजी नमस्कार सु॥ ईहिदे सितैन मया व अलफ. सेदवाईचे ठाणें कटारेवाले यांणीं घेतलें आहे. तरी तुह्मी बापूजी नारायण याजला सामील होऊन, ठाणे घेऊन, म॥निलेयाचे स्वाधीन करणें आणि कटारेवाले याचें पारपत्य उत्तम प्रकारें करणें. जाणिजे. छ १९ शौवल. आज्ञाप्रमाण.

---

[ १९८ ] ॥ श्री ॥ ६ जून १७६०.

राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः—

विनंति उपरि. यमुने पारवारच्या नांवा साऱ्या जमा करून आपले हुकूमांत ठेवाव्या, त्यास प्राप्त न व्हाव्या याप्रमाणें करावयास लिहिलेंच आहे. त्या बमोजीब कोठें केलें, कोठें न केलें, तें लिहिणें. + जेथें बंदोबस्त जाहाला असेल तथील जाहाला. पुढें ठीक राखाव्या. नसेल जाहाला तेथील करणें. जाणिजे. छ २१ सवाल, सु॥ ईहिदे सितैन मया व अलफ. हे विनंति.

---

[ १९९ ] ॥ श्री ॥ ८ जून १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्य राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः—

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. पत्र तुमचें तूर्त येत नाहीं. आतां खामास्वारी चमेलीवर उत्तर तीरीं आली. सरदाराच्या भेटी लौकरीच होतील. हफीज रहिमतखान आला आहे. याचेंहि बोलणें चालणें होऊन काय ठहराव होणें तो होईल. लेहून पाठऊं. त्यास, सुजाअतदौला पटाणि

याकडे जात होते ते माघारे आले. परंतु तुमचें या मजकुराचें लिह्लिें आलें नाहीं व नजीबखान व जाहानखान बिठुरास गेले हेंहि वर्तमान आलें. त्यास, तुह्मी कोठें आहां ? काय मजकूर ? सुज्याअतदौल्याचा विचार काय? तुह्मीं त्यास सर्वविशीं लिहिलें कीं नाहीं ? इतके दिवस बोलत होते तें निदर्शनास यावें. आह्मी जवळ आलों. सरदार आह्मी येक होताच शत्रूच्या पारपत्याचा विचार घडेल. त्यास, सुज्यातदौला यांणीं फौजसुद्धां सामील व्हावयाचा विचार करावा. सांप्रत नजीबखान यांचें राजकारण लागलें आहे. त्यास, याचा आमचा स्नेह असतां त्या राजकारणाची आस्ता करावी हें उचित नाहीं व ते करणार नाहींतच. परंतु आलें राजकारण तोडूं नये या भावें बोलत असतील तरी तेंहि न बोला. त्याचें राजकारण तोडून यावयाचें करावें. हे आलियावरी सर्व बंदोबस्त व उचित गोष्टी, पातशाही कामें, व अलीगोहर आणून पातशा करणें, इत्यादिक सर्व होऊन येईल. तरी याचा प्रकार सर्व त्याचा लेहून पाठवणें. संशय न राहाता येत असें करणें. तुमचें पत्र तिकडील बातमी वरचेवरी या दिवसांत यावी, हें करणें. जाणिजे. + छ २२ सवाल. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[२००] ॥ श्री ॥ १० जून १७६०.

पु॥ राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गो॥. विनंति उपरि. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. सुजाअतदौला याचा प्रकार इतके दिवस ठीक होता. परंतु आतां आह्मांस एक प्रकार लिहितात. त्यास स्वामी आगरियास आले ह्मणजे नजीबखान, ज्याहानखान माघारे कोळेस जातील आणि यांची व सुजाअतदौलाची गांठहि पडणार नाहीं ह्मणोन कितेक लिहिलें तें कळलें. एशियास आह्मी चमेल उतरलों. आगरें अठरा कोस आहे. एकादों दिवशीं सरदार आह्मी एक होऊन पार उतरावयाची तजवीज करणार. अगरिया-

जवळ जातों. नजीबखान व ज्याहानखान माघारे फिरतील. न फिरले तथापि सुजाअतदौला यांणीं इतके दिवस येथील लक्षानें राहिले. आतां सरदार आह्मी एक जाहालों. याउपरि यांणींहि यावें, अबदालीचें पारपत्य करावें, दिल्लींतील बंदोबस्त व पातशाही पूर्ववत् करावी, हें काम सोडून त्यास भिऊन त्याजकडे जावयाची तजवीज करितात. तरी अबदाली त्याचे तालुक्यांत उतरून येत नाहीं. त्याजकडे त्याचा उपद्रव काय आहे ? त्यास, आतां तरी सर्व प्रकारें आमचा मनसुबा उत्तम आहे हें, यावें हेंच यास योग्य, असें पत्रहि लिहिलें आहे. त्याजकडे पाठवणें आणि तुह्मीं लिहिणें. कोण्ही पाठवावयाचा असेल तर पाठविणें. आणि दुसरा विचार सर्वथा न करीत ते गोष्ट करून त्याचा इकडे यावयाचा प्रकार करणें. सरदारांकडून करारबादहि जाणें तो गेला असे. त्याजवरूनहि त्यांणीं आपली पक्की खातरजमा करून घ्यावयाची तर घ्यावी. दुसरा विचार याउपरि सहसा न करावा. नजीबखान ज्याहानखान यांणीं कूच इटाव्याहून केलें. कोळेकडे येतात अशी खबर आहे. हे इकडे आले तरी तुमचा उगला तिकडे असावा ह्मणजे सुजाअतदौला तुह्मासीं नीट बोलतील. ठीकच होईल. जाणिजे. छ २५ सवाल. + तुह्मी, गणेश संभाजी, बाबूराव कानेर, अबदाली काळेहून यमुना उतरून अलीकडे येऊं लागले तरी, अंतरवेदींत सर्वांनीं उतरून पायबंद द्यावा. कदाचित् दिल्लीकडे चालला तरी सहजच ठाणीं सुटतील. तुह्मीं बसवीत जावीं. दोनचार रोजांत सरदार आह्मी एक होऊन लढाईची तरतूद करणें तें करूं. सुजादौलांनीं दम धरावा. त्याकडे न जावें. असें असून न आइकतील तर आमचा नेहमीं पंच पडेल. सर्व गरमनरम होऊन मायेंत मेळवून तिकडे न जात तें करणें. रा॥ छ २५ सवाल. हे विनंति.

---

[ २०१ ] ॥ श्री ॥ ११ जून १७६०

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:-

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणें. विशेष. तुह्मांकडे सालमजकुरची रसद महालानिहायची रुपये ११००००० अकरा लक्ष रुपये येणें. त्याचा भरणा स्वारीकडे करणें. तीर्थरूपाकडे पुणियास न करणें. येथून लेहून पाठविलें आहे. याखेरीज सालगु॥ सनसितैन व मागील बाकीचा ऐवज महाल॥ तुह्मांकडे येणें आहे. त्यास, तूर्त कांहीं स्वारीकडे ऐवजाची तर्तूद करून पाठविणें ह्मणोन लिहिलें होतें. परंतु कांहींच ऐवज आला नाहीं. मसलतीचे दिवस, फौजेस पोटास जरूर द्यावें लागतें. सर्व तुह्मांस ठाऊक आहे. तुह्मी मातबर मामलेदार बहुत दिवस या प्रांतास माहीत. सावकारीमध्यें पत उत्तम प्रकारची. या समयांत तुह्मीं हरप्रयत्नेंकरून जो ऐवज लागेल तो मेळवून द्यावा. असें असतां कांहींच तरतूद न जाली. अपूर्व आहे ! अंतरवेदींत मात्र पठाणाचा दंगा जाला. त्यास तुह्माकडील परगणेयांस फारसी तसदी लागली नाहीं. कदाचित् लागली असती तरी तुह्मीं ऐवज मेळवावा. मातबर काम पडल्यास दोन सालाचा सारेच मामलतीचा ऐवज अगोदर घ्यावा. अशीच तुमची सचोटी सावकारीमध्यें आहे ह्मणोन लिहिलें आहे. तरी सर्व समजोन लिहिल्याप्रमाणें ऐवजाची तरतूद करणें. सालमजकूरचे रसदेची अगोदर सूचना लिहिली आहे. ह्याहि भरणा लौकरच करावा लागेल. याची तजवीज करणें. जाणिजे. छ २६ सवाल, सु॥ हिहिदे सितैन मयावअलफ. + बहुत काय लिहिणें. देशीं ऐवज न पाठविणें. येथेंच दोन महिन्यांत भरणा करणें. वारंवार लिहिला असून ऐवज न आला. तुमची पत आहे. काम पडलें असून मनन वाढवावें. तेव्हां मनसबा शेवटास गेलियावर पैका द्याल. तोंपर्यंत भरंवसा येत नाहीं हें उत्तम नाहीं. सत्वर तरतूद, रसद व बाकीचे ऐवजी ब॥, तूर्त पाठविणें. हे विनंति.

[ २०२ ] ॥ श्री ॥

पु॥ राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः—

विनंति उपरि. तुह्मीं दोन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. यांत मुख्यार्थ कीं मातबर फौजेनिशीं सत्वर यावें. सुज्यातदौला सर्व प्रकारें स्वामीच्या येणिया- मुळें येऊन सामील होतील. अबदालीकडे जात नाहीं. राजकारणहि राखून ठेविलें आहे. ह्मणोन विस्तारें लिहिलें तें सर्व कळलें. ऐशियास, खासास्वारी दरमजल बोडसियास आली. पुढें दरमजल तुह्मी लिहिल्या रोखेंच येऊं. सरदारांसहि लिहिलें असे. त्यांचींहि पत्रें जशीं येतील त्यासारिखा रोख धरूं. त्यास सुज्याअतदौलाचें राजकारण फार करून दाखवावें. सरकारचें काम व यास मातबर इच्छेनरूप पदारूढ करवावें याचा कितेक अर्थ तुह्मी बोलत होता तो प्रकार बनला नाहीं. परंतु हल्लीं मल्हारबांनींहि त्यास बहुताप्रकारें लिहिलें आहे. व, यांशींहि स्नेहाचा फारच याचा राबिता आहे. या दिवसांत आमचेंहि येणें जाहलें. येणेंकडून कितीक उमदी कामें वडणें. हे दिवस रुबकार जाहाले. यास्तव तुह्मी जे बोलत होता ते सुज्याअतदौला यास एकपक्षी करून घेऊन यावें. आणि तैमुरियाचे पातशाहीचा बंदोबस्त करावा. अबदालीस खूब तंबी करावी. मल्हारबाचा या गोष्टीविशीं संशय न आणावा. तेहि याच कामावर तयार आहेत. सुज्याअतदौलाविर्शीं कांहीं दुसरा मजकूर नाहीं. आतां सुज्याअतदौलानें आपले तर्फेनें निदर्शनास आणून देऊन पुढें फार दिवस स्नेहाची मजबुदी चालोन येईल ते गोष्ट त्यांणीं करावी. त्यास, तुह्मीं हा सर्व अर्थ पहिल्या लिहिल्यावरून त्यास कळवून त्यास या कामावरी सिद्ध केलें असेल. कदाचित् मळमळीत प्रकार असेल तर जो तुह्माजवळ त्याचा पुर्ता वळखी असेल त्यास तेथें पाठवून त्यास भरंवसा पुरवून यावयाचे करीत तें करणें. अबदालीस तो साफच जाब द्यावा. मलकाजमानी सुज्यातदौलाकडे गेली आहे ह्मणोन कळलें. ऐशास, अबदालीचे जबरदस्तीखालीं बाईकाचे भरंसियावरी जावें, त्याची जरब आपण सोसावी, हें कांहीं यास योग्य नाहीं. मागें जे जे त्यास भेटले

त्यांची गत काय जाहाली ? हाल काय जाहले ? यास ह्ररप्रें॥ न्यावें, तेथें नेऊन फसवावें, रोहिल्यानें पैका कबूल केला त्यास जागा नाहीं, लटकी आशा दाखवावी, फसवावें, त्याचे जबरदस्तीखालीं हे सांपडले ह्मणजे याजपासूनाहि पैक्याची इच्छा करावी, न कबूल केलें तरी मग अबदालीचा प्रकार कळतच आहे. असे प्रकार घडतील. हेंहि त्यास आपले तर्फेनें हितोपदेश सांगावा. इकडे उपयोगी आहेतच ते दृढ करावे. हिंदुपत वगैरे यांस पत्रें गेलीं. तुह्मी लिहिणें. लौकर येत तें करणें. शाहाजादियाकडीलहि वर्तमान लिहिणें. सुजादौला त्याचा पैगाम तोडून आमचे पुर्ते होऊन सामील होतील तर त्याचे हातेंहि मातबर बंदोबस्ताचें काम घेऊं. निर्मालय जाले ते आमचे कामाचे काय ? हे चांगले असून काम न करतील, घरीं राहून दोहींकडे पाहतील तर त्यांसच पुढें पेंच. तर या समयीं आह्मांकडे यावें. तसेंच फरकाबादवाले आणणें. हे विनंति.

---

[ २०३ ] ॥ श्री ॥ १५ जून १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

पो॥ सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. ऐशास इकडील सविस्तर वर्तमान लिहिणें तें पेशजी पत्रीं लिहिलेंच आहे. त्याजवरून कळलेंच असेल. + सुज्याअतदौला याची व नजीबखान व ज्याहानखान याची भेट जाहली. त्यास याउपरि त्यास त्यांणीं साफ जाब देऊन निरोप द्यावा आणि एकपक्षी कराराप्रमाणें इकडे यावयाचें करावें. सरदारांच्या भेटी दोती दिवशीं होतील. गंगोबा आले. भेटलेयाउपरि पुरती तजवीज करणें ती करूं. तहाचा जाब-

साल आहे. जें ठहरेल तें लिहून पाठवूं. जाणिजे. छ १ जिलकाद. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २०४ ] ॥ श्री ॥ १९ जून १७६०.

राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः

विनंति उपरि. सुज्याअतदौलाचा मजकूर दोन तीन पुरवणियांत लिहिला. त्यांत मुख्य मजकूर हाच कीं नजीबखानाचे जाणियामुळें अबदालीकडे जाणार. परंतु अद्यापि उलग आहे ह्मणोन. तरी खासास्वारी जवळ अगरियास यावी ह्मणजे आपण त्यास मिळत नाहीं असें लिहीत असतां, त्यांणीं, आह्मी जवळ आलों असें असतां, हा विचार मनांत आणिला हे गोष्ट त्याचे दूरंदेशीस व चालत आल्या स्नेहास अयोग्य व त्यास ही गैर नफियाची गोष्ट आहे. कशी ? तर हाफीजरहिमत याचे मारफातीनें सरदारांशीं राजकारण अबदालीचें लागलें आहे. बोलोनहि हाफीज गेला आहे. हें ठीक जाहलें तरी जाईल व ज्यांणीं ज्यांणीं लबाडी केली त्याचें पारपत्य हातून होईल. कदाचित् राहिला तर आह्मी, सरदार व जाट येका दो दिवशीं अगरियाजवळच एक होऊन पार उतरून उत्तम प्रकारें पारपत्य करितां. सर्वहि गोष्टी उत्तम होतील. आमचा इतका जमाव पडला असतां त्यांत सुज्याअतदौला जाऊन फसतील. एक तर आमचा पुरता दावा पडेल. आणि अबदालीस पैका न मिळाला नजीबखानानें कबूल केला आहे त्यास पैक्याचें कूळ हेच आहेत. यास त्याजपासोन उलगावावें ह्मणजे सहजच पैका देणें आला. हेहि गोष्ट त्यास वाईट. याचाहि विचार दूरंदेशीनें केला असेलच. यांतून जाणार नाहींत. तथापि त्यास कोण्ही बहकावितात. तर हें त्यास हें उमजवावें. सर्वथा त्यांणीं न जावें. नजीबखानास साफच जाब द्यावा; लावून द्यावा. त्यांणीं पार राहावें. इकडे यावयाचें

करावें, याचा भरंवसा फार होता. माधवसिंग याचा विश्वास होता. त्यास त्याणीं फौज तयार केली. आपण येणार. कमाविसदार वकील सोडिले. इतकें त्याणीं केलें. याचा भरंवसा असोन हे गोष्ट सहसा याणीं करूं नये. अबदाली उपरी. किती दिवस पुरवेल. आह्मी नेहमीं आहों. श्री कृपनें हरएक गोष्ट सत्वर होऊन येईल. आतां त्याणीं उलग नसावं हें उचित असे. जाणिजे. + सरदार आह्मी एक होऊन सत्वर जें करणें तें करूं. याउपरि त्याचा जाबसाल तोडून एकपक्षी पुरतें व्हावें. आतां तिकडे जातील, तर नेंहमीं आह्मांकडे तोडून जाणें तरी जावें. सर्व अर्थ गरम नरम होऊन त्याचें जाणें तिकडे न होय तें करणें. वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. र॥ छ ५ जिलकाद. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[२०५.] ॥ श्री ॥ १९ जून १७६०.

पु॥ राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

विनंति उपरि. सुज्याअतदौला यांणीं नजीबखान यास साफ जाब दिल्हा कीं आह्मी मराठियांकडे आहों, तुह्मीं अबदालीस बिदा करणें. त्याजवरून ते फारच खट्टे होऊन निरोप घेऊन गेले. त्यास, आह्मी जवळ आलों; सुज्याअतदौलाचा जाब तसा जाहाला; आतां, नजीबखान याचे वस्तू कांहीं तिकडे[२८४] राहावत नाहीं. तुह्मी इटावियास येऊन त्याचे फौजेस धुडावावें. आपलीं ठाणीं जीं गेलीं असतील तीं कायम करणें. सुज्याअतदौलाहि तुमचे कुमकेस फौज पाठवितील. त्यास लेहून पाठवणें. ते बोलत होते कीं गोविंदपंत इटावियास असते तरी नजीबखान कांहीं त्याजवर न जाता. परंतु हेच गेले असते तरी आह्मी फौज पाठवितों. असें भाषण केलें. असो. त्याजवर काय आहे ? तुर्त तुह्मीं त्याचे लोक उठवून आपला अंमल करावा. यास

---

२८४ इटाव्यास.

गुंता पडणार नाहीं. सारे एक होऊंन करणें. जाणिजे. + गोपाळराव, गणेश संभाजी, तुह्मीं, अकबरपूरकर, सर्व जमा होऊन आपली जागा कायम करणें. शिंद्याकडून भिकारीदास सुजादौला ह्याकडे आहे. त्याचेंच पत्र आलें कीं नजीबखानास निरोप देऊन गंगापार आहेत. तुह्मांसहि वर्तमान कळलेंच असेल. मुकासदाराचें तेहि साहित्य करितील. तुह्मीं जमा होऊन अंमल आपला करणें. नजीबखान, जहानखान अबदालीकडेच जातील. हाफिजाचे बोलीवर अबदाली नजीबखानास टाकून जाईल. न गेला तर सरदार, आह्मी, जाट एक होऊन यमुना उतरून पारपत्य करूं. कोणे चिंता न करणें. सर्लोबित दुरून भारी असते. येथें सर्व कळलें. लौकरच उत्तम होऊन येईल. र॥ छ ५ जिलकाद. ऐवज जरूर खर्चास अठापंधरा रोजांत येईसा करणें. हे विनंति.

---

[ २०६ ] पे॥ छ १० जिलकाद ॥ श्री ॥ १९ जून १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि: पो॥ सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. येथें खर्चाची वोढ फारच जाहाली आहे. तुह्मी ऐवजाची तरतूद करून ऐवज सत्वर पाठवणें, ह्मणोन वारंवार लिहीत असतां, ऐवजाची तरतूद केली आहे ऐसें मात्र शोभेस लिहिता. परंतु, ऐवज रवाना करीत नाहीं. हे गोष्ट उत्तम नसे. हालीं हें पत्र लिहिलें असे. तरी पेशजी लिहिल्याप्रें॥ ऐवज सत्वर पत्र पावतांच हुजूर रवाना करणें. विलंब एकंदर न लावणें. जाणिजे. छ ५ जिलकाद, सु॥ इहिदे सितैन मया व अलफ. + बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

२८५ कोणाचीहि व विशेषत: येथें अबदलीची.

२८६ शेवटीं अखेरपर्यंत गोविंदपंतानें ऐवज पाठविला नाहीं. डिसेंबरांत बाळाजी गोविंद व पाराशरदादाजी यांजबरोबर पाठविला तो अबदालीच्या लोकांनीं मध्येंच लुटिला.

[ २०७ ]  ॥ श्री ॥  २४ जून १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:
सेवक सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करणें. विशेष. तुह्मीं पत्रें सप्तमीचीं पाठविलीं तीं प्रविष्ट जाहालीं. त्यांचीं उत्तरें पुरवणियांत लिहिलीं त्यावरून कळेल. येथें दरमहा पांच सहा लाख रुपये लागतात. तरी तुह्मांस लिहिल्याप्रें॥ मातबर ऐवज येऊन पोहोचे तें करणें. सुजाअतदौलाचीं पत्रें पाठविलीं आहेत. हीं दो दिवसांत त्यास पावे तें करणें. कड्याकुऱ्याविशीं नजीबखानास दोन अडीच लक्ष रु॥ द्यावे याचे र॥ गोपाळराव गणेश यांचें पत्र पाठविलें तें पावलें. त्यांस तुह्मीं लिहिलें तें उत्तम. अर्ता रु॥ त्यांस का द्यावे ? न द्यावेच. जाग्याजुग्यांची बंदोबस्ती उत्तम प्रकारें करून राहावें. र॥ छ १० जिलकाद. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

२८७ पानिपतच्या मोहिमेस एकंदर जो सैन्यसमूह जमला होता, त्याचा सगळ्याचा खर्च भाऊसाहेबांस द्यावा लागत नसे. सरंजामी सरदार आपापल्या सैन्यांचे खर्च चालवीत. भाऊसाहेबांना आपल्या स्वतःच्या सैन्याच्या खर्चास दरमहा सहा लाख रुपये लागत. पानिपतची मोहीम शके १६८१ च्या वद्य त्रयोदशीला ह्मणजे इ. स. १७६० च्या १५ मार्चला सुरूं होऊन १४ जानेवारी १७६१ ला संपली. ह्मणजे ही मोहीम बरावर दहा महिन्यांना एक दिवस कमी इतके महिने चालली होती. दरमहा सहा लाखप्रमाणें दहा महिन्यांचा साठ लाख खर्च होतो. व शेवटल्या चार महिन्यांतील महागाई लक्षांत घेऊन दरमहा दहा लाख जास्त खर्च धरिल्यास ह्या शेवटच्या चार महिन्यांचा ज्यादा खर्च चाळीस लाख होतो. एकंदर सुमारें एक कोटी रुपये एकट्या भाऊसाहेबांचे सैन्याच्या खर्चाला लागावे असा अंदाज होतो. भाऊसाहेबांचें सैन्य पन्नास हजार पडदुराहून निघतेवेळीं होतें असें बाबूराव खेराच्या १६ व २० मार्च १७६० च्या पत्रांत आहे.

२८८ ह्मणजे लढाई सुरू झाल्यावर.

२०८ ] ॥ श्री ॥ २५ जून १७६०.

राजश्री गोविंद बल्लाळ गोसावी यांसि:

विनंति उपरि. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. सुज्याअतदौलाचा मजकूर विस्तारें लिहिला व तुह्मीं त्याशीं इतबार पुरावयाचें लिहिलें तें कळलें. ऐशियास, तुह्मी त्याशीं बोलला व तेहि तिकडे जात नाहीं असें बोलतात, हें यथार्थच. परंतु, तुर्त ते बोलतात एक, करतात एक, असें आमच्या बातमीचे रीतीनें दिसतें. कसें? तरी, अलीकडे फौज उतरली, आपणाहि अलीकडे आले आणि नजीबखान यास ठेऊन घेतलें आहे. त्यास, त्यांणीं जेव्हां त्यास ठेऊन घेतलें, तेव्हां एक प्रकारें दिसतें. यास्तव कितेक त्याचे मतलब होऊन आमचा उपयोग पडावा यास्तव विस्तरें मजकूर सांगून राजश्री रामाजी अनंत व राजश्री नारो शंकर यांस रवाना केलें आहे. व फौज मागून येऊन पोहोंचली. त्यास, तुह्मीं पुढें सुज्याअतदौला यास लेहून पाठवावें कीं यांस कितेक आपलें खातरदास्तीस्तव, सरकारचे उपयोगास्तव रवाना केले असेत; हे येतात व फौजाहि मागून येते तों तुह्मीं तेथें मुकाम करावा; नजीबखानास लावून द्यावें आणि तागायत

---

२८९ रामाजी अनंत व नारो शंकर यांच्या दफ्तरीं हिंदुस्थानांतील घडामोडीसंबंधीं पत्रें असावीं. विठ्ठल शिवदेव, हिंगणे, अंताजी माणकेश्वर ह्यांच्याहि दफ्तरीं ह्या घडामोडीसंबंधीं कागदपत्र सांपडावे. आह्मीं विठ्ठल शिवदेव, नारो शंकर व रामाजी अनंत ह्यांच्या वंशजांच्या गांवीं ह्मणजे विंचूर, मालेगांव इत्यादि ठिकाणीं शोध केला; परंतु, कागदपत्रांचा सुगावा लागला नाहीं. वर सांगितलेल्या पुरुषांचे कागदपत्र सांपडल्यास हिंदुस्थानांत मराठ्यांनीं १७१४ पासून १७६१ पर्यंत ज्या कामगिऱ्या केल्या त्यांचा समग्र इतिहास कळेल. नारो शंकर यांच्यासंबंधीं एक यादी मालेगांव येथें आह्मांस मिळाली तिच्यावरून तेथील दफ्तराची हकीकत कळून येईल.

॥ श्री ॥

यादी शिवराव गोपाळ राजे बहादर संस्थान मालेगांव सु॥ सन १२४२ फसली. ती॥ कैलासवासी नारो शंकर नानासाहेब राजेबहादर हे त्रिवर्ग बंधू. यांचे वडील पूर्वीं विज्यापूरचे सुभ्याकडेस दिवानगिरीचे कामावर होते. असो. अलीकडील मजकूर. अबाजी शंकर हे श्रीमंत पेशवे यांचे दरबारांत रोजगारास होते. लक्ष्मण शंकर यांणीं पेशवे सर-

बोलत गेला त्याप्र॥ शेवटास न्यावें, हेंच उत्तम आहे. असें प्रकारें लेहून,

---

कारांनून काल्पी सुभ्याचें काम हिंदुस्थान प्रांतीं केलें. नारो शंकर हे कैलासवासी थोरले मल्हारजीबावा सुभेदार होळकर याजकडे जाऊन रोजगाराची पैरवी करून, शिलेदारी प्रथम केलियावर, कांहीं काजार्खाचें कामकाज केल्यावरून पागा, नगारा, निशाण सुभेदार यांणीं देऊन आपले लोभांतच ठेविलें होतें. श्रीमंताकडील फौज व नायगावकर वगैरे यांच्या पागा हिंदुस्थानांत जाऊन वोडसेवाले राजे यांची विलासाची व शिकारीची जागा झांशी घेऊन कांहीं अंमलहि वसवूं लागले. त्यावरून जमेत करून याचा कटा केला. नायगावकर मारिले गेले. हा मजकूर पुण्यास कळल्यावर मागती येथून तयारी करूं लागले. त्यांत कोणाची हिंमत न होय. तेव्हां सुभेदार यांणीं श्रीमंतास विनंति केली कीं आमचे पदरीं नारोशंकर मनुष्य कजाख आहे. त्याजला इंदूर सुभ्याचे कामावर ठेविलें आहे. त्याकडे ही मोहीम सांगितली असतां करण्यायोग्य आहे. श्रीमंतांनीं मान्य करून नारो शंकर याचे नांवें पत्र व सुभेदार यांणीं आपलें पत्र पाठविलें. त्यावरून इंदूरचे कामावर कारकून ठेऊन पुण्यास आले. सुभेदार यांणीं श्रीमंताची भेट करवून मोहिमीचीं वस्त्रें दिल्हीं. आणि पांच हजार फौज तैनाती देऊन इतलाखी फौज ठेवण्यास सांगून हिंदुस्थान प्रांतीं रवानगी करून दिल्ही. तिकडे फौजेसुद्धां जाऊन, वोडसेवाले यांचें राज्य घेऊन, राजे हस्तगत करून, आसमतात् गिरास होते त्यांचें पारपत्य करून, झांशीस ठाणें घालून, सरकारास म॥र लिहून पाठविला. त्यावरून सरकारची मर्जी प्रसन्न होऊन, झांशी सुभ्याचीं वस्त्रें व शिरपेंच, कंठी, चौकडा हुजरेयाजवळ देऊन पाठविलें. नारो शंकर यांणीं राजे यांचें संस्थान राजाकडेस कायम ठेऊन झांशीसुभ्याकडे कांहीं सरकार खालसा महाल करून घेतले. व अवांतर मांडलिक राजेरजवाडे यांजकडूनहि कांहीं सुभ्याकडेस अजमासें तीसपस्तीस लक्ष परियंत आकारें जमेचा करून घेऊन, झांशी खेडें होतें त्याची वसाहत करण्यावद्दल लाखो रु॥ खर्च करून सुभा राहण्यालायक जागा केली. श्रीमतास गैरवाका कोणी समजाविल्यावरून नारोशंकर याजला पुणेंमुक्कामीं बोलावून आणिलें ते कालीं कांहीं इतराजीचा डौल दिसण्यांत आला. सुभेदार मुरब्बी; ते हिंदुस्थानांत-शिंदे अलिजाबहादर पुण्यास होते. त्यांची हिंदुस्थान प्रांतीं रवानगी होऊं लागली ते समयीं नारो शंकर यांणीं अलिजाबहादर याजकडेस सांगून पाठविलें कीं सुभेदार प्रसंगीं नाहींत, सरकारमर्जी तो रुष्ट दिसते. यावर आलिजावहादर यांणीं अभय सांगून पाठविलें कीं जे सुभेदार तेच आह्मी, काळजी न करावी. शिंदेबहादर हिंदुस्थान प्रांतीं जाण्यास निरोप घेतेसमयीं सरकारास विनंति केली कीं नारो शंकर यांणीं सरकार चाकरी करून किफायत केली असतां खावंदांनीं गैरवाका ऐकून माणसें वाढलेलीं तीं मोडावीत असें होऊं नये; त्याजला आमचे वराबर दिल्हे पाहिजे; त्याखेरीज आमचें जाणें होणार नाहीं. खावंदांनींहि त्यांचे पराक्रमावर नजर देऊन सरकारांतून सरदारीचीं वस्त्रें दिल्हीं. व शिंदे बहादर यांणींहि आपले दिवानगिरीचीं वस्त्रें व श्रीमंत महाराज

ते तेथेंच राहात बलकी माघारे फिरत असें करवणें. हे उभयतां पुढें पोहों-चल्यावरी यांणीं लिहिल्यास तुह्मीं फौज सुद्धां जाऊन पोहोंचणें. वरचेवर तिकडील मजकूर लिहिणें. जाणिजे. सारांश, सुज्याअतदौला याचे मत-लब तुह्मीं लिहिले तेच पक्के त्याशीं बोलावें. त्याची निशा करावी व त्याज-पासून आपली निशा करून घ्यावी. याचे लांब बोलणें करणें. रूबरू बोलोन पाठवावे. या गोष्टीस तुह्मी जवळ असतां तर ठीक पडतें. तुह्मी जवळ नाहीं, यास्तव तुमचें जाणें लांबणीवर पडतें. रवानगी लवकर व्हावी यास्तव या उभयतांस पत्रें देऊन सविस्तर सांगून रवाना केले असेत. तुह्मीहि त्यास पुढें लेहून इतकेंच पाठवावें कीं तुमचे मतलब तेच तुह्मांशीं लांबल-चक बोलावे व तुमची पुरती निशा करून घ्यावी व आपले तर्फेची निशा करून घ्यावी, यास्तव यांस रवाना केले असेत; येतील तोंपर्यंत जावयाची

---

छत्रपति यांचा पंतप्रतिनिधी, कैलासवासी भवानराव याजवर वेमर्जी झाली होती ते काळीं प्रतिनिधींचीं वस्त्रेंहि, यांजला दिल्हीं. शिंदे अलिजाबहादर यांचे दिवानगिरीचे कामावर आमचे आजे त्रिंबकराव नारायण यांजला पाठविलें. झांशी सुभ्यास पुतणे, लक्ष्मण शंकर यांचे चिरंजीव, विश्वासराव लक्ष्मण ठेविले. प्रतिनिधींचे कामावर आपण नारो शंकर राहिले. यानंतर श्रीमंत कैलासवासी भाऊसाहेब पेशवे हिंदुस्थानप्रांतीं जाऊन सोनपतपानपतचे लढाईंत गारद जाले. ते काळीं कामकाज नारो शंकर यांणीं दिल्लीस केलें. तेव्हां राजेबहादर किताब खुदावंत पातशाहा यांचे येथून जाली आहे. पुढें कैलासवासी श्रीमंत थोरले माधवराव-साहेब व दादासाहेब चुलते पुतणे या उभयतांचें वाकडें आलें. त्या प्रसंगांत लढाया वगैरे कामेंकाजें झालीं. तेव्हां पंधरा लक्षांची जाहागीर दिल्ह्यावर कर्नाटक प्रांतीं वगैरे लढा-ईचीं कामें पडलीं. कोठेंहि कमती पडली नाहीं. कैलासवासी ती॥ बाप्पासाहेब यांस स्व-देशीं व हिंदुस्थानप्रांतीं सरकारसेवा घडली. सारांश, वडिलांनीं पराक्रमानेंच मातबरी मे-ळविली. याचा पूर्वापार म॥र लिहिला असतां विस्तार कोठवर लिहावा. कोणते तेरिखेस व कोणते सनांत काय जें प्राप्त जालें हें तपशीलवार लिहून पाठवावें तरी आमचे दौलतींत हालीं माजी होत गेल्यामुळें कागदपत्र दाखलेशीर राहिला नाहीं. कांहीं राहिले तेहि मा-लेगांवचे लढाईत गेले. इ. इ.

१८१८ च्या १३ जूनला मालेगांवचे लढाईंत मालेगावचा किल्ला जळून जमीनदोस्त झाला व त्याबरोबर आंतील दफ्तरहि खाक झालें. पानिपतची लढाई १७६१ त झाली व नारो शंकराला प्रतिनिधींची मुतालिकी १७६२ त मिळाली. यादींत मजकूर वरखालती झा[illegible] आहे. यादी इ. स. १८३३ त लिहिलेली आहे.

उतावळी न करावी, तेथेंच राहावे. असें प्रकारें लेहून पाठवणें. मुलकाचा मजकूर तर तुर्त मुलकाचा पेंच नाहीं. आह्मी आगरियाजवळ आहों. सुजाअतदौलाचा स्नेह आहे तों पेंच कांहीं पडत नाहीं. परंतु, आपल्या जागा असतील त्यांत दारू, गोळी, दाणा वगैरे सरंजामाचा गल्ला भरणें. मजबुदी ठीक करणें. यद्यप पेंच पडल्यास झुंजत परंतु कांहीं भय मानून कांहीं जागा न सोडीत असें करणें. रूबरू बोलणें जाहाल्यास भावगत जशी कळेल तसें त्याशीं बोलावें यास्तव यांस पाठविलें आहे. जसें देखतील तसें बोलतील. यास्तव तुह्मी त्यास आशाच लाऊन ठेऊन तिकडे न जात तें करणें. त्यासहि पत्र पाठविलें असे. त्याचाहि मसुदा पाठविला असे. रा॥ छ ११ जिलकाद. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २०१ ] पे॥ छ ८ मोहरम. ॥ श्री ॥ २६ जून १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:
पो॥ बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मीं दोन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. अबदाली, रोहिले यांचा मजकूर विस्तारें लिहिला त्यांत

२९० कोळजळेश्वराच्या वरती राहून अबदालीनें नजीबखान व ज्याहानखान यांस मराठ्यांच्या मुलुखांतील ठाणीं मारण्यास व सुजाअतदौल्यास घेऊन येण्यास पाठविलें होतें. भाऊसाहेबांचें सैन्य आग्र्याजवळ आल्यावर नजीबखानाला अर्थातच मराठ्यांच्या ताब्यांतील इटाव्यास राहतां न येऊन तो अबदालीच्या सैन्यास मिळण्याच्या हेतूनें परतला. पुढें मराठ्यांचें सैन्य आग्र्यास यमुनेच्या दक्षिणतीरीं उतरलेलें पाहून अबदालीहि त्या नदीच्या उत्तरतीराला येऊन थडकला. नंतर भाऊसाहेब कुंजपुरा घेऊन परत येईतोंपर्यंत अबदाली यमुनेच्या पैलतीरानें मराठ्यांच्या सैन्याच्या समांतर चालत होता. रा. पारसनीसकृत मराठ्यांचे पराक्रम, बुंदेलखंडप्रकरण ह्या ग्रंथांत एक पानिपतच्या लढाईची अपूर्ण बखर छापिलेली आहे. त्यांत भाऊसाहेब शिंदेहोळकरांना घेऊन माळव्यांतून हिंदुस्थानच्या रोखें येत असतां अबदाली अटकेवर आला व तो यमुना उतरून आठ दिवसांत मराठ्यांशीं टक्कर दे-

खुलासा कीं पठाण, रोहिले इकडे आले याजमुळें सकुराबादचा अंमल उठला; ण्याच्या विचारांत होता, इत्यादि विधानें केलीं आहेत; परंतु, हीं विधानें खरीं नाहींत हें मराठ्यांच्या इतिहासाच्या ह्या भागाच्या अवलोकनानें कळून येण्यासारखें आहे. ह्या बखरींत अशींच आणखीं शेंकडों विधानें आहेत कीं जीं खोटीं आहेत असें सहज सिद्ध करून दाखवितां येईल. उदाहरणार्थ कांहीं विधानांचा येथें निर्देश करितों. ( १ ) अश्विन शुद्ध १० स भाऊंनीं हिंदुस्थानच्या स्वारीचा बेत प्रगट केला असें बुंदेलखंडप्रकरणाच्या ११५ व्या पृष्ठावर आहे; परंतु, हिंदुस्थानांत जाण्याचा अश्विनांत पेशव्यांचा मुळींच बेत नव्हता हें ह्या पुस्तकांतील मागील एका टीपेंत सिद्ध केलें आहे. ( २ ) कार्तिक वद्य १३ स भाऊ गारपीरावर डेरेदाखल झाले असें ११७ पृष्ठांत आहे; परंतु, भाऊ दसऱ्यालाच गारपिरावर जाऊन डेरेदाखल झाले होते हें सुप्रसिद्ध आहे ( ग्रांटडफ, बखरी, इ. ). ( ३ ) भाऊ गारपिरावरून आंबेडपूर, पैठण, हरडा इत्यादि मुकामांवरून हिंदुस्थानांत गेले व नानासाहेब ह्यावेळीं पुण्यास होते असें पृष्ठें ११९ । १२० त लिहिलें आहे; परंतु, भाऊ नगर, पैठण या शहरांवरून न जातां, सिद्धटेक, पेडापूर ह्या गांवांवरून उदगिरीस गेले व उदगीरची मोहीम चालू असतां नानासाहेब अहमदनगरच्या किल्ल्यांत बसले होते हें ह्या पुस्तकांतील मागील लेखांकांत स्पष्ट लिहिलें आहे. ( ४ ) ह्या बखरकाराला उदगीरच्या मोहिमेची वातमीच नव्हती असें दिसतें. कारण तिच्यासंबंधीं त्यानें एक शब्दहि लिहिला नाहीं. ( ५ ) भाऊ हिंदुस्थानांत गेल्यावर गिलज्या अटकेस आला म्हणून हा बखरकार लिहितो; परंतु, तें अगदींच टाकाऊ आहे. ( ६ ) सालीमगडाजवळ मराठ्यांचें सैन्य यमुना उतरून पलीकडे गेलें असें पृष्ठ १२५ त आहे; परंतु, पानिपतच्या मोहिमेंत मराठे यमुनेचा दक्षिणतीर सोडून कोठेंच गेले नाहींत. आग्रा, दिल्ली, कुंजपुरा, सोनपत, बागपत, पानिपत हीं स्थलें यमुनेच्या ह्या तीराला आहेत. ह्या स्थलांवरून मराठे पानिपताला गेले. अबदाली कोळजळेश्वरावर यमुनेच्या तीराला होता, तो, मराठे सोनपतावर गेल्यावर, यमुना नदी उतरून ह्या तीराला आला. ( ७ ) सरदारांच्या सैन्यांचे आंकडे दिले आहेत ते फारच अवाढव्य आहेत व त्यांची बेरीजहि बरावर नाहीं. ( ८ ) खंडण्याचे आंकडे दिले आहेत तेहि अविश्वसनीय आहेत. भरतपूरकर, उदेपूरकर, जयनगरकर इत्यादि मोठमोठ्या संस्थानिकांकडून पावणेनऊ लक्ष रुपये खंडणी येते व बाकी किरकोळ संस्थानिकांकडून एक्यायशीं लक्ष येते ! एकंदरींत ही सर्व बखर गप्पांनीं भरली आहे. तारखांच्या चुका, स्थलांच्या चुका ( आंबेडपूर, कुंजरपूर ), पुरुषांच्या नांवांच्या चुका ( कुकुमशाहा, सेवाखान ), प्रसंगांच्या चुका ( उदगीरच्या लढाईची विस्मृति, अबदाली सबंद एक वर्ष हिंदुस्थानांत होता ह्याची विस्मृति ), काल्पनिक आंकडे, बऱ्याच तिथी देऊन आपण त्या गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्या असें भासविण्याची दुरिच्छा, असा फारच वात्रटपणा ह्या बखरींत झाला आहे. रा. पारसनीस ह्मणतात त्याप्रमाणें ही

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब सिरोंजेअलीकडे आले; पुढें आगरियास आल्यावर आपण त्यांजकडे जाऊन[२९१] सविस्तर निवेदन करितों. ह्मणोन कितेक विचाराचा मजकूर लिहिला तो कळला. ऐशास, प्रस्तुत चिरंजीव राजश्री भाऊ कोठपावेतों गेले ? अबदाली कोठें आहे ? नजीबखान व ज्याहानखान पुढें आले होते ते कोठें आहेत ? तें विस्तारें तिकडील वर्तमान वरच्यावर लिहीत जाणें. कनोज फर्फुदच्या मुक्कामाचीं पत्रें पावलीं. नजीबखान, ज्याहानखान इटावियाकडे आले त्याचें वर्तमान काय ? आपले ठाणियाचें वर्तमान काय ? तें लिहिणें. जाणिजे. छ १२ जिलकाद. + हे विनंति.

---

[ २१० ] ॥ श्री ॥ २७ जून १७६०.

पु॥ राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः

विनंति उपरि. स्नानाकरितां गंगादक असावें याकरितां गंगोदकाच्या कावडी २ दोन चहूं दिवसाआड वरिचेवरी पाठवीत जाणें. जाणिजे. छ १३ जिलकाद. बहुत काय लिहिणें. + सतत चांगले निगेनें कावडी येत असें तरतुदेनें पाठवीत जाणें. पाणी पिणें जालें तरी त्याचा बंदोबस्त नीट करून पाठवीत जाणें. हे विनंति.

---

बखर समक्ष हजर असलेल्या गृहस्थानें लिहिलेली नाहीं; ती साधीहि नाहीं व तींत काव्येतिहाससंग्रहांत छापलेल्या बखरींच्यापेक्षां माहितीहि जास्त नाहीं. सारांश, ही सर्व बखर येथून तेथून बनावट आहे.

२९१ भाऊ आग्रयाला आले ह्मणजे आपण त्यांना जाऊन भेटतों ह्मणून गोविंदपंत नानासाहेबांना लिहितो; परंतु, भाऊ आग्रयाला आल्यावर गोविंदपंत इटाव्यापासून काहीं कामगिरीच्या निमित्तानें दूर निघून गेला. पानिपतच्या मोहिमेंत गोविंदपंत भाऊसाहेबांना मुळींच भेटला नाहीं.

[ २११ ]पे॥ छ २० जिलकाद.॥ श्री ॥ २७ जून १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

पो॥ सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. येथें ऐवजाची निकड फार आहे ह्मणोन तुह्मांस वारंवार लिहीत असतां कांहीं तरतुद करून ऐवज रवाना केला आहे ह्मणोन तुह्मी लिहितां. त्यास, पन्नास हजार रुपये रवाना केले आहेत ह्मणोन बातमी कळली. ऐशास, तुह्मी मातबर मामलेदार. जे समयीं जसा पैका आणवूं तसा तुह्मांकडून यावा. दिरंग लागो नये. ऐसें असोन तुह्मीच दिरंगावरी घालों लागल्यास दुसऱ्या मामलेदारांस काय शब्द लावावा? तुह्मीं यापें॥ करूं नये. तुह्मांकडून चवदापंधरा लाख ऐवज यावा. त्यापैकीं तुर्त पांचसात पाठवणें ह्मणोन लिहिलें असतां अद्याप ऐवज येत नाहीं हें अपूर्व आहे! याउपरि दिरंग न लावितां सदहू ऐवजाची तरतुद करून ऐवज सत्वर रवाना करणें. येथील वोढीमुळें परिछिन्न विलंबावरी न घालणें. आतां वाटेचेंहि ठीक आहे. तर ऐवज जलदीनें पाठवणें. जाणिजे. छ १३ जिलकाद, सु॥ इहिदे सितैन मया व अलफ. + बहुत काय लिहिणें. भदावरचे वाटेनें अगर ग्वालेरवरून सत्वर चांगला ऐवज यावा. लाख पन्नासानें होणें काय? हे विनंति. जो जमा होईल तो वरचेवर पाठवणें. त्या ( विलंब )॰ लागल्या चाकरीस फार शब्द लागेल. हे विनंति. एकादो महिन्यांत रसदेचाहि भरणा [२९२]इकडेच करणें. हे विनंति.

---

२९२ भाऊसाहेब हिंदुस्थानांतील मामलेदारांकडून रसदेचे पैसे मागवीत हें ह्या वाक्यावरून उघड आहे. गोविंदपंताला पचवीस लाख रुपये बाकीचे व रसदेचे मिळून द्यावयाचे होते; परतु, तें त्यानें शेवटपर्यंत मुळींच दिले नाहींत. हे पन्नास हजार व शेवटीं एकदां साडे चार लाख गोविंदपंतानें पाठविले; परंतु, त्यापैकीं कांहीं गिलच्यांनीं मध्येंच लुटून नेले. गोविंदपंताच्या प्रांतांत दंगाधोपा बिलकुल नव्हता. असें असून गोविंदपंतानें

[२१२] पे॥ प्रथम श्रावण वद्य १३, ॥ श्री ॥
मु॥ सेगरनदी ( १० जुलै १७६० ). ४ जुलै १७६०.

राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी विनंति उपरि. पत्र आषाढ शुद्ध त्रयोदशीचें पाठविलें त्यांत मजकूर. सुज्याअतदौला जातात; ऐकत नाहीं. पार फौज उतरावी. इटावियाकडून आपण येतों. आगरियाजवळ स्वामी आले, फौज उतरली ह्मणजे हें निमित्य करून फिरतील ह्मणोन व अबदालीचे लष्करची बातमी. तीर्थरूपाकडे जिन्नस रवाना केला तो सर्व कळला. ऐशियास, सुज्याअतदौला जातात. पुढें तेथें जाऊन तिकडून कांहीं पेंच पडला तर—तर कसें करितील ? हें कळत नाहीं. अथवा जरब मातबर आमचे तर्फेनें सारियावरी बसेल तेव्हांच नरम येतील. पुढें वर्तमान लिहीत जाणें. शाहाजादे दोहींकडे येत नाहींत असें आहे तें बरेंच आहे. तुर्त असेंच असावें. तिकडे न जावें हेंच उत्तम आहे. फर्मांशी जिन्नस पाठविला, उत्तम केलें. पैका पाठवावयास फीर दिवस लागले. लौकर पाठवणें. पार[२९३] उतरून आपले ठाणियाचा बंदोबस्त करणें. पाऊसामुळें गंभीर नदीस पाणी, यास्तव मुक्काम जाहाले. एका दो दिवशीं आगरियास जाऊं. पूल बांधोन पार फौज उतरूं. तुह्मांकडेहि फौज कांहीं येईल. वरचेवरी गिलज्याचे लष्करचें वर्तमान लिहिणें. सुज्याअतदौला गेले. तेव्हां

---

कोणत्या सबबीवर व कोणाच्या जोरावर पैसे पाठविण्याचें लांबणीवर टाकिले ? भाऊसाहेबाचा संचार पानिपतपर्यंत अव्याहत झाला. जेथें जावें तेथें त्यांना जयच येत गेला. तेव्हां त्यांस पैशाची मदत केली असतां ते फारच बलिष्ठ होतील व दिल्लीस नवीन एखादें राज्य स्थापून स्वतंत्रपणें कारभार करतील असा मत्सर नानासाहेबांच्या मनांत कदाचित् आला असेल. ऐतिहासिकलेखसंग्रहांतील नंबर २५ च्या सारांशांत हा मत्सराचा विचार सखारामबापूनें नानासाहेबांच्या डोक्यांत भरवून दिला व भाऊसाहेबांना ऐवज न देण्याविषयीं हिंदुस्थानांतील मामलतदारांस ताकिदी करविल्या असा मजकूर लिहिलेला आहे. ह्या ताकिदाच्या जोरावर गोविंदपंतानें पैसे देण्यास विलंब लावला असावा. ह्या ताकिदी गुप्तपणें गेल्या असाव्या.

२९३ गंभीर नदीच्या पार.

त्याचे तालुकियांत जमीदारांनीं फिसाद करावी, त्यास पायबंद बसावा, याचा विचार काय तो माहितगारीनें सर्व लिहिणें. तुमचे लगामी कोण-कोण आहेत, तजवीज सर्व लिहिणें. जशी आज्ञा होईल तसें करणें. तुह्मी, गोपाळराव गणेश, गणेश संभाजी, गोपाळराव बापुजी ऐसे सारि-यानें फौजसुद्धां अंतर्वेदींत उतरावें. काळेचे सुमारें सारियानें जमा व्हावें. आपले आपले ठाणियाचा बंदोबस्त करावा. सरकारचे फौजेची उतराव-याची तरतुद करणें ती करूं. जाणिजे. छ २० जिलकाद. + हे विनंति.

---

[ २१३ ] ॥ श्री ॥ ८ जुलै १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसः

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. तुह्माकडील हिशेब तिगस्तां चौसाला विल्हे लाविला त्याची नकल व गुदस्तां अजमास करून तुह्माकडे पाठविला आहे त्याची अशा दोन नकला असल अजमासाप्रमाणें व हिशेबाप्रमाणें करून सत्वर पाठवणें. अलीकडे दोन साला तुमचे महालची जमाबंदी कळत नाहीं त्यास जमा व वसूल यांचा अजमास स्थूलमानेंकरून पाठविणें. तुह्मां भेटीस याल तेव्हां समागमें कागदपत्र घेऊन यालच. परंतु अगोदर प्रयोजन कागद-पत्रांचें आहे. यास्तव कासीद जोडी याच कामासाठीं पाठविली आहे. याजबा॥ सदर्हूप्रमाणें पाठवून देणें. रवाना छ २४ जिलकाद. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २१४ ] ॥ श्री ॥ ८ जुलै १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः

पोष्य बाळाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. सरकारांत नाटकशाळांचें प्रयोजन आहे. तरी जातीच्या शुद्ध, चांगल्या, जरूर, दोन तीन, तरण्या[२९४] मिळवून पाठविणें. फार चांगल्या पाठविणें. छ २४ जिलकाद. हे विनंति.

---

[ २१५ ]

॥ श्री ॥

८ जुलै १७६०.

राजश्रीयाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यासः

पो॥ सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मीं आषाढ शुद्ध पौर्णिमेचीं पत्रें पाठविलीं तीं छ २२ जिलकादीं पावलीं. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. कलमें त्रि त॥.

सुज्याअतदौले यांस कित्येक प्रकारें खरीं लटकीं बोलोन नजीबखान याणीं बीर देऊन अबदालीच्या भेटीस चालविलें. सुज्याअतदौलास कित्येक पुरातन नामी लोक सांगत होते जे मराठ्यांशीं सलूख करणें उत्तम आहे; अगर दोहींकडीलहि भावगर्भ पाहून मग जिकडील जोरा तिकडे सलूख करावा. तूर्त अबदालीकडे जाऊं नये. याप्रमाणें सांगत असतां न ऐकून जावयाचें केलें आहे. जात आहेत. कसकसें शेवटास जाईल प-

राजश्री रामाजी अनंत व नारो शंकर सुज्यातदौले याकडे रवाना केले आहेत, त्याच्या थैल्या पत्रें पाठविलीं तीं पावलीं. आजच याचा मजकूर लिहून सुज्यातदौलाकडे जोडी रवाना केली आहे. उत्तरें लोकरच येतील. व हे उभयता इकडे आलियावर ते आह्मी मिळून जाऊं. जरी त्यांचा मुकाम कोठें आह्मी जाऊ तो जाहल्यास उत्तम आहे, आणि दरकूच गेले तरी उपाय नाहीं ह्मणून लिहिलें तें कळलें. ऐशियास सुज्याअतदौला

२९४ लग्नामुंजींच्या समारंभांत, उत्सवांत, भेटींचे समयीं नाचण्यास नाटकशाळा [मागी]ल्या शतकांत लागत असत.

हावें ह्मणून लिहिलें तें कळलें. ऐशास मुज्याअतदौला अबदालीकडे गेले. जे जे करार केले ते लटके, आणि अबदालीच त्यास फार चांगला वाटला. याउपरी त्याचें अन्न इकडे नाहीं. यास्तव गंगापारचे जमीनदारांजवळून दंगा करवावा. बलवडसिंग यास लिहावें, आणि त्याचे तालुक्यांत गंगापार उतरावयाचा प्रकार असेल ती जागा पहावी. जें बोलतील मागतील तें लावावें. हें काम करावें लागतें. चालना करणें. जे तुमचे हातीं असतील त्यांस ठीक करणें. लिहून पाठविणें. अंतर्वेदींत उतरून आपला अमल करणें. ठाणीं सारीं बसवणें. वरचेवरी वर्तमान लिहीत जाणें.

अकबरपूरचें ठाणें, गोपाळराव बापूजीचे ठाणेदारानें टाकलें होतें, आणि जमीदारांनीं शह टळतांच त्याचे कमाविसदाराचें ठाणें बसविलें. त्यास तिकडील बंदोबस्त कसा आहे तें लिहिणें.

तिकडे गेले यास हुजूर बोलाविले आहेत. अगरियास पलीकडून येतील. अथवा इकडूनच येतील. पुढें उपयोग देखिला तर पाठवूं.

पैकियाची कांहींच तरतूद होत नाहीं हें फारच अपूर्व आहे असें तुह्मास नसावें. जलदीनें पैका पोहोंचविणें.

गोपाळराव गणेश याचा अमल चांगलाच आहे. आतां याणीं, तुह्मीं, गणेश संभाजी याणीं आपली सारी फौजसुद्धां निशान कोळजलेश्वर या सुमारें भिवगांव येथवर यावें. सकुराबाद वगैरे ठाणीं बसलीं राहिलीं तीं बसतील. सकुराबाद मातबर ठाणें आहे, तेथें सारियाचा जमाव पाडून अमल ठीक करणें. अगरियास पूल बांधून इकडूनहि फौजा पार उतरून पलीकडे येईल, आणि तिकडील बंदोबस्त ठीक करणें. याउपरि पार उतरून कोळपर्यंत बंदोबस्त करावयास चिंता नाहीं. जाटांचीं ठाणीं जाट कायम करणार व केलीं. फौजहि त्याची सरकारची उतरणें. तुह्मीं तिकडून येणें ह्मणजे ठीक होऊन येईल. ठाणीं यांची मजबुती चांगली करणें. जाणिजे.

रवाना छ २४ जिलकाद. हे विनंति.

[ २१६ ] ॥ श्री ॥ १० जुलै १७६०

राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

विनंति उपरि-- तुमचे पदरीं मामला केवढा ! तुह्मांपासून रुपया येणें किती ! आणि कांहींच येत नाहीं. येथें खर्चाची निकड. हें कांहींच मनांत नाहीं. अपूर्व आहे ! मागें कांहीं नव्हतें त्या दिवसांत कशी चाकरी केलीत ! कसें बरें ह्मणोन घेऊन या पद्धतीस आलां ! आतां तरी खावंदाचे इतबारी, मातबर मामलत पदरीं, पत चांगली, जर दंगा फार जाला तर एके सालचा ऐवज सरकारांत कर्जदाखल मेळवून द्यावा परंतु सरकारचें काम अडूं न द्यावें ! हे योग्यता असतां तपशील लिहितां हें याउपरि न करणें. पहिले लिहिल्याप्रे॥ बाकीचे ऐवजीं रुपये व रसदेचा ऐवज झाडून तरतूद हाली सालचा करणें आणि पावता करणें. याशिवाय सावकारी कांहीं कर्ज मिळेल तरी मेळवणें. हिंदुपत तुमचे मामलतेतील त्यांणीं पत्र पावतांच सत्वर फौजसुद्धां यावें. तें न करितां गुमानसिंग खुमानसिंग यास बगलेंत घेऊन सरकारचे मामलतींत उफराठी खरात्री मांडली असे. हे गोष्ट कांहीं त्यास बरी नाहीं. तुह्मी कशी करूं देतां ? त्याचा वकील आला, निष्ठेनें बोलला, त्यावरून भरंवसा आला. दुसरें, याजवर उपकार किती ! असें असतां, अबदालीची मसलत पडली असतां, घरचे कजिये काढून ह्या गोष्टी कराव्या येणेंकरून यास याचे वडील बरें स्वर्गीं कसें ह्मणतील ? व याचेंहि बरें काय होईल ? काम तो श्रीकृपेनें खातरखा घडेल. याजवर मात्र शब्द लागेल. पुढें फार वाईट. त्यास हें समजावून ताबडतोब त्यास फौजसुद्धां आणून पोहोंचावणें. अब्दाली राहिला तेव्हां त्याचें पारपत्य करणें. दो महिन्यांचा अवकाश आहे तों त्यांणीं यावें. तिकडील कजियांत एकंदर येऊं नये. आलिया बरें नाहीं. तुह्मीं फौजसुद्धां अंतर्वेदींत उतरणें. गोपाळराव गणेश यांस मेळवून घेणें. तुह्मी, ते व कांहीं गणेश संभाजी याचेहि राऊत येतील. तिकडून सारा बंदोबस्त करीत शिकोराबाद येथें येणें. तेथें सरकारचें ठाणेंहि बसलें आहे. तुह्मीं कोळजळेश्वरपर्यंत आपला अंमल बसवणें. जाटाचेहि

लोक पलीकडे गेले आहेत. आणखी जातील. आह्मी जलदीनेंच पार फौज आगरियाजवळ पूल बांधोन उतरतों. एका दो दिवशीं आगरियास जाऊं. पाऊसांमुळें इतके मुकाम जाहाले. नाहीं तर पोहोचलों असतों. सुज्याअतदौला यांणीं पुर्ती लबाडी केली. याउपरि त्याचे तालुकियांत फौज उतरावी. जमीदार सर्व आपले लगामी लागावयाचे असले त्याजला उत्तेजन देऊन दंगा करवावा. तमाम अंमल उठवावा. तसेंच बलबडसिंग याजपासूनहि दंगा करवावा. याची तरतूद अव्वल केली पाहिजे. हें जरूर करणें. सर्व प्रकार, कसे कोण हातीं आहेत, ते कसें करणार, सरकारची फौज उतरलिया नावांचें अनुकूल कसें पडतें तेंहि सर्व लिहिणें. प्रयागपर्यंत अंतर्वेदींत त्याचा अंमल आहे तो उठवावा. प्रयागचें राजकारण जाहालें तर करावें. परंतु अंतर्वेदींत जो अंमल असेल तो उठवावा. हें करावें. पारचीहि तरतूद करणें. उत्तर सविस्तर पाठवणें. जाटाचे परगणियांत त्याचीं ठाणीं बसवणें. आपले परगणियांत आपलीं बसवणें. बुंधेले पाठवणें. गंगापारचीं राजकारणें नीट करणें. फौज तुह्मांजवळ पाठवून तुमची रवानगी करावी लागेल. मामला गेला तरी एक साल तुह्मीं कर्ज पतीवर मेळवून द्यावें. तसा तो मजकूर नाहीं. बाकीचे ऐवजीं व रसद मिळोन पंचवीस लाख सत्वर तरतूद करून पाठवणें. त्या लिहिणें या दिवसांत फारच वाईट वाटतें. तुह्मांपासून मोठीं कामें घेणें. तुह्मीं तरतूदच करावी. र॥ छ २६ जिलकाद. बहुत कार्य लिहिणें. हे विनंति.

---

२९५ गोविंदपंताला भाऊसाहेबांनीं खालील आठ कामें सांगितलीं होतीं. ( १ ) पंचवीस लाख रुपये सत्वर पाठवून देणें. ( २ ) बारीक बातमी शत्रूकडील जलद पाठवणें. ( ३ ) सुज्याअतदौला याला आपल्या बाजूला ओढणें. तो अबदालीला मिळाल्यावर, त्याच्या प्रांतांत प्रयाग वगैरे ठिकाणीं दंगा करणें. ( ४ ) गोपाळराव गणेश, गणेश संभाजी व गोपाळराव बापूजी यांच्यासह अंतर्वेदींत येऊन कोळजळेश्वरीं ठाणें देऊन सुजाअतदौल्या-

पे॥ छ १६ जिल्हेज. ॥ श्री ॥ 　　　　　　　　　　१६ जुलै १७६०.

[illegible]विराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी. यांसः [illegible]दाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल [illegible] कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. आह्मीं सर-[illegible]वर्तमान छ २ जिलकादीं मथुरेवर आलों. पुढें कर्तव्यार्थ करीतच आहों. पलीकडे उतरावें तर नदीस पाणी फार. त्यांत जाटांकडील हजार दोन तीन फार[२९६] उतरली. मानाजी पायगुडे वगैरे सरकारचीं पतकेंहि उतरणार. नलीकडील ठाणियांचा बंदोबस्त करावयास हे फौज फार उतरली. यावरून अबदालीकडीलहि मातबर फौज इकडील शहास येणार. यास्तव तुह्मीं फार सावध राहणें. ठाण्यांचा बंदोबस्त उत्तम रीतीनें करणें. कदाचित् तिकडे त्यांची फौज आली, तर ठाणेदार मरत न पळत ऐशी मजबुदी करणें. येथेंहि सरकारची आणखी फौज फार उतरली, तर तुह्मांसहि वरचेवर इतला दिला जाईल. परंतु सावधगिरीनें राहणें. रवाना छ २ जिल्हेज. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

*ला व अबदालीला पायबंद देणें. ( ५ ) जमीदारांकडून दगा सुजाउद्दवल्याच्या प्रांतांत करविणें. ( ६ ) बुंधेल्यांना सरकारच्या प्रांतांत दंगा करूं न देणें. (७) बुंधेल्या सरदारांना सैन्यासह भाऊसाहेबांकडे पाठविणें. ( ८ ) यमुना उतरण्यास नावा जमविणें. ह्या आठ कामांपैकीं एकहि काम गोविंदपंताचे हातून झालें नाहीं. भाऊसाहेबांची ओरड शेवटपर्यंत एकसारखी चालूं होती.*

*२९६ ' फार ' हा शब्द ' पार ' ह्या शब्दाबद्दल लिहिलेला दिसतो.*

*भाऊसाहेबाचे मनांतून यमुना उतरून अंतर्वेदींतून अबदालीला रेटीत यमुनेंत नेऊन बुडवावयाचें होतें असें दिसतें. परंतु, बोटी न मिळाल्यामुळें व पूल बांधतां न आल्यामुळें यमुना उतरून जाण्याचा बेत रहित करणें भाऊस भाग पडलें. गोविंदपंताला नावा जमा करावयाला सांगितलें असून त्या त्यानें केल्या नाहींत.*

[ २१७ अ ] ॥ श्री ॥ अजमासें ५ जुलै १७६०.

राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

विनंति उपरि. तुह्मीं दोन पत्रें एकासारिखींएक मजकुराचीं पाठविलीं, त्यांत कलमवार सुज्याअतदौला याजकडील मजकूर व पत्रें पाठवून द्यावयाचा अर्थ लिहिला तो कळला. ऐशियास, कलमवार मतलबाचें उत्तर, सरदारांची आमची भेट रविवारीं[२१७] होणार ती होऊन, पाठवूं. तूर्त पत्र खातरनिशेचें सुज्याअतदौलास व त्याचे मातोश्रीस पाठविलें आहे. त्यांणीं, आह्मी जवळ आलों, आतां चित्त थीर करून, अबदालीचें भय चित्तांतून टाकून, निःशंकपणें आह्मांस येऊन मिळावें. त्यांत फार नफे आहेत. अबदाली अनेक प्रकारें त्यास वाईट तेंच करील. नजीबखान मायावी, हरप्रकारें यास फसवील. परंतु यांत नफा नाहीं. फारच गैरनफियाची गोष्ट. ते स्नेही आणि आह्मांस त्याचें कल्याण व आपलाहि उपयोग तेंच सांगणें. यास्तव साफ उत्तर देऊन नजीबखान यास लावावें. नजीबखानाचेंहि पारपत्य त्याचे चित्तानुरूप होईल. तरी हा प्रकार बोलोन, त्याचे गोसावी व कांहीं फौज अलीकडे उतरली ती त्याजकडे जाणार हें आहे, तरी ती गोष्ट सहसा न व्हावी हेंहि करणें. वर्तमान लिहिणें. जाट आपलीं ठाणीं कायम करितात. आह्मी आगरियाजवळ जातों. तुह्मीं तिकडील ठाणीं कायम करणें. नजीबखानास, धुडावून तुलवियाचा विचार सुज्याअतदौला याजकडून करणें. वर्तमान लिहीत जाणें. जाणिजे. दिल्लीहून वर्तमान आलें कीं अबदालीनें मारेकरी सुज्याअतदौलास घातले होते. त्यास ते व कागदपत्र सांपडलें. सुज्याअतदौला यांणीं त्यास मारलें. त्यास याचाहि मजकूर कसा तें लिहिणें. तुमची बातमी बारीक मोठी रीतीनें फारच आहे. तुह्मांकडे खबर येऊन मग इकडे यावयास उशीर लागतो. त्यास अबदालीचे लष्करांतून व सुज्याअतदौला याचे लष्करांतून बातमी परभारें इकडे यावी असें करणें. पैकियाची तरतूद केली परंतु येत नाहीं. येथं वोढ. उज्जनीहून पैका आला परंत पंधरा रोजांत उडून जाईल. भरंवसा

२१७ ६ जुलै १७६०, रविवारीं भाऊंची व सरदारांची भेट झाली.

मातबर पैकियाचा तुमचाच. त्या सत्वर पैका येईसा पाठवणें. वाट चांगलीच आहे. जरूर रवानगी करणें. जाणिजे. पंधरा लाख रु॥ जरूर पाठवणें. हे विनंति. भदावराकडून रोजांत पांच

---

[ २१७ ई ] ॥ श्री ॥

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

पो॥ विश्वासराव[२९८] बल्लाळ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. याउपरिहि सविस्तर वर्तमान निरंतर लिहीत जाणें. वरकड वर्तमान तीर्थरूपांनीं लिहिलें आहे त्याजवरून सविस्तर कळेल. +बहुत काय लिहिणें. हें विनंति.

---

[ २१७ ऊ ]. ॥ श्री ॥

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

पो॥ महीपतराव[२९९] आवजी कृतानेक सा॥ दंडवत विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. आपलें पत्र आलें तें पावोन संतोष जाहला. लिहिला अर्थ सविस्तर कळों आला. ऐसेंच

---

२९८ विश्वासरावाचीं हीं अशींच कुशलार्थाचीं आमचे जवळील सर्व पत्रें आहेत. भाऊसाहेब बरोबर असल्यामुळें विश्वासरावाला प्रमुखपणें वागतां येत नसे.

२९९ पानिपतच्या लढाईंत परभू गृहस्थ हा एवढाच दिसतो. भाऊसाहेबांच्या कैफियतींत ( पृष्ठ १२ ) बाजी हरी ह्मणून एक नांव येतें तें कदाचित् कोण्या परभू सरदाराचें असावें. त्यावेळीं परभूमंडळ नागपूरच्या दरबारांत विशेष होतें. परंतु, जानोजी व मुधोजी भोसले यांच्यापैकीं पानिपताला कोणीच गेला नाहीं. तेव्हां त्यांच्या पदरचीं परभूमंडळीहि गेली नाहीं हें रास्तच होतें.

सदैव पत्र पाठवीत जावें. श्रीमंताच्या पत्रांचीं उत्तरें पाठविलीं आहेत त्यावरून सर्व कळों येईल. श्रीमंतीं लिहिलेप्रमाणें॥ तरतूद करावी. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २१८ ] ॥ श्री ॥ २२ जुलै १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. पत्रें पाठविलीं तीं पावलीं. सुज्यातदौले याजकडील व अबदालीकडील व रोहिले यांचें वर्तमान विस्तारें लिहिलें तें सर्व कळलें. ऐशियास, ये विषयींचा प्रकार अलाहिदा पुरवणी पत्रीं लिहिला आहे त्यावरून कळेल. वरचेवर तिकडील बारीकमोठें वर्तमान लिहीत जाणें. रवाना छ ९ जिल्हेज. हे विनंति.

---

[ २१९ ] ॥ श्री ॥ २२ जुलै १७६०.

पुरवणी राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांस:

विनंति उपरि. शाहाजादा, पटणें मजबूद. जाफरअलीचा पुत्राहि जमावसुद्धां आला. त्यामुळें पटणें सोडून झाडींत गेला. त्यामागें मीरनाहि गेला. त्याकडे काशीद गेले आहेत. वर्तमान आलिया लिहून पाठवितों. शाहाजाद्याकडे अबदालीचे, सुजाउतदौलाचे, नजीबखानाचे, आणावयास वकील गेले आहेत. परंतु, त्याणें विचार केला कीं कोणी वजीर जाहालिया आपणास उपयोगीं नाहीं. यास्तव सध्यां कोठेंच न जावें हा विचार करून त्यांस उत्तरें बाजतबरसात जें करणें तें करूं ह्मणून लिहून

दिली. तो जात नाहीं ह्मणून लिहिलें तें कळलें. याउपरहि तिकडून बातमी उत्तम प्रकारें राखून लिहून पाठवीत जाणें. र॥ छ ९ जिल्हेज. हे विनंति.

---

[ २२० ]

॥ श्री ॥ २७ जुलै १७६०.

पुरवणी राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसः

विनंति उपरि. पत्रें पाठविलीं तीं पावलीं. सुजातदौले यांच्या मुलुखांत दंगा करावयाचा प्रकार लिहिला, त्यास मातबर मातबर जमीनदारांस पत्रें पाठवून लगामी लावून ठेविले आहेत. त्यांचे वकील आणून सविस्तर लिहितों. त्याजकडे कुमकेस सरकारची फौज दहा हजार यावी ह्मणजे सर्व गोष्टी ठीक होतील. परंतु काशींतील बंदोबस्त केला पाहिजे ह्मणून लिहिलें तें कळलें. ऐशास, दिलीकडील काम उरकल्यानंतर पार फौज येईल. परंतु जमीदारांस बोलावून तालुक्यांत बखेडा करावयास विलंब न करणें. काशीचा बंदोबस्त तुह्मी हुजूर आलियानंतर केला जाईल. रवाना छ १४ जिल्हेज. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

[ २२१ ]

॥ श्री ॥ २८ जुलै १७६०.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मीं विनंतिपत्रें पाठविलीं तीं पावलीं. ठाण्यांचा बंदोबस्त ठीक करून लौकरीच हुजूर येऊन पोहोचतों ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशास, उत्तम आहे. बंदोबस्त करावयास दिरंग न लावणें.

सत्वरीच सर्व बंदोबस्त ठीक करणें. वरकड सर्व पुरवणीपत्रीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. रा। छ १४ जिल्हेज. हे विनंति.

---

[ १२२ ] ॥ श्री ॥ २८ जुलै १७६०.

पु॥ राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

विनंति उपरि: अबदालीचे मतें आपले देशास जावें, लढाई एकंदर पाडूं नये. एक वाटा त्याची देशची फौज गेली; दोन वाटे राहिली आहे. सुज्यातदौले यांचे मतें आपले हातें व नजीबखान रोहिले यांचे हातें अबदालीकडील तह श्रीमंतांनीं करवावा, ह्मणजे आह्मी सर्व ठीक करून देऊं, त्यास देशास लावून देऊं. या अन्वयें त्याचीं पत्रें आपणास येतात. तरी सुज्यातदौले यांस पत्र थैली सरकारांतून पाठवावी. त्यांत आमचे लिहिण्यास हवाला घालून ल्याहावें. हें चित्तास आलें तरी करावें, ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशियास, सध्यां सरदार व बळवंतराव गणपत दिल्लीस पाठविले आहेत. त्यांनीं शहर घेतलें. किल्लाहि सत्वर घेतील. आह्मी मजलदरमजल तेथें जातों. तें काम जालियानंतर येविशींचें लिहून पाठवूं. तुह्मीं तिकडील वर्तमान आणवून वरचेवर लिहून पाठवीत जाणें. अंतर्वेदींतून तुह्मांकडून उगळा असावा. रा। छ १४ जिल्हेज. हे विनंति.

---

[ १२३ ] ॥ श्री ॥ २८ जुलै १७६०.

पु॥ राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

विनंति उपरि. सुज्यातदौले व नजीबखान यांजकडील मा।र विस्तारें

लिहिला व दिल्लींत फौज त्यांची हजारांपर्यंत आहे, अधिक नाहीं, येविशीं आह्मांस आज्ञा करावी ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशियास, दिल्लीस उभयतां सरदार व राजश्री बळवंतराव गणपत हुजरातची फौजसुद्धां रवाना केले. त्यांणीं दिल्लीस जाऊन, हल्ला करून शहर घेतलें. त्याच लगटासरसे किल्यांतहि लोक शेंपन्नास जाऊन पोहोचले. परंतु लोक किल्यांत जाऊन लुटीस गुंतले. त्यामुळें फिरोन किल्लेकारांनीं सावध होऊन बाहेर काढिले. प्रस्तुत यांणीं तमाम शहरचा बंदोबस्त केला. किल्यास मोर्चे लाविले आहेत. लौकरीच फत्ते होईल. आह्मीहि दरकुच जात असो. एकादो दिवशीं खासा स्वारी जाऊन पोहोचेल. तुह्मांस कळावें ह्मणोन लिहिलें असे. रा। छ १४ जिल्हेज. हे विनंति.

---

[ २२४ ] पे॥ छ ४ मोहरम. ॥ श्री ॥ २ आगष्ट १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. तुमचीं पत्रें आलीं तीं पावलीं. सायंत लिहिलें वर्तमान कळों आलें. याउपरिहि तिकडील सर्व वरीचेवरी लिहीत जाणें. खासा स्वारी मजलदरमजल येऊन दिल्लीस दाखल जाहाली. तमाम शहराचा बंदोबस्त केला. किल्यांत अबदालीकडील लोक होते याकरितां किल्यास मोर्चे लाविले. खंदकावरी मोर्चे कायम होऊन तोफांचा मार दिल्हा. तेव्हां आंतील लोक घाबरे होऊन कौल मागों लागले. सबब त्यांस कौल

३०० 'आठशें पठाण' ह्मणून भाऊसाहेब यांच्या कैफियतींत (पृष्ठ ९) लिहिलें आहे. त्याच पृष्ठावर वरती 'आठ हजार' पठाण ह्मणून लिहिलें आहे तें चुकलें आहे. ही चूक मूळ बखरीवरून दुसरी प्रत करून घेणाऱ्याची आहे. 'भाऊसाहेबांच्या बखरी'प्रमाणें हीहि बखर बरीच विश्वसनीय आहे. छापील प्रत मूळ अस्सल बखरीवरून केलेली नाहीं; अस्सल बखरीच्या एखाद्या लेखी प्रतीवरून केलेली आहे.

देऊन हत्यारसुद्धां बाहेर काढून [३०१] छ १९ जिल्हेजीं किल्ला फत्ते जाहाला. जागा फारच बेश, मजबुदीची आहे. याउपरि सर्व बंदोबस्त यथास्थित होईल. सुज्यांअतदौलेहि जवळ यमुनेचे पैलतीरीं येऊन उतरले आहेत. गोड बोलतात. पुढें होईल वर्तमान तें लिहिलें जाईल. ऐवजाविशीं वारंवार लिहिलें असोन अद्याप ऐवज येत नाहीं हे कोण गोष्ट ! याउपरि पत्र पावतांच बाकीचा ऐवज व रसदेचा भरणा करून जलदीनें पाठवणें. विलंब न लावणें. ऐवज रवाना जाहला आहे तोहि ताकीद करून सत्वर येई तें करणें. + ऐवजाविशीं वारंवार लेहून मागलों ! याउपर मिळेल त्यापासून पैका घ्यावा हेंच बाकी राहिली ! श्रीरंगपट्टणाचे [३०२] वर्षीं फारकरून दाखवायाचें

---

३०१ १आगष्ट १७६०.

३०२ श्रीरंगपट्टणचें वर्ष ह्मणजे इ. स. १७५७. ह्या वर्षीं फेब्रुवारींत नानासाहेब पुण्याहून निघून मार्च-एप्रिलांत श्रीरंगपट्टणाजवळ जाऊन तेथून खंडणी घेऊन जूनअखेर पुण्यास आले. पाठीमागें, गोपाळराव गोविंद, मल्हारराव भिकाजी व बळवंतराव गणपत ही मंडळी तें सबंद साल तिकडेच खंडण्या वसूल करीत होती. १७५७ च्या जुलैंत नाना व भाऊ पुण्यास असतां गोविंदपंत बुंदेले त्यांस भेटण्यास आले होते ( लेखांक ७२ ). 'मराठ्यांचे पराक्रमां'त ( पृष्ठें १०२ व १०३ ) रा. पारसनीस ह्मणतात कीं गोविंदपंत बुंदेले पुण्यास सावनूरच्या मोहिमेच्या अगोदर आले होते त्यावेळीं त्यांनीं शहाण्णव लक्षांच्या हुंड्या श्रीमंतांपुढें ठेविल्या व हिंदुस्थानांत परत येतांना बहुमानार्थ पेशव्यांनीं कानिटकर व येरंडे हे दोन दरखदार त्यांस नेमून दिले. कानिटकर व येरंडे हे दरखदार पंतांच्या 'बहुमानार्थ नेमून दिले नसून, पंत हिशेबांत कुचराई करीत ती त्यांनीं न करावी ह्मणून त्यांच्यावर देखरेखीकरितां पाठवून दिले होते, हें आह्मी मागील एका टीपेंत साधार दाखवून दिलेंच आहे. कानिटकर व येरंडे १७५७ त गोविंदपंतावरोबर हिंदुस्थानांत गेले हेंहि गोविंदपंताच्या १७५९ तील पत्रांवरून स्पष्ट आहे. तेव्हां गोविंदपंत सावनूरच्या मोहिमेच्या अगोदर पुण्यास आला व त्यावेळीं हे दरखदार त्याच्यावरोबर हिंदुस्थानांत गेले हें विधान निराधार आहे हें उघड आहे. सावनूरची मोहीम १७५५च्या दसऱ्यास सुरू झाली. अर्थात् १७५५ त हे दरखदार गोविंदपंतावरोवर गेले नाहींत हें अतिच स्पष्ट आहे. तसेंच गोविंदपंत स्वतः १७५५ त पुण्यास आला होता कीं काय हेंच मुळीं संशयग्रस्त आहे. ह्या विधानावर बखरीखेरीज इतर योग्य आधार असल्याशिवाय विश्वास ठेववत नाहीं. तसेंच गोविंदपंतानें ९६ लक्ष रुपये पेशव्यांस वहाल केले ह्मणून एक विस्मयजनक पोटविधान आहे. परंतु, गोविंदपंताच्या हिशेबाची धरसोड पहातां व त्याचा एकंदर दर्जा पहातां, इतकी रक्कम

बोलत होता. प्रस्तुत रसद वगैरे पैक्याची तरतुद होऊन येईना, हें कामाचें नाहीं. अंतर्वेदचा बंदोबस्त करणें. बंगस व कांहीं रोहिले घरास जातील. सुजादौलाची उमेद अबदालीस कळली! आंतील आंतहि[303] पेंच वाढतील. दिल्ली घेतल्यामुळें कमर तुटली! पुढें सर्व उपाय करणें तो करितों. लढाई तर पा॑ण्यावर[304] मौकूफ आहे. तोंपर्यंत फुटफाट करणें ते करितों. तुमची बातमी ठीक आहे. वरचेवर लिहीत जाणें. रा॥ छ २० जिल्हेज. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

२२५ ]

॥ श्री ॥

१ आगष्ट १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री मुकुंदपंत स्वामीचे सेवेसी:
ेष्य गोविंद बल्लाळ सा॥ नमस्कार विनंति. उपरि येथील कुशल त॥ श्रावण वद्य १३ मुक्काम नदी सेगर जाणून स्वकीय कुशल लेखन असिलें पाहिजे. विशेष. पठाण फरुकाबादकर कनवजेस हजार स्वार झाला आणि चारशे स्वार बलबेर येथेंहि आहेत. त्याजला तेथून ड़िलें पाहिजे. नाहीं तर, मागती मुलकांत फितुर होणार. चार सा कार्य आहे. मी माघारा येतांच, तमाम सरदार माघारे येणार. नालबंदी पाहिजे; कोणास अर्जबाब; व कोणी आह्मी तेथेंच ते असा प्रसंग! जर अम्हीं तपशील लिहावा तर फडनिसास संशय ोतो कीं हे महिना दोन महिने फिरावयास जातात. हें त्याजला ात. आणि येथें लढाईचा प्रसंग दिसतो. त्यास, तुह्मीं व जनार्दनपंत,

---

म वहाल करण्याची त्याची ऐपत होती असें बिलकुल वाटत नाहीं. भाऊसाहेबाला याने सवंद वर्षांत २५ लाख रुपये देववतना, तो शहाण्णव लाख रुपये वहाल देईल ात् हिशेबी पुरावा आल्यावांचून खरें मानितां येत नाहीं.

३ अबदालीकडील सरदारांसरदारांत.

यमुनेच्या पुरावर.

चिरंजीव बाबा, उमरगडीं एकत्र होणें. कीं पठाणाकडील काम नासो अगर होवो तुह्मीं येणें. तर तैसेंच लिहिणें. अगर आठ रोजांत पठाणाचें पारपत्य करून फौज त्या शहवर ठेवून येणें, नव रोज लागणार नाहीं, तरी तसेंच लिहिणें. हे दोन्ही कार्यास न येत. आह्मीं जाऊंच नये माघारे उमरगडीं यावें तर तैसेंच लिहिणें. सत्वर उत्तर पाठविणें. फौजेचा रंग ह्मणावा तर जर मी उमरगडास चालिलों तर सर्व माघारे येतील. पाय कोणी घेत नाहीं. पुढें कोणी धजत नाहीं. असें संकट प्राप्त. जर फौज पुढें जाईना तर पठाण कसे दबतात? आणि जावें तर तिकडे फडणीस श्रमी. याजकरितां दोनी पेंच आहेत. यांत तुह्मी लिहाल तें करून. बलबेर येथें गेलियानें आज नफा आह्मांस कांहीं नाहीं. तूर्त कांहीं मिळणें नाहीं. न गेलियानें त्यांचा फैलाव जालियास तमाम ठाणीं राहणार नाहींत. दंगा होईल. याजकरितां पठाणाचें पारपत्य जरूर पाहिजे. त्यास, याचा जैसा तुह्मी जबाब लिहाल त्याप्रमाणें करून. उत्तर सत्वर पाठवणें. नदीवर आहे. फडणिसांनीं समाधानें आठ रोजांत जाऊन यावें असें लिहिलें तर जाऊन. त्याणीं लिहिलें कीं जाऊं नये तर न जाऊन. उत्तर पा॥. सविस्तर चिरंजीव बाबास लिहिलें तें तुह्मीं, फडणीस एकत्र होऊन उत्तर पाठविणें. नदीवर मुक्काम आहे. तुमचे लिहिलेप्रमाणें करून. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ २२६ ] ॥ श्री ॥ १२ आगष्ट १७६०.

पु॥ राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि: विनंति उपरि:

सुज्यातदौला याचे जमातदार व भाऊबंद बेराजी आहेत. त्यांचे अनुसंधान आलें होतें तें खरें करावयास

जमीदार सारे मिळोन गडबड करावी हा मनसुबा करितात. त्यांजकडेहि पत्रें पाठविलीं आहेत. जाब

गृहस्थ पाठविला आहे, ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशास, टीक जालियावरी लिहिणें. तशी तजवीज लेहून पाठवूं.

आलियावरी स्वामीस लेहून पाठवूं, ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशास, पक्का जाब येताच लिहिणें. सर्वांस उमेदवार अंतस्ते करणें. कोण्हास न तोडणें आणि प्रगटहि होऊं न देणें. जाणिजे.

सुज्यातदौले याचे मतें जे आपले व नजीबखान यांचे मतें सला व्हावा. हाफीजमहमद व अहमदखान व गाजुद्दीखान हे त्यांत नसावे. ह्मणजे सर्व ठीक करून देऊं. ऐसा यांचा विचार आहे, ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशास, सारेच जवळ आहेत. राजकारणें, वकीलहि येतात. याउपरि ज्यांत सरकारचें काम आणि उपयोग सर्व तेंच घडेल.

अबदाली सुकरतालावरी जाऊन छावणी करील. त्यास, तमाम रोहिले यांस त्याणें सांगितलें कीं दोन मास आपले घरीं जाणें, बलावूं तेव्हां येणें. यावरून कोणी दोन हजार, कोणी हजार, असे पार गेले. फैजुल्लाखान व सादुल्लाखान वगैरे कितेक पार गेले, ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशास, सांप्रत शिकंदरियावरी आहे. तिकडे विशेष बातमी वर्तमान येत जाईल तर लिहिणें. जाणिजे.

एकूण चार कलमें. जाणिजे. छ ३० जिल्हेज. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

पे॥ छ १५ मोहरम.

---

१२ आगष्ट १७६०.

[ २२७ ]

॥ श्री ॥

पु॥ राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसः

विनंति उपरि पत्रें पाठविलीं तीं पावलीं.

बंगालियाचा सुभा मिरजाफरखान व राजे रामनारायण पटण्याचे सुभेदारीचे नायब यांजकडे पत्रें बातमीस हमेश जात असतात. अलीकडे त्यांचीं उत्तरें पारसी आलीं. त्यांत सविस्तर बंगालियाचं वर्तमान लिहिलें आहे. तीं पत्रें सेवेसी पाठविलीं आहेत. त्यावरून सविस्तर कळेल. व या दोघांस पत्रें पाठवावीं जे तुमचे येखलासीचें वर्तमान गोविंदपंतांनीं लिहिलें, त्यावरून कळलें त्यास तुह्मी आपली, खातरजमा राखणें. कोणे गोष्टीचा वसवसा न धरणें. ऐसीं पत्रें यावीं ह्मणून लिहिलें तें कळलें. ऐशियास मिरजाफरखान व मीरनचा पुत्र मेल्याची खबर आली आहे. पुढें रामनारायण तेथें सर्वाध्यक्ष जाहले असेत, ह्मणून खबर आहे. त्यास पुरती खबर आलियावरी पत्र पाठविणें तें पाठवूं.

नवाब सुज्यातदौले यांणीं आह्मांस पत्र पाठविलें आहे व स्वामीसहि पाठविलें आहे. तीं पत्रें रवाना केलीं आहेत, त्यावरून सर्व कळेल. त्याचा भावार्थ हाच कीं आपण अबदालीकडे आलों ह्मणून कांहीं श्रीमंतांनीं अलीगोहर शाहाजादे याजकडे शिऊभट आहेत. त्यांजलाहि पत्रें पाठविलीं आहेत. शाहाजादे फार फजित जाहले. ते अबदालीकडे व सुज्यातदौले यांजकडे येत नाहींत. त्याजकडे कासीद पाठविले आहेत. स्वामीकडे यावयाविशीं त्यास व शिवभटास लिहिलें आहे. उत्तरें आलियावर सर्व लिहून पाठवितों ह्मणून लिहिलें तें कळलें. ऐशियास, तिकडील उत्तरें काय येतील तीं लिहून पाठविणें. त्यासारखें लिहिलें जाईल.

मजवरी स्वामींनीं किरकोळ वराता न कराव्या. ऐवज नाहीं. मुलखांत बखेडा जाहला आहे. बंदोबस्त करून मीच सेवेसी हिशेब घेऊन येतों, ह्मणजे ऐवज आहे नाहीं कळेल. तेथें आल्यावर जे आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करीन. येथील बंदोबस्त आटोपून लौकरच येतों, ह्मणून लिहिलें तें कळलें. ऐशास, सरकारांत मसलतीमुळें बाहेरील शत्रूचा पेंच. या दिवसांत सर्वांपेक्षां तुमचा भरंवसा, आणि न मिळे ऐवज तेथून पैदाहि कराल. असें असतां तुह्मी

वसवसा धरूं नये. सर्व प्रकारें त्यांचें कार्य होय तेंच करीन. ऐसा त्यांचा आशय ह्मणून लिहिलें तें कळलें. ऐशास, दिल्लीस खासा स्वारी आली. दिल्ली घेतली. सर्व बंदोबस्त सरकारचा जाहला. सुज्याअतदौला व नर्जीबखानहि पार आले, हा जाबसाल त्याचाहि आहे. होईल तो करूं. शिकंदरियावरी गिलज्याहि आहे. कळावें. तुह्मी तिकडील बंदोबस्त करून कधीं येणार तें लिहिणें. बाकीचे ऐवजीं दहा लाख व रसदेचे ऐवजीं पंधरा लक्ष एकूण पंचवीस लक्ष रुपये सत्वर पोहोचावणें. जाणिजे. याप्रमाणें हिशेब दाखविता. अपूर्व आहे ! सरकारचें काम होऊन येईल. परंतु तुमचे कदीमीस व निष्ठेस एकप्रकारें दिसेल. तपशील सहसा न लावितां दहा पंधरा लाख रुपये, व रसदेची तरतूद जरूर करणें. दूरं देश. मर्जीणारे? तुह्मी आहे. आळस न करावा.

चार कलमें लिहिल्याप्रमाणें करणें. जाणिजे. ३० जिल्हेज. हे विनंति.

---

[ २२८ ] ॥ श्री ॥ १५ आगष्ट १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि: पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. तुह्माकडून ऐवज मातबर भरणा सत्वर येऊन पोहोचावा. याविषयीं तुह्मांस वारंवार लिहिलें असोन अद्यापि ऐवज येत नाहीं, हे गोष्ट उत्तम नसे. येथें खर्चाची निकड फार आहे. तरी ऐवजाची तरतूद सत्वर होऊन श्रावण मासाआंत ऐवज येऊन येथें पावे ते गोष्ट करणें. येविषयीं विलंब एकंदर न लावणें. तुह्मांकडील लोक अद्यापि कोणी कोणी आपले बुणगे वस्तभाव कुल देशास लावून देतात ह्मणून वर्तमान कळलें,

तरी हें कामाचे नाहीं. येविषयींची चौकशी करून लोकांस ताकीद करणें. कोणाचे बुणगे वस्तभाव जाऊं न देणें. जाणिजे. छ ३ मोहोरम सु॥ इहिदे सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २२९ ] ॥ श्री ॥ १६ आगष्ट १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जाणें. विशेष. तुह्मांस ऐवजाविषयीं बहुतच पत्रें गेलीं. तुह्मांसारखे मातबर मामलेदार भरंवशाचे माणूस. तुह्मांकडून कांहींच तरतुद होऊन येत नाहीं. दोन लक्ष रुपये पाठविले तेवढ्यानें काय होणार? खावंद मसलतशीर असल्यास तुह्मी एकदोन सालचा अगाऊ ऐवज सरकारांत द्यावा. पुढें महालांत उगवून घ्यावा. त्यास तोहि प्रकार नाहीं. सालमजकूरची रसद व गुदस्ताची बाकी येणें. त्यास त्या ऐवजीं तुह्मीं कर्जवाम घेऊन रोख ऐवज पाठवावा. चाकरी करून दाखवावी. त्यास असाच मजकूर लिहितां आह्मी भागलों. परंतु तुमचे चित्तांत किमपिच येत नाहीं. सरकारांत पैका दिला ह्मणजे बुडाला वाटतो. असेंच चित्तांत येतें कीं काय हें कांहींच कळत नाहीं. याउपरि सर्व अर्थ ध्यानांत आणून, तुमची या प्रांतीं पत चांगली आहे, मोबदला करून मातबर ऐवजाची रवानगी करणें. पंचवीस लक्ष रुपये तुह्मांस द्यावे लागतील. याची काळजी चित्तांत धरून पत्र पावतांच ऐवजाची रवानगी करणें. दमाजी गायकवाड वगैरे वराता झाल्या आहेत त्यांस ऐवज देणें. जाणिजे. छ ४ मोहोरम. सु॥ इहिदे सितैन मया व अलफ. + बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २३० ] ॥ श्री ॥ १६ आगष्ट १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. ऐवजाकरितां तुह्मांस वारंवार लिहीत असतां अद्यापि ऐवज येत नाहीं हे कोण गोष्ट? प्रस्तुत सर्व अर्थ राजश्री गंगाधर मल्हार यांस आज्ञा करणें ती केली आहे. हे लिहितील त्याप्रमाणें सत्वर ऐवजाची तरतूद करून पाठविणें. दिरंग न लावणें. वारंवार लिहित गेलों. दहा लाखपर्यंत बाकी व पंधरा लाखपर्यंत रसद एकूण पंचवीस लाखपर्यंत जलदीनें येत तें करणें. तिकडील वर्तमान लिहिणें. जाणिजे. छ ४ मोहरम सु॥ इहिदे सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २३१ ] ॥ श्री ॥ १७ आगष्ट १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. सरकारांत तोफखान्याकडे बैलांचें प्रयोजन जरूर फारच आहे. याविषयीं पेशजी तुह्मांस लिहिलें आहेच. परंतु प्रस्तुत फार निकड आहे. पावसामुळें तोफखान्याचे बैल खराब जाहले, मरतात. यास्तव तुमचा तालुका विटावे वगैरे जवळ आहे. येथील तूर्त पांचशें बैल सत्वर जमा करून हुजूर पाठविणें. येविषयीं दिरंग लागावयाचें काम नाहीं. तरी लौकर बैल चांगले, मजबूत, गाड्याचे कामाचे ऐसे रवाना करणें. जे जे जमा होतील तितकेच जलदीनें रवाना करीत जाणें. बैलाविणें खोळंबा झाला आहे. हें ध्यानांत आणून लौकर पाठविणें. विलंब न करणें. +अबदालीची फौज कांहीं फुटून येणार. त्यांचा करार तुह्मा-

जवळ जमा व्हावें. एक लाख खर्चास देऊन इकडे आणावें. यांत फौजहि फुटते. येथेंच आल्या लढाईत वसवास राहतो. यास्तव याप्रें॥ केलें आहे. जे येतील ते तुह्मास पत्र घेऊन येतील. त्यांस आपलेजवळ जमा करणें. रसद बाकी एकूण वीसपंचवीस लाख जरूर तरतूद, तुर्त सत्वर कांहीं, निमे पुढें पाठवणें. त्या वारंवार न लिहिणें. र॥ छ ५ मोहरम. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २३२ ] ॥ श्री ॥ २० आगष्ट १७६०.

पु॥ राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गो॥ यांसि:

विनंति उपरि. सादुल्लाखान वगैरे रोहिले यांचा पैगाम आहे कीं पार गंगेच्या उतरावयाची फौजेची तरतुद करावी. नावाडी सोरमचें घाटचा थुरिया आहे. त्यास आपण जावयाचें सांगतों. फौजा जातील. त्याणीं त्यास न्यावें. वस्त्रें देऊन उमेदवार करावें. नावा जमा कराव्या. ह्मणजे पुल बांधोन पार फौज उतरेल. याप्रें॥ सोरमच्या घाटीं केलिया पारचे रोहिले वगैरे इकडे येणार नाहींत. तिकडील हंगामियामुळें गिलज्याच्या लष्करांत जे आहेत ते इतक्याच निमित्यें उठान जातील. त्यास, सदहूप्रें॥ तुह्मीं लिहिल्या घाटास येऊन, थुरिया नावाडी यास नेऊन, वस्त्रें देऊन, नावा जमा करून, पूल बांधोन, उतरावयाची तयारी करणें. र॥ छ ८ मोहरम. हे विनंति.

---

[ २३३ ] ॥ श्री ॥ २१ आगष्ट १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून

स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. पत्र पाठविलें तें पावलें. अबदालीची फौज दिल्ली घेतली यामुळें फार घाबरी जाहली. रोहिले फारकरून पार गेले. राहिले जाणार. नजीबखान मात्र हिमत धरून दाखवितो. सुज्याअतदौला जाऊन फसले आहेत. याजकरितां स्वामींनीं दम धरून काम करावें. पुरतेंच त्याचें पारपत्य होईल. फौजसुद्धां यावें तर इकडे ठाणीं कायम करणें हें काम टाकून येतां नये. याजकरितां गुंतलों ह्मणून लिहिलें तें कळलें. एशियास, दिल्ली घेतली. त्याजवर सलाबत चढली. आंत फार फूटफाट आहे. परंतु नजीबखान त्यास हिमती देऊन आपलें बरें करून घेऊन त्यास लावणार. त्यास येथेंहि नजीबखान व सुज्याअतदौला वगैरे राजकारणें आहेत. परंतु अद्यापि ठीक बरें कोणीहि बोलत नाहींत. पुढें होईल तें पाहूं. त्यास येथें कित्येक तुराणी फुटून चाकरीस येणार त्यासि करार हाच कीं उठोन अंतरवेदींत जावें. तुह्माजवळ जमा व्हावें आणि पार उतरणें जाहलें तर उतरावें. अथवा तेथून आगरियाकडे उतरून •आणणें तर आणावें. असे प्रकार बोलतात. येणार त्यास पत्रें तुह्मांकडे जावयाचीं देऊन रवाना करूं. ते येतील त्यांस आपलेजवळ जमा करणें. दुसरें रोहिल्यांचें अनुसंधान आहे कीं आपले तालुकियांत पार उतरावयाची अवाई घालावी आणि गंगातीरीं कनोजपुढें आमचे मुलखांत फौज आली ह्मणजे पार गेले ते येणार नाहींत. व येथें जे दुदिले आहेत तिकडील दंगियामुळें उठोन येतील. त्यांची गुज मांडेल. हा प्रकार आहे. तरी तुह्मीं कनोजेपुढें रोहिल्यांच्या मुलखांत गंगातीरीं येऊन पार उतरावयाची अवाई घालणें. गंगातीरीं राहणें ह्मणजे यास पायबंद बसेल. आणि जे दुदिले जाहले असेत ते यास सोडून जातील. हें काम करणें. फौज बुंदेले वगैरे जमा करणें. पैका लौकर रवाना करणें. सादुलाखान वगैरे रोहिले हे ह्मणतात कीं फुला नावाडी यास गंगातीरीं फौजा पावया बोलवावें. आपणहि त्यास पाठवून देतों. आणि नावा जमा करून पार उतरावयाचा हंगाम करावा. ह्मणजे हें निमित्य ठवून सारे तिकडे निघोन जाऊं. त्यास त्याजलाहि पत्रें दिलें आहे. तरी तुह्मीं

फुला नावाडी यास बोलावून नेऊन लिहिल्याप्रमाणें करणें. जाणिजे. छ १ मोहरम. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[२३४] ॥ श्री ॥ २६ आगष्ट १७६०.

श्रीमंत राजश्री गोविंदपंतदादा स्वामीचे सेवेसीं:

आज्ञाधारक शिदाप्पाशेट वीरकर[३०५] रामराम विनंति उपरि येथील कुशल त॥ छ १४ माहे मोहरम जाणून मुकाम लष्करनजीक दिल्ली जाणून स्वामीच्या कृपेंकरून सुखरूप असो. विशेष. आपल्याकडून बहुत दिवस पत्र येऊन साकल्य वृत्त कळत नाहीं. तरी ऐसें नसावें. सदैव पत्रीं सांभाळ करावा. प्रस्तुत सरकारांतून श्रीमंतांनीं वरात आपल्याकडे रु॥ १५००० पंधरा हजारांची दिली आहे. ती वरात बजिन्नस शुभकर्ण ब्राह्मण याजबरोबरी स्वामीकडे पाठविली आहे. तरी ऐवज रसदेच्या ऐवजीं देविला असे. तरी हे रु॥ पंधरा हजार जालोनास देविलिया आह्मास पोहोचतील. तेथें आमचा खरीदीचा खोळंबा न होय तें करावें. सर्व प्रकारें स्वामीचा भरोसा जाणून वरात आपल्याकडे घेतली आहे. येथील कामकाज आह्मा लायख जें असेल तें आज्ञा करावी. सेवेसी सादर असो. रु॥स येथें तोटा जाणून पत्रीं विस्तार लिहिला असे. सरकारांत ऐवजाचा तोटा आहे, ह्मणून श्रीमंतांचे चित्त स्वस्थ नाहीं. तरी आपण श्रीमंतांची कृपा संपादून घेतीलच. परंतु, सूचनार्थ सेवेसीं लिहिलें असे. + बहुत काय लिहून. कृपालोभ असो दीजे. हे विनंति.

---

[२३५] ॥ श्री ॥ २७ आगष्ट १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि: पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून

---

३०५ वीरवाल्हे येथील. हे पेशव्यांचे कामिसारीजनरल होत.

स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. इकडे तमाम तोफखान्याचा बंदोबस्त करून एका जुटीनें मजबुतीनें लढाई करणें लागतें. याकरितां तुह्मापाशीं राजश्री रूपराम अडारूचे भाऊ वगैरे, पठाण रोहिले असतील, ते चारशेंपर्यंत देखत पत्र हुजूर पाठवून देणें. ते लोक अशा लढाईचे कामाचे आहेत. जरूर या प्रसंगीं असावे लागतात. तरी सत्वर पाठवून देणें. पैकियाची तरतूद लौकर करणें. पाठवून देणें. विलंबावरी न घालणें. खर्चाची ओढ फार आहे, ह्मणोन लिहिलें असे. तरी सत्वर पाठवून देणें. दिरंगाईवरी एकंदर न घालणें. छ १४ मोहरम. हे विनंति.

---

[ २३६ ] ॥ श्री ॥ २९ आगष्ट १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री जनार्दनपंत स्वामीचे सेवेसी:

पोष्य गोविंद बल्लाळ सा॥ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल ता॥ मिति श्रावण वद्य ३ मु॥ तिरव जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असीलें पाहिजे. विशेष. इकडील वर्तमान या प्रकारचें आहे. आह्मीं मौजे मही घेऊन सेगर नदीवर येऊन दरमजलींनीं तालगांवीं ईसन नदीवर आलों. पाऊस अतीशय. चिखल झाला. नद्या भरल्या व जलमय सर्व जालें. परंतु तसेच भिजतच दरमजलींनीं तालगांवीं ईसननदीवर आलों. पठाणाजवळ स्वार, प्यादे दोन हजार होते. परंतु त्याजला कळलें कीं कजियास आले. चार कोस त्याजसी आह्मांस अंतर राहिलें. त्याजवर त्यांणीं मातबर वकील पाठवून सलूख केला. इतक्यांत नवाब अहमदखान याचीं पत्रें आह्मांस आलीं. साहेबजादे यांस व फकरदौला यांस आलीं. आह्मांस लिहिलें कीं सर्वस्वी मी तुमचा आहें. मागें मुलेंमाणसें आहेत. चिरंजीव आहेत. तुमचे भरंवसेयावर वरकड कनवज वगैरे ठाणीं एक मतलबाकरितां बसविलीं होतीं. तुह्मची मर्जी. परभारें उठोन

येतील. पुत्रास व हमसी फकरूदौला यास त्याणीं लिहिलें कीं पत्रदर्शनीं उठोन येणें. पंत सांगतील त्याप्रमाणें त्यांची मर्जी तुह्मीं राखणें. आणि बिबीनेंहि यास लिहिलें. ते उठोन फरूकाबादेस गेले. राजेश्री माधवराव यास नेऊन कनवजेंत बसविलें. दुसरे दिवशीं तिरवेयावर आलों. गडी तयार तिरवेयाची होती. पांचशें सातशें बरखंदाज जमा केला. चौफेर घेरून उभे राहिलों. हल्ला करावा हा विचार करीत होतों. तों फौज सभोंवती उभी राहिली. पाहोन घाबरे झाले. वकील येऊन रदबदली केली. कौल घेऊन समरसिंग बघेला भेटीस आला. गडी खालीं करून दिली. दुसरे रोजीं आहेरवाला पेमशिंगहि भेटीस आला. गडी खालीं करून दिली. ठाणें सरकारचें बसलें. हटिया आज खालीं होईल. ह्मणून टाकून खेरनगर, भुजाजंग, खतलाख, मोहना, बरगांव वगैरे तमाम खालीं झालीं. ठाणीं बसलीं. पाडितात. उदईक येऊन कूच करून, बिठुरास जाऊन, स्नान करून, घाटंपुरावरून उमरगडीं येऊन. श्रीमंत स्वामींच कृपेनेंच हें कार्य झालें. नाहीं तर, मोठें संकट होतें. दोन मास गडी घ्यावयास लागती. सर्व उत्तम जालें. नक्षहि जाला. आणि कार्यहि जालें. माणूसहि जाया न जालें. संतोषाचें वर्तमान तुह्मांस कळावें ह्मणोन लिहिलें आहे. सुजातदौले जाऊन अनुपशहरीं भेटले. बहुत शिष्टाचार मुबरात शिरपाव अबदालीनें दिल्हा. दुसरे रोजीं वजिरीचा शिरपाव देऊं लागला. तव्हां याणें विनंति केली: "पातशाहा कोण ? मीं वजीरी कोणाची करावी ? तुह्मी पातशाही तखतीं बसा; मी वजीरी करीन. उगीच वस्त्रं देऊन माझी फजिती कां करितां ?" त्याजवर अबदालीनें सांगितलें कीं प्रातःकाळीं याचा जाब देऊन. त्याजवर रातीस सर्व लहान थोर अबदाली जमा करून मसलत केली कीं आपणास येथें राहणें नाहीं. आणि मराठे यांचा जोर दिवसेंदिवस होऊं लागला. त्यास कोणाची गोष्ट ऐको नये. मराठे यांशीं सलूख करून आपले देशास जावें. हें वर्तमान चालत आहेत. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति.

[ २३७ ] ॥ श्री ॥ २ सपटेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुमचीं पत्रें आलीं तीं पावलीं. ठाण्याचा बंदोबस्त होऊन गंगाकिनारा जाऊन शह देतों ह्मणोन व अबदालीकडील व रोहिले सुज्यातदौले यांजकडील वर्तमान विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐशि-यास, आह्मी प्रस्तुत दिल्लींत राजश्री नारो शंकर यांस तीन हजार प्यादे व तीन हजार राऊत व सामान सरंजामसुद्धां ठेऊन बंदोबस्त केला आहे. पलीकडून रोहिले अबदाली यांची तहाचीं राजकारणेंहि आलीं आहेत, बोलतात. सुज्यातदौले यांचेंहि फारकरून राजकारण आहे. ठहराव अद्यापि कोणताहि नाहीं. याकरितां आह्मीं सर्व घाटांचे बंदोबस्त केलेच आहेत. तूर्त त्यांजकडील राजकारणाचा बनाव बसतो न बसतो हें पहात येथें बस-ल्यानें ठीक नाहीं. याकरितां कुंजपुऱ्याकडेहि जाणार आहों. येथील बंदो-बस्त केलाच आहे. व आह्मी तिकडे गेल्यानंतर तेहि इकडे राहत नाहींत. त्या रोखें सहजांत येतील. तेव्हां दिल्लीकडील शह चुकला. आपला मुलूख पाठीस[३०६] पडोन लढाई पडली तरी तिकडेच पडेल. असाहि प्रकार योजिला आहे. करूं. तुह्मीं यावयाचा मजकूर लिहिला तरी तूर्त इकडे न येणें. तुह्मी व राजश्री गोपाळराव गणेश ऐसे मिळोन दहा बारा हजार फौजे-निशीं कनोजेजवळ पलीकडील दबावास जाऊन रहावें. ह्मणजे सहजच पलीकडून रोहिले इकडील गेले आहेत ते व तिकडून येणार त्याजवरी दबाव पडेल. ते इकडे यावयाचें करणार नाहींत. सुज्यातदौले ममतेनें बोल-

३०६ मराठे कुंजपुऱ्यावर गेल्यावर अबदाली यमुना उतरून येईल व यमुनेवरील पाय-उतार कुंजपुऱ्याच्या उत्तरेस असल्यामुळें अबदालीची पाठ पंजाब व अफगानिस्थानाकडे होईल व मराठ्यांची पाठ माळवा व बुंदेलखंड ह्या प्रदेशाकडे होईल अशी भाऊंची अटकळ होती. परंतु, मराठ्यांनीं कुंजपुऱ्याला मोर्चे दिले असतां, अबदालीला, यमुनेला उतार नसल्यामुळें, कुंजपुऱ्यांतील कुतुबशाहाला मदतीस येण्यास सापडलें नाहीं. भाऊंच्या ह्या दोनचार महिन्यांतील डावपेचांचें सविस्तर कथन प्रस्तावनेंत केलें आहे.

तात, परंतु मोगली लोकांचा विश्वास नाहीं. यास्तव तुह्मी तेथें जवळोन असिल्यास याच्याहि मुलखांत शह पडेल. याची वर्तणुक ठीक न जाहलिया मुलखाची जप्ती अगर जमीदारांकडून फिसाद करावयास येईल. सर्वां गोष्टीनें ठीक पडेल. बंगसाकडील व सादतखान अफरादी वगैरे याजकडील राजकारणें आलीं आहेत जे आह्मी येथून हरएक बहाणा करून तिकडे निघोन जाऊन गोविंद बल्लाळ यांजवळ जमा होऊं. ऐसें आहे. यास्तव जो त्यांचा सरदार तुह्मास सरकारचें पत्र घेऊन येईल त्याजला आपल्याजवळ जमा करून ठेवणें. इकडे हुजूर येऊं म्हणतील तरी हुजूर पाठवणें. याप्रमाणें येतील त्यांचा बंदोबस्त करणें. तुम्हाकडे यावयाविषयीं राजश्री गोपाळराव गणेश यांस लिहिलें आहे, तेहि फौजसुद्धां येतील. तुह्मीं त्यांनीं मिळोन गंगाकिनारा धरून पलीकडे दबावास राहवें. ह्मणजे पलीकडील येणारास पायबंद बसून येऊं पावणार नाहींत. नावांचाहि बंदोबस्त करणें. बारीक मोठें वर्तमान होईल तें वरिच्चेवरी दो दिवसा आड लिहून जोडी हुजूर पाठवीत जाणें. चहूंकडील बातमी राखून लिहिणें. ऐवजाकरितां तुह्मांस वारंवार लिहितों, परंतु अद्यापि ऐवज येत नाहीं. येथें तो खर्चाची ओढ फार झाली आहे. तुह्मी तपशिल मात्र लावून लिहितां हें कामाचें नाहीं. मसलतीच्या प्रसंगीं तुह्मी या प्रसंगीं तपशील लावूं लागला तरी कसें ठीक पडेल ? हें सर्व बारीक नजरेनें उमजोन ऐवजाची तरतूद सत्वर करून मातबर ऐवज पाठवून देणें. येविषयीं हयगय परिच्छिन्न कामाची नाहीं. तुमचा हिशेब पुण्यांत होऊन विल्हेस लागला आहे. या अलीकडील सर्व अजमास हुजूर पाठविणें ह्मणून पेशजीं लिहिलें असतां अजमास येत नाहीं हें अपूर्व आहे. या उपरि पुण्यास हिशेब होऊन ताळेबंद करून दिला आहे तो व त्याजपासून आजपावेतों अजमास ऐसें सत्वर पाठविणें. विलंब न लावणें. + सोरमचे घाटीं पुलाची अवाई करणें. बंगसाचे मुलखांत उपद्रव करणें. येथून बंगस आफरिदी बहाणा करून तुह्मांस सामील होतील राहिलेहि पारचे येणार नाहींत. कित्येक टोपीवालेहि सरकारांत

येणार ते तिकडे येतील. पत्र घेऊन येईल तो खरा. यापाई तकरार नाहीं. सावधता बातमी राखीत जाणें. आह्मी आलियावर तुह्मी फार तरतूद करणार असें बोलत होतां तें बहुधा विसरलासें वाटतें. मातबर मामला सहा महिने लिहितां भागलों. दोन लाख रुपये आले हें उत्तम कीं काय ? जरूर रसद वगैरे दहा पंधरा लाख सत्वर पोहोचावणें. हिशेब विल्हेस लागला त्याची नकल व सं३०७बांत बेहेडा पुढील केला व पुण्याहून जाजती जमा व खर्च लिहून अजमास लिहून पाठविले त्याच्या नकला व कमाविशीपासून तुचा हिशोबाचा अजमास सत्वर पाठविणें. अजमास तयार नसला तर मागील बेहेडे व हुजूरचेच अजमास सत्वर पाठविणें. मागून तेहि पाठविणें. तिकडें काम मातबर. तुह्मीं इकडे न येणें. लिहिलेप्रमाणें तरतूद करणें. रवाना छ २१ मोहोरम. बहुत काय लिहिणें. गोपाळरावाहि तुह्मांजवळ येतील. त्यांचें व शहाजादियाचें वर्तमान लिहीत जाणें. हे विनंति.

---

[ २३८ ] ॥ श्री ॥ २ सप्टेंबर १७६०.

पुरवणी राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

विनंति उपरि. आज छ २१ मोहरमीं संध्याकाळीं अबदालीकडील तुराणी वगैरे लोक पांच सहा हजार तयार होऊन गाजुदी नगरच्या रोखें गेले; ऐसी बातमी जासुदाचे जबानीवरून कळली. त्यावरून तुह्मांस लिहिलें असे. तरी तुह्मी आपले जागां सावध राहणें. न कळे कदाचित् तिकडे आले तरी येतील. यास्तव सावध खबरदारीनें राहून लांबवरी बातमी चांगली राखीत जाणें, वर्तमान लिहिणें. जाणिजे. छ २१ मोहरम. हे विनंति.

---

३०७ सवाखमसैनांत.

[ २३९ ] ॥ श्री ॥ ३ सप्टेंबर १७६०.

पुरवणी राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः

विनंति उपरि. यंदा तुह्मांकडील प्रांतांत दंगा जाहला, तो फार करून सरदारांकडीलच तालुकियांत. किरकोळी सरकारच्या तालुकियांत जाहला. सध्या तों तुह्मीं शत्रूकडील ठाणीं अमल उठवून आपलीं कायम केलीं. आतां लावणींचे दिवस. रयतेस दिलासा देऊन तगाई देऊन लावणी या दिवसांत करावी, त्यास दिरंग दिसतो. बुंदेलखंडांत तो कांहींच पेंच नसतां तिकडीलहि लावणी रयतेची दिलभरी नाहीं यामुळें पुढें नुकसानी येणार, ऐशीं वर्तमानें येतात. त्यास तुह्मांसारिखे मुलखाची आबादी करावयास दुसरे कोण? तुह्मी बारगीर सरकार किफायत गैर किफायत समयासमयास चित्तांत आणून किफायतीचीं कामें करीत आलां पुढें त्याचप्रमाणें करावीं. ऐसें असोन तुह्मांकडील तालुकियांतील ऐशीं वर्तमानें यावीं उत्तम नाहीं. या उपरि बुंदेलखंड वगैरे आपल्या तालुकियांत तमाम रयतेची दिलभरी करून लावणी होय तें करणें. येविषयीं आपणांकडील तालुकदारांसाहि वरचेवर ताकिदा लिहून पाठवून लावणी होऊन नुकसानी न ये तें करणें. या वर्तमानावरून असें दिसोन येतें कीं लावणीस कमती करून खावंदास तोटा[३०८] दाखवावा. परंतु तुह्मी असे न व्हां. तुह्मांपासून सरकारनफाच व्हावा. मक्त्याचा मामला असोन ज्याप्रमाणें लावणी रयतेचा दिलासा करून पैसा साधतां मोठ्या खाजगत संसाराप्रमाणें चित्तांत आणून खावंद किफायत करावी. करणें. कोणे महालीं कशी तगाई देऊन लावणी केली हें तपशिलवार लिहून पाठविणें. रवाना छ २२ माहारम. बहुत काय लिहिणें. हे विनंति

---

३०८ धन्याचा तोटा करण्याची गोविंदपंताची ही खुबी लक्षांत ठेवण्यासारखी आहे!

[ २४० ] ॥ श्री ॥ ४ सप्टेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री बाळाजी गोविंद स्वामी गोसावी यांसः

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणें. विशेष. ब॥ देणें अजुरा खर्च मोहनभाई वगैरे यांजबरोबर श्री गंगाजळ कावडी प्रयागीहून वे॥ दीनानाथ प्रयागवळ याणीं पाठविल्या होत्या त्यास अजुरा ———————————— रुपये.

२४० गंगाजळ कावडी ४० दर ६.
६४ मिठै व अनार कावडी ८ दर ८.
२० गुलकंद कावडी २ दर १० प्रं॥.

———————
३२४

येकूण तीनशे चोवीस रुपये तुह्मांकडून देविले असेत, तरी प्रांत बुंदेलखंड वगैरे महाल येथील एवजीं पावते करून पावलियाचे कबज घेणें. जाणिजे. छ २३ मोहरम सु॥ इहिदे सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

———

[ २४१ ] ॥ श्री ॥ ४ सप्टेंबर १७६०.

सेवेसी[३०९] विज्ञापना मोहन, ब्राह्मण मुजरद कावड देऊन अंतोबाच्या घरास पा॥ आहे. त्याचे घरचेंहि बहुत दिवस वर्तमान कळत नाहीं. त्यास, दोन माणसें आपलींहि याजबराबर देऊन वर्तमान आणवून लेहून पाठवलें पाहिजे. खर्चास कांहीं प्रविष्ट करावें. आजपर्यंत समस्त सुखरूप आहों. पुढें निभावून येऊन स्वामीचे पाय अवलोकन स्वामीच्या पुण्यप्रतापें होईल. शाहाजादा सुज्यातदौला कुन्यानजीक अद्यापि आहेत. पुढें कांहीं दिल्लीकडे

३०९ पत्र कोणाचें कोणास आहे तें समजण्यास मार्ग नाहीं.

जात नाहींत. आह्मांकडून दोनचार मुजरद पत्रें सेवेसी गेलीं आहेत; परंतु, उत्तर येत नाहीं. मार्ग चालत नाहीं, यास्तव येऊन पावत नसतील. खिमोले कासीद पाठविला, चार महिने झाले, परंतु जाब येत नाहीं. त्याची गती काय आहे ईश्वर जाणें. सर्वदां पत्रीं कुशलार्थ ल्याहावयास आज्ञा करून सेवकास आराम होय तें करावें. इकडील वर्तमान सेवेसी वरचेवर लिहीत जाईन. सेवेसी श्रुत होय. हे विनंति. समस्त मंडळीस साष्टांग नमस्कार. लोभ कीजे. हे विनंति—

---

[ २४२ ] ॥ श्री ॥ ५ सप्टेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसः

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मी अंतरवेदींतील वगैरे तालुकियाची लावणी संचणी करावयास अनमानसा करून हेलसांड करितां. मामलत आपल्याकडे राहणार नाहीं हा संशय धरितां. कमाविशीचा मामला सबब कमी यावी, ऐशा डौलानें हयगय करिता. ह्मणोन बारीक बारीक शोध करितां विदित जाहलें. ऐशास, तुह्मी तों असें न करालच हा भरंवसा आहे. परंतु आपलेच तर्कानें एखादी भलती गोष्ट चित्तांत समजोन डावा डौल व्हावं ऐसं नसावें. याउपरि रयतस दिल भरंवसा चांगला देऊन लावणी संचणी यथास्थित होय. पडली जमीन बिघराचा बिघा असेल तेहि लावणी होय. तुह्मी पेशजी बोललां आहां त्याप्रमाणें निदर्शनास येईल ऐसें करणें. काणेविशीं कोणाचें सांगितलें चित्तांत न आणितां बंदोबस्त ठीक करणें. पेशजी कित्येक कामें काजें तुह्मांस लिहिलीं आहेत त्याप्रमाणें ठीक करणें. + जाणिजे. छ २४ मोहरम सुमा इहिदे सितैन मया व अलफ. लावणी करून जमा साभे. तुमचे बोललेप्रमाणें

तरतूद होऊन येई. मक्ता होता तेव्हां मेहनत लावणी करीत होता. कमावीस झाली, आमचें येणें झालें. आतां लावणी पाडून तोटा नजरेस पडेसा करावा, असा शब्द न येई. चांगलें काम सरकारचें होय तें खातरजमेनें करणें. ऐवज जरूर पाठविणें. तुमचें येणें तूर्त उत्तम नाहीं. तिकडे सुज्यादौलाचे जमीदार अंतस्तें नीट करून ठेवणें. सोरचचे घाटीं नावा जमा करून रोहिल्याचे मुलकांत दबाव देणें. यामुळें रोहिले घरीं गेले ते येणार नाहींत. येथें आहेत ते मागें पाहतील. अबदालीचे फौजेंतील कांहीं लोक उठून येणार. दहा पांच हजारांचीं राजकारणें आहेत. तेहि तुह्मांकडेच जमा होतील. आपले मुलकांतहि दबाव राहील. असे कितेक उपयोग. यास्तव लिहिलेप्रें॥ करणें. इकडे न येणें. बंगसचे मुलकांत पुरता पायबंद देणें. ऐवज जरूर पाठवणें. मोठी मामलत असोन अगदीं ऐवज न यावा हा त॥ कामाचा नाहीं. जरूर पाठवणें. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २४३ ] श्रीगजानन ७ नोव्हेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंदपंत दाजी स्वामींचे शेवेसी:

पोष्य नारो शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील क्षेम ता॥ छ २७ रा॥वल पावेतों मुकाम इंद्रप्रस्थ कुशळरूप जाणून स्वकाय कुशळ लिहीत असलें पाहिजे. याउपरि श्रीमंत राजश्री भाऊसाहेबानीं आपणास पहिलीं पांच चार पत्रें पाठविलीं. सांप्रतहि मुजरद बहुत निकडीनें पत्र लिहिलें आहे. पत्रावलोकनीं साद्यंत कळेल. दाजीबा, आह्मांसहि आपण सत्वर येत नाहीं ह्मणोन बहुत प्रकारें लिहिलें आहे. अशा समयास आणीक सर्व कामें एकीकडे ठेवून रात्रीचा दिवस करून चाकरी करून दाखवावयाचा प्रसंग असतां, तुह्मी यावयास ढील करितां, यावरून काय ह्मणावें ? पत्र पावतांच जेथें असाल तेथून कूच करून दुमजला येऊन पोहोंचणें. तुह्मापाशीं दहा

हजार फौज असोन पंचवीस लाख रुपये खात असतां, खावंदांस कामाची निकड असतां तुह्मी लटके बहाणे करून मुलकांत रहावें हे गोष्टी तुह्मांस योग्य नाहीं. खावंद वारंवार लिहितात, तुह्मी गढी कोटाचे बहाणे लिहितां हा सेवक लोकांचा धर्म नव्हे. पत्र श्रीमंतांचे पावतांच शितार्बी करून येणे. प्रसंग उरकल्यावर आलेत तर काय कामाचे ? + याउपर श्रीमंतांनीं आह्मांस रागें भरोन दोन चार पत्रीं तुह्माविषयीं लिहिलें कीं तुह्मीं त्यांस लेहून फौजा लौकर येऊन समयीं उपराळा होय तें करावें. तरी आपण या समयीं दरोबस्त फौजा व जमीदार समागमें घेऊन राजश्री गोपाळराऊ वगैरे त्याच प्रांतींचें श्रीमंतांचें अन्न खाऊन दौलत कमाविता. सर्वांनीं जमा होऊन सत्वर यावें. नाहीं तरी परिच्छिन्न शद्व लागेल. श्रीमंताची व मोगलाची दों तीं कोसांची तफावत. एकदोन रोजांत युद्ध तुंबळ होऊन श्रास करणें तें होईल. परंतु श्रीमंतांचे हिमतीस तारफ कोठपर्यंत लिहावी ! सफजंगीस कांहीं बाकी नाहीं. बुणगे कबीले सर्व बराबरच आहेत. ऐसें निदान आरंभिलें आहे. आह्मी किल्ले मजकूरचा बंदोबस्त करून दीड हजार फौजा मोगलाचे लश्करवर जवळ कनोजीस ठेवून घोडीं उंटें आणितात. व हजार स्वार प्यादा फार उतरोन धामधूम मांडिली. रसदहि बंद करविली आहे. ऐशा समयीं आपण फौजांसुद्धां आलिया श्रीमंतास बहुतच समाधान वाटेल. जरूर रात्रीचा दिवस करून, लांब मजली करून लौकर लौकर येणें. विलंब न करणें. बहुत काय लि॥. हे विनंति.

---

[ २४४ ] ॥ श्री ॥ १८ सप्टेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि: पो॥ सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. अलीकडे तुमचें पत्र येत नाहीं, तरी

सविस्तर लेहून पाठवणें. इकडील वर्तमान कांहीं अधिकोत्तर ल्याहावें ऐसें नाहीं. तुह्मास पेशजी एकदोन वेळा लिहिलें होतें जे तुह्मी फौजसुद्धां गंगा-किनारा सोरबच्या घाटाजवळ जाऊन राहाणें. पलीकडे रोहिले सुजातदौलाच्या मुलकांत उतरावयाची आवाई घालणें. तिकडे गडबड करणें. बुणगे उमरगडीं टाकून सडी दौड लांबलांब करावी. रसद अबदालीच्या लष्करास जाते ती लागभाग पाहून मारावी, लुटावी. पलीकडील जमीदारांस कुल बीर देऊन हातीं घ्यावें. त्याजकडून उपद्रव करवावा. येणेंप्रें॥ तुह्मास लिहिलें होतें. याअन्वयें तुह्मी व राजश्री गोपाळराव गणेश मिळोन तिकडे गेलां असालच व लिहिल्या डौलानें करीतहि असाल. कदाचित् नसिलां गेलां तरी याउपरि तऱ्ही लौकर जाऊन सोरमच्या घाटास दाखल होणें, विलंब न० लावणें. येविशीं गोपाळराव गणेश यांसहि लिहिलें आहे. ते तुह्मापाशीं फौजसुद्धां येतील. तुह्मींहि त्यांस लिहून आपणापाशीं आणणें आणि हें काम करणें. व जे लोक अबदालीकडील इकडच्या राजकारणानें निघोन येतील त्यांस तुह्मीं जागा देऊन ठेऊन घेणें. इकडे रवाना करणें ऐसेंहि पेशजी लिहिलें होतें. त्यावरी येथून कोण्ही तुमचे नावचीं पत्रें घेऊन गेले आहेत, तुह्मांस पत्र सरकारचें आणून देईल, त्यास जागा देऊन जमा करणें, इकडे पाठवणें. वर्तमान वरिचेवरी लिहीत जाणें. ऐवज पोख्ता जमा इतकें दिवसांत तुह्मीं केलाच असेल. तरी सत्वर ऐवज पाठवणें. विलंब एकंदर न लावणें. + तुह्मी, गोपाळराव, जमीदार आठ दहा हजार जमा व्हाल. इकडे आणल्यास रान मोकळें पडेल. फारकरून माहालीं फौज राहून दोनतीन हजार येईल. तिकडे पेंच पडल्या माहालीं राहील फौज त्याच्यानें बंदोबस्ताहि राहणार नाहीं. यास्तव तुह्मीं आपला तालुका मागें टाकून, राजे जमीदार जमा करून, सडे फौजेनें सोरमकडे येऊन, पलीकडे दौरत घालावी. जमीदार वगैरे पलीकडील फिसाद उठवावी. सादुल्ला, फैजुल्ला रोहिले यांकडे सूत्रहि करावें. फौजेचा दबाव दुपट पडेल. घरोघरचे येणार ते येणार नाहींत. बंगसहि लगाम लावील तर सलूख राखावा. येथून उठवून

न्यावा. न येई तरी मुलूख मारावा. हें केलिया मोठें काम आहे. तुह्मी आतां केवळ माहालकरी नव्हा. सरदारासारखी तुह्माबा॥ फौज आहे. पांचसात हजार सडे फौजेनें रात्रंदिवस गनीमी करून रसद कुमक येईल ते मारावी. जाटांचेहि जवळ कुमकेस आहेत. याप्रें॥ जालिया मोठें काम आहे. तरी जरूर करणें. ऐवज रवाना करणार तो सत्वर ग्वालेरीवरून येऊन पोहोंचे, दोनचारशें राऊत शाहाणा माणूस पैक्याबा॥ देऊन रवाना करणें. प्रस्तुत तुमचेच ऐवजाचा भरवसा आहे. र॥ छ ८ सफर. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २४५ ] ॥ श्री ॥ १९ सप्टेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसः

पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. अबदालीचे पारपत्यास चिरंजीव राजश्री भाऊ व विश्वासराव गेले आहेत. राजे हिंदुपत याणीं आपले फौजसुद्धां जाऊन सामील व्हावें. येविशीं चिरंजिवाचीं पत्रें त्यांस येत असतां अद्याप जात नाहीं हें त्यांस उचित् नाहीं. तरी तुह्मीं हिंदुपतीस बहुत प्रकारें समजाऊन सांगून फौजसुद्धां सत्वर निघोन जात ते गोष्ट करणें. श्रीकृपेनें पठाणाचें पारपत्य चिरंजीव करीतच आहेत; परंतु, हिंदुपत जाऊन न पावल्यास त्यांचें कल्याणावह नाहीं. असें त्यास सांगून त्यांचें जाणें सत्वर होय तें करणें. जाणिजे. छ ९ सफर सु॥ इहिदे सितैन मया व अलफ. + बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

२१० ह्यावरून जाटाचें व भाऊंचें अद्याप वाकडें आलें नव्हतें.

[ २४६ ] ॥ श्री ॥ २१ सप्टेंबर १७६०.

पा। राजश्री जनार्दनपंत स्वामीचे सेवेसी:

विनंति उपरि. दिल्लीहून वर्तमान आलें जे मराठे यांची फौज दिल्लीस येऊन जो फौजदार अबदालीचा होता याकूब अल्लीखान तो मात्र नावेवर बसोन पार होऊन पळाला. वरकड स्वार प्यादे चार पांच हजार मारले गेले. श्रीमंत स्वामींचें ठाणें दिल्लींत बसलें. घाट यमुनेचा आगरेयापासून कुंजपुरेयापावेतों श्रीमंत स्वामीचे हातीं लागले. याउपरि वर्तमान येत जाईल तें लिहून पाठवून. चौथे रोजीं सुजातदौले अबदालीजवळ गेले. त्यांजला अबदालीनें सांगितलें कीं तुह्मी मातबर. दोन करोड रुपयेयाचा मुलक तुह्मांखाले. त्यास मी हैराण, मजवर शिपाई यांची तलब चढली, याची तजवीज करून देणें. याप्रमाणें बोलतांच सुजातदौले सखेद जाहले. त्याजवर शाहावलीखान वजीर याजकडे गेले कीं मी तुमचे इमानावर आलों. आतां हें काय ? त्यास शाहानवाजखान याणें जबाब दिल्हा कीं तुह्मी लुच्चाचे सांगितल्यावरून आला. नदी उतरून कोण तुह्मांवर येत होता ? आह्मीं तुह्मांस इमान पाठविलें नाहीं. जसे आला तसे अबदालीस राजी करा. त्याजवर फजीत होऊन डेरा आले. नजीबखानानें अबदालीस सांगितलें कीं तुमचे कार्याकरितां सोय जशी सुजातदौले याणीं मागितली त्याप्रमाणें करून घेऊन आलों. आतां रुपये घेणें, सोडणें. हें वर्तमान सुजातदौले यांस कळलें. नजीबखानाशीं व सुजातदौले यास बिगाड झाला. सुजातदौले यास करोड रुपये तूर्त मागतात, हें वर्तमान घनसुंदरदासानें लिहिलें आहे. घनसुंदरदास यास सुजातदौले याणीं नेऊन सर्व सांगितलें कीं मजला नजीबखानानें फसाविलें. मजला श्रीमंत राजश्री भाऊस्वामींनीं व सरदारांनीं व गोविंदपंतांनीं, माझे आईनें, सर्वांनीं सांगितलें कीं तुह्मीं न जाणें. त्याचें न आइकोन या कुंटणाचे बोलास लागोन आलों. फजीत पावलों. सारांश फजीत जाले. अबदालीचे लष्करीं गडबड जाली. सर्व लहान थोरांनीं मराठे यांसि सलूख करून आपले देशास जावें हा मनसुबा आहे. याजउपरि लढाईची हिंमत

त्यांत राहिली नाहीं. दहा हजार घोडे, उंट, खचर अनुप शहरीं मेले, नित्य मरतात. ईश्वरकृपेनें श्रीमंत स्वामीचें दैव थोर. आणि श्रीमंत र॥ भाऊ स्वामी यशस्वी आहेत. सर्व उत्तमच होईल. आह्मी सत्वरच येतों. चिरंजीव र॥ गंगाधरबावास सत्वर पाठविणें. वरकड जें वर्तमान येईल तें वरचेवर लिहून पाठवून. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति. अबदालीचे घरीं मनसुबा जाला, मराठे यांसीं सलुख करून वजीर गाजदीखान बक्शी अहमदखान यासी करार करून आपले देशास जावें या मनसुबयात आहेत. हे विनंति.

---

[ २४७ ] ॥ श्री ॥ २१ सप्टेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री जनार्दनपंत स्वामीचे सेवेसीः

पोष्य गोविंद बल्लाळ सा॥ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल ता॥ भादो सुध ११ मु॥ गुलोली जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. कपिलाषष्ठी महापर्व आहे. चिरंजीव बाबास आणविलें आहे. सडे येतील. तुह्मींहि येणें. वरचेवर स्नान करून येऊन मौजे गुलौलीस लागलों. तेथली शनवारीं फत्ते झाली. आणीक दो गडी खाली झाली. येक दोन राहिली ते आज खाली होतील. सत्वर सर्व येणें. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ २४८ ] ॥ श्री ॥ २४ सप्टेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः

पो॥ सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून

स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. सरकारांत कडूपडवळाचें वगैरे प्रयो-जन आहे, तरी जरूर पाठवणें. चित॥

८८५ कडूपडवळ उत्तम.
८।· मध बहुत उत्तम.
८८५ पित्तपापडा.

८॥·

येणेंप्रें॥ तीन जिनस सत्वर तलाश करून जरूर पाठवून देणें. फारच प्रयोजन आहे. तरी सत्वर पाठवणें. जाणिजे. छ १४ सफर, सु॥ इहिदे सितेन मया व अल्लफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २४९ ] ॥ श्री ॥ २४ सप्टेंबर १७६०.

श्रियासह चिरंजीव रा॥ बाबा व गंगाधरा प्रती गोविंद बल्लाळ आशीर्वाद. उपरि. तुह्मीं पत्र जासुदासमागमें पाठवलें तें पावलें. त्यास, तुह्मी चिरंजीव गंगाधरास रायपुरीं ठेवून तुह्मी वतीसें[311] घेऊन पत्रदर्शनीं आह्मांजवळ ल॰करीं येणें. तदनंतर आह्मी समागमें येऊन. वरचेवर स्नान करून येऊन. जर येणें तर येथें द्वितीयेच्या पक्षास येणें. ह्मणजे पक्ष करून गंगास्नानाहि करून येऊन. गुलोलीं आज शनवारीं मध्यरात्रीं धर्मद्वार मागोन निघोन गेले. दोन गढी आणीक सुटली. दोन राहिली तेंहि आज सुटतील. तुह्मीं लिहिलें कीं कपिलाषष्ठीस स्नानास यावें ह्मणोन दोन चिट्टिया लिहिल्या त्यास, चिरंजीव गंगाधरास व मुलीस ठेवून तुह्मीं बायकांस घेऊन बहुत जलद पत्र पावतांच येणें. एक घडीचा विलंब न करणें. भेटीनंतर सविस्तर बोलोन. तुह्मांकरितां येथें आह्मीं मुकाम केला आहे. सत्वर येणें. उद्या

---

३११ सौभाग्यवतीस. गोविंदपंत बुंधेल्याचें अक्षर अगदींच दुर्वाच्य आहे. त्याची वाक्यरचनाहि असंबद्ध असते. विशेषणविशेष्यसंबंध तर गोविंदपंत हवेतसे करतो.

पत्र पावेल तेंचक्षणीं येणें. दोन राहुटिया लहान लहानशी घेऊन येणें. चार कनाता घेऊन येणें. एक शेतखाना, भांडीं अगत्य अगत्य घेऊन येणें. विलंब न करणें. मित्ती भाद्रो शुद्ध ११. हे आशीर्वाद. मोहरा दहापंधरा घेऊन येणें. हे आशीर्वाद. तुह्मांसहि पत्र जासुदासमागमें पा। तें पावलेंच असेल. पत्र पावतांच तुह्मीं स्वार होऊन येणें. हे विनंति. रा. रामचंद्र-भटजी सुखरूप आह्माजवळ पावले. हे विनंति. पत्र पावतांच निघोन येणें. नाहीं तर द्वितीयेस श्राद्ध आहे. त्यास घेऊन तर विलंब लागेल. याजकरितां तुह्मीं येणें. पत्र पावतांच येणें. हे आशीर्वाद.

———

[ २५० ] ॥ श्री ॥ २ सप्टेंबर १७६०.

विनंति उपरि. सविस्तर लिहिलेंच आहे. मींहि ताकीद केली आहे. वरचेवर चिरंजीव बाबापासून ताकीद करवून हिसेब आणवणें. करोलीकडे, याकडेहि ताकीद लिहून पाठविली. तुह्मींहि ताकीद करणें. आह्मीहि करितों. पंधरा रोजांत सर्व येतील आणि आह्मीहि इकडून फडशा करून येतों. आणि श्रीमंत रा। भाऊ स्वामीकडे जाऊन काय करावें ? मागील पुढील कजिये होते. डुढी होती. नाहीं तर आह्मींहि रोज भेटावयास श्रीमंत स्वामींस जातों. आतां तुह्मींहि मेहेनत केलीत आहे. त्यास पंधरा रोजांत सर्व फडशा होऊन येईल आणि गुंतेहि वारतील. सर्व निर्मळ होईल. वरचेवर लिहीत जाऊन. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति.

———

[ २५१ ] ॥ श्री ॥ २५ सप्टेंबर १७६०.

अखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्यराजश्री विसाजी गोविंद गो॥ यांसि:
सेवक सदाशिव चिमणाजी नमस्कार. सु॥ इहिदे सितेन मया व अलफ.

तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें पावलें. राजश्री राजे प्रिथीसिंग हे सरकारांत बहुत निष्ठेनें वर्ततात. दोघे चिरंजीव फौजसुद्धां राजश्री गोविंद बल्लाळ यांजकडे चाकरीस गेले आहेत. यांणींहि इकडे सरकारकाम सिद्धवाटचें ठाणें राघो गोविंदाकडील मवाशियांनीं घेतलें होतें तेथें हे आह्मीं मिळोन जाऊन ठाणें घेतलें. दहावीस माणूस प्रिथीसिंगाचें जखमी जाहालें. पांच सात ठार जाहालें. ठाणें घेऊन आमचे हवालीं केलें. ह्मणोन कितेकप्रकारें त्याचे निष्ठेचें वर्तमान लिहिलें तें कळलें. ऐशास, त्यांणीं निष्ठेनें वर्तावें व वर्ततात यांतच सर्वा गोष्टींनें त्यांचें बरें आहे. याउपरिहि तुह्मीं त्यांस सांगोन सरकारकार्यांत सादर राहात तें करणें. ठाणें आपलेकडे आहे तें कोणाकडे द्यावयाची आज्ञा करावी, ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशास, ठाण्याचा मा।र तरी मागाहून लिहिला जाईल. तूर्त तुह्मांकडे असो देणें. प्रिथीसिंग निष्ठेनें वर्ततात बरेंच आहे. त्यांचे चिरंजीव तिकडे गोविंदपंताकडे गेले आहेत. याणींहि फौजसुद्धा या समयीं येथें यावें ह्मणजे निष्ठा विशेष वाढल ! तरी तुह्मी सांगोन त्याजला, फौजसुद्धा इकडे येत तें करणें. छ १५ सफर.

( लेखनसीमा ).

---

[ २५२ ] ॥ श्री ॥ २७ सप्टेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

पो॥ सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. श्रीमध्यें ब्राह्मणांचीं वर्षासनें आहेत. त्यांचा ऐवज झाडून वे॥ राजश्री बाळकृष्ण दीक्षित यांजकडे पावता करणें व दहा हजार जाजती देणें ह्मणोन दोनचार वेळ तुह्मांस लिहिलें. त्यास दोन साला वर्षासनाचा ऐवज दिल्हा व दहा हजार रु॥ जाजती दिल्हे, तीन साला वर्षासनाचा ऐवज राहिला तो अद्याप पावला नाहीं, ह्मणोन दीक्षितांचें पत्र

आलें. त्यावरून तुह्मांस लिहिलें आहे. तरी तीन सालांचा वर्षासनाचा ऐवज नेमणूकप्रें॥ दीक्षितांकडे श्रीमध्यें पावता करून कबज जाणून पाठवून देणें. या गोष्टीस आळस सहसा न करणें. याखेरीज श्रीमध्यें दीक्षितांकडे अनुष्ठानाचे खर्चाबद्दल रु॥ १५००० पंधरा हजार देविले आहेत, त्याची वरात अलाहिदा पाठविली आहे. तो ऐवज पत्र पावतांच जलदीनें श्रीस पोहचावून कबज जाणून पाठवणें. जाणिजे. छ १७ सफर सु॥ इहिदे सितैन मया व अलफ. + बहुत काय लिहिणें. वारंवार ताकीद असून [३१२]धर्माचा ऐवज न पावणें, अपूर्व आहे ! आतां दिवाळीपर्यंत वर्षासनाचा पहिलेप्रें॥ देखील सालमजकूर व जाजती दहा हजार, सनद पेशजी पावली त्याप्रें॥, व हालीं अनुष्ठानाचे पंधरा हजार दीक्षितांजवळ पावते करून कबज येथें घेऊन पाठवणें. हे विनंति. बार.

---

[ २५३ ] ॥ श्री ॥ २७ सप्टेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसिः

पो॥ बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मीं विनंतिपत्रें श्रावण वद्य १४ चीं पाठविलीं तीं भाद्रपद वद्य द्वितीयेस पावलीं. चिरंजीव राजश्री भाऊंकडील व पठाणाचें व सुज्याअतदौलाकडील व अलीगोहर शाहाजादे याकडील वर्तमान विस्तारें लिहिलें तें कळलें. याउपरिहि तिकडील वर्तमान विस्तारें वरच्यावर लिहीत जाणें. या दिवसांत तिकडील मनुष्याचा अर्थ विस्तारें जलद लेहून यावा. तदनुरूप त्वरेनें सर्व लिहीत जाणें. जाणिजे. छ १७ सफर, सु॥ इहिदे सितैन मया व अलफ. हे विनंति.

---

१ ३१२ गोविंदपंतावर हा एक आणखी आरोप आहे.

[ २५४ ] ॥ श्री ॥ २९ सप्टेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री बाळाजी गोविंद स्वामी गोसावी यांस:
पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. बद्दल देणें राजश्री नारो शंकर यास पथकास समजावीस नालबंदीचे ऐवजापैकीं रुपये १००००० येकून एक लक्ष रुपये तुह्मांकडून देविले असेत. तरी प्रांत बुंदेलखंड वगैरे महाल येथील ऐवजीं कार्तिक मार्गशीर्ष दोन महिन्यांत पावते करून पावलियाचें कबज घेणें. जाणिजे. छ १९ सफर, सु॥ इहिदे सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २५५ ] ॥ श्री ॥ ७ आक्टोबर १७६०.

चिरंजीव राजश्री गंगाधर यासि: गोविंद बल्लाळ आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत जाणें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान साद्यंत कळलें. त्यास चिरंजीव सौ॥ लक्ष्मी प्रसूत झाली. कन्या झाली. फार उत्तम झालें. आह्मी बिठ्ठराहून कूच करून रीप नदीवर आलों. गुलोलीचें मामलियाकरितां एक दोन मुकाम करून फडशा करून दरमजलींनीं उमरगडीं येऊन. आतां गुंता नाहीं. वरकड भेटीनंतर सविस्तर बोलोन. अबदालीकडील दोन हजार फौज लुटविली, कुंजपुरेयाजवळ. कुंजपुरा घेरिला आहे. बहुधा घेतला असेल. आह्मी सत्वरच येऊन. गुलोलीवाले यानें सन १८१६ पैसा न दिल्हा. गडी बांधोन राहिला. जर याजला सोडून आलों तर तसेंच राहील. तूर्त ऐवज कांहीं हातीं येणार ह्मणून मुकाम केला. सत्वरच फडशा होईल. मोहनसिंग गुलोलीवाला दमला. रमईपुरीं गेला. त्याचे मातबर भले माणूस येऊन भेटून गेले. उदईक सर्व येतील. फडशा करून मी येतों. मित्ती भाद्रो व॥ १४. हे आशीर्वाद.

---

[ २५६ ] ॥ श्री ॥ ११ आक्टोबर १७६०.

पु॥ राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी यांसि:—

विनंति उपरि. राजश्री गणेश संभाजींनीं बुंधेल्यांसीं घसघस लावून छत्रपूरचे गांव मारिले, शहरास उपद्रव लावणार, सावकारा उठतो, ह्मणोन लिहिलें होतें त्यास त्याणीं त्यांसीं कटकटीचा प्रसंग पाडूं नये, बुंधेले फौजसुद्धां घेऊन हुजूर यावें, येविशीं म॥रनिले यांस परस्पर लिहून पाठविलें आहे, त्याप्रमाणें ते करितील. कदाचित् हे याप्रमाणें बुंधेल्यास सांगत असतां ते न ऐकत, तरी तुह्मीहि त्यांस चांगले तऱ्हेनें लिहून सांगोन ऐकवावें. फौजसुद्धां हुजूर येत तें करावें. नाहीं तरी पेशजी चिरंजीव राजश्री समशेरबहादर गेले होते, ते वेळेस तिकडे बखेडा जाहला, फिसाद जाहली. तसा प्रकार होऊं न देणें. जाहलिया सरकार काम ठीक होणार नाहीं हें सर्व ध्यानांत आणून गणेश संभाजी बुंधेल्यास सांगतील त्याप्रमाणें ते ऐकोन येत ऐसे करणें. विरुद्ध पडेल तें न करणें. समशेरबहादरास तुमचेच तर्फेचा विरुद्ध ते वेळेस पडला. तसें न व्हावें. तुमची त्यांची पुर्ती ओळख आहे. याकरितां त्यांस स्पष्ट चांगले तऱ्हेनें सांगोन ऐकवणें. जाणिजे. छ १ रबिलोवल. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २५७ ] ॥ श्री ॥ ११ आक्टोबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गो॥ यांसः

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. बुंधेल्यांकडे राजश्री गणेश संभाजी याणीं कजिया आरंभिला आहे त्यास चहूंकडे पेंच नसावे. तजविजीनें बुंधेले हाताखालीं रहावे, याचा विचार म॥ निलेस लिहावा, ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशास हाच म॥ गणेश संभाजी यांस

लिहिला आहे. त्याणीं कजिया केला नसेल, व हल्लींहि कजिया न करणें. त्यास समजावून सांगोन फौजसुद्धां हुजूर घेऊन येणें. ह्मणोन लिहून पत्रें रवाना केलीं आहेत. याप्रमाणें करितील. पारच्या जमीदारांना कजिया मानवला आहे. शेंपन्नास ठाणें रोहिल्यांचें घेतलें ह्मणोन लिहिलें तरी उत्तम आहे. या उपरिहि वारंवार पारचें राजकारण ठीक राखून लेहून अतिशय बखेडा करीत ऐसें करणें. तिकडील सूत्र पक्कें चांगले तऱ्हेनें हातीं राखणें. गंगाकिनारा आज्ञेप्रमाणें जातों ह्मणोन लिहिलें, तरी बहुत दिवस तुह्मांस ( लिहा ) वयाचें समाप्त केलें. सीमा झाली. तुह्मी थोर माणूस वारंवार काय ह्मणावें. करून दाखवाल याउपर तें खरें. रा॥ छ १ रा॥लावल. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २५८ ] ॥ श्री ॥ १४ अक्टोबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

पो॥ सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मांस तिकडे मोठ्या कामास जावयाविषयीं वारंवार लिहिलें. परंतु अद्याप राजश्री गोपाळराव गणेश व तुह्मी गेला नाहीं. कोठें किरकोळ जमीदारांची गढी गांव घेत बसला आहां हें ठीक नाहीं. याउपरि लौकर तिकडे जाऊन पेशजी लिहिल्याप्रमाणें गडबड करून धुंद उडवणें. या गोष्टीस हयगय एकंदर न करणें. आह्मीं यमुनेचे पाणी फार याकरितां दिल्लीवरी बसोन उपयोग नाहीं. यास्तव कुंजपुऱ्यास जाऊन अबदुलसमदखान याचें पारपत्य करावें, या अर्थें दरकुच जात आहों. चिरंजीव राजश्री नाना, आपाजी जाधवराव यास दिल्लीस पाठविलें. त्यांनीं छ २० सफरीं अलीगोहर याचे नांवचे गजशिक्के केले. शहरांत द्वाही

फिरविली. त्याचे पुत्रास बाहेर काढून वलीहदं[३१३] केलें. सर्व अलमास खुशाली जाहली. लोकांनीं नजरा केल्या. शिक्के चालते जाहले. मोठा समारंभ केला. तुह्मांस कळावें ह्मणोन लिहिलें असे. आह्मी कुंजपुऱ्याकडे गेलों. इकडे अबदालीचें कुच होऊन आलियावरी उत्तमच जाहलें. दिल्लीकडील मुलख मार्ग मोकळा राहिला. इकडेच लढाई पडेल. कदाचित् ते इकडे न येतां तिकडे तुमचे रोखें जाहले तरी बरेंच आहे. आह्मी पाठीवरी यमुना उतरून अंतरवेदींतोन येऊन पारपत्य करूं. कुंजपुरेवाला ठेहरत नाहीं. डावा ढोल होऊन दमवायाच्या मुद्यावरी आहे. ठहरला तरी मोर्चे लावून यथास्थितच पारपत्य करूं. तुह्मीं तिकडे सत्वर जाऊन पोहोंचणें. केवळ छोट्या मोठ्या कस्मास गुंतोन न राहणें. ऐवज लौकर येऊन पावे एसा रवाना करणें. दिरंग न लावणं. + तुह्मीं पेशजी लिहिलेप्रमाणें गनीमी मेहनत करून रोहिले सुज्यादौला यांचे प्रांतांत धामधूम होई असें करणें. किरकोळ गढियांचे कामास न गुंतणें. अबदाली आह्मांकडेच येईल. तिकडे आला तरी पाणी आहे तो आहे. चार रोजांत कुंजपुरियाचें पारपत्य करून सारंगपुराकडे उतरून नजीबखानाचे विल्हे लावून पुढें अबदालीचे पाठीवर येऊं. रवाना छ ४ रा।लावल. बहुत काय लिहिणें. अलीगोहरचा शिक्का

३१३ १७५९च्या नोव्हेंबरांत गाजुद्दिनानें अलमगिरास ठार मारिलें व औरंगझेबाचा पुत्र कामबक्ष त्याच्या पुत्रास ह्मणजे शहाजहानास तख्तावर बसविलें. इतक्यांत अवदालीची गडबड झाल्यामुळें गाजुद्दिनाला मराठ्यांकडे पळून जावें लागून ह्या शहाजहानास कोणीं विचारीतनासें झालें. अवदाली सबंद १७६० साल अंतर्वेदींत होता; परंतु, त्यानें कोणी नवीन पातशाहा स्थापिला नाहीं. भाऊसाहेब दिल्लीस आल्यावर त्यांनीं पट्टणास पळून गेलेल्या अलीगोहरास पातशाहा करून त्याचे नांवें गजशिक्के केले व त्याचा पुत्र जो जवानबख्त त्यास वलीअहद ह्मणजे युवराज केले. भाऊंनीं विश्वासरावाला तख्तावर बसविलें ह्मणून मल्हारराव होळकर लिहितो, असें ग्रांटडफ् ह्मणतो. विश्वासरावाला तख्तावर बसविल्याबद्दल एक शब्दहि होळकरांच्या कैफियतींत नाहीं. तेव्हां मल्हारराव होळकरानें पानिपतच्या लढाईची हकीकत दुसऱ्या एखाद्या लेखांत लिहिली असली पाहिजे. हाच लेख बहुश: होळकराची थैली ह्मणून ज्यास ह्मणतात तो असावा. सदर थैली काव्येतिहाससंग्रहकारांस मिळाली होती, परंतु ती हरवून गेली असें कळतें.

दिल्लींत पडला, त्याची चिटी पाठविली आहे. त्याप्रमाणें लिहून पातशा-हाची जरब मोडून याचे नांवें करणें. हे विनंति.

---

[ २५१ ]

हिते[३१४] असतां अद्याप न गेलां हें काय ? याउपरि लौकर जाऊन पेशजीं लिहिल्या अन्वयें सर्व कामें यथास्थित करणें. याउपरि दिरंगावरी न घालणें. ऐवजाची तर्तूद केली आहे. निसूर बसलों नाहीं. वरिचेवरी ऐवज रवाना करीन. याच पत्राचे पाठोपाठ ऐवज येऊन पावेल. विलंब लागत नाहीं. ह्मणोन भरंवशानें लिहिलें तें कळलें. ऐशास पत्र तों येऊन पावलें. ऐवज पाठोपाठ यावयाचा तो कधीं येऊन पावेल हें मात्र कळत नाहीं. येथें खर्चाची निकड आहे हें वारंवार लिहीत असतां तपशील मात्र लिहितां. ऐवज येत नाहीं. हें कामाचें नसे. याउपरि दिरंग न लावितां ग्वालेर, आगरे, मथुरेवरून ऐवज दिल्लीस येई तें करणें. विलंब न लावणें. जाट बलमगडास आहेत. तिकडून रसदेचा वगैरे पेंच पडावयाचा नाहीं. त्याची फौज पुत्र हुजूर येणार. ते येथें राहून पलीकडे पायबंद द्यावा. तिकडून तुह्मीं फौजसुद्धां जाऊन शहावरी असावें. इकडे यमुनेचें पाणी हलकें होतांच अबदालीचें पारपत्य यथास्थित करावें, असा डौल आहे. त्याजकडून तहाचें राजकारण अद्याप आहे, परंतु मळमळीत आहे. ठीक नाहीं. येथील मर्जीनरूप जाहल्याशिवाय तह होणार नाहीं. प्रस्तुत आह्मीं दिल्लीहून कुच करून दोन मजली ललेऱ्यास कुंजपुऱ्याचे सुमारें आलों. पुढें जाऊं. अलीगोहर याचे पुत्र बाहेर काढून वलीहद्दी करावी, हा निश्चय होऊन शुक्रवारचा मुहूर्त करार केला अहे. होईल तें मागाहून लिहिलें जाईल. ऐवज लौकर पाठविणें. सारीं कामें लिहिल्याप्रमाणें यथास्थित करणें. + अलीगोहरचे पुत्रास वलीआहद शुक्रेवारीं[३१५] केलें. गजाशिका

---

३१४ हें पत्र असेंच अर्धेंमुर्धें सांपडलें. ह्या पत्राचा पहिला व तिसरा बंद नाहीं.

३१५ छ ३० सफर ह्मणजे १० अक्टोबर १७६०.

अलीगोहरचा केला. आपले तालुकियांतहि शाहाआलमाचा गजाशिक्का चालवणें. महिनाभर फौजा उतरायाजोगें पाणी होत नाहीं. कुंजपुरियास समदखान आहे. आह्मी कुच करून त्याचें पारपत्य करितों. अब्दाली तिकडे आला तर उत्तम. न आलिया फिरोन येऊं. तुह्मीं लिहिलेप्रमाणें शह देणें. जाट आपलाच आहे. वसवास नाहीं. ऐवज सत्वर खबरदारीनें दिल्लीस सत्वर पोहोंचेसा करणें. पुढें सोईनें घेऊन जाऊं. ऐवजाविशीं आह्मीं लिहा—

---

[ २६० ] ॥ श्री ॥ २५ अक्टोबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसि:

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. तुह्मांस दोन चार पत्रें पाठविलीं कीं तुह्मीं व गोपाळराव गणेश एकत्र होऊन जलदीनें सुजातदौलाचे मुलकांत हंगामा करणें व रसद न चाले तें करणें. शेंपन्नास राऊत प्यादे येतील जातील, त्यांस लुटून मारून टाकीत जाणें. असें लिहीतच गेलों परंतु तुह्मी गढ घेत बसलां हें काय ? तरी याउपरि पत्रदर्शनीं सुजातदौलाचे मुलकांत हंगामा करणें. व अलीकडील रसद वगैरे मारीत जाणें. नेहमीं मुलकांत फिरावें. कोठें रसद मारावी. कोठें गांव लुटावा. वाट मारावी. माणसें मारून टाकावीं. दहशत बसवावी. हेंच नित्य करावें. मूलूक अंतरवेदींतील व गंगापारचा लुटीत जावा. वाटेचे गांव व रस्ते असतील त्यांस दहशत पडोन बेचिराख होय तें करावें. + वारंवार लिहिणें तें लिहिलें; परंतु तुमचेकडून त्यास उपसर्ग करावा हें होत नाहीं. पायबंद बसत नाहीं. तरी याउपरि या गोष्टीस उशीर न लावणें. वरचेवरी वर्तमान लिहित जाणें. जाणिजे. छ १५ रबिलावल सु॥ इहिदे सितैन मया व अलफ. हे विनंति. कुंजपुरा[३१६] व पांच सात हजार फौज,

३१६ कुंजपुरा २० अक्टोबर १७६० रोजी घेतला ह्मणून भाऊसाहेबांच्या कैफियतींत

पांचसा हजार प्यादा लुटला. यामुळें अबदालीचे लश्करांत दहशत पडली. कितेक लोक उठून जातात. अबदाली कुच करून बागपतेवर चार कोस कांहीं फौजाहि उतरूं लागली. लौकरच त्याचें पारपत्य होईल. तुह्मीं तिकडून [317] गनीमी तऱ्हेनें उगळा लावावा. अबदाली अलीकडे [318] आला. तुह्मीं पुढें येऊन वाटा त्याच्या माराव्या. कांहींच होऊन येत नाहीं. उत्तम नाहीं. सत्वर लिहिलेप्रमाणें करणें. हे विनंति.

---

[ २६१ ] ॥ श्री ॥ १ नोव्हेंबर १७६०.

राजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गो॥:

विनंति उपरि. अबदाली यमुना बागपताजवळ उतरला आणि गणोरास

---

( पृष्ठें १०।११ ) ह्मटलें आहे. परंतु लेखांक २६५त 'कुंजपुरा महाष्टमीस ह्मणजे १७ अक्टोबर १७६० रोजीं घेतला ह्मणून स्पष्ट लिहिलें आहे. ह्या वर्षी दसरा १९ अक्टोबर १७६० रोजीं होता. कुंजपुरा घेऊन भाऊ कुरुक्षेत्रास जावयास निघाले ह्मणून लेखांक २६५त लिहिलें आहे. काशीराजाच्या मतें कुंजपुऱ्याहून भाऊ दिल्लीस परत आले व तेथें त्यांनीं दसऱ्यास फौजेची गणती केली. परंतु भाऊ कुंजपुऱ्यास जे गेले ते दिल्लीस पुन्हा परत आलेच नाहींत. तेव्हां दिल्लीस जाऊन फौजेची गणती भाऊंनीं केली नाहीं हें उघड आहे. भाऊंचा दसरा कुंजपुऱ्यास झाला त्याअर्थी गणती कुंजपुऱ्यासच झाली ह्यांत संशय नाहीं.

३१७ भाऊ गनीमी तऱ्हेनें लढाई खेळले नाहींत असा त्यांच्यावर एक आरोप आहे. परंतु मोगली व गनीमी अशा दोन्ही तऱ्हांनीं युद्ध करण्याचा भाऊंचा विचार होता. जवर तोफखाना जवळ असल्यामुळें ठाणबंद होऊन मोगली तऱ्हेनें लढाई चालविण्याचा भाऊंनीं बेत केला. व गनीमी तऱ्हेनें शत्रूस भांबावून सोडण्यास गोविंदपंत, गणेश संभाजी व गोपाळराव गणेश यांस हुकूम केला. हा हुकूम ह्या तिघांनीं कितपत पाळला हें ह्या पत्रांतून सविस्तर वर्णिलेंच आहे.

३१८ अबदाली २५ अक्टोबर १७६०ला यमुना उतरून बागपतेवर आला. त्याचें सैन्य तीन चार दिवस नदी उतरत होतें तें २८ अक्टोबराला सबंध यमुनेच्या दक्षिणतीराला आलें.

आला. खासा स्वारी कुंजपुरियाहून पाणिपतास आली. त्याजवर तीन दिवस गणोरास होते. तेथून भालकियास आले. तेथून दोन अडीच कोस आजी आले. फार आवळून चालतात. कहीं लांबवूं देत नाहीं. चाळीस कोस, पन्नास कोस धावतात तें नाहीं ! अंतर थोडकें आहे. त्याचे आमचे बातमीची गोळागोळी होती. याप्रमाणें तीन दिवस होतें. दाणा दोन अडीच शेर गिलज्याचे लष्करांत आहे. हिंमत फार आहे. तरी यास गिळणार. त्यास, लढाई लौकरीच होऊन येईल. परंतु तुह्मीं जलदीनें यमुनेपलीकडून येऊन बागपतेपर्यंत धुमामा चालवून यास रसद न पोहचे, फौजेस शह पडे, ऐसें करावें. आतां गिलज्याचा पेंच तिकडे नाहीं. तुमच्यापाशीं सिद्दी या पेंचामुळें लागणार नाहीं. यास्तव लांब लांब मजलीनें येणें. सुज्याअतदौलाचे मुलकांतहि जमीदारांजवळून धुंद करवणें. या कामास दिरंग न लावणें. हें काम मागेंच करावें ऐसें होतें. याउपरि तपशील न लावणें. जाणिजे. छ २२ रबिलोवल. बुंधले वगैरे त्यास पत्रें पाठवणें. त्यांचाहि खबर लिहिणें. जाणिजे. छ मजकूर. दोनचार हजार फौज सडी निवडून बागपतेजवळ यमुना पारून यावें. रसद मारावी. गडमुक्तेश्वर, शामली, वगैरे नजीबखानाचे प्रांत जाळावे. अबदालीस मागें रसद बंद होऊन मुलुकाचा बोभाट होय असें जरूर करणें. वारंवार लिहिलें जाऊन अजून तुह्मी उमरगडींच आहां हें अपूर्व आहे ! आतांहि लिहिलेप्रमाणें न जालें तरी मर्दुमीचें काम होत नाहींसेंच जालें ! इरे धरून तडकून येऊन काम करणें. रा॥ छ २२ रा॥लावल. हे विनंति.

---

[ २६२ ] ॥ श्री ॥ ३ नोव्हेंबर १७६०.

श्रीमंत राजश्री पंत स्वामीचे सेवेसीः

विनंति सेवक करद्वय जोडून साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना.

स्वामीची आज्ञा घेऊन जसवंतनगरापाशीं आलों तों राजश्री लक्ष्मणपंत यांजकडून लश्करचें वर्तमानाचें पत्र आलें तेंच बजिन्नस सेवेसी पाठविलें आहे. त्याजवरून विदित होईल. मऱ्हाटी फौज शेर[३१९] झाली. याउपरि अबदालीचें पारपत्य सत्वरच होईलसें दिसतें. मी आज रातोरात सकुराबादेस आज्ञेप्रमाणें जातों. तेथून सविस्तर वर्तमान सेवेसी लिहीन. कृपा करावी. हे विज्ञापना. पे॥ मित्ती कार्तीक सुध ७ [३२०] शनवार मु॥ इटावें.

---

[ २६३ ] **श्रीगजानन** ३ नोव्हेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंदपंत दाजी स्वामीचे सेवेसि:

पोष्य नारो शंकर कृतानेक सा॥ नमस्कार विनाति उपरि येथील कुशल ता॥ छ २४ माहे रबिलावल मु॥ दिल्ली जाणून स्वकीय कुशल वर्तमान लिहून संतोषवीत गेलें पाहिजे. विशेष. आपलें आमचें बंधुत्व जाणून श्रीमंत स्वामीपासून वरात आपणावर घेतली. ते वरात घेऊन राजश्री कृष्णाजीपंत आपल्याकडे पाठविले आहेत. पंतमजकुरास जाऊन दीड महिना

---

३१९. अबदालीचें सैन्य यमुनेच्या दक्षिणतीरीं आल्यावर व येतांना मराठ्यांच्या व गिलज्यांच्या झटापटी दररोज चालल्याच होत्या. पैकीं नदी उतरतांना जी चकमक झाली ती होत असतांना मराठे आपण होऊन मागें सरकले असें दिसतें. नाहींतर नदीच्या उतारांतून अबदालीचें सैन्य सुरक्षित आलें असतें असें वाटत नाहीं. या गोष्टीचा प्रपंच प्रस्तावनेंत यथास्थित केला आहे. नंतर अबदाली बागपतेच्या पुढें संभाळक्यावर आल्यावर मराठ्यांच्या पिछाडीचें व अबदालीच्या आघाडीचें युद्ध झालें. त्यांत मराठे शेर झाले. गोविंदपंतानें जर प्रामाणिकपणानें काम केलें असतें तर अबदालीची ह्यावेळीं धडगत नव्हती. ह्या गोष्टीचा विशेष प्रपंच प्रस्तावनेंत केला आहे.

३२० ह्या पैवस्तीवरून गोविंदपंत कार्तिक शुद्ध सप्तमीस ह्मणजे १५ नोव्हेंबर १७६० रोजीं इटाव्यास होता हें उघड आहे. ग्रांटडफ् ह्या सुमारास गोविंदपंताला अताईखानें ठार मारलें ह्मणून ह्मणतो तें चूक आहे, हें पुढें स्पष्ट दाखवून दिलें आहे. बळवंतराव मेहेंदळ्याच्या पाठीमागून गोविंदपंत मारला गेला.

झाला. अद्याप ऐवज आला नाहीं. त्यास येथें युद्धप्रसंगाचा समय असतां आपण ऐवजास विलंब करावा हे गोष्ट इष्टत्वाहून दूर असे. आह्मांस येथें खर्चाची निकड विशेष आहे, ह्मणून बंधुत्व जाणून आह्मीं वरात घेतली असतां विलंब ऐवजास व्हावा हें अपूर्व आहे. आतां कृपा करून वायद्यावर दृष्ट न देऊन पंत मशारनिलेबरोबर ऐवज येथें पोहचे तो अर्थ आपण करतील. कदाचित् सावकारी नुकसान वाइद्याबद्दल बसेल तें देऊं. परंतु समयावर दृष्ट देऊन ऐवज आह्मांस अगत्य पोहचावले पाहिजे. + श्रीमंत स्वामींचें पत्र तुमचे नांवें आलें तें पाठविलें असे. अंतरवेदींत मोगलांचे मुलकांत तुमची फौज येऊन मोगलास पायबंद द्यावा ह्मणोन श्रीमंतांची मर्जी. वरचेवर तुह्मांकडे ताकीदपत्रें येत असतां अद्याप आपली फौज प्रांतास येत नाहीं. ऐसें नसावें. लौकर या समयीं येऊन पोहचावें. उचित असे. वरातेचा ऐवज लाख रुपये स्वारीस मोगलाच्या प्रांतास येतां समागमें आणावा. अथवा झांसीकडे ऐवज पावे तें करावें. साडेसवीस हजार रुपये घाटमपूर वगैरे वरातांचे बलगोविंद याचे येथें पेशजी वरातांपैकीं पावले न पावले. आह्मांस सावकार मजकुराची रसीद न आली. त्यास हें कैसें वर्तमान तें लिहावें व ऐवज पावला नसेल तर ताकीद करून सत्वर पावे तो अर्थ करावा. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

पे॥ कार्तिक शुद्ध ७ शनवार, मु॥ इटावें.

---

[ २६४ ] ॥ श्री ॥ ४ नोव्हेंबर १७६०

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसः

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. येथील खर्चाचे ओढीकरितां ऐवजाविशीं तुह्मांस वारंवार फारच लिहीत गेलों. परंतु ह्या गोष्टी तुमच्या चित्तांत

किमपि न येतां चालढकलीवरी हा कालपर्यंत नेलें. धातुपोषणार्थ मात्र लिहितां कीं मजला ऐवजाचे तर्तुदीशिवाय दुसरा अर्थ नाहीं, तर्तूद केली, करतों, एका दो दिवशीं रवानगीहि करितों, येतों, कार्यावरी आज्ञे-प्रमाणें जातों. ऐशा गोष्टी रिकाम्या लिहितां. मात्र निदर्शनास यांतील एकहि येत नाहीं. यामुळें तुमच्या कर्तृत्वाची तारीफ वाटते ! ते कोठपर्यंत लिहावी ? लिहितां लिहितां भागलों ! हें तुमच्या कर्तुत्वास उत्तम नाहीं. याउपरि पत्र पावतांच रसदेचा व बाकीचा ऐवज मातबर भरणा करून अवि-लंबें रवाना करणें. दिरंग एकंदर न लावणें. कदाचित् अबदाली यमुनेच्या दक्षिणतीरीं आल्यामुळें मार्ग सुद्धां नाहीं, ऐवज कसा रवाना करावा, हें निमित्य ठेवाल. आणि हा तपशील लिहावा तरी असें न करणें. अबदालीची आमची गांठ पाणीपताजवळ पडली आहे. तोफखान्याचा आराबा रचून लढाई करावयास तयारी केली आहे. त्याच्यानें इकडे तिकडे जावत नाहीं व कांहीं करवत नाहीं. पावणेदोन कोस दीड कोसाची तफावत आहे. पेंढारी व लुगारे राऊत वगैरे नित्य उंटें, घोडीं, तट्टें, बैल अघाडी पिछाडीवरी जाऊन गोटापासून घेऊन येतात. त्याचे कोणी पाटीवरहि निघत नाहीं. याप्रमाणें आहे. तुह्मीं या गोष्टी भयाच्या कोण्हेविशीं चित्तांत न आणितां सत्वर ऐवज दिलीस रवाना करणें. तेथें आलियावरी आह्मी हरतर्तुदेनें घेऊन येऊं. विलंब न लावणें. जलद जलद ऐवज दिलीस येऊन पोहोंचे तें करणें. तुह्मींहि पत्र पावतांच अंतरवेदींतून पटपटगंजावरी यांच्या पछाडीस येऊन पोहोंचणें. साव-कास याल तरी ठीक नाहीं. लांब लांब मजलीनें येणें. रसद त्याजकडे जाव-याची आढळेल ते लुटणें, दबाव पाडणें, ह्मणजे चहूंकडून घाबरा होईल. हेहि युक्त तुह्मांस बहुत वेळ लिहिली. परंतु तुह्मी येत नाहीं. सारीच डोळे-झांक करितां. परंतु असा समय चाकरी करून दाखवावयाचा पुढें कदापि येणें नाहीं. या हंगामीं जो आपले शक्तीपेक्षां चाकरी आधीक करून दाख-वील त्याचें रूप आहे. हें दूरंदेशी ध्यानांत आणून सर्व गोष्टी लिहिल्याप्र-माणें करणें. ऐवज पाठवणें. तुह्मीं येणें. लहान सहान गढ्यामुळें गुंतोन

मोठ्या कामाच्या उपयोगांतून जाल असें करून न घेणें. + तुह्मीं दरमजल बागपतचे सुमारें अंतरवेदींतून येऊन रसद मारणें. नजीबखानाचा मुलूक जाऊन लुटून फस्त करणें. ऐवज रसदेचा पांच सातशें राऊत देऊन आगरियावरून जलदीनें दिल्लीस येऊन पोहोंचेसा करणें. जाटाच्यानें अटकाव होत नाहीं. वेडेंवाकडें तो करणार नाहीं. मातबर एकदाच यावा. त्यांत दोन तीन लाख एकेकदां उटें चांगले राऊत देऊन रवाना करावे. दिल्लीस पावलियावर जसें दिसेल तसें पुढें आणून घेऊं. दोन चार हजार चांगली निवडक फौज लांब लांब मजली करून लिहिलेप्रमाणें रोहिलियांच्या मुलुकांत दगा व रसद बंद करणें. कांहींच न झालें तरी परिछिन्न तुह्मांवर शब्द येइल. वारंवार लिहिलियाची, आपले अबरूची इरे धरून काम बजावून आणणें. या दिवसांत तुह्मी येऊन लिहिलेप्रमाणें पावलां असतां तर किती काम होतें ! अजून तरी करून दाखवणें. गंगापार जमीदारांकडून दंगा करवणें. गोपाळराव गणश फौजसुद्धां गंगापार उतरून जमीदार सामील करून सुजादौला रोहिले यांचा अंमल उठवावा. याप्रमाणें करणें. मसलत मोठी. या दिवसांत ज्यास जें लिहावें त्याप्रमाणें होऊन न येई मग तुह्मी आमचे कामाचे काय ? याउपरि आज्ञेची व चाकरी करून दाखवावयाची सीमा झाली ! लिहिलेप्रमाणें सत्वर करणें. रवाना छ २५ रा॥विल. वल. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २६५ ] ॥ श्री ॥ ५ नोव्हेंबर १७६०.

चिरंजीव राजश्री दिवाकर जोशी यासि प्रती कृष्ण जोशी आशीर्वाद उपरि येथील कुशल तागाईत आश्विन वद्य १३ बुधवारपर्यंत मु॥ फणीपत येथें सुखरूप असो. विशेष. वर्तमान तरी श्रीमंतांहीं महाष्टमीस समदखान व कुतुबशहा मारून, दहा हजार सेना लुटून, कुंजपुरा घेऊन लुटिला. गढी

खणून जमीनीबरोबर केली. लोक आभर जाहले. श्रीमंतास भूमिगत सात लक्ष रुपये सांपडले. तेथून कूच करून कुरुक्षेत्रास चालिले होते इतकियांत अबदाली बागपतापाशीं यमुना पायाब उतरून सोनपथास आला. हें वर्तमान श्रीमंतीं ऐकतांच माघारे फिरोन यवनाचे सन्मुख दरमजल पाणिपथास आले. यवन येथून दोन कोसावरी राहिला आहे. नित्य थोडें थोडें युद्ध होत आहे. श्रीमंतांहीं चोहोंकडे तोफखाना पसरला आहे. यवनास थोर भय जाहलें आहे. पुढें येववत नाहीं. आमचे सैनिक यवनाचे समक्ष उभे राहून, नित्य शेंपन्नास यवन मारून उंट, घोडीं आणितात. दोन हत्ती पेंढारी यांनीं काल आणिले. यवनाच्या सैन्यांत रसद[३२१] बंद जाहली. यामुळें पीठ ८८३ व चणे ८८४ तूप ८८॥ याप्रमाणें महर्ग जाहलें आहे. आमचे सैन्यांत गहूं ८।६ व चणे ८।२ व तूप ८८२॥ याप्रमाणें सवंगाई आहे. आणखी दोन चार दिवसांत यवन चालोन तोफावरी येईल तरी क्षणमात्र बडेल. न ये तर आमचे लोक जाऊन युद्ध करणार. वरकड सर्व प्रकारें,करून शुभ चिन्हें होतात व स्वप्नें उत्तम श्रीमंतांस होतात. याजवरून सर्व सैन्यास उत्साह आहे, कीं अबदाली व नजीबखान व सुज्यातदौला आठा चौ दिवसांत क्षयास जातील ऐसें दिसतें. अबदाली शाहानशाहा ह्मणवीत होता. त्यानें युद्धें बहुत केलीं आहेत, परंतु तो दो कोसांवरी येऊन आठ दिवस बसोन कांहीं पराक्रम होत नाहीं. याजमुळें आमची फौज बहुत शेर आहे. अबदालीनें स्वदेशास जावें तरी मार्ग नाहीं; युद्ध करावें तरी परिणाम नाहीं; उगेंच बसावें तरी

---

३२१ यमुनेस पाणी फार असल्यामुळें यमुना उतरल्यावर कांहीं दिवस अबदालीच्या सैन्यांत फार महर्गता झाली. दिल्लीस मराठे असल्यामुळें यमुनेच्या दक्षिणतीरानें अबदालीला कही मिळणें अशक्य होतें. त्याला कही अंतर्वेदींतून यावयाची. परंतु अंतर्वेद सोडून तो यमुनेच्या दक्षिणतीरीं आल्यामुळें त्याला अंतर्वेदींतून रसद मिळणें प्रथम प्रथम कठीण पडलें. परंतु पुढें लवकरच पाणी जसजसें उतरत गेलें तसतशी अबदालीच्या सैन्यांत चंगळ झाली. ह्या पत्रांत अबदालीच्या सैन्यांत महागाई झाली ह्मणून ह्मटलें आहे. ती महागाई गोविंदपंताच्या पराक्रमामुळें झाली असा मुळींच अर्थ नाहीं. ती महागाई यमुनेच्या पाण्यानें व अबदालीनें केलेल्या स्थलांतरामुळें झालेली होती. गोविंदपंत अंतर्वेदींत असून त्यानें हें पायबंद देण्याचें व कही अडविण्याचें सहज होण्यासारखें काम केलें नाहीं.

मक्षावयास नाहीं. याप्रमाणें विचारांत पडला आहे. मागाहून युद्ध जाहल्यावरी सविस्तर होईल तें लिहूं. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

---

[ २६६ ] ॥ श्री ॥ ७ नोव्हेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री बाळाजी गोविंद स्वामी गोसावीं यांसिः

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. बद्दल देणें अजुरा खर्च प्रयागाहून गंगाजलाच्या कावडी दीनानाथ प्रयागवळ याणीं मोहन कहार वगैरे अ॥ २५ याजबरोबर पाठविल्या त्याचा अजुरा दर कावडीस रुपये ६ प्रमाणें रुपये १५० दीडशें रुपये तुह्माकडून देविले असेत. प्रांत बुंदेलखंड वगैरे महाल येथील ऐवजीं पावते करून कबज घेणें. वरक्त हरदु मुसंन्ना मजुरा एक असे. जाणिजे. छ २८ रा॥वल, सु॥ इहिदे सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २६७ ] ॥ श्री ॥ १५ नोव्हेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री आपा स्वामीचे सेवेसिः

पोष्य लक्ष्मण बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल ता॥ कार्तिक सुध ७ भृगुवासर संध्याकाळ जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांची कासद जोडी आजुरदार पत्रें श्रींस, बलवडसिंग राजास व राजश्री मोरो बल्लाळ जोशी यांस पत्रें होतीं. ते जोडी येथें पोटास मागावयास आले. त्यानीं पत्रें सरकारी दाखविलीं. त्या पत्रांसमागमें दिवाकर जोशी ब्रह्मघाटीं राह-

तात, त्यांस पत्र लश्करीहून त्यांचे बंधूचें आलें. तें पत्र वाचून त्याची नकल करून बजिन्नस अक्षरशा पाठविली. त्या पत्रावरून सविस्तर कळेल. लश्करचें सविस्तर वर्तमान लिहिलें आहे. कळावें. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे. हे विनंति.

सेवेसि आपत्यें समान दामोदर मधसूदन सा॥ नमस्कार विनंति लिहिली. परिसो. लोभाची वृद्धि कीजे. हे विनंति.

सेवेसि विनंति सेवक माणको महादेव व हरी कृष्ण करद्वय जोडून साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना लिहिली. परिसोन कृपा कीजे. हे विनंति.

---

[ २६८ ] ॥ श्री ॥ १५ नोव्हेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गोविंद बल्लाळ स्वामी गो॥ यांसि:

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. सरकारांत दारूचें प्रयोजन आहे, तरी तुह्मांकडून दारू चार खंडी पांच खंडी असेल ते तावडतोब रवाना करून दिल्लीस येऊन पोहोंचे ते गोष्ट करणें. या कामास दिरंग एकंदर न लावणें. जलदीनें रवाना करणें. + जाणिजे. छ ६ रबिलाखर सु॥ इहिदे सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें. येथें काम मोठें आहे. वीस खंडी दारू, पांच खंडी शिसें तयार करणें. त्यांत तयार जें असेल तें पत्रदर्शनीं रवाना करणें कीं दिल्लीस लौकर येऊन पोहोंचेशी करणें. फौज सुद्धां लौकर येणें. ऐवज रवाना करणें. हें लिहिलेप्रमाणें एकहि काम होऊन न आलें. फार दिवस खावंदानें लहानाचे थोर केलें, वाढविलें, त्याचें [३२२] सार्थक केलें ! अजून तरी सावध होऊन लिहिलेप्रमाणें येऊन पोहोंचणें. दारू, शिसें व ऐवज दिल्लीस

---

३२२ ही गोविंदपंताची शिफारस ध्यानांत ठेवण्यासारखी आहे !

सत्वर पावेसा करणें. दारू फारच लौकर आली पाहिजे. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २६९ ] ॥ श्रीशिव ॥ १४ डिसेंबर १७६०.

राजमान्यराजश्रीविराजितराजश्री बाळाजी गोविंद बल्लाळ स्वामी गोसावी यांसः

पोष्य नारो गंगाधर नि॥ राजश्री गणेश गंगाधर महाल तोफखाना दि॥ निहाय. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरि. तुम्हांवर वरात श्रीमंत भाऊसाहेबीं रु॥ २००० दोन हजार देविले होते ते रुपये वरातेचे दोन हजार भरून पावलों. रा॥ रा॥ धोंडाजी हरबाजी नवाळे याचे विद्यमानें भरून पावलों. हें लिहिलें. मार्गशीर्ष सुध ७ सप्तमी शके १६८२ विक्रम-नाम संवत्सरे छ ५ जमादिलावल.

---

[ २७० ] ॥ श्री ॥ १८ डिसेंबर १७६०.

राजश्री पांडुरंगपंत दि॥ र॥ गोविंद बल्लाळ स्वामी सेनेसिः

सेवक नारो शंकर नमस्कार विनंति उपरि. राजश्री गोविंदपंत यांहीं श्रीमंताचा खजाना रुपये ४२०००० चार लक्ष वीस हजार तुम्हांकडून आमचे स्वाधीन करविला आहे. त्याजपे॥ राजश्री धोंडाजी नाईक नवाळे यास रुपये ५०००० पन्नास हजार देणें. कबज घेणें. छ ९ जमादिलावल. सु॥ इहिदे सितैन. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २७१ ] ॥ श्री ॥ २० डिसेंबर १७६०.

पु॥ राजश्री कारकून दिमत गोविंद बल्लाळ गोसावी यांसि:

सु॥ इहिदे सितैन मया अलफ. तुह्मीं दिल्लीस ऐवज आणिला आहे, त्यापैकीं बदल देणें पागा दिमत रंभाजी कदम यास मुदबाखाचे बेगमीबदल रुपये १५० रुपये तुह्माकडून देविले असेत. तरी पावते करून पावलियाचें कबज घेणें. जाणिजे. छ ११ जा॥लावल. आज्ञा प्रमाण ( लेखन सीमा ).

---

[ २७२ ] ॥ श्री ॥ २३ डिसेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री गंगाधर गोविंद स्वामी गोसावी यांसि:

पोष्य सदाशिव चिमणाजी—विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. गोविंद बल्लाळ दिल्लीकडे फौजसुद्धां आले. गाजद्दी नगरानजीक त्यांचा व गिलज्याचे फौजेचा मोकाबला होऊन गोविंद[३२३]-

---

३२३ बळवंतराव मेहेंदळे ७ डिसेंबर १७६० रोजीं वारला. त्यानंतर कांहीं दिवसांनीं ह्मणजे २२ डिसेंबर १७६० रोजीं गोविंदपंत मारला गेला. व दुसरे दिवशीं किंवा त्याच दिवशीं त्याचें शिर अवदालीनें भाऊकडे पाठवून दिलें. ह्या संबंधानें नानाच्या बखरींत छापलेलें खालील पत्र वाचावें. हें पत्र विविधज्ञानविस्ताराच्या ५ व्या पुस्तकाच्या ७ व्या अंकात पुनः छापिलें आहे.

श्री नक्कल.

चिरंजीव राजमान्य राजेश्री मोरोबादादा यांप्रति बाळाजी जनार्दन आशीर्वाद उपरी येथील कुशळ तागाईत चं. १९ जमादिलोवल पावेतों मुकाम पाणिपत एथें सुखरूप असों. विशेष. बहुत दिवस जाहले, आपणाकडून पत्र येऊन, कांहींच वर्तमान कळत नाहीं. तरी निरंतर पत्रीं संतोषवीत जावें. इकडील मजकूर पूर्वी कुंजपुऱ्यास लढाई जहाली. अबदुलसमदखान वगैरे मारले. त्याजवर, आबदालीची गांठ पडली. कृष्ण जोशी संगमेश्वरकर यांस गोळा लागून देवआज्ञा झाली. इतकें वर्तमान तपशीलवार लेहून पाठविलें होतें, त्यावरून

पंतांच्या फौजेनें शिकस्त खाऊन पळाली. मशारनिल्हे झुंजांत राहिले ह्मणोन वर्तमान येथें आलें. बाळाजी गोविंद फौजेसमागमें गेले. ते व सारी

साकल्य कळलेंच असेल. त्या आलीकडील मजकूर तरीं, यांणीं तोफखान्याचा आरव पसरून खंदक खणून पाणिपत गांव आपल्या पाठीशीं घालून सज्या फौजा तोफांचे मागें उभ्या याप्रमाणें बंदोबस्तानें राहिले आहेत. बुणगे गांवाचे पुढें फौजेचे मागें ठेविले आहे. नित्य गोळागोळी होती; सभोंवत्या त्याच्या फौजा आहेत. त्यापाशींही चाळीस पन्नास तोफ चांगली आहे. साठहजारपर्यंत फौज आहे. एके दिवशीं सरदारांकडील बाजूकडे त्याची फौज वाढून आली. त्याची यांची लढाई चांगली झाली. शिंद्यांकडील लोकांनीं त्यांना गोटांत नेऊन घातलें. साहाशें पावेतों माणूस जखमी व ठार त्यांजकडील जाहाले. यांजकडीलहि दोन अडीचशेंपर्यंत ठार व जखमी झाले. अस्तमान झालें यास्तव लढाई राहिली. त्यानंतर पंधरा दिवशीं चंद्र २८ रविलाखरीं श्रीमंताकडील मोर्चावर चालून चार पांच हजार आले. वरकड फौज त्यांची पाठीमागेंच उभी होती. त्यांची यांची लढाई होऊं लागली. लढाईस प्रारंभ होतांच अस्तमान झालें. ते दिवशीं बळवंतराव गणपत यांस छातींत गोळी लागली. तसेच घोड्याखालीं पडले. तों त्यांजकडील माणसें धांवलीं. त्यांतील एकानें तोंडावर तरवारीचा वार केला, दुसऱ्यानें गळा कापून तें शीर नेऊं लागले, तों पांच सांत राऊत धांऊन सोडविलें. गळा अर्धा कापला होता, तसेच आणून दहन केलें. समागमें स्त्री अग्निप्रवेश केली. त्यादिवशीं त्याजकडील दीड हजार माणूस ठार आपल्या आराब्यापुढें पडलें होतें. त्यांचे पुढें किती होतें हें कळलेंच नाहीं. अैशीची तीन घटका रात्र पावेतों लढाई झाली. आपल्याकडील दीडशें पावेतों ठार व पांचशें सातशें पावेतों जखमी झाले. ही लढाई फार चांगली झाली होती. परंतु बळवंतराव यांचा प्रकार असा झाला यामुळें ते सर झाले. त्यावर गोविंद बल्लाळ यांस पूर्वीपासून पत्रें जात होतीं कीं अंतरवेदींत उतरून, अवदालीचा रस्ता बंद करणें. यावरून, ते दरमजल दिल्लीच्या सुमारें आले. तेथील नारो शंकर यांचीहि कांहीं फौज मदतीस घेतली व पुढें रस्त मारावी तों अवदालीनें दाहा हजार फौज निवडक पाठवून दगा केला. कोणी लढले व कोणी पळाले. गोविंद बल्लाळ यांचें शीर कापून आणून श्रीमंताकडे पाठवून दिलें. मग दहन झालें. गोविंदपंताकडील वगैरे तीन चारशें फौज ठार झाली. गोविंदपंताचे चिरंजीव बाळाजी गोविंद हे समागमें होते. ते पळून नारो शंकर यांजवळ दिल्लीस आले. कोणी कोणी पळालेले लोक येत. याप्रमाणें झालें. मोठे दगेबाज, याजकरितांच आरब पसरून खंदक खणून मोंगलाई रीतीनें राहिले आहेत. दोन महिने यांची लढाई होत्ये. अद्यापि लढावें हाच निश्चय उभयतां पक्षीं झाला आहे. ईश्वर काय परिणाम लावील तो खरा. मनसबा भारी पडला आहे. पैसा नाहीं. माहागाई फार. यामुळें लष्कर गलबललें आहे. याप्रमाणें वर्तमान आहे. आपले बुणग्यांत गोळे जातात. त्याचीं बहूत पत्रें मी पाठविलीं. परंतु

फौज कोठें एके जागा होईल तें लिहिले आलियानंतर कळेल. ते एके जागा होऊन दिल्लीस येतील. त्यास गोविंदपंत राहिले हें वर्तमान तिकडे कळल्यानंतर मामल्यांत जमीदार वगैरे फिसाद करितील. तर तुह्मीं सावधपणें राहून, शिबंदी अधिक उणी लागली तर ठेवून, कोठें फिसाद न होतां, पूर्ववत्प्रमाणें बंदोबस्त राहे तें करणें. मशारनिल्हेचे पदरीं मातबर शिवराम गोविंद वगैरे आहेत, त्यांचें समाधान राखोन सर्वा गोष्टींचा बंदोबस्त करणें. मोगलाकडील कोणी दहा पाच हजार फौज घेऊन येऊन तीकडील अमल करितो असें नाहीं. परंतु इकडील गोविंदपंतांच्या वर्तमानानें तीकडील जमीदार चार आहेत ते तूर्त डोई उचलितील, दंगा करितील, ठाण्यास दगा करितील. यास्तव मजबुदीनें राहून ठाणियांत जे जे आहेत, त्याचा पुस्तपन्हा वरचेवर करून ठाणीं मजबूत रहात तें करणें. कदाचित् वसुलास जमीदारांनीं चार दिवस खलेल केलिया पुढें सर्व नीट केलें जाईल. परंतु ठाण्यास दगा जालियानें वाईट. यास्तव ठाणीं सर्व फार हिमतीनें राखणें. तुह्मीं तिकडे आहां. गोविंदपंतांनीं मातबर शिवराम गोविंदासारखे पदरीं बाळगले आहेत. त्यास हिमत धरून अशा समयांत गेली गोष्ट सुधारून दाखवावी. झाले गोष्टीचा खेद न करावा. ईश्वर इच्छेस उपाय नाहीं. तुह्मीं आपलें सर्व प्रकारें समाधान असों देणें. बंदोबस्त उत्तम प्रकारें करणें. इकडील फौज शिकस्त खाऊन तिकडे गेलियानें फारच वाईट दिसतें. यास्तव त्यास तिकडे जाणें उत्तम नाहीं. त्याणीं जमा होऊन मागती दिल्लीस यावें. याप्रमाणें येथून त्यांस लिहिलें आहे. तुह्मीं त्यास याप्रमाणें लिहून ते दिल्लीसच येत तें करणें. त्यामागें तुह्मीं सर्वांनीं हिमत धरावी. मामल्यांत बंदोबस्त उत्तम

---

आपणास एकहि लिहावयास अनुकुल न पडलें. बरें! असो. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे. हे आशीर्वाद. हें वर्तमान तीर्थस्वरूप राजश्री बावांस लिहून पाठवावें. हे आशीर्वाद. पेटा फुलमरी एथील फडनविशी माहादाजीपंत कुंटे यांस दिल्ही आहे. त्यांस त्यांचें वेतन उत्तम प्रकारें होय, अशी विनंति श्रीमंतास करून करून घ्यावें. मीं आपणास लिहावें असें नाहीं. असामी आपले घरचा. परंतु माहादाजीपंत यांचीं पत्रें येतात त्यावरून लिहिलें आहे. हे आशीर्वाद.

ठाणींठुणीं मजबूद असावी, यांतच सरकारचेंहि काम व तुमचेंहि स्वरूप आहे. + तुह्मी मामलियांत आहां. सर्वांचा दिलासा करून बंदोबस्त करणें. घाबरे झालिया जमीदारच वाखा करितील. दिलांत चिंता न करणें. आह्मी आहों. सर्व नीट करूं ठाणीं जतन राखणें. मुलुकाचा बंदोबस्त करणें. जाणिजे. छ १४ जमादिलावल. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २७३ ] ॥ श्रीशंकर ॥ ९ जानेवारी १७६१.

राजश्री बाळाजीपंतबाबा दाजी गोसावी यांसि:

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

स्ने॥ कुसाजी पायगुडे दंडवत विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केलें पाहिजे. विशेष. श्रीमंत राजश्री सुभेदार याणीं आह्मांस तुह्मावर दरमाहेची नेमणूक करून दिली. त्यापैकीं रुपये २००० दोन हजार भरून पावलों. हस्तें बाळाजी अनंत. सदरहु रुपये भरून पावलों. मिती शके १६८२ विक्रमनाम संवत्सरे पौष सुध ४ मंदवार छ २ माहे जमादिलाखर सु॥ इहिदे सितैन मया अलफ. हे कबज लिहून दिलें. सही. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे. हे विनंति.

---

[ २७४ ] ॥ श्री ॥ १० जानेवारी १७६१.

राजश्री पांडुरंग बाबुराव स्वामी गोसावी:

विनंति उपरि. राजश्री कृष्णाजी अनंत याचे वरातेचा ऐवज तुह्माजवळ आहे, त्यापैकीं त्याजकडील स्वार आले आहेत, त्यास खर्चास .... भवानसिंग रुपये १० दहा देणें. मिती पौष शुद्ध ४ सन १८१७. हे विनंति.

---

[ २७५ ] ॥ श्री ॥ १२ जानेवारी १७६१.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री बाळाजीपंत स्वामी गोसावी यांसि:

पोष्य धोंडो पद्माजी दिमत राजश्री सटवाजी जाधवराव दंडवत विनंति. स्वामीवरी वरात श्रीमंत राजश्री भाऊसाहेब याणीं दिली ——— रुपये.

८०० किता.

२०० किता.

———

१०००.

येकूण हजार रुपये देविले ते सदर्हु वराताप्रमाणें हजार रुपये आह्मी भरून पावलों. मु॥ दिल्ली. छ ५ जमादिलाखर सु॥ इहिदे सितैन मया अलफ. हे विनंति.

---

[ २७६ ] ॥ श्री ॥ १३ जानेवारी १७६१.

राजश्री पांडुरंग बाबूराव स्वामी गोसावी:

विनंति उपरि. नाइकाकडील हवाल्याचे ऐवजी रुपये ८०० आठशें मेघशामपंत याजब॥ पाठवणें. चांगला ऐवज घेणें. मिती पौष शु॥ ७.

---

[ २७७ ] ॥ श्री ॥ ९ जानेवारी १७६१.

राजश्री पांडुरंग बाबूराव स्वामी गोसावी:

विनंति उपरि. राजश्री धोंडोबा नाईक याजकडील हवाल्याचे ऐवज पैकीं रा॥ कुसाजी पायगुडे यास तूर्त रुपये २००० दोन हजार देविले असेत. नाइकाकडून ··· कबज घेणें. मिती पौष शुद्ध ३. हे विनंति.

---

[ २७८ ] ॥ श्री ॥

विनंति उपरि. राजश्री अंताजी माणकेश्वर यांजकडील दहा हजार रुपयांची कबज येथें घेतली आहे. ऐवज चार लक्ष वीस हजारापैकीं देववावा. हे विनंति.

---

[ २७९ ] ॥ श्री ॥ ३१ डिसेंबर १७६०.

राजश्री बाळाजीपंत बाबा गोसावी यांसिः

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

सो॥ कुसाजी व जानराव पाडगुडे रामराम विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वानंदलेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. श्रीमंत राजश्री मल्हारजी होळकर सुभेदार याणीं आह्मास रोजमेरा याची वरात तुह्मावर रुपये ७४७५ सात हजार चारशें पंचाहत्तरांची दिली होती. दरमाहे करार करून त्या ऐवजीं रुपये ३४८७॥ तीन हजार चारशे साडे सत्यांशी हस्तें बाळाजी अनंत रानडे—कारकून यांचे मार्फतीनें भरून पावलों. हें कबज लिहून दिलें. सही नि॥ कारकून. मिती मार्गशीर्ष वद्य दशमी. शके १६८२ विक्रमनाम संवत्सरे, छ २२ जमादिलावल सु॥ इहिदे सितैन मया अलफ. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे. हे विनंति. मे॥ दिली.

---

[ २८० ] ॥ श्री ॥ २४ डिसेंबर १७६०.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री बाळाजी गोविंद स्वामीचे सेवेसीः

पो॥ जनार्दनराम नि॥ नारायणराव बापूजी साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबीं तुह्मांकडून तुमचा ऐवज दिल्लीस आला आहे त्यापैकीं देविले ——— रुपये

१४८६२॥ पथक नि॥ नारायणराव बापूजी.

७२२१॥ रोजमोरा अठवडे २.

२००० कापड ख॥बद्दल.

५६४१ शेळके व गावडे यांस देविले ते.

१४८६२॥.

७५६ पागा जानराव .... .... ....

२१८५ पागा रंभाजी कदम.

१७८०३॥.

येकूण सतरा हजार आठशें साडेतीन रुपये दिल्लीस भरून पावले. छ १५ जमादिलोवल' सु॥ इहिदे सितैन. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे. हे विनंति.

---

[ २८१ ] ॥ श्री ॥ ३० जानेवारी १७६१.

झाडा ऐवज नि॥ बाळाजी गोविंद दिल्लीस खजाना आला. सु॥ इहिदे सितैन मया व अलफ.

रुपये.

४,२००००.

पै॥ वजा दिल्लीचे मुकामीं खर्चास घेतले ८८००.

बाकी ४,११,२००

खर्च.

६०,००० धोंडोबा नाईक नवाळे यांसी रो॥ नारो शंकर यांनीं देविला, छ ९ जमादिलावलीं.

१,१०,००० रो॥ लष्कर श्रीमंत स्वामीकडे बराबर कृष्णराव बल्लाळ दि॥ पायगाडे, छ १३ जमादिलावलीं.

७३,९६३॥ बा॥ वराता हुजूर.

१०,००० अंताजी माणकेश्वर वरात वीस हजार पैकीं, छ १५ जिमादि.

१४,८६२॥ पतक नारायणराव बापू, छ १५ जमादिलावलीं.

९,२२१॥ वरात १.

५,६४१ वरात १.

---

१४,८६२॥.

७५६ जानराव ढमढेरे छ १५.

२३३५ रंभाजी कदम छ १५ र॥.

२१८५ वरात १.

१५० वरात १.

---

२३३५

६,००० त्रिंबकराव सदाशिव छ १६

८,४६८ लखजी बोधे छ १८ जा॥वल.

१०,००० शिदाप्पा शेटे वीरकर छ १८ जा॥.

७,९९६ कृष्णाजी अनंत छ २३ जा॥वल.

८०० राघो निळकंठ छ २४ जमा॥वल.

१५० विठलराव शिवदेव छ २३.

१२,५९६ पा॥ रा॥ हुजूर रोजमोरा दीडमाही छ २९ जमादिलावलीं.

---

७३,९६३॥.

०० रवाना लष्कर श्रीमंत स्वामीकडे बराबर पाराशरदाजी[३२४] छ

---

२४ जमादिलावल ह्मणजे २ जानेवारी १७६१ ह्या रोजीं पाराशरदादाजी, चपांचशें रुपयांची एकेक थैली घेणारा असे, तीनशें स्वार घेऊन पाणिपताकडे [illegible]. खजिन्यावरोबर बंदोबस्ताकरितां आणीक चारपांचशें स्वार होते. [illegible]वलीं ६ स्वार परत आले व २९ जमादिलावलीं ह्मणजे ७ जानेवारी [illegible] स्वार परत आला. कारण हुल्लड झाली. २४ जमादिलावलीं सहा

२४ जमादिलावलीं १,५००००.

पैकींवजा

३,००० छ मा॥र स्वार फिरोन आले सुमार ६.

५०० छ २९ जमादिलावलीं हुलड जाली तेथून स्वार आला १.

३५००.

बाकी —————————————— रुपये.

७८६ पागेची चंदीची बेगमी.

१७६ पागा जानराव ढमढेरे इ॥ छ १३ जमादिलावल ता॥ छ २८ जमादिलावल रोज १६ दररोज रु॥ ११ प्रे॥ —————————— रुपये.

---

स्वार परत आले ते कांहीं इतर कारणानें आले. २९ जमादिलावलचा मात्र, हुलड झाली म्हणून परत आला. पाराशरदादाजी चोविस तारखेला दिल्लीहून निघाला तो २६ तारखेच्या रात्रीं अवदालीच्या लष्करापाशीं चुकून गेला. तेथें रात्रीं चकमक झाल्यावर एक स्वार निघाला तो २९ तारखेला दिल्लीस परत आला. ही हुलड पांच जानेवारीला झाल्यावर नऊ दिवसांनीं पानिपतचें मोठें युद्ध झालें. पानिपतचें शेवटलें युद्ध कोणत्या तारखेस झालें याबद्दल बराच मतभेद आहे. ७ जानेवारी, ८ जानेवारी, १२ जानेवारी व १४ जानेवारी ह्या तारखा निरनिराळ्या ग्रंथकारांनीं दिल्या आहेत. पानिपतची लढाई हिंदूंच्या पौषांत व यवनांच्या जमादिलाखरांत झाली. लढाईच्या दिवशीं बुधवार होता. त्याअर्थी १४ जानेवारी १७६१ ही तारीख विश्वसनीय ठरते. रा. डफ, कीन, मालेसन, साने इत्यादि मंडळीनें सातवी तारीख घेतली आहे. रा. नातू, ठाकूर इत्यादि १४ जानेवारी पसंत करितात. आमच्या मतें १४ तारीखच खरी असावी. ( १ ) कारण, ह्या तारखेच्या बाजूला बखरींचें बहुमत आहे. ( २ ) पौष शु॥ ८ ही तीथ पानिपतची हे महाराष्ट्रांत आबालवृद्धांच्या तोंडीं झालेलें दिसतें. ( ३ ) मुसलमानांनाहि ६ जमादिलाखर हीच तारीख पसंत आहे. ( ४ ) हिंदूंचा पौषांत व यवनांचा जमादिलाखरांत बुधवार अष्टमीला व ६ व्या तारखेला यावयाचा म्हणजे १४ जानेवारी हीच तारीख घ्यावी लागते. हा एवढा पुरावा १४ व्या तारखेच्या प्रीत्यर्थ दिला खरा. परंतु, अस्सल पत्राचा पुरावा हातीं येईल तर ह्याहूनहि ठामपणें हीच तारीख खरी असें बिनहरकत म्हणतां येईल. कारण, हजारों नामी तर्कांपेक्षां एक अस्सल चिटोरें जास्त महत्वाचें असतें.

३६० पागा लखजी बोधे इ॥ ता॥ छ ३० जमादिला-
वल आठरा रोज दररोज रु॥ २० प्रे॥.
२५० पागा नि॥ रंभाजी कदम यांसी मोहगम बेगमी.

७८६

३,११२४१॥.
बाकी ता॥ छ ३० जमादिलावलीं —— रुपये.
२८,७५०॥.

ता॥

रुपये दिल्हे. वरात कबज घेतली असे.

२,००० गणेश गंगाधर यांची वरात देणें अ-
से. रो छ ५ जमादिलाखर पावली गु॥
पांडुरंग बाबूराव.

२६,७५०॥ ऐन शिल्लक.
२६,७५० ता॥ धोंडोबा नाईक.
॥ ता॥ पांडुरंग बाबू.

२६,७५०॥.

२८,७५०॥.

२६,७५०॥ छ ३० जमादिलावलीला धोंडोबा नाईक नवाळे यांजकडे
—— रुपये.

२८७५ छ ५ जमादिलाखर.
१८७५ पागा दारकोजी निंबाळकर वरात.
१००० सटवाजी जाधवराऊ.
८०० वरात १.
२०० वरात १.

१०००

२८७५.

बाकी ———————————————————— रुपये.

२३,८७५॥.

वजा केले ते रु॥ ६८०० बाकी रुपये.

१७०७५॥.

पैकी वजा महीपतराव

चिटणीस याजकडे॥ २०००.

बाकी १५०७५॥.

छ २३ जमादिलाखर मु॥ भिंड. येणेप्रमाणे॥ नारो शंकर याजकडे याद लेहून दिल्ही असे.

———

[ २८२ ] ॥ श्री ॥ २३ फेब्रुवारी १७६१.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री जनार्दनपंत दाजी स्वामीचे सेवेसि:

पोष्य नारो शंकर साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल छ १७ रजब पावेतों मु॥ ग्वालेर यथास्थित जाणोन स्वकीय लेखन करून तोषवीत असावें. यानंतर राजश्री पांडुरंग शंकर यांचे लिहिल्यावरून आपण आमचे ऐवजाचे द्यावयाविषयीं ज्या ज्या प्रकारें राजश्री बाळाजीपंत बाबा यांसि बोलिलेत त्या कृपेचा साद्यंत अर्थ कळोन बहुत समाधान झालें. ऐसाच आपला स्नेह अकृत्रिमभाव आह्मांसी आहे. चित्तास चित्त साक्ष साक्ष असे. ऐसियासि राजश्री बाबा यानीं निश्चयास अंतर करावें, उचित नव्हे. भगवत् कृपेंकरून श्रीमंतांचें राज्य कायम आहे. आजच कोण्ही हितोपदेशी सांगत असतील त्याजवर दृष्ट देऊन, तरते बुडते पाहून, आत्मस्वार्थ ध्यानांत आणून, बाबानीं आमचा ऐवज कैलासवासी पंतानीं करार केला त्या वचनावर दृष्टि न देतां न द्यावा, व हिलेहवाले करावे व ते खासा भिंडेंत वचन बोलिले तें अनृत करावें, विहित नाहीं. शेवट आमचा ऐवज

त्यांस सुटणार नाहीं. ऐक्य परमार्थ राखून देतील, तर घेऊं; नाहीं तर श्रीमंतांसमक्षाहि ते देतील व आह्मी घेऊं. परंतु या समयीं आह्मी ऐवज दिल्यानें उपकारी होतों व पूर्वापर स्नेह वृद्धिंगत होतो. इतकें लक्षून कार्य करून घ्यावें हेंच उचित आहे. सांप्रत सरदारांनीं ताकीदपत्रें दिलीं तीं पाठविलीं आहेत. त्याप्रमाणें ऐवज निश्चयानरूप ऐवजाचा निकाल करून पांडुरंग शंकर यांच्या ऐवजासुद्धां रवानगी करावी. तुह्मीं चार लक्ष विसाचा ऐवज झाडा दिल्लींत लिहून दिला. पर[३२५] त्याबरोबर ऐवज पांचशें रुपयें तुह्मा-कडे नक्षा आला तो जमेस न धरिला. याजमुळें पांचशें हिशेबीं बाकी व ऐवज झाड्यापैकीं आठ आणे येतां पांचशें अर्धा रुपया हिशेबाची नकल पाठविली आहे. त्याप्रमाणें मनास आणून ऐवज राजश्री पांडुरंग शंकर यांचे स्वाधीन करावा. आह्मींहि बाबांस बहुत प्रकारें लिहिलें आहे, आपणहि समजून सांगावें. त्यांचे तुमचे सर्वांचे विचारास आलिया कराराप्रमाणें लक्षा रुपयांचा निकाल करून द्यावा. कदाचित् ऐवज नच द्यावा असें सर्वांचे चित्तास आलें, तर आह्माकडील दस्ताऐवजीं कागदपत्र सर्व देऊन श्रीमं-तास पत्र देऊन राजश्री पांडुरंग शंकर यांची रवानगी सत्वर आह्माकडे करावी. विलंब न करावा. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २८३ ]  ॥ श्री ॥  ६ मे १७६१.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री बाळाजी[३२६] गोविंद स्वामी गोसावी यांसि:

पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. चिरंजीव राजश्री भाऊसाहेब यांनीं राजश्री नारो शंकर यांस गुदस्ताचे समजाविशीचे ऐवजी एक लक्ष

---

३२५ पर ह्मणजे परंतु. पर हा शब्द कऱ्हाडे लोकांच्या बोलण्यांत विशेष येतो.

३२६ वडिलांचा कित्ता चिरंजीवांनीं गिरविला होता.

रुपयांची वरात तुह्मावरी दिली. त्यास तुह्मीं वरातेचा ऐवज अद्याप दिला नाहीं, ह्मणून हुजूर विदित झालें. त्याजवरून हें पत्र लिहिलें असे. तरी वरातेप्रं॥ ऐवज मशारनिल्हेस पत्रदर्शनीं पावता करणें. यविषयीं फिरोन बोभाट येऊं न देणें. जाणिजे. छ ३० रमजान सु॥ सन इहिदे सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २८४ ] ॥ श्री ॥ २१ मे १७६१.

आशीर्वाद उपरि. चवेताळीसशा रुपयांच्या चिठ्या बाबूरायाच्या घेऊन पुणियास रवाना करितों. तुमचीं पत्रें चिटकोबाकडे रवाना करितों. पत्राप्रं॥ ऐवज देतील. श्रीमंतांचें पत्र पाठविलें तें पावलें. तुर्त आह्मी रेवातीरीं आहों. श्रीमंत बऱ्हाणपुरीं गेले. सौभाग्यवती गोपिकाबाई येथें राहिली आहेत. नारायणरायास[३२७] फोड्या आल्या. आठाचौ रोजांनीं येथून गेलियावर वर्तमान निवेदन करूं, तों तुह्मीहि याल. वरकड सविस्तर मजकूर कळला. त्या अलीकडील पत्र तुह्मीं चैत्र शुद्ध १ निघतों ह्मणऊन लि॥ तें उत्तम. त्याप्र॥ निघोन आलांच असाल. सत्वर भेटी होईल. हे आशीर्वाद. कारकुनांचीं पत्रें पाठविलीं ते पुणियास चिटकोबा ज्यांचीं त्यांस पावितील. हे आशीर्वाद. मित्ती चैत्र व॥ २ द्वितीया, शके १६८२ वृषनाम संवत्सरे. हे आशीर्वाद.

---

[ २८५ ] ॥ श्री ॥ २४ जून १७६१.

सेवेसि जोती गोपाळ[३२८] कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना येथील

---

३२७ नारायणरावास देवी आल्याचा उल्लेख नानाफडणिसानें आपल्या आत्मचरित्रांत केला आहे ( पत्रें व यादी ५३ ).

३२८ हें पत्र पानिपतानंतर अंतर्वेदींत व बुंदेलखंडांत झालेल्या गडबडीसंबंधाचें आहे.

वर्तमान तागाईत जेष्ठ व॥ ५ मिती हिंदुस्थानी स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं आज्ञापत्र पाठविलें तें चैत्र शु॥ १४ श्री काशींत पावलें. त्याजवरी वैशाख व॥ ५ पंचमीस निघालों ते अयोध्येंकडून ब्रह्मावर्तास आलों, तों तेथें अमल होऊन आठ दिवस झाले होते. तेथून वैशाख शु॥ ११ गुरुवारीं उंबरगडास दाखल झालों. आपले मंडळीची व श्रीमंत राजश्री बाबांची भेट झाली. माणसें श्रींतच ठेविलीं. सडे एक माणूस व तट्टू असे आलों. सोबती काशीकर ब्राह्मण पांच सात होते, ह्मणून मार्गी निभाव झाला. अंतरवेदींत बहुतकरून अमल बसला आहे. कड्याकडे अद्यापि दंगा आहे. फर्काबादेपलीकडे राहिल्यांची फौज आली आहे. ह्मणून वर्तमान आहे. व जाट व गंगोबातात्या मथुरेजवळ उतरून कौलास आले हेंहि वर्तमान आहे. नवाब सुज्यातदौला काशींस दाखल झाला. शहाजादाहि पाटणियाहून दोन मजली आलीकडे आला आहे. सुजातदौले व त्याची भेट होणार. त्यास, त्यांजमध्यें कांहीं विषम पडलें. ह्मणून वर्तमान आहे कीं मिरजाकोचक पूर्वीं प्रयागीं होता तो शहाजादा याजकडे गेला होता. त्याजवरी सुज्यातदौला यानें तो तिकडे गेलियावर प्रयाग घेऊन त्याचीं माणसें धरलीं, ह्मणून तो शहाजाद्यापासून अयोध्येस आला. त्याजलाहि धरून बंदीस घातलें. त्यास हल्लीं दिल्लीकडून आलियावरी त्यास जिवें मारिला. त्याचीं मुलें बायका अशीं सातजण मारून टाकलीं. याकरितां शहाजादा यास विषाद आला आहे. पुढें जें होईल तें होवो. आज तागाईत राजकीय वर्तमान या प्रांतीं य रीतीचें आहे. राजश्री मल्हारराव होळकर सुभेदार मांघारे फिरले, ह्मणून वर्तमान आहे. जानोजी भोंसले सागर प्रांतास आले होते, तेहि मल्हारबा देशास गेले असें वर्तमान ऐकून नागपुराकडे गेले. बुंधेले यांचा सला मात्र करून देऊन गेला. सल्याचा करार करून हिंदुपतराजे यानीं बाळाजीपंतास पत्र लिहून दिलें कीं तुमचा व आमचा पूर्ववत् प्रमाणें सलुख. कळावें. गुरसराई व कोच या प्रांतीं गव्हारांनीं दंगा केला आहे. तूर्त या प्रांतीं गंगा-

धरतात्या मात्र आहेत. मथुरेजवळ उतरून अंतरवेदींत आले ह्मणोन खबर आहे. काय होईल तें पहावें. सेवेसि श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[ २८६ ] ॥ श्री ॥ ६ जुलै १७६१.

स्वामींचे सेवेसी सेवक त्रिंबक बाबूराव साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. विशेष. पीरखानाबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. बारा हजारांच्या हुंड्यांचा ऐवज गणेशपंतास पाववून जाब पाठविला आहे. आह्मांबरोबर हुंडी सहा हजारांची तो ह्रि सकारली व नक्षा रुपये वीस हजार त्याची याद अलाहिदा आहे. यावर दरबारचें वर्तमान. श्रीमंतांस देवआज्ञा झाली हें तों जगप्रसिद्ध कळलेंच असेल. मरणाचे पूर्वी दोन दिवस पर्वतीसच होते. तेथेंच मृत्यु आला. तेथें मृत्यु होतांच शहरची बंदोबस्ती केली. जागा जागा दहा दहा वीस गाडद्यांच्या चौक्या ठेवून वाड्याभोंवते हजार बाराशें गाडदी चवकी ठेवून बंदोबस्ती केली. मंगळवारचे दिडा प्रहरा रात्रीस. दुसरे दिवशीं बुधवारीं अग्नि दिला. परंतु ते दिवशीं शहरांत मोठा आकांत झाला. ईश्वरजीसें करणें कीं तशामध्यें कोणही परसैन्य नव्हतें; नाहींतर मोठा प्रळय झाला असता. इतकें असतां जो आंग्र्या[३२९] कैदेमध्यें आहे, त्याणें इब्राहिमखां गारदी याचा भाचा चाकरीचे उमेदगारीमुळें सात आठ हजार गारद्यांनिशीं आला आहे, त्याणें श्रीमंत सावध असतांच पैगाम केला होता कीं याचा काळ होतांच तूं व आपण मिळून शहर लुटावें, आणि गर्दी करावी. ऐसा पैगाम होतांच तो इकडे काल होयास ( झालें ). आणि आंग्र्यानें त्यास पत्र पाठविलें कीं आतां हे वेळ आहे. गारदी व तुह्मीं येऊन पोहोंचणें. ह्यानें तें पत्र बजिन्नस नेऊन श्रीमंत दादासाहेबांस दाख-

---

३२९ तुळाजी आंग्रे याला १७५६ त कैदेंत टाकलें.

विलें. त्यावरून गारदी याजवर बहुत मेहेरबान झाले, आणि आंगऱ्यावर आणखी चौकी मजबूत गारदियाची ठेवून बंदोबस्ती केली. आणखी जीवनराव वकील याणें मोगलास पत्रें पाठविलीं होतीं तीं धरलीं, कीं तुह्मीं या वेळेस येऊन पोहोंचणें. त्यावरून त्याची अप्रातिष्ठा केली. परंतु कोण्ही देखिली नाहीं. जनआफवा आहे. अस्तु. प्रस्तुत कामकाज कुल याखत्यारी रा॥ रा॥ बाबूराव फडणीस व रा॥ सखारामबापू हे दोघेजण आहेत. यांजवेगळें काडीमात्र कामकाज होत नाहीं. श्रीमंत दादासाहेब चौदावे दिवशीं सोमवारचे बारा घटका रात्रीं वाड्यामध्यें मुहूर्त करून दाखल झाले. तोंपर्यंत पर्वतीस होते. श्रीमंत माधोराव व बाईसाहेब बुधवारीं दाखल होणार. पर्वतीस आहेत. पुढें मानस हा आहे कीं सातान्यास जाऊन ताराबाईचे विद्यमानें राजापासून पांवरुणें घ्यावीं, व नवे शिक्के करावे, मग पुढें राज्याचा जो बंदोबस्त करायाचा तो करावा. जर ताराबाईनें आपले खुशीनें राजापासून पांघरुणें दिलीं तर उत्तमच आहे. नाहींतर आपला आपणच कार्यभाग संपादून सत्वरच यावें, ऐसा निश्चय आहे. मंगळवारीं जेजुरीचा मुकाम होता. पुढें राजश्री चिटकोपंतनाना साहित्यास सोमवारचे रात्रीं पुढें स्वार होऊन गेले, तों मागें फिरून मनसुबा राहिला. चार दिवस मुकाम झाला. चौ दिवसा करार जातील. सारांश कारभार उभयतांकडे आहे. प्रस्तुत मुलकाची बंदोबस्ती यथास्थित करावी. मग महाल वगैरेचे हिशेब मखलाशी ज्या होणार त्या होतील.

---

[ २८७ ] ॥ श्री ॥ १ मार्च १७६०.

ढोले व पारखी कसबे पुणें यांचा होळीचे पोळीचा कजिया आहे. सबब, सरकारचा प्यादा देऊन पोळी लावावी ह्मणोन परवानगी श्रीमंत राजश्री नानांची. रवानगी रावोपंत गडबोले सुभानजी एसाळ दि॥ बहीरजी नाईक मोरे याजव॥ जाली. छ १२ रजब, इहिदे, फाल्गुन शु॥ १५.

---

[ २८८ ] ॥ श्री ॥ २७ जून १७६१–

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री जनार्दनपंत स्वामीचे सेवेसि:

पोष्य बाळाजी[330] गोविंद व गंगाधर गोविंद सा॥ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल ता॥ जेष्ठ व॥ ८ पर्यंत यथास्थित जाणून स्वकीय लिहिलें पाहिजे. विशेष. या प्रांतीचें वर्तमान सविस्तर आपणास एक दोन पत्रीं लिहिलें, त्याजवरून कळलेंच असेल. आह्मी अंतरवेदींत आल्यानंतर सर्व ठाणीं सरकारचीं कायम झालीं. मंगळपुरास अहमदखान बंगस याजकडील फौज होती, तेथें थोडें बहुत झूंज जाहलें. तसेंच फफुंदेस रोहिले इटावे सकुराबादचे फफुंद तालगाव मिळोन अमलदार जमा होऊन हजार बाराशें राऊत, दोन हजार प्यादे एक जागा जमा जाहले होते. आठ दहा रोज झुंजले, शेवटीं निघोन गेले. इटावे, सकुराबादसुद्धा ठाणीं त्यांनीं खालीं करून दिलीं. वरकड सर्व ठाणीं सलुखानेंच खालीं जाहलीं. एक गाजीपुरी रूपराय खीचर व कीरतसिंग राहिले. त्याणीं तेथें मातबर सरंजाम करून किल्यांत बसले आहेत, यामुळें तिकडील महालीं अमळ सुरळीत चालत नाहीं. कृष्णाजी रायाजी, काशी गंगाधर, गंगाधर बापूजी वगैरे सर्व गाजीपूरचे शहावर सातशें राऊत, तीन अडीच हजारपर्यंत प्यादा जमा करून आहेत. ठाणीं मात्र बसलीं आहेत. परंतु खीचराचे दहशतीमुळें जमीदार भेटत नाहीं अमल चालत नाहीं. गला तो राहिला नाहीं. माल खाऊन जमीदार बसले, त्याचें काय करावें ? फफुंदेस कुसळसिंग हमनाथ व पंचमसिंग चोबे वगैरे पहिल्याप्रमाणें जमीदारा जाहला. बलोरुरु आदिकरून गढ्या पूर्ववत् जाहल्या. फुफुंद कसब्यांत मात्र ठाणें बसलें आहे. तसेंच इटावेयांचे चौधरी गढीबंद जाहले. माल सर्व भाक्षिला. पैसा घेऊन कांहीं रोहिल्यां दिला. कांहीं आपण घेतला. एवंच रयतेकडे कांहीं राहिलें नाहीं. गढीबंद होऊन बसले आहेत. कांहीं दबाव करावा तर कामेथीस पळून जाणार. रोहिल्यांच्या फौजा गंगातीरानें आहेत. यामुळें आह्मांस

३३० हें पत्र पानिपतानंतरच्या गडबडीचें आहे.

येथून कोठें गाजीपुराकडे अगर गढीस लागायास फौज पाठवितां नये. साग-राकडेहि मोठा दंगा जाहला होता. हटे, सागर, जटाशंकर, जयसिंगनगर, खेमलासे, येरण, दुरई इतकीं मात्र ठाणीं राहिलीं. वरकड सर्व जागा गेली. राजे पिर्थीसिंग गढाकोटावाले देखील फिरले. सागर खालीं करून मागों लागले. झुंजहि जाहले. तेथें अपाजी विश्वनाथ सागरचे लिहिणार कामास आले. किल्याबाहेर माणूस निघतां नये. हटयास मोर्चे लागले. एक महिना किल्ला जुजला. शेवटीं त्याणीं तळें फोडलें. एक दोन रोजीं हटे, जटाशंकर किल्ले जावे असा प्रकार जाहला. तेव्हां राजश्री विसाजी गोविंद याणीं राजश्री जानोजी भोसले यांजकडे कारकून पाठवून त्यांस आणिलें. दहा हजार फौज जानोजीबावाच आले. हटयाचे मोरच्यांवर जूजहि त्यांसी व बुंदेल्याचे लोक व डांगी, गोंड तमाम दहा हजार जमा जाहले होते. पांच सातशें माणूस कापून काढिलें, तेव्हां मोरचे सोडून निघोन गेले. जागा सर्व लुटून जाळून फडशा केली. बुंधेल्यांशींहि सलूख तूर्त केला. तेजगड वगैरे ठाणीं लोध्यांकडे राहिलीं आहेत, तीं तूर्त येतां दिसत नाहींत. परंतु ते या बंडांतून निघोन दंगा करतील यास्तव तूर्त सलूख करून घेऊन मग राजश्री जानोजीबावांची रवानगी करतील. तेहि नागपुराकडे जाणार. हिंदुस्थानांत कोणीहि राहत नाहीं. रोहिल्याची फौज फिरोन आली. सकु-राबादचें ठाणें उठवून दिलें. तें देवलीस आलें. फिरोन दंगा जाहला. उप-रालांतील मात्र नाहीं. चोहीकडे दंगा याउपरि भार ईश्वरावर आहे. राजश्री गंगाधरपंततात्या जाटापाशीं आहेत. गाजदीखानास वजिरी जाटानें देविली. तेहि बरोबरच आहेत. तात्याबरोबर फौज ह्मणावी तर हजार दीड हजार आहेत. राजश्री गणेश संभाजी बुंदेलखंडांत आहेत. त्यांचा एक राऊत आह्मांकडे येत नाहीं. आह्मीं तूर्त अहमदखानाशीं सलुख केला आहे, परंतु त्याचा विश्वास नाहीं. जाटानें आगऱ्यास मोर्चे लाविले, परंतु किल्ला मज-बूद; श्रम त्याचे सार्थक होतां दिसत नाहीं. पन्नास हजार पाऊण लक्षपर्यंत प्यादे मोर्चास आहेत. शहर घेतलें. मोर्चे बसले आहेत. हे विनंति.

---

[ २८९ ] ॥ श्री ॥ ४ जुलै १७६१.

वडिलाचे सेवेसी साष्टांग नमस्कार विनंति येथील क्षेम त॥ छ २९ जिलकादपावेतों आशीर्वादेंकरून पुणेंत सुखरूप असो. आपण पत्र पाठविलें तें पावलें. तीर्थरूप नाना ज्येष्ठ वद्य त्रयोदशीस पुणेस आले. तीर्थरूप बाबांस बरें वाटत नव्हतें. याजकरितां मी तुळापुरीं गेलों होतों. तिकडून तीर्थरूपहि आले. मग बाबांस घेऊन पुणेस अवघे समागमेंच आलों. आपण उभयतां तीर्थरूपास पत्रें पाठविलीं तीं प्रविष्ट करावीं ह्मणवून आज्ञा. आज्ञेप्र॥ दिलीं. मुलेंमाणसें तिकडे आहेत त्यांचा मजकूर आपण लिहिला. त्यास,. तीर्थरूप नानांच्या विचारें आठचार दिवस गलबल करूं नये. तुह्मी येथें याल त्याउपरि आणावयाची तजवीज करावी लागेल. सारांश, तिकडून इकडे आणावीं लागतील यांत तो गुंता नाहीं. परंतु नेहमीं तिकडे होतीं याजकरितां तुर्त गलबल आधींच करतां नये. याप्र॥ बोलले. त्यांचे हातचें उत्तर सकाळ रवाना करतों. भावगर्भ बोलल्याचो लिहिला. सांप्रत उभयतां श्रीमंत सातारेस जातात. मंगळवारीं पुणेहून निघोन जातात. आण दहा बारा दिवसांचीं दानें वगैरे. नेहमीं तेथें जाऊन समीप असावें लागेल. त्याजकरितां तपशील ल्याहावयास ठीक पडलें नाहीं. सकाळ सर्व तपशील लिहून पाठवितों. स्वारीसमागमेंहि मजला जावें लागतें. तुर्त दहा दिवसापासून तेरावा चवदावा दिवस होईतोंपर्यंत नेहमीं तेथून लिहितां नये. स्वारीहि लवकर निघणार. तीहि गडबड सांगातेंच जाहाली. सारांश, आपण तेथें फार दिवस राहूं नये. लवकर यावें. दिवस राहावयाचे नाहींत. तुह्मी येथें आल्याउपरि प्रकार सर्व नजरेस पडेल. त्या डौलावर कराल. यास्तव जरूर यावें. श्रीमंतांचा आजचा बारावा दिवस आहे. दानधर्म उत्तम प्रकारें दानें वगैरे होतच आहेत. राजश्री माधवराव क्रिया करितात. तेरावा दिवसाहि उत्तम होईल. श्रीमंत राजश्री माधवराव सातारियास जाणार. एक विचार, एकटेच जाणार. एक विचार, दादाहि बराबरीच जातील. मुत्सदी अवघे बरोबर सातारा जातील. श्रीमंत राजश्री नानासाहेबीं राजा कराव-

याचा नेमिला होता तो राहिलासा जाला आहे. श्रीमंत राजश्री दादांचे व गोपिकाबाईचे मतें ताराबाईचे विचारें जो राजा बसवावयाचा अगर न बसवावयाचा विचार जो करितील त्याप्रे॥ ताराबाईचे विचारें करावें. त्यास रामराजाच बाहेर काढावा असें असे. श्रीमंत राजश्री माधवराव उद्यांच्या सोमवारीं सातारियास जाणार. सप्तमीस पेशवाईचीं वस्त्रें घ्यावयाचा मुहूर्त आहे. राजश्री त्रिंबकरावमामा व शामरावबाबा व विसाजी दादाजी तिघे सातारा आहेत. राजा बाहेर काढावा, कऱ्हाड वाई प्रांत त्याजकडे द्यावा, असेंहि करतां न ऐकत तरी जसा कळेल तसा बंदोबस्त करावा. परंतु, आधीं वस्त्रें द्यावीं. मग मजकूर जो करणें तो करावा. सांप्रत मुख्यत्वें सखारामपंत व बाबूराव फडणीस हे दोघे एक विचारें आहेत. असें आहे. राजश्री दादासाहेबांपाशीं पश रामचद्र गणेश व कृष्णराव काळे या दोघांची चाल बहुत आहे. आबा पुरंधरे व नाना पुरंधरे हेहि आहेत. पुढें कसकसा मजकूर होईल तो लेहून पाठवीन. तमाम शिलेदारांस पत्रें पाठविलीं आहेत. सरंजाविशी करून, नालबंदी देऊन, फौज जमा करावी असें आहे. अशीहि बोली आहे कीं श्रावण शुद्ध प्रतिपदेस डेरादाखल व्हावें. श्रीमंत राजश्री माधवरायांनीं वस्त्रें घेऊन सातारियाचा बंदोबस्त करून पुणियास यावें. मग बाहेर स्वारीस निघावें. राजश्री माधवरायांनीं घरीं देशीं दहा हजार फौजेनसी असावें, दादांनीं स्वारीस जावें, असें आहे. जागाजागा विचार होतच आहेत. पुढें कसकसें होईल तें लेहून पाठवितों. हे विनंति.

---

[ २९० ] ॥ श्री ॥ ४ जुलै १७६१.

वाडलाच सेवसी सा॥ नमस्कार विनंति येथील क्षेम त॥ छ १ जिल्हेज पावेतों आशीर्वादेंकरून पुणंत सुखरूप असो. आपण ( पत्र ) पाठविलें कीं

सांप्रत कारभारी कोण ? त्यास, र॥ सखारामपंत, बाबूराव फडणीस. वरकडहि आहेत. परंतु दोघे तुर्त कामकाजाचा बंदोबस्त करितात. श्रीमंत उभयतां मंगळवारीं निघोन सातारेस जातात. मंगळवारीं जेजूरीस मु॥, बुधवारीं दहीगांव, गुरुवारीं माहुलीं, येणेंप्रमाणें मु॥चा ठराव जाहाला आहे. तथूनहि लवकरच येणार. तीन दिवस तेथें राहावें, मागती यावें सारखा तुर्त येथें निश्चय आहे. तीर्थरूपांनीं पंढरीस जावयाचा छंद धरला आहे. आपण लवकर यावें. चार वरसें जाहालीं. वडील अवघडांत घालून गेले. ज्या दिवशीं भेट होईल ते समयीं सर्व काळजी हारेल. तुर्त येथें स्वारीचा व दानधर्माचा समय, याजमुळें माणसांस एकदोन दिवस अधिक लागल. हिशेबाच्या एकदोन कलमांचा तफावत लिहिला; तर आपण एकादा दिवशीं येतील. सर्व येथें नीट होईल. तीर्थरूप नाना खासगत यादी समजावयाचे व किरकोळ सरकारी हिशेब समजावणें, सरकारकून कारखाने तमाम मना होता, त्याहि यादीमिदी अवघा वेळ नेऊन, सरकारांत दाखवून, करारमदार करून नवे घ्यावे. तेणेंप्रे॥ खर्चवेच करावा. पागा अवघ्या मोडून पांचपांच प्यादे करावे. कामाठी देखील दूर करितात. दोनचारशें कामाठी कार्याकारण ठेवावे. असे नानाप्रकारें बंदोबस्त मांडिले. चिरंजीव सौभाग्यवती बगाबाई आणविली तर तिकडून अवघी महिना पंधरा दिवशीं आणावयाची आहेत. मग तातड काय ? सेवेसी. हे विनंति.

---

[ २९१ ] ॥ श्री ॥ ४ जुलै १७६१.

तीर्थस्वरूप राजश्री दादा वडिलांचे सेवेसीः

आपत्यें हरीनें साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल त॥ आषाढ शुद्ध द्वादशी जाणून स्वकीय लेखन आज्ञा केली पाहिजे. पुण्याहून माणूस आलें त्याजबरोबर राजश्री त्रिंबकपंत कारकून तेथें आहे त्याचें पत्र आलें.

राजकी वर्तमान लिहिलें आहे. तें पहावयासि पाठविलें तें पहावें. जवानी प्यादियाबरोबर निरोप आला कीं निजामअलीपासून वकिलाचा सांडणी स्वार आला. जप्ती करावयाबद्दल तेथून रवानग्या जाहल्या. त्या प्रांतीं जाहल्या. इकडेहि लवकरीच येणार. याजकरितां सावध असावें ह्मणोन निरोप आला, त्याजवरून आपणास लिहिलें आहे. मी उद्यां संध्याकाळ पावेतों येतों. अजमास हिशेब कांहीं समजाविला. कांहीं आज समजावितों, आणि उद्यां यतों. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[ २९२ ] ॥ श्री ॥ ६ जुलै १७६१.

अपत्यें चिटकोबानें चरणावरी मस्तक ठेवून सा॥ नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता॥ आषाढ शुद्ध ५ पावेतों मुकाम पुणें येथें यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. दरबारचें वगैरे सविस्तर वर्तमान तीर्थरूपांस तजविजीनें पुसोन सत्वरच यावें किंवा आठाचौ दिवसांनीं आले तरी कार्यास येईल ऐसा खुलासा काढून आह्मांस लेहून पाठवणें. त्यास, तीर्थरूपांनीं पेशजी पत्र आपल्यास पाठविलेंच आहे. तीर्थरूपांचें मानस आहे कीं तुह्मीं सत्वरींच यावें. दरबारचा कारभार एक प्रकारचा जाला आहे. यास्तव त्यांचें मानस आहे कीं लौकर यावें. राजश्री बाळाजी गोविंद यांस मुजरत पत्रें पाठविलीं आहेत कीं तुह्मीं सत्वर येणें. श्रीमंत राजश्री दादासाहेब व माधवराव सातारियास जाणार. यास्तव आह्मी साहित्याबद्दल जेजूरीस गेलों. टोपी व चार गज सकलाद हिरवी गहिरी रंगाची पाठवणें. त्याजवरून सकलाद गज चार एकूण किंमत आठरा रु॥ व टोपी एक पाठविली आहे. प्रविष्ट होईल. बहुत काय लिहिणें. कृपालोभ असो दीजे. हे विनंति. श्रीमंत राजश्री चिटकोपंतनाना साहित्याबद्दल जेजूरीस गेले. मजला जाब लेहून देणें ह्मणून सांगितलें. त्याजवरून पत्र लिहिलें आहे. श्रीमंत उभयतां सातारियास जाणार. त्यास, ताराबाईस दरें फार वाटत

नाहीं. यास्तव दोन दिवस राहिले. एकादो दिवसांनीं मुहुर्त आहे. जातील. श्रीमंत राजश्री नानाचे मनांत होतें कीं पंढरपुरास जाऊन दोन महिने राहावें. त्यास राजश्री सखारामपंताकडे गेले होते. निरोपाचा विचार पुशिला. निरोप देईनात, यास्तव राहाणें जालें. दरबारीं कारभारी सखारामपंत व राजश्री बाबूराव फडणीस हे उभयतां आहेत. उभयतांचें चित्त एक जालें आहे. राजश्री सखारामपंत करार ह्मणतात. राजश्री दादा द्यावें ह्मणतात. देणें अद्यापि बंदच आहे. द्या द्या वरीच चालतें. कमाविसदारांस रसदेचें मागणें लाविलें आहे. राजश्री नारो शंकर यांचा पहिला करार जाला होता तो आपल्यास कळलाच होता. अलीकडे त्यास ह्मणतात कीं, आह्मास कर्जवाम फार जालें आहे. सबब रसद मागतात. ते कांहीं कबूल होत नाहींत. शेवट कसा होईल तें पहावें. राजश्री शिंद्याकडील मामलत आहे ती तुकोजी शिंदे याचा भाऊ महादजी शिंदे आउंधकर याचे नांवें सरदारी करावी, राजश्री रामचंद्र गणेश दादासाहेबापाशीं होते त्यांस दिवाणगिरी सांगावी, ऐसें घाटत आहे. शागीर्दपेशा व इमारती व कामाठी व हशम यांचा बंदोबस्त होत आहे. कार्याकारण ठेवितात. वरकड दूर कांहीं केले, कांहीं करणार. इमारती तुर्त चालत नाहींत. सर्वाध्यक्ष उभयतां आहेत. दादांचें व गोपिकाबाईचें व दोघे कारभारी यांचें एक चित्त एकत्र जालें आहे. पुढें कसकसें चालेल पहावें. राजश्री आबा व नाना पुरंधरे येथेंच आहेत. तेहि सातारियास जाणार. सातारा गेलियानंतर पुढें कसकसा मजकूर होईल तो पहावा. सेवेसी श्रुत जालें पाहिजे. मागें जे मुत्सद्दी होते त्यांची चाल कांहीं विशेष दिसत नाहीं. शिलेदारांस व खर्चास ऐवज पाहिजे यास्तव कर्जपट्टी करावी ऐसी वार्ता आहे. विदित जालें पाहिजे. श्रीमंत सातारा जाणार. तिकडे कितेक दिवस लागतील तें पहावें. श्रीमंतांचें मानस आहे कीं लौकरींच यावें, मग पहावें. सेवेसी विनंति. पीरखान प्यादा याजबा। नवी सकलाद् चार गज व जुनी टोपी नानांची पाठविली आहे. पावेल. यादीचे कामास माणसें ५॥ आहेत. कळावें. सेवेसी विनंति.

[ २१३ ] ॥ श्री ॥ ९ जुलै १७६१.

से॥ दादो तानदेव कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान त॥ आषाढ शुद्ध ८ पावेतों यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री उभयतां नानांनीं पत्रें आपल्यास लिहिलीं आहेत त्याजवरून कळों येईल. मोगलाकडील वर्तमान तरी बेदरानजीक आहे. पंचवीस हजार फौज आहे. सरकारांत साठी लक्षांची जागीर घेतली तिची जफ्ती मांडिली आहे. तमाम कारकून उठविले. आपले बसविले. आपण मुलेंमाणसेंसुद्धा तेथें आहां. त्यांस औरंगाबाद जवळ. याजकरितां तजविजीनें माणसें घेऊन आपण इकडे यावें. येविशीं श्रीमंत राजश्री नानांनीं आपल्यास लिहिलें आहे. आधीं तजवीज करावी. बहुतशी गडबड नाहीं तों तजवीज करावी. श्रीमंत राजश्री दादा व राजश्री माधवराव काल बुधवारीं वानवडीस गेले. आज तेथें मुकाम आहे. राजश्री चिटकोपंत नाना जेजूरीस गेले ते काल प्रातःकाळीं आले. उदईक थेऊरचा मु॥ आहे. नानाहि जातील. थोरले नाना स्वारीबराबर जात नाहीं. ऐसें दिसतें. वरकड नवलविशेष वर्तमान लिहिजेसें नाहीं. मोगलानें वळ बांधिलें आहे. श्रीमंत सातारा जाऊन सत्वरीच येणार. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत जालें पाहिजे. मुत्सदी अगदीं जातात. कळावें. सेवेसी विनंति.

---

[ २१४ ] ॥ श्री ॥

विनंति. येथील प्रकार सांप्रत नवे घाट सर्वेहि होतात. परंतु निश्चय हा काळपावेतों कामाकारभाराचा नाहीं. सातारेहून फिरोन येऊन मग येथील कामें चालतील. दिवस पुढील फार अवघड दिसल्या प्रकारांत दिसतात. कळावें. हे विनंति.

---

[ २९५ ] ॥ श्री ॥ ५ आगष्ट १७६१.

पे॥ आश्विन शुद्ध ४ शके १६८३.

सेवेसि[331] जोती गोपाळ व लक्ष्मण अंबाजी व कृष्णाजी भिकाजी व अंताजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना येथील वर्तमान तागाईत श्रावण शुद्ध १५ पर्यंत मु॥ रायपूर स्वामीचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे. विशेष. जेष्ठ शु॥ ५ चें गांडापुराहून पत्र आलें तें आषाढ शु॥ ४ स पावलें. त्या आलीकडे आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तेणेंकरून चित्त सापेक्षित आहे. तरी तपशीलवार वर्तमान लिहावयासि आज्ञा केली पाहिजे. विशेष. उंमरगड गेल्यानंतर उभयतां रायपुरीं आहेत. इटावे येथीलहि ठाणें उठोन आलें. रोहिल्यांचें ठाणें बसलें. राजश्री गंगाधरपंत तात्या कोळेवर आहेत तसेच आहेत. जाटहि कोळेवर आहे. नजीबखान पाणीपतावर आहे. त्यास माधवसिंग व नजीबखान एकत्र जाहले आहेत. जाटाशीं बिगाड केला आहे. गंगापारच्या रोहिल्यांचें सूत्र जाटाकडे लागलें आहे. नजीबखान येकलाच वेगळा पडला आहे. जाटाचे मतें सुज्यातदौले यानीं वजीरी करावी, व गाजीदीखानानें बक्षीगिरी करावी. हें पातशाह अलीगोहर याच्या मनास येत नाहीं. गाजिदीखान अगदींच नसावा. आपल्या हातीं द्यावा. त्यास जाट देत नाहीं. यामुळें जाटाचें व त्याचें बिघडेल, असें दिसतें. गणेश संभाजी याणीं राजश्री बाबूराव कोनेर याजकडील मामलत आपल्याकडे त्याचे तर्फेनें करून घेऊन झांशीस गेला, तेथें आहे. झांशीचा किल्ला हवालीं करून घेतला. किसोरसिंग उमरगडीं होता. त्यानें कामकाज चांगलें उमरगडीं केलें. त्यास उमरगड सुटल्यावर तो येथें आला. त्यानें रदबदली केली कीं आपल्याकडे गांव आवरिया वगैरे आहेत, त्यांजपैकीं दहा हजार रुपये सालाबाद घेतां ते माफ करावे. त्यावरून त्यास माफ करून सनद दिल्ही. सन सतराचें येणें होतें तेंहि माफ करून सतराचे

---

३३१ हें व पुढील दोन पत्रें पानिपतानंतरच्या गडबडीचीं आहेत.

सालापासून सनद करून दिल्ही. त्याजकडे कारकुनी दरसाल पांचशें रुपये द्यावे असा करार केला आहे. सन १८१८ चे सालापासून द्यावे असा करार करून चिठी लिहून घेतली आहे. सतराचें त्यानें सोडवून घेतलें. आह्मास ह्मणाले तें माफ करावें. पुढं आपली कारकुनी घ्यावी. मग आह्मीं शेंपन्नास कमजास्ती करून ठीक करून घेतलें. स्वस्त जाहले तरी येतील. कळावें. राजे रतनसा याजकडील वर्तमान पद्माकरपंतांनीं लिहिला आहे त्यावरून सविस्तर कळेल. त्याजकडील शंभर रुपये मात्र दोनशेंपैकीं आह्मीं येथें घेतले आहेत. सीताराम बक्षीची जागड छ ६ जिलकादीं दूर केली. आणि त्यापैकीं चारशें स्वार व पांचशें प्यादे ठेविले, तेहि छ ६ जिल्हेजीं दूर केले. त्याची तलब तीन हजार रुपये न दिले. आमची कारकुनी अलीकडील एका महिन्याची न आली. पलीकडील अगदीं घेतली. परंतु त्यानीं चिठ्या करून दिल्या आहेत. बारा तेराशें वसूल होणें आहेत. येतील तेव्हां खरें. कळावें. शिंद्यांच्या परगणियांचे हिशेब सरकारांत पाठवणें ह्मणून श्रीमंत राजश्री दादासाहेब ह्यांचें ताकीदपत्र आलें आहे. त्यास ते परभारा त्यांनीं सरकारांत भरावे किंवा आह्मीं घेऊन सरकारांत द्यावे याचें सरकारांत ठीक करून लिहून पाठवावें. येथील गृहस्थाचें मानस आहे कीं परभारें सरकारांत द्यावे. आह्माकडे दाखला न यावा. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[ २९६ ] ॥ श्री ॥ ५ आगष्ट १७६१.

पुरवणी सेवेसी शिरसाष्टांग नमस्कार विनंति. श्रीमंत भाऊसाहेब सि रीस आले. तेथें गणेश संभाजी जाऊन भेटले. तेथें गडी सिरसईची होती, ती घेतली. बंदोबस्त करून उभयतां नरवरास माघारे जाऊन तेथून दतियास गेले. दोन तीन हजार फौज बरोबर आहे. सिरोजेकडे यावयाचा मजकूर

होता. तेथें इजतखान व अहीरखीची एकत्र होऊन श्रीमंतावर रोख केला. दगावाजीचा विचार पाहोन नरवरहून दतियास गेले. राजश्री विश्वासराय लक्ष्मण करारयास आहेत. अद्याप एक निश्चय गोष्ट समजत नाहीं. तेथें जाऊन गृहस्त अथवा माणस कोणी जातो तो ह्मणतो निस्संदेह गुंता नाहीं. कागदीं पत्रीं दस्तक नाहीं. कशावरून जाणावें ? येथून कोणी गृहस्त मायेचा जात नाहीं. बातमीहि ठीक लावून करीत नाहींत. परंतु कागदीं पत्रीं गोष्ट अटकलेंत येत नाहीं. गणेश संभाजीस हातीं घेतला आहे. कळावें. पेशजी आज्ञा आली आहे त्याप्रमाणें वर्तणूक करीन. यांस सोडून काय कारण जावयाचें? राजश्री बापूजी नारायण यास नरसिंगडची मामलत होती. त्यास तेथून सरकारांतून दूर करून श्रीमंत राजश्री बाबास दिली. सनद येथें आली. उपरांत मामलत गडांसुद्धां दादांचे हवाली करून शिलेदारीनें दोन महिने चाकर होते. उपरांत निरोप घेऊन देशीं जावयासी सागरीं गेले. राजांच्या भेटी जाहल्यावर गेले. राजश्री विसाजी गोविंद यांसि अद्यापवर सलूक नाहीं. गडींबाहेर सर्व जाग्यांत कारकून याचे बसोन वसूल घेतात. टाणीं सर्व आठ नऊ आहेत, तीं विसाजी गोविंद याचे स्वाधीन आहेत. याज खेरीज पांचशें पागास्वार ह्मणून बरोबर आहेत. दोन महिने लश्करांत बरोबर होते; परंतु सलखाची गोष्ट न ठरली. शेवटीं घाटीखालीं उतरूं लागले, तेव्हां विसाजीपंत बोलिले कीं मला बरोबर नेतां तरी मामलत पूर्ववत् प्रमाणें माझी मजकडे ठेवणें. कारकून सर्व उठवून आणावे. मी बरोबर चाकरीस तयार. तें बनोन न आलें. सारांश, त्याची याची आडभारीयांस जागा घेणें. त्यांस न देणें. यांचा मजकूर तेथील स्वामी जाणतच असतील. मी काय लिहूं ? तेथील लिहावयासि आज्ञा केली. शेवटीं हे घाटीखालीं आले. ते सागरास गेले. मागाहून विसाजीपंतास लिहिलें कीं तुमचे भरंशावर आह्मी इकडे आलों आहों. सर्व उत्तम प्रमाणें बंदोबस्त करणें. त्यांचें उत्तर आलें नाहीं. दहशत परगणेयांत विसाजीपंताची भारी आहे. या उपरि काय ठरेल तें पहावें. स्वामीस किती दिवस लागतील तें लिहावें. लौकर आलें पाहिजे. हे विज्ञापना.

---

[ २९७ ] ॥ श्री ॥ ५ आगष्ट १७६१.

पु॥ राजश्री जनार्दनपंत स्वामीचे सेवेसि.

विनंति उपरि नजीबखान रोहिले यांणीं इंद्रप्रस्थीं सर्व किल्याचा सुद्धां बंदोबस्त करून पाणीपताकडे जाऊन बहादरखानबलोच्याशीं स्नेह संपादून बागपताकडे अंतरवेदींत आले. शिकंदराबादेकडे येणार. रोहिलेचार, बलोच, सुजातदौला, पठाण, सातांचें येक मत आहे. पटण्यास पातशाह आहे, त्यास आणून दिल्लीस स्थापना करून बंदोबस्त करावा. गाजदीखानास जाटाचे विद्यमानें वजिरी दिली. परंतु त्याशीं व रोहिले सुज्यातदौल्याशीं पेंच. किल्यांत बंदोबस्त नजीबखानाचा. पातशाह स्थापिला. यासि वजिराशीं द्वेष. याची वजिरी कोण रीतींनें चालेल ? किल्यांत जाणें तर पांच माणसांनिसीं वजिरानें जावें. असा प्रकार जाहल्यानंतर गाजदीखान किती दिवस राहतील, तें कळतच आहे. जाटाशीं रोहिल्याशीं पेंच पडला. तशाहिमध्यें आगऱ्याचे किल्यास मोरचे लाविल्यानें पातशाही हरामखोरी ठहरली. पातशाह पटण्याहून तीन मजलीं आलीकडे आला. तो फिरंग्याचे स्वाधीन. सर्व अधिकार फिरंग्याचा तेथें आहे. हिंदुस्थानी कोणी नाहीं. मिरजा कोचक प्रयागचा किलेदार सोडून देणें ह्मणून पातशाहाचा हुकूम जाहला असतां सुजातदौल्यानें जिवें मारिला. यामुळें पातशाहासीं सुजातदौल्याशीं पेंच जाहला. यास्तव सुजातदौला पातशाहास आणावयास जीवनपूरपर्यंत गेला होता तो एक मजल माघारा अयोध्येचे रोखें फिरला, ह्मणून बातमी आली आहे. फिरोन वकीलहि परस्परें गेले आहेत. चोंहीकडे दंगाच आहे. ईश्वर काय करील पहावें. आपण आजपर्यंत पुण्यास दाखल जाहलेच असतील. तिकडील तपशिलवार वर्तमान सर्व लिहून पाठवावें. आह्मीहि इकडील कांहीं स्वस्थता झाली ह्मणजे महिना पंधरा रोजीं एकजण येऊं. भेटीनंतर सविस्तर कळेल. सागरचे आपाजीपंत ठार जाहले, यामुळें तेथील हिशेब आले नाहींत. आह्मीं पत्रें बहुत पाठविलीं. विसाजीपंत सागरीं गेले ह्मणजे हिशेब सत्वर पाठवितील. राजश्री मल्हारजीबावा या प्रांतांतून गेले. प्रस्तुत इकडे तात्या आहेत. रोहिल्याची

गडबडेचा प्रसंग आहे. याबद्दल ईश्वर इच्छा असेल तें प्रमाण. मागाहून सविस्तर लिहून पाठवूं. तुमचीं दोन तीन पत्रें पावलीं. मजकूर कळला. सदैव पत्रीं कुशलोत्तर संतोषवीत जावें. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे. हे विनंति.

राजश्री दादोपंत, धोंडोपंत, नारोपंत, सखोपंत, वेंकाजीपंत यांस नमस्कार लि॥ परिसिजे. लोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ २९८ ] ॥ श्री ॥ १ नोव्हेंबर १७६१.

नकल.

अखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्यराजश्री नारो आपाजी गोसावी यांसिः—

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार सु॥ इसने सितैन मया व अलफ. जागा जागा किल्यांस फितूर होतात. त्यास, तुह्माकडे पुरंधर, वज्रगड आहेत तेथील तुह्मी खबरदारी उत्तम प्रकारें करणें. चौकीपाहारे अलग, नौबत दुरुस्त करवणें. पाहारे फेरवणें. किल्यावर बरें बरें माणूस ठेवणें. किल्ले सर्व सामानांनीं पुरे संजुद करणें. तुह्मी खबरदार सावध आहांच. तथापि चौकशीस आळस न करणें. किल्यांचीहि रणघेरें नीट करून ठेवणें. फितुरी मनुष्य असेल त्याची अगोधर चौकशी करणें. जाणिजे. छ २ रा॥ खर. बहुत काय लिहिणें.

---

[ २९९ ] श्रीशंकर. २४ जानेवारी १७६३.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
जनार्दनपंत बाबा स्वामीचे सेवेसि.

पोष्य काशी नरसिंह कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल ता॥ माघ शु॥ १० मु॥ आमानगज नजीक पर्णे जाणून स्वकीय लिहीत गेले

पाहिजे. विशेष. कृपा करून पत्र पाठविलें. पावलें. बहुत समाधान झालें. याच प्रकारें सर्वदा पत्र पाठवून संतोषवीत जावें. इकडील वर्तमान सविस्तर राजश्री कृष्णाजीपंतीं लिहिलें आहे. सविस्तर तपशीलवार त्याजवरून कळेल. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांकडील वर्तमान लिहावें ह्मणोन लिहिलें. त्यास आपण परस्परें तिकडे ऐकतच आहां, त्याचप्रमाणें आहे. अधीकोत्तर लिहावें तर प्रमाणांत दिसत नाहीं. राजश्री गणेश[१] संभाजी प्रस्तुत त्याजकडे गेले आहेत. थोडीबहुत नरवरवाल्याची फौज समागमें आहे. या प्रकारचें वर्तमान आहे. आह्मांस बुंदेले याणीं बोलाविलें मदतीस, ह्मणोन येथें आलों आहों. एक दो रोजीं भेटी होणार. पुढें विचार जो होईल तो लिहून पाठवूं. आपणाकडील वरचेवर कुशलोत्तर कृपा करून लिहीत असावें. सुजातदौले यांनीं करोलीचे घाटीं पूल बांधोन बणी बहादर कासम आली खां यांस पंचवीस तीस हजार फौजेनसी बुंदेले यांजवर पे॥ गहोरा व कालिंजर पावेतों जप्ती केली. राजे पर्णेयांत आहेत. कबीले सर्व डांगेंत तजगड प्रांते पे॥- राहतां कालिंजर, आजेगड, मडफा, जैतपूर ठाणीं मात्र राहिलीं. बुंदेलखंड त्याणें घेतलें तमाम रजवाडे वोडसे, दतीया, भदावर इजतखानसुद्धां त्यास मिळाले. सर्वांच्या चित्तीं सिरोंजपावेतों घेऊन यावें. मोंगलाचा जोरा भारी जाहला आहे. याजउपरि हे जागा राहतां मुशकील आहे. असो. ऋणानुबंध असेल त्याप्रमाणें घडोन येईल. आह्मीं श्रीमंत स्वामीस व उभयतां चिरंजिवांस इकडील साद्यंत वर्तमान वरचेवर लिहीत गेलों. त्यांचे मर्जीस फौज पाठवून बंदोबस्त इकडील कांहीं करावा तें येत नाहीं. यास आमचा काय उपाय ? जशी मर्जी असेल तसें करून. आपण प्रसंगीं आहेंत. कळेल त्याप्रमाणें विनंति करावी. आजपावेतों जिवाभ्य श्रम करून खावंदाचा नक्षा राखिला आहे. पुढें सर्व मर्जी त्यांची. सिरोंजेस आले ह्मणजे उज्जेनपावेतों जागा गेली. फौजा माळवियांत नाहींत हें पुर्तें यवनानें पाहून काम करीत आहे. आणि फौजाहि देशीहून येत नाहींत. कर्णाटक प्रांतीं जात आहेत. हे सर्व खबर

१ हीं १७६३ सालचीं पत्रें भाऊंच्या तोतयासंबंधाची कांहीं हकीकत देतात.

बातमी मोंगलानें पाहोन मनसबा केला आहे. तुह्मास कळावें ह्मणोन लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति.

---

[ ३०० ] ॥ श्री ॥ नोव्हेंबर १७६३.

सेवेसि शिरसाष्टांग नमस्कार विनंति. येथील क्षेम असो. विशेष. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब कराारेयास अश्विन व॥ १२ स प्रगट नरवरीं होऊन राजश्री विश्वासराव[1] लक्ष्मण याणीं घेऊन आले. तथून पत्रें सर्व गृहस्तास आलीं. राजश्री करसी[2] नरसी यांस आलीं. व विसाजी[3] गोविंद यांस व बापूजी नारायण नरसीगडवाले यांस आलीं. खासे यांचींच पत्रें नांवचीं आलीं. खासे अक्षर लिहित नाहींत, ह्मणून राजश्री काशी नरसी मात्र न मानीत. वरकड चोहोंकडे बंदोबस्त होत चालला. सर्वांस घरोघरीं परस्परें तथून पत्रें आपलीं आपलीं येतात, कीं श्रीमंत करार; गुंता किमपि नाहीं. सर्व जनांमध्यें दुसरा अर्थ दिसोन येत नाहीं. तथून कासीद जोडी दोन आल्या, ते कागद वाचून कासीदास मुखमार्जन शिवीगाळी होतात. कचेरींत थट्टा कीं स्वर्गद्वार मोकळें झालें. ज्या बायकांचे पुरुष वारले असतील, त्याणीं डोई वाढवावी ! नानाप्रकारें वल्गना होतात. श्रीमंत स्वामीची आज्ञा आली कीं चार लक्ष रुपये व हत्ती घोडे वगैरे सरंजाम दो लक्षांचा घेऊन हुजूर सत्वर येणें. त्याचें उत्तरहि पाठवीत नाहींत. सर्व लटकें ह्मणतात. बापूजी[4] नारायण विसाजीपंत यांसहि पत्रें आलीं कीं हुजूर येणें. राजश्री बापूजी नारायण कार्तिक शु॥ १३ स निघान करारेयास जाणार. राजश्री गणेश[5] संभाजी सिरोंजेस होते ते करारेयास गेले. पावतील. दतियावाले व वोडशावाले यांचे पांच येऊन पोंचले. कांहीं खजिनाहि आला. करार्‍याचे झासीचे मध्यें दिनारा मातबर जागा दुर्घट आहे. तेथील

---

१ नारो शंकराचे पुतणे. २ गोविंदपंत बुंदेल्यांचे धाकटे बंधू. ३ विसाजी गोविंद चांदोरकर. ४ बुंदेलखंडांतील एक सरदार. ५ गणेश संभाजी खांडेकर हे एक बुंदेल्यांच्या बरोबरचे सरदार.

राजा येऊन भेटला. मामलत केली. कासी नरसी यास पत्र आलें, तें श्रीमंत राजश्री बाळाजीपंत बाबाकडे पाठविलें आहे. दोन ह्याची नकल मीं पाठविली आहे. पावेल. मोर्तबांत लेखनसीमा अक्षरें आहेत. विदित होय. प्रस्तुत कासी नरसी सागरांत आहेत. ते बाहेर जात आहेत. तयारी होत आहे. तिकडे जातों ह्मणून ह्मणत आहेत. पहावें. खाशाचे दस्तुरचें पत्र येत नाहीं, यामुळें गुंता किंचित दिसतो. परंतु राजश्री विश्वासराव लक्ष्मण मातबर माणूस. ते इतकें करणार नाहींत. येथून कोणी मातबर शहाणा माणूस कारकून पाठवून मग करणें तें करावें, ह्मणून मीं पांच चार वेळां ह्मटलें. परंतु त्यांचे विचारास येत नाहीं. देशीं पत्रें श्रीमंतास गेलीं आहेत. संशय धरावा असें किमपि दिसत नाहीं. अक्षर मात्र येत नाहीं. वरकड लिहिणेंयाची पद्धत वगैरे खुणांमध्यें अंतर किमपि नाहीं. संशय किमपि नाहीं. विदित होय. राजश्री विश्वासरावजींचाहि आकस यांजवर आहे. गणेश संभाजीस तों पिटून बाहेर घातला आहे. राजश्री बापूजी नारायण यांची तों मामलतच नरसीगडची जबरदस्तीनें घेतली आहे. राजश्री चिंतो केशव यांजपाशीं होतें तें बेइजत करून अडीच हजार रुपये सान्याचे हवाला करून घेतले; ह्मणून तो याकडून निघोन गणेश संभाजीकडे सडा गेला आहे. गणेश संभाजीनें आपली दिवाणगिरी दिली. तेहि करारेयास जाणार. यांसी सर्वांसीं विरुद्ध. स्वार प्यादा सर्वांसीं कज्या. सलुक आपल्यामध्यें व बाहेर कोठें नाहीं. राजश्री जनकोजी शिंदे ह्मणून पेशजी गेले त्यांचे वर्तमान तहकीक कळत नाहीं. तें लिहावयासी आज्ञा केली पाहिजे. झालें वर्तमान कच्चें पक्कें लिहिलें आहे. सेवेसी विदित होय. हे विज्ञापना.

---

[ ३०१ ] ॥ श्री. ॥ नोव्हेंबर १७६३.

पुरवणी सेवेसि शिरसाष्टांग नमस्कार. विनंति विज्ञापना: काशीहून उत्तर

६ जनकोजी शिंद्याचाहि एक तोतया निघाला होता.

आले नाहीं. आलें ह्मणजे पाठवीन. वरकड वर्तमान तपशिलवार पेशजी लिहिलें आहे, त्यावरून सेवेसि श्रुत जालें असेल. हल्लीं तपशिलवार लिहावें तरी स्वामीस पत्र पावेल न पावेल. यास्तव न लिहिलें. या उभयतांमध्यें हर्षामर्षच चालिला आहे. वरकड गोष्टींविशीं तरी स्वामींची आज्ञा येईल त्याप्रमाणें करीन. दिवसेंदिवस माणस नजरेंत नाहींसें दिसतें. राजश्री खंडो शामराज येथें आले, त्यांस एकांतीं आह्मीं बहुत प्रकार पुशिले. हातचे अक्षर मात्र लिहीत नाहीं. तें अभिमानास्तव मात्र कीं कोणास कशास पत्र लिहावें, ऐसें भाषण करितात; दुसरा अर्थ किमपि नाहीं. देशींहि पत्रें श्रीमंत सौभाग्यवतीबाईस गेलीं आहेत. व येथें श्रीमंत करारेयांत ज्यांचे स्थलीं आहेत, त्याणीं विनंति करून चुलतेयास आपलें पत्र पाठविले आहे. येकांतीं करून कोणास प्रगट नाहीं. गुप्तरूपेंकरून पाठविलें आहे. तेथें विदित जालें असेल. व एक पत्र श्रीमंत मोरो बल्लाळ जोशी आहेत त्यांस गेलें आहे. गुप्तरूपें तेहि येणार, ऐसी बातमी आहे. पहावें. स्वामीस विदित असेल. राजश्री जनकोजी शिंदे देशीं गेले. भेटी श्रीमंताची जाली. उपरांत मनमानें ऐसें वर्तमान लोकांनीं येथें उठविलें आहे. लिहिलें कोणाचें आलें नाहीं. त्यास सविस्तर सर्व लिहावयासी आज्ञा केली पाहिजे. आपले वर्तमान पेशजी लिहिलें आहे त्याप्रमाणें आज्ञापत्र पाठवावें. त्याप्रमाणें मी करीन. विस्तारें काय लिहूं ? करारेयाचे मजकुरांत गुंता किमपि नाहीं. सेवेसि विदित होय. एकोणिसाचे सालचे हिशेब अद्याप कोणाचे घेतले नाहींत. आणविले आहेत. पहावें. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

---

[ ३०२ ] ॥ श्री ॥ नोव्हेंबर १७६२.

पुरवणी सेवेसि शिरसाष्टांग नमस्कार विनंति. करारेयाजकडील श्रीमंतांचें वर्तमान तहकीक तपशिलवार मुजरद काशीदाबरोबर लिहून पाठ-

विणें ह्मणोन आज्ञा. त्यास, येथें राजश्री खंडो शामराज आले तें तों सविस्तर लिहिलेंच होतें. अलीकडील मजकूर तरी राजश्री विश्वासराव व गोविंद शामराज व चिमणाजी वामन यांनीं करारेयांत एके दिवशीं रुबरू विनंति केली कीं, आज दीड दोन महिने होत आले, फौजा येऊन कोणी सामील होत नाहीं, आपले हातचे पत्र कोणास जात नाहीं, यास्तव तरी साहेबीं मेहेरबान होऊन पुण्याच्या जोड्या आल्या आहेत त्यांस पत्र एक आपले हातची चिटी द्यावी; व सागरीं कासी नरसी आहेत व गणेश संभाजी आहेत ऐशा तीन चिट्या द्याव्या. शेवटीं एक चिटी मनास येईल त्यास द्यावी. आज्ञा झाली कीं आजपासून चौ दिवशीं सर्व सांगाल त्याप्रमाणे करून देऊं. चिंता न करणें. चवथा दिवस आला ते समयीं प्रातःकाळीं उठोन तयारी करून कोणास न पुसतां शिकारीस गेले, ते नरवरच्या रोखें पाठीमागें विश्वासराय गेले. तों हे नरवरीं दाखल झाले. निमे वाटेहून चिमणाजी वामन नरवरीं गेले. विश्वासराय मध्यें मुकाम करून राहिले. संध्याकाळीं चिमणाजी वामन व खासे एके जागा राहिले. प्रातःकाळीं जाबसाल करणें तों किल्यावर राजाचे भेटीस गेले. सांगोन पाठविलें कीं तुह्मी करारेयास जाणें. आह्माकडे न येणें. हे माघारे सर्व गेले. गोविंद शामराज डमरीस गेले. राजानें हत्ती एक, पांच घोडे नजर केले. सरंजाम दिला. चार दिवस मेजवानी केली. उपरांत पांच सातशें स्वार बंदुकदार हजारापर्यंत राजानें आपला भाऊ देऊन सिरोंजचे रोखें आले. प्रस्तुत शहाडोरेयास आहेत. तथून एक गृहस्त राजश्री बाजी रघुनाथ चितपावन ह्मणोन छोटेखानी गृहस्त होते, त्यास येथें याजकडे पत्र कीं घेऊन येणें. पत्रें यास आणिलीं तीं कारकुनानें लिहिलीं. मोर्तब मात्र होतें. करारेयाहून पत्रें येत तीं पद्धतवार. यांत कांहींच ठिकाणा नाहीं. नकल पाठविली आहे. पावेल. खास दस्तूर तो नाहीं. गृहस्थ शपथ वाहतो. अन्यथा नाहीं. परंतु कागदापत्रावरून कळत नाहीं. भाषण हिंदुस्थानी. दक्षणी भाषण नाहीं. कागदपत्रीं ठिकाणा नाहीं. याणीं कागद पाहिले. गृहस्थास शब्द लाविला, हें काय घेऊन आला?

शेवटीं गृहस्त जाब घेऊन गेला. तहकीक लागत नाहीं. तेथून गृहस्त जो येतो तो खरें ह्मणतो. पत्रावरून कुंठित विचार होतो. लिहीत नाहीं, भाषण नाहीं. हल्लीं आतांच पत्र आलें. गणेश संभाजी जाऊन दाखल जाहले. भेटी जाल्या. त्यांणीं लिहिलेयांत आहे कीं दोन लाख रुपये श्रीमंतास नरसीगडचे ऐवजीं ..गरे पैकीं तूर्त खर्चास पाठवून देणें. गणेश संभाजीची ताकीद आली आहे. ऐसें वर्तमान झालें आहे. याचें जाणें होईल तेव्हां पहावें. हे विज्ञापना.

---

[ ३०३ ] ॥ श्री ॥ ६ नोव्हेंबर १७६३

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री कासी नरसी गोसावी यासि: सेवक सदाशिव चिमणाजी नमस्कार सु॥ आर्बा सितैन मया अलफ. खासा आगमन किले करारियासि जालें. तरी तुह्मीं आपले जमावसुद्धां ठाणेयांची बंदोबस्ती राखोन तुह्मीं पहिले सरंजामविषई लिहिलें त्याप्रमाणें घेऊन हुजूर येणें. जाणिजे. छ २९ माहे रबिलाखर. बहुत काय लिहिणें. मोर्तबांत 'लेखन सीमा' ऐसीं अक्षरें आहेत.

---

[ ३०४ ] ॥ श्री ॥

श्रीमत्परमहंसपरिव्राजिकाचार्यब्रह्मानंदाश्रमस्वामीनारायण.

स्वस्तिश्री कृष्णाजी भिकाजी फडनीस यांस पूर्वीं पावती रुपयांची हुंडी पा॥ होती. त्यांत मुदत एक महिन्यांची होती. त्यास मुदत जाहलियावर हुंडीचे रुपये ३६ छत्तीस लक्ष्मण आबाजी याचे विद्यमानें वैशाख शु। सप्तमीस पावले. लि॥ मिती जेष्ठ वद्य ७.

---

१ स्वामीनारायणाचा पंथ गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत होता असें ह्या पत्रावरून ठरतें. गेल्या शतकांत कृष्णाजी भिकाजी बुंदेलखंडांत कारकून होता.

# जाहिराती.

**आर्यधर्मदर्पण**:—उत्तम मोहोरेदार कागदावर नियमितपणें प्रसिद्ध होत असलेल्या ह्या ४८ पृष्ठांच्या मासिकपुस्तकांत ज्ञानाचें अनादि भांडार म्हणून मशहूर असलेलें श्रीमन्महाभारत, अध्यात्मविषयक ग्रंथांपैकीं प्रमुख योगवासिष्ठ आणि धर्मशास्त्रविषयक ग्रंथांचे शिरोभागीं असलेला पराशरमाधव हे ग्रंथ सरळ व सुबोध मराठी भाषांतरासह प्रसिद्ध होत असतात. मासिकपुस्तक सुरू झाल्याला ४ वर्षे संपूर्ण होऊन पांचवें वर्ष चालू आहे. इतक्या अवधींत श्रीमहाभारतांतील आदिपर्व व सभापर्व हीं दोन प्रकरणें संपूर्ण झालीं असून तिसरें वनपर्वही संपत आलें आहे आणि योगवासिष्ठाचीं पहिलीं दोन प्रकरणें संपून तिसरें प्रकरण सुरू आहे. मासिक पुस्तकाची वर्षाची अगाऊ वर्गणी ट० ह० सह ४८६ आहे. मागील वर्षांचे सर्व अंक ग्राहकांना जास्त किंमत न पडतां १२ अंकांना ४८६ ह्या किंमतींतच मिळण्याची सवड ठेविली आहे. सारांश, प्रथमपासूनचे अंक घेऊन नवीन होणाऱ्या ग्राहकाला हें पांचवें वर्ष संपेपर्यंतची वर्गणी २१८१४ च पडते. नवीन ग्राहकांना मागील अंक घेतलेच पाहिजेत अशी अट नाहीं.

**व्यवस्थापक आर्यधर्मदर्पण.** वाई. जि. सातारा.

**मोदवृत्त**:—ह्या साप्ताहिकपत्रांत राजकीय व धार्मिक विषय येत असून ग्राहकांना श्रीवाल्मीकिरामायण व सुश्रुत हे ग्रंथ भाषांतरासह दोन्ही मिळून प्रतिवर्षी सुमारें ८०० पृष्ठें मोहोरेदार कागदावर छापिलेले मिळत असतात. ग्रंथांच्या ८०० पृष्ठांसह पत्राची वर्षाची अगाऊ वर्गणी फक्त दोन रुपये असून परगांवच्या ग्राहकांना टपाल हंशील रीतीप्रमाणें वेगळं द्यावें लागतें. भाषांतरासह सदरहू ग्रंथ पत्रावरोबर देऊं लागल्याला २ वर्षें संपूर्ण झालीं असून तिसरें वर्ष सुरू आहे. इतक्या अवधींत श्रीवाल्मीकिरामायणापैकीं बालकांड, अयोध्याकांड व अरण्यकांड हीं तीन प्रकरणें संपूर्ण झालीं असून चवथें सुरू आहे. तिन्ही कांडांचीं निरनिराळीं पुस्तकें कापडीबांधणीकेलेलीं बांधून आज तयार आहेत. प्रत्येकाची ट० ह० सह किंमत अनुक्रमें एक रुपाया दहा आणे, तीन रुपये चार आणे व एक रुपाया दहा आणे आहे. वर्तमानपत्राची गोष्ट जरी बाजूला ठेविली तरीं मोहोरेदार कागदावर छापिलेलीं मोठ्या साचाचीं ८०० पृष्ठें २ रुपये किंमतींत कोठेंही मिळत नाहींत.

**व्यवस्थापक मोदवृत्त.** वाई. जि. सातारा.

**आर्यधर्मरहस्य**—ह्या ४० पृष्ठांच्या मासिकपुस्तकांत श्रीभगवद्गीता येत असते. प्रथमतः गीतेंतील श्लोक; नंतर त्या श्लोकाचें सरळ व सुबोध मराठी भाषांतर; गीतेवरील संस्कृत व प्राकृत अद्वैतपंथी टीकांना मुख्य आधारभूत असलेले श्रीमच्छंकराचार्यांचें

भाष्य; नंतर सदर्हू भाष्याचें सरळ व सुबोध भाषांतर; स्थलविशेषीं भाष्याचें स्पष्टीकरण आणि भाष्याला धरून नसलेल्या गीतेवरील अद्वैतपंथी टीकांचा युक्तायुक्त विचार; येणेंप्रमाणें विषयांचा क्रम ठेविला आहे. ह्या मासिकपुस्तकाचें पहिलें वर्ष संपूर्ण होऊन दुसऱ्या वर्षाचे २ अंक प्रसिद्ध झाले आहेत. गुदस्त सालच्या अपरिहार्य कारणामुळें हें मासिकपुस्तक आजपर्यंत बंदच ठेवावें लागलें होतें तें आतां नियमितपणें सुरू झालें आहे. गीतेंतील चवथा अध्याय संपूर्ण होत आला आहे. पुस्तकाचा साचा अष्टपत्री असल्यामुळें ... शपत्री साच्याच्या ६० पृष्ठांपेक्षांही मजकुर ह्यांत जास्त जातो. कागद अति उत्तम मोहरेदार असून छपाई सुबक होत असल्याचें तर प्रसिद्धच आहे. वर्षाचे ... अगाऊ वर्गणी अवघी ट. ह. सह २८६ आहे. हा विषय ३ वर्षे चालेल असा अदमास आहे.

**काशिनाथ वामन लेले**
व्यवस्थापक आर्यधर्मरहस्य
वाई. जि. सातारा.